म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ३९२

॥ श्रीराम समर्थ ॥

सत्कार्योत्तेजक सभा – धुळें

# सुवर्णमहोत्सव ग्रंथ

★

REFBK-0006384

शक १८६५ ज्येष्ठ शु. ४

६२३० ६३८०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
सं. ...............
ता. ...............
ठाणे

सत्कार्योत्तेजक सभा - धुळें

श्री

# रामदास आणि रामदासी

भाग ५० वा

सर ५ वा ] ★ [ मणि ६ वा

## सत्कार्योत्तेजक सभा

# सुवर्णमहोत्सव ग्रंथ

आम्ही स्वामीचे अंकित । रामनामें मुद्रांकित ॥

संपादक — गणेश शंकर देव, धुळें

★

१८६५ ज्येष्ठ शुद्ध ४ सोमवार
राज्याभिषेक शक २६९

REFBK-0006384

मूल्य पाच रुपये

प्रकाशक
शंकर श्रीकृष्ण देव, बी. ए., एल्एल्. बी.
चिटणीस, सत्कार्योत्तेजक सभा, धुळें

आपआपल्या लेखांचे सर्व हक्क त्या त्या लेखकांनीं
आपआपल्याकडे राखून ठेविले आहेत.

मुद्रक
द्वारकानाथ भगवंत कर्णिक, बी. ए., एल्एल्. बी.
न्यू टाइम्स प्रिंटरी, लि., गिरगांव, मुंबई

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

॥ श्रीरामसमर्थ ॥

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठांक |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... | ३ |
| (१) सत्कार्योत्तेजक सभेचें कार्य | ३ |
| (२) ग्रंथाचें संपादन | १३ |
| श्रीसद्गुरुस्तवन | १६ |
| (१) कवि विनायककृत सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेचें अष्टक (गणेश शंकर देव, धुळें) | ३ |
| (२) सत्कार्योत्तेजक सभा – धुळें, स्थापनेची सभा ... (रा. कृष्णाजी शंकर दीक्षित, पुणें) | ६ |
| (३) सन १८९८ तील सत्कार्योत्तेजक सभा ... (गणेश शंकर देव, धुळें) | ११ |
| (४) सत्कार्योत्तेजक सभा – धुळें, देव – चांदोरकर – भट (रा. कृष्णाजी बळवंत महाबळ, नाशिक) | १५ |
| (५) सत्कार्योत्तेजक सभेचीं पहिलीं बारा वर्षें .... (रा. गोपाळ रावजी गोगटे, भुसावळ) | २१ |
| (६) एक क्रांतिकारक महंत .... ... (प्रो. नारायण केशव बेहेरे, नागपुर) | २९ |
| (७) रामदास स्वामी आणि महंमद पैगंबर ... (रा. के. ना. डांगे, मंदसोर) | ४८ |
| (८) श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली काय ? .... (रा. गणेश गोविंद कारखानीस, विजापूर) | ६९ |
| (९) रामदासांचा उपदेश व उद्योग महाराष्ट्रराज्याला विघातक ठरला काय ? ... (प्रो. त्र्यंबक शंकर शेजवलकर, पुणें) | ८३ |
| (१०) श्रीसमर्थोक्त शिवचरित्र ... .... (रा. अनंतदास रामदासी, गिरड) | ९१ |

(११) श्री समर्थांच्या जीवींचें आर्त—मराठा आणि
महाराष्ट्रधर्म व राज्य .... ... ११३
(रा. त्रिंबक रामकृष्ण गद्रे, अकोला)
(१२) श्री समर्थांची शिकवण व थिऑसफी .... १२०
(प्रो. राजाराम सखाराम भागवत, ठाणें)
(१३) श्री समर्थांची शिकवण व भगवद्गीता .... १३०
(रा. वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर, अकोला)
(१४) महाराष्ट्रक्रांती व रामदासांची भूमिका ... १३७
(प्रो. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर, काशी)
(१५) श्री समर्थ रामदास आणि साहित्यशास्त्र ... १५७
(डॉ. के. ना. वाटवे, पुणें)
(१६) समाजसुधारक समर्थ ... ... १६८
(रा. गजानन वासुदेव कवीश्वर, इंदूर)
(१७) कवि विनायकांच्या आणखी दोन कविता ... १७९
(गणेश शंकर देव, धुळें)
(१८) श्री मध्वाचार्य व श्री समर्थ यांचा संप्रदाय .... १८३
(रा. बाळाचार्य खुपेरकर, कोल्हापुर)
(१९) वऱ्हाडांतील समर्थांचे शिष्य आणि त्यांची
सांप्रदायिक कामगिरी .... ... १८९
(रा. यशवंत खुशाल देशपांडे, यवतमाळ)
(२०) समर्थांचें व्यक्तिवैशिष्ट्य दर्शविणारे शब्दप्रयोग ... २०२
(रा. श्रीधर सखाराम पंडित, पुणें)
(२१) समर्थकृपेचीं वचनें तो हा दासबोध ... २१४
(रा. अनंत सखाराम वणीकर, अहमदाबाद)
(२२) श्री समर्थसंप्रदाय व स्त्रीसमाज .... ... २१९
(कु. गार्गी भाटवडेकर, मुंबई)
(२३) श्री समर्थ आणि धर्मप्रचार ... ... २३१
(रा. वा. कृ. दाणी, दारव्हा)
(२४) श्री समर्थ आणि संगीत ... ... २३६
(रा. राजाराम गणेश पंडित, माहुली)

(२५) सोलीव सुख ... .... .... २४१
(सर मोरोपंत जोशी, उमरावती)
(२६) श्री रामदासपंचायतनांतील केशवस्वामी भागानगरकर २४७
(प्रिन्सिपॉल दामोदर केशव ओक, नागपुर)
(२७) रामेण रामदासेन लिखितं वाल्मीकिरामायणम् २६८
(रा. नरहर दामोदर शास्त्री, धुळें)
(२८) श्री समर्थकालीन मठ व त्यांची दिसणारी कामगिरी २८३
(रा. सा. बाबासाहेब देशपांडे, पुणें)
(२९) शककर्ते समर्थ ... .... ... २९२
(प्रिन्सिपॉल जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, मुंबई)
(३०) समर्थांची शिकवण कालबाह्य होणारी नसून
शाश्वत आहे ... .... .... २९८
(आचार्य श्रीराम गोसावी, नाशीक)
(३१) समर्थसंप्रदायाची दक्षिणेंतील एक विद्यमान परंपरा ३०३
(प्रो. रा. वि. ओतुरकर, पुणें)
(३२) रामदासांची काव्यदृष्टि ... ... ३१४
(प्रो. रामचंद्र श्रीपाद जोग, पुणें)
(३३) दासबोधांतील कांहीं व्याकरणविशेष ... ३२४
(रा. हरि नारायण नेने, नागपुर)
(३४) समर्थांचें शब्दसामर्थ्य ... ... ३४७
(प्रो. शंकर केशव कानेटकर, सांगली)
(३५) श्रीसमर्थवाङ्मयाचें नव्यानें परिशीलन करण्याची आवश्यकता ३५४
(प्रो. प्रभाकर वासुदेव बापट, ग्वाल्हेर)
(३६) जेझीया कराबद्दल अवरंगजेब बादशहास लिहिलेल्या पत्राचा ३६३
जनक कोण? शिवाजी, कां अन्य कोणी?
(रा. भास्कर वामन भट, धुळें)
(३७) समर्थ तुकारामबोवांचे गुरु असतील कां? ३६९
(प्रो. शंकर वामन दांडेकर, मुंबई)
(३८) समर्थकालीन इतिहासाचें एक अलक्षित अंग ३७५
(प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी, नागपुर)

(३९) जुना दासबोध आणि नवा दासबोध ... ३९३

(रा. जनार्दन सखाराम करंदीकर, पुणें)

(४०) श्री समर्थांचा संप्रदाय ... .... ४१०

(रा. यशवंत सूर्यराव सरदेसाई, मुंबई)

(४१) श्रीसमर्थांचा "उत्तम पुरुष" ... ४१२

(प्रो. नरहर रघुनाथ फाटक, मुंबई)

(४२) सत्कार्योत्तेजक सभेचें स्थापनाकालीन ग्रहदृष्ट्या निरीक्षण ४२२

(होराभूषण दीक्षित, पुणें)

(४३) श्रीसमर्थसंप्रदाय आणि त्याचें भवितव्य ... ४२९

(शंकर श्रीकृष्ण देव, धुळें)

(४४) सत्कार्योत्तेजक सभा चिरायु होवो ... ४३९

(गणेश शंकर देव, धुळें)

(४५) प्रार्थना ... ... ... ४४३

(रा. दुर्गाराम बाल हरिदास, मंगळूर)


## परिशिष्टें


(१) सत्कार्योत्तेजक सभा–धुळें, संस्थेची घटना ... ४४७

(२) सत्कार्योत्तेजक सभेचें ५० वर्षांचें प्रकाशन ... ४५१

(३) सत्कार्योत्तेजक सभेचे ५० वर्षांतील लेखक ... ४५६


## फोटो


(१) महाराणी श्रीमंत सौ. इंदिराबाईसाहेब होळकर पृष्ठांक ९ समोर

(२) कै. गणेश जनार्दन आगाशे ... पृष्ठांक ५ समोर

(३) शंकर श्रीकृष्ण देव, धुळें ... पृष्ठांक ७ समोर

(४) कवि विनायकांचें हस्ताक्षर ... पृष्ठांक १८१ समोर

(५) श्री समर्थ ... ... पृष्ठांक २३७ समोर

॥ श्रीरामसमर्थ ॥

# सत्कार्योत्तेजक सभा-धुळें
# सुवर्णमहोत्सव ग्रंथ

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्थळ प्रत सं. नं. ता. ठाणे

## प्रस्तावना

(१)

## सत्कार्योत्तेजक सभेचें कार्य

### (१) सुवर्णमहोत्सव ग्रंथ

सुमारें बारा महिने होत आले, सत्कार्योत्तेजक सभेच्या सुवर्णमहोत्सव ग्रंथाची कल्पना मनांत आणली. श्रीसमर्थवाग्देवतामंदिराच्या, १८६४ ज्येष्ठ शुद्ध १३ च्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं एकदोघांजवळ बोललों होतों. या ग्रंथनिर्मितीच्या मार्गांत लेख, द्रव्य, छापखाना, कागद, अशा अनेक अडचणी होत्या. सगळ्या च दूर होऊं शकल्या, असें नाहीं; पण त्यामुळें हें घडून कसें येईल याची चिंता वाटे. शेवटीं “ येत्न तो देव जाणावा ” या श्रीसमर्थांच्या शिकवणीप्रमाणें प्रयत्न तर करून पहावा असें मनांत येऊन गेल्या नवंबर महिन्यांत देवांपाशीं सहज गोष्ट काढली; अडचणी येतील च, पण त्या दूर हि होतील, असें सांगून त्यांनीं अनुमति दिली, पण ती देतांना कांहीं गोष्टी टाळण्याविषयीं स्पष्ट बजाविलें. त्याप्रमाणें कांहीं गोष्टी टाळतां आल्या, आणि कांहीं गोष्टी टाळतां आल्या नाहींत. असो;

या ग्रंथाची कल्पना कळवून “ श्री समर्थचरित्रग्रंथसंप्रदायादिविषयक लेख ” पाठविण्याविषयीं अनेक विद्वानांना विनंति करण्यासाठीं पत्रें लिहिलीं, आणि बहुतेकांनीं आपली संमति कळविली. वास्तविक, मी पत्रें लिहावीं आणि अशा थोर थोर विद्वानांनीं लेख पाठवावे, ही माझी योग्यता नव्हे. मी हें जाणतों. हे लेख मिळण्याचें सारें श्रेय सत्कार्योत्तेजक सभेच्या कार्याला आहे, हें कोणी हि सांगेल.

या ग्रंथाच्या लेखकांत अध्यापक आहेत, प्राध्यापक आहेत, पंडित आहेत, वकील आहेत, समाजसेवक आहेत, कार्यकर्ते आहेत, संशोधक आहेत, सांप्रदायिक आहेत, अभ्यासु आहेत, सारांश, नाहीं कोण ? जणूं कांहीं, महाराष्ट्रांतील साहित्यिकांचें हे लेखी संमेलन च होय. म्हणून उत्तरेकडील काशीग्वाल्हेरपासून

दक्षिणेकडील सांगलीकोल्हापुरपर्यंतच्या, आणि पूर्वेकडील नागपुरपासून पश्चिमेकडील मुंबईपर्यंतच्या थोर थोर लेखकांनीं पाठविलेले हे लेख म्हणजे सत्कार्योत्तेजक सभेला या विद्वानांच्या द्वारें बृहन्महाराष्ट्रानें दिलेलीं आशीर्वचनें च होत, असें मी समजतों. अवघ्या महाराष्ट्रानें सत्कार्योत्तेजक सभेच्या कार्याचा हा गौरव केला असा याचा अर्थ होतो. सत्कार्योत्तेजक सभा या सर्व लेखकांची ऋणी आहे.

## (२) तें कार्य

उभ्या महाराष्ट्रानें ज्या कार्याचा असा गौरव करावा, तें कार्य तरी कोणतें? तें दोन प्रकारचें आहे, एक दिसूं शकतें आणि एक भासूं शकतें. सत्कार्योत्तेजक सभेचें सुमारें २१००० पृष्ठांच्या ७४ ग्रंथांचें प्रकाशन, जांबेचें श्रीसमर्थमंदिर, धुळ्याचें श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, आणि त्या मंदिरांतील "ज्या संग्रहांत महाराष्ट्राच्या श्री शिवरायादि छत्रपतींचीं हस्ताक्षरें आहेत, खुद्द श्रीसमर्थांचें स्वदस्तुरचें पत्र आहे, त्रिभुवनांत दुसरीकडे कोठें नसलेली, श्रीसमर्थांनीं स्वतः लिहिलेली वाल्मीकि रामायणाची प्रत आहे, अनेक ऐतिहासिक आणि सांप्रदायिक थोर व्यक्तींचीं हस्ताक्षरें आहेत, इतिहासाचीं साधनें असणारीं दोन अडीच हजार कागदपत्रें आहेत, महाराष्ट्राच्या सहाशें वर्षांच्या काळांतील बहुतेक साधुसंतांची थोडीफार कविता आहे, शके ११४० ते १७४० या सहाशें वर्षांच्या काळांत महाराष्ट्रांतील धार्मिक विचारांचा प्रवाह कसा वहात होता, हें कळण्याचीं विपुल साधनें ज्या संग्रहांत आहेत", असा हस्तलिखितांचा संग्रह, या सर्व बाबींचा दृश्य कार्यांत समावेश होतो. भासमान होणाऱ्या कार्याची कल्पना दृश्य कार्याच्या ज्ञात परिणामांवरून करावयाची आहे. सभेनें एक प्रकारचें शैक्षणिक कार्य अव्याहतपणें ५० वर्षें चालविलें आहे. आरंभीं आरंभींच्या व्याख्यानमाला, सभासदांच्या बैठकी, २-३ ग्रंथमाला, रामदास आणि रामदासी मासिक, इतिहास आणि ऐतिहासिक मासिक, भेटीगांठी, विचारविनिमय, संशोधनाचे व इतर दौरे, या व अन्य मार्गांनीं सभेनें एक च एक गोष्ट महाराष्ट्राच्या मनावर ठसविण्याचा सारखा प्रयत्न केला आहे.

सत्कार्योत्तेजक सभा स्थापन झाली ती कशासाठीं? "देशकार्य करावयाचें, समाजांत देशसेवेची स्फूर्ति उत्पन्न करावयाची, ज्ञानाची ज्योत जास्त प्रदीप्त करावयाची, लोकांत विभूतिपूजा जागृत करावयाची अशा तऱ्हेची कॉलेजांत जाणाऱ्या या तरुण मंडळींची ध्येय-सरणी होती. पण त्या ध्येयास सातत्य राहणेस्तव एकादी संस्था निर्माण केली पाहिजे, ही रा. शंकरराव देवांची पहिल्यापासून खटपट" असें या ग्रंथांतील "स्थापनेची सभा" या आपल्या लेखांत सांगून रा. दीक्षित लिहितात:

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ............
ठाणें.



श्रीमंत सौभाग्यवती
महाराणी इंदिराबाईसाहेब होळकर, इंदूर

"भाषा **प्राकृत** उन्नतीस चढवा–काया करा अर्पण –
**आर्यावर्त**हितास. द्या सतत **सत्कार्यास उत्तेजन** ॥
हा च मुळीं 'सभेच्या' स्थापनेचा उद्देश होता."

जांबेच्या श्रीसमर्थमंदिराची स्थापना हि यासाठीं च. "सचित्र श्रीसमर्थमंदिर जांब" या वृत्तचर्चेच्या पांचव्या खंडांत जांब येथील श्रीसमर्थमंदिरांत झालेल्या श्रीसमर्थमूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेची हाकिकत देतांना देव लिहितातः "बृहन्महाराष्ट्रांतील लक्षावधि महाराष्ट्रियांच्या अंतःकरणाला जी तळमळ लागली आहे. + + + (तिचें) फळ म्हणजे आज झालेली श्रीसमर्थांची प्राणप्रतिष्टा होय. ××× सर्वांची दृष्टि पुनरपि श्रीसमर्थचरणांकडे वळली आहे. सर्वांचे शुद्ध संकल्प फलद्रूप झाल्यावांचून रहाणार नाहींत. श्रीसमर्थांना करुणा आली च पाहिजे. अवतार घेतल्यावांचून त्यांना गत्यंतर कोठें आहे?" महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणाला लागलेली तळमळ कशासाठीं आहे? सर्वांची दृष्टि पुनरपि श्रीसमर्थचरणांकडे वळली आहे, ती कशासाठीं? श्रीसमर्थांना करुणा येऊन सर्वांचे शुद्ध संकल्प फलद्रूप व्हावयाचे, ते शुद्ध संकल्प कोणते? आणि श्रीसमर्थांनीं अवतार घ्यावयाचा तो कशासाठीं? त्या लेखाच्या शेवटीं महाराष्ट्राच्या वतीनें देवांनीं श्री समर्थांपाशीं मागणें मागितलें आहे, तें हें:

समर्थानें समर्थ करावें। तरी च समर्थ म्हणवावें।
त्रैलोक्यास पडिलें ठावें। सामर्थ्य ज्याचें॥

श्रीसमर्थांच्या समर्थांनीं समर्थांना समर्थ केलें आणि बंदविमोचनाचें आपलें सामर्थ्य त्रैलोक्याच्या नजरेस पुन्हां आणून दिलें. महाराष्ट्रानें श्रीसमर्थांपाशीं केलेलें मागणें हें च ना, कीं, समर्था, समर्थ हें नांव सार्थपणें मिरवावयाचें असेल, तर महाराष्ट्राला समर्थ करा आणि बंदविमोचनाचें आपलें सामर्थ्य जगास पुन्हां एकवार पटवून द्या.

धुळ्याचें श्रीसमर्थवाग्देवतामंदिर हि या च साठीं. एक च उदाहरण देतों. श्रीमंत महाराणी सौ. इंदिराबाईसाहेब होळकर, इंदूर, यांच्या हस्तें या मंदिराचें उद्घाटन झालें आहे. तें करण्यापूर्वी श्रीमंतांनीं त्या वेळीं केलेल्या भाषणाच्या शेवटीं "आर्यावर्तांतील सर्व देवता, ऋषिमुनी, आचार्य, योगी, तपस्वी, साधुसंत यांचे चरणीं नम्र नमन करून" प्रार्थना केली कीं, श्रीसमर्थवाङ्मय "आमचें भावी पिढीस समर्थ करो, असा आशीर्वाद द्या." भावी पिढी समर्थ व्हावी, ती कशासाठीं?

रामदास आणि रामदासी ग्रंथमाला, इतिहास आणि ऐतिहासिक ग्रंथमाला, महाराष्ट्रधर्म ग्रंथमाला, या माला कशासाठीं? रामदास आणि रामदासी मासिक

कशासाठीं ? इतिहास आणि ऐतिहासिक मासिक कशासाठीं ? श्री शिवजन्मोत्सव कशासाठीं ? "आपण कोण" याचा विचार कशासाठीं ? आणि जपानच्या मर्दुमकीचें वर्णन तरी कशासाठीं ? सत्कार्योत्तेजक सभेचें सारें प्रकाशन कशासाठीं ?

सारांश, सत्कार्योत्तेजक सभेचें सारें, सारें कांहीं कशासाठीं ? एका च गोष्टीसाठीं.

पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काल

ही गोष्ट महाराष्ट्राच्या मनावर अढळ बिंबलेली रहावी, महाराष्ट्राला त्या पूर्व दिव्याचें विस्मरण होऊं नये आणि भावि रम्य कालाकडे लागलेली महाराष्ट्राची दृष्टि अचल असावी म्हणून. सभेनें प्रत्येक गोष्ट केली ती एवढ्याचसाठीं. सभेच्या प्रकाशनावरून हें स्पष्ट दिसून येतें.

"छत्रपति श्रीशिवाजी महाराज व शिवजन्मोत्सव" हें सत्कार्योत्तेजक सभेचें पहिलें प्रकाशन होय. शक १८२१ च्या वर्षप्रतिपदेला तें प्रसिद्ध झालें. या ग्रंथाच्या पहिल्या पंधरा पृष्ठांत महाराष्ट्रांत नुकत्या च सुरू झालेल्या शिवजन्मोत्सवावर घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांचें खंडण देवांनीं केलें असून, बाकीच्या पृष्ठांत सभेचे दुसरे एक संस्थापक कै. काशिनाथ पांडुरंग ऊर्फ काका पिंपळखरे यांनीं श्रीशिवचरित्र वर्णिलें आहे. ग्रंथाच्या शेवटीं शेवटीं रा. पिंपळखरे लिहितात : "शिवाजी देव होता असें अगोदर च गृहीत धरणें म्हणजे त्यांनीं केलेलीं कृत्यें करण्यास आपण असमर्थ आहों असा पुरावा आणणें होय. + + शिवाजीच्या हातून जी देशसेवा झाली, जीं सत्कार्यें झालीं, तशा प्रकारची देशसेवा हरएक देशाच्या प्रत्येक मनुष्यास कर्तव्य आहे." "जपानी लोकांच्या व आमच्या गुणदोषांत बरेंच साम्य आढळून येतें. असें आहे तर मग त्यांच्या व आमच्या सांप्रतच्या स्थितींतही पुष्कळ साम्य असावयास पाहिजे होतें" असें वाटून "टीचभर जपानच्या राष्ट्रानें तीस चाळीस वर्षांत सुधारणेचें शिखर गांठलें" तें कशाच्या बळावर याचा विचार करण्याकरितां देवांनीं शक १८२५ त "जपानची मर्दुमकी" वर्णिली. या पुस्तकावर अभिप्राय देतांना कै. शिवरामपंत परांजपे यांचा सन १९०३ चा "काळ" म्हणतो: "हें पुस्तक आपल्या सध्यांच्या स्थितीला फारच बोधप्रद होण्यासारखें आहे. आपण कसे मोठे होऊं, हा विचार ज्यांच्या मनांत घोळत आहे, त्यांच्या डोळ्यापुढें दुसरे कसे मोठे झाले याबद्दलची उदाहरणें जितकीं पुष्कळ येतील तितकीं तीं थोडीं च आहेत." "आपण कोण" होतों, कोण आहोंत व कोण होऊं याचा विचार करणाऱ्या सत्कार्योत्तेजक सभेचें लक्ष रामदासी वाङ्मयाकडे न वळतें तर च आश्चर्य.

या च दृष्टीनें सत्कार्योत्तेजक सभेचें लक्ष रामदासी वाङ्मयाकडे आकर्षिलें गेलें आणि शक १८२७ त रामदास आणि रामदासी ग्रंथमालेचा पाहिला भाग " श्रीमत् दासबोध " सभेनें प्रसिद्ध केला. त्याच्या प्रस्तावनेंत देव म्हणतात : " समाजाला अशी हीन स्थिती प्राप्त झाली असतां श्रीमत् दासबोध ग्रंथाचें प्रयोजन काय होतें तें शब्दांनीं सांगितलें च पाहिजे काय ? + + स्वतःचा प्रपंच प्राणिमात्र करीत आहेत. स्वबांधवांचा प्रपंच करण्यांत च मनुष्याची श्रेष्ठता आहे. हा बोध म्हणजे च महाराष्ट्रधर्माचें शिक्षण होय. अलिकडच्या भाषेंत याला च स्वदेशाभिमान म्हणतात. असलें शिक्षण देणारा प्राकृतांत तरी एवढा च ग्रंथ आहे. + + जें कार्य एकवार या ग्रंथानें महाराष्ट्राच्या हातून घडविलें तें च कार्य करण्याची पात्रता या ग्रंथाच्या आश्रयानें केव्हां हि महाराष्ट्राला येणार आहे." ग्रंथमालेचा नुकता च प्रसिद्ध झालेला ग्रंथ देवांचें " श्रीसमर्थहृदय," त्यांत हि तें च. " श्रीसमर्थ-हृदय " ग्रंथाची अकरा प्रकारांची फलश्रुती देवांनीं सांगितली आहे. त्यांत आठवी फलश्रुति ते देतात, ती अशी : या ग्रंथाच्या अवलोकनानें " स्वराज्य आणि स्वाराज्य प्राप्त करून घेण्याची दिशा दिसूं लागेल."

मी हें सारें आपलेपणानें म्हणतों असें कोणास वाटण्याचा संभव. म्हणून त्रयस्थांचे अभिप्राय पाहिले पाहिजेत. धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील श्रीसमर्थवाङ्मयाकडून इंदूरच्या महाराणी श्रीमंत सौ. इंदिराबाईसाहेब होळकर कोणती अपेक्षा करितात, हें आपण वर पाहिलें च आहे. जांब येथील श्रीसमर्थ-मंदिराविषयीं ज्ञानप्रकाशकार लिहितात : " श्रीसमर्थांच्या या स्मारकमंदिरानें महाराष्ट्राचा मोगलाईतील भाग व ब्रिटिश हद्दींतील भाग यांत एक फार चांगला दुवा निर्माण झाला आहे, यांत शंका नाहीं." सारांश, मोगलाईतील महाराष्ट्र आणि ब्रिटिश हद्दींतील महाराष्ट्र या महाराष्ट्राच्या दोन विभागांना या दुव्यानें सांधून कांहीं तरी साधावयाचें आहे तर! सत्कार्योत्तेजक सभेच्या प्रकाशनाविषयीं कोण काय म्हणतात हें सविस्तरपणें सांगण्याला आज माझ्या हातीं आवश्यक तीं साधनें नाहींत. पण थोड्यावरून सारें जाणावयाचें असल्यास रामदास आणि रामदासी मासिकाच्या कार्याविषयीं नागपुरचे डॉ. पेंडसे काय म्हणतात तें पाहिलें म्हणजे पुरें होईल, असें वाटतें. " चौथा सुमनहार " या ग्रंथांतील " रामदास आणि रामदासी मासिकाचें कार्य " या आपल्या लेखांत डॉ. पेंडसे लिहितात : " म्हणून स्वधर्म आणि स्वसंस्कृति रक्षिण्याचें सामर्थ्य ज्याच्यायोगें येईल अशा स्वराज्यस्थापनेकरितां राजकारण हि केलें च पाहिजे. धर्म आणि राजकारण यांचा हा अन्योन्य संबंध लोकांच्या मनावर ठसविण्याचें कार्य ' रामदास आणि रामदासी ' मासिकानें गेलीं दोन तपें निष्ठेनें केलें. ++ स्वधर्माकरितां स्वराज्य-स्थापना हें साध्य ठरल्यावर याचें प्रमुख साधन म्हणून संघटनेचा पुरस्कार

या मासिकानें केला. ++ ही संघटना घडवून आणण्यासाठीं, अखंड तजविजी, अखंड चाळणा केल्या पाहिजेत. व त्याकरितां आळस सोडून कामाला लागलें पाहिजे. आळस घात करणारा आहे तो टाकून द्या आणि 'यत्नाला देव' मानून कामाला लागा हा समर्थांचा संदेश बरोबर पोंचून आळसाचा तिरस्कार आणि प्रयत्नाचा पुरस्कार या मासिकानें अव्याहत केला आहे. ++ महान् कार्यांच्या सिद्धीसाठीं प्रयत्नपूर्वक केलेली संघटना दुर्बल आणि लेच्यापेच्या लोकांची असून उपयोगी नाहीं म्हणून बौद्धिक, मानसिक व शारीरिक शक्तीच्या संपादनाचें महत्त्व या मासिकानें प्रतिपादिलें. ++ राष्ट्रीय जीवनांत युक्ति आणि शक्ति या दोहोंचा उपयोग असल्यामुळें एकाला श्रेष्ठ आणि एकाला कनिष्ठ न मानितां शक्तियुक्तीच्या समन्वयाचा पुरस्कार करून 'शक्तियुक्ति जये ठायीं। तेथें श्रीमंत धांवती' या समर्थांच्या उपदेशाचें महत्त्व लोकांना पटविण्याची महत्त्वाची कामगिरी या मासिकानें केली. तात्पर्य, सशक्त व्हा, प्रयत्नवादी बना, आळस टाकून देऊन संघटित व्हा आणि संघशक्तीच्या साहाय्यानें स्वराज्यस्थापना करून स्वधर्म आणि स्वसंस्कृति यांचें संरक्षण करा, हा समर्थांचा तेजस्वी संदेश महाराष्ट्राच्या कानावर गेलीं पंचवीस वर्षें या मासिकानें घातला."

नुसत्या रामदासी मासिकाच्या द्वारा च नव्हे, तर नानाविध मार्गांनीं श्री समर्थांचा हा तेजस्वी संदेश सत्कार्योत्तेजक सभेनें महाराष्ट्राच्या कानीं घातला. सभेचे त्या वेळचे, दरम्यानचे आणि आजचे सभासद आपआपल्यापरी महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनासाठीं धडपडत आहेत. अनेक उदाहरणें असतील, तीं सारीं आपल्याला माहीत नाहींत इतकें च. अगदीं लहानसें उदाहरण द्यावयाचें झाल्यास या च ग्रंथांतील लेखक रा. दीक्षित आणि त्यांचे बंधु यांचें देतां येईल. "स्थापनेची सभा" या आपल्या लेखांत "त्या पहिल्या सभेंत आम्हांस जो प्रकाश मिळाला, त्याचा आम्हां बंधुद्वयास जन्मभर उपयोग होत आहे" असें सांगून आपण व आपल्या बंधूंनीं चालविलेल्या शैक्षणिक कार्याचा उल्लेख त्यांनीं अगदीं थोडक्यांत केला आहे. वर उल्लेखिलेल्या आपल्या लेखांत डॉ. पेंडसे हि म्हणतात च कीं, रामदासी मासिकानें "जे केवळ भौतिकवादी, जडवादी किंवा सुखवादी राजकारणी होते त्यांना धर्माकडे आणि अध्यात्माकडे हि लक्ष देण्यास लाविलें; आणि जे केवळ निवृत्तिवादी किंवा अध्यात्मवादी धार्मिक होते त्यांना राजकारणाकडे हि लक्ष दिलें पाहिजे असें वाटावयास लावलें." डॉ. पेंडसे यांच्या लेखणींतून हे शब्द उतरतांना त्यांच्या दृष्टीसमोर तशा कांहीं व्यक्ति निःसंशय असल्या पाहिजेत. नामनिर्देश करणें बरें नव्हे म्हणून च नांवें न सांगतां मी हि निश्चितपणें असें म्हणूं शकतों कीं, सत्कार्योत्तेजक सभेच्या लिखाणा-मुळें–देवांच्या लिखाणामुळें–आपलें लक्ष राजकारणाकडे वळलें असें त्यांना कळविणाऱ्या

दहा पांच तरी व्यक्ति मला ठाऊक आहेत. त्यांपैकीं कांहींनीं याचें श्रेय देवांच्या दासबोधाच्या प्रस्तावनेला दिलें आहे. या व्यक्तींत महात्माजींच्या परिसरांत प्रमुखत्वानें वावरणारी एकादी व्यक्ति आहे, त्याप्रमाणें च हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांत हि प्रमुख गणल्या जाणाऱ्या दोन तीन व्यक्ति आहेत. सत्कार्योत्तेजक सभेनें महाराष्ट्राच्या केलेल्या अल्पशा सेवेचें स्वरूप हें असें आहे. सारांश, आपलें कोणतें हि लहान मोठें कार्य करतांना सत्कार्योत्तेजक सभेचें लक्ष एका च ध्रुव ताऱ्यावर केंद्रित झालेलें असतें; आणि सभेचा ध्रुव तारा म्हणजे तुमच्या आमच्या, सर्वांच्या, अंतर्यामींची इच्छा, " रामराज्य करणें सर्वत्र हो."

**( ३ ) तेवढें तरी करूं या**

गेल्या ४०-५० वर्षांत सत्कार्योत्तेजक सभेकडून महाराष्ट्राची ही जी सेवा झाली, तिचें श्रेय त्यांचें त्यांना ! सत्कार्योत्तेजक सभेचें, सभेच्या सभासदांचें महत्व तें किती ! श्रीसमर्थांच्या मनांत आलें, तें, कोणाला तरी निमित्त करून, त्यांनीं घडवून आणलें. त्यांच्या मनांत येईल, तेव्हां तो सुदिन हि उगवणार आहे. तो लवकर उगवावा ही आपली इच्छा. त्यासाठीं श्रीसमर्थांना आळविण्यापलिकडे आज आपल्या हातीं दुसरें काय आहे ? तेवढें तरी आपण करूं या. समर्थ घडवून आणतील हें निश्चित.

## ( २ )

## ग्रंथाचें संपादन

**( १ ) लेख**

सत्कार्योत्तेजक सभेच्या दृष्टीनें या ग्रंथांतील लेखांचें महत्व काय आहे याचा विचार करतांना, या ग्रंथांत ज्यांचे लेख आले आहेत, त्यांचें तें ऋण प्रस्तावनेच्या आरंभीं मी मान्य केलें च आहे. पण ज्यांचें लेख या ग्रंथांत येऊं शकले नाहींत, त्या सर्वांनीं सत्कार्योत्तेजक सभा आणि तिचें कार्य याविषयीं आपली सहानुभूति दर्शविली याचा मला आनंद होतो. लोकनायक बापुजी अणे, अलाहाबाद विश्वविद्यालयाचे प्रो. रामचंद्र दत्तात्रय रानडे, 'सह्याद्रि' चे संपादक रा. दिनकर विनायक काळे, पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. श्रीपाद रामचंद्र पारसनीस, सर परशुरामभाऊ कॉलेजचे प्रो. श्रीपाद महादेव माटे, भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे प्रो. दत्तो वामन पोतदार व रा. शंकर नारायण जोशी, मुंबईच्या रामनारायण रुइया कॉलेजचे प्रो. दत्तात्रय केशव केळकर, इंदूरचे श्रीमंत सरदार माधवराव विनायक किबे, उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजचे प्रो. विष्णु भिकाजी कोलते, यवतमाळचे

रा. वामन नारायण देशपांडे वगैरे थोरांच्या सहानुभूतीला निःसंशय महत्व आहे, आणि म्हणून या सर्वांनीं दाखविलेल्या सहानुभूतीबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों; आणि या सर्वांनीं आपापले लेख श्री रामदास आणि रामदासी मासिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या "सुमनहार" ग्रंथासाठीं सवडीनें पण अवश्य पाठवावे, आणि ज्यांचे आले आहेत त्यांची ते सुमनहारांत गोंवण्यास परवानगी असावी, अशी येथें च विनंति करून ठेवतों.

## (२) फोटो

या ग्रंथांतील फोटो प्रसिद्ध होण्याच्या कामीं ज्यांचें ज्यांचें सहाय्य झालें त्या सर्वांचा मी आभारी आहे. असें फोटो एकंदर पांच आहेत: (१) श्रीमंत महाराणी सौ. इंदिराबाईसाहेब होळकर, इंदूर, (२) कै. गणेश जनार्दन आगाशे, (३) शंकर श्रीकृष्ण देव, (४) कवि विनायकांचें हस्ताक्षर, आणि (५): श्री समर्थ. श्री समर्थांवांचून सत्कार्योत्तेजक सभेचा सुवर्णमहोत्सव ग्रंथ कसा निघावा? कवि विनायक हे सत्कार्योत्तेजक सभेचे एक संस्थापक. त्यांची एक नवीन कविता, आणि ती ही त्यांच्या च हस्ताक्षरांत, या ग्रंथांत देण्यांत यावी, हें योग्य च होय. देवांच्या फोटोशिवाय सत्कार्योत्तेजक सभेचा सुवर्णमहोत्सव ग्रंथ पुरा च होऊं शकत नाहीं, अशी माझी व्यक्तिगत भावना आहे. गणेश जनार्दन आगाशे हे तर सत्कार्योत्तेजक सभा ज्या सभेंत स्थापन झाली त्या सभेचे अध्यक्ष होते. सत्कार्योत्तेजक सभेच्या कार्याशीं श्रीमंत महाराणीसाहेबांचा संबंध गेल्या दहा पंधरा वर्षांत च आला, पण तेवढ्यांत ही श्रीक्षेत्र जांब येथील श्रीसमर्थमंदिरास रु. १००८ व तेथील "दासविश्रामधाम" या निवासस्थानास रु. ५०००, धुळ्याच्या श्रीसमर्थ-वाग्देवतामंदिरास रु. १००८, व सत्कार्योत्तेजक सभेला रु. १००८, इत्यादि, अनेक कारणांनीं सत्कार्योत्तेजक सभेनें चालविलेल्या श्रीसमर्थांच्या त्रिविध कार्यास श्रीमंतांकडून बहुमोल साहाय्य झालें आहे. पण एवढ्यानें च झालें नाहीं; इंदूरहून मुद्दाम तेवढ्यासाठीं धुळ्यास येऊन श्रीसमर्थवाग्देवतामंदिराचें उद्घाटन स्वहस्तें करून श्रीमंतांनीं सत्कार्योत्तेजक सभेस उपकृत केलें आहे.

## (३) प्रकाशनाची मंद गति

शक १८१५ ते १८६५ या पन्नास वर्षांत जे ७४ ग्रंथ सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केले, त्यांत अवघे ४६ भाग श्री रामदास आणि रामदासी ग्रंथमालेचे आहेत; आणि आपली तर इच्छा आहे कीं, १२१ भागांची माला श्रीसमर्थांच्या कंठीं विराजलेली आपण पहावी. ही आपली इच्छा पुरी होण्यास सध्यांच्या प्रकाशनकार्याच्या मंदगतीनें आणखी ७५ वर्षें पाहिजेत! श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील

संग्रहाचें "जुनें ठेवणें" सत्कार्योत्तेजक सभेनें महाराष्ट्राचें महाराष्ट्राच्या स्वाधीन केलें; पण त्यांत काय आहे हें पहाण्याची आणि जाणून घेण्याची प्रबळ इच्छा महाराष्ट्राला केव्हां होणार? सत्कार्योत्तेजक सभेचें प्रकाशन तर चालू राहील च, पण इतरांनीं हि, म्हणजे साहित्यिकांनीं आणि धनिकांनीं, एकमेकांशीं सहकार्य करून, मंदिरांतील शेंकडों ग्रंथांचें संपादन आणि प्रकाशन आपापल्या जबाबदारीवर केलें पाहिजे. श्रीसमर्थवाग्देवतामंदिरानें हि आपली ग्रंथमाला सुरू करण्याची वेळ अजून आली नाहीं कां? सर्वांनीं विचार करावा इतकी च प्रार्थना आहे.

**(४) सत्कार्योत्तेजक सभा - धुळें**

सुवर्णमहोत्सवाचा हा सोन्याचा दिवस पहाण्याचें भाग्य सत्कार्योत्तेजक सभेला लाभलें, ही श्री समर्थांची कृपा! इतके दिवस सभेचें काम एकतंत्री चाललें, तरी सभेची मालकी महाराष्ट्राकडे च होती. आतां तर Societies Registration Act प्रमाणें संस्था नोंदून घेण्यांत येत असल्यामुळें ती मालकी महाराष्ट्राकडे कायद्यानें च येणार आहे. या पन्नास वर्षांत खरोखर च लक्षावधि व्यक्तींचे सहाय्य सकार्योत्तेजक सभेस झालें आहे. श्रीसमर्थवाग्देवतामंदिर आणि जांबेचें श्रीसमर्थमंदिर यांना सहाय्य करणारे, सभेच्या मासिकांचे आणि ग्रंथमालांचे ग्राहक, सभेचे ग्रंथ विकत घेणारे, या सर्वांचा आणि आरंभापासून आतांपर्यंत इतर नानाविध मार्गांनीं सत्कार्योत्तेजक सभेस सहाय्य करणारांचा या सहाय्यकांत समावेश होतो. सारांश, अवघ्या महाराष्ट्रानें सहाय्य केलें आणि सभेला पुढें करून आपल्या कार्याचें श्रेय तिला दिलें. म्हणजे सत्कार्योत्तेजक सभा महाराष्ट्राची आहे आणि महाराष्ट्र सत्कार्योत्तेजक सभेला आपली मानतो. तेव्हां तें प्रेम, तो लोभ, सर्वांनीं अखंड ठेवावा, अशी प्रार्थना आहे.

शेवटीं, अकरा मण्यांचा एक एक सर, याप्रमाणें अकरा सरांची जी माळ श्री समर्थांच्या कंठीं विराजलेली आपल्याला पहावयाची आहे, त्या माळेच्या पांचव्या सरांतील हा सहावा मणी, श्री रामदास आणि रामदासी ग्रंथमालेंतील पन्नासावा भाग - म्हणजे च सत्कार्योत्तेजक सभेचा हा सुवर्णमहोत्सव ग्रंथ - आजच्या मंगल दिनीं महाराष्ट्र वाचकांच्या सेवेशीं सादर करितों.

धुळें
१८६५ श्री शिवजयंती

**गणेश शंकर देव**

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

# श्रीसद्गुरुस्तवन

★

त्राहे त्राहे सद्गुरुराया । निरशीं अहंमाया ।
कृपा करीं लवलाह्या । काळ जाला सिद्ध खाया ॥ ध्रु० ॥

तव कृपेवीण जाण । वेदशास्त्रव्याख्यान ।
हरिकथाकीर्तन । संगीतकळा ॥
योग याग तीर्थाटण । स्नान संध्या मुद्रा ध्यान ।
सकळ हें फोल जाण । देवाधिदेवा ॥ १ ॥

हरिहरब्रह्मादिक । ते हि प्रभुपदीं रंक ।
चालती सकळ लोक । तुझिया सत्ता ॥
व्यास अंबऋषी शुक । साधु संत सकळिक ।
तव कृपा निजसुख । भोगिती सदा ॥ २ ॥

भक्ति भाव निरूपण । भूतदया अनुष्ठान ।
देवोदेवीं चिंतन । सप्रेम जऱ्ही ॥
तऱ्ही तव कृपेवीण । जो जो कीजे तो तो शीण ।
दिनकर शरण । सद्गुरुपदीं ॥ ३ ॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं.......... नं..........
ता..............
ठाणें.

श्री

# रामदास आणि रामदासी

भाग पन्नासावा

सत्कार्योत्तेजक सभा – धुळें

# सुवर्णमहोत्सव ग्रंथ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
स्थळ प्रत
सं. ......... नं. .........
ता. .........
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय

॥ श्रीरामसमर्थ ॥

कवि विनायककृत

## सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेचें अष्टक

### सत्कार्योत्तेजक मंडळी – धुळें.

### जीवितमहिमा.

श्लोक

"आहे जीवित भासमात्र" – रड ही गाऊं नका हो! नका.
झोपा घेत असे मनुष्य, मृतवत् लेखूं नये त्यास कां?
बाहेरून दिसे तशीच नसते वस्तुस्थिति दुःखदा.
"आहे जीवित तथ्यपूर्ण" – हृदयीं ही गांठ बांधा सदा. ॥ १ ॥

"जाऊनी पडलों चितेंत म्हणजे केलें खऱ्या सार्थका,
आम्ही मेळविली" – असें न समजा – "आहेस तूं मृत्तिका
मातीला मिळशील" – सद्वचन हें आत्म्यास लागू नसे.
भोगावें सुखदुःख केवळ, न हा संसारहेतू असे. ॥ २ ॥

आहे जी स्थिति आज तीहुनि उद्यां कांहीं करावी बरी.
विद्या विस्तृत, वेळ अल्प अगदीं, तैशांत ती धांवरी!
छाती थोर, तथापि, नित्य सुचवी प्रत्येक ठोका जना
आला मृत्यु समीप – सावध असा – कां चालवा यत्न ना? ॥ ३ ॥

आहे जीवितयुद्ध विश्वसमरीं मोठें सदा चाललें;
धीरें त्यांत लढून, नांव जगतीं ह्या गाजवा चांगलें;
गोते खाल, न चालवा – विनवितों – त्या मेंढरांचें व्रत.
गेल्याचाच करीत शोक बसणें वाईट ही पद्धत. ॥ ४ ॥

भावी काल किती हि सौख्यद असो, जाऊं नका त्यावर
आहे ही घडि आपली – न गमवा. यत्नास व्हा सादर.
चित्तीं धैर्य धरा. सदा भरंवसा ठेवा हरीच्या वरी
संसाराब्धि तरावयास तरणी ही एक आहे खरी. ॥ ५ ॥

झाले आजवरी महापुरुष जे त्यांचीं चरित्रें पहा.
"व्हावें आपणही तयांसम" – तुम्हा लाभेल हो! बोध हा.
जातांना जग सोडुनी, उमटवा मागें पदें आपलीं –
कालाच्या पुलिनीं. जनास सरणी घालून द्या चांगली. ॥ ६ ॥

संसाराब्धि तरून जात असतां, जो सांपडे एकटा,
फेरे घेत फिरे, बळी जन पडे जो बापडा संकटां,
जीवाशा नुरली – अशास दिसतां तीं पावलें आपलीं
मित्रांनो न गमेल काय "मजला संजीवनी लाधली"? ॥७॥

यासाठीं, कर जोडुनी बसुं नका – बांधा कशी कंबर.
घाला भीक न संकटा – प्रतिदिनीं यत्नास व्हा सादर.
भाषा प्राकृत उन्नतीस चढवा – काया करा अर्पण –
आर्यावर्त हितास. द्या सतत सत्कार्यास उत्तेजन. ॥ ८ ॥

ता. १९ माहे मे, १८९३

"आर्यावर्त" प्रेस धुळें

सत्कार्योत्तेजक सभेच्या
स्थापनेच्या सभेचे अध्यक्ष



कै. गणेश जनार्दन आगाशे
हेडमास्तर, सरकारी हायस्कूल, धुळें

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे

"इ. स. १८९३ त एका रात्रीं करंदीकरांच्या माडीवर विनोदमूर्ति कै. विनायक जनार्दन करंदीकर म्हणजे विख्यात विनायक कवि, शांतिब्रह्म कै. माधवराव घाणेकर, सत्त्वशील कै. काशीनाथ पांडुरंग ऊर्फ काका पिंपळखरे आणि मी (शंकर श्रीकृष्ण देव), अशा चौघांनीं एकत्र जमून पुण्याच्या सद्वर्तन-प्रवर्तक मंडळीच्या धर्तीवर आपण एक मंडळी स्थापावी, असा संकल्प केला. **सत्कार्योत्तेजक मंडळी** असें नामाभिधान योजण्यांत आलें आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं विनायक कवीनें एक श्लोकाष्टक तयार करून आणून दिलें. × × त्या वेळीं धुळ्यास **कै. गणेश जनार्दन आगाशे** हे इंग्रजी शाळेवर हेडमास्तर होते. इ. स. १८८९ त मी सातवींत असतां च ते प्रथम धुळ्यास आले होते. त्यांचा मजवर पुत्रवत् अति लोभ होता. त्यांच्या अध्यक्षतेखालीं खोलगल्लींतील त्या वेळीं असलेल्या एका खाजगी इंग्रजी शाळेच्या इमारतींत ५-५० समवयस्कांची सभा भरून सत्कार्योत्तेजक मंडळीची स्थापना जाहीरपणें झाली. सभेंत रा. कृष्णराव पुंडलीक यांनीं, इतकें मोठें नांव कशाला, मोठें नांव आज घ्यावें आणि उद्यां बुडवावें, हें ठीक नव्हे, असा आक्षेप घेतला आणि मी बोलून गेलों, मी जिवंत आहे तोंवर तरी हें नांव बुडूं देणार नाहीं. कै. गुरुवर्य आगाशे यांनीं आशीर्वाद दिला."

अशी सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेची हकिकत, रामदास आणि रामदासी मासिकाच्या २१७ व्या अंकांत, म्हणजे "चौथा सुमनहार" या रामदास आणि रामदासी ग्रंथमालेच्या ३९ व्या भागांतील "सत्कार्योत्तेजक सभा-धुळें" या आपल्या लेखांत रा. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं थोडक्यांत दिली आहे. या हकिकतींत कवि विनायकांच्या ज्या श्लोकाष्टकाचा उल्लेख रा. देव यांनीं केला आहे, तें श्लोकाष्टक वर देण्यांत आलें आहे. या अष्टकाच्या शेवटच्या दोन ओळी स्मरणानें रा. देव यांनीं आपल्या लेखांत दिल्या होत्या. सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेच्या प्रसंगीं मित्रमंडळींत वाटण्यासाठीं या अष्टकाच्या प्रती धुळें येथील "आर्यावर्त" छापखान्यांत अर्ध्या कागदावर छापून घेतल्या होत्या. त्यांपैकीं एक प्रत सभेचे जुने कागदपत्र चाळीत असतांना आढळली. सत्कार्योत्तेजक सभेच्या एका संस्थापकानें-कवि विनायकांनीं-सभेच्या स्थापनेच्या प्रसंगासाठीं मुद्दाम केलेलें, आणि तेव्हांपासून जवळ जवळ आजपर्यंत अनुपलब्ध असलेलें, श्लोकाष्टक सत्कार्योत्तेजक सभेच्या या सुवर्णमहोत्सवग्रंथांत देतां आलें, याचा आनंद वाटतो. आर्यावर्त छापखान्यांत ५० वर्षांपूर्वी छापलेली या श्लोकाष्टकाची प्रत फ्रेम करून सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं ठेवण्यांत आली आहे.

ग. शं. देव

---

# (२)

## सत्कार्योत्तेजक सभा – धुळें

### स्थापनेची सभा

( लेखक — **रा. कृष्णाजी शंकर दीक्षित**, बी. ए., पुणें )

क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे –

सुभाषित

(१) गंगेचें मूळ गंगोत्रीजवळ, यमुनेचें जम्नोत्रीस, गोदावरीचें त्र्यंबकेश्वरीं ज्यांणीं पाहिलें असेल, त्यांस काशीची गंगा, प्रयागची यमुना व राजमहेंद्रीची गोदावरी पाहून, तीच ही मूळ नदी काय असा संशय येऊन अचंबा वाटेल. सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना अशी च आहे. धुळें येथें थोडकीशी कॉलेजांत जाणारी मंडळी, पुढाकार घेऊन पन्नास वर्षांपूर्वी सभा स्थापन करितात, व आज धुळ्यास श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, व जांब येथें श्रीसमर्थमंदिर पहावयास मिळतें, हा ही प्रकार तशांतला च. 'यत्न तो देव जाणावा' हें समर्थवचन यथार्थ आहे, कारण रा. शंकर श्रीकृष्ण देव हे यत्नाचा पुतळा आहेत.

( २ ) माझें दुय्यम शिक्षण सातवे इयत्तेपर्यंत धुळ्यास झालें. ते वेळीं खानदेश हा एक अज्ञानांधकारांत लोळणारा जिल्हा होता. आमचें धुळें अखिल महाराष्ट्रापासून लांब, रेल्वेस्टेशनापासून पसतीस मैल असें होतें. हल्लींचे दोन्ही खानदेश ते वेळीं एक होते, व सर्व खानदेशाकरितां एक च हायस्कूल धुळ्यास होतें, व तें ही लहान होतें. त्यांतून दरसाल १५।२० चे वर म्याट्रिकला बसणाऱ्या मुलांची संख्या नसे, व पास होऊन कॉलेजांत जाणारांची संख्या तर प्रतिवर्षी चार पांचच असे. शाळेंत जी आम्हांस विद्या मिळे, त्यापलीकडे आमचें ज्ञानच जात नसे. शाळेबाहेरचें वाचन हें आम्हांस ठाऊक च नव्हतें. अशा काळांतही धुळ्याच्या विद्यार्थ्यांत भरतभूमीचा अभिमान, तिची सेवा, तिच्यांतील विभूतींची पूजा, इत्यादि विषयीं ज्ञानामृत पाजणारीं कॉलेजांतील चार पांच मुलें धुळ्यास वावरावीं हें आमचें ते वेळीं थोर भाग्य!

( ३ ) ह्या कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांत मुकुटमणि म्हणजे अर्थात च रा. शंकर श्रीकृष्ण देव होत. पुष्पांचा नवगुच्छ फुलझाडावर असावा, त्यांत एक दोन सुमनांनीं पुढाकार घेऊन फुलावें, व इतर कलिकांस फुलण्यास धीर

## महात्माजी धुळ्यास आले असतां



रामेश्वरशेट महात्माजी
सौ. कस्तुरबा देव रणदिवे

द्यावा, व मदत करावी, अशांतली च ही गोष्ट. सन १८९२ सालीं मे महिन्यांत मी इंग्रजी चवथे यत्तेंत होतों, त्याचे अगोदरची मला त्या काळची आठवण नाहीं. त्या सालीं धुळ्याचीं कॉलेजांत जाणारीं मुलें म्हणजे रा. शंकरराव देव, कै. गोविंद काशीनाथ ऊर्फ नानासाहेब चांदोरकर, कै. शंकर भय्या मांडे, रा. दामोदरपंत दुगल, कै. काका पिंपळखरे, कै. शंकर गोविंद पुंडलिक, रा. कृष्णाजी गोविंद पुंडलिक, रा. गोपाळ रावजी गोगटे, कै. नारायण बळवंत पेंडसे, कै. गोविंद नारायण टकले हे होत. ही मंडळी मे महिन्याचे सुटींत धुळ्यास आल्यावर मोठ्या प्रेमानें आम्हां शाळेंतील विद्यार्थ्यांस दगडी शाळेच्या आवारांत जमवून पुण्यांतील ज्ञानाच्या जिवंत झऱ्याचें पाणी आम्हांस व्याख्यानरूपानें पाजीत. सन १८९२ चा मे महिना हा असा पहिला मे महिना असें मला आठवतें. ते वेळीं या मंडळींतील बहुतेकांनीं व्याख्यानें दिलीं. तसें च त्याच सालीं त्यांनीं पांझरेचे वाळवंटांत आट्यापाट्या खेळण्याचा क्रम सुरू केला. मला अजून धन्यता वाटते कीं, मी व माझे मित्र रा. कृष्णाजी नारायण कागलकर (ते वेळीं इयत्ता ४ थी) यांणीं आम्हांस तुमच्यांत खेळायला घ्या म्हटल्याबरोबर आम्हांस या मंडळींनीं आपणांत खेळावयास घेतलें.

(४) देशकार्य करावयाचें, समाजांत देशसेवेची स्फूर्ति उत्पन्न करावयाची, ज्ञानाची ज्योत जास्त प्रदीप्त करावयाची, लोकांत विभूतिपूजा जागृत करावयाची, अशा तऱ्हेची कॉलेजांत जाणाऱ्या या तरुण मंडळींची ध्येय-सरणी होती. पण त्या ध्येयास सातत्य राहणेंस्तव एखादी संस्था निर्माण केली पाहिजे, ही रा. शंकरराव देवांची पहिल्यापासून खटपट. त्या खटपटीस सन १८९३ च्या मे महिन्यांत ता. १९ रोजीं मूर्तस्वरूप आलें. आपल्या कॉलेजांतील मित्रांस सुटींत धुळ्यास आल्याबरोबर च एकत्र जमवून रा. शंकररावांनीं त्यांजवळ विचारविनिमय सुरू केला. अर्थात च अशी संस्था स्थापावी व तीस "सत्कार्योत्तेजक सभा" असें नांव द्यावें असें रा. शंकररावांचें म्हणणें, पण हा हिय्या कित्येकांस होईना, पुष्कळांस आत्मविश्वास वाटेना, कित्येकांचें म्हणणें इतक्यांतच संस्थेस मूर्तस्वरूप नको, तर कित्येकांचें म्हणणें इतकें मोठें नांव नको. पण रा. शंकरराव देव यांणीं आपल्या सवंगड्यांस उत्तर दिलें कीं, "मी जिवंत आहें, तोंवर हें नांव बुडूं देणार नाहीं."

(५) खरी गोष्ट अशी होती कीं, या सर्व मंडळींत रा. शंकरराव देव हे प्रमुख होते; ते त्यांचा आत्माच होते. तेव्हांपासून च रा. शंकरराव यांची बुद्धिमत्ता श्रेष्ठ होती. त्यांची वाणी मधुर होती. त्यांचें बोलणें ठसकेदार असे. त्यांचें वक्तृत्व मोहक असे. त्यांचें भाषण आल्हादकारक असे. व त्यांच्या म्हणण्याची लोकांवर सहज छाप बसे. तथापि ते सर्व गोष्टी विचारपूर्वक करीत असें स्पष्ट दिसे. सर्व

मित्रांचें अनुमोदन मिळाल्यावांचून पुढें पाऊल टाकायचें च नाहीं, असा त्यांचा स्वभाव असे. आपण च पुढील पिढीचे कर्ते व नेते आहोंत असा त्यांचा भरंवसा आहे, असाच त्यांचा चेहरा दिसे. फुलांच्या गुच्छांत जोरदार सुमनांनीं विकासभूत झाल्यावर, इतर कळ्यांनां उमलण्यास साहाय्य केलें पाहिजे, ही त्यांची दृढ भावना होती. प्रीति, शहाणपण व सामर्थ्य यांचें त्यांच्यांत ऐक्य असल्यामुळें इतरांस जी गोष्ट अवघड, अशक्य व उद्यांची अशी वाटे ती त्यांस साहजिकच सोपी, सुलभ व आजची च अशी वाटे. गोष्टी आपोआप च होत असतात असें नव्हे, तर त्यांचा ओघ बदलणें आपल्या हातीं आहे, असें त्यांस अंतःस्फूर्तीनें च वाटे. ही अंतःस्फूर्ति त्यांच्यांत जबर असावी, असें आम्हां सर्वांस तेव्हांपासून च वाटे. ह्या अंतःस्फूर्तीनें च ते आपल्या सोबत्यांत विचारांची जागृति करीत. व अशा पुरुषास च पुढें जनतेचा नेता व्हावयाचें असतें. आपल्यांतून प्रेम, ज्ञान, व विचार यांचा ओघ दुसऱ्यांत वाहत राहिला पाहिजे, ही नेत्यांची भावना असते. जनतेच्या डोक्यांत सद्विचारस्फूर्ति, व हृदयांत विश्वप्रेम आपण च उत्पन्न केलें पाहिजे, अशी नेते पुरुषांची श्रद्धा असते. त्याकाळीं धुळ्याच्या विद्यार्थ्यांत रा. शंकरराव देव हे असे नेते निर्माण झाले, हें धुळ्याचें काय पण महाराष्ट्राचें ही भाग्य समजावयाचें. फुल वाढतें, तसें ध्येय वाढलें पाहिजे, व त्याचा परिमल सर्वत्र पसरला पाहिजे, हा रा. शंकरराव यांस ध्यास असे. यामुळें त्यांच्या वचनांतील सत्यता, भावनांतील प्रेम, व ध्येयाची निष्ठा यांच्या समुच्चयानें त्यांच्या मित्रांस उत्तेजन मिळून 'सत्कार्योत्तेजक सभा' अशी संस्था स्थापन करण्याचें मुक्रर ठरलें.

(६) ही गोष्ट सन १८९३ च्या मे महिन्यांतील होय. सुट्टींत पुण्याहून परत आल्यापासून च रा. देव हे या खटपटींत होते. शेवटीं सर्वांचा निश्चय होऊन 'सभेच्या स्थापनेची' सभा ता. १९ मे रोजीं भरवावयाची असें मुक्रर ठरलें. तेव्हां खोलगल्लींत असलेल्या न्यू इंग्लिश स्कूल या शाळेंत ही सभा भरली. आम्ही हायस्कुलांतील विद्यार्थीही या सभेची चातकासारखी वाट पाहत होतों; व त्या दिवशीं रा. देव यांचें वक्तृत्व ऐकण्यास, व त्यांच्या विचारांचा लाभ घेण्यास आम्ही बरेचजण सभेस हजर होतों. त्या सभेस हजर असलेल्यापैकीं, हायस्कुलांतील जे विद्यार्थी हजर होते, त्यांपैकीं ज्यांचीं नांवें मला आठवतात, तीं पुढील प्रमाणें होत :—

कै. माधवराव घाणेकर, कै. कृष्णाजी माधव गद्रे, कै. दत्तात्रय रामचंद्र कोतवाल, कै. विनायक शंकर हतवळणे, कै. गणेश विष्णु शिंत्रे, कै. धोंडो गोविंद पुंडलिक, माझे वडील बंधु ती. रामचंद्र शंकर दीक्षित (हल्लीं पुणें), रा. रामचंद्र त्रिंबक देव (हल्लीं अमळनेर), रा. कृष्णाजी नारायण कागलकर (हल्लीं

मुंबई), रा. जनार्दन रामचंद्र जहागिरदार (हल्लीं वर्धा), रा. शंकरराव पानट (हल्लीं जळगांव).

रा. शंकरराव देव यांचे कॉलेजांतील जे मित्र हजर होते त्यांचीं नांवें मीं वर दिलीं आहेत.

(७) विद्यार्थ्यांव्यतिरिक्त जे हजर होते, त्यांत दोघे प्रमुख होते; एक कै. विनायक जनार्दन ऊर्फ बाबूराव करंदीकर ऊर्फ विख्यात विनायक कवि, व दुसरे रा. सदाशिव सीताराम बर्वे (हल्लीं मुक्काम दादर, पेन्शनर, जेल डिपार्टमेंट). रा. बर्वे यांचे शेती व आंकडेशास्त्र यांवर केसरींत नेहमीं सडेतोड लेख येतात. विनायक कवी ची आठवण झाली म्हणजे ते तरुणपणीं च वारले या बद्दल दुःख वाटतें. त्यांचें रा. शंकरराव देव यांस फार साहाय्य झालें असतें. या विनायक कवीनें सभेच्या दिवशीं एक श्लोकाष्टक तयार करून सभेच्या वेळीं प्रसिद्ध केलें. त्यांतील शेवटल्या उद्बोधक दोन ओळी अद्याप सर्वांच्या स्मरणांत आहेत.

भाषा **प्राकृत** उन्नतीस चढवा — काया करा अर्पण —
**आर्यावर्त** हितास. द्या सतत **सत्कार्यास उत्तेजन** ॥

हाच मुळीं 'सभेच्या' स्थापनेचा उद्देश होता, व यावर च सभेंत चर्चा झाली. सभेंत अर्थात पहिले वक्ते रा. शंकरराव देव होते. त्यांनीं कांहीं एक आडपडदा न ठेवतां स्पष्ट व खुलासेवार भाषण केलें. एखादा मूर्तिकार पाषाण पुढें घेऊन मूर्ति घडवावयास बसतो तेव्हां, त्याच्या दृष्टीनें पाषाणाचे आंत मूर्ति जीवंत असते च, व जसजसें तो त्या पाषाणावर काम करीत सुटतो, तसतशी ती मूर्ति प्रकट होत जाते, तद्वत् रा. शंकरराव देव यांचें भाषण होतें. देशांतील तरुण मुलांस वाट दाखविण्यास व त्यांचें ध्येय जागृत ठेवण्यास आतां यापुढें अशा संस्थांची प्रत्येक जिल्ह्यांत आवश्यकता आहे, हें त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें. त्यांच्या अस्खलित व कळकळीच्या भाषणाचा परिणाम अद्याप माझे हृदयावर व माझ्या बंधूंच्या हृदयावर कायम आहे. इतर वक्त्यांचीं भाषणें झाल्यावर, 'सत्कार्योत्तेजक सभा', धुळें, ही संस्था आज स्थापन करण्यांत आली आहे असें जाहीर करण्यांत आलें.

(८) पुढल्या च वर्षी रा. शंकरराव देव व त्यांच्या कॉलेजांतील मित्रांपैकीं कांहीं ग्रॅज्युएट झाले. पण त्याच्या पुष्कळ अगोदर च मी व माझे बंधूंनीं धुळें सोडलें.

'सत्कार्योत्तेजक सभेच्या' स्थापनेस ज्या मित्रांनीं रा. देव यांस दुजोरा दिला, त्यांनीं पुढेंही आयुष्यभर रा. देव यांच्या राष्ट्रसेवेच्या कामांत त्यांस मदत केली, व कांहीं अद्याप ही करीत आहेत. उदाहरणार्थ, रा. गोपाळराव गोगटे (भुसावळ) हे अद्याप 'समर्थ' संप्रदायाचे कामीं उत्तम मदत करीत आहेत.

( ९ ) रा. शंकरराव देव यांची बुद्धिमत्ता, व देशसेवेची कळकळ यामुळें त्यांस त्यांच्या तरुणपणापासूनच मोठ्या कर्त्या लोकांत मान असे. सन १८९८ सालीं लोकमान्य टिळक तुरुंगांतून सुटून आल्यावर सप्टेंबर अखेर सिंहगडावर रहावयास गेले. तेथें त्यांस भेटावयास अनेक भक्त व पुढारी येत. त्यांत डिसेंबर महिन्यांत रा. शंकरराव देव हे आले होते. ते वेळीं मी तेथें होतों. "वेदांचें प्राचीनत्व" या ग्रंथाचें लेखन चाललें होतें. लिहून झालेला भाग रा. टिळक यांनीं रा. देव यांस दाखविला, व त्यावर दोघांची चर्चा झाली व ते वेळीं इतर ही गोष्टी निघाल्या, त्यावरून रा. टिळक यांचें रा. देव यांजवर किती प्रेम होतें हें मला प्रत्यक्ष पहावयास मिळालें आहे.

( १० ) 'सत्कार्योत्तेजक सभेची' आजवर झालेली कामगिरी लोकांपुढें आहे च. तिचें मला वर्णन करावयाचें नाहीं. मला फक्त सभेच्या स्थापनेच्या सभेंत जी ओजस्विता होती, व जिनें मलाही आयुष्यभर उत्तेजन मिळालें, त्या रा. देव यांच्या ओजस्वितेचें वर्णन करावयाचें होतें.

( ११ ) त्या पहिल्या सभेंत आम्हांस जो प्रकाश मिळाला, त्याचा आम्हां बंधुद्वयास जन्मभर उपयोग होत आहे. माझे वडील बंधु, रा. रामचंद्र शंकर दीक्षित, पेन्शन घेतल्यापासून आज बारा वर्षें पुण्यांतील बहुतेक दुय्यम शिक्षणसंस्थांत, व तत्सम संस्थांत व्यवस्थापक मंडळांत सभासद आहेत, व ते पुण्यांतील शैक्षणिक चळवळींत नेहमीं भाग घेतात. मी पेन्शन घेतल्यावर साताऱ्यास रयत शिक्षण-संस्थेमार्फत प्राथमिक शिक्षकांचें एक ट्रेनिंग कॉलेज काढलें, तें विनावेतन सहा वर्षें चालविलें; ती संस्था आतां फार भरभराटीस आली आहे; व तिचे अनुकरणानें नाशिक, जळगांव, पुणें व बेळगांव येथें प्राथमिक शिक्षकांचीं खाजगी ट्रेनिंग कॉलेजें नुकतींच निघालीं आहेत.

( १२ ) सारांश, 'धुळ्याची सत्कार्योत्तेजक सभा' आतां वटवृक्षासारखी फोफावत आहे. या सभेचे शीर्षभूत अथवा हृदयभूत रा. शंकर श्रीकृष्ण देव ऊर्फ नानासाहेब यांस ईश्वर शंभर वर्षांचें आयुरारोग्य देवो!

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.



॥ श्रीरामसमर्थ ॥

# सन १८९८ तील सत्कार्योत्तेजक सभा

( गणेश शंकर देव, धुळें )

( १ ) खालील पत्र भुसावळचे वकील रा. गोपाळ रावजी गोगटे यांचेकडून मिळालें. तें सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहांत ठेवण्यांत येत आहे. रा. गोगटे १८९३ ते १९०२ धुळ्यास रहात होते. रा. देव परगांवीं गेले असतां, तेथून त्यांनीं रा. गोगटे यांना धुळ्यास सन १८९८ त खालील पत्र पाठविलेलें आहे. तें पेन्सिलीनें लिहिलेलें असून अर्धेंच उपलब्ध आहे. त्या वेळीं सत्कार्योत्तेजक सभेचे कोण कोण सभासद होते, कोणाकोणाला सत्कार्योत्तेजक सभेचे सभासद करून घ्यावयाचा प्रयत्न करावयाचा होता, याचा बोध त्या पत्रावरून होतो. तें पत्र असें :—

**To be Members**

(१८) Thombre
(१९) S. P. Pendse
(२०) Vaishampayan
(२१) Rama Dev
(२२) Elder Dixit
(२३) S. B. Bhide
(२४) S. A. Kulkarni
(२५) Chapekars
(२६) V. N. Paranjape
(२७) Vakharkar
(२८) Garud (College)
(२९) Atre (College)
(३०) Upasani (College)
(३१) Shevadekar
(३२) Abhyankar
(३३) Palasikar
(३४) Raoji Upasani
(३५) K. G. Pundlik
(३६) Abdul Shaikh
(३७) Dr. Kunte
(३८) Krishna Kagalkar
(३९) Vishnu Takle
(४०) G. N. Paranjape
(४१) Panat S. M.

**Present Members**

( १ ) Gogate
( २ ) Dev
( ३ ) Pendse
( ४ ) Takle
( ५ ) Pimpalkhare
( ६ ) Dugal
( ७ ) Bhanage
( ८ ) Apte
( ९ ) Ghanekar
(१०) Karandikar
(११) Garud
(१२) Oka
(१३) Marathe
(१४) Jamkhedkar
(१५) Mande
(१६) Chandorkar
(१७) Barve S. S.

My dear Gopalrao,

Please try to secure the consent of the gentlemen mentioned in this list whom I propose to be the members of the Satkaryottejak Sabha. Also send letters or request personally Pendse, Takle, Bhanage, Ghanekar, Karandikar, Garud, Oka, Marathe, Jamkhedkar, to be ready with their essays by the 1st of December. This year we must work more carefully, earnestly and with zeal. We must admit many new members. You will also try to prepare a good report, which we may be able to publish. Request all members, present and to be, to write beautiful essays, marathi if possible, which we might publish in one volume.

( २ ) पत्रांत नांवाच्या मागें अंक नाहींत. ते सोयीसाठीं देण्यांत आले आहेत. पत्रांत नमूद केलेले सत्कार्योत्तेजक सभेचे त्या वेळचे सभासद आणि ज्यांना सभासद करून घेण्याचा प्रयत्न करावयाचा ते सद्‌गृहस्थ यांची थोडक्यांत माहिती अशी :

### त्या वेळचे सभासद

( १ ) **गोगटे**—रा. गोपाळ रावजी गोगटे, बी. ए., एल्‌एल्. बी., वकील, भुसावळ

( २ ) **देव**—रा. शंकर श्रीकृष्ण देव, बी. ए., एल्‌एल्. बी., वकील, धुळें—सभेचे एक संस्थापक

( ३ ) **पेंडसे**—कै. प्रो. नारायण बळवंत पेंडसे, एम्. ए., एल्‌एल्. बी., जुनागड

( ४ ) **टकले**—कै. गोविंद नारायण टकले, बी. ए., धुळें

( ५ ) **पिंपळखरे**—कै. काशीनाथ पांडुरंग ऊर्फ काका पिंपळखरे, धुळें - सभेचे एक संस्थापक

( ६ ) **दुगल**—रा. दामोदर विनायक दुगल, धुळें - शिक्षक, दुकानदार

( ७ ) **भणगे**—रा. कृष्णराव नारायण भणगे, वकील, मंडलेश्वर

( ८ ) **आपटे**—कै. हरि नारायण आपटे, धुळें

( ९ ) **घाणेकर**—कै. माधवराव बळवंत घाणेकर, बी. ए., मामलेदार, धुळें - सभेचे एक संस्थापक

(१०) **करंदीकर**—कै. विनायक जनार्दन करंदीकर ऊर्फ कवि विनायक - सभेचे एक संस्थापक, पोलीस खात्यांत नोकरी

(११) **गरुड**—कै. गोपाळ बळवंत गरुड, बी. ए. एल्‌एल्. बी., वकील, धुळें

(१२) **ओक**—तत्कालीन कै. नारायणराव ओक, वकील, धुळें, यांचे चिरंजीव

(१३) **मराठे**—कै. शंकर भिकाजी मराठे, पाष्टे

(१४) **जामखेडकर**—रा. दामोदर श्रीकृष्ण जामखेडकर, वकील, भुसावळ

(१५) **मांडे**—कै. शंकर भय्या मांडे, बी. ए. एल्एल्. बी. धुळें

(१६) **चांदोरकर**—कै. गोविंद काशीनाथ चांदोरकर, बी. ए. एल्एल्. बी., वकील, धुळें

(१७) **बर्वे**—रा. सदाशिव सीताराम बर्वे, सेवानिवृत्त सरकारी नोकर, तुरुंगखातें, दादर

## करावयाचे सभासद

(१८) **ठोंबरे**—रा. यशवंत अमृत ठोंबरे, बी. ए., सेवानिवृत्त मंत्री, सांगली

(१९) **पेंडसे**—कै. सदाशिव पिलाजी पेंडसे, बी. ए., धुळें

(२०) **वैशंपायन**—कै. वासुदेव मोरेश्वर वैशंपायन, बी. ए., एल्एल्. बी., धुळें

(२१) **रामा देव**—रा. रामचंद्र त्र्यंबक देव, बी. ए., सेवानिवृत्त मामलेदार, अंमळनेर

(२२) **मोठे दीक्षित**—रा. रामचंद्र शंकर दीक्षित, बी. ए., सेवानिवृत्त सरकारी नोकर, शिक्षण खातें, पुणें

(२३) **भिडे**—कै. शंकर बाळकृष्ण भिडे, बी. ए., मामलेदार, धुळें

(२४) **कुळकर्णी**—कै. सखाराम अमृत कुळकर्णी, बी. ए., मामलेदार, धुळें

(२५) **चापेकर बंधु**—(१) कै. प्रो. श्रीकृष्ण नीळकंठ चापेकर, एम्. ए., एल्एल्. बी. व (२) त्यांचे धाकटे बंधु

(२६) **परांजपे**—रा. विनायक नारायण परांजपे, बी. ए., एल्एल्. बी., वकील, धुळें

(२७) **वाखारकर**—कै. विष्णु रावजी वाखारकर, पोलीस प्रॉसीक्यूटर, धुळें

(२८) **गरुड**—कै. रा. ब. सिद्धनाथ धोंडदेव गरुड, बी. ए., वकील, धुळें

(२९) **अत्रे**—कै. अत्रे सबजज यांचे चिरंजीव

(३०) **उपासनी**—उपासनी मंडळीपैकीं कॉलेजांत असलेले

(३१) **शेवडेकर**—कै. मार्तंडराव शेवडेकर, मामलेदार, धुळें
(३२) **अभ्यंकर**—कै. कृष्णराव नारायण अभ्यंकर, वकील, नंदुरबार
(३३) **पळशीकर**—कै. विश्वनाथ अमृत पळशीकर, वकील, धुळें
(३४) **रावजी उपासनी**—रा. रावजी बाळकृष्ण उपासनी, धुळें, सेवानिवृत्त शिक्षक
(३५) **पुंडलीक**—रा. कृष्णाजी गोविंद पुंडलीक, पुणें, सेवानिवृत्त एज्युकेशनल इन्स्पेक्टर
(३६) **अबदुल शेख**—अबकारी इन्स्पेक्टर, मराठीचे व्यासंगी, कवि विनायकांचे स्नेही
(३७) **डॉ. कुंटे**—कै. डॉ. दामोदर केशव कुंटे, एल्. एम्. ॲन्ड एस्., धुळें
(३८) **कृष्णा कागलकर**—रा. कृष्णराव नारायण कागलकर, बी. ए.
(३९) **विष्णु टकले**—कै. विष्णु नारायण टकले, सरकारी नोकरी, जबलपुर
(४०) **परांजपे**—कै. गणेश नारायण परांजपे, रेलवे ऑफिसर, मुंबई
(४१) **पानट**—रा. सखाराम माधव पानट, निवृत्त मामलेदार, जळगांव

[३] हे बहुतेक जण त्या वेळीं कॉलेजांतील विद्यार्थी होते, किंवा कॉलेजांतून नुकतेच बाहेर पडले होते. सत्कार्योत्तेजक सभेच्या त्या वेळच्या या सभासदांना आणि करावयाच्या सभासदांना, शक्य तर मराठींत, सुंदर निबंध लिहिण्याची विनंती करावी अशी सूचना गोगटे यांना देवांनीं या पत्रांत दिली आहे. या सर्व निबंधांचा एक ग्रंथ प्रसिद्ध करण्याची हि कल्पना होती. अजूनपर्यंत सत्कार्योत्तेजक सभेचें लक्ष प्रकर्षानें रामदासी वाङ्मयाकडे गेलें नव्हतें. त्याला अजून ६ – ७ वर्षें अवकाश होता. "एकादा ग्रंथ नेमून तो सर्वांनीं वाचून त्यावर चर्चा करणें, त्या वेळच्या सरकारी हायस्कूलच्या इमारतींत किंवा आवारांत स्वतंत्र व्याख्यानमाला गुंफणें," एवढींच कार्यें सभेकडून त्या वेळीं होत होतीं. यावरून त्या वेळच्या सभासदांच्या निबंधांच्या ग्रंथाचें स्वरूप थोडें तरी तर्कितां येतें. एवढें मात्र खरें कीं, सत्कार्योत्तेजक सभेनें प्रसिद्ध केलेले "सहा सुमनहार" व हा "सुवर्णमहोत्सव ग्रंथ" या ग्रंथांसारखा ग्रंथ, म्हणजे अनेकांच्या निबंधांचा एक ग्रंथ, काढण्याची कल्पना त्या वेळीं सत्कार्योत्तेजक सभेच्या चालकांच्या मनांत होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६२३०
... शाखा (... मत)

(४)

## सत्कार्योत्तेजक सभा – धुळें

## देव – चांदोरकर – भट

( लेखक — रा. **कृष्णाजी बळवंत महाबळ**, नाशिक )

[ १ ] सन १९०४ चे अखेरीअखेरीस मी धुळ्यास ट्रेनिंग स्कूलमध्यें गेलों. तालीम हा आवडीचा विषय म्हणून साहजिक च पाताळे यांच्या तालमींत जाऊं लागलों. तेथें श्री. आप्पासाहेब रणदिवे, कै. गोविंदराव जांदे, कै. गोविंदराव मसूरकर यांचा परिचय झाला. आमच्या ट्रेनिंग स्कूलमध्यें त्या वेळीं पैसाफंडाकरितां दरमहा वर्गणी जमत असे. तेथील पैसाफंडाचें काम मजकडे आलें होतें. जमलेली वर्गणी श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांजकडे पोहोंचती करण्याकरितां आम्ही जाऊं लागलों. थोडा थोडा परिचय होत चालला.

[ २ ] प्रथमतः आमची चौकशी केली. आम्ही भावी शिक्षक! तेव्हां शिक्षकाची कामगिरी किती महत्त्वाची आहे, देशाच्या परिस्थितींत शिक्षक जर उत्तम असतील, तर जागृति – टिकाऊ जागृति–होईल याची जाणीव देण्याच्या दृष्टीनें श्री. देवांनीं आम्हांस निरनिराळे प्रश्न विचारावे. जीं उत्तरें देतां येत तीं द्यावीं आणि उत्तरें देतां येत नाहींत असें आढळलें म्हणजे पूर्वपक्ष उत्तरपक्ष दोन्हीं हि स्वतः करून आमचें समाधान करण्याचा प्रयत्न श्री. नानासाहेब देव करीत असत. पैसाफंड हा देशाच्या उद्योगधंद्याच्या शिक्षणाकरितां आहे तेव्हां मदत ज्यास्त कशी देतां येईल या विचारांत आम्ही होतों. थोडेंसें दहा रुपयांचें भांडवल आमच्या विद्यार्थ्यांतून च जमविलें आणि गोपाळ कंपनींतून विद्यार्थ्यांच्या उपयोगी वस्तु खरेदी करून त्यांचें एक छोटेंसें कपाटरूप दुकान आमच्या वसतिगृहांत सुरु केलें. त्यावर होणारा सर्व नफा आम्ही पैसाफंडास देऊं लागलों. मदतीची वाढ या प्रकारच्या विक्रीनें झाली हें नानासाहेब यांस सांगितलें. हळुहळू परिचय वाढत चालला.

[ ३ ] रविवार सुटीचा दिवस; तेव्हां दुपारीं श्री. देवांच्या घरीं आम्ही जमावानें जाऊं लागलों. त्या वेळीं श्रीमत् दासबोधाचें टिपण करण्याचें काम चालू होतें. आम्ही गेलों म्हणजे नित्य नवीन विषय नानासाहेबांनीं आम्हांस सांगावा. आम्ही श्रोतृवृंद आणि देव प्रवचनकार. कळकळीचे ते बोल, अंतःकरणाचा ठाव घेत घेत आंत जाऊन बसत, असें आम्हांस होऊन जाई. साहजिक च अंतःकरणांत

अधिक ओलावा उत्पन्न होऊं लागला. कधीं कधीं असें घडे कीं, संध्याकाळचे सुमारास पांझरा नदीच्या वाळवंटात लांबवर जाऊन तेथें च प्रवचनें होत. चार भिंतींच्या आंत घडत असलेल्या प्रवचनांपेक्षां वाळवंटांतील हीं प्रवचनें मोठ्या मौजेचीं वाटत.

[ ४ ] प्रवचनांचे आठवतात ते विषय असे होतेः हितोपदेशांत " गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् " असा पाठ ट्रेनिंग स्कूलमध्यें नुकता मिळाला होता च त्याला अनुसरून,

नाहीं देह्याचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा ।
प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ॥ १९–६–२५

स्वदेशी चळवळीच्या जोराचा काळ, तेव्हां आपल्या च कल्याणाकरितां आपण "देशव्रती" असणें अवश्य. उद्यां निश्चय करूं असें वाटतें, पण ही उद्यां कधीं च संपणारी नाहीं. मृत्यूनें आपली शेंडी धरली च आहे हें लक्षांत ठेवून वागलें पाहिजे. दुसऱ्यावर अवलंबून रहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आणि म्हणून

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपण चि कष्टत गेला । तो चि भला ॥ १९–९–१६

या समर्थोक्तीची जाणीव करून दिली. कुटुंबपोषणरूप सेवा प्रत्येक जण करीत असतो च, त्यांत विशेष काय! समर्थांनीं जगाचा संसार केला. आपण आपल्या धर्माचे, आपल्या देशाचे सेवक बनले पाहिजे. सेवा धकाधकीची आहे, तेव्हां लक्षांत ठेविलें पाहिजे कीं,

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।

तेव्हां आपण बलवान् झालें पाहिजे. आणि त्यासाठीं व्यायाम नित्य केला पाहिजे. केवळ धष्टपुष्ट होऊन भागणार नाहीं, प्रसंगीं शिपाईगिरी स्वतः पत्करली पाहिजे, म्हणून लष्करी शिक्षण हि अवश्य आहे, वगैरे. दुबळ्यांचें हें काम नव्हे, म्हणून समर्थ म्हणतात कीं,

नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनि सिकवाव्या ॥ १९-१०-२२

आपण शक्तिमान झालों तरी सहनशक्तीची अत्यंत आवश्यकता आहे. ती सहनशक्ति कशी येईल? तर सांगत कीं, समर्थ म्हणतात :—

धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे ।

अशी तुमची वागणूक असली म्हणजे त्याचा परिणाम तुमचा विरोध करणारे जे असतील त्यांच्यावर असा होईल कीं,

प्रस्तावोन परावे । आपले होती ॥ १९–६–२२

धर्मसेवा, देशसेवा सोपी नाहीं. जपानसारखें छोटेसें राष्ट्र अगदीं थोडक्या काळांत उच्चस्थितीस जाऊन पोहोंचल्याचें उदाहरण देत.

व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती ।
तेणें प्राणी सदैव होती । देखतदेखतां ॥ १९–३–७

शिवाय,

जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलत चि राहिले । करंटे जन ॥ १८–७–१६

कष्ट सहन करण्याचें सामर्थ्य उत्पन्न होण्यासाठीं आणि मन तयार होण्यासाठीं—

आधीं कष्ट मग फळ । कष्ट चि नाहीं तें निर्फळ ।
साक्षेपेंविण केवळ । वृथापुष्ट ॥ ११–१०–२०

या कष्टाची फलश्रुति काय? तर—

कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ।
केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ॥ १८–७–३

तेव्हां हा साक्षेप साधण्यासाठीं

बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथांतर ।

शिक्षकाच्या धंद्याला तर पाठांतराची विशेष आवश्यकता आहे. आणि हें पाठांतर दृढतर होण्यास

भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ ४–२–३

व्यक्तिशः आपण गुणविशिष्ट बनलों म्हणजे त्या गुणांचा प्रचार करण्याकरितां चळवळी करणें अवश्य आहे.

सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें ।

अमक्यांनीं च चळवळ करावी असें नाहीं, सर्वांनीं करावी. अशी योग्य चळवळ होत गेली तर ती सामर्थ्ययुक्त होते, पण हें सामर्थ्य टिकून रहावें, असें वाटत असेल तर एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, या चळवळीला

परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ २०–४–२६

ही खूणगांठ बांधून ठेविली पाहिजे. समर्थांचीं उमटलेलीं पाउलें आपण पहात गेलों, तर समर्थांनीं प्रथम काय केलें? एकंदर त्यांच्या कार्यांचा क्रम कसा? तर–

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥ ११–५–४

मग हा च क्रम लक्षांत ठेवून, परमेश्वराची सदैव आठवण ठेवून, देशाच्या सुस्थितीसाठीं जे चळवळीचे प्रयत्न इष्ट असतील ते करण्याची आपली तयारी

पाहिजे. मनुष्यमात्र सुखासाठीं धडपड करीत असतो. जनीं जनार्दन भरलेला आहे ही जाणीव पटली पाहिजे. लोकांच्या सुखांत आपलें सुख आहे हें लक्षांत घेऊन तें सुख मिळवावयाचें असेल तर—

जयास वाटे सुख चि असावें। तेणें रघुनाथभजनीं लागावें।

पण एवढ्यानें हि भागत नाहीं!

स्वजन सकळ हि त्यागावे। दुःखमूळ जे॥ ३-१०-६२

आपणांमध्यें त्यागी वृत्ति बाणणें अवश्य आहे. "आयुः पृथिव्यां द्रविणं (देहि)" दीर्घायुष्य दे आणि पृथ्वींतील सर्व संपत्ति आम्हांस दे म्हणजे च "ऐहिक स्वातंत्र्य दे" एवढी च प्रार्थना करून आम्ही आर्य थांबत नाहीं, तर "ब्रह्मवर्चसम् मह्यं दत्त्वा ..." असें हि आपलें मागणें असतें. ब्रह्म म्हणून जें म्हणतात, तें हि मिळालें पाहिजे. ती ब्रह्मप्राप्ति होणें सुलभ कां आहे? पण ती कठीण आहे म्हणून सोडून द्यावयाची नाहीं. प्रयत्न केला च पाहिजे, आणि त्या प्रयत्नाची शिगलोट अशी झाली पाहिजे :—

देवाच्या सख्यत्वासाठीं। पडाव्या जिवलगांसी तुटी।
सर्व अर्पावें सेवटीं। प्राण तो हि वेचावा॥ ४-८-८

अशी आपली तयारी झाली पाहिजे.

श्री समर्थांच्या वचनाधारें अशीं किती तरी प्रवचनें आम्ही ऐकिलीं. साधारणपणें जुळणी करून पूर्वीची आठवण या ठिकाणीं ताजी केली इतकें च.

[५] सन १९०५ सालीं नाशिक येथें श्री शिवजयंति उत्सवांत श्री. नानासाहेब देवांना मुख्य वक्ते म्हणून मित्र-मेळयानें बोलाविलें होतें. ऐतिहासिक सत्याची ज्वलज्जहाल व्याख्यानें ऐकणारे नाशिककर देवांची ती साधी, सडपातळ मूर्ति पाहून आपसांत कुजबुजूं लागले कीं, गबाळा फेटा गुंडाळलेले हे वक्ते काय बोलणार! पण व्याख्यानाचा विषय समर्थांच्या ओजस्वी शब्दांत जसजसा विवेचिला जाऊं लागला, तसतसे नाशिककर तरुण अविचल स्थितींत मुग्ध होऊन गेले आणि शेवटीं शेवटीं तर प्रत्येकाचें हृदय गहिंवरल्याशिवाय राहिलें नाहीं. असें वक्तृत्व देवांचें त्या वेळीं होतें. त्या काळच्या धकाधकीच्या काळांत महाराष्ट्रांत नांवाजले जाणारे आणि लोकमान्यांचे शिष्य म्हणून असलेले जे जे पुढारी म्हणून गणले जात होते, त्यांत देवांची गणना होत होती, इतकें म्हटलें म्हणजे पुरें आहे.

[६] धुळयास नित्य नियमानें पांझरेच्या वाळवंटांत अगर पाटाचे पुलावर देव, चांदोरकर, भट ह्या त्रिमूर्ति संध्याकाळच्या वेळीं केवळ हवा खाण्याकरितां

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ता. १९
ठाणें.

फिरण्यास जात नसत तर कोणत्या तरी विषयाची च चर्चा करीत करीत यांचें मोकळ्या हवेंत फिरणें बसणें होत असलेलें अनेकांनीं पाहिलें आहे.

[७] एकमेव समर्थवाङ्मयसंशोधनाचें प्रचंड कार्य हृदयाशीं धरून श्री. नानासाहेबांनीं तें आजपर्यंत अव्याहत चालविलें आहे, तें इतकें झालें कीं, त्यासाठीं धुळ्याचें श्रीसमर्थवाग्देवतामंदिर बांधावें लागलें. नानासाहेबांच्या च प्रयत्नामुळें समर्थांच्या जन्मभूमींत – जांबेस – समर्थांची स्थापना झाली.

[८] पूर्व कालीं युद्धाची आघाडी तोफखान्याची असे. वाङ्मयीन युद्धाला देखील तोफखान्याची आवश्यकता आहे च. तो तोफखाना दुसरा तिसरा कोणता नसून छापखाना हाच होय. सत्कार्योत्तेजक सभेकडून समर्थवाङ्मय प्रसिद्ध होण्यास स्वतःच्या तोफखान्याची आवश्यकता भासली म्हणून "आत्माराम" छापखाना अस्तित्वांत आला, आणि पुढें तो विकला तरी सभेच्या प्रकाशनाचें बहुतेक सगळें कार्य या च छापखान्यांत आजपर्यंत होत आलें.

[९] विस्तव हातीं धरवेल, पण कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांची प्रकृति सांभाळणें कठीण. पण ते राजवाडे वर्षांतला कांहीं काळ देव आणि भट यांचेकडे रहात असत. धुळ्याचें "राजवाडे-संशोधन-मंदिर" हें देव आणि भट या उभयतांच्या च प्रयत्नांचें फल होय.

[१०] देवळांत मूर्ति आहे, पण पुजारी चांगला नाहीं, आणि देवळाची च काय, पण देवाची हि जोपासना जेथें होत नाहीं, त्या देवळांत दर्शनास तरी कोण जाणार? पण जेथें देवाची त्रिकाळ पूजा करणारे तिन्हीं पुजारी भावानें, श्रद्धेनें, पूजा करीत आहेत, दर्शनेच्छूंचें लक्ष वेधलें जाईल अशी टापटीप आहे, तेथें गर्दीच गर्दी जमावयाची. डोळे भरून मूर्ति पाहून डोळ्यांचें पारणें फेडून घेणारे भाविक श्रद्धाळू लोकांचे थवेच्या थवे अशा ठिकाणीं आल्याशिवाय रहात नाहींत. त्याचप्रमाणें सत्कार्योत्तेजक सभा धुळयास स्थापन करणारे प्रमुख श्री. शंकर श्रीकृष्ण देव हे असले, तरी त्यांना सहाय्यभूत होणारे श्री. चांदोरकर आणि श्री. भट यांचा झालेला मिलाफ त्रिमूर्तींच्या स्वरुपाचा, प्रयागाच्या त्रिवेणी संगमासारखा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. सत्कार्योत्तेजक सभेच्या या तीन पुजाऱ्यांनीं सभेची अमोल सेवा केली. दृष्टांत च द्यावयाचा झाला तर मेणबत्तीचा देतां येईल. मेणबत्ती स्वतः वितळत राहून एकसारखा अखंड प्रकाश देत राहते. त्याप्रमाणें या पुजाऱ्यांनीं आपला देह झिजवून अखंड ५० वर्षें सत्कार्योत्तेजक सभा नुसती टिकविली च असें नव्हे, तर जनताजनार्दनाच्या डोळयांत भरेल अशी सभेची कार्यनिर्मिति करून ठेविली.

[ ११ ] सन १८९३ ते १९०५ हीं सभेचीं बारा वर्षें तपश्चर्येंत गेलीं. या तपःश्चर्येची फलश्रुति म्हणजे श्रीसमर्थांचा दासबोध शक १८२७ त प्रसिद्ध होणें ही होय. समर्थांच्या तीर्थाटणांचीं दर्शनें घेण्यांत घालविलेल्या २७ वर्षांची फलश्रुति, शक १८५४ त जांबेंत श्रीसमर्थांचें आगमन होण्यानें मिळाली. समर्थांच्या वाणीला अनुसरून जो अर्थ धांवत यावयाचा, त्या वाग्देवतेचें मंदिर शक १८५७ त झालें, आणि या देवतेचे पुजारी आसेतुहिमाचल पसरले जावे या हेतूनें शक १८६१ त श्रीसमर्थसंघाची मुहूर्तमेढ रोविली. या संघाचें शाखांचें जाळें विणलें जाऊन भारतांत सर्वत्र पसरलें जावें म्हणून प्रयत्न होऊं लागले. ही या कार्याची होत असलेली वाढ म्हणजे सत्कार्योत्तेजक सभेच्या वटवृक्षाची घनदाट छाया च होय, असें म्हटल्यास वावगें नाहीं.

[ १२ ] सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेला ५० वर्षें पुरीं होऊन तिचा सुवर्णमहोत्सव म्हणजे श्री. शंकर श्रीकृष्ण देव आणि श्री. भास्कर वामन भट यांच्या ५० वर्षांच्या अविरत कार्याचा च हा सुवर्णमहोत्सव होय. प्रयागास गंगा, यमुना आणि सरस्वती यांचा संगम आहे, त्याला आपण त्रिवेणी संगम म्हणतों. तेथें गंगा यमुना प्रत्यक्ष दिसतात, पण सरस्वती दिसत नाहीं, ती गुप्त आहे. आज हि तशी च स्थिति या उत्सवाचे प्रसंगांत दिसत आहे. आज हि कै. गोविंद काशीनाथ ऊर्फ नानासाहेब चांदोरकर यांचा अमर आत्मा सत्कार्योत्तेजक सभेच्या सुवर्णमहोत्सवांत आपल्या मित्रद्वयाचें कार्य पहात असेल, नाहीं कोणी म्हणावें!

[ १३ ] देश, धर्म, संस्कृति यांचें आयुष्य शतकांनीं मोजलें जातें. अशीं शतकें मोजलीं जाण्यास अनेक संस्थांचें दीर्घायुष्य साधनीभूत होत असतें. याला अनुसरून सत्कार्योत्तेजक सभेला दीर्घायुष्य चिंतणें म्हणजे तिच्या या पुजाऱ्यांना च दीर्घायुष्य चिंतण्यासारखें आहे. असें च कार्य देवभटादि सत्कार्योत्तेजक सभेच्या सभासदांकडून, श्रीसमर्थांच्या महाराष्ट्रांत, पतितपावन दुष्टसंहारक प्रभु रामचंद्राच्या कृपेनें घडो अशी प्रभुचरणीं प्रार्थना आहे.

( ५ )

# सत्कार्योत्तेजक सभेचीं पहिलीं बारा वर्षें

( इ. स. १८९३-१९०५ )

( लेखक — रा. **गोपाळ रावजी गोगटे**, बी. ए., एल्एल्. बी., **भुसावळ** )

हीं बारा वर्षे, म्हणजे सभेची बाल्यावस्था होय. मोठ्या वयाच्या, विचारवंत लोकांनीं स्थापिलेल्या संस्थांची बाल्यावस्था व आमच्या सभेची बाल्यावस्था, यांत महदंतर आहे. प्रौढ दूरदर्शी अशा मंडळीच्या संस्थांचे उद्देश, धोरण, कार्याची दिशा, वगैरे प्रथमपासून निश्चित असतात. तसें अल्पवयी अननुभवी मंडळींचें नसतें. म्हणून अशांच्या संस्थेचें बालपण म्हणजे थोरांच्या करमणुकीचा विषय होय. ज्याला कांहीं आपुलकीचें प्रेम वाटेल, त्याला च त्याचें कौतुक वाटणार.

जैसा स्वभावो मायेबापांचा । अपत्य बोले जरी बोबडिया वाचा ।
तर्‍हि अधिकाधिक तेयांचा । संतोखुचि आथि ॥ ज्ञाने. $\frac{१}{६४}$

धुळें येथें सन १८९३ मध्यें सत्कार्योत्तेजक सभा स्थापन झाली, तेव्हां त्या सभेचे जे सभासद होते, त्यांतलि बहुतेक धुळें येथील हायस्कुलांतील अभ्यासक्रम संपवून बाहेर पडलेले होते. पुण्यास फर्ग्युसन कॉलेज निघेपर्यंत, धुळ्याचे विद्यार्थी कॉलेजकडे क्वचित च वळत. कारण, एक तर नौकर्‍या पटापट मिळून पोटापाण्याचा प्रश्न लवकर सुटे व दुसरें असें कीं, कॉलेज शिक्षण बरेंच महाग असल्यामुळें, तें पुष्कळांच्या आटोक्याबाहेर होतें. पण फर्ग्युसन कॉलेज निघाल्यावर, कॉलेजांत जाणारांची संख्या वाढूं लागली. फर्ग्युसन कॉलेजमध्यें सुद्धां त्या वेळीं पहिल्या १।२ परीक्षांपुरतें च शिक्षण मिळण्याची सोय होती; परंतु तेवढें शिक्षण पदरीं पाडून घेतल्यानंतर, पुढचें पुढें पाहातां येईल या भरंवशावर मध्यम वर्गाचे विद्यार्थी त्या कॉलेजांत शिरत. त्या कॉलेजांत गेलेल्या विद्यार्थ्यांचे मनावर, टिळक, आगरकर, आपटे, गोखले, गोळे, केळकर वगैरे प्राध्यापकांच्या शिक्षणाचे चांगले संस्कार होत. नवें चैतन्य संचारल्यासारखें वाटे. त्या प्राध्यापकांचें सौजन्य, विद्वत्ता, कर्तबगारी, जनसेवा, बाणेदारपणा, उत्साह, वगैरे अनेक सद्गुणांची छाप पडून विद्यार्थी भारले जात. आपण हि त्यांच्यासारखें कांहीं करावें, अशी महत्वाकांक्षा मूळ धरी. पुण्यांतल्या सभांतून होणारीं नामांकित वक्त्यांचीं उत्तेजनपर भाषणें, केसरी-मराठ्याचे न्यायनिष्ठुर लेख, यांची पकड मनावर बसे. ही कॉलेजची मंडळी, जेव्हां सुटींत धुळ्यास परत येत, तेव्हां अनेक मित्रांची व

त्यांची गाठ पडे. पुण्यास काय चालतें हें जाणण्याच्या इच्छेनें, ते मित्र तिकडील बारीकसारीक गोष्टीबद्दल सुद्धां, जिज्ञासेनें प्रश्न विचारीत. सर्वांचें एकत्र जमून बसण्याचें ठिकाण म्हणजे पांझरा नदीचें सुंदर स्वच्छ वाळवंट होय. वेळ सायंकाळची. वाळवंटांतलें मंडळीचें वर्तुळ, वाढतां वाढतां बरें च वाढे. नाना विषयांवर चर्चा चाले. पुण्याच्या प्रोफेसरांच्या नकला होत. किर्लोस्कर कंपनीच्या नटांचीं संगीत पदें, कोणी सुस्वर म्हणून दाखवीत. कै. श्री. बाबूराव करंदीकरांसारखें कविरत्न मंडळींत होतें. ते देशभक्तीनें ओथंबणारीं नवीन नवीन काव्यें रचीत व स्वतः म्हणून दाखवीत. बहुधा रोज आट्यापाट्यांचे खेळ, वाळवंटांत होत. अशा मजेंत सुटीचे दिवस केव्हांच निघून जात.

ही मंडळी कोण होती, याची माहिती, मागें एका लेखांत आली आहे. अशा शिळोप्याच्या गप्पांत कांहीं काल गेल्यावर रा० रा० शंकर श्रीकृष्ण देव यांचे मनांत अशी एक कल्पना आली कीं, नदीवर जमून विचारविनिमय करणाऱ्या या मंडळीची एक संस्था काढावी. पुण्याच्या पुढारी मंडळींचे, त्यांचे मनावर जास्त खोल संस्कार झालेले होते व इतरांच्या मानानें त्यांच्या जीवाला आंच हि जास्त लागलेली होती. "प्रभवति मणिर्बिंबोद्ग्राहे न मृदांचयः" हें वचन त्यांचे ठिकाणीं सार्थ झालेलें होतें. त्या परिस्थितींत, हातून होतील तीं चांगलीं कामें करण्याचें, त्यांनीं योजिलें व आपले मित्रांशीं त्याबद्दल खल करून, प्रत्यक्ष सभेची स्थापना ता. १९।५।१८९३ रोजीं एक जाहिर सभा बोलावून केली. कै. रा. गणेश जनार्दन आगाशे हेडमास्तर यांनीं, स्वतः अध्यक्षस्थान स्वीकारून, सभेचा पुरस्कार केला.

सभेचा सभासद होण्यास, कोणताही दर्जा लागत नव्हता. व वार्षिक चार आणे वर्गणी देण्यापलीकडे कोणती ही जबाबदारी नव्हती. आठवड्यांतून दोन दिवस, कोणीतरी इंग्रजींत अगर मराठींत एखाद्या विषयाचा मुद्दाम अभ्यास करून, त्यावर व्याख्यान द्यावें असा कार्यक्रम ठरला. रा. आगाशे हेडमास्तर यांनीं हायस्कूलचे कांपौंडाची जागा सभेसाठीं वापरूं देण्यास परवानगी दिली व बाकें खुर्च्या टेबलें वगैरे सामान हि घेऊं दिलें. प्रथम प्रथम सराव नसलेमुळें, मंडळींना व्याख्यानाचें जमेना; परंतु रा. भणगे (हे हल्लीं मंडलेश्वर येथें वकील आहेत) हे इंग्रजींत अगर मराठींत 'न बिभेति कदाचन' या वृत्तीनें बोलत; त्यांचेपासून मंडळी सभाधीटपणा शिकली व कांहीं दिवसांनीं भाषणाचा कार्यक्रम सुरळीत चालूं लागला.

सभेच्या नांवाप्रमाणें सभासद कार्याला लागले. मुख्यतः शिवाजी व गणपती उत्सव धुळयास चालू केले. रायगडस्मारकासाठीं घर न घर फिरून त्यांनीं चांगलीशी

रक्कम जमविली. दसऱ्याचा सण साजरा करण्याची नवी पद्धत पाडली. नाना फडणवीसांचा शतसांवत्सरिक उत्सव केला. हें सर्व पुण्याचें अनुकरण होतें हें कबूल करण्यांत कांहीं लाज नाहीं. प्रथम पुण्यानें बोलावें चालावें व मग धुळ्यानें तसें करावें. 'उवाच धात्र्या प्रथमोदितं वचः। ययौ तदीयामवलम्ब्य चांगुलिम्।' (रघु.) असें हें बालपणांत चालावयाचें च. पण सभा त्यावेळीं इतकें करूं शकली, यांत च कौतुक आहे. पुढें वैदिक स्कूल काढण्यांत आलें. दुष्काळाचा कायदा जिल्ह्यांतील लोकांस समजून देण्याचें काम सभेच्या मंडळीनेंच केलें.

याच बारा वर्षांच्या आरंभीच्या काळांत सभेनें तीन पुस्तकें प्रसिद्ध केलीं होतीं. (१) इ.स. १८९९ सालीं "छत्रपती श्री शिवाजी महाराज व शिवजन्मोत्सव," हें ८३ पृष्ठांचें पुस्तक. याच्या पहिल्या १५ पृष्ठांत, रा. शंकरराव देव यांनीं, उत्सवावर त्या काळीं घेण्यांत आलेल्या आक्षेपांचें खंडण करून, उत्सवाची राष्ट्रीय उपयुक्तता प्रतिपादिली होती. त्या पुढचें ९१ पृष्ठापर्यंतचें श्री शिवचरित्र, कै. काका पिंपळखरे यांनीं लिहिलें होतें. आमचे काका पिंपळखरे, हे एक झांकलेले अमोलिक थोर पुरुष होते. आमच्या मित्रमंडळींत, त्यांच्या इतका सात्विक मित्र दुसरा नव्हता. शेवटच्या दोन पृष्ठांवर जें सुंदर 'शिवस्तोत्र' आहे, तें अर्थात् सभेचे अधिकृत कवि कै. बाबुराव करंदीकर यांच्या लेखणींतून उतरलेलें आहे. सभेच्या संग्रहीं या पुस्तकाची एकच प्रत आहे, पण ती अति मोलाची समजून सभेनें संरक्षिली आहे. ही प्रत त्याचवेळीं लोकमान्यांकडे पाठविण्यांत आली होती व तिच्या पहिल्या १५ पृष्ठांवर, लोकमान्यांनीं स्वहस्तें कांहीं मराठी आणि कांहीं इंग्रजी शेरे, लिहिलेले आहेत. (२) दुसरें छोटें पुस्तक 'आपण कोण' म्हणून इ.स. १९०० सालीं प्रसिद्ध झालें होतें, तें रा. देवांनीं त्यावेळीं कै. शिवरामपंत परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं व लोकमान्यांच्या उपस्थितींत, पुण्यास सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत दिलेलें एक व्याख्यान होय, आणि (३) तिसरें पुस्तक "जपानची मर्दुमकी" म्हणून देवांनींच लिहिलेलें, सन १९०३ मध्यें प्रसिद्ध झालें होतें. यांपैकीं पहिल्या शिवाजी महाराजांच्या पुस्तकाच्या एकदम शंभर प्रती घेतल्या गेल्याबद्दल जो आनंद मंडळीस वाटला, त्याचें प्रतिबिंब रा. देवांनीं आपल्या एका मित्रास ती गोष्टता. २१।७।९९ रोजीं पत्रद्वारा कळविली, त्या पत्रांत खालील वाक्यांत उमटलें आहे.

H. H. The Chatrapati Maharaj of Kolhapur has been pleased to order — How many copies you guess — one hundred copies of our book!

सभेच्या बाल्यावस्थेंत, रा. आगाशे हेडमास्तर, रा. सा. श्रीधर बाळकृष्ण उपासनी मुनसफ, रा. ब. हेबळीकर, रा. रा. महादेव कृष्ण आपटे वकील, रा. ब. जोशी डु. डे. क., रा. गणेश कृष्ण आपटे इंजिनियर अशा थोर मंडळींनीं सहाय्य करून, सभेला उपकृत केलें आहे, त्याबद्दल सभा त्यांची सदैव ऋणी आहे. सन १८९८ पासून प्लेग धुळयाचे पाठीस लागला व सभासदांपैकीं बरेच पांगून उद्योगधंद्यासाठीं धुळयाबाहेर गेले, तथापि जागेवर राहिलेल्या मंडळींनीं सभेचें कार्य पुढें चालविलें.

अशी या पहिल्या बारा वर्षांची हकीकत, आठवली तशी नमूद केली आहे. येथून च पुढें सभेनें समर्थकार्याकडे विशेष लक्ष पुरविलें व तें इतकें कीं, आज तें अखिल महाराष्ट्राचें कार्य होऊन बसलें आहे. तें सर्वांना विदित आहे च.

---

( ६ )

# एक क्रांतिकारक महंत

( लेखक—प्रो. **नारायण केशव बेहेरे, नागपुर** )

एखाद्या मासिकांतील एखादा चटकदार लेख किंवा लघुकथा वाचतांना वाचक अचानक जाहिरातीला ठेचाळतो व त्याच्या रंगाचा भंग होतो हा अनुभव हल्लीच्या प्रचारकी जगांत नवा नाहीं. विसाव्या शतकांत जाहिरातींचें स्वतंत्र असें महान शास्त्र निर्माण झालें आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जाहिरातींचें महत्व मान्य झालें असलें तरी मजकुरापेक्षा त्यांचा दर्जा कनिष्ठ समजला जाई. परंतु आज वर्गणीदार व रसिक वाचक यांच्यापेक्षां जाहिरातबाज व्यापाऱ्याची मोठ्या राष्ट्रीय वर्तमानपत्राच्या दरबारीं देखील अधिक प्रतिष्ठा असते, मग लुंग्यासुंग्या व पोटभरू प्रकाशकांची गोष्ट कशाला? वाचक रसिक पंडित असला तरी फुकट्या किंवा वर्षाकाठीं दहापाच रुपये फार तर वर्गणी भरणारा असणार. परंतु जाहिरातदारांकडून हजारों रुपयांची वार्षिक चंदी वर्तमानपत्रांना लाभत असते आणि ह्या आडवळणी प्राप्तीवरच वर्तमानपत्रांचा संसार चालतो, वर्गणीदारांच्या बळावर चालत नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

पूर्वी जाहिरातीसाठीं आग्रंतीं स्वतंत्र स्तंभ किंवा पृष्ठें मुद्दाम राखून ठेवलीं असत. त्यामुळें मजकुराचें वेड असणाऱ्या रसिकाला जाहिरातींचें कुंपण सहजगत्या टाळतां येई, परंतु त्यामुळें जाहिरातदाराचा हेतु पूर्णांशानें साध्य होत नसे. लोकांचें लक्ष वेधून घेतलें नाहीं तर ती जाहिरात वेंधळ्या दूतीची प्रतिमा ठरेल. म्हणून मजकुराच्या मध्यभागीं, कथानकाच्या ओघांत किंवा प्रबंधाच्या साखळींत जाहिरात आजकाल युक्तीनें गुरफटली असते. वाचकाची इच्छा असो नसो, ती त्याच्या नजरेंत भरते व त्याच्या रसाचा भंग करते. त्याचें मन ठेचाळतें व त्याची विचारमालिका त्रुटित होते. परंतु त्याचें लक्ष तिच्याकडे विशेष रीतीनें वेधतें ही गोष्ट तितकीच खरी. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून हिंडणाऱ्या प्रवाशाला सिंहगडाची मातबरी कदाचित वाटणार नाहीं. परंतु वऱ्हाडच्या सपाट मैदानी प्रदेशांत एकाकी उभा असणारा नाविलगड तेथील जनतेला हिमालयापेक्षांहि भव्य व उंच वाटतो. गौर वर्णाला विलायतेंत किंमत नसली तरी मद्रास इलाख्यांत खास आहे आणि फळांच्या मेव्यापेक्षां गव्हाची गोडी काश्मिरी पंडितांना अधिक भासली तरी मुंबईचे लोक थोडेच अक्रोड-अंगुरांचा अव्हेर करतात?

महाराष्ट्रांतील भागवत धर्माचा इतिहास वाचत असतांना त्यांत रंगलेला भाविक भक्त ही रामदास स्वामींची भव्य जाहिरात अवचित दृष्टीस पडतांच भांबावतो व गांगरतो. मूळ विषयावरून त्याचें चित्त चलित होतें व त्याचा रसभंग होतो. युगें अठ्ठावीस विटेवरी उभे असणाऱ्या काळ्यासावळ्या, ठेंगण्याठुसक्या, कंबरेवर दोन्ही हात ठेवून जगाकडे शून्य परंतु सांतिक दृष्टीनें पाहणाऱ्या बुद्धस्वरूपी विठोबाच्या ऐवजीं धनुष्यावर बाण चढवून वीराच्या पावित्र्यांत उभी असलेली एकपत्नी, एकवचनी, एकबाणी श्रीरामचंद्राची सुंदर मूर्ति भक्ताच्या नजरेस पडते. शांतिसागराला भरती येऊन तो खवळलेला महासागर दिसूं लागतो व तुफानाच्या गर्जनेंत सूर मिळवून लाटांचें भीषण तांडव चाललेलें दिसतें. रावणासारख्या अनेक पापी, उन्मत्त, दुराचरणी, अहंमन्य व जुलमी अधिकारी दैत्यांचें निर्दालन झाल्याचें दृश्य अहिंसेनें डोळ्यावर चढलेली झापड पार उडवून लावते व नवी जागृती मनांत उत्पन्न करते. रामदास स्वामींच्या अवचित दर्शनानें वारकरी भक्ताची तंद्री उतरते व त्याच्या सुखशांत समाधीचा भंग होतो! आणि हा सर्व अद्भुत प्रकार भागवत धर्माच्या परमोत्कर्षसमयीं घडून येतो!

संतकृपा जाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें आवार ॥
जनार्दनी एकनाथ । खांब दिला भागवत ॥
तुका जालासे कळस । भजन करा सावकाश ॥
बहेणी फडकती ध्वजा । निरुपण केलें वोजा ॥

बहिणाबाईंच्या गाथ्यांतील या अभंगांत भागवतधर्माचा संपूर्ण इतिहास सूत्ररूपानें आला आहे. या अभंगाचें वारकरी सांप्रदायांत मोठें महत्त्व मानलें जातें. थोड्याफार पाठभेदानें तो वारकरी पंथांत सर्वत्र रूढ असून प्रमाणभूत मानला जातो. मात्र कोणी कोणी चुकीनें समजतात तसें त्याचें कर्तृत्व तुकारामाच्या माथीं मारतां येणार नाहीं. स्वतःला भागवतधर्माचा कळस म्हणवून घेण्याइतके तुकारामबोवा त्यामुळें अहंमन्य ठरतात, ही गोष्ट त्यांच्या अंध भक्तांच्या लक्षांतच येत नाहीं. अभंग म्हटला कीं तो तुकारामाचा च हीच त्यांची भावना असते. परंतु त्यांच्यासारखा नम्र व सात्त्विक संत स्वतःचा असा अहंतापूर्ण उल्लेख खास करणार नाहीं. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे भागवतधर्माचे अत्यंत मोठे तत्त्ववेत्ते होत. त्यांपैकीं ज्ञानेश्वर हे आद्य संस्थापक आणि तुकाराम हे मंदिरावरील कळस म्हणून विख्यात आहेत. तुकाराममहाराजांच्या काळीं भागवत

धर्माचा परमोत्कर्ष झाला आणि अखिल महाराष्ट्र भक्तिरसांत नाहून रंगून गेला. भागवत धर्माची पाळेंमुळें जनतेच्या हृदयांत खोल रुजलीं आणि तो जनतेचा धर्म झाला. परंतु विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं याच काळांत रामदासस्वामींचा अवतार झाला! रामदास व तुकाराम हे दोघे समकालिन महापुरुष होते. ही गोष्ट माहीत असूनही पुष्कळांच्या लक्षांत राहत नाहीं व त्यामुळें विनाकारण गैरसमज उद्भवतात व नागफणीप्रमाणें माजतात!

भागवत धर्माच्या महापुरुषांत रामदासांची गणना होत नाहीं व पुष्कळ त्यांना भागवत धर्मी समजत नाहींत. भागवत धर्म हा हिंदुस्थानभर पसरलेल्या वैष्णव सांप्रदायाचा महाराष्ट्रीय पाठभेद होय. कृष्ण चैतन्य उर्फ गौरांगप्रभू, नरसी मेथा, तुळसीदास हे परप्रांतिय वैष्णव संत होते. तामीळ देशांत अळुवारांनीं हाच भक्तीचा सांप्रदाय फुलविला. ओरिसा प्रांतांतील बिठ्ठिदेव हा विठ्ठलाचें च नामांतर होय. मत्स्य–कूर्म–वराहादि दहा विष्णूचे पुराणोक्त अवतार प्रसिद्ध च आहेत. जैनधर्माची महाराष्ट्रांत व कर्नाटकांत विशेष प्रभा फाकली होती त्या सुमारास महाराष्ट्रांत भागवत–सांप्रदायाचा प्रारंभ झाला. यामुळें विष्णूच्या पंढरपुरांतील अवतारावर जैन तीर्थंकराची कळा चढली आहे व विठोबाला बुद्ध मानणारे अनेक विद्वान दाखवून देतां येतील. विठोबाचें ध्यान बुद्धाप्रमाणें च शांत, अंतर्मुख, अहिंसात्मक व क्रियाशून्य आहे हें पंढरपूरच्या मूर्तीचें दर्शन घेणाऱ्या कोणा हि डोळस भाविकाला कबूल करणें भाग आहे. पण बुद्ध झाला तरी तो विष्णूचा नववा अवतार च होय. बुद्ध, राम किंवा कृष्ण हे सर्व विष्णूचे च अवतार होत. तेव्हां विठ्ठलभक्त संत तेवढे च भागवत सांप्रदायी असा दुराग्रह न्याय्य ठरणार नाहीं. समर्थ रामदासांचें आराध्य दैवत कृष्ण किंवा विठ्ठल नसून राम होतें, हें खरें. परन्तु ते तीर्थयात्रा करत असतांना पंढरीस जेव्हां गेले तेव्हां विठ्ठलाचें दर्शन घेऊन उद्गारले—

येथें उभा कां श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा ॥
काय केली सीताबाई। येथें राही रखुमाई ॥
काय केली अयोध्यापुरी। येथें वसवीली पंढरी ॥
काय केलें वानरदळ। येथें मिळवीले गोपाळ ॥
रामीं रामदासी भाव। तैसा होय पंढरीराव ॥

समर्थांना या भिन्न अवतारी मूर्तींत फरक थोडाच वाटत होता? त्यांची दृष्टि व भक्ती काय एकांगी होती?

वैकुंठीचा विष्णु कैलासी शंकर। मुख्य निराकार परब्रम्ह ॥

हें उच्च पारमार्थिक तत्त्व त्यांना पटलें होतें. परंतु

राम कृपाकर विठ्ठल साकार। दोघे निराकार एकरूपें ॥

हें एकत्त्व पटून हि त्यांनीं रामोपासनेचा प्रचार मोठ्या धडाडीनें करून भागवत धर्माच्या जुन्या ओघाला नवें वळण लावलें. गंगा नदीचा कालवा काढला तरी तो अखेरीस गंगा नदींतच लुप्त होतो. त्याप्रमाणें भागवत धर्मांतून निघालेला रामदासी सांप्रदाय समर्थांच्या मृत्यूनंतर थोड्याच काळांत भागवत धर्मांत पुनश्च विलीन झाला. भागवत धर्माचे अनेक महान आधारस्तंभ दाखवितां येतील. परंतु रामदास स्वामी हे आपल्या पंथाचे एकमेव संस्थापक, चालक व प्रसारक आहेत! त्यांच्यासारखा महापुरुष त्यांच्यानंतर त्यांच्या पंथाला लाभला नाहीं. त्यामुळें त्यांचा पंथ त्यांच्या वैयक्तिक महनीयतेमुळें त्यांच्या नांवानेंच ओळखला जातो. भागवत धर्म किंवा वारकरी सांप्रदाय हा ज्ञानेश्वर–नामदेव–एकनाथ–तुकाराम या चौखांबी भरभक्कम आधारावर उभा आहे. परंतु त्या महापुरुषांच्या वैयक्तिक नांवानें तो ओळखला जात नाहीं. कारण अनेक मोठे व विविध जातीचे संत व कवि त्या सांप्रदायांत निर्माण झाले व त्यांनीं वारकरी सांप्रदाय लोकप्रिय केला. रामदासी पंथ हा एकट्या रामदासांच्या अनन्य साधारण विभूति तत्त्वावर आधारलेला आहे. रामदास स्वामी हे आपल्या पंथाचे हिटलर आहेत तर भागवत धर्मांतील प्रत्येक मोठा संत हा त्या पंथाचा तत्कालिन व तात्पुरता रूझवेल्ट म्हणतां येईल. हिटलरचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी खरें, परंतु त्याची पक्षसंघटणा एकखांबी तंबूप्रमाणें किंवा जबलपूर येथील राणी दुर्गावतीच्या मदनमहालाप्रमाणें आहे. आधारभूत व्यक्ती हयात आहे तोंपर्यंत त्या पक्षाचें सामर्थ्य अतुलनीय असतें. परंतु तो एकुलता एक आधार ढांसळतांच तो पत्त्यांचा शोभिवंत बंगला कोसळून पडतो. उलटपक्षीं हजार खांबावर उभारलेला तंजावरचा सभामंडप एखादा खांब मोडून पडला तरी डौलानें जसाच्या तसा उभा असतो! गोमेचे दोन पाय मोडले तर तिचें कांहींच वाकडें होणार नाहीं, पण माणसाचे दोन पाय नव्हे, पण एक पाय मोडला तरी तो कायमचा पांगळा व दुबळा होईल. हुकुमशाही पंथ अधिक संघटित, प्रबळ, पराक्रमी व कर्तृत्त्ववान असतो, परंतु जागतिक इतिहासाच्या दृष्टीनें तो क्षणभंगुर ठरतो. लोकशाही पक्ष आवळ्याची मोट बांधल्याप्रमाणें विस्कळित व मंदगति असला तरी त्याची लोकप्रियता व लोकसंग्राहक शक्ति मोठी असते व त्यामुळें त्याला दीर्घायुष्य तुलनात्मक दृष्ट्या लाभलेलें दिसतें. मुसळधार पाऊस कीं श्रावणझड श्रेष्ठ हें कोण ठरवूं शकेल? तलाव, विहिरी, नद्या कोरड्या पडल्या असतील तर मुसळधार पावसानें त्या ताबडतोब जलमय होतील परंतु शेतीच्या पिकाला वारकी व अबोलकी श्रावणझड अधिक मानवतें.

आजच्या युगांतील कल्पना रामदासस्वामी व इतर भागवतधर्मी संत यांच्यावर लादण्यांत आमची चूक झाली व नव्या चष्म्यांतून जुनी सृष्टि पाहणें अन्याय्य व आभासात्मक आहे असें ओरडणारा टीकाकारांचा वर्ग क्रुद्ध होईल हें आम्हीं पूर्णपणें जाणून आहोंत. परंतु जगाच्या व मानवतेच्या इतिहासांत त्या त्याच कल्पना व ते तेच विचारप्रवाह पुनः पुनः उद्भवतात व जुनी लीला नव्या नावानें प्रगट करतात. मौलिक नाविन्य या मानवी सृष्टींत सागरांत जलबिंदु या प्रमाणांत अत्यल्प असतें. लोकशाही ही फ्रेंच राज्यक्रांतींतून उद्भवली नाहीं किंवा हिटलर-मुसोलिनी-स्टॅलीन यांनीं हुकूमशाहीचा पाया घातला नाहीं. वैदिक कालांतील लोकांनी गणराज्य पाहिलें होतें व त्याचीं वर्णनें वैदिक वाङ्मयांत आढळतात. आणि शिकंदर, तिमूर, महंमद, पिटर यांच्यापुढें हिटलर-मुसोलिनी-स्टॅलीन खुजे दिसतील व त्यांचे ते धड शिष्यहि म्हणवून घेण्यास नालायक ठरतील. राष्ट्रीय हिंदी मुसलमान व पाकिस्तानी मुसलमान यांच्यांत आज जो तात्विक लढा दिसतो तोच विचारसंग्राम मोगल बादशाहीच्या किंवा बहामनी राज्याच्या इतिहासांत आढळतो. सय्यदबंधूंना परधर्मी मराठे जवळचे वाटत, परंतु स्वधर्मी अफगाण शत्रु भासत. नादिरशहाच्या स्वारीच्या वेळीं दिल्लीच्या बादशहानें बाजीराव पेशव्याचें सहाय्य मागितलें आणि दक्षिणेंतील मुसलमानी बादशहांनीं मराठ्यांच्या साह्यानें दिल्लीपतीशीं दोन शतकें लढा चालविला. देश श्रेष्ठ कीं धर्म श्रेष्ठ, हा प्रश्न या विचारसंग्रामाच्या मुळाशीं आहे. पोपच्या मध्यस्तीनें पापाचें निर्मूलन करून स्वर्ग पाहणारे ख्रिस्ती व भटजींच्या मार्फत पितरांना श्राद्धप्रसंगीं अन्न पोहोचतें करूं पाहणारे हिंदु यांची विचारसरणी एक च आहे. नांवें मात्र निराळीं! गुप्त साम्राज्याच्या मांडलिकांचे आजचे हिंदी संस्थानिक ब्रिटिश राजवटींतील युगाचे अवतार होत. महात्मा गांधी हे थोरो किंवा टालस्टाय यांचे केवळ अनुयायी नसून गौतम बुद्ध किंवा येशू यांचे अध्यात्मिक वारस होत. गांधीजींची हिंदु अहिंसा जैन धर्माला आपली मालकीची कल्पना वाटेल. आजचे ख्रिस्ती मिशनरी व त्यांचा धर्मप्रसार बुद्ध भिक्षूंच्या पासंगांतहि उतरणार नाहीं.

प्रत्येक संत थोड्या फार अंशानें महान पुरुष म्हणजे महंत असतो. आणि प्रत्येक महंत थोड्याफार प्रमाणांत संत प्रवृत्तीचा असतोच. हुकूमशहाला देखील लोकाराधना करावी लागते आणि लोकनियुक्त अध्यक्षालाहि प्रसंगीं अरेराव बनावें लागतें. कारण हुकूमशहाची लोकप्रियता ओसरली कीं, त्याच्या शक्तीचा संनिपात होतो आणि अध्यक्ष कणखर नसला तर त्याच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव पसार होऊन तो पदच्यूत होतो. हें खरें असले तरी हुकूमशहा व लोकनेता यांचें वर्गीकरण करणें फारसें कठीण नाहीं. त्याचप्रमाणें संत व महंत यांचें वर्गीकरणहि सुलभ आहे. तुकाराम एकनाथ हे संत होते, परंतु रामदास स्वामी हे महंत होते. माणसाच्या

वृत्तीप्रमाणें कोणाला संत थोर वाटतो तर कोणी महंताची पूजा करतो. मानवी मनावर प्रेमानें संत सत्ता चालवितो तर महंताच्या कर्तृत्त्वानें मानवी मनावर त्याची छाप पडते. दोघेंहि थोर असले तरी संताचें सौजन्य व महंताचा पराक्रम हे विशेष रीतीनें डोळ्यांत भरणारे गुण आहेत. अपकाराची फेड उपकारानें करून संत आपल्या विरोधकाला लाजवितो, तर महंत "ये यथा माम् प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्" या गीतावचनानुसार वर्तन करतो. रामदास स्वामींचें वैशिष्ठ्य त्यांच्या महंतगिरींत आहे.

संत श्रेष्ठ कीं महंत श्रेष्ठ, या कोड्याचा उलगडा कधींच होणार नाहीं. कारण दोघांचीही परिस्थितीप्रमाणें राष्ट्राला गरज लागते. दोघांचेहि सद्‌गुण मानवतेच्या उद्धारास कारणीभूत होतात. मुत्सद्दी कीं सेनापती, वीर कीं संत, कवि कीं तत्त्ववेत्ता राष्ट्राचा तारक होतो? या प्रश्नाचें यथार्थ उत्तर कोण कधीं देऊं शकेल? कारण दोघेंहि राष्ट्रपुरुष असतात! त्यांच्यांत तरतम भाव लावणें अशक्य आहे! तलवार कीं लेखणी, कला कीं नीति, राष्ट्र कीं धर्म श्रेष्ठ, या कोड्यांचाहि निकाल कदापि लागणार नाहीं. कारण या जोडींतील प्रत्येक कल्पनेला सत्याचा आधार आहे. व्यक्तिहित कीं समाजकल्याण हा प्रश्नहि सुटणार नाहीं. राष्ट्रवाद कीं व्यक्तिस्वातंत्र्यवाद हा प्रश्नहि कायमचा अनिर्णित राहणार!

समाज विस्कळीत असला कीं अहिंसा, शांति, प्रेम, सत्य या संतांच्या सद्गुणांनीं फार मोठी संघटणा होते, जातिभेदाची तीव्रता लोपते, वर्गकलह बंद पडतात, उच्चनीच अहंकारी भाव सौम्य होतो व समाजांत समता व बंधुता प्रस्थापित होऊं लागते. विस्कळित समाजाचें त्यामुळें राष्ट्र बनतें. जातिभेदानें पोखरलेल्या व दुर्बल बनलेल्या महाराष्ट्र देशांत भागवतधर्मी संतांनीं संघटणा घडवून आणली. महाराष्ट्राचें दैव थोर म्हणून या भागवती सांप्रदायांत ज्ञानेश्वर-एकनाथ हे ब्राम्हण, तुकाराम कुणबी, नामदेव शिंपी, गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी, चोखा महार व रोहिदास चांभार हे नामांकित संत होऊन गेले. महाराष्ट्रांतील अठरा पगड जातींपैकीं अशी एकहि जात नाहीं कीं जिनें आपल्या संत-कवि-प्रतिनिधीद्वारां महाराष्ट्रसंघटणेला हातभार लावला नाहीं. महाराष्ट्र आपला देश, मराठी आपली भाषा, पंढरपूरचा विठोबा आपला देव, ग्यानबा तुकारामादि संत हे आपले पुढारी, भक्ति हा मोक्षाचा मार्ग, नामसंकीर्तन हें आपलें कर्मकांड अशी भावना संतांच्या प्रभावी वाणीमुळें व त्यागी आचरणामुळें प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या रोमरोमीं भिनली! त्यामुळें बेकीची एकी झाली व अठरा पगड जातींचें राष्ट्र बनलें! संतांची ही कामगिरी अमोल नाहीं असें कोण म्हणेल?

परंतु हें मानसिक शुद्धीचें कार्य अत्यंत हळूहळू मुंगीच्या पावलांनीं चालणारें आहे. या कार्याला पूर्णता कधींच येत नाहीं. उलट दीर्घ काळ चालणाऱ्या या

उत्क्रांतीच्या कार्यांत बाह्यजगांत आकस्मिक घडून येणाऱ्या उत्पातांनीं मध्येंच खंड पडतो व पुनः नव्या पिढींतील संतांना 'नवी विटी व नवें राज्य' सुरू करावें लागतें. यामुळें संतांच्या कार्यपरंपरेला कधींच अंत पडत नाहीं. जगाच्या अंतापर्यंत त्यांचें कार्य चालणार. कारण त्यांचें ध्येय सतत दृष्टिपथांत असलें तरी तें प्रत्यक्ष सृष्टींत पूर्णतया कधींच स्थापित होत नाहीं. यामुळें संतांची परंपरा हजारों वर्षें चालत असते. तिच्यांत मधूनमधून भरती-ओहटीच्या क्रिया होत असतात, परंतु लहान मोठ्या चंचल लाटांचें नृत्य समाजांत सतत चालू असतें. आवसे-पौर्णिमेला जोराची भरती आली किंवा तुफान झालें म्हणजे उत्क्रांतीमार्गांत उठलेल्या प्रबळ लाटा डोळ्यांत विशेष भरतात व जाणवतात. परंतु एरवीं डोळ्यांत तें भरलें नाहीं तरी समाजाच्या अंतरशुद्धीचें कार्य लहानमोठे संत सतत करत असतात. कारण संतांचें ध्येय त्यांच्या हयातींत कधींच फळाला येत नाहीं. जमीनीवर उभे असतांना खालून आकाश जेवढें दूर दिसतें तेवढेंच डोंगरावर चढल्यानंतरहि वाटतें. माणूस कित्तीहि उंच गेला तरी आकाशाला त्याचे हात कदापि पोहोंचत नाहींत. परंतु तेवढ्यावरून माणूस डोंगरावर चढलाच नाहीं, असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. प्रत्येक संताच्या प्रभावी वाणीमुळें समाजाचें मन वरच्या पातळीवर जात असलें तरी पूर्णतेचें आकाश त्याच्यापासून फार दूर असतें. त्यामुळें संतांची परंपरा कधींच खंड पावत नाहीं. त्यांची समाजाला नेहमीं गरज भासते. एखाद्या उत्पातानंतर तर त्यांची जाणीव विशेष प्रमाणांत भासते.

हिंदुधर्ममहासागरांत वेळोवेळीं व स्थानोस्थानीं ज्या प्रचंड लाटा उठल्या त्यांतील एक लाट म्हणजे ज्ञानेश्वरादि तुकारामान्त संतांनीं महाराष्ट्रजनतेंत घडवून आणलेली धार्मिक उत्क्रांति ही होय. हिंदु धर्म हा जगांतील पहिला धर्म होय. युरोपीयन पंडितांना मानवसंस्कृतीचें उगमस्थान ग्रीस व रोमच्या इतिहासाशीं संलग्न करणें अभिमानास्पद वाटत असलें तरी तें सत्य मात्र नव्हे. त्यामुळें हिंदु संस्कृतीवर अर्वाचीन छाप मारण्यास ते उत्सुक असतात. परंतु त्यांनाहि आतां नाइलाजानें कबुली देणें भाग पडलें कीं ऋग्वेदाच्या रचनाकालाला निदान सहा हजार वर्षें लोटलीं असावीं. वैदिक हिंदु धर्म अर्थात याहून प्राचीन असला पाहिजे. कारण धर्मविचारांत थोडेंबहुत स्थैर्य व धार्मिक कल्पनांत सातत्य आल्याशिवाय ऋग्वेदांतील अनेक सूक्तें व छंद रचले गेले नसतील. चीनचा प्राचीन धर्मसंस्थापक कनफ्युशीअस हा ऋग्वेदाच्या रचनाकालानंतर किमानपक्ष अडीच तीन हजार वर्षांनीं झाला असावा. बुद्ध गौतम व जैन तीर्थंकर महावीर हे ऋग्वेदरचनेनंतर किमानपक्ष साडेतीन चार हजार वर्षांनी जन्मास आले. खिस्ती धर्मसंस्थापक येशू व मुसलमानी महंमद पैगंबर हे ह्या तुलनेने अर्वाचीन ठरतील. तेव्हां जगांतील सर्व प्रचलित धर्मांच्या कल्पनांचें

उगमस्थान हिंदुधर्मविचारांत सापडणें साहजिक आहे. आणि म्हणूनच हिंदु धर्माला महासागराची उपमा उत्तम रीतीनें शोभते. कारण पृथ्वीवर एकच महासागर आहे. भूगोलांत जरी पांच महासागरांचीं भिन्न भिन्न नांवें चुकीनें दिलीं आहेत, तरी पृथ्वीच्या नकाशावर सहज कोणी नजर टाकली तर त्याला असें दिसून येईल कीं हे भौगोलिक पंचमहासागर एकांत एक गुंतले असून ते सर्व एकाच प्रचंड हिंदी महासागराचे सोयीप्रमाणें पाडलेले काल्पनिक विभाग आहेत. त्यांत भिन्नता नाहींच! समुद्र, आखात व उपसागर हे तर बोलून चालून महासागराचे पोटविभाग आणि तेहि सोयीप्रमाणें पाडलेले व नामकरण केलेले. कश्यप समुद्रासारखा (Caspian Sea) एखादा लहानसा भाग अपवादात्मक रीतीनें महासागरापासून फुटून निराळा निघालेला आढळेल. परंतु त्याला आज समुद्र म्हणणें चुकीचें ठरेल. पूर्वी तो महासागराचाच भाग होता व समुद्र हें त्याचें वर्गीकरण रास्त होतें. परंतु आज त्याला खारें सरोवरच म्हणावें लागेल. जगांतील प्रमुख धर्म पंच विभागात्मक महासागर ठरतील व विविध धर्मपंथांना समुद्रांची आखातांची किंवा उपसागरांची उपमा देतां येईल.

हिंदी महासागरांच्या पोटांत ज्याप्रमाणें प्रशांत (Pacific), असुर (Atlantic), उत्तर ध्रुव (Arctic) व दक्षिण ध्रुव (Antarctic) हे चार महासागर समाविष्ट झाले आहेत, त्याप्रमाणे हिंदु धर्मांतून च १ कनफुशी, २ बुद्ध, ३ ख्रिस्ती व ४ यवनी हे प्रचलित भिन्न भासणारे मोठे धर्म निघाले आहेत. जगांतील लोकसंख्येपैकी शेकडा ९५ लोक या पंच महाधर्मांचे अनुयायी आहेत. जैन, पारशी, शीख या लोकांची महती थोर असली तरी त्यांची संख्या अल्प आहे. शिवाय सामान्य हिंदु जनतेला या तिन्ही धर्मांचे अनुयायी हिंदुधर्मीयच वाटतात. यहुद्यांचा ख्रिस्ती धर्माशीं असलेला घनिष्ठ संबंध प्रसिद्धच आहे. तेव्हां या अनेक धर्मांना व पंथांना सिंधुसमुद्र, गंगासमुद्र, लाल समुद्र असें संबोधितां येईल, हिंदु धर्माच्या प्राचीन आचार्यांना या सत्य घटनेची जाणीव असल्यामुळें हिंदुधर्माचें स्वरूप महासागराप्रमाणें व्यापक, विशाल व संग्राहक झालें. बुद्ध, जैन व ख्रिस्ती या तीन थोर धर्मांच्या कल्पनांत व मूलभूत सिद्धांतांत जें विलक्षण साम्य आढळतें त्याचा फायदा घेऊन बुद्धाचा अवतार हिंदु धर्मांत समाविष्ट करण्यांत आला आणि संन्यास, अहिंसा व त्याग यांना हिंदु धर्मांत मोल चढलें. विष्णूचा नववा अवतार हा गौतम, महावीर व येशू या धर्मसंस्थापक थोर त्रिमूर्तीचा दर्शक आहे. तलवार घेऊन धर्मप्रसाराचें कार्य करणारा लढाऊ कलंकी हा विष्णूचा दहावा अवतार बहुधा महंमद पैगंबराच्या चारित्र्यानें स्फूर्त झाला असावा. ताजिये बसविणें, नालसाहेबाची स्वारी काढणें, फकीरी घेणें, हिरवा नाडा बांधणें, वाघ रंगणें व मोहरमचा सण साजरा करून

रेवड्यांचा प्रसाद खाणें या विविध उपायांनीं व आचारांनीं पर्वापर्वापर्यंत हिंदु-धर्मीयांनीं आपल्या थोर धार्मिक तत्वज्ञान व परंपरेनुसार मुसलमानी धर्माला वश करून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करून पाहिला. परंतु मुसलमानांचा हिंदुधर्मद्वेष यत्किंचितहि न शमतां त्यांचा सवता सुभा कायम राहिला. ख्रिस्ती, बुद्ध व जैन हे धर्म हिंदु धर्मानें पचनीं पाडले व शीख आणि पारशी व यहुदी यांच्याशीं घरोबा जोडला, परंतु मुसलमानांच्या कडवेपणापुढें हिंदु धर्माला हात टेकावे लागले.

हिंदु धर्म हा जगांतील पहिला (हिंदूंच्या मतें अनादि) धर्म असल्यामुळें व इतर धर्मकल्पनांचा व मतांचा उगम तेथूनच झाल्यामुळें जगांत जन्मलेलें प्रत्येक बालक धर्मानें हिंदु असतें. संस्कारांनीं विशिष्ट दीक्षा दिल्याशिवाय तें अन्यधर्मी होऊं शकत नाहीं. जोंपर्यंत त्याच्यावर कोणताहि धर्मसंस्कार होत नाहीं तोंपर्यंत तें हिंदूच समजलें गेलें पाहिजे. ख्रिस्ती आईबापांच्या पोटीं जन्मलेल्या अर्भकाचा संस्कारपूर्ण बाप्तीस्मा होतो तेव्हांच तें ख्रिस्ती समजलें जातें. खूदवा पढल्याशिवाय कोणी मुसलमान होत नाहीं. परंतु हिंदु धर्मानुसार संस्कारानें केवळ द्विजत्व प्राप्त होतें, हिंदुत्व जन्मतःच प्रत्येकाला प्राप्त झालेलें असतें. 'जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते' शूद्र हा हिंदुच होय. संस्कारपूर्वक द्विजाची (ब्राम्हण-क्षत्रिय वैश्याची) मात्र दीक्षा घ्यावी लागते. ती घेतली नाहीं तरी द्विजत्व लाभत नसलें, तरी कोणाचें हिंदुत्व नष्ट होत नाही! संस्कारासंबंधी हिंदु धर्माची इतकी उदार भूमिका आहे. ती अन्य धर्मांत क्वचितच आढळेल.

हिंदु समाजधारणेला पोषक असलेली ही हिंदु धर्मांतर्गत चातुर्वर्ण्य व्यवस्था पुढे कालांतरानें भ्रष्ट होऊन हिंदु धर्माला व समाजाला घातक व मारक झाली. हें चातुर्वर्ण्य प्रारंभीं तरी भगवंतांनीं गीतेंत कथन केल्याप्रमाणें मनुष्याच्या गुणकर्मावर अवलंबून होतें. "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" तेव्हां क्षत्रिय विश्वामित्राला तपस्येनें सहज ब्रह्मर्षी होतां येत असे. परंतु गुणधर्म बाजूस सारून जन्मावर हें चातुर्वर्ण्य प्रस्थापित झाले तेव्हां वर्णव्यवस्थेला जातिभेदाचें स्वरूप आलें. पुढें या चार प्रमुख जातींच्या हजारो पोटजाती निर्माण झाल्या. आज हिंदुसमाजांत अशा जन्मजात रोटीबंद व बेटीबंद जाती पोटजातींची संख्या साडेतीन हजार आहे. प्राचीन काळीं ब्राम्हण-क्षत्रिय वैश्य हे तिन्ही द्विज समान योग्यतेचे परंतु भिन्न गुणांचे समजले जात. परंतु हिंदु समाजांत दुर्दैवानें उत्पन्न झालेल्या या जातिभेदाच्या भूतानें थैमान मांडल्यामुळें अनेक भ्रममूलक उच्चनीच भावना समाजांत निर्माण झाल्या. जरी ब्राह्मण [जन्मजात] भ्रष्ट झाला तरी तो संत तुकारामापेक्षां श्रेष्ठ गणला जाऊं लागला. तुकारामासारख्या जगद्वंद्य कुणब्याच्या पंगतीला भ्रष्ट ब्राह्मण बसावयास अनमान करूं लागला, मग सोयरेसंबंध जोडण्याची वार्ता दूर च राहिली.

त्यांतच अस्पृश्यतेचा कलंक हिंदु धर्माला लागला व पांचवी मोठी चांडाळ जात व तिच्याहि अनेक पोटजाती निर्माण झाल्या. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व चांडाळ असे जन्मजात व पिढीजात उच्चनीच अनुक्रमांक समाजांत रूढ झाले. त्यामुळें हिंदु धर्माला मृत कळा आली व हिंदु समाजाची छकलें झालीं. हिंदूंच्या भालीं गुलामी आली. प्रथम हिंदु मुसलमानांचे गुलाम बनले व आज हिंदु-मुसलमान दोघेहि ब्रिटिश सत्तेचे गुलाम बनले आहेत. त्यांत देखील मुसलमान गुलामांचा नंबर हिंदु गुलामांपेक्षां वरचा लागतो असें मुसलमान मानतात!

हिंदु धर्माचे व समाजाचे बल खच्चविणारे तीन मोठे दोष म्हणजे (१) अस्पृश्यता (२) जातिभेद व (३) जन्मजात कृत्रिम उच्चनीचतेच्या भावना. एखाद्या माणसाला त्याच्या गुणामुळें मान्यता मिळाली तर समाजाला त्याची थोरवी पटल्यामुळें त्याबद्दल विषाद वाटत नाहीं. परंतु गुणशून्य माणूस जन्मजातीच्या जोरावर जेव्हां प्रतिष्ठा मिरवूं लागतो तेव्हां समाजांतील इतर गुणी माणसांना दुःख होणें स्वाभाविक आहे. हे तीन दोष दूर करण्याचा प्रयत्न प्रिन्सिपाल आगरकरादि आंग्लविद्याविभूषित पंडितीपढिक सुधारकांनीं प्रथम करून पाहिला, ही सनातनी धर्ममार्तंडांनीं चालविलेली ओरड चुकीची आहे. जातिभेदाचें उच्चाटन व अस्पृश्यतेचें निर्मूलन करण्याचे अनेक प्रयत्न क्रांतिकारकांनीं प्राचीन काळापासून चालविले आहेत. कारण हिंदु धर्म व समाजाला लागलेली ही कीड सर्वांना स्पष्टपणें दिसत होती. बुद्ध व जैन धर्म याच कारणांनीं उदयास आले. सनातनी हिंदुधर्मी त्या थोर धर्मसंस्थापकांना पाखंडी म्हणत असत. महानुभाव व लिंगायत पंथापुढें हेंच उच्च ध्येय होतें. दुर्दैवानें ही कीड समाजवृक्षाच्या इतक्या खोल गाभ्यांत जाऊन बसली आहे कीं हीं भुतें त्या थोर क्रांतिकारकांना गाडतां आलीं नाहींत. उलट हिंदु समाजांत चार दोन नवीन जातींची व पंचवीसतीस पोटजातींची जादा भर मात्र पडली. जे जाती मोडावयास गेले त्यांनीं नवीन जाती अहेतुपूर्वक निर्माण केल्या. प्रार्थनासमाज, ब्राह्मोसमाज व आर्यसमाज यांनीं हेंच महत्कार्य करण्याचें कंकण बांधलें आहे.

परंतु जातिभेदाचें व अस्पृश्यतेचें निर्मूलन करणें इष्ट असलें तरी तें अशक्य जाणून समाज व धर्मसंघटणेच्या दृष्टीनें वैष्णव संतांनीं एक नवा प्रयोग करून पाहिला. भक्तीनें मोक्ष मिळतो व नामसंकीर्तनानें कोणालाहि स्वर्ग गाठतां येतो, ही त्यांची मुख्य शिकवण. कर्मकांडाचें महत्व त्यांनीं कमी केलें व नाममहिमा वाढविला. भजन कीर्तन ही त्यांची पंथप्रसाराचीं साधनें व झांज-टिपळ्या हीं त्यांची आयुधें. या वैष्णव संतांनीं चवथ्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत तामीळ देशांत मोठी क्रांति घडवून आणली. ही धार्मिक कांति घडवून आणणारे

बारा अळुवार संत तिकडे प्रसिद्ध आहेत. ह्या बारा अळुवारांत तिरुमंगाई हा शूद्र व तिरपान हा अस्पृश्य जातीचा होता. या अळुवारांच्या निवडक कवितांचा संग्रह दहाव्या शतकांत नाथमुनीनें केला. त्याला 'प्रबंधम्' म्हणतात व तामीळ लोक त्या गाथेला वेदाप्रमाणे मान देतात. अळुवारांची महाराष्ट्रीय आवृत्ती म्हणजे भागवत धर्म होय. प्रबंधमूच्या रचनेनंतर २७० वर्षांनीं ज्ञानेश्वरीचा जन्म झाला. हिंदुस्थानच्या एकत्वाला प्राकृत भाषाभेद कधींच नडला नाहीं. कारण संस्कृत ही सर्व हिंदुस्थानची धर्मभाषा होती व तिला देवभाषा समजत. उत्तरेस बदरीनारायण – केदार, दक्षिणेस रामेश्वर, पूर्वेस जगन्नाथपुरी व पश्चिमेस द्वारका ही क्षेत्रें सर्वांच्या दृष्टीनें पवित्र होतीं. बारा ज्योतिर्लिंगें हिंदुस्थानभर विखुरलीं होतीं.

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका
पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायिकाः ॥

ही सात पुण्यनगरें भिन्न भिन्न भाषाभाषी प्रांतांत होतीं.

गंगेच यमुनेचैव गोदावरी सरस्वती
नर्मदा सिंधु कावेरी जलेस्मिन् सन्निधं कुरु ॥

या पुण्यसलिला सरितांचें स्नान करण्यास्तव हिंदुस्थानभर प्रवास करणें प्रत्येक भाविकाला भाग पडे. त्यामुळें तीर्थाटण करणाऱ्या जनांच्या द्वारा एका प्रांतांतील धार्मिक क्रांतीचा प्रसार दुसऱ्या प्रांतांत होऊं शके. कारण दळणवळणाचीं साधनें थोडीं असलीं, तरी हिंदूंचा धर्माभिमान तेव्हां तीव्र होता व ज्ञान संपादण्याचा तीर्थाटण हा सुलभ मार्ग होता.

भागवत धर्माला सुदैवानें ज्ञानेश्वरासारखे अलौकीक आचार्य, नामदेवासारखे देवाचे लाडके भक्त, एकनाथासारखे न्यायी व समतावादी पंडित आणि तुकारामासारखे सरळ, नम्र व प्रासादिक संतकवि लाभले! त्यांच्यामुळें जातिभेद मावळला नाहीं, परंतु त्याचीं तीव्र कंटकशल्यें महाराष्ट्रापुरती तरी बोथटलीं व त्या जागीं मखमालीची लव वठली. मात्र चोखोबाला पांडुरंगाच्या देवळांत प्रवेश मिळूं शकला नाहीं. परंतु भजनांत व कीर्तनप्रसंगीं जातिभेद पाळला जात नसे व भक्तिरसांत रंगून नाचतांना शिवाशिवीचें भान उरत नसे. जातीजातींतील वैमनस्यें कमी झालीं व कृत्रिम उच्चनीच भावनांना तात्पुरती सार्वजनिक प्रसंगीं मूठमाती मिळाली.

संतांच्या कामगिरीची कितीहि स्तुति केली तरी त्यांना लाभलेल्या यशाच्या मर्यादांचा विसर पडूं देण्यांत अर्थ नाहीं. जातीजातींत ऐक्य प्रस्थापित झालें तरी तेवढ्यामुळें राष्ट्र समर्थ, संपन्न व स्वतंत्र होऊं शकत नाहीं. शहाणा मनुष्य नदी

ओलांडतांना बनेल तोंपर्यंत प्रवाहाच्या दिशेनें पोहत जातो. परंतु केव्हां तरी धार कापल्याशिवाय त्याला पैलतीर गांठतां येणार नाहीं. धार केव्हां कापावयाची हें तो प्रसंग व परिस्थिती पाहून ठरवितो, इतकेंच! परंतु केवळ प्रवाहपतित झाल्यानें त्याला पैलतीर केव्हांच गांठतां येणार नाहीं. बेकीची एकी झाली म्हणजे पूर्वतयारी झाली, परंतु म्हणून काय पराक्रमाची गरज नाहीं? पराक्रम केव्हां तरी संधी साधून करावा लागणार; शत्रूचें निर्दालन करणें भागच! लाकडांचा केवळ ढीग जमवून होळी पेटणार नाहीं. लाकडांची रास रचल्याशिवाय होळी पेटणें शक्य नाहीं. परंतु केवळ ढीग करून कार्य साधत नाहीं. त्या ढिगाऱ्याला कोणी तरी अग्नि लावलाच पाहिजे. त्या ज्वालेचें महत्व तिच्या आकारावर अवलंबून नसून तिच्या सामर्थ्यावर व परिणामावर ठरत असतें. इंधनाचें महत्व मात्र त्याच्या आकारमानावर ठरतें. वीज क्षणभर चमकली म्हणून काय झालें? स्फुलिंग लहान असला म्हणून काय झालें? तरवारीचें महत्व तीक्ष्ण धारेवर आहे, किंमतीवर नाहीं. क्रांतिकारक घटनेचें आयुष्य अल्प असलें तरी तिचें कार्य मात्र चिरंतन स्वरूपाचें ठरतें.

वन्हि तो चेतवावा रे चेतवितांच चेततो।

संतांनी निर्मिलेल्या अस्फुट व अमूर्त अशा राष्ट्रभावनेला ही चेतवणी तुकाराम महाराजांच्या काळांत म्हणजे भागवत सांप्रदायाच्या परमोत्कर्षकालीं महंत रामदासांनीं दिली. त्यामुळें महाराष्ट्राला स्वातंत्र्याची तहान लागली व स्वराज्याची भूक जाणवली! आत्मसंघटण व शत्रुनिर्दालन या दोन्ही क्रिया राष्ट्राला आवश्यक आहेत. त्या एकमेकांच्या पूरक आहेत व त्या क्रमशः चालतात. पहिली क्रिया घडल्यानंतर दुसरीचा कार्यक्रम सुरू होतो. अहिंसा, शांति, प्रेम हीं पाहिल्या पायरीवरील आयुधें तर हिंसा, पराक्रम व अभिमान हीं दुसऱ्या पायरीवरील आयुधें होत. पहिली क्रिया साध्य होण्यास दीर्घ काळ लोटावा लागतो तर दुसरी तडकाफडकी निकालांत निघते. पहिली क्रिया पूर्णांशानें कधींच साध्य होत नाहीं. तारतम्य ओळखून ती थांबवावी लागते व दुसऱ्या क्रियेचे मंत्र म्हणावे लागतात. पहिलीचा मार्ग उत्क्रांतीचा तर दुसरीचा भर क्रांतीवर. पहिली लोकशाही चळवळ तर दुसरी हुकूमशाही वावटळ! पहिलीचे चालक अनेक संत तर दुसरीचा एकटाच महंत. पहिलीचे चालक नीतितत्वानुसार वर्तन करण्याचा प्रयत्न करतात तर दुसरीचा हुकूमशहा पराक्रमावर सारी भिस्त ठेवतो. पहिली बोलकी किंवा फार तर लेखी चळवळ, दुसरी मात्र कर्तृत्वाची वावटळ! संत व महंत दोघेहि लोकप्रिय असतात. किंबहुना महंतांवर लोकांचें प्रेम अधिक असतें. रुझवेल्ट अमेरिकेंत जितका लोकप्रिय आहे त्यापेक्षां हिटलर जर्मनींत खात्रीनें अधिक लोकप्रिय आहे.

पहिल्याचा मंत्री व सहचर वेंडेल विल्की आपल्या पुढाऱ्यावर कडक टीका करतो, तर गोअरिंग गोबेल्स हे हिटलरचे केवळ प्रतिध्वनी असतात. संतावर अनुयायांचें अंध प्रेम असतें, तर महंतावर त्याच्या अनुयायांची अंध परंतु सादर भक्ती असते. संत आपल्या अनुयायांना आपले मित्र लेखतो, तर महंत आपल्या अनुयायांना लेकरें-लेखून त्यांचा भार शिरावर वाहतो. संताचें ध्येय सत्यसृष्टींत उतरत नाहीं, तर महंताला 'याच देहीं याच डोळा' ध्येय फलित झालेलें पहावयास मिळतें. संताची नजर भविष्य काळावर, तर महंताची वर्तमान काळावर खिळलेली असते. संताचा शिष्यसांप्रदाय-गुरूच्या समाधीनंतर त्याचें उरलेलें कार्य पुढें किंवा पुनश्च हरिः ॐ पासून चालवितो, तर महंताच्या मृत्यूपूर्वीच त्याच्या कार्याचा पसारा उरकला असतो. त्यामुळें महंताला सांप्रदाय सहसा असत नाहीं व असला तर तो टिकत नाहीं. संताची लोक प्रसंगीं टिंगल करतात, तर महंताला ते चळचळा कापतात. मनाविरुद्ध कांहीं घडल्यास संत अश्रू दुःखानें ढाळतो, तर महंत शापून भस्म करूं पाहतो!

भागवतधर्मप्रसाराचा परमोत्कर्ष तोच महंत रामदासस्वामींचा कार्यारंभ कां ठरला हें वरील विवेचनावरून सहज लक्षांत येईल. संघटणाचें कार्य पुरेसें वाटलें, कीं शत्रुनिर्दालनाच्या कार्याला हात घालावा लागतो. प्रवाहपतित राष्ट्र व त्याचे पुढारी योग्य संधी प्राप्त झाली असें वाटतांच प्रवाहाची नेटानें धार कापावयास सज्ज होतात. पंढरीचें दैवत पांडुरंग म्हणजे कंसाला मारणारा श्रीकृष्ण नव्हे, तर शस्त्रसंन्यास घेऊन 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' या भूमिकेवरून बुद्धावतारांत शिरलेला शांतिब्रह्म परमेश्वर! समाजांत समता व बंधुता स्थापतांना त्याचा आशीर्वाद कामीं पडला, तरी शत्रूचें निर्दालन करून स्वातंत्र्य स्थापण्याच्या कार्यांत त्याची फुसकी साक्ष कशी सफल होणार? म्हणून समर्थांनीं ललकारी दिली कीं, "श्रीरामचंद्राचें ध्यान करा. तो हि विष्णूचाच अवतार आहे. राम, कृष्ण व बौद्ध एकच! कृष्ण व बुद्ध ही रामचंद्राची अवतारी वंशावळ! एक पुत्र तर दुसरा नातू! तेव्हां आपण सर्व आतां त्या परमपूज्य आजोबाला गाठूं व त्याचे चरण वंदून त्याचा आशीर्वाद मिळवूं. चौदा चौकड्यांचा राजा रावण दैत्य जेव्हां माजला व देवांना बंदींत टाकून त्यांचा छळ करूं लागला तेव्हां याच पराक्रमी श्रीरामचंद्रानें त्याचा वध केला व रामराज्य स्थापन केलें, आणि तें कोणाच्या बळावर? तर ज्यांना पराक्रमी व धिप्पाड दैत्य 'मर्कटें' म्हणून हेटाळीत त्या ठेंगण्या ठुसक्या काळ्या मावळ्यांच्या सहाय्यानें! मोगल शूर पराक्रमी असतील, ते प्रचंड राक्षस असतील व त्यांचा राजा दुसरा रावण असेल! आपण त्यांच्या तुलनेनें क्षुद्र दिसूं, परंतु श्रीरामचंद्राच्या वरप्रसादानें ही अशक्य गोष्ट शक्य होईल. रावणाच्या

जुलमानें त्यावेळीं जसा देश व समाज त्रस्त झाला होता तशीच अस्मानी सुलतानी आजहि माजली आहे. धर्म संकटांत सापडला, लोकांना खावयास अन्न नसल्यामुळें ते घरादारांना पारखे होऊन देशोधडीस लागले, त्यांच्या घरच्या स्त्रियांच्या पातिव्रत्यावर दुष्टांची धाड पडून त्या भ्रष्ट झाल्या ! परंतु

धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।
जाले, आहेत, पुढें होणार। देणें ईश्वराचें॥

प्रत्यक्ष देवानें धर्मरक्षणार्थ आजहि अवतार घेतला आहे! तो व त्याचे अनुयायी मावळे दैत्यांचा खास संहार करतील व पुनश्च रामराज्य स्थापन करतील.

आदिशक्ती माता तुळजाभवानीच्या रुपानें पातली आहे. प्रतापगडावर तीच प्रगट झाली आहे. रामाला तिनें पूर्वी वर दिला म्हणून रामचंद्राला विजय मिळाला. ती रामवरदायिनी आतां शिववरदायिनी झाली आहे. त्या देवीला उद्देशून समर्थ म्हणतात —

दुष्ट संहारिले मागे। ऐसें उदंड ऐकतो
परंतु रोकडें कांहीं। मूळ सामर्थ्य दाखवी॥
येकची मागणें आतां। द्यावें तें मजकारणें
तुझा तूं वाढवी राजा। शीघ्र आम्हांचि देखतां॥
रामवरदायिनी माता। गर्द घेऊनि उठली
मार्दिले पूर्वीचे पापी। आनंदवनभुवनीं॥
प्रत्यक्ष चालली राया। मूळमाया समागमें
नष्ट चांडाळ ते खाया। आनंदवनभुवनीं॥
भक्तांसी रक्षिले मागे। आतां हि रक्षिते पहा
भक्तांसी दिधले सर्वै। आनंदवनभुवनीं॥

तूं दुष्टसंहाराचा प्रत्यक्ष चमत्कार आज करून दाखविल्याशिवाय जुन्या पौराणिक कथांवर विसंबावयास आम्ही तयार नाहीं. हा शिवराजा तुझा आहे. त्याचें सामर्थ्य व यश वाढीव."

श्रीरामचंद्राच्या उपासनेबरोबर मारुतीरायाची उपासना ओघानें आली च. कारण मारुतीरायाचें अद्भुत चरित्र वजा केलें तर रामायणांत बाकी शून्यच उरेल. हा रामाचा दास असला तरी शत्रूंचा काळ आहे. हा वीर मूर्तिमंत पराक्रम आहे. हें आदिशक्तीचें प्रगट सामर्थ्य आहे. समर्थांना दासमारुतीपेक्षां वीरमारुतीचें

ध्यान अर्थातच अधिक प्रिय होतें. त्यांचीं भीमरूपी स्तोत्रें मृतास देखील केवळ पठनानें चैतन्य आणतील. मारोतीरायाला त्यांनी भीम म्हणून संबोधिलें !

भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती
वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥
महाबळी प्राणदाता सकळां उठवी बळें
सौख्यकारी शोकहर्ता धूर्त वैष्णव गायका ॥
ध्वजांगें ऊचली बाहो आवेशें लोटला पुढें
काळाग्नी काळरुद्राग्नी देखतां कांपती भयें ॥
ब्रम्हांडें माइलीं नेणों आवळे दंतपंगती
नेत्राग्नीं चालिल्या ज्वाळा भ्रुकुटी ताठल्या बळें ॥
कोटिच्या कोटि उड्डाणे झेंपावें उत्तरेकडे
मंद्राद्रीसारिखा द्रोण क्रोधें उत्पाटिला बळें ॥

काय विलक्षण शब्दसामर्थ्य ! शिवरायाचा शत्रु उत्तरेस दिल्लीला होता म्हणून उत्तरेकडे मारुतीरायाची झेप होती. आज समर्थ असते तर समूळ पर्वत उपटून टाकणाऱ्या प्रभंजनासारख्या भीमरूपी वज्र हनुमानाला त्यांनी पश्चिमेकडे झेप घ्यावयास लावली असती व महासागर कोरडा करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली असती !

समर्थांच्या या विशिष्ट भूमिकेमुळें त्यांनीं सुंदरकांड व युद्धकांड अशी रामायणाचीं दोनच कांडें रचलीं. त्यांना वीर मारुतीची कामगिरी मुख्यतः वर्णन करावयाची होती. त्यांतहि पहिल्यांत १०० व दुसऱ्यांत १३०० वर श्लोक आहेत. त्यांचा दासबोध तर विशेषतः व्यवहारधर्म, राजकारण व समाजसेवा यांचा मेळ घालणारा उत्कृष्ट ग्रंथराज आहे. परमार्थापेक्षा हि या जगांतील व्यवहारास समर्थांनीं महत्त्व दिलें आहे. ज्याला व्यवहारांत यश मिळविण्याचें सोपें कार्य साधणार नाहीं त्याला परमार्थाचा बिकट मार्ग कसा साध्य होणार ? ही समर्थांची मनोभूमिका लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यांच्या स्फुट प्रकरणांत तर वीररसाची गंगा दुथडी भरून वाहत आहे. त्यांची साधी व रोखठोक वाणी मनाच्या श्लोकांत प्रगट झाली आहे. हा तपस्वी ब्राह्मण पंडित सरळ धोपटमार्गी मराठ्याच्या सडेतोड वाणीनें उपदेश करतांना आढळतो. शिवराजा त्याचा शिष्य लौकीकांत असला तरी हा महंत त्याला 'देवाचा अवतार' 'प्रत्यक्ष महादेव' मानतो व त्याचा उघड उघड गौरव करतो. त्यांच्या लेखी शिवराजा क्षत्रियच काय परंतु देव होता. समर्थ मोठे

कीं शिवाजीमहाराज मोठे, स्वराज्यस्थापनेची खरी कामगिरी कोणाची असेल? असले क्षुल्लक वाद माजविणाऱ्यांनीं समर्थांची ही निस्पृह भूमिका लक्षांत घ्यावी. समर्थांची व शिवरायाची भेट फार उशीरा घडून आली असे अट्टाहासानें प्रतिपादणारे आजचे विद्वान एक गोष्ट विसरतात, कीं त्यामुळें शिवछत्रपतीच्या विशाल व दूरदर्शी राजकारणाला व सर्वसंग्राहक धोरणाला गालबोट लागतें. समर्थांसारखा शहाजी-राजांच्या जहागिरींत राहणाऱ्या लोकविलक्षण महंताची शिवाजीराजांनीं अनेक वर्षें भेट न घेणें यांत समर्थांपेक्षां महाराजांकडेच लघुता येते. महाराजांनीं उघडपणें धर्मरक्षणाचें व त्याबरोबर च गोब्राह्मणप्रतिपालनाचें व्रत अंगिकारलें होतें. त्या काळच्या रिवाजाप्रमाणें त्यांनीं तत्कालिन सर्वच संतांची भेट घेतली असली पाहिजे आणि गुरुपदेशहि त्यांनीं तारुण्यांत च घेतला असला पाहिजे. कारण तत्कालिन कर्ते पुरुष उमेदीच्या वयांत च गुरुपदेश घेऊन ऐहिक वैभवाबरोबर च पारलौकीक वैभवाची वाट सुगम करून ठेवीत. गुरूला लोक आज तुच्छ मानत असले तरी तेव्हां तो अत्यंत पूज्य मानला जाई.

समर्थांचें लिखाण अतिशय ओजस्वी, क्षोभक व स्वातंत्र्यदीपक आहे.

मराठा तितुका मेळवावा । आपला महाराष्ट्रधर्म वाढवावा
येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हासती ॥
देवद्रोही तितके कुत्ते । मारूनि घालावे परते
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ॥
देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा
मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावे
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥

मोगलांच्या सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या साम्राज्यांत तीर्थक्षेत्रांचें दर्शन घेण्याच्या निमित्तानें हिंडणारा हा महंत स्पष्ट जाहीर घोषणा करतो कीं—

विघ्नांच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरि लोटला
धर्डिली चिर्डिली रागें । रडविली बडविलीं बळें ॥
खौळले लोक देवाचे । मुख्य देवचि उठिला
कळेना कायरे होते । आनंदवनभुवनीं ॥
कल्पांत मांडला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया
कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभुवनीं ॥

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्तान बळावले
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनीं ॥

बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें । आनंदवनभुवनीं ॥

औरंगजेब तेव्हां हिंदुस्थानचा बादशहा होता. तो कडवा हिंदुद्वेष्टा मुसलमान असला तरी संतांचा छळवाद करण्याची बुद्धि त्याला झाली नाहीं. टिपू व औरंगजेब यांचें हें वैशिष्ट्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावें
कष्ट करोन घसरावें । म्लेंच्छांवरी ॥

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडे तिकडे ॥

लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥

शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत मानावें
इहपरलोकीं रहावें । कीर्तिरूपें ॥

शिवाजी महाराजांच्या पश्चात त्यांच्या पुत्रास केलेला हा उपदेश संभाजी महाराजांनी प्रत्यक्ष कृतींत आणून हुतात्मा हें मानाचें चिरंजीव पद मिळविलें, हें सुप्रसिद्धच आहे. सम्राटापेक्षांहि ही पदवी फार मोठी आहे. त्यामुळेंच

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु
अखंडस्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥

यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥

आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळा ठाईं ॥

धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥

अशा शिवछत्रपतींचे संभाजीराजे पुत्र शोभले! ' पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा '

तत्कालिन भीषण परिस्थितीचें चित्र समर्थांनी भयानक शब्दांत मांडिलें असलें

कितीयेक ग्रामेंचि ते वोस जाली। पिकें सर्व धान्येचि नाना बुडाली
कितीयेक धाडीवरी धाडि येती। द्वया सैन्यकाचेनि संहार होती॥
कितीयेक ते मेघही मंद जाले। अनावृष्टि स्थळोस्थळीं लोक मेले
कितीयेक अन्नाविसीं भ्रष्ट जाले। कितीयेक लोकीं जनीं प्राण दिल्हे॥
कितीयेक ते तांब्रबंदींच गेले। कितीयेक माऱ्हाष्ट्रबंदीं निमाले
कितीयेक ते छंद ना बंद कांहीं। कितीयेक बेबंद ते ठाइंठाईं॥
कितीयेक ते घ्राणकर्णेंचि घेती। किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती
किती मोट बांधून ते बूडवीती। पिछाडेचि बांधोनि हीरोनि नेती॥

तरी त्यांनी लोकांना विलक्षण धीर दिला आहे. त्यांचा आशावाद अमर आहे.

धीर्धरा धीर्धरा तकवा। हडबडूं गडबडूं नका
काळ देखोनि वर्तावें। सांडावें भय पोटिचें॥
धरावा धीर तो मोठा। विचारें पाहतां बरें
अधीर मानसें खोटीं। काम कांहीं कळेचिना॥
धाकेंचि चळचळा कांपे। भेणेंचि फळफळां मुते
प्रसंगीं चळचळा कांपे। तो प्राणी आत्मघातकी॥

यापेक्षां माणसानें 'यत्न तो देव जाणावा' व परिस्थितीवर मात करावी. नर करणी करेल तर तो नराचा नारायण होतो. 'यत्नाचा लोक भाग्याचा। यत्नेवीण दरिद्रता' हा त्यांचा संदेश आहे.

कष्टतां सौख्य मानावें। कष्टीं फळचि पाविजे।
आळसें सुख वाटें तें। दुःख ब्रह्मांड भोगवी॥
केल्यानें होत आहेरे। आधी केलेंचि पाहिजे
यत्न तो देव जाणावा। अंतरीं जाणतां बरें॥
अचुक यत्न तो देवो। चुकणें दैत्य जाणिजे
न्याय तो देव जाणावा। अन्याय राक्षसी क्रिया॥
सावधु देव जाणावा। उन्मत्तु दैत्य बोलिजे
साक्षेपी वंश देवाचे। आळसी वंश दानवी॥

प्रयत्नवादाचें यापेक्षां जोरदार समर्थन जगांतील वाङ्मयांत आढळणार नाहीं. ‘ असेल माझा हरि । तर देईल खाटल्यावरी । ’ या पंगु दैववादाला हें समर्थांचें जोरदार आव्हान आहे. ‘ सावध ’ ‘ सावधान, ’ ‘ सावधपण ’ हें समर्थांच्या तत्वज्ञानदीपिकेंचे आवडते शब्द आहेत. सावधपण हें देवपण होय. याच्या उलट उन्मत्तपणा हा राक्षसी गुण आहे.

मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥

या समर्थांच्या सुप्रसिद्ध ओवींत हरिकथानिरूपण व राजकारण यांच्या बरोबरीनें सावधपणाला स्थान मिळालें आहे. ईश्वराचा आशीर्वाद घ्यावा व धर्माच्या व्यापक तत्वज्ञानी भूमिकेवर राजकारणाची उभारणी केली आणि अखंड प्रयत्न सावधपणें चालू ठेवला तर यश लाभेल. ‘ कष्टावीण राज्य नाहीं – कष्टावीण फळ नाहीं. ’

जेंही उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥

तेव्हां कष्ट जरी करावयाचे ठरलें तरी सावधपणा हवाच. माणसानें कष्ट करतांना देहभान विसरून बेफाम होऊं नये. विवेक त्यानें सांभाळला पाहिजे, प्रसंग ओळखला पाहिजे, संधि साधली पाहिजे, शक्तीचें महत्व अपार असलें तरी तिच्या जोडीस युक्ती पाहिजेच. त्याशिवाय फळ पदरांत पडणें कठीण.

शक्तीनें पावतीं सुखें । शक्ति नसतां विटंबना
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे ॥
कोण पुसे अशक्ताला । रोगीसे बराडी दिसे
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ॥
शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यत्न होतसे
शक्ति युक्ति जये ठाईं । तेथें श्रीमंत धांवती ॥
युक्तीनें चालती सेना । युक्तीनें युक्ति वाढवी
उदंड खस्तिचीं कामें । मर्द मारूनि जातसे ॥

या मार्गानें जातां प्रपंच नेटका होईल, परमार्थाची वाट गवसेल आणि राजकारण यशस्वी होऊन रामराज्य स्थापन होईल. युक्ति हेंच सावधपण! शक्तियुक्तिसंयोग म्हणजे कृष्णार्जुनयोग व निश्चित विजय!

राज्य या रघुनाथाचें । कळिकाळासि नातुडे
बहुवृष्टि अनावृष्टि । हें कदा न घडे जनीं.॥

उद्वेग पाहतां नाहीं । चिंता मात्र नसे जनीं
व्याधि नाहीं रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ॥

युद्ध नाहींच अयोद्धा । राग ना मत्सरू नसे
बंदनिर्बंदही नाहीं । दंड दोष कदा नसे ॥

कुरूपी पाहतां नाहीं । जरा मृत्यु असेचिना
आदरु सकळै लोकां । सख्यप्रीति परस्परें ॥

बोलणें सत्य न्यायाचें । अन्याय सहसा नसे
अनेक वर्तती काया । येक जीव परस्परें ॥

दरिद्री धुंडितां नाहीं । मूर्ख हा तो असेचिना
परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रहो ॥

अद्भुत पिकती भूमी । वृक्ष देतीं सदा फळें
अखंड दुभती धेनु । आरोग्यें वाहती जळें ॥

नद्या सरोवरें वापी । डोलती नूतनें बनें
फळती फुलती झाडें । सुगंध वनवाटिका ॥

उदंड वसती ग्रामें । नगरें पुरेंचि पट्टणें
मठ माड्या पर्णशाला । ऋषिआश्रम साजिरे ॥

नाना युक्ति नाना बुद्धि । नाना विद्या नाना कळा
नाना संगीत सामर्थ्यें । नाना वाद्यें परोपरी ॥

एखादा आधुनिक लालसमाजसत्तावादी स्टॅलिनदास या रामराज्यापेक्षां अधिक उज्ज्वल असें कोणतें ध्येय दृष्टीपुढें ठेवूं शकेल? केवढें उदात्त ध्येय व किती मनोवेधक शब्दचित्र! जगांत विचारसंग्रामाची पुनरावृत्ती होते ती अशी! ह्या रामराज्य स्थापनेसाठीं समर्थांनीं तीर्थयात्रेच्या व देवदर्शनाच्या निमित्यानें सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला व आपल्या मतांचा प्रचार केला, ठिकठिकाणीं मारुतीचीं देवळें स्थापन केलीं आणि देवळालगत तालमी उभारल्या, अनेक मठ उभारले आणि त्या मठांत आपल्या महंत-शिष्यांची योजना केली व रामोपासनेचा प्रसार सर्वत्र हिरीरीनें केला. त्यांचा धीर गंभीर अवतारी शिष्य स्वराज्यस्थापनेचें कार्य

स्वतंत्रपणें करीत असला तरी त्या स्वराज्यस्थापनेपूर्वीची तत्त्वज्ञानी भूमिका निर्माण करण्याचें श्रेय भागवत सांप्रदायांतील संतांपेक्षां ह्या तीक्ष्ण, ओजस्वी, सतेज ब्रह्मचारी महंतालाच देणें भाग आहे. शिवछत्रपतींना वैदिक मंत्रांनीं राज्याभिषेक झाला, महाराष्ट्रांत स्नानसंध्या करावया उदंड पाणी वाहूं लागलें आणि सह्याद्रीच्या व कोंकणपट्टीच्या नापीक व रुक्ष भूमींत आनंदवनभुवन निर्माण झालें. आपल्या तपस्येला फळें आलेलीं त्यांनीं पाहिलीं व तीं चाखलीं. रामराज्याची महाराष्ट्रांत स्थापना झाली आणि समर्थ राजगुरु ब्रह्मर्षी वसिष्ठ बनले!

समर्थांची आपल्या शिष्यावर विलक्षण जरब होती. त्यांच्या मताविरुद्ध ब्र काढण्याची कोणाची हिंमत नव्हती, मग आचरण्याची गोष्ट दूरच राहिली. त्यांच्या शिष्यांचीहि त्यांच्यावर अलोट श्रद्धा असे व त्यांच्या डोळ्यांच्या केवळ इषाऱ्यानें त्यांचा शिष्यवर्ग प्राणार्पण करण्यास सज्ज होई, आज्ञापालन व कडक लष्करी शिस्त हा समर्थांच्या पक्षसंघटणेचा दंडक होता. हिटलर किंवा स्टॅलीन यांच्या आजच्या पक्षसंघटणेप्रमाणे त्यांचा सांप्रदाय प्रबळ, एकजुटीचा व कार्यकर्ता बनला. या सांप्रदायाच्या यांत्रिक संघटणेमुळें समर्थांना आपली नियोजित कामगिरी उत्तम रीतीनें पार पाडतां आली. पण या यांत्रिक पद्धतीचीं सूत्रें सर्वस्वी एकहातीं राहतात व एकतंत्री चालविलीं जातात. त्यामुळें ती जशी अत्यंत कर्तबगार बनते तशीच शक्तिकेंद्र नष्ट होतांच ती सर्व प्रबल यंत्रें गंजून निकामी होतात. यांत्रिक पद्धतीचे हे सर्व गुणदोष त्यांच्या सांप्रदायांत होते.

यांत्रिक पक्षसंघटणापद्धतींत मध्यवर्ती केंद्रांतून सुटलेल्या हुकुमांची तामिली करण्याची घटकांची मूळ कार्यक्षमता अनेक पटींनी वाढते परंतु तितक्याच प्रमाणांत त्यांची स्वतंत्र विचारशक्ति कुंठित होते, कल्पना खुजटते, तारतम्य बुद्धि लोपते आणि कार्यतत्परता मंदावते. मध्यवर्ती केंद्राचें नियंत्रण दूर होतांच शीर तुटलेल्या कबंधाच्या अवयवांप्रमाणें घटकांना स्थिति प्राप्त होते.

समर्थांनंतर त्यांचे मठ व त्यांतील महंत हळूहळू निष्क्रीय व तेजोहीन बनले आणि त्यांच्या सांप्रदायाला भागवतधर्मी संताप्रमाणें फारसे अनुयायीहि महाराष्ट्रांत लाभले नाहींत. आजहि भागवती सांप्रदायाला रामदासी पंथापेक्षां महाराष्ट्रांत अधिक पाठिंबा आहे हें कै. पांगारकरांचें विधान सर्वथैव खरें असलें तरी त्यामुळें त्यांच्या क्रांतिकारक महनीयतेला किंचित्‌हि कमीपणा येत नाहीं. विजेप्रमाणें क्रांतिकारकाचें जीवितकार्य अत्यंत तेजस्वी व परिणामकारक असलें तरी तें संपतेंहि लवकरच! एखाद्या शहरांत प्लेगची साथ एकदां पसरली कीं साफसफाई करणें, उंदीर मारणें, जंतुनाशक द्रव्यांनीं घरें धुणें, लस टोचून रोगाच्या प्रसाराला प्रतिबंध करणें — असल्या विविध उपाययोजनेंत वर्षानुवर्षें घालविल्यानंतर प्लेग कालांतरानें नष्ट होतो.

परंतु लंडन शहरांत एकदां भयंकर मोठी आग लागली व प्लेगचें तेथून त्या आगीमुळें कायमचें उच्चाटण झालें. समर्थांनीं देशांत अशी प्रचंड आग पेटविली कीं पारतंत्र्य त्यांत जळून खाक झालें. गोगलगाईच्या गतीनें होणाऱ्या पारतंत्र्य-क्षयाला जागा उरली नाहीं.

गेल्या चाळीस पन्नास वर्षांत समर्थसांप्रदायाचें पुनरुज्जीवन होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. लंकेसारख्या लहानशा बेटाच्या रावण या राक्षसी राजानें उन्मत्त होऊन आर्यावर्तासारखी विस्तीर्ण देवभूमि पादाक्रांत केली व त्यांतील देवांना बंदींत जुलमानें टाकून गुलामाप्रमाणें त्यांच्याकडून आपली हीन सेवा करवून घेण्याचा उपक्रम केला. तेव्हां प्रभू श्रीरामचंद्रानें रावणाचा वध केला व राक्षसी राज्यांतील दैत्य वृत्तीचा पूर्ण निःपात केला व लंकेचें राज्य सत्शील प्रवृत्त बिभीषणाला दिलें. ह्या प्राचीन पौराणिक इतिहासाच्या स्मरणानें तीच रामोपासना आजच्या परिस्थितींत उपयोगीं पडूं शकेल असें राष्ट्रांतील कर्त्या बुद्धिमंत देशभक्तांना वाटणें स्वाभाविक आहे. औरंगजेबाच्या रावणी पाशांतून महाराष्ट्राची मुक्तता रामोपासनेच्या जोरावर झाली. रामदास व शिवछत्रपति या पराक्रमी जोडीला कृष्णार्जुनाशिवाय दुसरी उपमा नाहीं. एक तपस्वी तर दुसरा पराक्रमी, एक साधु तर दुसरा विख्यात नृप, एक योगेश्वर तर दुसरा धनुर्धर वा भवानीधर! ह्यांच्यापैकीं प्रत्येकाचें मोठेपण स्वयंप्रकाशी व स्वतंत्र बाण्याचें! त्यांच्यांत तरतम लावणें मानवी शक्तीच्या बाहेरचें आहे. परंतु त्यांचा संयोग म्हणजे निश्चित विजय! त्यामुळें शिवछत्रपतींचा उत्सव महाराष्ट्रांत विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून किंबहुना एकोणिसाव्या शतकाच्या अगदीं अखेरच्या दशकांत सुरु झाला! शिवरायाच्या मानसपूजेनें हिंदुस्थान आजहि स्वतंत्र होईल असें लोकमान्य टिळकांना वाटलें. शिवरायाच्या पराक्रमाचे वारस जे पहिले बाजीराव पेशवे किंवा दुसऱ्या बाजीरावाच्या हातून घडलेलें पाप ज्यांनीं आपल्या शौर्यानें, धैर्यानें व हुतात्म्याच्या हिरीरीनें धुवून काढले त्या स्वातंत्र्यसंग्रामसिंह नानासाहेब पेशव्यांच्या पराक्रमाचे पोवाडे टिळकांचे कर्तृत्ववान् शिष्य स्वातंत्र्यवीर सावरकर गर्जून गाऊं लागले. ह्या स्वातंत्र्योपासक चळवळीला भरती आली असतांना शिवगुरु व राष्ट्रगुरु असे थोर महंत रामदासस्वामी यांचा विसर महाराष्ट्राला पडणें अशक्य होतें. समर्थांच्या सांप्रदायाचें पुनरुज्जीवन करण्याच्या उद्देशानें पन्नास वर्षांपूर्वी सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना झाली. सांप्रदायाचे जुने सर्व कागद पत्र-ग्रंथ प्रसिद्ध झाल्याशिवाय विस्मृतीनें वठलेल्या सांप्रदायाला नवी पालवी कशी फुटावी? संस्थेच्या इतिहासांत पन्नास वर्षांचा काळ दीर्घ नसला तरी व्यक्तीच्या आयुष्यांत तो चिकाटीचा, भक्तीचा. एकनिष्ठेचा आणि कर्तबगारीचा ठरतो. या समर्थसांप्रदायाच्या सेवेला नानासाहेब देव यांनीं

आपलें तनमनधन वाहिलें आहे. त्यांच्या दीर्घ व समर्थ तपस्येचा श्रेष्ठ गौरव ह्मणजे संस्थेचा सुवर्णमहोत्सव दिन होय. प्रभु रामचंद्रानें त्यांच्या हातून संस्थेची हीरक महोत्सव पर्वणीहि साजरी करवून घ्यावी अशीच कोणीहि परमेश्वरास प्रार्थना करील. समर्थ संप्रदायाच्या नव्या पराक्रमी अवताराचीं चिन्हें पाहणाऱ्याला दिसतील. वर्धा येथील हनुमानगडावरील श्रीधरपंत परांजपे व समर्थांच्या पराक्रमक्षेत्राच्या परिसरांतील पुण्यभूमि कऱ्हाड येथील मसूरकर महाराज हे स्वतःस रामदासानुदास म्हणवून घेण्यांत धन्यता मानतात व अस्पृश्योद्धार आणि शुद्धिकार्याची चळवळ या संघटणात्मक कार्याला दोघांनीं वाहून घेतलें आहे. वाईचे संत चौंडे महाराज यांनीं गोरक्षणाचा प्रचंड खटाटोप आरंभिला आहे. या सर्व चळवळींचें केंद्रीकरण देशांत प्रचंड विचार व आचारांची धार्मिक वावटळ उठवून देणारा समर्थांचा क्रांतिकारक अवतार देशांत लवकरच निर्माण होईल अशी कोणी आशा बाळगल्यास ती फोल कां ठरावी? समर्थसांप्रदायाचें पुनरुज्जीवन व तेंहि तेजानें व ओजानें परिपूर्ण असें व्हावे आणि त्या सांप्रदायाच्या छायेखालीं व छत्राखालीं वावरणाऱ्या कर्तबगार अशा शिवरायाच्या अवतारी पुत्रांच्या हातून हिंदुस्थानची स्वराज्यस्थापना व्हावी व तें जगांतील एक महान् स्वतंत्र, संपन्न व समर्थ राष्ट्र व्हावें, अशी परमेश्वरास आपण प्रार्थना करूं या.

उत्क्रांतीपथाचा शेवट भविष्यवाद्यांच्या दृष्टिपथांत येऊं शकतो, पण क्रांतीचा शेवट कसा होणार हें कोणाला च सांगतां येत नाहीं. प्रचंड हिमालयाचें भविष्य वर्तवितां आलें तरी चिमुकल्या ज्वालामुखीचें भविष्य दिग्दर्शित हि करतां येत नाहीं!

( ७ )

# रामदास स्वामी आणि महंमद पैगंबर

( लेखक—रा. **के. ना. डांगे**, एम्. ए., बी. टी., **मंदोसर** )

आपल्या डोळ्यावर विश्वास ठेवा आणि अगदीं विश्रब्धपणें वाचा, "रामदास स्वामी आणि महंमद पैगंबर." वडाची साल पिंपळाला लावण्याचा खटाटोप न करतांही आपल्याकडील विभूतींची तुलना इतर देशांतील विभूतींशीं, उदाहरणार्थ वाल्मीकि म्हणजे भारतवर्षाचा होमर, कालिदास हिंदुस्थानचा शेक्सपीयर, समुद्रगुप्त म्हणजे जसा कांहीं आपला नेपोलियन च, काव्हूर म्हणजे इटलीचा रामदास, अशा सूचक रचनांनीं आपण करीत आलों आहोंत. विद्यारण्यांना कर्नाटकसाम्राज्य-संस्थापनाचार्य म्हणतात, तसें रामदासांना महाराष्ट्र–धर्म–संस्थापनाचार्य म्हटल्यास तें आम्हांला आवडेल असें वाटतें. चंद्रगुप्त–चाणक्याच्या जोडीप्रमाणें शिवाजी-रामदासाची जोडीही इतिहास–संशोधकांना, निदान ऐतिहासिक कादंबरीकारांना तरी, वावडी नाहीं. हें मूल्यमापन स्वदेशांतील झालें, ह्याच्या हि पुढें जाऊन महाराष्ट्राचा माल जगाच्या बाजारपेठेंत उतरवण्याचा कोणी प्रयत्न केला आणि रामदास स्वामींचें, महंमद पैगंबरासारखे जे 'धर्म संस्थापनेचे नर' होऊन गेले त्यांच्याशीं, साम्यवैषम्य दाखवलें तर कोणी 'हरहर' म्हणावयास नको आणि कोणी तोबा तोबा ही म्हणावयास नको.

कारण ह्या ऐतिहासिक, विभूतींची निरपेक्ष आणि 'उदासीन ते वृत्ति जीवीं धरून' पुण्यस्मरणें करण्याचे दिवस आमच्या सार्वजनिक जीवनांत येऊं लागले आहेत. रामदासांचा आणि हजरत पैगंबराचा भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक दूरान्वय असला, तरी रामदासापुढें महंमदानुयायी राज्यकर्त्यांचा आणि लोकांचा पराक्रम आणि प्रभाव हिंदुस्थानच्या नकाशाप्रमाणें मांडून ठेवला होता आणि दयानंदानीं अलिकडे तोडीस तोड काढली, तशी एकेश्वरत्वाची तोड रामदासकालीं कोणी तरी काढणें आवश्यकच होतें. प्रबोध-शक्तीचें उत्थान करणारा प्रभावशाली संघटनकर्ता म्हणून आपण महंमदाच्या जीवनचरित्रापासून बोध घेण्यांत च आतां स्वारस्य राहील. तसें च महाराष्ट्र-देश राहिला थोडा म्हणून हळहळून जनहित विवरण्यास निघालेल्या ह्या महामहंताच्या वाङ्मयी मूर्तीस, त्या समर्थकृपेच्या वचनांना अखिल महाराष्ट्रीयांनीं — पण ह्याची शहानिशा कशाला करावी ?–अखिल भारतवर्षीयांनीं आपल्या हृदयाच्या हृदयांत कुराण–शरीफासारखें पूज्य स्थान देऊन ठेवावयास हवें. प्रवास, पलायन, सक्षम शरीरयष्टि, चमत्कार, ग्रंथनिर्माणशक्ति,

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ ४१ स
सं. नं.
ता.

सांप्रदायिकत्व हीं त्या उभयतांना प्रथमदर्शनीं सुचणारीं साम्यें बाजूस ठेवून, आणि एक स्वामी तर दुसरा गृहस्थ, एक राज्याला भगव्या झेंड्याखालीं सोडून देणारा, तर दुसरा चंद्रतारकचिन्हांकित हरितध्वजाखालीं स्वयमेव राज्यकार्यधुरंधरा वाहणारा, एक मठपति तर दुसरा महिपति, हा परिस्थितिवैषम्यानें उद्भवलेला विरोधही दृष्टिआड करून आपण ह्या थोर विभूतींनीं सुचविलेल्या दृष्टिकोणावर आपलें लक्ष केंद्रित करूं लागलों, तर ह्यांच्यांतील साम्यें नव्या नव्या क्षितिजाप्रमाणें एकामागून एक दृष्टिगोचर होत जातात.

रामदासांचें ब्रह्मचर्य आणि भिक्षाटन हें व्यक्तित्वाला कांसवाच्या अवयवाप्रमाणें आवरून घेऊन पण शेवटीं अधिक लोकसंग्रह व्हावा म्हणून च उल्लेखनीय, नाहीं तर वानर-दलाप्रमाणें भासणारें सिंहस्थांतलें राम-दल नुसत्या त्या कारणानें च आदर्श ठरलें असतें. तसें च महंमदाचा गृहस्थाश्रम आणि सर्वसंग्राहकत्व हें देखील व्यक्तीचा विकास करून कां होईना, पण तत्कालीन समाजाच्या योगक्षेमासाठीं आणि संघटनेप्रीत्यर्थ होतें, म्हणूनच प्रशंसनीय; एरवीं, तुम्ही आम्ही काय कमी आहोंत? महंतांची महंती कांहीं निराळीच असते. ते आपुल्यापुरते पाहत नाहींत, 'ऐसा जो कां महंत, तो कां होईल संकोचित, प्रशस्त जाणतां समस्त विख्यात योगी.' असल्या प्रशस्त, जाणत्या, विख्यात दोन महंतांत कोणाला कांहीं साम्य सुचलें, तर मागच्याप्रमाणें तें आज उद्यां आणि पुढें ही विचारांना चालना देत जाईल.

दोघेही तेजस्वी वाङ्मयाचे, ज्या योगानें अनुयायांत तेजाची, स्वत्वाची आणि शौर्यवीर्याची लाट उसळेल अशा प्रखर प्रचंड साहित्याचे, युगनिर्माणकर्ते होऊन गेले. जगांतील एकपंचमांश लोक हजरत पैगंबराच्या काव्यकलेमुळेंच ओजोगुणानें भारून गेले आहेत. महाराष्ट्रांतील तेजस्वी वाङ्मयगंगेचें मूळ इतर प्रांतांप्रमाणेंच शाहीरांच्या पोवाड्यांत सांपडत असलें तरी त्याला पुढें आणून अभिजात नागर वळण देऊन ऐसपैस विस्तृत करण्याचें कार्य कृष्णेच्या खोऱ्यांत, ह्या कवीश्वरांनीं, कृष्णाकांठच्या स्वामींनीं च केलें. समान अधिष्ठानावर कार्यें चाललीं असतांना, शिवाजी-रामदासांचे मनोमन कोणते संदेश जात येत असतील ते हेरायाला त्या काळीं तुम्ही आम्ही नव्हतों. पण ह्या पुढचे भविष्यकालीन शिवाजी राजाराम आणि त्या काळच्यासारखी विवेकवैराग्ययुक्त प्रपंचपरमार्थसाधन करणारीं, सुचित, बहुतांचीं बहुत भलीं कामें करणारीं, त्रिवार सावध असणारीं, महाराष्ट्र-मंडळें निपजणार असलीं तर ती रामदासी वाङ्मय वगळून आमच्या कोणत्या वाङ्मयाच्या परिशीलनानें निपजणार आहेत? रामदासांनीं एकादी लढाई जिंकली नाहीं आणि शिवाजीनें स्वहस्तें एकादा ग्रंथ लिहिण्याइतकी साक्षरता आणि साहित्योपासना

दाखविल्याचें प्रसिद्ध झालें नाहीं. पैगंबरांत ह्या दोन्हीं गोष्टींचा समन्वय झाला होता, हें मान्य आहे. पण ह्यापुढें एका बाजूस तत्वज्ञानाचें रहस्योद्घाटन, साहित्यांतील नवनिर्मिति, सहजस्फूर्त विचारांचे वाङ्मयीन अलंकारप्रसाधन आणि दुसऱ्या बाजूस दुसरें तें राजकारण, अशा दोन्हीं अंगांनीं आमचे उद्यांचे पुढारी टिळक, परांजपे, बापट, सावरकराप्रमाणें पुढें सरसावतील, तेव्हां त्यांना रामदासांचें ऋषि-ऋण मान्य करतांना कोणताच संकोच वाटूं नये, इतकी ह्या रामदासी वाङ्मयाची महत्ता आहे. असल्या सदुपदेशाला बोध-वाद आणि प्रचार-कला म्हणून नांवें ठेवणारांची नांवें ही ऐकूं येणार नाहींत, इतक्या सुदूर भविष्यकालांतही समर्थांचें आतुर बोलणें जिवंत अंतःकरणांचा ठाव घेतल्यावांचून राहणार नाहीं. कुराण-शरीफ ही हेंच कार्य घडवून आणीत असतें. आमच्या दास-बोधांत आम्हांला आमचें कुराण शरीफ केव्हां दिसणार?

दुसरें ठळक साम्य, शक्तीची उपासना. अवतरणें देत बसलों तर एक ग्रंथ होईल आणि वाचक म्हणतील लेखकाला स्वतःचें कांहीं लिहितां येत नाहीं, तें निराळेंच. पण जेथें इतिहास साक्षीला उभा आहे, अंगुलीनिर्देश करायला बलोपासनेचे आखाडे आणि मठ आहेत, महंतें महंत करून, युक्तिबुद्धीनें भरवून, हें प्रपंचपरमार्थाचें खडें सैन्य ठायीं ठायीं सिद्ध केल्याच्या खुणा खनाळांत ही सांपडतात, तेथें उगीच कागद महाग करून काय उपयोग? महंमदानुयायांनीं मध्यपूर्व पादाक्रांत केली आणि रामदासांचे मठ मध्यप्रांत – मध्यप्रदेशापलीकडे ही सांपडतात, ही तुलना वाचून हंसूं येईल. पण रामदासाचा जय जय रघुवीर समर्थ अटक – कटकपर्यंतच राहिला ह्यांत रामदासांचा दोष तो काय? तो दोष आमचा. मार्गदर्शकाचें काम करून असल्या विभूति अनंतांत विलीन होतात, त्यानंतरचा जनसमुदाय काय करतो त्यावर त्यांचें मोल जोखणें, ही अगदींच स्थूल दृष्टि आहे. जें महंमदानें कार्य केलें तें च तत्त्वतः रामदासांनीं केलें. दोघांनीं दोन प्रबल शक्ती उत्पन्न केल्या. आम्ही ही देव मस्तकीं धरण्याचे आणि हलकल्लोळ करून मारतां मारतां मारण्याचे रामदासी संकेत त्या काळीं पाळले असते, शक्ति बुद्धि वारंवार एके ठायीं दिसूं लागल्या असत्या, तर महंमदी धर्माप्रमाणें महाराष्ट्र – धर्मही युगांतरीं जागतिक धर्म बनला असता. खलिफामागून खलिफा झाले, ख्रिस्तामागून पीटरपॉल निघाले, गुरूमागून गुरु पुढें आले, तसे रामदासामागून रामदासी मधूनमधून तरी त्या जोडीतोडीचे निघाले असते, तर नामसप्ताह, पालखी, भंडाऱ्याव्यतिरिक्त आनंदवनभुवनाचा भूमंडळीं विस्तार पाहण्याचा निराळा च सोहळा पहावयास मिळाला असता. कारण, 'व्याप तैसें वैभव' अशीं अरबीफारशींतही भाषांतर करून समानार्थक सुचवितां येणारीं वचनें समर्थ खड्या बोलींत सांगून गेले आहेत.

ह्या बाबतींत आपले रामदास आणि भारतवर्षांतील इतर रामभक्त राम – दास ह्यांतील भेद अधिकच जाणवतो. रामदासांना राम पाहिजे तो छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा पाहिजे, राम पाहिजे, रामवरदायिनी माता ही खड्ग घेऊन धांवून यायला पाहिजे. त्या देवीनें, तुझा तूं वाढवी राजा, ही प्रार्थना मान्य करावयास हवी, आणि तो राजा देखील, देखोनी गनिमांच्या फौजा, रणशूरांच्या फुरफुरती भुजा, असा कैपक्षी हवा. रामानुजींचें लोण हिंदी भाषेंत पोंचविणाऱ्या रामानंदी संप्रदायाचें असें विशिष्ट तत्त्वज्ञान आणि विचारसरणी दिसत नाहीं. तुलसीदास मात्र रामाला ‘ एक आस, विश्वास ’ मानायला तयार, पण तुलसीरामायण म्हणजे एक नैतिक साहित्यिक भक्तिपर पुराणकथा – ग्रंथ गोस्वामींनीं रचला त्याप्रमाणें रामदासस्वामीसारखी बलोपासना, हनुमान इष्ट ठेवले असल्यामुळें, त्यांना करता करवितां आली असती, तर उत्तर दक्षिण तेवढ्यापुरती एक झाली असती. तुलसीदासाचा राम सगुण च आहे. रामदासाचा राम निर्गुणाच्या रूपकांतही तितकाच अभिराम दिसतो. शांकर – रामानुज मायावाद आणि संसारत्याग, ज्ञानेश्वरीप्रमाणें, कबीरांच्या शब्दाप्रमाणें दासबोधांतही आहे, पण रामदासांनीं त्याच्या जोडीला बसवलें तें नाना मंडळें हालवणारें, नाना लोकांस चाळवणारें, बैसल्या लोकांस उगवणारें आपलें सामर्थ्य. सामर्थ्य ही समर्थांची विशेषता.

हें सामर्थ्य समाजांत उत्पन्न करतांना महंमद पैगंबरानें जसा एक देव पाहिजे, अल्ला हु इल्ला अकबर, तो देव सर्वश्रेष्ठ आहे, असें पहिलें च एकेश्वरत्व पुन्हां आपल्याकडून ठासून प्रतिपादलें, तसें च रामदासांनीं देव कोणता आणि देव्हारा कोणता हें ओळखण्याची सावधगिरीची सूचना दिली. मातीचे देव, धोंड्याचे देव, सोन्याचे देव, रुप्याचे देव, रुविच्या लाकडाचे देव, बाण तांदळे नर्मदे देव, ताम्रनाणीं हेमनाणीं इत्यादि ओंव्या वांचतांना जणूं काय एकादा मूर्तिभंजक च आमच्या अंद्धश्रद्धेचें विडंबन करीत आहे, असें वाटतें. अंधविश्वास, लोकभ्रम, क्षुद्रदेवदेवतार्चन, इत्यादि थोतांडावर स्वामींनीं आपली कुबडीगुप्ती चालवली च होती. पण ती चालवतांना नुसता बौद्धिक सुधारकी आव आणला नाहीं, तर सगुण सुंदराकडून निर्गुण निरंजन एकेश्वरत्वाकडे आम्हांला घेऊन जाण्याचा हव्यास धरला आणि त्यांत रामभक्ति ही एक मधली पायरी, उपासना ही एक साधना, म्हणून मानली होती. नाना देवदेवतांतून राम पहावा आणि तो पुढें निर्गुण समजावा हें रामदासीय धोरण, आणि नानाविध देवांची पूजा करूं नये हें आरबांना उपदेशून, निर्गुणाच्या वाटेवरची एक खूण च म्हणून जणों काय, काबा ह्या पवित्र पाषाणाची उपासना चालूं ठेवावी हें महंमदीय धोरण; ह्यांत उजव्याडाव्याइतकें अंशतः अंतर असलें तरी हीं दोन्हीं धोरणें सारखींच समंजस वाटतात आणि

मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म ज्ञान दर्शवितात. एकेश्वरवादाची प्रतिनिर्मिती दयानंदांनीं, निरुक्त आणि व्याकरणाच्या भानगडींत न पडतां, वेदांतून धार्मिक संघटनेचा एक उपाय म्हणून आमच्यापुढें आतां ठेवली, तशीच अतिचिकित्सकांना हि पुरून उरेल इतकी अद्वैतता स्वीकारून रामदासांनीं दासबोधांत तिची ओबडधोबड तरी अवला-सुबोध भाषाशैलीनें पुनरुक्ति केली. एकमेव ग्रंथ म्हणून कुराणाप्रमाणें च "वेदाकडे परत चला" असें म्हणतात, तसेंच रामदासाकडे परत चला, असें म्हणण्याची हौस बुद्धिवाद्याची भूमिका सोडून ही अनावर होणें स्वाभाविक आहे.

हा एकेश्वरवाद, ही बलोपासना, यच्चयावत् गोष्टीला मजहब अथवा भगवंताचें अधिष्ठान देण्याची ही भूमिका, हा प्रपंचपरमार्थाचा समन्वय, धूर्तपणाचीं कामें करीत असतां उत्तम गुणांच्या पुरुषांचें हें 'तळमळ तळमळ होत चि असणें,' राजकारण आणि धर्मकारण ह्यांच्या अभेदांत च तिसरें तें सावधपण आणि वर्तायाचें लक्षण समाविष्ट करून प्रसंग पाहून चालण्याची ही नीति, ह्या गुणसमुच्चयामुळें रामदासस्वामी आणि महंमद पैगंबर ह्यांत देशकालपरिस्थितीचें च तेवढें अंतर उरतें. राजकारण बहुत करावें, परंतु कळों च न द्यावें, एवढें च चाणक्याशीं रामदासाचें साम्य; चाणक्याचीं पारमार्थिक मतें कोणी विचारांत घेत नाहीं. मॅक्याविलीशीं साम्य, सुचावें बहुत उपाये, एवढें च; परांतरास न लावावा ढका, परपीडेवरी नसावें अंतःकरण, हें मॅक्याविलीला स्वप्नांतही मान्य नव्हतें. आर्यसमाजाचा एकेश्वरवाद, धर्माचें वेदमूलत्व, आणि तेजस्विता रामदासी पंथांत ही दिसून येते. तशीं हीं साम्यें राखून मूर्ति-पूजेच्या विरोधाचा अतिरेक करणेंही आर्यसमाजाला अव्यवहार्य आहे असें समजून चुकलें. तो मध्यम क्रम रामदासांनीं साधला. एकांतिक निर्गुणाच्या 'उपासने'वर तेवढा जोर देऊन समर्थांनीं महाराष्ट्राचा ब्रह्मसमाज केला नाहीं, उपनिषदांतील तेजस्विता, रूपक-प्रचुरत्व आणि सुबोध विवेचनशैली मात्र सर्वामुखीं केली. नांदेडच्या गुरुगोविंद-सिंहाच्या क्षत्रिय बाण्याची सूचना आणि जवळ च टाकळीला पुरश्चरण करीत असतांना, संभवतः, रामदासांनीं घेतलेली धकाधकीची सूचना एक च आहेत. पण शीख राजपुताप्रमाणें केवळ योद्धे च म्हणून प्रसिद्धी पावले, तर महाराष्ट्रीयांनीं शेवटल्या मोठ्या मोंगलाशीं राजकारणाचे डाव खेळून त्याला जमीनदोस्त केलें. एकूण रामदासांचीं वैशिष्ट्यें आपल्या देशांत कांहीं कांहीं व्यक्तींत गवसतात तीं अंशतः च, म्हणून गुणांचा शक्य तितका मोठा सामग्र्यविधि इतरत्र संशोधतांना आम्ही पश्चिम पयोनिधीच्याही पलिकडे अरबस्तानांत दृष्टि टाकली आणि सर्वोत्तमाच्या दासाची त्या ईश्वराच्या प्रेषिताशीं पैगंबराशीं तुलना केली, तर त्यांत दोघांनाही गौरविलें असें समजण्यास काय चिंता आहे? हिंदु-मुसलमान जमातींनीं

एकमेकांचे सद्गुण अंगीं आणावे, तसेंच त्या विशिष्ट सद्गुणांचे मूळ प्रेरक जे पथप्रवर्तक धर्मसंस्थापक त्यांच्याही चरित्रांचें अभ्यासू दृष्टीनें आलोडन करावें आणि करवावें, विवरण केलें चि करावें, उत्तम गुण तितुके घ्यावे, ह्यांत गैर तें काय?

रामदासस्वामी आणि महंमद पैगंबर ह्यांची तुलना झाली. एका च पातळीवरच्या दोन महापुरुषांत कांहीं साम्यें सांपडायचीं च तीं सांपडलीं. दोघे ही साम्यें दाखवलीं त्या दृष्टीनें थोर आणि समसमान आहेत. पण रामदासांचे अनुयायी म्हणविणारे, त्यांना राष्ट्रगुरु म्हणून संबोधणारे आम्ही स्वतः कसे काय आहोंत? महंमदानुयायी महंमद पैगंबराला कदाकाळीं विसरत नाहींत. पैगंबराच्या वाढदिवसाला गोळा झालेला आपल्या गांवांतला मुसलमान समाज तुम्ही पाहिला आहे ना? दासनवमीच्या उत्सवाशीं त्या वाढदिवसाची तुलना करूं कां? तुलना करवत नाहीं. कारण, आम्ही रामदासाला विसरलों नाहीं, पण विशेष अनुसरलों ही नाहीं. सद्गुरो! हा आमचा अपराध. तुम्ही प्रांत-पुरुष नाहीं, राष्ट्र-पुरुष आहां, महा–राष्ट्र-पुरुष अर्थात् जागतिक पुरुष आहांत. महंमद, ख्रिस्त, बुद्ध महावीराप्रमाणें आपल्या ही चरित्राला चमत्कारांच्या पुरवण्या आम्हांला मनसोक्त पुरवतां आल्या, पण आपला सर्वांत मोठा चमत्कार जो संघटनेचा संदेश आणि मराठा तितुका मेळवावा, हा उपदेश पोथींतल्या पोथींत च प्रायः राहून गेला. जणूं काय, मराठा तितुका मेळवावा, राजी राखावा सकळ लोक, चतुर सर्वत्र पाहतो, सकलिकांचें राखो जाणे समाधान, असलीं वचनें म्हणजे केवळ अर्थवाद च आहेत! राम आणि दास ह्या दोन शब्दांच्या समासानें आपण एक च व्यक्ति जाणतों, त्याप्रमाणें अद्वैत अध्यात्मपर आणि सामाजिक संघटनपर अशा समासांनीं एक च एक रामदासी तत्त्वज्ञान अभिप्रेत आहे. 'संकेतें लोक वेधण्या'च्या मुळाशीं 'अंतरात्मा म्हणिजे देव' असें अधिष्ठान आहे, तर पंचीकरणमहावाक्यांचें प्रात्यक्षिक म्हणजे 'क्रिया', त्या क्रियेवीण वचन, तें श्वानाचें वमन मानून समाजाचा प्रपंच नेटका करून देण्यांत 'सदैवपण' आहे. अध्यात्म हा सिद्धांताचा आपाताळ निमग्न भरभक्कम सह्याद्रि पायथा, आणि चोखट नीतिन्यायें वर्तावें, आणि समाजाकडून तऱ्हे सांडून सांडवावी, क्रिया करून करवावी बहुताकरवीं, हा त्या पायथ्यावर रचलेला सौजन्याचा सज्जनगड, अशा ह्या एकजिनसी इमारतीच्या एक संघ बनावटींत विश्वजनांच्या उपयोगा धरायचें कोणतें आणि सोडायचें कोणतें? त्या समतोल शिकवणीचा नुसता एकेक पैलू आमच्या आचरणांत प्रतिबिंबला तरी आमचें सोनें होऊन जाईल. आम्ही अडीच कोटी आहोंत, तेजस्विता दाखवली तर मुसलमान, शीख, शिंतो ह्यांना जग वचकतें, तसें तें

आम्हांला वचकूं लागेल, संघटनेचा संदेश ध्यानांत धरला तर महंमदीयांची जशी एक 'बिरादरी' त्रिखंड व्यापून उरली, तशी आम्हां महाराष्ट्रीयांची ही आजच्या गलबल्यांतल्या गलबल्यांत एक भव्य भ्रातृ-भावना उदयास येईल, वैराग्याचा भगवा झेंडा त्यागाचें आणि आत्मसंयमाचें प्रतीक म्हणून ओळखला तर आमच्या विषयवासनांच्या वाङ्मयी व्यापारावर कांहीं तरी नियंत्रण बसेल, आणि आजचे ऐषआरामी स्थानापन्न भाग्यपुरुष उद्यां धगधगीत पुण्यराशी महापुरुष म्हणून महाराष्ट्राला भूषणभूत ठरतील. पण हें केव्हां? "घडो भेटि कृष्णातिरीं स्वामियाची" अशी एकाद्या दासानुदासाप्रमाणें आम्हां महाराष्ट्रीयांची आर्त भावना उत्कटतेच्या चरमसीमेवर पोंचेल तेव्हां. ही भावना उत्कट कशी असते तें महाराष्ट्रीयांनीं महंमदानुयायांत तरी ती पाहून समजून घ्यावें. शीख समजले, त्यांचा ग्रंथ ग्रंथसाहिब आहे; आमचा ग्रंथराज नुसतें एक पुस्तक आहे! महाराष्ट्रापासून मक्का-मदीना दूर असेल, पण साम्य सुचवायला आणि इष्ट तें अनुकरण करायला महाराष्ट्रीयापासून महंमदी जनता तर आज दूर नाहीं ना?

आणि हा संकेत आजच्या महाराष्ट्रीयांना पटत नसेल तर तो आपण आपल्या महा-राष्ट्राला कळवूं. महाराष्ट्राचा मोठेपणा महाराष्ट्रांत च डांबून ठेवण्याचें धोरण पुरें झालें. रामदासासारखे राष्ट्र-पुरुष म्हणजे 'देणें ईश्वराचें,' तें महाराष्ट्राच्या माळरानांत आणि मराठीच्या मोडी वळणांत च गुंतून ठेवावयाचें नाहीं. समर्थांची शिकवण, चातुर्यलक्षण, देवशोधन आणि सिद्धांतनिरुपण घरोघर पोंचविण्याचें सत्कार्य सत्कार्योत्तेजक सभेनें अगदीं आधुनिक पद्धतीनें अर्ध शतकावर केलें. ह्यावरही कोणी दासबोधांत वर्णिलेला आळस आणि करंटपणा दाखवूं लागला तर आपला यत्न तो देव आहे च. आजपर्यंतच्या ह्या चळवळीच्या सामर्थ्यानें आणि निढळाच्या घामानें हरळीची मुळी हिरवी राहिली हें काय कमी झालें? उद्यां रामदासी मठ-संस्था शंकराचार्यांच्या मठाम्नायाप्रमाणें अधिक व्यापक होईल, दासबोधाची गॉस्पेल कुराणाप्रमाणें नाना भाषांत भाषांतरें होतील. महंमद महावीराप्रमाणें ह्या आमच्या महापुरुषाचे 'महोच्छाव' परप्रांतांतही साजरे होऊं लागतील, त्यांचीं प्रबंध, पाठ, जाड वचनें रामदासांनीं तीर्थाटण केलेल्या सर्व भारतवर्षांत जिव्हाग्रीं बसतील आणि त्यांनीं प्रचारलेल्या प्रचितीच्या महंत-मार्गावर आम्हीं येऊन पोहोंचूं, तेव्हां साहजिक च आज शिवाजीविषयीं जगाची दृष्टि निवळतां च त्याला ते थोर मानूं लागले त्याप्रमाणें पुढें केव्हां तरी अखिल हिंदु जनता रामदासालाही वर निर्दिशलेल्या धर्मपुरुषाइतक्या च धारणेचा पुरुष मानूं लागेल आणि ह्या लेखाच्या मथळ्यासारखा मथळा वाचून ह्यापुढें तरी बुचकळ्यांत पडणार नाहीं.

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

# श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली काय ?

लेखक — रा. **गणेश गोविंद कारखानीस**, बी. ए.,
मन्त्री, हरिजन - सेवक - संघ, **विजापूर**

श्रीसमर्थांचा अवतार समाप्त होऊन गेल्यास आज जवळ जवळ पावणेतीनशें वर्षें होत आलीं. या कालांत या भारतभूंत अनेक स्थित्यंतरें झालीं. मुसलमानी सत्ता नष्ट झाली, स्वराज्य आलें व गेलें, व त्या ठिकाणीं ब्रिटिश राजवट चालू झाली. या राजकीय पालटाचा परिणाम या देशाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय इत्यादि गोष्टींवर साहजिकपणें व्हावयाचा तो झाला आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या सहवासानें देशांतील लोकांच्या एकंदर आचारविचारांत मोठीच क्रन्ति घडवून आणलेली आहे. विशेषतः आधिभौतिक शास्त्रांच्या भरमसाट प्रगतीमुळें जीवनाकडे पाहाण्याचा समाजाचा एकंदर दृष्टिकोन पार पालटून गेला आहे व जात आहे. अशा परिस्थितींत तीनशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रास दिल्या गेलेल्या श्रीसमर्थांच्या शिकवणीचा सद्यस्थितींत कितपत उपयोग होणार आहे, आधुनिक विचारप्रवाहांत तिला स्थान आहे काय, ती शिकवण जशीच्या तशी आज हि देशास आचरणार्ह आहे काय, कां ती अजिबात त्याज्य झाली आहे, इत्यादि प्रश्नांचा उहापोह या लेखांत करण्याचा अल्पसा प्रयत्न आम्हीं करणार आहोंत.

सार्वजनिक कार्याच्या निमित्तानें गेल्या दोन तपांत प्रस्तुत लेखकाचा संबंध विविध प्रकारच्या विचारप्रणालींतील लहानमोठ्या सज्जनांशीं आला. त्यांतील कांहीं वारकरी सांप्रदायाचे नेते आहेत, कांहीं रामदासी सांप्रदायाचे अध्वर्यु आहेत, बरीच वर्षें श्री लोकमान्यांच्या सहवासांत घालविलेले कांहीं महाभाग त्यांत आहेत, महात्माजींचे निकटवर्ती हि कांहीं जण त्यांत आहेत, कांहीं कम्युनिस्ट मताचे मित्र आहेत, तर कांहीं स्वतंत्र वृत्तीनें विचार करणारी मंडळी हि त्यांत आहेत. प्रसंग-विशेषीं गांठीभेटी झाल्यावेळीं अनेक विषयांचा विचारविनिमय त्यांच्याशीं होत असे. त्यांत आधुनिक ग्रन्थ प्रसिद्ध ग्रन्थकारांप्रमाणें ऐतिहासिक कालांतील ग्रन्थ-कारांचा – साधुसंतांचा – परामर्श हि घेतला जात असे. अशा वेळीं पूर्वपक्ष व उत्तरपक्ष हटकून व्हावयाचे च, ऐतिहासिक कालांतील संतांचा विषय चालू असतां, एकानें म्हणावें कीं, साधुसंतांच्या खुळ्या बंडामुळें देश अधोगतीला गेला, दुसऱ्यानें

प्रतिपादावें कीं, श्रीसमर्थ मात्र या गोष्टीला अपवाद आहेत, देशाला त्यांचा उपयोग झाला आहे, तों तिसऱ्यानें म्हणावें कीं त्यांचें वाङ्मयांत सुद्धां आतां तीनशें वर्षांचें जुनें झाल्याकारणानें नव्या जगताला मार्गदर्शन करण्याचें त्यांत सामर्थ्य नाहीं, अतएव तें सुद्धां आतां टाकाऊ च झालें आहे, इत्यादि अनेक प्रकारचीं भिन्न भिन्न मतें त्यावेळीं प्रतिपादिलीं जात. एकदां तर मौज अशी झाली कीं, प्रस्तुत लेखकाचें व्याख्यान एका शहरीं एका मंडळाच्या वतीनें ठरविलें गेलें. व्याख्यानाचा विषय 'श्री ज्ञानेश्वरमहाराजांचें कार्य' असा होता व तो व्याख्यानाच्या आधीं १-१॥ महिना ठरविण्यांत आला होता. असें असतांना सुद्धां ठरलेल्या दिवशीं तेथें व्याख्यानास गेलों असतांना, व्याख्यानमालेचे चिटणीस शिष्टाचाराप्रमाणें व्याख्यानाचे आधी तास दोन तास भेटीस आले असताना म्हणतात काय! तर काय हो! सहाशें वर्षांपूर्वीचा विषय तुम्ही घेतला आहे, या व्याख्यानाचा हल्लींच्या काळीं उपयोग काय? व तुमच्या व्याख्यानास लोक तरी येणार किती व कसे? ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास हे आतां फार जुने झाले आहेत, म्हणून निरुपयोगी झालेले आहेत असें तुम्हांस वाटत नाहीं काय? त्यांच्यांत काय राजकारण आहे, का सामाजिक सुधारणा आहे, का मजुरांचा प्रश्न आहे, का समाजसत्तावाद आहे! काय आहे तरी काय? येऊन जाऊन तें तुमचें ब्रह्म व ती तुमची माया! कोण विचारतो या तुमच्या निरुपयोगी वेदान्ताला! इ. इ. ह्या प्रसंगाचा उल्लेख करण्याचें कारण एवढेंच कीं, या चिटणीसांच्या उद्गारांत महाराष्ट्रीय सुशिक्षित म्हणविणाऱ्या जनतेचें साधुसंतांच्या शिकवणीच्याबद्दलचें प्रतिबिंब पडलेलें आहे असें आम्हांस वाटतें. तेव्हां अशा प्रकारची विचारसरणी सत्यास धरून कितपत आहे, याचा विचार करणें आवश्यक आहे. सध्यां आपण केवळ श्रीसमर्थांच्याच शिकवणीचा विचार करूं या.

साक्षात्कारी पुरुषांचे ग्रन्थ अनुभवाच्या दृढतम पायावर रचलेले असल्यामुळें त्यांची शिकवण एक प्रकारें शाश्वत च असते. विद्वानांचे ग्रन्थ केवळ विद्वत्तेच्या जोरावर आधारलेले असतात. त्यांच्यात हि अनुभव नसतो असें नाहीं. पण लौकिक अनुभव व आत्मप्रचीति यांत महदंतर आहे. यामुळें स्वानुभूतीच्या शाश्वत भूमिकेवरून लिहिलेले ग्रन्थ हे जसे त्रिकालाबाधित असतात, तसे त्या बैठकीचा ज्यास आधार नसतो ते ग्रन्थ शाश्वत होऊं शकत नाहींत; मग लिहिणारा किती हि जाडा विद्वान् असो. या च कारणास्तव उपनिषदांची शिकवण वा गीतेची शिकवण ही शाश्वत आहे. देशकालपरत्वें या ग्रन्थांच्या शिकवणींत जो बदल झालेला दिसतो तो त्यांच्या मूलभूत सिद्धान्तांत नसून, त्या त्या कालास ते ते कसे कसे लावावयाचे, त्यांच्या योजनेंत – त्यांच्या बाह्य स्वरूपांत पडलेला असतो हें आपणास ह्या ग्रन्थांकडे पाहिल्यास दिसून येईल. हा च प्रकार श्रीसमर्थांच्या वाङ्मयाचा आहे. त्यांत

रामदासी महंत कसा असावा किंवा श्रीसमर्थसंप्रदायाचीं लक्षणें कोणतीं यांची जी चर्चा जागोजाग आढळते ती पाहिली असतां निःशंकपणें असें विधान करण्यास प्रत्यवाय नाहीं, कीं श्रीसमर्थांनीं त्या कालीं महाराष्ट्राला दिलेली शिकवण एक प्रकारें शाश्वत आहे व आज हि ती बव्हंशीं जशीच्या तशी आचरणांत आणण्यास योग्य अशी च आहे, नव्हे ती ताबडतोब कृतींत आणण्यास महाराष्ट्रानें आतां मुळीं च कालावधि करूं नये. श्रीसमर्थांनीं आपल्या कालीं ज्या वेळीं आपल्या कार्यास महाराष्ट्रांत प्रारंभ केला, त्याला आज तीनशें वर वर्षें होऊन गेलीं खरीं. पण त्यावेळीं देशाची जी स्थिति होती तीच पुष्कळ अंशीं आज हि कायम आहे. त्या वेळीं देश पारतंत्र्यांत होता; आज हि तो तसा च आहे, पारतंत्र्यामुळें प्रजेची जी सर्वांगीण दैना व जें अधःपतन त्या कालीं झालें होतें तें आज हि दिसून येत आहे. तेव्हां आपल्या काळच्या दुःस्थितीचा नायनाट करण्यासाठीं श्रीसमर्थांनीं ज्या साधनांचा अवलंब केला, आपल्या महंतांस, आजच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास सार्वजनिक कार्यकर्त्यांस – जी शिकवण दिली व जे धडे दिले व ज्यांचा प्रचार या महंतांनीं महाराष्ट्रभर व बाहेर हि केला व जनतेची परकीय सत्तेविरुद्ध उठावणी करून त्या सत्तेची पाळेंमुळें खणून काढून टाकण्याचा प्रयत्न केला, ती त्यांची तेजस्वी शिकवण आपणांस त्यांच्या ग्रन्थांत पहावयास मिळते. ती पाहिली असतां 'श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली' अशी अज्ञानानें ओरड करणाऱ्या आधुनिक कार्यकर्ते व विचारवंत म्हणविणारांची कींव येते. आपल्या महंताच्या अंगीं कोणते गुण पाहिजेत, त्यानें काय केलें पाहिजे याचें टिपण श्रीसमर्थांनीं एका अभंगांत केलें आहे.

प्रथम लिहीणें दुसरें वाचणें। तिसरें सांगणें अर्थांतर ॥ १४–१
आशंका निवृत्ति ऐसी चौथी स्थिती। पांचवी प्रचीती अनुभवें ॥ २
साहावें तें गाणें सातवें नाचणें। ताळी वाजवणें आठवें तें ॥ ३
नवां अर्थभेद दाहावा प्रबंद। आक्रावां प्रबोध प्रचीतीसी ॥ ४
बारावें वैराग्य तेरावा विवेक। चौदावा तो लोक राजी राखे ॥ ५
पंध्रावें लक्षण तें राजकारण। सोळावें तें जाण अवेग्रता ॥ ६
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा। काळ समजावा सर्वांठांईं ॥ ७
आठ्रावें लक्षण वृत्ती उदासीन। लोलंगता जाण तेथें नाहीं ॥ ८
ऐकोणीसावें चीन्ह सर्वांसी समान। राखे समाधान ज्याचें त्याचें ॥ ९
विसावें लक्षण रामउपासना। वेध लावी जना भक्तीरंगें ॥ १०

वरील वीस लक्षणांपैकीं विसावें लक्षण – रामउपासना हें आत्मज्ञानासंबंधींचें आहे, बाकींचीं एकोणीस या आत्मज्ञानास पोषक अशीं आहेत. 'श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य झाली' असें मानणारांस आम्हीं विचारतों, कीं यापैकीं कोणतीं लक्षणें आजच्या बदललेल्या परिस्थितींत हि सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या अंगीं असणें आवश्यक नाहींत? कोणतीं लक्षणें टाकाऊ आहेत, हें त्यांनीं दाखवावें व मगच त्यांनीं आपलें आग्रही मत प्रतिपादनाच्या भानगडींत पडावें. आमच्या मतें यांतील प्रत्येक लक्षण अत्यंत महत्वाचें आहे, ज्यांच्या अंगीं हीं लक्षणें ज्या प्रमाणांत वास करीत आहेत, त्या त्या व्यक्ती त्या कमी अधिक प्रमाणांत समाजांत आज प्रत्यक्ष रितीनें कार्य करीत असलेल्या दृष्टोत्पत्तीस पडत आहेत. तेव्हां ज्यांना कांहीं प्रत्यक्ष भरींव कार्य करून दाखववायाची मनीषा आहे, त्यांनीं यांपैकीं शक्य तितकीं लक्षणें आपल्या अंगीं बाणविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचें उद्दिष्ट सत्वर साधेल, असें निःसंशय समजावें. देशांत – महाराष्ट्रांत – हल्लीं अनेक कार्यकर्ते विद्यमान आहेत. आपापल्या शक्तीप्रमाणें ते सार्वजनिक सेवेचें व्रत अविरतपणें चालवीत आहेत. तरी पण आक्षेपकांस असें विचारावेंसें वाटतें, कीं वरील अभंगांत वर्णिलेल्या गुणांनीं मंडित असे त्यांत कितीसे आहेत? कां त्यांस वरील सर्व लक्षणें कालबाह्य झालीसें वाटतें?

'अतिपरिचयें अवज्ञा घडे' या न्यायानें असें वाटतें, कीं संतांच्या विशेषतः श्रीसमर्थांच्या प्रत्येक कृतीकडे व उक्तीकडे गंभीरपणें पहाण्याचा आमचा अभ्यास सुटत चाललेला आहे, आम्हांस त्यांत कांहीं खोल हेतु आहे असें वाटेनासें झालें आहे. नाहींतर आम्हांकडून या गोष्टींची होत आलेली अवहेलना झाली नसती, व त्यांत कांहीं तरी मोठा अर्थ भरला आहे असें वाटलें असतें. याबद्दल आपण श्रीसमर्थांच्या चरित्रांतील, त्यांच्या अलौकिकत्वाची व विभूतिमहत्त्वाची पहिली चमक ज्या प्रसंगापासून दिसूं लागली तेंच उदाहरण घेऊं या. आक्षेपकांस नम्र विनंति ही, कीं त्यांनीं अगदीं चिकित्सक दृष्टीनें श्रीसमर्थांच्या प्रत्येक कृतीकडे पहावें, पण त्यांत स्वमताभिनिवेश मात्र नसावा. म्हणजे त्यांस कळून येईल, कीं श्रीसमर्थांच्या आयुष्यांतील प्रत्येक गोष्ट आधुनिक कार्यकर्त्यांस अनुकरणीय आहे. होऊं घातलेला विवाह हा त्यांच्या आयुष्यांतील पहिला महत्त्वाचा प्रसंग. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी हा बिकट पाश व मोह तोडण्याचें सामर्थ्य श्रीसमर्थांशिवाय दुसऱ्या कोणा प्रसिद्ध व्यक्तींत प्रतिपक्षीयांस दिसून आलेलें विद्यमान जगाच्या इतिहासांत आहे काय? केवढें कोंवळें वय व काय हें प्रखर वैराग्य! श्रीसमर्थांच्या चरित्रांतील ही घटना ऐतिहासिक प्रमाणानें सिद्ध आहे. ही कांहीं कविकल्पना नव्हे. देशाभिमानानें प्रेरित झालेली शेंकडों तरुण मंडळी आजन्म ब्रह्मचारी राहून देशाची

सेवा करण्याचा संकल्प करीत आलेली व असलेली नित्यशः आपण ऐकतों व पाहतों, पण त्यांच्या आयुष्यांत हा परिक्षेचा - विवाहाचा प्रसंग आला रे आला, कीं मग भावनेच्या भरांत केलेले त्यांचे ते निश्चय व तीं उच्च ध्येयें कोठच्या कोठें ' उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ' या उक्तीप्रमाणें पार लयाला जातात व त्यांचें आयुष्य, तोडण्यास अशक्य असलेला हा मायेचा पाश गळ्यांत पडल्यानें, सर्व-सामान्य माणसासारखें च होतें. जगाच्या या सनातन राहाटीकडे पाहिलें असतां श्रीसमर्थांनीं आपल्या ध्येयपूर्तीसाठीं अगदीं अल्पवयांत केलेला हा लोकोत्तर त्याग अपूर्व आहे असें आक्षेपकांस वाटत नाहीं काय ? ध्येयप्राप्तीसाठी श्रीसमर्थांची केवढी ही मनाची कठोरता ! या व असल्या च प्रसंगांना उद्देशून एकवीससमासींतलि पुढील वचनें त्यांच्या मुखांतून पडलीं असलीं पाहिजेत :—

तुजकारणें सर्व संग । त्यक्त केला ॥ २ × २

तुजविण मज माया । कांहीं नाहीं रे रामराया । २ × ४

तुजकारणें जिवलगांचा । संग सोडिला ॥ २ × ५

हातांत घेतलेल्या कार्याच्या पूर्तीसाठीं ‘देहे पडे कां देव जोडे’ अशा प्रकारची श्रीसमर्थांची अल्पवयांतील हांव पाहून मन आश्चर्यानें स्तंभित होऊन जातें. ध्येयपूर्तीसाठीं कराव्या लागणाऱ्या त्यागाच्या श्रीसमर्थांनीं पायऱ्या लावलेल्या नाहींत. यासाठीं केवढें वैराग्य, ज्याला आधुनिकांनीं स्वार्थत्याग हें नांव दिलेलें आहे, आंगीं बाणलें पाहिजे त्याबद्दलची ग्रंथराजांतील ती सुप्रसिद्ध ओंवी वाचकांच्या परिचयाची आहेच :—

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तो हि वेचावा ॥ ४–८–८

श्रीसमर्थांनीं हें स्वतः आचरिलें, एवढें च नव्हे तर, आपल्या तपश्चर्येच्या प्रभावानें आपणांसारखें च देशासाठीं सर्वस्वाची होळी करणारे शेंकडों कार्यकर्ते त्यांनीं उत्पन्न केले. ‘देशासाठीं’ हा शब्दप्रयोग पाहून कांहीं मंडळी बिचकतील पण त्यांस एवढें च सांगतों, कीं श्रीसमर्थांनीं देव आणि देश हे भिन्न आहेत असें मानलेलें नाहीं. असो. सव्वातीनशें वर्षांपूर्वी श्रीसमर्थांनीं घालून दिलेलें हें जाज्वल्य उदाहरण, ज्याला देशासाठीं कांहीं खरोखरीं च करावेसें वाटतें, त्याला आज हि अनुकरणीय नाहीं काय ?

ज्या देवाच्या सख्यत्वासाठीं श्री समर्थांनीं आपल्या सर्वस्वावर लाथ मारली, त्या देवाच्या स्वरूपाकडे पाहिल्यास कट्टर नास्तिक हि त्या उपासनेस लागेल.

श्रीसमर्थांची उपासना एकांगी नाहीं. ती विश्वव्यापिनी आहे. म्हणून या उपासनेला त्यांनीं पहिलें स्थान दिलें आहे.

मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्व विषईं ॥ ११–५–४
चौथा अत्यंत साक्षेप। ५

ही त्यांची प्रसिद्ध चतुःसूत्री होय. या चतुःसूत्रींतील पहिलें सूत्र जें 'हरिकथा निरूपण' यांत श्रीसमर्थांनीं उपासना करावयास सांगितलें आहे. उपासना अर्थात च सगुणाची होय. निर्गुणाची उपासना संभवत च नाहीं, मात्र सगुणाची उपासना याचा जो संकुचित अर्थ कांहीं विद्वान करीत असतात तो येथें अभिप्रेत नाहीं. सगुणोपासना याचा प्रचलित अर्थ मूर्तिपूजा इतकाच करण्यांत येतो. अधिकारपरत्वें श्री समर्थांनीं साधकांस हि ही उपासना सांगितली आहे. पण ते येथें च थांबत नाहींत. त्यांची उपासना ब्रह्मांडव्यापिनी आहे. त्यांच्या रामाचें रूप नभासारखें विस्तीर्ण आहे. इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. जगताची सेवा म्हणजे 'हरिभजन' अशी श्री समर्थांची व्याख्या आहे,

नारायण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी।
या कारणें तोषवावी। कोणी तरी काया ॥

या ओंवीवरून श्रीसमर्थ देशसेवा व देवसेवा यांत कांहीं च अंतर मानीत नव्हते हें स्पष्ट दिसून येत आहे. या ठिकाणीं विश्व याचा अर्थ देश-स्वदेश असा करण्यांत आला आहे. श्रीसमर्थ विश्वकुटुंबी असतांना त्यांच्या अंगीं हा संकुचित अर्थ चिकटविण्यांत कां येत आहे, अशी शंका येणें साहजिक आहे. याचें उत्तर असें आहे कीं, श्रीसमर्थांच्या वर्तनांत जो मनस्वी नेमकपणा दिसून येतो, त्याला अनुसरून हा अर्थच घेणें योग्य आहे. तात्पर्य, जेणें करून आपला देश सर्वतोपरी सुखी राहील असें वर्तन करणें याला च श्रीसमर्थांनीं हरिभजन किंवा उपासना म्हटलें आहे, व ती ज्याची करावयाची तें विश्व च, तो देश च त्यांचें सगुण दैवत होतें. ते म्हणतात:—

राम तो जाणिजे आत्मा। सर्वांतरात्मा तो चि तो। च. मा. १–१

अशी ही सर्वांतरात्म्याची श्रीसमर्थांनीं महाराष्ट्राला आपल्या कालीं उपासना दिली होती. त्या कालीं तो त्या उपासनेंतून उत्तीर्ण हि झाला होता! आजचा महाराष्ट्र ही उपासना करीत आहे काय? श्रीसमर्थांप्रमाणें कितीश्या मंडळींनीं या उपासनेकरितां आपलें तनमनधन झिजविलें आहे, किती कार्यकर्त्यांच्या अन्तःकरणांत,

सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे।

अशी श्रीसमर्थांप्रमाणें,

निशी दिनीं जनचिंता लागलीसे अपारा।

असें झालें आहे? समाजाचीं नानाविध दुःखें पाहून,

उदंड दुःख लोकांचें। ऐकतां ऊर फुटतो।

अशा रीतीनें किती जणांची छाती दुःखभरानें फुटूं लागली आहे? हे व अशा च तऱ्हेचे प्रश्न विचारल्यास त्याचे समर्पक उत्तर महाराष्ट्रानें द्यावयास नको काय? श्रीसमर्थांस महाराष्ट्र आपल्या गुरुस्थानीं मानतो. त्याचें त्यांच्यावर गाढ प्रेम आहे. पण गुरुनें सांगितलेल्या या उपासनेकडे मात्र त्याचें असावें तसें लक्ष नाहीं. तसें असतें तर देशाच्या प्रत्येक आंदोलनांत तो उसळून पडला असता. पण तो तसा पडलेला नाहीं, हें अगदीं स्पष्ट आहे, पण असें करण्यांत गुरुद्रोहाचें पातक आहे. तें टाळावयाचें असल्यास महाराष्ट्रानें आतां या गुरूपदिष्ट उपासनेची कांस पुनः धरली पाहिजे. पुरे झाली आतां अन्य देवतांची उपासना, 'जितके गांव तितके देव' आहेत, त्यांच्या उपासनेपासून इष्ट कार्यसिद्धी व्हावयाची नाहीं, कारण

अज्ञान जनाचे देव नानापरी।
त्यांची संख्या करी कोण आतां॥ स्फु. ओं. ३-१

तेव्हां आतां सर्वांनीं या उपरिनिर्दिष्ट उपासनेच्या मागें लागावें हें हितावह आहे.

श्री समर्थांच्या चतुःसूत्रींत राजकारणाचा अनुक्रम दुसरा लागतो, एवढें त्याचें महत्त्व श्रीसमर्थ मानतात. आधुनिक काळांतील श्रीसमर्थ अशी ज्यांच्याबद्दल आमची भावना आहे ते श्री लोकमान्य याबद्दल एके ठिकाणीं असें म्हणतात कीं, "धर्म व राजकारण दोन नाहींत असें च श्रीरामदासांनीं शिकविलें." लोकमान्यांच्या या उक्तीवरून श्रीसमर्थांनीं राजकारणास एवढा उच्चांक कां दिला असावा हें ध्यानांत येतें. श्रीसमर्थांच्या पूर्वी व नंतर आतांपर्यंतच्या कोणत्या हि महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीयेतर संतानें राजकारणास एवढें महत्त्व दिल्याचें उभ्या हिंदुस्थानांत आढळून येत नाहीं. सनातन धर्माचा त्रिभुवनांत डंका गाजविणारे एवढे मोठे संत स्वामी विवेकानन्द त्यांनीं सुद्धां आपल्या सांप्रदायांत राजकारणास स्थान दिलेलें आढळून येत नाहीं. परकीय राजवटींत राजकारणास प्रपंचामध्यें केवढें महत्त्व असतें हें विसाव्या शतकांतील, कीं ज्या शतकांत राजकारणास पहिल्या प्रतीचें महत्त्व प्राप्त झालें आहे, संताच्या लक्षांत न येतां, सतराव्या शतकांतील, कीं ज्यावेळीं राजकारणास अजून विशेष महत्त्व प्राप्त झालें नव्हतें,

श्रीसमर्थांची उपासना एकांगी नाहीं. ती विश्वव्यापिनी आहे. म्हणून या उपासनेला त्यांनीं पहिलें स्थान दिलें आहे.

मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्व विषई॥ ११–५–४
चौथा अत्यंत साक्षेप। ५

ही त्यांची प्रसिद्ध चतुःसूत्री होय. या चतुःसूत्रींतील पहिलें सूत्र जें 'हरिकथा निरूपण' यांत श्रीसमर्थांनीं उपासना करावयास सांगितलें आहे. उपासना अर्थात च सगुणाची होय. निर्गुणाची उपासना संभवत च नाहीं, मात्र सगुणाची उपासना याचा जो संकुचित अर्थ कांहीं विद्वान करीत असतात तो येथें अभिप्रेत नाहीं. सगुणोपासना याचा प्रचलित अर्थ मूर्तिपूजा इतकाच करण्यांत येतो. अधिकारपरत्वें श्री समर्थांनीं साधकांस हि ही उपासना सांगितली आहे. पण ते येथें च थांबत नाहींत. त्यांची उपासना ब्रह्मांडव्यापिनी आहे. त्यांच्या रामाचें रूप नभासारखें विस्तीर्ण आहे. इकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. जगताची सेवा म्हणजे 'हरिभजन' अशी श्री समर्थांची व्याख्या आहे,

नारायण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी।
या कारणें तोषवावी। कोणी तरी काया॥

या ओंवीवरून श्रीसमर्थ देशसेवा व देवसेवा यांत कांहीं च अंतर मानीत नव्हते हें स्पष्ट दिसून येत आहे. या ठिकाणीं विश्व याचा अर्थ देश-स्वदेश असा करण्यांत आला आहे. श्रीसमर्थ विश्वकुटुंबी असतांना त्यांच्या अंगीं हा संकुचित अर्थ चिकटविण्यांत कां येत आहे, अशी शंका येणें साहजिक आहे. याचें उत्तर असें आहे कीं, श्रीसमर्थांच्या वर्तनांत जो मनस्वी नेमकपणा दिसून येतो, त्याला अनुसरून हा अर्थच घेणें योग्य आहे. तात्पर्य, जेणें करून आपला देश सर्वतोपरी सुखी राहील असें वर्तन करणें याला च श्रीसमर्थांनीं हरिभजन किंवा उपासना म्हटलें आहे, व ती ज्याची करावयाची तें विश्व च, तो देश च त्यांचें सगुण दैवत होतें. ते म्हणतात:—

राम तो जाणिजे आत्मा। सर्वांतरात्मा तो चि तो। च. मा. १–१

अशी ही सर्वांतरात्म्याची श्रीसमर्थांनीं महाराष्ट्राला आपल्या कालीं उपासना दिली होती. त्या कालीं तो त्या उपासनेंतून उत्तीर्ण हि झाला होता! आजचा महाराष्ट्र ही उपासना करीत आहे काय? श्रीसमर्थांप्रमाणें कितीश्या मंडळींनीं या उपासनेकरितां आपलें तनमनधन झिजविलें आहे, किती कार्यकर्त्यांच्या अन्तःकरणांत,

सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे ।

अशी श्रीसमर्थांप्रमाणें,

निशी दिनीं जनचिंता लागलीसे अपारा ।

असें झालें आहे? समाजाचीं नानाविध दुःखें पाहून,

उदंड दुःख लोकांचें । ऐकतां ऊर फुटतो ।

अशा रीतीनें किती जणांची छाती दुःखभरानें फुटूं लागली आहे? हे व अशा च तऱ्हेचे प्रश्न विचारल्यास त्याचे समर्पक उत्तर महाराष्ट्रानें द्यावयास नको काय? श्रीसमर्थांस महाराष्ट्र आपल्या गुरुस्थानीं मानतो. त्याचें त्यांच्यावर गाढ प्रेम आहे. पण गुरूनें सांगितलेल्या या उपासनेकडे मात्र त्याचें असावें तसें लक्ष नाहीं. तसें असतें तर देशाच्या प्रत्येक आंदोलनांत तो उसळून पडला असता. पण तो तसा पडलेला नाहीं, हें अगदीं स्पष्ट आहे, पण असें करण्यांत गुरुद्रोहाचें पातक आहे. तें टाळावयाचें असल्यास महाराष्ट्रानें आतां या गुरूपदिष्ट उपासनेची कांस पुनः धरली पाहिजे. पुरे झाली आतां अन्य देवतांची उपासना, 'जितके गांव तितके देव' आहेत, त्यांच्या उपासनेपासून इष्ट कार्यसिद्धी व्हावयाची नाहीं, कारण

अज्ञान जनाचे देव नानापरी ।
त्यांची संख्या करी कोण आतां ॥ स्फु. ओं. ३–१

तेव्हां आतां सर्वांनीं या उपरिनिर्दिष्ट उपासनेच्या मागें लागावें हें हितावह आहे.

श्री समर्थांच्या चतुःसूत्रींत राजकारणाचा अनुक्रम दुसरा लागतो, एवढें त्याचें महत्त्व श्रीसमर्थ मानतात. आधुनिक काळांतील श्रीसमर्थ अशी ज्यांच्याबद्दल आमची भावना आहे ते श्री लोकमान्य याबद्दल एके ठिकाणीं असें म्हणतात कीं, "धर्म व राजकारण दोन नाहींत असें च श्रीरामदासांनीं शिकविलें." लोकमान्यांच्या या उक्तीवरून श्रीसमर्थांनीं राजकारणास एवढा उच्चांक कां दिला असावा हें ध्यानांत येतें. श्रीसमर्थांच्या पूर्वी व नंतर आतांपर्यंतच्या कोणत्या हि महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीयेतर संतानें राजकारणास एवढें महत्त्व दिल्याचें उभ्या हिंदुस्थानांत आढळून येत नाहीं. सनातन धर्माचा त्रिभुवनांत डंका गाजविणारे एवढे मोठे संत स्वामी विवेकानन्द त्यांनीं सुद्धां आपल्या सांप्रदायांत राजकारणास स्थान दिलेलें आढळून येत नाहीं. परकीय राजवटींत राजकारणास प्रपंचामध्यें केवढें महत्त्व असतें हें विसाव्या शतकांतील, कीं ज्या शतकांत राजकारणास पहिल्या प्रतीचें महत्त्व प्राप्त झालें आहे, संताच्या लक्षांत न येतां, सतराव्या शतकांतील, कीं ज्यावेळीं राजकारणास अजून विशेष महत्त्व प्राप्त झालें नव्हतें,

तें अजून शास्त्रत्वाप्रत पोहोंचलें नव्हतें, श्रीसमर्थांच्या ध्यानांत आलें, एवढेंच नव्हे तर त्यांनीं तें आपल्या सांप्रदायाचें एक प्रमुख अंग मानलें, यांत च त्यांचें अलौकिकत्व दिसून येतें. सर्व साधुसंतांनीं प्रपंच नेटका कसा करावा हें सांगितलें आहे. श्रीसमर्थांनीं हि तें सांगितलें आहे. पण राजकारणाशिवाय केलेला प्रपंच तो खरा प्रपंच च नव्हे, त्याला प्रपंच म्हणतां यावयाचें नाहीं. असें श्रीसमर्थांनीं अगदीं हडसून खडसून सांगितलें आहे. हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे, या संबंधीं,

प्रपंचीं जाणें राजकारण। परमार्थीं साकल्य विवरण। १९-४-१७

असें त्यांचें सूत्र आहे. या ठिकाणीं राजकारण याचा अर्थ आपण हल्लीं जो करतो तोच आहे, तसें च

मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।

या ठिकाणीं हि पण राजकारण म्हणजे Politics असाच अर्थ अभिप्रेत आहे. असा राजकारणप्रधान राष्ट्रप्रपंच श्रीसमर्थांनीं केला, व राष्ट्राला हि तो तसा करण्याचा संदेश दिला. हा प्रपंच त्यांनीं इतक्या उत्कटतेनें केला, कीं त्याचीं फळें त्यांनीं आपल्या डोळ्यांदेखत चाखलीं व जोपर्यंत त्यांची या राजकारणास पोषक अशी शिकवण महाराष्ट्रांत जिवंत होती, जाग्रत होती, तोपर्यंत महाराष्ट्राचा यशोदुंदुभि आसेतुहिमाचल गर्जत होता हें ऐतिहासिक सत्य आहे.

आमचें वरील विधान कोणास अतिशयोक्तीचें वाटण्याचा संभव आहे. त्यांच्या समाधानासाठीं आम्हीं त्यांस, मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या सहाव्या खंडांत प्रसिद्ध झालेलें श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांस माधवराव अनंत वेदान्ती यानें शके १७०४ माघ वद्य ५ मीस लिहिलेलें पत्र, वाचण्यासाठीं विनंति करतो. या पत्राच्या उत्तरार्धांत श्रीसमर्थांची शिकवण पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येते. हें पत्र फारच मोठें असल्यानें येथें त्यांतील कांहीं वाक्यें वाचकांसाठीं उध्दृत करतों:– "राजांनीं आधीं अन्तःकरण जाणावें ... जो परांचें अन्तःकरण जाणील तोच राजा.... समय ओळखावा.... दुर्मदासी दूर ठेवावें.... उपाधी पासून दूर असावें. उपाधींत न सांपडावें. लीनत्व पहिलेंच घ्यावें. मूर्खत्व सोडून द्यावें. दोष अवगुणांतें झांकावें.... लोक पारखोन सोडावें. पुनः मेळवून घ्यावें." इ. इ. ही शिकवण जों पर्यंत जाग्रत होती तोंपर्यंत मराठी साम्राज्य होतें, तिच्या अंताबरोबर साम्राज्य हि नष्ट झालें.

श्रीसमर्थांनीं राजकारणास आपल्या सांप्रदायांत एवढें महत्त्वाचें स्थान कां दिलें याचा येथें थोडा विचार कर्तव्य आहे. परकीय अशी यावनी सत्ता भारतवर्षांत

बद्धमूल झाल्यानें राजकारणास साहजिकच फार महत्त्व प्राप्त झालें. पण देशाच्या दुर्दैवानें श्रीसमर्थांच्या कालापर्यंत तत्कालीन पुढाऱ्यांचें या महत्त्वाच्या प्रश्नाकडे मुळींच लक्ष गेलें नव्हतें. श्रीसमर्थांच्या कालापर्यंत परकीय सत्तेपासून होणारी देशाची अधोगती थांबविण्याचे जे प्रयत्न झाले त्यांचा समाजास उपयोग झाला नाहीं असें नाहीं. पण तो कांहीं अंशीं 'अंतरि रोग वरि वरि उपचार' या मासल्याचा होता. राजकीय स्वातन्त्र्य हें सर्व दुःखावर रामबाण औषध आहे, आपला धर्म, आपली संस्कृति, आपलें सारें सामाजिक जीवन स्वराज्याशिवाय व्यर्थ होय, सर्व प्रकारच्या सुखांचें मूळ स्वातंत्र्यांत आहे, शरीरास जसें आत्म्याविना चैतन्य नाहीं तसें पूर्ण स्वातंत्र्याविना राष्ट्र मृतवत् असतें व त्याची पूर्ण वाढ कधीं हि होणें शक्य नाहीं, हें पूर्णपणें श्रीसमर्थांनीं च प्रथम् ओळखलें तेव्हां प्रतिपक्षीयांशीं त्यांच्यां च शस्त्रानें लढल्याशिवाय गत्यंतर नाहीं, तसें करणें अत्यंत आवश्यक असा धर्म समजून श्रीसमर्थांनीं राजकारणास हातीं धरलें असलें पाहिजे. देशाच्या त्या वेळच्या परिस्थितीनें त्यांच्यासारख्या उदारधी पुरुषास तसें करण्यास भाग पाडलें असलें पाहिजे. "या हतभागी देशाची विपन्न स्थिति पाहून रोजचें राजकारण टाकून दुसऱ्या उद्योगास लागणें म्हणजे कुरुक्षेत्रावरील अर्जुनाच्या मनोदौर्बल्याचें अनुकरण करणें च होय" असें एके ठिकाणीं लोकमान्यांचे उद्गार आहेत. ती च स्थिति श्रीसमर्थांची झाली असली पाहिजे हें त्यांच्या 'अस्मानी सुलतानी,' 'महंतीचें सुख,' 'परशुरामाची प्रार्थना' इत्यादि प्रकरणांवरून अगदीं स्पष्ट आहे. तेव्हां श्रीसमर्थांनीं राजकारणास हातीं धरलें तें अगदीं योग्य च झालें. आपल्या दीर्घ दर्शीत्वानें त्यांनीं बरोबर कयास बांधिला कीं, या पुढें देशास मुसलमान व इतर परकीयांशीं राजकारणाच्या कटकटी अखंड कराव्या लागणार आहेत म्हणून भविष्यत्कालांत सुद्धां आपल्या सांप्रदायानें देशाच्या प्रचलित गोष्टीपासून अलिप्त राहातां कामां नये व तसें राहून भागणार हि पण नाहीं, या साठीं त्यानीं राजकारण हें धर्माचें प्रमुख अंग मानलें व त्याला आपल्या सांप्रदायांत प्रविष्ट करून घेतलें. आतां त्यांच्या पश्चात या त्यांच्या शिकवणीकडे त्यांच्या सांप्रदायिकांचें तसें च महाराष्ट्रीयांचें जावें तसें लक्ष गेलें नाहीं हें देशाचें दुर्दैव होय !

श्रीसमर्थांची राजकारणपर दृष्टि किती व्यापक होती हें त्यांच्या दा. १५-२ मधील वर्णना वरून दिसून येतें. महाराष्ट्राच्या तात्कालीन स्थितीचें त्यांत चित्र रेखाटलें आहे. त्यांस ती स्थिती पाहून फार वाईट वाटत असावें व चाललेले प्रकार त्यास सहन होत नसावे असें त्यांच्या त्या उद्गारांवरून सरळ अनुमान निघतें. "कित्येक जण बाटले व परधर्मांत गेले, कांहीं यवन झाले तर कांहीं पोर्च्युगीज

लोकांनीं खिश्चन धर्मांत ओढले, यावनी भाषेमुळें कित्येक देशभाषेस पारखे झाले, जिकडे तिकडे राजकारणाची भाषा ऐकूं येत आहे, ती इतकी कीं त्या पुढें तें करणारांस जेवण सुद्धां सुचेनासें झालें आहे (अर्थात च हें राजकारण म्हणजे मुसलमान दरबारांत शिरलेल्या व त्यांत च स्वतः कृतार्थ समजणारांचें राजकारण), क्षत्रियांस युद्धाशिवाय कांहीं उद्योग नव्हता, त्यामुळें ते उन्मत्त झाले आहेत (याचा अर्थ असा कीं हे क्षत्रिय म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून स्वकीयांच्या पारतंत्र्याच्या बेड्या दृढ करण्यांत परकीयास सहाय्य करणारे व गुलामगिरींत भूषण मानणारेच असणार हें उघड आहे. नाहींतर स्वराज्य प्राप्तीसाठीं प्रयत्न करणारे क्षत्रिय उन्मत्त कसे असतील बरें?), शेटसावकारांस तर स्वतःची तुंबडी भरल्याखेरीज दुसरा उद्योग नाहीं, ब्राम्हण वर्गास द्वैत खरें कां अद्वैत खरे असल्या एतत्सदृश शुष्क वादाशिवाय कांहीं चांगला धंदा राहिलेला नाहीं, असें हें श्रीसमर्थकृत वर्णन आहे.

कित्येक म्लेंच होऊनि गेले। कित्येक फिरंगणांत आले।
देश भाषेनें रुधिलें। कितीयेक ॥
मऱ्हाष्ट्र देश थोडा उरला। राजकारणें लोक रुधिला।
अवकाश नाहीं जेवायला। उदंड कामें ॥
कित्येक युद्ध प्रसंगीं गुंतलें। तेणें गुणें उन्मत्त जाले।
रात्रंदिवस करूं लागलें। युद्धय चर्चा ॥
उदिम्यास व्यासंग लागला। अवकाश नाहींसा जाला।
अवघा पोट धंदाच लागला। निरंतर ॥

* * *

स्मार्थी आणि वैष्णवी। उरलीं सुरलीं नेलीं आघवीं
ऐसी पाहता गथागोवी। उदंड जाली ॥

या वर्णनावरून अनुमानें निघतात तीं अशीं कीं, पोटासाठीं परधर्मांत जाणें, पोटासाठीं परकीयांची नोकरी करणें, पोटासाठीं केवळ व्यापार करणें या व इतर गोष्टी श्रीसमर्थांस बिलकुल मान्य नव्हत्या. त्यांचा ते मनापासून तिरस्कार करीत. श्रीसमर्थांच्या या वर्णनांत धार्मिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक या सर्वांचें रूप दृष्टीस पडतें. पण हें वर्णन आजच्या परिस्थितीला अगदीं तंतोतंत लागू पडत नाहीं काय? तात्पर्य, श्रीसमर्थांची उपासना जशी विश्वव्यापिनी तसेंच त्याचें राजकारण हि ब्रह्मांडाला गवसणी घालणारें व्यापक, हेंच या वर्णनावरून सिद्ध होतें.

राजकारणांत कार्यकर्त्यांस योग्य तो उपदेश व मार्गदर्शन करणें हें कमी महत्त्वाचें नाहीं. श्रीसमर्थांनीं तें भरपूर केलें असावें असें उपलब्ध प्रमाणांवरून वाटतें. चंद्रराव मोरे प्रकरण, अफजुलखानवध प्रकरण हीं प्रकरणें श्रीसमर्थ प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेत असत, याचीं च प्रमाणें होत.

अशा या श्रीसमर्थांच्या राजकारणपर शिकवणींत आज हि कांहीं धडा घेण्यासारखा आहे, असें आक्षेपकांस वाटत नाहीं काय ?

श्रीसमर्थांसारखे निष्ठूर ध्येयवादी श्रीसमर्थ च ! देशासाठीं व धर्मासाठीं त्यांच्या-सारखे दुसऱ्या कोणी कष्ट केलेले आढळत नाहीं. वयाच्या बाराव्या वर्षापासून त्यांच्या शारीरिक व मानसिक कष्टांस प्रारंभ झाला, तो जवळ जवळ त्यांच्या समाधि-कालापर्यंत चालू होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्राच्या सबंध इतिहासांत श्रीशिवछत्रपतींखेरीज या तोडीचें दुसरें उदाहरण नाहीं, असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. धगधगीत ब्राह्मण्य कसें असावें याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्री समर्थांचें च. "ब्राह्मणाचा देह संसारांतील तुच्छ भोग भोगण्यासाठीं निर्माण झालेला नाहीं, तर या लोकीं जिवंत असेपर्यंत कष्ट करून तप करण्याकरितां, आणि मरण पावल्यानंतर परलोकीं अनंत सुख भोगण्याकरितां आहे,"

ब्राह्मणस्य तु देहोऽयं क्षुद्र कामाय नेष्यते ।
कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानन्त सुखाय च ॥ ११-१७-४२

या भागवतोक्त उक्ती प्रमाणें श्रीसमर्थांचा आयुष्यक्रम शेवटपर्यंत अक्षरशः होता. 'ब्राह्मण स्त्री गर्भ धारण करत्ये तो त्यानें जन्माला येऊन तप करावें ह्मणून,'

तपोर्थीयं ब्राह्मणी धत्त गर्भम् ॥ ११।२६।५

हें महाभारतकारांचें वचन श्रीसमर्थांनीं मातोश्रीच्या उदरीं येऊन अगदीं सार्थ केलें. तप ह्मणजे ध्येयपूर्तीसाठीं शारीरिक व मानसिक कष्ट होय. श्रीसमर्थांचें ध्येय काय होतें, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. "आघवेंचि सुखी असावे । ऐसी वासना" असें आपल्या ध्येयाचें त्यांनीं स्वतःच वर्णन केलें आहे. गिरिधरांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास "रामराज्य करणें सर्वत्र हो" हा श्रीसमर्थांच्या सबंध आयुष्याचा ध्रुव तारा होता. या ताऱ्यावरील त्यांची दृष्टि वयाच्या पांचव्या वर्षापासून तो त्यांच्या ऱ्याहत्तराव्या वर्षापर्यंत क्षणभर देखील, कोणत्याहि बिकट प्रसंगांत, किती हि कष्ट सोसण्याचा प्रसंग आला असतां, इकडे तिकडे चळली नाहीं, इतका त्यांचा कठोर ध्येयवाद होता. त्यांचा प्रत्येक श्वासोच्छ्वास या ध्येयपूर्तीसाठीं होता.

श्रीसमर्थांच्या एकंदर आयुष्यक्रमावरून असें अनुमान वा सिद्धान्त निघतो कीं, ब्राह्मणत्व आणि सौख्य (अर्थात् शारीरिक सौख्य) या गोष्टी त्यांस

परस्परविरुद्ध वाटत असाव्यात. त्यांच्या ग्रन्थांवरून हि हें च सिद्ध होतें. दा. १४×१ हा समास हें च सांगतो, शिवाय

घरींच बैसतां खोटें। ब्राह्मणु हिंडता बरा।
आळसी घातघेणा तो। कष्टला म्हणजे बरा॥

तसें च,

अत्यंत साक्षपी व्हावें। न व्हावें आळसी कदा॥

हें वचन, त्या च प्रमाणें दासविश्रामधामकारकृत,

समर्था घरीं ऐसा कायदा। आळसासी टेंको न देती कदा।
करिती शिष्यांनीं सर्व काळ धंदा। सद्गुरूकडे लक्षीत॥

हें श्रीसमर्थांच्या कडक शिस्तीचें वर्णन व इतर हि एतत्सदृश अनेक वचनें हें च दर्शवितात. त्यांतल्या त्यांत ब्राह्मणवर्गावर सर्व समाजाच्या नेतृत्वाचा फार मोठा भार आहे, असें श्रीसमर्थांचें प्रामाणिक मत असल्यानें, ब्राह्मणानें कष्टांतच सौख्य मानलें पाहिजे असें त्यांस वाटत होतें,

कष्टतां सौख्य मानावें। कष्टीं फळची पाविजे।
आळसें सुख वाटे तें। दुःख ब्रह्माण्ड भोगवी॥

या व इतर उद्गारांवरून असें वाटतें कीं ब्राह्मण्य=तप=कष्ट असें त्यांचें समीकरण होतें. 'घरींच बैसतां खोटें' इ. वचनावरून श्रीसमर्थांचा ब्राह्मणासंबंधींचा दुसरा सिद्धान्त असा निष्पन्न होतो कीं, ब्राह्मण ह्मणजे तो त्यांच्या मतें कायमचा च प्रचारक असला पाहिजे, त्यानें घरीं न बसतां समाजामध्यें सतत ज्ञानाचा प्रसार करीत, जागृति उत्पन्न करीत हिंडलें पाहिजे. ब्राह्मणांबद्दल महाभारतकारांचा हाच अभिप्राय असल्याचें दिसून येतें. 'युद्ध न करणारा राजा आणि प्रवास न करणारा ब्राह्मण या दोघांना बिळांत राहणाऱ्या प्राण्यांना सर्प खाऊन टाकतो त्याप्रमाणें भूमि गिळून टाकते"

भूमिरेतौ निगरति सर्पो बिलशयानिव।
राजानं चाप्ययोद्धारं ब्राह्मणं चाप्रवासिनम्॥ १२-२३-१५

यांत ब्राह्मणानें प्रवास करावयाचा तो पोटास मिळत नाहीं म्हणून भिक्षा मागण्याकरितां नव्हे तर त्याचा हेतु वर सांगितल्याप्रमाणें आहे. समाजाकरितां कांहींएक न करतां फुकट भिक्षा मागणाऱ्या अव्रती व अध्ययनशून्य ब्राह्मणांना राजानें शिक्षा करावी असें महाभारतांत च एके ठिकाणीं सांगितलें आहे,

अव्रता ह्यनधीयाना यत्र भैक्षचरा द्विजाः ।
तं ग्रामं दण्डयेद्राजा ।

महाभारतकार व श्रीसमर्थ हे ब्राह्मणवर्गाकडून केवळ्या त्यागाची अपेक्षा करीत आहेत हें आतांपर्यंत आपण पाहिलें. त्यावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं, ब्राह्मण ह्या वर्गाचें स्वतःसाठीं–स्वार्थासाठीं–अस्तित्व च मुळीं नाहीं. त्याची प्रत्येक गोष्ट जगासाठीं च असली पाहिजे. शांतिपर्व अ. २४५ मध्यें 'ज्याचें जीवित धर्मासाठीं, ज्याचा धर्म देवासाठीं, ज्याचें आयुष्य तपासाठीं असतें तो च खरा ब्राह्मण होय,' अशी एके ठिकाणीं ब्राह्मण शब्दाची व्याख्या केलेली आहे.–

जीवितं यस्य धर्मार्थं धर्मो हर्यर्थमेव च ।
अहोरात्रिश्च पुण्यार्थं देवा ब्राह्मणं विदुः ॥

व तीच त्यांस अभिप्रेत असल्याचें, त्यांच्या आयुष्यावरून व ग्रन्थांवरून दिसतें.

श्रीसमर्थांस आपले गुरु समजणाऱ्या आधुनिक सुशिक्षित महाराष्ट्रानें त्यांच्या वरील मताचा विचार करावा. श्रीसमर्थांचें ब्राह्मणांबद्दलचें हें मत कोणीकडे व समाजांत हल्लीं या वर्गाच्या कांहीं पुढाऱ्यांकडून प्रतिपादिलें जात असलेलें मत कोणीकडे? ब्राह्मणांनीं आपली दुःस्थिति सुधारण्याकरितां वाटेल तो धंदा करावा असें हे अट्टाहासानें सांगत असतात. परिस्थितींत अंतर पडलें आहे. तेव्हां वारा येईल तशी पाठ फिरविली पाहिजे, असें यांचें मत आहे. यांना असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं, श्रीसमर्थांच्या कालीं जी समाजाची स्थिति होती ती च आज जवळजवळ आहे ना? समाजाची आजची जी नैतिक व आचारात्मक कल्पना आहे तीच तीनशें वर्षांपूर्वीं होतीना! कां त्यांत व आतांच्या स्थितींत दृष्टींत भरण्याजोगें अन्तर पडलें आहे? तें विशेष पडलेलें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. असें असतांना सुद्धां देशकालवर्तमानाकडे पाहून पावलोंपावलीं सावधानतेचा पुकारा करणारे श्रीसमर्थ ब्राह्मणांस जें सांगत आहेत तें आजच्या काळांत या ब्राह्मण-कैवाऱ्यांस कां पटूं नये याचें सखेदाश्चर्य वाटतें! ब्राह्मणांच्या त्या कालाच्या दुःस्थितीचें श्रीसमर्थकृत वर्णन आजच्या ब्राह्मणवर्गास अक्षरशः लागतें. आपल्या हृदयाच्या रक्ताच्या शाईनें तें वर्णन श्रीसमर्थांनीं लिहिलें आहे कीं काय असें वाटतें. इतकें तें कळवळून लिहिलें आहेः—

नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचार चि बुडाला ।
वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ॥
ब्रह्मज्ञानाचा विचारु । त्याचा ब्राह्मणासी च अधिकारु ।
वर्णानां ब्राह्मणो गुरुः । ऐसें वचन ॥

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपले इछेनें ॥
ऐसा कळ्युगींचा आचार । कोठें राहिला विचार ।
पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे ॥
गुरुत्व आलें नीच याती । कांहीं येक वाढली महंती ।
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ।
हें ब्राह्मणांस कळेना । त्याची वृत्ति च वळेना ।
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥
राज्य नेलें म्लेंचिं क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं ।
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहीं च नाहीं ॥
ब्राह्मणांस ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें ।
त्या च विष्णूनें श्रापिलें । फरशरामें ॥
आह्मी हि ते चि ब्राह्मण । दुःखें बोलिलें हें वचन ।
वडिल गेले ग्रामणी करून । आम्हां भोंवते ॥
आतांचे ब्राह्मणीं काये केलें । अन्न मिळेना ऐसें जालें ।
तुम्हां बहुतांचे प्रचितीस आलें । किंवा नाहीं ॥

—दा. १४–७–२९ ते ३९

यांतील कोणती ओंवी आजच्या ब्राह्मणांना लागू नाहीं? गेलीं कित्येक शतकें ब्राह्मण वर्गाचें काय हें अधःपतन चाललेलें आहे? आतां ही घसरगुंडी थांबणार तरी कोठें? कां ही अशी च चालावयाची! खरोखर पाहतां एका कालाला ब्राह्मणांचा केवढा अधिकार होता! "या देशांत जन्मलेल्या ब्राह्मणांच्या चरणांजवळ बसून जगांतील सर्व मानव जातीनें आपापलीं कर्तव्यें समजून घ्यावीं":—

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥

असें मनूचें वाक्य आहे. असें असतां ऐहिक सुखाच्या मोहाला बळी पडून, त्यांनीं आपलें महत्त्व घालविलें व सगळ्यांच्या रोषाला पात्र होऊन बसले, समाजांत उच्चनीचत्वाची नसतीं ग्रामण्यें, नसते वाद उपस्थित न करितां, श्रीसमर्थांनीं सांगितल्याप्रमाणें समाजाच्या सर्वांगीण उद्धाराचें कार्य,

ढुंगाला लंगोटी लावून निरपेक्षपणानें, खोट्या मोठेपणाची हांव न धरितां, जर या वर्गानें चालू ठेविलें असतें, तर आज समाजांत जी बजबजपुरी, जी अनवस्था माजलेली दिसून येत आहे, ती दिसती ना ! आपल्या कालीं, श्रीसमर्थांनीं हें जाणलें होतें व जाणून वेळेवर ब्राह्मणांस सावध केलें होतें. त्याचा परिणाम काय व्हावयाचा तो झाला होता. तेव्हां श्रीसमर्थांनीं ब्राह्मणांस केलेला हा उपदेश व शिकवण आज हि त्यांस मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे, अशी आमच्याप्रमाणें च आमच्या आक्षेपक मित्रांची खात्री पटेल, असा आह्मांस दृढ भरवसा आहे.

सर्वस्वाचा त्याग करून जनीजनार्दनाची सेवा करण्यास बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यास दोनप्रहरची चिंता न पडावी ह्मणून श्रीसमर्थांनीं त्याच्या हातांत भिक्षेची कामधेनु दिली आहे. यांत श्रीसमर्थांचा फार खोल हेतु आहे. त्यांच्या पूर्वी हा भिक्षेचा सांप्रदाय होता व हल्लीं हि तो अजून विद्यमान आहे. पण श्रीसमर्थांनीं भिक्षा मागण्यांत जी शिस्त घालून दिली आहे, त्यांत जो उद्देश त्यांचा दिसून येतो, ती शिस्त व तो उद्देश मात्र इतरांच्यांत दिसून येत नाहीं. बहुतेक लोक ती पोटासाठींच मागतात, कांहीं थोडे निस्पृहपणानें मागत असतील, नाहीं असें नाहीं. पण या थोड्यांत श्रीसमर्थोक्त निस्पृहाचीं तीं इतर लक्षणें नाहींत. भिक्षा मागण्यास सांगण्यांत श्रीसमर्थांचे अनेक हेतु दिसून येतात. कार्यकर्त्याचा जास्तींत जास्ती वेळ समाजकार्याकडे लागावा, आपल्या पोटासाठीं तो दुसऱ्याचा मिंधा नसावा, भिक्षा घालणारास आपण ती घालतांना ती घेणारावर मोठा उपकार करीत आहोंत असें न वाटावें, तसेंच घेणाराला हि आपण कोणाचें उपकृत झालों आहोंत असें न वाटावें, कार्यकर्ता कोणा एकट्यावर अवलंबून नसावा, तो तसा राहिल्यास त्याच्या अन्तर्बाह्य स्वातंत्र्यास बाधा येण्याचा संभव आहे, जनतेच्या पुढें असले भिक्षेकरी नेहमीं आल्यानें तिला ते करीत असलेल्या कार्याची नेहमीं जाणीव व जागृति राहावी, हे व इतर उद्देश श्रीसमर्थांच्या मनांत ती चालू करतांना असावेत असें दा. १४×२ मधील वर्णनावरून वाटतें व कांहींचीं अनुमानें बांधतां येतात. भिक्षा मागतांना कार्यकर्त्यानें आपले डोळे, कान व इतर इंद्रियें जागृत ठेवावयास पाहिजेत हें पुढील उद्गारांवरून दिसून येतें:—

प्रत्यहीं मागणें भिक्षा। मिळाली न मिळे तरी।
नित्य नूतन हिंडावें। धुंडावे भक्त प्रेमळ॥ स्फु. प्र. ३×६
हिंडता पारखी लोकां। कार्यकर्ता जिवीं धरीं॥ स्फु. प्र. १×६

श्रीसमर्थांच्या भिक्षेसंबंधींच्या शिकवणीचा साकल्यानें विचार केल्यास असें दिसतें कीं ही भिक्षा मागावयाची ती स्वतःसाठीं नसून जगासाठीं च आहे. कारण ती मागणाराचें, ती मागत असतांना स्वतःचें स्वतन्त्र असें अस्तित्व च उरलेलें दिसून

यत नाहीं. वैयक्तिक मोक्षासाठीं भीक मागणारे अनेक झाले व होतील हि पुढें. पण तो तरी उच्च कोटीचा पण एक प्रकारें पराकाष्ठेचा स्वार्थ च होय. श्रीसमर्थांस हें नको होतें. आपण तरून इतरांस तारणारीं धडाडीचीं माणसें त्यांना पाहिजे होतीं.

" जयाचें धड नाहीं। तयाचें परत्र पुससी काई "

म्हणजे पारलौकिक स्वराज्य ऐहिक स्वराज्याशिवाय शक्य नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत होतें :—

प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुम्हीं कष्टी व्हाल।

तेव्हां असला प्रपंच करून जगाचा उद्धार करणारीं माणसें श्रीसमर्थांना पाहिजे होतीं. त्यांच्यासाठीं ह्या भिक्षेच्या सांप्रदायाचा आपला नवावतार त्यांनीं अस्तित्वांत आणला व हीच

" भिक्षा वांचवी विपत्ती। होणार काळीं॥ " १४-२-२२

असें पुढील भविष्य हि वर्तवून टाकिलें.

लोकमान्यांचें या संबंधींचें मत त्यांच्या एका आठवणींत पुढील प्रमाणें आढळतें. तो प्रसंग बंगालच्या फाळणीमुळें राष्ट्रांत जी जागृति उत्पन्न झाली, ती समाजाच्या शेवटच्या थरांत कशी न्यावयाची, याबद्दल 'आठवणीचे संपादक' त्यांस विचारवयास गेल्या वेळचा होता. लोकमान्य त्यांस उत्तर देतात:— "राष्ट्राकरितां फकीर बनण्यास तुम्ही तयार आहांत काय? तसें असाल, तर राष्ट्रोन्नति झाली च पाहिजे. नुसता सल्ला काय विचारता? बुद्धिवान् ब्राह्मणांचीं मुलें महाराष्ट्रांत रामदासांच्या शिष्याप्रमाणें फकीर ह्मणून हिंडण्याची वेळ आतां आली आहे. उद्योगास लागा." याचा अर्थ असा कीं, लोकमान्यांस ही श्रीसमर्थांची शिकवण कालबाह्य वाटत नव्हती, हें निश्चित. मग आक्षेपकांस ती तशी कां वाटावी, हें कळत नाहीं. लोकमान्यांच्या अपेक्षेप्रमाणें महाराष्ट्रांत घडून आलें किंवा कसें, याचें उत्तर कोण देणार?

संघटना करावी श्रीसमर्थांनीं च! या कार्याला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी त्यांस पूर्ण परिचित होत्या. त्यांचें सर्व ज्ञान त्यांनीं आपल्या पर्यटनकालांत प्राप्त करून घेतलें होतें. त्यांचें निरीक्षण किती सूक्ष्म होतें या विषयीं त्यांच्या ग्रंथांत पदोपदीं प्रत्यंतर मिळतें. भोंवतालच्या परिस्थितीचें पूर्ण आकलन, समाजाला लागलेल्या रोगाचें अचुक निदान व त्यावर योजण्याचे रामबाण उपाय, तसें च जनतेच्या अन्तःकरणाची पारख व तीं आपणांकडे ओढून घेण्याची हातवटी, या सर्व बाबतींत श्रीसमर्थांचा हात धरणारे पुरुष फार च थोडे उत्पन्न झालेले आहेत. आधुनिकांनीं श्रीसमर्थांच्या चरणांपाशीं बसून या शिकवणुकीचे धडे आज हि घ्यावेत, इतकी ती

शिकवण महत्वाची व मार्गदर्शक आहे. ती आतां आपण येथें थोडक्यांत क्रमशः पाहूं या :—

तत्कालीन परिस्थितीचें वर्णन श्रीसमर्थांनीं दासबोध, अस्मानीसुल्तानी, परचक्र निरूपण, करुणाष्टकें इत्यादि ठिकाणीं वारंवार केलेलें आहे. वाचकांनीं तें त्या त्या ठिकाणीं पहावें. अनेकांनीं तें अनेकदां आपल्या लेखनांत उपयोगिलें असल्यानें येथें तें पुनः देऊन जागा अडवीत नाहीं. या सर्व वर्णनांचा सारांश थोडक्यांत पुढें देत आहोंत. तीर्थक्षेत्रें भ्रष्ट करणें, बायका पोरें बाटविणें, हिंदूधर्माचा नायनाट करणें, व्यापारी लोकांस लुटणें, या बाबी श्रीसमर्थकालीं मुसलमानांच्या नित्याच्या च होत्या; तसेंच दुष्काळ, लुटालूट, चोऱ्या व दरोडे, स्त्रियांस गुलाम म्हणून विकणें, वाटमाऱ्या करणें, चांचेगिरी करणें इत्यादि अनन्वित प्रकारांस श्रीसमर्थांच्या पूर्वकालीं व पूर्ववयांत नुसता ऊत आलेला होता. या लोकस्थितीचें इतकें सूक्ष्म वर्णन श्रीसमर्थांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणी केलेलें आढळांत नाहीं यावरून त्यांस लोकस्थितीचें ज्ञान किती उत्कृष्ट होतें हें दिसून येतें. कार्यकर्त्यांच्या आंगीं तें असावेंच लागतें. तें नसल्यास तो कार्य तरी काय करणार?

समाजस्थितीचें श्रीसमर्थांचें हें ज्ञान किती अचुक होतें याची वाचकांस बरोबर कल्पना यावी म्हणून ताडून पाहण्याकरितां ऐतिहासिक कागदपत्रांतील एक दोन उतारे देतों. पुढील उतारा श्री शंभू छत्रपतींच्या मृत्युनंतरच्या औरंगजेबाच्या एका फर्मानापैकीं आहे :—"दरोबस्त दक्षण साध्य होऊन फत्ते जाली. ... ... या उपरी एक वर्ण करावा; हिंदू ठेऊ च नये, म्हणून ओलें अन्न विकावें ऐसा हुकूम केला." आतां दुसरा उतारा पहा. हा वाड व पारसनीस यांनीं प्रसिद्ध केलेल्या सनदापत्रांपैकीं असून तो विजापुरच्या सुलतान महमद आदिलशहाचा आहे :— "धर्माप्रमाणें (ह्या मुसलमानी धर्माप्रमाणें) सर्व लोकांस वागविणें. ... ... व मराठी देवळांतील मूर्ति वगैरे फोडणें. ... ... लोकांस निराकाराचे भजण्याकरितां बोलावणें व दारू पिणारे लोक व कैफ करणारे लोक व शिवाय वाईट करणारे लोक यांस मर्यादा देणें व देवांच्या मूर्ति दगडाच्या वगैरे आकारी बिन आकारी मोडून टाकणें." सनातन धर्मावर कसला बिकट प्रसंग होता, हें यांत स्पष्ट दिसून येतें.

पारतंत्र्याचा रोग लागल्यामुळें देशाची स्थिति कशी झाली होती, हें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें श्रीसमर्थांनीं पूर्ण ओळखलें होतें. याच्या वरची उपाययोजना हि श्रीसमर्थांनीं 'संक्षेपतः क्रियायोगो निदान परिवर्जनम्' या वैद्यकीय सिद्धान्ताप्रमाणें केली म्हणजे रोगाचा नाश करणें झाल्यास, तो ज्या कारणास्तव झाला तें कारणच

समूळ नष्ट करणें हें होय. म्हणून श्रीसमर्थांनीं मूळ गड्ड्यालाच हात घातला. पारतंत्र्याचा विषारी वृक्ष च समूळ नष्ट करण्याचें ठरवून तत्कालीन समाजास,

देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥

असला जळजळीत संदेश दिला, व

देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्होळ करावा ।
मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥

अशी जिकडे तिकडे दंगल उडवून देण्यास त्यांनीं सांगितलें.

हें कार्य करण्यास संघटना पाहिजे होती. ती त्यांनीं समुदाय करून व निरनिराळे संघ स्थापून केली, याबद्दल त्यांचे पुढील उद्गार च साक्ष देत आहेत.

ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।
संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ दा. १९-६-१४

तसें च,

मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।
ये विषयीं करितां तकवा । पूर्वज हांसती ॥

आपल्या त्या 'अपूर्व आज्ञापत्रांत' श्रीसमर्थ शिष्यांस हें च सांगत आहेत कीं, बाबानों! 'संघे शक्तिः कलौ युगे' म्हणून तुम्ही संघ काढा, संघटना करा, तसें न कराल तर, तुमच्या परमार्थाला कमीपणा येईल,

कांहीं समुदाय करणें । ये विशीं आलस्य न करणें ।
आलस्य करितां उदंड उणें । दिसेल परमार्थीं ॥ ४ ॥ आ. पत्र

कारण वैयक्तिक मोक्षाला श्रीसमर्थ फार महत्त्व देत असावेत, असें त्यांच्या उद्गारांवरून वाटत नाहीं. 'आपण तरून इतरांस तारणाऱ्यांस' ते मानीत. नाहीं तर त्यांनीं पुढील उद्गार काढले च नसते,

पोहणारें बुडते तारावे । सामर्थ्यें बुडों नेदावें ॥ आ. प. ५॥

तात्पर्य, संघटना करणें – समुदाय करणें हें श्रीसमर्थांनीं आपल्या सांप्रदायाचें एक लक्षण च बांधून टाकिलें आहे.

ही संघटना कोणत्या लोकांची करावयाची याबद्दल हि श्रीसमर्थांचे कांहीं नियम आढळतात. भोळ्यांस किंवा बावळटांस यांत वाव नसे. कारण,

भोळा भाव सिद्धि जाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ॥ दा. २—९—११

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत सं. ७३ ता. ठाणें.

अशक्तांचें व दुर्बळांचें येथें काम नसे,

धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ॥

म्हणून श्रीसमर्थ बुद्धिमानाला व सशक्ताला च हातीं धरीत,

नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनि शिकवाव्या ॥ दा. १९-१०-२२

'आज्ञापत्रांत' शिष्यांना कसलीं मुलें हातीं धरावीं हें सांगताना,

सोईऱ्या धाईऱ्याचीं मुलें । तिक्षण बुद्धीचीं सखोलें ॥ ७ ॥

असें च त्यांनीं बजाविलें आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. बरोबर च आहे कीं, श्रीसमर्थांना आपल्या सांप्रदायिकांकरवीं कांहीं उत्कट कार्य घडवून आणावयाचें होतें, तेव्हां, त्यांनीं शिष्य निवडण्यांत इतकी चिकित्सा करावी. त्यांना आपल्या शिष्यांची संख्या प्रतिष्ठेसाठीं उगीच च फुगवावयाची नव्हती, डोळ्यांसमोर प्रचंड कार्य दिसत होतें, तें मोठ्या उलाढालीचें होतें, त्याला चतुरस्त्र माणसें च पाहिजे होतीं व तीं श्रीसमर्थांनीं आपल्या अलौकिक सामर्थ्यानें जमविलीं. येथें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, त्यांत श्रीसमर्थांचें धोरण व चातुर्य परमावधीचें दिसून येतें. शिष्यांची निवड करतांना त्यांनीं जीं त्यांचीं लक्षणें दिलीं आहेत तीं पाहिलीं म्हणजे असें वाटतें कीं, ज्याला केवळ सध्यांच्या भाषेंत परमार्थी ह्मणतात, तसला एकांगी परमार्थी - केवळ स्वतःपुरता परमार्थी - श्रीसमर्थांस नको होता. अशक्ताला बुद्धिमंदानां हि हा परमार्थ (व्यक्तिगत) साधण्यासारखा आहे. पण श्रीसमर्थांस आपले शिष्य शरीरानें धष्टपुष्ट, बुद्धीनें तल्लख, गायनादिकलेंत निष्णात असलेले, सुंदर अक्षर लिहिणारे, उत्कृष्ट वक्ते असलेले, सुखाला आंग न देणारे, कष्टांत सौख्य मानणारे इत्यादि उत्तम गुणांनीं संपन्न पाहिजे होते. यावरून त्यांचें मनोगत काय असावें तें स्पष्ट दिसतें. त्यांना राष्ट्रकार्य करावयाचें होतें व त्या कार्यासाठीं जी प्रचंड संघटना करावयाची होती, त्यासाठीं त्यांना वर उल्लेखिलेल्या गुणांनीं युक्त अशीं कर्तृत्ववान माणसें पाहिजे होतीं, तीं त्यांनीं जमविलीं, त्यांना निवळ स्वार्थी परमार्थी नको होता, किंबहुना असल्या परमार्थास ते परमार्थ मानण्यास सिद्ध नव्हते. श्रीसमर्थ स्वतः उत्तम गुणांचें माहेरघर होते, प्रत्ययज्ञानी होते, तेव्हां आपल्या संघटनाकार्यांत त्यांनीं आत्मसदृश माणसांचा च भरणा करावा हें त्यांच्या चतुरस्रतेस साजेसें च होतें. आपल्या पर्यटन कालांत देशाची जी स्थिति त्यांनीं अवलोकन केली, त्यावरून त्यांनीं, ज्या समाजाला व राष्ट्राला जिवंत राहून कांहीं विशिष्ट कार्य करून दाखवावयाचें आहे, त्यानें संघटित झालेंच पाहिजे, असा आपल्या मनाशीं ठाम सिद्धान्त ठरविला व पुढें योग्य कालीं तो आचरणांत हि आणला.

संघटनाशास्त्रांतील श्रीसमर्थ आचार्य होते. या शास्त्रांतील आणखी एक महत्त्वाचें अंग, एक अत्यंत आवश्यक शिकवण, त्यांनीं कार्यकर्त्यांस दिली आहे, ती आतां आपणांस पहावयाची आहे. श्रीसमर्थांच्या वेळेस समाजांत नाना मतें, नाना पाखांडें, प्रचलित होतीं. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता, 'जो जे मती सांपडला तया तेंचि थोर" अशी स्थिति होती, 'अवघें अनावेक (अनायक) जालें चहूंकडे' असा प्रकार होता. हा 'मतामतांचा गल्बला मोडून, लोकांस चुचकारून, त्यांना त्यांच्या हिताचा मार्ग दाखवून, आपल्या अधोगतीस परकीय जसे कारणीभूत आहेत तसे अज्ञानजन्य आपले स्वतःचे अनेक दोष हि आहेत हें गोड शब्दानें त्यांस दाखवून देऊन समाजाच्या अगदीं वरील थरापासून तों थेट खालच्या थरापर्यंत सर्वांस एका सूत्रांत गोंवून कार्यभाग करावयाचा होता. तो केवळ परकीयांची उठल्या सुटल्या निंदा करून किंवा स्वकीयांचे 'दोष अखंड बोलून' सिद्धीस जावयाचा नव्हता. गोड बोलून च हें काम करावयाचें होतें. समाजांतील बखेडे मोडून, 'वंडपाखांडाचे वाखें 'करून महायोगी जे श्रीसमर्थ त्यांनीं हें अवघड कार्य केलें. ग्रंथराजांत 'योगी' शब्दाच्या ज्या दोन तीन व्याख्या आहेत, त्यापैकीं लोकांचीं अन्तःकरणें जो राखतो तोच योगी होय अशी एक आहे,

> सभेमध्यें कळहो जाला। शब्द येतो जाणत्याला।
> (लोकांचीं) अन्तरें राखों नाहीं सिकला। कैसा योगी॥ १८–१०–३४

समाजाचें अन्तःकरण राखण्याच्या या शिकवणीबद्दल श्रीसमर्थांचे किती तरी उल्लेख आहेत, हें कार्य जर महंत–कार्यकर्ता–करूं शकला नाहीं तर त्याच्या हातून जगदुद्धाराचें कार्यच होणार नाहीं, महंत ही पदवी त्याला योग्य होणार नाहीं,

> या कारणें मनोगत। राखेल तो मोठा महंत।
> मनोगत राखतां समस्त। वोढोन येती॥ १३–१०–२९

लोक राजी राखण्यावर श्रीसमर्थांचा फार मोठा कटाक्ष आहे. याबद्दल कांहीं थोडीं वचनें उद्धृत करतोंः—

> वर्तायाचा विवेक। राजी राखणें सकळ लोक। १३–१०–२३
> परांतरासी राखणें। सर्व काळ॥ १८–१०–१२
> बहुतांचें मनोगत। हातीं घेतलें पाहिजे॥ १२–१०–३७
> मनुष्य राखिलें राजी। तो प्राणी शाहाणा बरा॥ स्फु. प्र. १–९
> सकळांसीं सख्य राखावें। वर्तावें तें मनोगतें॥ स्फु. प्र. ३–२३

सर्वांसीं नीवउं जाणे । धन्य तो जाणता गुणी ॥ स्फु. प्र. ४०–५
जाणते नेणते राजी । राखावें बहुतांपरीं ॥ च. मा. ३–७

असे आणखी किती तरी उल्लेख आहेत. कार्यकर्त्यांस ते बजावतात कीं, कार्य सुरळीतपणें शेवटास जावें, अशी इच्छा असेल तर जनतेच्या अन्तःकरणास जेणें करून धक्का लागेल असें त्यानें वागतां कामा नये,

अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका ॥ १९–४–१९

समाजाचें अन्तःकरण कोठवर राखावयाचें याची श्रीसमर्थांनीं दोन ठिकाणीं अगदीं सीमा केली आहे. बाकी विश्व च ज्यांनीं नारायणाच्या जागीं मानलें व त्याची च उपासना ज्यांनीं जगाला उपदेशिली, त्यांच्या मुखांतून जर असलीं वाग्रत्नें जगास मिळावयाचीं नाहींत, तर तीं त्याला मिळणार तरी कोठून म्हणा! जनतारूपी जनार्दनास संतुष्ट राखणें ही मुख्य भक्ति होय, असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. याचा अर्थ असा कीं नवविधा भक्तींमध्यें जी मुख्य आत्मनिवेदन भक्ति, तिच्या जोडीला श्रीसमर्थांनीं ह्या भक्तीला आणून बसविलें आहे,

लोकांसी राखणें राजी । हे मुख्य भक्ती जाणिजे ॥ स्फु. प्र. ४२–५

श्रीसमर्थांचा देव कोणता, हें आतां पुनः सांगण्याची आवश्यकता नाहीं. या जनीजनार्दनाच्या – विराट – स्वरूपी या विश्वांतील नारायणाच्या – कोणत्या हि अवयवाची पूजा ही त्याची च पूजा होय. श्रीसमर्थांची ती भजनाची सुप्रसिद्ध दुसरी व्याख्या (कारण, वर उल्लेखलेली पहिली) वाचकांस पूर्ण परिचित असणार च,

भेटो कोणी एक नर । धेड महार चांभार ।
त्याचें राखावें अंतर । याचें नांव भजन ॥ करुणाष्टकें २१५

काय ही अंतःकरणाची उदारता व विशालता! भजनाची व्याख्या श्रीसमर्थांप्रमाणें कोणी तरी अशी केली आहे काय? समाजाचें त्यांनीं असें रंजन केलें म्हणून त्यांच्या हातून ती प्रचंड संघटना झाली व म्हणून च त्यांना समर्थ म्हणावयाचें! असें वाटतें कीं इतरांना ती करणें साधावयाची नाहीं म्हणून आपण च त्यांनीं ती 'समर्थ' शब्दाची व्याख्या केली काय?

बहुत जनास चाळवी । नाना मंडळें हाळवी ।
ऐसी हे समर्थपदवी । विवेकें होते ॥ १८–१०–४६

संघटनेची वैदिक आर्यांची ही च परंपरा आहे. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. श्री समर्थांची हि ' रामकथा ब्रह्मांड भेदूनी । पैलाड न्यावी ॥ " अशी प्रतिज्ञा होती. प्राचीन आर्यांचे संघटनेचे ते दोन प्रसिद्ध मन्त्र,

'संगच्छध्वं संवदध्वं संवो मनांसी जानताम्' म्हणजे, तुम्ही सर्व एकत्र व्हा' एकमेकांशीं बोला व एकमेकांचें मनोगत ओळखा,' हा एक व दुसरा

समानीव आकूतिः समाना हृदयानि वः।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति॥

म्हणजे "तुमचा अभिप्राय एकसारखा, तुमचीं अंतःकरणें एकसारखीं व तुमचें मन एकसारखें असो; जेणेंकरून तुमची संघशक्तीची बळकटी होईल," यांच्या शिकवणींत व वर प्रतिपादिलेल्या श्रीसमर्थांच्या शिकवणींत कांहीं अंतर आहे काय? श्रीसमर्थांची ही शिकवण त्रिकालाबाधित आहे. आक्षेपकांनीं तिचें शांत चित्तानें मनन करावें म्हणजे त्यांस आपली चूक आढळून येईल.

देव श्रेष्ठ का पौरुष-प्रयत्न-श्रेष्ठ या प्रश्नाचा उहापोह रामायण, महाभारत व योगवासिष्ठ या ग्रन्थांत पुष्कळ च केला गेलेला आहे. श्रीसमर्थांनीं हि हा विषय पुष्कळ चर्चिला आहे. पण श्रीसमर्थांच्यांत जें आहे, तें इतरांत नाहीं असें वाटतें. प्रथमतः पहिले तीन ग्रन्थ याबद्दल काय ह्मणतात तें पाहूं व नंतर श्रीसमर्थांकडे वळूं. यत्नावांचून कांहीं हि मिळावयाचें नाहीं, असा या तीन हि ग्रन्थांचा अभिप्राय आहे. 'जे भेदरट आणि कर्तृत्वशून्य असतात ते च दैवावर विसंबून राहतात, सुज्ञ व पौरुषयुक्त माणसें दैवावर विसंबून बसत नाहींत, असें रामायणामध्यें ह्मटलेलें आहे.

विक्लवो वीर्यहीनो यः स दैवमनुवर्तते।
वीराः संभावितात्मानो न दैवं पर्युपासते॥

रामायणांतील या वचनावरून दैव ही चीज अस्तित्वांत आहे किंवा नाहीं, याबद्दल ग्रन्थकाराचा अभिप्राय काय आहे हें कळून येत नाहीं. महाभारतकार दैवाचें अस्तित्व मानतात व तें मनुष्याच्या प्रयत्नांत थोडे बहुत लुडबुड हि करतें, असें त्यांचें मत आहे. पण त्यांचा बव्हंशीं भर प्रयत्नावर आहे असें स्वच्छ दिसतें. केवळ दैवावर अवलंबून राहणारा मनुष्य सर्वथैव नाश पावतो असा त्यांचा पहिला सिद्धान्त आहेः—

असंशयं दैवपरः। क्षिप्रमेव विनश्यति॥

'सतत यत्न करीत असावें; म्हणजे दैवयोगानें यश मिळेल असा त्यांचा दुसरा सिद्धान्त आहे.:—

यत्नो हि सततं कार्यस्ततो दैवेन सिध्यति॥

अनुशासनपर्वाच्या साहाव्या अध्यायांत दैव व उद्योग यांमध्यें श्रेष्ठ कोण याचा विचार चालूं असतांना, ग्रन्थकार असें सांगतात कीं उद्योग व दैव यांची सांगड घातल्याशिवाय पुरुषार्थ प्राप्ति व्हावयाची नाहीं. दैव हें बीजाच्या जागीं व उद्योग हा क्षेत्राच्या जागीं मानावा. यांचा उत्तम संयोग झाला म्हणजे उत्तम प्रकारचें पीक येतें:—

क्षेत्र पुरुषकारस्तु दैवं बीजमुदाहृतम् ।
क्षेत्रबीज समायोगात्ततः सस्यं समृध्यते ॥

असा जरी सिद्धान्त त्यानीं प्रतिपादिला आहे, तरी त्यांचा मुख्य भर प्रयत्नावरच आहे, हें पुढें दिलेल्या वचनावरून सिद्ध होत आहे,

उदाराणां तु सत्कर्म दैवं क्लीबा उपासते ॥

म्हणजे मोठीं माणसें सत्कर्मावर भरंवसा ठेवतात तर दुबळे लोक दैवावर ठेवतात.

आतां योगवासिष्ठकार काय म्हणतात तें पाहूं या. यांच्या कोशांत "दैव" हा शब्द च आहे असें दिसून येत नाहीं. इतके हे कट्टर प्रयत्नवादी आहेत. 'दैव ही केवळ मूर्खांची कल्पना आहे' खरोखर तें नाहींच,

मूढैः प्रकल्पितं दैवम् ॥

ज्याला 'दैव' म्हणतात तें दुसरें तिसरें कांहीं नसून आपलें पूर्वकर्मच होय,

प्राक्स्वकर्मेतराकारं दैवं नाम न विद्यते ।

तें मुळांत नाहीं च मुळीं, मंदबुद्धीच्या लोकांची ती कल्पना आहे,

कल्पितं मोहितैर्मन्दैर्दैवं किंचिन्न विद्यते ।

असल्या दैवाचा – पूर्वकर्माचा – नाश या जन्मांतील कर्मांनीं नष्ट करतां येणें शक्य आहे, असें ह्या ग्रन्थकाराचें मत आहे,

प्राक्तनोऽद्यतनेनाशु पुरुषार्थेन जीयते ।

याविषयींचा यांचा ठाम सिद्धान्त हा कीं, उद्योगी लोकांना जगांत मिळविण्यास कांहीं हि कठीण नाहीं,

न हि सत्त्ववतामस्ति दुःसाध्यमिह किंचन ।

या तिघां हि ग्रन्थकारांहून श्रीसमर्थांचें वैशिष्ट्य काय आहे, हें दाखविण्यासाठीं हें विवरण करावें लागलें. महाभारतकार यत्नाच्या जोडीला दैव पाहिजे असें म्हणतात. श्रीसमर्थांस त्याची – दैवाची – आवश्यकता भासत नाहीं. याबाबत त्यांचें योगवासिष्ठकारांशीं चांगलें पटतें. प्रारब्धाची रेषा – प्रारब्धकर्म सुद्धा पुसून टाकतां येतें, असें श्रीसमर्थांचें मत आहे,

रेखा तितुकी पुसोनि जाते।

मात्र हें साध्य होण्यास 'अचुक' यत्न पाहिजे. तो करंट्यास करितां येत नाहीं, म्हणून तो सर्व दोष प्रारब्धावर ढकलतो,

अचुक यत्न करवेना। म्हणून केलें तें सजेना।
आपला अवगुण जाणवेना। कांहीं केल्या।-दा. १२-२-६

म्हणून,

कष्टी होऊनियां सेखीं। प्रारब्धावरी घालिती॥ १२-२-५

योग वसिष्ठांत थेट याच अर्थाचें वचन आहेः—

सर्वमेवेह हि सदा संसारे रघुनंदन।
सम्यक्प्रयुक्तात्सर्वेण पौरुषात्समवाप्यते॥

म्हणजे, या जगांत योग्य दिशेनें प्रयत्न केला असतां वाटेल ती वस्तु प्राप्त करून घेतां येते, या जगांत प्रयत्नास अशक्य अशी कोणतीच वस्तु नाहीं, लहान मोठा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे असें श्रीसमर्थांनीं कितीदां तरी सांगितलें आहे. सबंध राष्ट्र आळसांत लोळत असल्याचें व कष्टाला चुकावीत असल्याचें श्रीसमर्थ आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहात होते. असल्या मृत समाजाला त्यांना जागृत करावयाचें होतें. म्हणून हताश होऊन बसलेल्या व कांहीं सुचत नाहीं, आतां काय करूं म्हणून निराश झालेल्या राष्ट्राला, त्यांनीं,

लहान थोर काम कांहीं। केल्या वेगळें होत नाहीं।
करंट्या सावध पाही। सदैव होसी॥ दा. १२-९-६

असा, कांहीं तरी, आपल्या अल्पस्वल्प शक्तीप्रमाणें, प्रत्यहीं करीत जा, असा प्रत्येकास संदेश दिला, तसेंच उदंड कष्ट करण्याची शक्ति अंगीं असेल, तर ब्रह्मांडाला हि तुम्हाला गवसणी घालण्याचें सामर्थ्य प्राप्त होईल असें हि सांगितलें,

घालूनि अकलेचा पवाड। व्हावें ब्रह्मांडाहून जाड।
तेथें कैचें आणिलें द्वाड। करंटपण॥ दा. १२-९-२९
'लहान थोर काम कांहीं। केल्या वेगळें होत नाहीं'

हा संदेश याच कालांत जनतेस विद्यमान पुढाऱ्यांनीं दिला आहे ना? त्याची वाट आपण कशी लावली व लावीत आहोंत याचा विचार विचारवंतांनीं व आक्षेपकांनीं करावयास नको काय?

अशा या प्रयत्नाला श्रीसमर्थांनीं जें 'देवत्व' दिलें आहे, तें मात्र आजवर कोणी दिल्याचें दिसत नाहीं. 'यत्न तो देव जाणावा' असें म्हणणारे श्रीसमर्थ

पहिलेच. आपापल्या परीनें ज्यानें त्यानें ‘यत्नांची स्तुति केली आहे खरी, पण ती श्रीसमर्थांनीं केलेल्या स्तुतीपुढें अगदींच फिकी पडत्ये. त्यांनीं यत्नाला देवत्व कोणत्या कारणास्तव दिलें असलें पाहिजे, हें ‘त्यांच्या, उद्योग आधीं का प्रारब्ध आधीं’ या प्रश्नाची चर्चा ज्या १२ व्या ओंवी शतकांत केली आहे त्यांत सांपडतें. प्रारब्धापेक्षां यत्न श्रेष्ठ. कां, तर,

आहे निराकार निर्मळ निश्चळ। तेथूनी चंचळ प्रेत्न जाला॥
प्रेत्न जाला आधीं ह्मणोनियां थोर। प्रारब्ध विचार ऐलीकडे॥
ऐलीकडे कर्म पाहतां भूतळीं। प्रेत्न अंतराळीं मूळारंभ॥

प्रारब्धापेक्षां प्रयत्न श्रेष्ठ कां तर ब्रह्माच्या ठिकाणीं जें पहिलें स्फुरण झालें तो प्रयत्न. तो आधीं झाला म्हणून तो प्रारब्धापेक्षां श्रेष्ठ अशी ही श्रीसमर्थांची विचारसरणी आहे. या ठिकाणीं वाचकांचें लक्ष आह्मी एका प्रश्नाकडे वेधूं इच्छितों. ‘अंतरात्म्याची व्याख्या श्रीसमर्थांनीं

मुळीं मुळींचें स्फुरण। तेंचि अन्तरात्म्याचें लक्षण॥ दा. १६–७–४

अशी केली आहे. ब्रह्माचे ठिकाणीं जी पहिली चेतना वा स्फुरण तो च अन्तरात्मा, असा या ओव्यर्धाचा अर्थ आहे. या वरून अन्तरात्मा=प्रयत्न असें समीकरण संभवतें. कारण प्रयत्न हि ब्रह्माच्या ठिकाणचें पहिलें स्फुरण असल्याचें आपण वर पाहिलें च आहे. आतां श्रीसमर्थ अन्तरात्म्याला च देवांचा देव म्हणतात. तेव्हां यत्नाला च त्यांनीं ‘देव’ म्हटलें आहे, तें बरोबर च ठरत आहे व तें ओघानें च प्राप्त होत आहे. प्रयत्नवादाला श्रीसमर्थ येवढें महत्त्व कां देतात, तें आतां वाचकांच्या ध्यानांत चांगल्या रीतीनें ठसलें असेल असें वाटतें. प्रयत्नवादासंबंधींचें हें विशिष्ट प्रकारचें प्रतिपादन प्राचीन ग्रन्थांत दिसून येत नाहीं. तो श्रीसमर्थांचा विशेष होय. यांत च त्यांचें समर्थत्व दिसून येतें.

१७ व्या शतकांतील श्रीसमर्थांची सामाजिक कामगिरी २० व्या शतकांतील सुधारकाग्रणी म्हणविणारांस लाजवील अशी च आहे. विशेषत: स्त्रियांच्या सुधारणे-बाबत श्रीसमर्थांइतकी अघाडी दुसऱ्या कोणीं च आजवर मारलेली नाहीं. नाहीं म्हणावयास स्वामी विवेकानन्दांनीं या संबंधीं कांहीं थोडें कार्य केलें आहे, पण मौज अशी आहे कीं स्वामीजींच्या स्त्रीशिष्यांत नांव घेण्याजोगी भारतीय स्त्री एक हि नाहीं. याच्या उलट प्रकार श्रीसमर्थांच्या शिष्यिणींचा आहे. या कार्यास प्रारंभ श्रीसमर्थांच्या पूर्वी तीनशें वर्षें श्रीज्ञानेश्वरांनीं चालू केला होता हें खरें आहे. पण एका श्री मुक्ताबाई व्यतिरिक्त व श्री जनाबाई व्यतिरिक्त नांव घेण्याजोगी एक हि स्त्री संत, नंतरच्या ३००।३५० वर्षांत झालेली दिसून येत नाहीं.

'प्रतापां' त तेरा स्त्री महंतांचीं नावें आहेत. पैकीं श्री वेणाबाई, श्री अंबिकाबाई, श्री आक्काबाई व श्री वेणाबाईच्या शिष्यिणी बयाबाई या सर्व मोठ्या योग्यतेच्या उच्च कोटीच्या ब्रह्मवादिनी होत्या. उत्तम स्त्री काव्यग्रंथकार या नात्यानें श्री वेणाबाईच्या तोडीची स्त्री अजून कोणी झालेली नाहीं, असें म्हटल्यास तें सत्यास सोडून होणार नाहीं.

स्त्रियांत ब्रह्मवादिनी होण्याचें भाग्य फार थोड्यांच्या च वाट्याला आलेलें आहे. औपनिषदिक व पौराणिक कालांतील ब्रह्मवादिनींची मिळून बेरीज केली तरी एकट्या श्रीसमर्थांच्या ब्रह्मवादिनी शिष्यिणीच्या बेरजे इतकी ती भरणार नाहीं असा अभूतपूर्व चमत्कार श्रीसमर्थांनीं करून दाखविला. याचा सरळ अर्थ असा कीं, राष्ट्रकार्यांत, मग तें राजकीय, धार्मिक व सामाजिक असो, योग्य अवसर व परिस्थिति दिल्यास व योग्य मार्गदर्शकत्व मिळाल्यास स्त्रियांस हि समाजकार्य करतां येतें, तें पुरुषांच्या तोडीनें करतां येतें, हें राष्ट्राला श्रीसमर्थांनीं इतिहासांत पहिल्यानें च शिकविलें. स्त्रिया आणि त्या महंती करितात, ही सनातन धर्मांत अपूर्व व 'कधीं देखिलें ना ऐकिलें' या सदरांत येणारी गोष्ट होती. पण श्रीसमर्थांनीं श्रीवेणाबाई, अंबिकाबाई या दोघांस मठपति करून, ती हि सत्य सृष्टींतील घटना आहे असा अपूर्व चमत्कार जगास दाखविला, या शिकवणी वरून आधुनिकांनीं योग्य तो बोध घ्यावा.

मृत राष्ट्रास ज्यांनीं जिवंत केलें, त्यांनीं सामाजिक कार्य अमुक केलें व तमुक केलें, म्हणून सांगणें, ह्यांत स्वारस्य तरी काय ? आपल्या संजीवनी मन्त्रांनीं त्यांनीं प्रत्येक व्यक्तीस आपल्या स्वत्वाची जाणीव करून दिली, प्रत्येकास तूं मुक्त आहेस असें सांगितलें व त्याचें अज्ञानपटल दूर केलें,

कोणासी च नाहीं बंधन। भ्रांतीस्तव भुलले जन। ९-६-५७

असा संदेश दिला. श्रीसमर्थांनीं कार्यास प्रारंभ करण्यापूर्वी बहुजन समाज होता कसा व तें कार्य संपल्यानंतर तो कसा झाला याचें सुंदर वर्णन उद्धवांच्या त्या प्रसिद्ध अभंगांत आहे,

पाषाणीं अवेव नाना कमाविले।
तैसे लोक केले समर्थांही॥
काष्टीं हि अवेव नाना कमाविले।
तैसे लोक केले समर्थांही॥
धातूला अवेव नाना कमाविले।
तैसे लोक केले समर्थांहीं॥

लोक हि पाषाण जडजीवं जाण।
कमाऊनी पूर्ण नीट केले ॥
आम्ही हि पाषाण श्रींनीं कमाविलों ।
शिवराम जालों पावन चि॥

श्रीसमर्थांच्या कार्याचें वर्णन यापेक्षां सरस रीतीनें करण्याची आमची शक्ति नाहीं.

अशा रीतीनें श्रीसमर्थांच्या शिकवणींपैकीं ६।७ धड्यांचेंच विवरण करण्याचा अल्पसा प्रयत्न यथामति वर करण्यांत आला आहे. अजून कितीतरी शिकवणी राहिल्या आहेत. श्रीसमर्थांची ती अखंड सावधानता, त्यांची दूरदृष्टी, चाळणा, एकांत, त्यांचें नेमस्तपण, राजकारणपर शिकवण, महंतांस घालून दिलेले वागण्याचे नियम इत्यादि अनेक शिकवणींची चर्चा राहिली आहे. त्यांनीं राष्ट्रास वेळोवेळीं दिलेले हे धडे आहेत. हजारों शिष्यांकरवीं या शिकवणींचा त्यावेळीं प्रचार करण्यांत आला व त्यामुळें सबंध राष्ट्र आपल्या कर्तव्याला जागलें.

जी गोष्ट तीनशें वर्षांपूर्वीं झाली, ती आज होणें शक्य आहे. कारण देशाची परिस्थिति पूर्वींची च जवळजवळ आज हि आहे. महाराष्ट्रानें या गोष्टीचा विचार करण्यांत आतां व्यर्थ कालापव्यय करण्यांत अर्थ नाहीं. आधीं च बरा च काल फुकट गेला आहे. आतां त्यानें सावध होऊन स्वकर्तव्योन्मुख व्हावें हें राष्ट्राच्या सद्यःस्थितींत अत्यंत हितावह आहे.

श्रीसमर्थांच्या आक्षेपकांस अशी नम्र प्रार्थना आहे कीं, त्यांनीं श्रीसमर्थांचे ग्रन्थ, त्यांच्या चरित्रांतील प्रत्येक कृति यांचा शांतपणानें विचार करावा. हल्लींची परिस्थिति लक्षांत घ्यावी. म्हणजे, आम्ही वर प्रतिपादिल्याप्रमाणें, त्यांच्या ध्यानांत येईल कीं, श्रीसमर्थांची शिकवण तीनशें वर्षांपूर्वीं इतकी च आज हि ताजी आहे, तितकी च उपयोगी पडणारी आहे, ती जीर्ण म्हणून टाकाऊ झाली नसून तिचा त्या वेळचा जोम व तेज अजून हि पूर्ववत् कायम आहे व ती राष्ट्रास पुनश्च कार्यक्षम करण्यास समर्थ आहे.

श्रीसमर्थचरणीं नम्र प्रार्थना शेवटीं अशी कीं,

समर्थीं पूर्वीं प्रार्थिलें होतें । प्रतापगडीं भवानीतें ।
तुझा राजा आह्मां देखतें । तूं चि सत्वरी वाढवी गे ॥

आह्मीं हि तें चि मागणें । आपणांसी याचितों या चि कारणें ।
नशीबीं येत दुःख भोगणें । यथा पूर्व प्रकारें ॥

तरी धांव धांव गा श्रीसमर्थराया । सवें घेऊन येणें श्रीशिवराया ।
उद्धरावया भारतभूसि या । परदास्यपंकी रुतली जे ॥

करावें अज्ञानखंडण । करवावें सन्मार्गदर्शन ।
जेणें योगें समाधान । संपूर्ण राष्ट्र पावेल ॥

( ९ )

# रामदासांचा उपदेश व उद्योग
# महाराष्ट्रराज्याला विघातक ठरला काय ?

( लेखक — प्रो. त्र्यंबक शंकर शेजवलकर, एम्. ए., पुणें )

समर्थ रामदासांच्या उपदेशाचा वा उद्योगाचा उद्देश इतर साधुसंतकवींप्रमाणें परमार्थप्रवण व नीतिपर होता, कीं त्याहून विशेष असें कांहीं या सज्जनगडनिवासी महंतांत होतें, याबाबत महाराष्ट्रांत फार काळ दोन मतें प्रचलित असलेलीं सर्वांना ठाऊक आहेत. पण दासांचें वैशिष्ट्य मान्य करून त्यांच्या कार्याचा पारंपरिक परिणाम अंतीं शिवकालीन महाराष्ट्राच्या राष्ट्र-धर्मप्रवण चळवळीस निराळ्या मार्गावर नेऊन सोडण्यांत झाला, असें नवीन मत प्रतिपादन करण्याचा मान अंधेरीच्या इस्मायल कॉलेजांतील कुशाग्रबुद्धि प्राध्यापक श्री. व्ही. व्ही. जोशी यांनी संपादिला आहे. प्रा. जोशी यांनीं रानड्यांच्या चाळीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथानंतर या विषयावर इंग्रजींत एतद्विषयक विचार मांडण्याचें साहस करून 'तीन साम्राज्यांचा संघर्ष' नामक ग्रंथ दोन वर्षांपूर्वी वाचकांच्या हातीं दिला. या ग्रंथांतील विवेचन मराठी वाचकांना प्रायः नवीन वाटण्यासारखें नाहीं. पण विषयाची मांडणी त्यांनी सोपपत्तिक, सुस्पष्ट व आकर्षक इंग्रजींत केली आहे यांत संशय नाहीं. त्यामुळें निवळ मराठी च जाणणाऱ्या वाचकांची आजवर सोय झाली होती तशी सोय त्यांनीं इंग्रजी भाषेंतून अभ्यास करणाऱ्या इतिहासप्रेमी जनतेची केली आहे. यूरोपीय राजनीतीशीं व ऐतिहासिक तत्त्वज्ञानाशीं श्री. जोशांचा चांगला च परिचय असल्यामुळें त्यांच्या विषयविवेचनाचें स्वरूप वैचारिक दृष्ट्या सहज च अद्ययावत् झालें आहे. पण त्यांत वाईट एवढें च कीं, महाराष्ट्रभाषाभिज्ञ असून हि जोशांनीं मराठींतील मूलभूत इतिहाससाहित्याचा जरूर तेवढा परिचय करून घेतला नाहीं. अर्धवट परिचय हा क्वचित् अज्ञानापेक्षांहि उपद्रवकारक ठरतो तसें येथें झालें आहे. ज्याला एखाद्या विषयावर स्वतंत्र मत बनवावयाची इच्छा असेल त्यानें सर्व मूलभूत साहित्य स्वतः च अभ्यासिलें पाहिजे, बाबावाक्य प्रमाण धरून भागणार नाहीं. बरें बाबावाक्यांचा आप्तवचन म्हणून उपयोग करावयाचा तर तें सामग्र्यानें मूलाशीं पारखून घेतलें पाहिजे. इतका आटोप ज्यास नसेल त्यानें मौन धारण करणें हें च समाजाच्या हिताचें आहे. पण ही कठोर मर्यादा महत्त्वाकांक्षी स्वमतप्रतिपादक माणसें क्वचित च

पाळतांना आढळून येतात. त्यामुळें च अनेक वादांचे वितंडवाद होऊन संशय तुटणें ही जी वादांची अवश्य फलश्रुति, ती कधीं च लाभत नाहीं. इतिहासाचार्य राजवाड्यांनीं वेळोवेळीं अनेक विषयांवरील आपलीं मतें त्या त्या काळीं त्यांसमोर असणाऱ्या (अ)संपूर्ण साहित्याच्या आधारावर हृदयभेद करणाऱ्या आवेशानें मांडलीं. कोणा हि इतर महापुरुषाप्रमाणें त्यांच्या जीवनविषयक व शास्त्रविषयक मतांची छाया सहज च त्यांच्या विषयप्रतिपादनावर पडलेली दिसून येते. अर्थात् त्यांचीं मतें ग्रहण करतांना व आधार म्हणून उपयोगांत आणतांना त्यांना जरूर तेथें छेद देण्याची आवश्यता असते. तसें च त्यांच्या पश्चात् आतां त्यांचें मत आधार म्हणून द्यावयाचें तर तें एक ठिकाणच्या विवेचनावर अवलंबून चालणार नाहीं. त्यांच्या समग्र उपलब्ध लिखाणाचा समन्वय केला पाहिजे. इतकें हि करून पुरें होत नाहीं. त्यांच्या वैयक्तिक पद्धतीचाहि विचार करावा लागतो. राजवाड्यांची रीत अशी कीं, एकदां एका विषयांत विमज्जन करून त्यावर एकदम ठणठणीत मत देऊन मोकळें व्हावयाचें, पुनः त्या विषयाकडे सहसा वळावयाचें नाहीं. मग त्यांची बुद्धि दुसऱ्याच विषयावर केंद्रित व्हावयाची. त्यामुळें स्वतःचें मत बदलण्याचा प्रसंगच त्यांवर यावज्जीव आला नाहीं. एकदा शिवाजीच्या जन्मतीथीचा त्यांनीं विचार करून आपलें म्हणणें मांडलें, दुसऱ्या तिथीचा विषय त्यांनीं पुनः हाताळला नाहीं. एकदां गोविंदपंत बुंदेल्याला त्यांनी नरकांत ढकलून दिलें, पुनः स्वतः च त्याचीं पत्रें प्रसिद्ध करून हि त्याचा पुनर्विचार त्यांनीं केला नाहीं. अशीच त्यांची कार्यपद्धति होती. त्यामुळें त्यांनीं एकदां कांहीं लिहिलें म्हणजे तेंच त्यांचें त्या विषयावरील अंतिम मत, असें म्हणणें हि मुष्किलीचें होतें. आपल्या ढोबळ चुका हि त्यांनीं दुरुस्त केलेल्या आढळत नाहींत. मात्र याचा अर्थ त्यांचीं मतें बदलत नसत असा हि नव्हे. सूक्ष्मदृष्टि वाचकाला त्यांच्या विचारांतील क्रांति सहज अजमावून पहातां येते. समर्थ रामदासांवर ग्रंथमालेंत लिहितांना जे राजवाडे ‘आपला हा समाज हजारों वर्षें चातुर्वर्ण्यघटित आहे व हें चातुर्वर्ण्य असेंच किती सहस्रें राहील याचा अंदाज होत नाहीं’ असें म्हणतात, तेच राधामाधवविलासचंपूच्या अखेरीस ‘चातुर्वर्ण्य व जाति अनादि नाहींत...... वर्णभेदाचें आतां कारण उरलें नाहीं...... जातिभेदाची मातब्बरी वृत्तिदृष्ट्या राहिली नाहीं...... वर्णांचें व जातींचें समाजरचनेंत जें कार्य व्हावयाचें तें बरेंच होऊन चुकलें आहे.’ असेंहि म्हणतांना आढळतात. इतरत्र सश्रद्ध आस्तिक्यबुद्धि दाखविणारे राजवाडे महिकावतीच्या बखरीच्या प्रस्तावनेंत जवळजवळ कम्यूनिस्ट झालेले भासतात. राजवाड्यांच्या चाहत्या स्नेह्यांचीहि त्यांच्या मताबाबत केवढी धांदल उडालेली होती हें पहाणें असेल त्यानें कै. ना. कृ. गद्रे यांनीं राजवाड्यांवर चित्रमय जगतांत (१९२७) मृत्यूनंतर लिहिलेला लेख वाचावा.

हें येवढें विवेचन येथें करण्याचें कारण असें कीं, जोशी राजवाड्यांच्या रामदासांवरील लेखामुळें चुकीच्या मार्गावर पाऊल ठेवते झाले आहेत; त्यांचें आनुषंगिक विवेचन प्रधान समजून समर्थांच्या कार्याबद्दल चुकीची समजूत करून बसले आहेत; ज्या ऐतिहासिक घटनेंत दासांचा बिलकुल हात नाहीं त्याबद्दल त्यांवर आरोप करतांना दिसत आहेत; मराठ्यांच्या ध्येयाबद्दल चुकीची समजूत करून घेऊन नंतर त्यांच्या इतिहासाची सरणी लावूं पहात आहेत.

आपल्या ग्रंथाच्या ऐशीं ते ब्यायशीं पानांवर श्री. जोशी रामदासांवर पुढील आरोप करतात. हा आरोप मराठशाहींत अठराव्या शतकांत झालेल्या परिवर्तनाबावत आहे. आरोप असा कीं, "रामदास **हेहि अप्रत्यक्षपणें** मराठ्यांच्या धार्मिक-राष्ट्रीय चळवळीचें **अराष्ट्रीयकरण** होण्याबद्दल जबाबदार धरले पाहिजेत-त्यांच्या चळवळीमुळें व संघटनेमुळें मराठ्यांनी पुढें ( पेशवाईत ) हिंदुपदपातशाहीचें राजकीय ध्येय पत्करलें. रामदासांच्या उद्योगाला तात्काळ असें फळ धरलें नाहीं, पण बाजिरावाच्या काळापर्यंत या ध्येयांत त्या उद्योगाची परिणति झाली. इतर संतसुधारकांच्या सामाजिक धार्मिक सुधारणेविरुद्ध यांचा खटाटोप होता. त्यांचा चातुर्वर्ण्याच्या न्याय्यत्वावर सश्रद्ध विश्वास होता. ब्राह्मणांचें महत्त्व कमी होणें त्यांस रुचत नव्हतें. समर्थ हे मराठ्यांच्या राष्ट्रीय चळवळीचे महान् राजकीय क्रांतिकारक उपदेशक नसून उच्च सुशिक्षित ब्राह्मणांच्या प्रतिक्रांतिकारी चळवळीचे पुढारी होते........मराठ्यांच्या शेतकरी-राज्याचें अधिपतित्व शिवाजीच्या वंशजांकडून उच्च जातीय पेशव्यांकडे गेलें ही वरवरची ब्राह्मणी हातचलाखी नसून तो रामदासांच्या तत्त्वांचा अंतिम विजय होता. यामुळेंच मराठ्यांचें मूळचें ध्येय बाजूस राहून त्यांच्या राष्ट्रीय चळवळीस निराळें अनिष्ट वळण लागलें. पण 'हिंदु हिंदुस्थान'च्या ध्येयास हिंदुराष्ट्रभावनेचें अखिल भारतीय अधिष्ठान नसल्यामुळें पेशव्यांचे प्रयत्न विफल झाले."

श्री. जोशांच्या या लिखाणांत अज्ञान आहे, भ्रम आहे, कार्यकारणसंबंध लावण्यांत गलत आहे, तर्कदुष्टता तर आहेच आहे. पेशव्यांचे प्रयत्न हिंदुराष्ट्रभावना अखिल भारतांत रुजली नसल्यामुळें विफल झाले हें खरें, पण त्यांचे मार्ग अशी राष्ट्रभावना निर्माण करण्यास समर्थ न ठरल्यामुळें च ते गडगडले. मराठ्यांचें-शिवकालीन मराठ्यांचें हि-ध्येय हिंदुपदपातशाही हेंच होतें, पण याचा अर्थ सर्व हिंदुस्थानांत तें एकदम सुरू करण्याचा मार्ग त्यांनीं अवलंबिला असें नव्हे. आपल्या शक्तीस झेपेल तेवढें च कार्य त्यांनीं आरंभिलें. रामदासांचा उपदेश 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा॥' असा होता, 'हिंदु तितुका मेळवावा। हिंदु धर्म वाढवावा॥' असें असल्याचें कोणाच्या वाचनांत नाहीं. अशी स्थिति

विद्यमान असतां रामदासांच्या खटाटोपाची परिणति बाजिरावकाळीं हिंदुपदपातशाहींत झाली असें कसें म्हणतां येईल? शिवाजीचा हेतु मराठियांचें गोमटें करून महाराष्ट्रधर्म राखण्याचा होता, त्याच कार्याची दुंदुभि दासांनीं वाजविली, मग त्यांच्या कार्यांत भेद कोठून निर्माण होईल? दासांवर टीका च करावयाची तर त्यांचें ध्येय महाराष्ट्रापुरतें संकुचित असल्याबद्दल कदाचित् करतां येईल, पण जोशी उलटच लिहितांना दिसतात.

याबाबत खरी स्थिति अशी आहे कीं शिवकालीन मराठ्यांचें हि ध्येय यवनाक्रांत अखिल भारताला सोडविण्याचें व हिंदुधर्माची पुनः माननीय पदावर स्थापना करून त्याला राज्याचा मुख्य धर्म (स्टेट रिलिजन्) बनविण्याचें होतें. या हेतूच्या सिध्यर्थ्य च त्यांना प्रथम हिंदु छत्रपतीचें एकछत्री राज्य निर्माण करणें भाग होतें. तें त्यांनीं सन १६७४ सालींच सिद्ध करून जगजाहीर केलें. शिवाजीच्या व रामदासांच्या ध्येयांची व मार्गांची उत्तम माहिती व्यक्तिशः असणारा माणूस रामचंद्रपंत अमात्यांएवढा दुसरा नाहीं ही गोष्ट आतां सर्वमान्य आहे. कारण त्याचा सन १६६८ पासून मरेपर्यंत मराठी राज्याशीं संबंध होता व तो स्वतः रामदासी होता. तो आपल्या राजनीतींत 'स्वामी हिंदुराज्यकार्यधुरंधर राज्याभिवृद्धिकर्ते' असेंच राजारामाच्या कार्याचें वर्णन करतांना म्हणतो, नर्मदेच्या उत्तरेस जाऊन आणि सिंधापासून बंगाल्यापर्यंत सर्व मोगली सुभे काबीज करण्याची वार्ता सांगतो व या सर्व कार्याचा कळस म्हणून 'वाराणसीस जाऊन स्वामी विश्वेश्वरस्थापना करतात तावत्कालपर्यंत' वाट पहाण्याचा उपदेश करतांना आढळतो. पंतांचें हें लिखाण शिवकालीन मराठ्यांचें रामदासाच्या उपदेशानें स्थिर झालेलें अंतिम ध्येय उत्तम रीतीनें मांडून दाखवितें. हा पुरावा असतां जोशांचें विधान कोण खरें मानील? बाजिरावाला हें ध्येय माहीत होतें, पण दुर्दैवानें शिवकालीन रामदासी परंपरागत मार्ग ठाऊक नव्हते. त्यामुळेंच त्याचे हेतु विफल झाले. रामदासांचा उपदेश पचवून आचरणांत आणणारा माणूस अयशस्वी होणार च नाहीं. दासांच्या सावधानतेची व संघटणेची परंपरा लुप्त झाल्यानेंच पेशवाई बुडाली. पण हा स्वतंत्र मुद्दा आहे. दासांच्या चळवळीचा व संघटणेचा तो परिणाम नसून त्या दोहोंच्या अभावाचा आहे. कार्यकारणभावाची येथें जोशांनीं गलत केली आहे.

इतर संतसुधारकांच्या विरुद्ध दासांचा उद्योग होता हा मुद्दा आतां पाहूं. दास हे इतर संतकवीप्रमाणें केवळ नीतिधर्मपर उपदेशक नसून दंडनीतीच्या जोरावर नीति व धर्म प्रचलित करणारें स्वतंत्र हिंदुराज्य हि त्यांना पाहिजे होतें हें राजवाड्यांनीं आपल्या निबंधांत उत्तम रीतीनें दाखवून दिलें आहे व आम्ही समजतों कीं जोशांनाहि तें मान्य आहे. जर हें ध्येय अमान्य नसेल तर तें सिद्ध

करण्याची योजनाहि मान्य करणें भाग आहे. दासांच्या वेळीं खरा हिंदुधर्म फक्त ब्राह्मणांत मरतझुरत अवशिष्ट होता. त्याचें पुनरुज्जीवन करून त्याला पूर्वपदावर आणावयाचें तर स्वकर्मच्युत पतित ब्राह्मणांचा उद्धार अवश्य होता. त्यामुळें दासांनीं आपलें लिखाण मुख्यतः ब्राह्मणांना उद्देशून लिहिलें आहे. याच लोकांनीं नीतिधर्मप्रवण होऊन नवीन धर्मराज्याचा पुकार करावा, ब्राह्मणाचें एक कर्तव्य अध्ययन तेवढें च करून मुखस्तंभ न बसतां दुसरें अध्यापनाचें लुप्त कर्तव्य हि नवीन घटनेस पोषक अशा रीतीनें करण्यास सज्ज व समर्थ व्हावें, या हेतूनें रामदासांनीं आपल्या वाणीचा सपाटा सुरू केला. केवळ भक्तीच्या बळावर कदाचित् नीतिधर्मतत्पर होतां येईल, पण ज्याला राज्यस्थापनेसाठीं समाजसंघटण घडवून आणावयाचें, त्याला केवळ पंढरीरायाला आळवून भागणार नाहीं. त्याला प्रथम शास्त्रज्ञानानें स्वतःला पूत करून घेऊन कर्मकौशल संपादन केलें पाहिजे. यांनीं समर्थ बनल्यानंतर तो कार्यकर्ता महंत होऊन सर्व जनास शिकवून त्यांचे समुदाय थाटून त्यांना इष्ट त्या कामाला लावूं शकेल. दासांनीं आपल्या उद्योगानें महाराष्ट्रांत असा वर्ग निर्माण करून तो जरूर तिकडे पेरून दिला. त्याचा सदुपयोग झाला हें शिवकालांतील कर्तबगारीनें ऐतिहासिक दृष्ट्या सिद्ध झालेलें आहे. इतर संतांच्या पद्धतीचा एक दोष असा होता कीं, त्यांच्या घोळक्यांत अज्ञहि येऊन बसूं शके. रामदासांच्या गटांत गबाळ सामावणें शक्य नव्हतें. जर संघटनेंत गबाळ शिरला तर ती संघटणा मोडली च समजावी. एतदर्थ दासांना एकजिनसी समाज निर्माण करण्याची आवश्यकता भासली व तो त्यांना तत्कालीन समाजपरिस्थितींत ब्राह्मणांतून निवडलेल्या माणसांचा मुख्यतः बनवावा लागला. यांत तत्त्वाचा मुद्दा नसून व्यवहार साधण्याचा मार्ग होता. रामदासांच्या एतद्विषयक थोड्या उद्गारांनीं बिचकून चुकीचें अनुमान काढणें तर्कदुष्ट ठरेल. श्री. जोशांनीं या प्रकरणीं राजवाड्यांचा मुख्य आधार दिला आहे. आरंभीं सांगितल्याप्रमाणें राजवाड्यांना १९०३ सालीं चातुर्वर्ण्य हजारों वर्षें रहाणार व रहावें असें वाटत होतें. यूरोपीय लोकांनाहि साम्यवादी व समाजवादी विचारसरणी सोडून पुढेंमागें चातुर्वर्ण्याचा च अवलंब करावा लागेल असें त्यांच्या दूरदृष्टीला तेव्हां वाटत होतें. त्यामुळें त्यांनीं दासांच्या या विशेषावर जास्त जोर दिलेला आढळतो. जर राजवाडे १९२३ सालीं हा विषय मांडते, तर त्यांनीं या विषयावर बहुधा कांहीं लिहिलें च नसतें, इतकीं त्यांचीं मतें बदललीं होतीं. पण राजवाडे एकदां चुकले म्हणून जोशांनीं चाळीस वर्षांनंतर चुकावें असें नाहीं. समर्थांना शास्त्रीय दृष्ट्या समता मान्य नव्हती, ते उच्चनीच मानीत, हें खरें आहे. पण सत्यजगतांत च पूर्ण वा खरी समता जेथें सृष्टींत कोठेंच नाहीं, तेथें दासांवर चुकीचें मत ग्रहण न केल्याबद्दल

आरोप कसा करतां येईल? जगांत कोणतींहि दोन माणसें सम नाहींत, दोन उच्च वर्ग हि सम नाहींत, तेथें 'भेद ईश्वर करून गेला' हें म्हणण्यांत दोष कोणता? सर्वांत चांगले गुण भरून त्यांना सम करण्याचा प्रयत्न करूं नये असें समर्थांनीं कोठें म्हटलें आहे? 'अधिकार पाहोन कार्य सांगावें,' केवळ 'मागासलेला' या शिफारसीवर कोणावर विश्वासून काम सांगूं नये, असें समर्थांनीं म्हटलें तर तें अशास्त्रीय कीं शास्त्रशुद्ध? समर्थांचा उच्चनीच भाव ब्राह्मण या जातीच्या गुणावर मोठ्या पगाराच्या जागा लाटण्यासाठीं नसून सच्चें गुरुत्व गुणाधिकाराच्या अधिष्ठानावर स्थापन करण्यासाठीं होता. कष्ट करून, प्रयत्न करून, सकळांना राजी राखून, 'उंच नीच न म्हणतां' सकळांचें हृदय निववून, 'वेड्यास वेडेंहि न म्हणतां' वा कोणाचें 'वर्म स्वमुखानें कदापि न उच्चारतां' सर्वांना बरोबर घेऊन कार्यसंपादन करण्यासाठीं होता. लोकांपुढें मिरवण्याची सुद्धां त्यांच्या पंथांत मोकळीक नव्हती. एकांतांत, गुप्तपणें, उगाच मचमच न करतां, कार्य मात्र घडवून आणण्यावर त्यांचा कटाक्ष होता. बरें दासांचें मत वा उपदेश कसा हि असो, त्याचा परिणाम काय झालेला दिसतो? 'ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा धरूं पहातो' असें गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजी च लिहितांना आढळत नाहीं काय? प्रो. जोशांचें 'शेतकरी–राज्य' महाराष्ट्रांत स्थापन करणारा शिवाजी सेनापतीखेरीज बाकीचे सात प्रधान ब्राह्मण च कां नेमतो? मागासलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या पदावर कां आणीत नाहीं? वैयक्तिक भीड एखाद दुसऱ्या जागेला बाधली असली, तरी इतर जागांवर त्याला मराठा आणून बसवावेंसें कां वाटलें नाहीं? लाखों होन शिवाजीनें राज्याभिषेकसमयीं ब्राह्मणभोजनांत कां घालविले? केवळ अंधश्रद्ध म्हणून? येथें जर एखाद्यानें तर्क केला कीं, शिवाजीला या ब्राह्मणांत च समाजकार्य साधणारे अल्पसंतुष्ट पण दीर्घकष्टाळु लोक आढळले, तर तो चुकीचा म्हणतां येईल काय? खरी स्थिति अशी कीं, शिवाजी जातधर्म, आपपर, उच्चनीच, कांहींहि न मानतां 'अधिकार' पाहून प्रत्येकाकडून काम घेत होता आणि रामदासहि त्याला तें च करावयास शिकवीत होता. शिवकालीं राष्ट्रीय नितिमत्ता वाढली होती, महाराष्ट्रधर्माचा अभिमान रुजला होता, छत्रपतींचें एकमेव शासन सर्व मानीत होते, म्हणून मराठे औरंगजेबाच्या प्रलयांतून वांचले. सर्व क्षेत्रांत पहिल्या दर्जाचीं माणसें पुढें आलीं व त्यांनीं महाराष्ट्राचा उज्वल इतिहास लिहिला. दासांच्या व शिवाजीच्या मागें त्यांनीं निर्माण केलेलीं व निवडलेलीं अधिकारी माणसें जिवंत होतीं तोंवर सर्व ठीक चाललें. पण मागाहून रामदासी संघटणा मोडली, उपदेश विसरला गेला. राज्याभिमान जाऊन अधिकारलालसा निर्माण झाली, धर्माभिमान जाऊन सुखलोलुपता आली, राष्ट्रीय नीतिमत्तेचें खोबरें

होऊन समाजांत बाचाबाची सुरू झाली, आणि त्यामुळें अखेरीस सर्वच ग्रंथ आटोपला. त्याला रामदासांचा उपदेश वा उद्योग कारणीभूत झाला नसून त्यांच्या उपदेशाचें विस्मरण जबाबदार होतें. ब्रह्मेंद्रस्वामींवर लिहितांना राजवाड्यांनी ( खंड ३ प्रस्तावना ) या प्रकाराची यथास्थित फोड केली आहे. पण प्रो. जोशी समूळ ग्रंथ पाहिल्याविणच चार ओळींवरून बोलणार, त्यांना कोण अडवील?

आपल्या ग्रंथाच्या एकशें एक पृष्ठावर प्रो. जोशी मराठ्यांना संस्कृतीचा नवीन धागा वळण्याच्या दृष्टीनें स्वतंत्र व विधायक असे कांहीं महाराष्ट्राच्या किंवा हिंदुस्थानच्या उपयोगासाठीं निर्मितां आलें नाहीं अशी रास्त टीका करतात. महाराष्ट्रांतील चळवळीच्या आरंभीं तशी आशा निर्माण झाली होती पण पुढें त्या चळवळीची नूतन निर्मितीची प्रतिभा केवळ धार्मिक भावनेंत विलीन झाली अशी त्यांची याबाबत इतिहाससरणी आहे. जर जोशांनीं रामदासी वाङ्मयाचा संपूर्ण अभ्यास केला असता तर त्यांना अशा संस्कृतीचीं बीजें व आराखडा दृग्गोचर होऊं शकला असता. सत्प्रवृत्त प्रयत्नाला देवस्वरूप देणारे रामदास त्यांना दिसले असते. चुकणें म्हणजे च दैत्यत्व समजून संसारांतील चूक हा शब्दच काढून टाकण्यासाठीं जीव शिणविणारे समर्थ त्यांच्या आढळांत येते. आजचें अद्ययावत् तत्त्वज्ञान याहून कोठें पुढें गेलें आहे? रशियांतील साम्यवादी यापेक्षां पुढचें सामाजिक तत्त्वज्ञान कोणतें सांगत आहेत? समाजशास्त्राची सर्व आटापेट समाजांतून चुका काढून टाकून त्यामुळें होणारा अपरंपार वृथा व्यय व शीण नाहींसा करण्यासाठींच आहे ना? मग हें शब्दजंजालांत न शिरतां अज्ञालाहि समजूं शकणाऱ्या बालबोध भाषेंत सांगणारे दास गड्डुयाला हात घालणारे द्रष्टे नव्हत काय? हिंदुस्थानच्या बोकांडीला बसलेला दैववाद व त्याचा मुख्य आधार खोटा देववाद सोडून ‘आचूक यत्न तो देवो’ म्हणणारे; शक्तियुक्ति यांच्या सहाय्यानें नेटका प्रपंच परमार्थासाठींच करावा असें दीर्घ कंठरवानें सांगणारे; फळें, फुलें, सर्व उत्तम खाद्य व इतर भोग्य वस्तु मिळविण्यास सांगून रामाजवळ सदा दे रे राम, दे रे राम म्हणून आक्रोश करणारे समर्थ आजच्या आधिभौतिकवाद्यांपेक्षां कोणत्या दृष्टीनें कमी पडणार आहेत? व्यक्तीनें आपण कष्ट सोसून सर्व चांगल्या गोष्टी मेळवून त्याचा विनियोग मात्र सर्वांसाठीं, समाजासाठीं, करावा असें सांगणारे रामदास आदर्श साम्यवादी नव्हत काय? समर्थांचा महंत साम्यवादी कार्यकर्त्यांच्या वर्गांतला नव्हे काय? कष्ट, यत्न, अचूकपणा सावधानता, ज्ञान, गुप्तपणा, लोकविन्मुखता, संघटण, कार्यप्रसार, राजकारण आणि या सर्वांना अविरोधी व पोषक अशी नीति व धर्म उपदेशिणारे महाराष्ट्रधर्मराजगुरु रामदास राजवाड्यांनीं हेगेलपेक्षांहि सरस तत्त्वज्ञ ठरविले तें चूक काय? त्याच्याहि पुढची पायरी ज्या कार्ल मार्क्स व लेनिन यांची, त्यांच्या हि सूत्र-भाष्यांचा गुणसमुच्चय दासांच्या

उपदेशांत आढळतो. भगवद्गीतेंतील दुर्लक्षिलेल्या 'निराश्रय', 'अनिकेत' इत्यादि विशेषणांनीं दर्शित असा जो कामकरी ऊर्फ कार्यकर्त्यांचा निरुपाधि निष्काम कर्ममार्ग, तो अक्षरशः दरी, घळी यांत वास करून व सदा ज्ञानकर्मासाठीं हिंडत राहून दासांनीं आचरला. स्वःत प्रोलेटरिअट (=अनिकेत कष्टाळु कामकरी) राहून स्थिरमति ऊर्फ स्थितप्रज्ञ होऊन त्यानीं वैयक्तिक दृष्ट्या निष्काम पण समाजदृष्ट्या पूर्ण सकाम असा कर्मयोग आचरून दाखविला. त्यांचा उपदेश दुर्दैवानें खऱ्या अर्थानें समजला गेला नाहीं. तो योग्य भूमींत रुजला नाहीं. त्यांची शिष्यपरंपरा खरोखरी चाललीच नाहीं. स्वतः ते सांगावयास हजर होते तोंवर त्यांचें म्हणणें ऐकून कांहींनीं कार्यें पार पाडलीं. त्यांची कार्यपद्धति आत्मसात केलेल्या थोड्यांनीं त्यांच्या मागें एक पिढी चालविली. पण पुढें ती कार्यप्रणाली लुप्तच झाली. त्यामुळें प्रो. जोशी म्हणतात त्याप्रमाणें मराठ्यांना कांहीं स्वतंत्र विधायक असें निर्मिलेलें दाखविण्यास अवसर मिळाला नाहीं. नाहीं तर शिवशाही ही भारतांत नवीन संस्कृतीची जनक च ठरली असती. पण पेशवाईत एकनाथ (समता), तुकाराम (बंधुता), रामदास (स्वातंत्र्य) यांचा उद्घोष मागें पडून श्रीधर मोरोपंत महीपति यांचा भोळा आणि दुबळा मनोरंजक भक्तिभाव पुढें सरसावला. अखेरीस तर 'तुइं तुइं पुइं पुइं' च्या सुरावर व डफाच्या थापावर चालणारा तमाशाच बोकाळला. अर्थात जगाला महाराष्ट्राचा तमाशा दिसला. पण तो रामदासांच्या उपदेशाचा व उद्योगाचा परिणाम नसून त्याच्या लुप्त होण्याचा स्पष्ट देखावा होता हें निश्चित होय.

---

## ( १० )

# श्रीसमर्थोक्त शिवचरित्र

(लेखक — रा. **अनंतदास रामदासी**, श्रीसमर्थगाथाकार, **गिरड**)

श्री शिवछत्रपतींना उद्देशून लिहिलेलीं अशीं श्रीसमर्थांचीं एकंदर ८ प्रकरणें उपलब्ध आहेत. तीं अशीं (१) शके १५७१ चे वैशाख शु. ८ स अनुग्रहापूर्वीं पाठविलेलें १५ ओंव्यांचें लिखित, (२) अनुग्रहप्रसंगीं सांगितलेला लघुबोध (दा. १३×६), अनुग्रहानंतर उपदेशिलेलीं (३) राजधर्म व (४) क्षत्रियधर्म हीं दोन प्रकरणें, (५) श्रीसमर्थ परळीस असतां तेथें नदीकाठीं सरकारी बागेंत समर्थांसाठीं संध्यामठी बांधावयाची शिवरायांनीं योजना केली, त्या समयीं सांगितलेलें बागप्रकरण, (६) श. १५७७ मन्मथ संवत्सरीं वैशाख शु. २ स शिवाजी महाराज याणीं झोळींत चिठ्ठी टाकली तेव्हां सांगितलेलें 'अखंड सावधान प्रकरण' (७) अफझुलखानाच्या वधानंतरच्या श्रीशिवसमर्थभेटी समयीं झालेलें 'उत्तम पुरुष निरूपण (दा. १८×६) आणि (८) सामनगड शिवरायांनीं बांधला ते समयीं सांगितलेलें 'कारखाने प्रकरण' अशीं हीं आठ प्रकरणें आहेत. या शिवाय स्फुट प्रकरण ३६ मधें (हें प्रकरण श. १६०० चे ज्येष्ठ मासीं 'श्रीदेवीचे दर्शनास स्वामी गेले' त्यावेळीं रचलें आहे)

येकची मागणें आतां। द्यावें तें मजकारणें।
तुझा तूं वाढवी राजा। शीघ्र आह्मांची देखतां॥ १७॥

शिवरायाच्या उत्कर्षास्तव प्रतापगडवासिनीस श्रीसमर्थांनीं केलेलें हें प्रसिद्ध 'मागणें' आहे. यानंतरचें पत्र, ज्यांत शिवरायाचा गौरवयुक्त स्पष्टपणें उल्लेख आहे असें श्रीसमर्थांनीं लिहिलें तें शंभु छत्रपतीस लिहिलें आहे. या पत्राचा लेखनकाल शके १६०३ च्या भाद्रपद ते पौष या दरम्यानचा असावा.

या ९–१० प्रकरणांपैकीं, (२) लघुबोध केवळ परमार्थपर असून 'पांचा भूतांचीं स्वरूपें नाशिवंत व निराकार, आत्मा शाश्वत हा दृढ निर्धार ठेवावा, सत्संगाच्या साह्यानें विवेकद्वारा त्या आत्म्यास ओळखावें आणि कर्ताभोक्ता मी नाहीं हें स्वानुभवानें जाणून आत्मनिवेदनानें त्या परमपुरुष परमेश्वरास मान्य व्हावें' असा त्या प्रकरणाचा सारांश आहे. (५) बाग प्रकरण व (८) कारखाने प्रकरण, हीं प्रकरणें शिवरायास सांगितल्याचा उल्लेख हनुमंत स्वामींचे बखरींत आहे आणि त्यांवरून श्रीसमर्थांची सूक्ष्म अवलोकनशक्ति, व्यापक धारणा, वागणुकीची कडक शिस्त इत्यादिकांचा बोध होत असला तरी शिवचरित्रपर उल्लेख

त्यांत ओझरता हि दिसत नाहीं. (३) राजधर्म (४) क्षात्रधर्म व (६) अखंड सावधान, हीं तीन प्रकरणें श्रीसमर्थांनीं शिवरायास सांगितल्याचा उल्लेख श्री सांप्रदायिक कागदपत्रें--लेखांक ४३ मधें आहे आणि अंतःप्रमाणावरून हि तीं शिवरायास सांगितल्याचें स्पष्ट दिसतें. (७) उत्तमपुरुष निरूपण हें हि शिवरायास च उद्देशून लिहिल्याचें अंतःप्रमाणावरून व हनुमंतस्वामींचे बखरीवरून सिद्ध आहे. ह्या १, ३, ४, ६ व ७ या पांच प्रकरणांत शिवचरित्राबद्दलचे काय काय उल्लेख आहेत तें आतां क्रमशः पाहूं. प्रथम १५७१ च्या लिखिताचा विचार करूं.

## १ लिखित

निश्चयाचा महामेरू। बहुत जनासी आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योग॥ १॥

परोपकाराचिया रासी। उदंड घडती जयासी।
तयाच्या गुणमहत्वासी। तुळणा कैंची॥ २॥

नरपति हयपति गजपति। गडपति भूपति जळपति।
पुरंदर आणि आदिशक्ति। पुष्टीभागीं॥ ३॥

यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत।
पुण्यवंत नीतिवंत। जाणता राजा॥ ४॥

आचारसीळ विचारसीळ। दानसीळ धर्मसीळ।
सर्वज्ञपणें सुसीळ। सकळां ठाईं॥ ५॥

धीर उदार आणि सुंदर। शूर क्रियेसी तत्पर।
सावधपणें नृपवर। तुच्छ केलें॥ ६॥

तीर्थें क्षेत्रें तें मोडिलीं। ब्राह्मणें स्थानभ्रष्ट जालीं।
सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला॥ ७॥

**देवधर्म गोब्राह्मण। करावया संरक्षण।**
**हृदयस्थ झाला नारायण। प्रेरणा केली॥ ८॥**

शूर पंडित पुराणिक। कवेश्वर वैदिक याज्ञिक।
धूर्त तार्किक सभानायक। तुमचा ठाईं॥ ९॥

**या भूमंडळाचा ठाईं। धर्म रक्षी ऐसा नाहीं।**
**महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हां करितां॥ १०॥**

आणिक हि धर्मकृत्यें चालतीं । आश्रित होऊनि कितेक असती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारलीं ॥ ११ ॥

कितेक दुष्ट संहारिला । कितेकांसी धाक सुटला ।
कितेकांसी आश्रयो जाला । शिवकल्याण राजा ॥ १२ ॥

तुमचे देसीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
रुणानुबंधें विस्मरण जालें । काये नेणों ॥ १३॥

सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तयांप्रती ।
धर्मस्थापनेची किर्ती । सांभाळिली पाहिजे ॥ १४ ॥

राजकारण उदंड दाटलें । तेणें चीत विभागलें ।
प्रसंग नस्तां लिहिलें । क्षमा केलें पाहिजे ॥ १९ ॥

या लिखिताच्या पहिल्या ६ ओव्यांत जीं ३२ विशेषणें योजिलीं आहेत, त्यांपैकीं एक हि मिथ्या किंवा अत्युक्तीचें वाटत नाहीं. पुढील ९।१०।११ व १२ ओव्यांकडे पहा. "तुमचे दरबारांत शूर आहेत, तसेंच पंडित, पुराणिक, कवीश्वर, वैदिक व याज्ञिकहि आहेत; धूर्त व तर्ककुशल असे सभानायक म्हणजे समाजाचे नेते तुमच्या पदरीं आहेत. धर्माचें रक्षण करील असा या जगतीतलावर कोणी दिसत नाहीं; महाराष्ट्रधर्म कांहीं जिवंत उरला असेल तर तो तुमच्या प्रयत्नांमुळें. तुम्ही च आतां त्याला वांचवाल तर तो वांचेल. साधुपरित्राण व दुष्टविनाश हीं जीं धर्मस्थापनेचीं दोन मुख्य अंगें त्यांचें रक्षण तुमच्या हातून होत च आहे; त्याशिवाय आणखी हि कांहीं चांगलीं चांगलीं धर्मकृत्यें तुमच्या हातून वा आश्रयानें घडत आहेत व त्यामुळें किती तरी थोर सज्जन तुमचे आश्रयास आले आहेत; येणेंकरून तुमची कीर्ति सगळ्या जगांत फांकली आहे; तुम्ही धन्य धन्य आहांत! अनेक दुष्टांचा तुम्ही संहार केला; तुमचें नांव ऐकून च कित्येकांना कांपरें भरलें आणि आमचा शिवराजा अशा प्रकारें किती तरी साधूसज्जनांचें आश्रयस्थान होऊन बसल्यानें त्याचें शिव म्हणजे कल्याण करणारा राजा हें नांव यथार्थ शोभतें आहे.

या शिवराजदरबारच्या वर्णनांत कोणती अत्युक्ति आहे? एखाद्या चिकित्सकास या ओव्यांत अतिशयोक्ती भासली तर तो जुन्या कागदपत्रांच्या अभावीं असलेल्या अपुऱ्या माहितीचा परिणाम आहे. अपुऱ्या माहितीवर विसंबून श्रीसमर्थांसारख्या समकालीन व निकटसंबंधीं महापुरुषांच्या लिखाणास अत्युक्त किंवा खोटें कसें मानावें? उलट श्रीसमर्थांच्या वचनांच्या आधारानें शिवछत्रपतींच्या अज्ञात अशा उद्योगांचा छडा लावतां आला तर तो लावण्याचा यत्न केला पाहिजे.

पुढील तेराव्या ओंवींत श्रीसमर्थ शिवराजास म्हणत आहेत कीं, "तुमच्या देशांत आम्ही येऊन राहिलों, पण तुम्ही आमचा समाचार घेतला नाहीं; ऋणानुबंधामुळें आमचें तुम्हांस विस्मरण झालें कीं काय कोण जाणे?" श. १५६६ चे वैशाखांत श्रीसमर्थ कृष्णातटाकास महाबळेश्वरास आले. तेथें श्रीकृष्णेच्या उगमस्थानाच्या वरचे अंगास मारुतीरायाची त्यांनीं स्थापना केली. दिवाकरभट व अनंतभट हे दोघे तेथें त्यांचे शिष्य झाले. तेथून वाईस कृष्णेच्या दक्षिणतीरीं सिद्धेश्वरासन्निध रोकडोबाची म्ह. मारुतीची स्थापना केली; तेथें हि थिटे, पिटके, चित्राव वगैरे मंडळी अनुग्रहीत झाली. पुढील पावसाळा माहुली व जरंडा येथें काढला. नंतर चाफळ, शिरगांव, शहापूर, कऱ्हाड, करवीर या भागांत वर्षअखेरपर्यंत अनेकांस अनुग्रह करीत संचार केला आणि १५६७ चा श्रीरामनवमीचा उत्सव केला तो मसूर येथें–शहाजीराजांचे जहागिरीचे गांवीं. या उत्सवाचे वेळीं शिवाजीराजे मसूरला आले होते. हीच शिवसमर्थांची पहिली भेट. यानंतरचे दोन उत्सव कोठें झाले त्याचा दाखला मिळत नाहीं. पण चाफळला श्रीराममंदिर होऊन तेथें श्रीरामनवमीचा उत्सव व्हावा असा श्रीसमर्थांचा मनोदय होता. आणि त्याप्रमाणें चाफळ येथें जागा मिळवून मंदिराचें काम हि सुरू झालें होतें. १५६९ चे अखेरीस हें श्रीराममंदिराचें काम पुरें होऊन त्यांत श्रीरामरायाची स्थापना झाली व १५७० चा श्रीरामनवमीचा उत्सव या च देवालयांत झाला. या देवालयाचें काम चालू असतां "समर्थ–आज्ञा पुसे शिवराजा। श्रीरघुनाथ देवाल्य मी बांधीन वोजा" (स. १९) या श्रीसमर्थप्रतापाच्या वचनाच्या आधारें १५६७ ते १५६९ या तीन वर्षांत शिवसमर्थांची आणखी एक तरी भेट झाली असावी असें अनुमानितां येतें. ही भेट बहुतेक देवालयाच्या आरंभकालीं च झाली असावी. म्हणजे १५७१ तील अनुग्रहप्रसंगापूर्वीं शिवसमर्थांची भेट कमींत कमी दोन वेळ झाली होती. या देवालयाचे बांधकामास ३०० होन गिरिगोसाव्यांच्या कीर्तनानिमित्त आणि ७०० होन हनुमान ओढ्यास बंधारा घालण्यासाठीं शिवरायाकडून आले होते. श्रीसमर्थांच्या भेटीसाठीं शिवराय चाफळला १२ वेळ आले होते; पण श्रीसमर्थ तेथें नसल्यानें भेट जाली नाहीं असा उल्लेख बखरींत आहे. तात्पर्य, अनुग्रहप्रसंगापूर्वीं च शिवसमर्थांचा परिचय झाला होता आणि त्या पूर्वपरिचयास अनुलक्षून च श्रीसमर्थ ह्या लिखितांत म्हणत आहेत कीं 'रुणानुबंधें विस्मरण जालें। काये नेणों॥' परस्परांचें परस्परांस स्मरण राहण्याइतका पूर्व परिचय असल्या खेरीज 'आमचें तुम्हांस विस्मरण झालें काय?' असें कसें म्हणतां येईल? या पुढील

सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती। सांगणें काय तुम्हांप्रती।
धर्मस्थापनेची कीर्ती। सांभाळिली पाहिजे॥ १४॥

राजकारण उदंड दाटलें। तेणें चित्त विभागलें।
प्रसंग नस्तां लिहिलें। क्षमा केलें पाहिजे॥ १५॥

ह्या दोन ओंव्या वाचतांना त्यावेळची शिवरायांची परिस्थिति ध्यानीं घ्यावी. १५७० च्या श्रावण व. १ पासून शहाजीराजे विजापुरास अटकेंत होते. त्यांनीं आपल्या हुकमाप्रमाणें वागणुक न केली तर त्यास भिंतींत चिणून घालण्याचा विचार बादशहानें चालविला आणि शिवाजीवर फत्तेखानास पाठविलें. त्याचा पूर्ण पराभव १५७० चे अखेरीस शिवरायांनीं केला. शहाजहानचा पुत्र शहाजादा मुराद हा त्यावेळीं मोंगलांच्या दक्षिणेकडील कारभारावर होता, त्याचे मार्फत शिवरायांनीं अदिलशहावर शहाजीराजांना सोडण्याविषयीं दडपण आणिलें. यानंतर शिवाजीराजे व अदिलशहा यांच्यांत तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. आदिलशहा कोंडाणा किल्ला मागत होता व तो न देण्याचा शिवाजीराजांचा आग्रह होता. अशा या प्रसंगाचें शब्दचित्र 'धर्मस्थापनेची कीर्ति। सांभाळिली पाहिजे॥ उदंड राजकारण दाटलें। तेणें चित्त विभागलें॥' या वचनांत यथार्थतेनें दिसत आहे. शहाजीराजांवरील प्राणांतिक प्रसंगामुळें राजकारणाचा मोठा च पेंच उत्पन्न झाला होता आणि कोंडाणा न देण्याच्या शिवरायांच्या आग्रहामुळें त्यांच्या धर्मस्थापकत्वाच्या कीर्तीस धक्का बसण्याचा संभव होता. याबाबतींत शिवभारतामध्यें सोनोपंत डबीरांनीं जो अभिप्राय दिला म्हणून म्हटलें आहे तशा च प्रकारचा अभिप्राय 'धर्मस्थापनेची कीर्ती। सांभाळिली पाहिजे॥' या वचनानें श्रीसमर्थांनीं सूचित केला. तो हा कीं, गडाच्या किंवा प्रदेशाच्या इच्छेनें पित्याचे प्राण धोक्यांत टाकूं नका; गड किंवा प्रदेश पुनः मिळवितां येतील; पण पित्याचे प्राण परत मिळणार नाहींत. आणि गडाच्या निमित्तानें पित्यास धोका आला तर धर्मस्थापनेची कीर्ति जाईल. एकंदरींत या पंधरा ओंव्यांच्या लिखितांत शिवरायाचा यथार्थ गुणगौरव असून त्यांची त्यावेळची परिस्थिति हि दर्शित झालेली आहे.

यापुढें अनुग्रहानंतर जीं दोन प्रकरणें शिवराजास समर्थांनीं उपदेशिलीं त्यांचा विचार करावयाचा आहे. त्यांपैकीं पहिलें

## २ राजधर्म

नमो मंगळमूर्ति विघ्नहरू। सरस्वतीस नमस्कारू।
सद्गुरु संत कुलेश्वरू। दाशरथी॥ १॥

श्रोतीं मानेल तरी घ्यावें। अथवा दाटूनि सांडावें।
प्रपंचाकारणें स्वभावें। बोलिलों मी॥ २॥

सावधपणें प्रपंच केला । तेणें सुख चि पावला ।
दीर्घ प्रयत्नें मांडिला । कार्यभाग साधे ॥ ३ ॥

आधीं मनुष्य ओळखावें । योग्य पाहूनि काम सांगावें ।
निकामी तरी ठेवावें । एकीकडे ॥ ४ ॥

पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणें ।
कार्यकर्त्याच्या गुणें । कार्यभाग होतो ॥ ५ ॥

कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहीं येक असला हेकाड ।
तरी समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ॥ ६ ॥

अमर्याद फितवे खोर । त्यांचा करावा संहार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ ७ ॥

मनुष्य राजी राखणें । हीं चि भाग्याचीं लक्षणें ।
कठीणपणें दुरी धरणें । कांहीयेक ॥ ८ ॥

समयीं मनुष्य कामा येतें । तयाकारणें सोशिजेतें ।
न्याय सांडितां मग ते । सहजची खोटें ॥ ९ ॥

न्यायसीमा उल्लंघूं नये । उल्लंघितां होतो अपाय ।
न्याय नसतां उपाय । होईल कैंचा ॥ १० ॥

उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासून चेवला ।
समयीं धीर सांडिला । तो ही खोटा ॥ ११ ॥

संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाये ।
तरी मग पाहतां काय । उणें आहे ॥ १२ ॥

बंध बांधावे नेटके । जेणें करितां चतुर तुके ।
ताब न होतां फिके । कारभार होती ॥ १३ ॥

धुरेनें युद्धासीं जाणें । अशीं नव्हेत कीं राजकारणें ।
धुरा च करोनि सोडणें । कित्येक लोक ॥ १४ ॥

उदंड मुंडें असावीं । सर्व ही एक न करावीं ।
वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥ १५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत नं. ९७ ठाणें.

मोहरा पेटला अभिमाना । मग तो जिवास पाहेना ।
मोहरे मिळवूनि नाना । वरी चपेटे करी ॥ १६ ॥

देखोनि व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती बारा वाटा ।
मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ॥ १७ ॥

रायांनीं करावें राजधर्म । क्षत्रीं करावें क्षात्रधर्म ।
ब्राह्मणीं करावें स्वधर्म । नाना प्रकारें ॥ १८ ॥

तुरंग शस्त्र आणि स्वार । पहिला पहावा विचार ।
निवटूं जातां थोर थोर । शत्रु पळती ॥ १९ ॥

ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलों कांहींयेक ।
येका मनोगतें स्वामी सेवक । असतां बरें ॥ २० ॥

पहिल्या लिखितांत ज्याप्रमाणें शिवरायाचा यथोचित गुणगौरव आहे . त्याप्रमाणें या प्रकरणांत त्या तरुण व साहसी स्वराज्यसंस्थापकास त्यावेळच्या परिस्थितीस आवश्यक अशा सावधगिरीच्या सूचना आहेत. सुरू केलेला कार्यभाग दीर्घ प्रयत्नानें सिद्ध होतो, माणसाची अगोदर पारख करून मग त्यास योग्य तें काम सांगावें, निकाम्यास दूर ठेवावें, योग्य विचारानें काम केल्यास उणेपणा केव्हां हि येत नाहीं, कार्यकर्त्यांच्या गुणावर कार्यसिद्धी अवलंबून आहे, हेकाड पण मोठा प्रयत्नशील असा कार्यकर्ता असेल तर त्याचा पाठीराखेपणा करावा, फितुरीचा यथातथ्य विचार करून फितवेखोर नेस्तनाबूद करावे, मनुष्य राजी राखणें हें भाग्याचें लक्षण होय, प्रसंगास उपयोगी पडणाऱ्या माणसासाठीं कांहीं तोशीस सोशीत जावी, पण न्यायमर्यादा सोडूं नये, उपाधीस कंटाळूं नये, प्रसंगीं धीर असावा, संकट निवारण्याचा आळस न करतां अनेक उपाय योजावे, चतुरांनीं हि मान डोलवावी असे निर्बंध घालावे, प्रत्येक वेळीं तुमच्यासारख्या धुरेनें म्हणजे मुख्य पुढाऱ्यानें च पुढें होऊन युद्धास जाणें योग्य नाहीं, अनेक पुढारी तुमच्या हाताखालीं तयार पाहिजेत, तुरंग, शस्त्र व स्वार यांचा विचार प्रथम करावा, इत्यादि प्रकारचा उपदेश १५७१ चे वैशाखांत किती समयोचित होता हें तज्ज्ञ जाणतील. या प्रकरणाच्या आद्यन्तीं असलेला ‘प्रपंच’ शब्दहि चिंतनीय आहे. त्यावरून ‘प्रपंच’ संबंधींची श्रीसमर्थांची कल्पना कशी व्यापक होती तें ध्यानीं येईल.

या राजधर्माबरोबर च सांगितलेलें दुसरें प्रकरण ‘क्षात्रधर्म’ हें आहे.

### ३ क्षात्रधर्म

अल्प स्वल्प संसारधर्म । मागां बोलिलों राजधर्म ।
आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो ॥ १ ॥
जयास जीवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ।
कांहीं तरी करूनी उपाये । पोट भरावें ॥ २ ॥
विन्मुख मरणीं नर्क होती । वांचून येतां मोठी फजीती ।
इहलोक परलोक जाती । पहाना कां ॥ ३ ॥
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोनि येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ४ ॥
नजर करारी राखणें । कार्य पाहून खतल करणें ।
तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होतीं ॥ ५ ॥
जैसा भांड्याचा गलोला । निर्भय भारामध्यें पडिला ।
तैसा क्षत्री रिचवला । परसैन्यामध्यें ॥ ६ ॥
निःशंकपणें भार फुटती । परवीरांचे तवके तुटती ।
जैसा बुलिया घालुन घेती । भैरी उठतां ॥ ७ ॥
ऐसे अवघेच उठतां । परदळाची कोण चिंता ।
हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा ॥ ८ ॥
मर्दें तकवा सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय ।
कार्य-प्रसंग समय । ओळखावा ॥ ९ ॥
कार्य समजेना अंतरें । तें काय झुंजेल बिचारें ।
युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखतां ॥ १० ॥
दोन्हीं दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें ।
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडुनी ॥ ११ ॥
देव मात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ १२ ॥
मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ १३ ॥

मरण हाक तों चुकेना। देहे वांचवितां वांचेना।
विवेकी होऊन समजाना। काय करावें॥ १४॥
भले कुळवंत म्हणावें। तें हीं वेगी हाजीर व्हावें।
हजीर न होतां कष्टावें। लागेल पुढें॥ १५॥
एक जाती दोन जाती पावला। तो कैसा म्हणावा भला।
तुम्हां सकळांस कोप आला। तरी क्षमा केली पाहिजे॥ १६॥
देवद्रोही तितुके कुत्ते। मारूनि घालावे परते।
देवदास पावती फत्ते। यदर्थीं संशय नाहीं॥ १७॥
देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा।
मुलुख बडवा कां बुडवावा। धर्मसंस्थापनेसाठीं॥ १८॥
विवेक विचार सावधपणें। दीर्घ प्रयत्न केलाचि करणें।
तुळजावराचेनि गुणें। रामें रावण मारिला॥ १९॥
अहो हे तुळजा भवानी। प्रसिद्ध रामवरदायिनी।
रामदास ध्यातो मनीं। यन्निमित्त॥ २०॥

हीं दोन्ही प्रकरणें 'श्रीसमर्थहृदय' या ग्रंथांत आलीं नाहींत आणि त्यांचे शुद्ध पाठ अन्यत्र कोठें प्रसिद्ध झाल्याचें स्मरणांत नाहीं. त्यामुळें जीं दोनचार प्रकाशनें समोर होतीं त्यांतील तारतम्यानें योग्य दिसले ते पाठ वर दिले आहेत. या दुसऱ्या प्रकरणांत ५ व ७ या दोन ओंव्यांचा अर्थ नीटसा लागला नाहीं. तथापि हें प्रकरण वीरोचित भाषेनें व तेजस्वी विचारांनीं असें भरलेलें आहे कीं, आजहि तें वाचतांना मर्द माणसाचे बाहू स्फुरण पावूं लागावेत आणि अंतःकरण ओजस्वी कल्पनांच्या लहरींनीं भरून जावें. मग श्रीसमर्थांच्या दिव्य वाणींतून हे शब्द प्रगट होत असतां तें ऐकण्याचें महद्भाग्य ज्यांना लाभलें त्या वीरश्रीनें मुसमुसलेल्या तरुण मराठा वीरांची काय अवस्था झाली असेल! 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे.' आज शंभर वर्षे निःशस्त्र व परतंत्र झालेल्या मनाला त्याची यथार्थ कल्पना कशी होणार? असो.

राजधर्म व क्षात्रधर्म हीं दोन्ही प्रकरणें एकाच बैठकींत पहिल्या मागून दुसरें अशीं सांगितलेलीं दिसतात. राजधर्मामधील 'मोहरा पेटला अभिमाना।' या सोळाव्या ओवीचा विस्तार क्षात्रधर्म प्रकरणांत केला आहे. अकराव्या ओंवीपर्यंत क्षत्रियवीरानें निधड्या छातीनें खणखणाटें युद्ध कसें करावें तें सांगितलें असून प्रथमच "रणांत पाठ दाखवून मेल्यास अंतीं नर्क किंवा वांचल्यास फजिती, याकरितां

'मारितां मारितां मरावें' " असा क्षत्रियास सर्वसामान्य असलेला उपदेश ३ व ४ या ओंवींत आहे. त्या काळीं हातांत शस्त्रें होतीं, मणगटांत बळ होतें आणि अंतःकरणांत स्वाभिमानाचा पीळ होता; त्यामुळें युद्धोत्सुक तरुण सर्वत्र गांवोगांव होते. त्यांत आपल्या कुटुंबासाठीं वा आप्तेष्टांसाठीं लढणारे, ग्रामरक्षणासाठीं झुंझणारे, वतनासाठीं प्राण देणारे वा घेणारे, अथवा धन्यासाठीं – मग तो धनी कोणी हि असो – त्यानें पोटाला भाकरी दिली कीं तो धनी झाला – त्याच्यासाठीं, न्यायान्याय अथवा राष्ट्राचें वा धर्माचें हिताहित याचा विचार न करतां – निमकहलालीनें प्राणार्पण करणारे असंख्य लोक होते. परंतु त्यांच्यापुढें देवधर्मरक्षणाचें संघटित व उज्ज्वल ध्येय नव्हतें. एवढे रणझुंजार रजपूत–क्षात्रधर्माची व धर्मयुद्धाची जणों जिवंत मूर्ति – ज्यांच्या शौर्यधैर्याची कीर्ति त्रिखंड गाजलेली – पण तेहि वतनें, मानापमान, धर्मयुद्धाची संकुचित वा विपर्यस्त कल्पना यांनीं ग्रासल्यानें आपसांतल्या यादवीमध्यें च आपली शक्ति क्षीण करीत होते. तीर्थाटनप्रसंगीं हा सर्व प्रकार व त्याचे दुष्परिणाम श्रीसमर्थांच्या अवलोकनांत आले होते. म्हणून क्षात्रधर्माच्या १२ ते १८ या ओंव्यांत क्षत्रिय वीराचें ध्येय निश्चितपणें सांगितलें. 'आपुला-देवमात्र उच्छेदिला, स्वधर्म बुडविला हें पाहून जिवंत राहण्यापेक्षां मरण बरें. क्षुद्र स्वार्थासाठीं भांडत काय बसतां? 'मराठा तितुका मेळवावा' 'आपुला महा-राष्ट्र-धर्म (वैयक्तिक धर्म नव्हे – सामाजिक नव्हे वा प्रांतिक हि नव्हे) वाढवावा' अर्थात् हें कार्य साधें नाहीं; फार अवघड – फार मोठें आहे; त्याला धैर्य, सहनशीलता वगैरे सद्गुण लागतील. पण धैर्य धरून या अवघड कार्यास – महाराष्ट्रधर्म वाढविण्यास ज्यानें त्यानें आपल्या शक्तीप्रमाणें हातभार न लावला तर वाडवडिलांच्या नांवाला बट्टा लागेल. मृत्यु चुकत नाहीं; देह चिरकाल राहत नाहीं. याकरितां काय करावयाचें त्याचा विचार आतां च करा. जे सज्जन असतील – कुलशीलवंत असतील त्यांनीं (शिवरायाच्या साह्यास) तात्काळ यावें. आतां न आल्यास पुढें पश्चात्तापाची पाळी येईल. भला कोण? समर्थ म्हणतात – माझ्या स्पष्ट बोलण्याचा तुम्हांस राग येईल; पण क्षमा करा, यावेळीं स्पष्टच बोललें पाहिजे; आपली जात किंवा धर्म पालटणारा तो भला नव्हे. पुढील दोन ओव्यांतील प्रत्येक शब्द चैतन्याचा स्फुलिंग आहे, वीररसाचा जिवंत झरा आहे. वीररसाबरोबर च देवधर्माचें संरक्षण व संस्थापन करण्याची स्पष्ट सूचना हि त्यांत आहे. आणि एकोणिसाव्या ओंवीच्या पूर्वार्धांत सर्व उपदेशाचें सार सांगितलें आहे कीं,

विवेक विचार सावधपणें। दीर्घ प्रयत्न केला चि करणें॥

या पुढील चार चरणांत शिवरायास सुचविलें आहे – कीं, ज्या तुळजा भवानीच्या वरप्रसादानें रावणसंहार करण्यांत रामरायांनीं यश मिळविलें त्या रामवरदायिनी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६३७१०१

तुळजामातेचें कृपाछत्र तुमचेवर आहे; तुम्हांस हि रामराज्य ह्मणजे 'देव-धर्म ब्राह्मण' यांचें संरक्षण करणारें स्वराज्य स्थापावयाचें आहे. त्यांत तुम्हांस त्या भवानीच्या कृपेनें च यश मिळेल. ती जगदंबा रामवरदायिनी आहे. म्हणून मी रामदास हि तिचें च ध्यान करितों.

या च अनुग्रहप्रसंगीं सेवकधर्माचे दोन समास सांगितले आहेत, त्यांत सेवकांनीं धन्याशीं स्वामीनिष्ठेनें कसें वागावें हें स्पष्ट भाषेंत खुलासेवार सांगितलें आणि त्याबरोबर च अशा स्वामीनिष्ठ सेवकांना स्वामीनें कसें वागवावें याचा हि उपदेश आहे.

## ४ अखंड सावधान

यानंतरचें शिवरायास राज्यदानप्रसंगीं सांगितलेलें प्रकरण उपलब्ध आहे तें शके १५७७ वैशाख शु. २ स झालेलें 'अखंड सावधान' हें होय. शिवछत्रपतींनीं श्री सद्गुरुसमर्थांच्या झोळींत आपलें राज्य अर्पण केलें आणि श्रीसमर्थांनीं तें परत शिवरायास दिलें ही कथा लोकप्रसिद्ध आहे. हनुमंतस्वामींचे बखरींत व तिजवरून प्रसृत झालेल्या लोकवार्तेत हें राज्यदान शिवछत्रपतींनीं मोठ्या भक्तिभावानें केलें आणि समर्थांनीं राजधर्म व परमार्थ सांगून आणि सच्छिष्य श्रीराम व सद्गुरु वसिष्ठ यांची कथा सांगून शिवाजी राजास राज्य करण्यास पुनः प्रवृत्त केलें अशी समजूत प्रचलित आहे. परंतु या राज्यदानांत भक्तिभावापेक्षां रुसव्याचा भाग अधिक होता असें हें प्रकरण व त्यावेळची शिवराजांची राजकीय परिस्थिति पाहून म्हणावें लागतें. या विषयाचें विस्तृत विवेचन श्रीसमर्थांची गाथा प्रस्तावना पृ. ७६–८२ वर केलें आहे. स्थलसंकोचास्तव त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. तें प्रकरण मात्र पुढें दिलें आहे.

कोणाचा भरंवसा न धरावा। आपला आपण विचार पहावा।
तकवा उदंड धरावा। कांहीं येक विषयीं ॥ १ ॥
देहदुःखें कदरों नये। उदंड चि करावें उपाये।
मग सर्व सुखास काय। उणें आहे ॥ २ ॥
येकांतीं चाळणा करावी। धारणा उदंड धरावी।
नाना विचारणा करावी। अरिमित्रांची ॥ ३ ॥
प्रयत्नीं चुकों नये। सुखवासी कामा नये।
सुचावे नाना उपाये। अनेक विषयीं ॥ ४ ॥

धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये ।
उद्योगरहित कामा नये । पशु जैसे ॥ ५ ॥
उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस आला ।
म्हणजे जाणावा चेवला । बुद्धिपासुनी ॥ ६ ॥
खबरदारी आणि वेगीं । तेणें सामर्थ्य चढे आंगीं ।
नाना प्रकारें कार्यभागीं । अंतर चि न पडे ॥ ७ ॥
कार्यकर्ते दुरी करावें । प्रसंगीं सर्वेचि हातीं धरावें ।
परंतु शोधोनि पहावे । कपटाविषयीं ॥ ८ ॥
जेथें बहु विचार । तेथें ईश्वरअवतार ।
मागें झाले थोर थोर । धके चपेटे सोसोनि ॥ ९ ॥
आपल्या मनासी रोधावें । परांतर शोधावें ।
क्षणक्षणा सांभाळावें । बदलेल म्हणोनी ॥ १० ॥
पाहिलें चि पाहावें । केलें चि करावें ।
शोधिलें चि शोधावें । राजकारण ॥ ११ ॥
इशारतीचें बोलों नये । बोलायाचें लिहों नये ।
लिहायाचें सांगों नये । जबाबीनें ॥ १२ ॥

शके १५७१ ज्येष्ठ शु. १५ स शहाजी राजास 'फर्जंद-इ-अदिलशाही' असा किताब देऊन मोठ्या गौरवानें अदिलशहानें मुक्त केलें, तरी पुढें ४।५ वर्षे त्यांस कोणती ही कामगिरी सांगितली नाहीं. पुढें कर्नाटकांतील बंडें मोडण्याचे कामगिरीवर अदिलशहानें त्यांस श. १५७६ चें आरंभीं पाठविलें. शहाजी राजांचा मुक्काम विजापुरास होता तोंपर्यंत शिवरायास अदिलशाहीविरुद्ध कांहीं च हालचाल करतां येत नाहीं. पण ते कर्नाटकांत जातां च नवीन मोहिमा हातीं घेण्यास शिवराय अत्यंत उतावीळ झाले. त्या बाबतींत सल्लामसलत करण्यासाठीं श्रीसमर्थांना जांबेस पत्र पाठवून त्यांनीं बोलावून घेतलें. या पत्रास उद्देशून "इशारतीचें बोलों नये । बोलायाचें लिहों नये। लिहायाचें सांगों नये । जबाबीनें॥ ही सूचना दिसते. तेव्हां पदरच्या मुत्सद्यांचा व श्रीसमर्थांचा हि सल्ला मिळाला कीं "पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणें ।" पित्याच्या कारागृहाचा सूड घेण्यासाठीं सळसळणाऱ्या शिवरायाच्या तरुण अंतःकरणाला हा सावधगिरीचा व शांततेचा उपदेश यावेळीं रुचला नाहीं. म्हणून त्यांनीं कांहींशा रुसव्यानें

व त्याग्यानें 'संपादिलें तें सर्व श्रीचरणीं अर्पण' अशी चिठ्ठी लिहून ती सद्गुरु समर्थांच्या झोळींत टाकिली. त्यावर शिवरायाची समजूत काढण्यासाठीं हा 'अखंड सावधान' प्रकरणाचा उपदेश झाला. या प्रकरणास दिलेलें 'अखंड सावधान' हें नांव आणि त्यांतील विषय ही परस्परांस किती अनुरूप आहेत आणि हा उपदेश किती प्रसंगोचित आहे तें वरील राजकीय परिस्थिति ध्यानीं घेऊन इतिहासज्ञांनीं पहावें. कालानुक्रमानें यापुढील प्रकरण

### ५ उत्तम पुरुष निरूपण

म्हणजे श्रीदासबोधांतील १८-६ वा समास होय. शके १५८१ च्या मार्गशीर्ष शु. ७ स शिवरायांनीं प्रतापगडाखालीं अफझुलखानाचा वध केल्यावर ते श्रीसमर्थदर्शनास आले त्यावेळीं हा समास शिवगौरवार्थ झाला. त्यांत तत्कालीन परिस्थितीचें प्रतिबिंब स्पष्टपणें उमटलें आहे. तें कसें तें आतां पाहूं. श्रीदासबोध-वाचकांच्या परिचयाचा हा समास असल्यानें तो येथें समग्र न देतां सारांशरूपानें त्याचा विचार केला आहे.

"वस्त्रभूषणांनीं शरीर श्रृंगारलें जातें त्याप्रमाणें विवेक, विचार व राजकारण यायोगें पुरुषानें अंतरंग श्रृंगारावें. तोंडाळ, हेकाड, कठोरवचनी, डौली, शीघ्रकोपी, बेइमानी, अनीतीनें वागणारा असल्या प्रकारचें लोक राक्षस होत. त्यांचा प्रतिकार अवश्य करावा. आणि अशा समयीं नित्यनेम चालणें शक्य नसतें. म्हणून विवेकी पुरुषानें 'अति सर्वत्र वर्जावें। प्रसंग पाहोन चालावें।'. हठनिग्रह करूं नये. हट्टामुळें पक्षभेद होतात. ईश्वरानें - विशेषतः तुळजाभवानीनें तुमचा अभिमान धरला आहे. तथापि विचारानें च चालणें योग्य. तुम्ही अखंड सावधान च आहां, तुम्हांस जास्त काय सांगावें? पण दूरदर्शीपणानें वागा; तुमच्यासारख्या समर्थ पुरुषाच्या पक्षाचा अभिमान धरून अनेक लोक त्यास चिकटून राहतील अशा धोरणानें चाला. एकटा अफजुलखान नाहींसा झाल्यानें सर्व काम संपलें असें नाहीं; तर 'म्लेंछ दुर्जन उदंड। बहुता दिसांचें माजलें बंड। याकारणें अखंड। सावधान असावें.॥' कर्त्याकरवित्या ईश्वरानें ज्या पुरुषाचा अंगिकार केला त्याची थोरवी कोणास कळेल? न्यायनीति विवेकविचार पाहणें, नाना प्रसंग व परांतर यांची परीक्षा करणें, सावधपणें महायत्न करणें, समयीं धारिष्ट धरून (अफजुलखानाच्या वधासारखें) अद्भुत कार्य करणें, यशकीर्ति प्रताप महिमा अपार असणें, अनेक लोकोत्तर उत्तम गुण अंगीं असणें, देवब्राह्मणांचा (म्ह. देव - धर्म - गो - ब्राह्मणांचा) कैवार घेऊन त्यांच्या कल्याणाची चिंता वाहणें, अनेकांचें पालन करणें, परोपकार घडणें, इहपरलोकींच्या परिणामाकडे दृष्टी

ठेवून 'अखंड सावधपणें राहणें', बहुतांचें सोसणें, उत्तम-गुणांचा ग्राहक, तीक्ष्ण तर्क, सूक्ष्म विवेक, धर्मस्थापक, पुण्यश्लोक आणि सर्व गुणांचें सार व जेणेंकरून अरत्रपरत्रींचा पैलपार पावतां येईल अशा 'तजविजा विवेक विचार' अंगीं असणें, हे सर्व गुण ईश्वरी देणें आहेत. फार काय 'धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वरी अवतार।' होत. हे अवतार ईश्वरी दयेनें पूर्वी झाले, सध्यां आहेत आणि पुढेंहि होतील! 'विवेक विचारें राजकारणें। अंतर शृंगारिजे' हा या प्रकरणाचा आरंभ आणि 'सकळ गुणांमध्ये सार। तजविजा विवेक विचार। जेणें पाविजे पैलपार। अरत्रपरत्रींचा॥' हा शेवट हे दोन्ही एकरूप असल्यानें विशेष चिंतनीय आहेत.

धन्य ते शिवराय कीं, ज्यांना श्रीसमर्थांसारख्या निस्पृह महापुरुषाकडून असें प्रशस्तिपत्र लाधलें! ह्यांत शिवरायाचा उत्कृष्ट गुणगौरव तर आहे च आणि त्याबरोबर हे सद्गुण म्हणजे ईश्वरी कृपेचें देणें होय, त्याचा अहंकार अंतःकरणास होऊं देऊं नका असा गर्भित इशारा हि यांत आहे. खंडोजी खोपड्यानें फितुरी करून अफजुलखानाची बायकामुलें पळवून लावली व त्याच्याबद्दल कान्होजी जेधे व हैबतराव सिलीमकर यांनीं रदबदली केल्यावरून शिवरायांनीं खोपड्याचे प्राण वांचविण्याचें वचन दिलें, पण पुढें त्याचा उजवा हात व डावा पाय तोडला, त्यामुळें जेधे व सिलीमकर यांना वैषम्य वाटलें; या प्रसंगास अनुलक्षून ७, ८ व ११ या ओव्या असाव्या. तसेंच हनुमंत स्वामींच्या बखरींत म्हटलें आहे कीं, 'समर्थांस विचारल्यावांचून कांहीं करावयाचें नाहीं, प्राण जावो अथवा राहो' असें उत्तर या अफजुलखानप्रकरणीं शिवरायांनीं पदरच्या मुत्सद्यांस दिलें होतें. त्यास उद्देशून 'समयासारिखा समयो येना। नेम सहसा चालेना। नेम धरितां राजकारणा। अंतर पडे।' हा उपदेश असावा. अफजुलखानाच्या सुभेदारीचें ठाणें वाईस होतें आणि शिरवळ येथें हि अदिलशहाचें हवालदारी ठाणें होतें. या दोन्ही ठाण्यास जवळ अशा कण्हेरी गांवीं सदाशिव शास्त्री येवलेकर ऊर्फ वासुदेव पंडित या आपल्या प्रमुख शिष्यास – 'ज्यास समर्थ प्रतिमा म्हणती जनीं।' – श. १५८० च्या अखेरीस वा १५८१ च्या प्रारंभीं श्रीसमर्थांनीं मठ करून देऊन ठेविलें त्यावरून आणि 'समर्थें आकारपूर्वक यवनासी मारविलें।' या समर्थ-प्रतापांतील वचनावरून या अफजुलखानप्रकरणीं श्रीसमर्थांचा बराच हात असावा असें दिसतें.

श्रीशिवछत्रपतींच्या कैलासवासानंतर १६०३ मधें संभाजी राजांस श्रीसमर्थांनीं जें पत्र पाठविलें त्याचा आतां विचार करावयाचा आहे. १६०३ च्या भाद्रपदमासीं बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद, आणाजी दत्तो वगैरे जुने कारभारी शंभु राजाच्या हुकमावरून मारले गेल्याचें कळल्यानंतर समर्थांनीं हें पत्र लिहिलें असावें.

## ६ शिवराजासी आठवावें

अखंड सावधान असावें। दुश्चित कदापि नसावें।
तजविजा करीत बैसावें। येकांत स्थळीं ॥ १ ॥
कांहीं उग्र स्थिति सांडावी। कांहीं सौम्यता धरावी।
चिंता लागावी परावी। अंतर्यामीं ॥ २ ॥
मागील अपराध क्षमावे। कारबारी हातीं धरावे।
सुखी करूनि धाडावे। कामावरी ॥ ३ ॥
पाटांतील तुंब निघेना। तरी मग पाणीच चालेना।
तैसें जनाच्या मना। कळलें पाहिजे ॥ ४ ॥
जनाचा प्रवाहो चालिला। म्हणिजे कार्यभाग आटोपिला।
जन ठायीं ठायीं तुंबला। म्हणिजे खोटें ॥ ५ ॥
श्रेष्ठीं जें जें मेळविलें। त्यासाठीं भांडत बैसले।
तरि मग जाणावें फावले। गनीमासी ॥ ६ ॥
ऐसे सहसा करूं नये। दोघा भांडण तिसऱ्या जय।
धीर धरुनि महत्कार्य। समजोन करावें ॥ ७ ॥
आरंभींच पडली धास्ती। म्हणिजे कार्यभाग होय नास्ती।
या कारणें समस्तीं। बुधी शोधावी ॥ ८ ॥
राजी राखतां जग। मग कार्याची लगबग।
ऐसें जाणोनि सांग। समाधानें करावी ॥ ९ ॥
सकळ लोक एक करावे। गनीम लाटून काढावे।
येणें करितां कीर्ति धांवे। दिगांतरीं ॥ १० ॥
आधीं गाजवावे तडाखे। तरी मग भूमंडळी धाके।
ऐसें न होतां धके। राज्यासी होती ॥ ११ ॥
समय प्रसंग वोळखावा। राग निपट न संडावा।
आला तरी कळों नेदावा। जनांमध्यें ॥ १२ ॥
राज्यामध्यें सकळ लोक। सलगी देउनी करावे शोक।
लोकाच्या मनामध्यें धाक। उपजों चि नये ॥ १३ ॥

बहुत लोक मेळवावे। लोक विचारें भरावे।
कष्ट करूनि घसरावे। म्लेंचराजे ॥ १४ ॥
आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मेळवावें।
मऱ्हाष्ट्रराज्य चिं करावें। जिकडे तिकडे ॥ १५ ॥
लोकी हि हीमती धरावी। शर्तीची तरवार करावी।
चढती वाढती पदवी। पावाल येणें ॥ १६ ॥
शिवराजासी आठवावें। जीवित्व तृणसमान करावें।
येहलोक परलोकीं तरावें। कीर्तिरूपें ॥ १७ ॥
शिवराजाचें आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा साक्षेप।
शिवराजाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं ॥ १८ ॥
शिवराजाचें कैसें बोलणें। शिवराजाचें कैसें चालणें।
शिवराजाची सलगी देणें। कैसी आहे ॥ १९ ॥
सकळ सुखाचा त्याग। करूनि साधिजे तो योग।
राज्य साधावया लगबग। तैसी करावी ॥ २० ॥
त्याहून करावें विशेष। तरीच म्हणावें पुरुष।
या उपरी आतां विशेष। काय ल्याहावें ॥ २१ ॥

यांत जिकडे तिकडे महाराष्ट्र राज्य करून चढती वाढती पदवी प्राप्त करून घेण्याचें ध्येय शंभुछत्रपतिपुढें श्रीसमर्थांनीं ठेविलें असून त्या ध्येयप्राप्तीचे उपाय पहिल्या १६ ओव्यांत सुचविले आहेत. ते असे "अखंड सावधान असावें; दुश्चितपणा सोडून येकांतांत तजवीजा करीत बसावें. त्यासाठीं उग्र स्थिति टाकून सौम्यपणा धरावा, परहिताची चिंता अंतर्यामीं धरावी; कारभाऱ्यांचे झालेले अपराध क्षमा करून त्यांना आनंदवून कामाला लावावें. पाटांतील पाणी तुंबून उपयोगी नाहीं. त्याप्रमाणें मुत्सद्दी व कर्ते पुरुष एके ठिकाणीं डांबून राहिले तर तें घातक आहे. राजकार्याच्या ओघांत ते मिसळले पाहिजेत. वडिलार्जित राज्य-वैभवासाठीं आपसांत भांडत बसल्यास शत्रूचें फावेल; दोघांचें भांडण तिसऱ्याचा लाभ; म्हणून यादवी मिटवावी आणि मोठ्या धैर्यानें व दूरदर्शीपणानें महत्कार्यें हातीं घ्यावी. तुमच्याविषयीं लोकांनीं धास्ती घेतली आहे. तशानें कार्यनाश होईल. यासाठीं लोक राजी करून त्यांना बुद्धिवाद शिकवून त्यांच्या मागें उदंड कामें लावून द्यावीं. सगळे लोक एकचित्त करून शत्रूंस पिटून काढावें, म्हणजे

तुमची कीर्ती दिगंतरीं धांवेल! राज्याच्या शत्रूंवर 'आधीं गाजवावे तडाखे' मग तुमचे जुने कारभारीच काय, सगळ्या भूमंडळास तुमचा धाक उत्पन्न होईल; असें न कराल तर राज्यास धोका येईल. राग अगदींच नाहींसा करावा असें नाहीं; समय प्रसंग ओळखून वागावें; राग आला तरी दुसऱ्यास कळूं देऊं नये; सगळ्या प्रजेला प्रेमानें वागवून शोकमुक्त करावें. कोणाहि प्रजाजनास आपल्या राजाबद्दल धास्ती वाटूं नये; प्रेम वाटावें. अशा प्रकारें प्रेमप्रीतीनें सर्व लोक एकत्र करून एक विचारानें भारून ते 'शर्तीची तरवार' गाजवितील अशी हिंमत त्यांचे ठायीं उत्पन्न करावी आणि म्लेंछांचा बीमोड करून जिकडे तिकडे महाराष्ट्र राज्य करावें म्हणजे तुमची थोरवी दिवसेंदिवस वाढत जाईल."

या सर्व उपदेशाचें सार पुढील पांच ओंव्यांत आहे. ही सर्व शिकवण तुम्हांस थोडक्यांत समजून आंगीं बाणवून घ्यावयाची असेल तर शिवराजाचें रूप आठवा, त्यांचा साक्षेप म्हणजे आस्थेचा उद्योग कसा होता त्याचें स्मरण करा, भूमंडळावर त्यांचा प्रताप कसा गाजत होता तें ध्यानीं आणा, त्यांचें बोलणें चालणें कसें होतें, आपलें महत्व संभाळून ते लोकांस कसे सलगीनें वागवीत तें सर्व लक्षांत घ्या. सगळ्या ऐषआरामाचा त्याग करून शिवराजांनीं जो योग साधला तो तुम्हीं साधा; राज्यसाधनाचे कामीं शिवरायासारखी अखंड लगबग चालू ठेवा; फार काय सांगावें? त्या पुण्यश्लोक शिवरायाचें स्मरण करा आणि आपलें जीवित्व तृणसमान लेखून उद्योगास लागा, म्हणजे इहपरलोकीं तुमची कीर्ति दुमदुमून जाईल. शिवरायांनीं जें कांहीं केलें – मिळविलें

त्याहूनि करावें विशेष। तरी च म्हणावें पुरुष।
या उपरी आतां विशेष। काय ल्याहावें ॥

## ७ श्रीशिवराय श्रीसमर्थांना कसे दिसले ?

लिखित, राजधर्म, क्षात्रधर्म, अखंड सावधान, उत्तम पुरुष आणि शंभुराजास पत्र या सहा प्रकरणांचा विचार येथवर केला. त्यांत सहा प्रकरणांच्या ११० ओव्या व स्फु. प्र. ३६ मधील १७ वा श्लोक मिळून १११ वचनांची चर्चा झाली. त्यांतून श्रीसमर्थांना शिवराज कसे दिसले, कोणत्या वचनांतून तत्कालीन प्रसंग दृष्टोत्पत्तीस येतात आणि शिवरायास श्रीसमर्थांनीं कोणता उपदेश केला त्याचें संकलित विवेचन ( द्विरुक्तीबद्दल वाचकांची क्षमा मागून ) आतां करावयाचें आहे. प्रथम शिवराय कसे दिसले ह्मणजे त्यांचे अंगीं कोणकोणते गुण श्रीसमर्थांनीं पाहिले तें पाहूं.

१ निश्चयाचा महामेरू २ बहुत जनांसी आधारू, ३ अखंड स्थितीचा निर्धारू, ४ श्रीमंत योगी, ५ परोपकाराचिया रासी। उदंड घडती जयासी, ६ नरपति, ७ हयपति, ८ गजपति, ९ गडपति, १० भूपति, ११ जळपति, १२ आदिशक्ति पृष्टभागीं, १३ यशवंत, १४ कीर्तिवंत, १५ सामर्थ्यवंत, १६ वरदवंत, १७ पुण्यवंत, १८ नितिवंत, १९ जाणता राजा, २० आचारसीळ, २१ विचारसीळ, २२ दानसीळ, २३ धर्मसीळ, २४ सर्वज्ञ, २५ सुसीळ सकळां ठाईं, २६ धीर, २७ उदार, २८ सुंदर, २९ शूर, ३० क्रियेसी तत्पर, ३१ सावधपणें नृपवर तुच्छ केलें, ३२ देवधर्म गोब्राह्मण संरक्षण करावया हृदयस्थ नारायणें प्रेरणा केली, ३३ महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं तुम्हांकरितां, ३४ आणिक ही धर्मकृत्यें चालती, ३५ आश्रित होऊनि कित्येक असती, ३६ कीर्ति विश्वीं विस्तारली, ३७ कितेक दुष्ट संहारिला, ३८ कितेकास धाक सुटला, ३९ धर्ममूर्ति. शके १५७१ चे लिखितांत हे गुण नमूद आहेत. पुढील राजधर्म, क्षात्रधर्म व अखंड सावधान हीं प्रकरणें बहुतांशीं उपदेशपर आहेत. १५८१ मधील उत्तम पुरुष निरूपणांत पुढील शिवगुणांचा उल्लेख आहे.——

४० ईश्वर आहे साभिमानी।, ४१ विशेष तुळजा भवानी।, ४२ अखंडचि सावधान, ४३ न्याय, ४४ नीति, ४५ विवेक, ४६ विचार, ४७ नानाप्रसंग-प्रकार परीक्षणें, ४८ परांतर परीक्षणें, ४९ महायत्न सावधपणें, ५० समयीं धारिष्ट धरणें, ५१ अद्भुतचि कार्य करणें, (यशकीर्तिप्रतापमहिमा यांचा उल्लेख लिखितांत आला आहे) ५२ असंख्य उत्तम गुण, ५३ कितेक जनांस आधार, ५४ सदा घडे परोपकार, ५५ इहलोक परलोक पाहणें, (अखंड सावधपणा याचा उल्लेख १२ व १८ ओवींत पुन: आला आहे; या समासांत एकंदर तीन वेळ अखंड सावधपणाचा उल्लेख आहे. त्यावरून शिवराय किती सावधपणें वागत होते व समर्थहि सावधानपणास किती महत्व देत होते तें ध्यानीं येईल), ५६ बहुतजनांचें साहणें, ५७ देवाचा कैपक्ष घेणें, ५८ ब्राह्मणाची चिंता वाहणें, ५९ बहुत जनांस पाळणें, ६० धर्मस्थापना, ६१ उत्तम गुणांचा ग्राहक, ६२ तीक्ष्ण तर्क, ६३ सूक्ष्म विवेक, ६४ पुण्यश्लोक, ६५ सकळ गुणांमधें सार। तजविजा विवेक विचार। जेणें पाविजे पैलपार। अरत्रपरत्रींचा.

१६०३ मधें शंभुराजास केलेल्या उपदेशांत शिवरायाच्या च गुणांचें व वागणुकीचें चित्र त्याजपुढें श्रीसमर्थांनीं उभें केलें आहे हें शेवटच्या ३।४ ओंव्यांवरून स्पष्ट आहे. म्हणजे अमुक करावें वा करूं नये असें जें शंभु छत्रपतीस सांगितलें आहे तें तें सर्व पूर्वी शिवरायाच्या हातून तसतसें घडलें आहे. वरील दोन प्रकरणांचें सारच या तिसऱ्या प्रकरणांत आहे असें वाचकांस दिसून येईल.

१ अखंड सावधान असणें ; २ कदापि दुश्चित नसणें , ३ येकांत स्थळीं तजविजा करीत बसणें , ४ कांहीं उग्र स्थिति सांडणें , ५ सौम्यता धरणें , ६ परावी चिंता अंतर्यामीं लागणें , ७ कारभाऱ्यांचे अपराध क्षमा करून , त्यांना कामावर धाडणें , ८ आपसांतल्या भांडणानें गनीमास आंत शिरण्याची सवड न देणें , ९ धीर धरून महत्कार्य समजून करणें , १० जग राजी राखणें , ११ कार्याची अखंड लगबग असणें , १२ सकळ लोक एक करणें , १३ गनीम लाटून काढणें , १४ दिगंतरीं कीर्ति धांवेल व भूमंडळ धाकेल असे तडाखे आधीं गाजवणें , १५ समय प्रसंग ओळखणें , १६ राग आला तरी कळूं न देणें , १७ प्रजेस सलगी देऊन शोकमुक्त करणें , १८ लोक एकविचारें भरणें , १९ कष्ट करून म्लेंच राजे घसरवणें , २० आहे तितुकें जतन करणें व पुढें आणिक मेळवणें , २१ जिकडे तिकडे महाराष्ट्र राज्य करणें , २२ लोकांस हिंमत देऊन शर्तीची तरवार करणें , २३ जीवित्व तृणसमान मानणें , २४ इहपरलोकीं कीर्तिरूपें तरणें , २५ रूप , २६ साक्षेप , २७ प्रताप , २८ बोलणें , २९ चालणें , ३० सलगी देणें , ३१ सकल सुखाचा त्याग करून राज्यसाधन योग साधणें , ३२ राज्यसाधनाची लगबग .

कोणत्या हि गुणाचें दर्शन कृतीवरून च होत असतें . अर्थात् ज्या गुणांचें वर्णन श्रीसमर्थांनीं केलें , त्यांस अनुरूप अशीं महत् कृत्यें शिवछत्रपतींच्या हातून घडत होतीं हें समर्थांनीं पाहून मग च हें वर्णन केलें आहे . तीं कृत्यें कोणतीं याचा शोध इतिहासांत करावयास पाहिजे ; उपलब्ध इतिहासांत तीं सांपडत नसतील तर अधिक संशोधन व्हावयास पाहिजे .

### ८ कांहीं ऐतिहासिक प्रसंग सुचविणारीं वचनें

( १ ) या भूमंडळाचा ठाईं । धर्मरक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ यावरून महाराष्ट्राखेरीज इतर प्रांतांतील तत्कालीन कर्त्या पुरुषांची असमर्थता व शिवरायाचें वैशिष्ठ्य हीं दिसून येतात .

( २ ) कितेक दुष्ट संहारिला । कितेकांसी धाक सुटला । कितेकासी आश्रयो जाला ॥ हे कोण कोण त्याचा अधिक शोध व्हावयास पाहिजे .

( ३ ) राजकारण उदंड दाटलें । तेणें चित्त विभागलें ॥ या राजकारणाचा किंचितसा उलगडा पूर्वी केला आहे . आणखी शोध लागला तर पाहिजे .

( ४ ) कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहींयेक असला हेकाड ।० यावरून जाड प्रयत्नाचे पण हेकाड स्वभावाचे कार्यकर्ते शिवरायाच्या पदरीं १५७१ चे सुमारास अगर पूर्वी कोणी होते काय ?

(५) राजधर्मातील ११ ते १३ व 'अखंड सावधान' मधील ५ व ६ या वचनांवरून उपाधीचा कंटाळा येण्याचे, संकटांचा त्रास वाटण्याचे व धीर सुटण्याचे प्रसंग १५७७ चे वैशाखापर्यंत शिवरायावर कोण कोणते आले होते?

(६) धुरेनें युद्धासी जाणें।० (राजधर्म १४) यावरून प्रत्येक युद्धांत वा महत्वाचे कामांत स्वतः च पुढें जाण्याची शिवरायाचीप्रवृत्ति १५७१ पर्यंत तरी होती आणि त्यामुळें कार्यकर्त्या माणसास त्यांच्या शौर्यधैर्याची परीक्षा होऊन पुढें सरण्यास विशेषसा अवसर मिळत नसावा असें अनुमानितां येतें.

(७) एका मनोगतें स्वामीसेवक। असतां बरें (रा. ध. २०) यावरून कांहीं सेवकांचें मनोगत शिवरायाचे मनोगताहून त्या वेळीं वेगळें असण्याचा संभव सूचित होतो.

(८) क्षात्रधर्म ओ. १९-२०, उत्तम पुरुष निरूपण ओं. ९ आणि स्फुट प्रकरण ३६ श्लो. २७-१९ यावरून शिवरायावर ईश्वरी कृपा होती, तुळजा भवानीचें कृपाछत्र त्यांचेवर होतें हें (श. १५७१, १५८१ व १६०० या तीन सालांतील तीन वचनांवरून) श्रीसमर्थांनीं जाणलें होतें. ते स्वतः साक्षात्कारी होते; तेव्हां या बाबतींत त्यांचें च वचन प्रमाण मानिलें पाहिजे.

(९) अखंड सावधान—या प्रकरणावरून १५७७ च्या सुमाराच्या अनेक गोष्टी सूचित होत आहेत असें वाटतें. (१) कोणावर तरी विसंबून कांहीं राजकारणाची मसलत शिवरायांनीं योजिली असावी. (२) ती मसलत सिद्धीस नेण्यासाठीं ते फार अधीर झाले असावेत; इतकें कीं, अरिमित्रांचा विचार हि पुरता केला नसावा. (३) त्यास उपाधीचा कंटाळा आला होता. (४) इशारतीचें बोलों नये! या वचनावरून शिवरायांनीं जांबेस समर्थांकडे ब्राह्मणाहातीं जें पत्र पाठविल्याचा निर्देश हनुमंत स्वामींचे बखरींत आहे, त्या पत्राचे व तत्संबंधीं जी सावधानता ठेवावयास पाहिजे होती ती ठेविली गेली नसल्याचें सूचित होतें.

(१०) उत्तम पुरुष निरूपणांतील ९, १०, १२, १४, १५, या ओंव्यांवरून विशेषतः १२–१५ या ओंव्यांवरून अफजुलखानाचा प्रसंग सूचित होतो. ६ ते ८ व ११ या ओव्यांतून जे १।२ प्रसंग दिसतात त्यांचा खुलासा पूर्वी केलाच आहे.

(११) शंभुराजाचें पत्र हें तर शिवचरित्रमय च आहे. त्याचा विस्तार करावयाचा म्हणजे सगळ्या च शिवचरित्राचा उहापोह करावा लागेल. तेव्हां त्याचा विचार वाचकांनीं च विश्वसनीय अशा शिवचरित्राच्या आधारें करावा अशी विनंति आहे.

या ६ प्रकरणांखेरीज श्री वनभुवनी, श्री अध्यात्मसार, तुळजाभवानीपर स्फुटप्रकरणें आणि इतर कांहीं प्रकरणें आहेत कीं, ज्यांत शिवचरित्राचा कांहीं धागा सांपडूं शकेल व या दोन महापुरुषांचा किती जिव्हाळ्याचा संबंध होता तें ध्यानीं येईल. या श्रीसमर्थवाङ्मयाचा अभ्यास न करतां श्री शिवचरित्र लिहिलें गेलें तर तें अपुरें राहील एवढें च येथें सुचवून ठेवतों. समकालीनत्व व अत्यंत निकटचा संबंध यांमुळें शिवचरित्रसाधनांत श्रीसमर्थवाङ्मयाचें स्थान विशेष आहे, एवढें जरी इतिहासज्ञांच्या लक्षांत आलें तरी पुष्कळ होईल. असो.

## ९ श्रीसमर्थांनीं श्रीशिवरायास केलेल्या उपदेशाचा सारांश

आतांपर्यंत विवेचिलेल्या साही प्रकरणांतून श्रीसमर्थांनीं शिवरायास जो प्रत्यक्षाप्रत्यक्ष उपदेश केला त्याचें सूत्र ध्यानीं रहावें म्हणून मुख्य मुख्य वचनें पुढें दिलीं आहेत.

१ धर्मस्थापनेची कीर्ति। सांभाळिली पाहिजे ॥, २ अखंड सावधान, ३ न्यायनीति सोडूं नये; ४ उपाधीस कंटाळूं नये; ५ बंध (शिस्त) नेटके बांधावे, ६ स्वामीसेवक एका मनोगतें असावे; ७ मनुष्य राजी राखणें, ८ धर्मस्थापनेसाठीं देव मस्तकीं धरावा. ९ मराठा तितुका मेळवावा; १० महाराष्ट्र धर्म वाढवावा; ११ विवेक, विचार, दीर्घप्रयत्न सावधपणें केला चि करणें, १२ खबरदारी आणि वेंगी। तेणें सामर्थ्य चढे अंगीं ॥' १३ येकांती चाळणा करावी; १४ राजकारण पाहिलें चि पहावें, शोधिलें चि शोधावें आणि केलें चि करावें; १५ सकळ कर्ता तो ईश्वर; १६ महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट्य धरणें । अद्भुतचि कार्य करणें, १७ बहुतजनांचें साहणें; १८ मर्दें तकवा सोडूं नये। म्हणिजे प्राप्त होतो जय ॥; १९ देवदास पावती फत्ते ॥; २० पाहोन समजोन कार्य करणें। तेणें कदापि नये उणें ॥.

हें कांहीं तरी झालें आहे. रत्नांच्या राशींतली निवडानिवड नेणतें मूल जशी करील तसें च हें होऊन गेलें. ज्या प्रकरणांतून ही निवड केली आहे त्यांपैकीं राजधर्म, क्षात्रधर्म व अखंड सावधान हीं "प्रसंगानुसार वाचून मनासि आणून वर्तणूक होईल तरी त्या वचनाचा अभिमान श्री देवासि आहे" असें आश्वासन श्रीसमर्थांनीं छत्रपति संभाजीमहाराजांना १६०३ च्या पौष व. ९ रोजीं कृपापूर्वक दिलें आहे. यास्तव वाचकांनीं वरील निवड लक्षांत न घेतां मूळ प्रकरणें च 'वाचून मनासि आणून वर्तणूक' करावी आणि नस्तें धाष्टर्य केल्याबद्दल अतज्ज्ञ लेखकास क्षमा करावी अशी सविनय प्रार्थना आहे.

हात आवरतां आवरतां लेख पुष्कळ च लांबला; तथापि यांत लेखकाचें स्वतःचें असें काय आहे? सत्कार्योत्तेजक सभेनें अत्यंत परिश्रमानें स्वार्थत्यागाचें

पाणी घालून श्रीसमर्थवाङ्मयाची जी दैदीप्यमान पुष्पवाटिका गेल्या ५० वर्षांत निर्माण केली, तिच्यांतील कांहीं पुष्पें यथाशक्तिउचलून समर्थभक्तांच्या हातीं दिलीं आहेत; अधिक कांहीं नाहीं. श्रीशिवसमर्थभक्तांच्या सेवेचा आणि सत्कार्योत्तेजक सभेच्या ऋणांतून किंचितसें उतराई होण्याचा योग अकल्पितपणें आला याचा आनंद होतो. ज्या श्रीशिवसमर्थांच्या कृपेनें व प्रेरणेनें हें सर्व घडून आलें त्यांच्या चरणीं त्यांच्या च शब्दांनीं प्रार्थना कीं,

दुष्ट संहारिले मागें। ऐसें उदंड ऐकतों।
परंतु रोकडें कांहीं। मूळ सामर्थ्य दाखवा ॥

---

# (११)

## श्रीसमर्थांच्या जीवींचें आर्त

### मराठा आणि महाराष्ट्रधर्म व राज्य

(लेखक—रा. **त्रिंबक रामकृष्ण गद्रे**, बी. ए., एल्‌एल्. बी., **अकोला**)

मराठा तितुका मेळवावा। आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा।
येविषयीं न करितां तकवा। पूर्वज हांसती ॥ १३ ॥
—क्षात्रधर्म

महाराष्ट्रराज्य करावें। जिकडे तिकडे ॥
—श्रीसमर्थांचें छत्रपति संभाजीराजांना पत्र

**(१) श्रीसमर्थांच्या जीवींचें आर्त :—मराठा, महाराष्ट्रधर्म व राज्य**

श्रीसमर्थांची व त्यांचे अत्यंत आवडते श्रीशिवराय यांची गुरुशिष्य या औचित्यपूर्ण नात्यानें भेट झाल्यावर उभयतांत जें संभाषण झालें त्यावेळीं श्रीसमर्थांनीं वर उल्लेखिलेल्या "क्षात्रधर्म" प्रकरणांतील उपदेश "राजधर्म" "सेवकधर्म" इत्यादि उपदेशांबरोबर च केला. "क्षात्रधर्म" ही तरुण मराठ्यांना श्रीशिवरायांच्या ध्वजाखालीं एकत्र होण्यासाठीं 'आज्ञा' किंवा हांक होती, महाराष्ट्रांतील यच्च्यावत तरुणांना (क्षात्रिय वृत्तीच्या सर्व जातींतल्या तरुणांना) हें निमंत्रण होतें. "मराठा" शब्दाचा हा च अर्थ श्रीसमर्थांच्या मनांत असला पाहिजे असा अभिप्राय मराठ्यांच्या इतिहासाचे द्रष्टे न्या. मू. रानडे यांचा हि आहे. "थोडक्यांत समर्थांच्या बोधाचें लक्षण सांगतों ... समर्थांचा उपदेश अर्ध्या ओंवींत आहे. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा.' मराठा हा शब्द व्यापक आहे. शिवाजीच्या पदरीं ब्राह्मण, शेणवी, प्रभू आदिकरून सर्व प्रकारचे मराठे होते[१]." (क्षात्रधर्म प्रकरण आज ही आमच्या तरुणांनीं वाचून त्याचें मनन केलें पाहिजे.) असे मराठे मिळवावे हें श्रीसमर्थांच्या जीवींचें पहिलें '**आर्त**' होय. त्यांचें दुसरें '**आर्त**' म्हणजे "आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा" हें होय. न्या. मू. रानडे यांच्या मतें "महाराष्ट्रधर्म हा हिंदुधर्माहून भिन्न आहे. त्याच्या तोडीचा जेमतेम इंग्रजी शब्द patriotism होईल." "दासबोध

---

१ न्या. मू. रानड्यांचीं धर्मपर व्याख्यानें; चौथी आवृत्ति: पृष्ठ २०३ पहा.

राजनीति व व्यवहारनीति यांची Encyclopedia आहे. या ग्रंथाचें काळजीपूर्वक अध्ययन केलें, तर महाराष्ट्रधर्म म्हणजे काय हें कळेल." म्हणजे त्यांच्या मतें श्री समर्थांनीं आपल्या ग्रंथराज दासबोधांत या धर्माचें विवेचन केलें आहे. त्या धर्माचा विस्तार करणें म्हणजे च महाराष्ट्रराज्याची स्थापना करणें हें तिसरें "**आर्त**" त्यांचें होतें. छत्रपति संभाजीमहाराजांना पत्र पाठवून श्रीसमर्थांनीं याबद्दल स्पष्ट आज्ञा केली आहे. श्रीसमर्थ सदरहु पत्रांत म्हणतात :– "आहे तितुकें जतन करावें, पुढें आणिक मेळवावें, **महाराष्ट्रराज्य करावें**, जिकडे तिकडे." आतां आपणांस श्रीसमर्थांच्या जीवींचीं तीन ही आर्तें त्यांच्या च शब्दांनीं कळलीं असें घेऊन चालूं या.

**(२) महाराष्ट्रमहोदयाचा उषःकाल :— पितुःश्री शहाजी राजे**

शहाजी राजे हे महाराष्ट्रमहोदयाच्या उषःकालाचे निर्माणकर्ते होते. "उत्तरेंत शहाजहान आणि दक्षिणेंत शहाजी अशी त्यांची त्या कालांत सर्वत्र कीर्ति होती. श्रीशिवरायाच्या नांवाच्या मुद्रेंत "**शाहसूनोः** शिवस्यैषा मुद्रा" असे अत्यंत अर्थसूचक शब्द आहेत. यावेळीं श्रीशिवाजी राजे केवळ बाल्यावस्थेंत फार तर पंधरा वर्षांचे असतील. शहाजी राजांचें नांव महाराष्ट्रांत, कर्नाटकांत आणि दक्षिणेंत रामेश्वरपर्यंत आणि उत्तरेस वाराणशी क्षेत्रांपावेतों "क्षात्रधर्मस्य नवावतारः" म्हणून प्रसिद्धीस आलें होतें. ते मराठा–क्षत्रियांचे आदर्श होते. श्रीसमर्थांच्या हि दृष्टीसमोर नाशिक–पंचवटींत पुरश्चरण, तपश्चर्या, वेदाध्ययन आणि विद्याभ्यास करीत असतांना नगरची निजामशाही आपल्या तंत्रानें चालविणारे हेच भोंसले–कुलोत्पन्न व वयानें चौदा वर्षें ज्येष्ठ असलेले शहाजी राजे वावरत होते. महाराष्ट्राला सद्बुद्धि दे अशा पवित्र गायत्री मंत्राचा जप करणारे महर्षि या राजर्षीच्या हालचालीकडे मोठ्या कौतुकानें व आदरानें पहात असले पाहिजेत. **रामदास** म्हणून त्यांची ही कीर्ति राजर्षीच्या कानांवर आली असली पाहिजे व पुरश्चरणाच्या द्वादश वर्षांच्या अंतिम कालांत शहाजी राजे व आपले "रामदास" यांच्या गांठीभेटी पवित्र नाशिक क्षेत्राजवळपास झाल्या असल्या पाहिजेत. या वेळीं जो विचारविनिमय झाला त्यांत समर्थांनीं एक तप भरतखंडाचें सर्वांगीण अवलोकन करून त्याची माहिती रात्रंदिवस युद्धांत निमग्न असलेल्या क्षत्रियोत्तमाला द्यावी असा संकेत ठरला व त्याची च प्रसिद्धी समर्थांना श्रीरामचंद्राची अशी आज्ञा झाली या सांकेतिक रहस्यमय भाषेंत झाली असें कां म्हणूं नये? मलिकंबर व चांदबीबी यांनीं मोगलाशीं निजामशाहीच्या संरक्षणार्थ युद्ध केलें. या

१ सहाव्या सुमनहारांतील आमचा "श्रीरामदासांकित दक्षिण हिंदुस्थान" पृ. ३० वरचा पहिला परिच्छेद पहा.

युद्धांत शहाजींचे वडील व चुलते मालोजी व विठोजी आणि सासरे लखुजी जाधव यांनीं मोठा पराक्रम केला. परंतु हा प्रयत्न अयशस्वी झाला. शहाजी राजे केवळ तेरा चौदा वर्षांचे असतांना मालोजी राजे कालवश झाले व त्यांची जागा त्यांच्या सुपुत्रानें घेतली. स. १६३१ त मलिकंबरच्या मुलानें नगरच्या निजामचा वध केला. या वेळीं शहाजीराजे पुढें आले व त्यांनीं तख्तावर दुसरा अल्पवयी निजाम बसवून राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. निजामाला मांडीवर घेऊन ते तख्तनशीन होत असत! स्वपराक्रमानें त्यांनीं कोंकण व निरा ते चांदोरपर्यंत 'देशा'वर आपला अंमल बसविला. शहाजी राजांवर मोगलांना स्वारी करणें भाग पडलें व पंचवीस हजार फौज राजांचा किल्लोकिल्लीं पाठलाग करू लागली. स. १६३२ ते १६३६ पर्यंत हा हुतूतूचा डाव राजे खेळत होते[१]! परंतु मोगलांच्या प्रचंड सेनेसमोर त्यांना पड घ्यावी लागली व शहाजहान बादशहाच्या संमतीनें च त्यांनीं विजापूरच्या दरबारांत मोठ्या सन्मानानें – नव्हे बरोबरीनें प्रवेश करून घेतला.

## (३) महाराष्ट्रांत दैवीशक्तीचा प्रादुर्भाव :— मातुःश्री जीजाबाई

मातुःश्री जीजाबाईच्या रूपानें त्या वेळीं महाराष्ट्रांत दैवी शक्तीचा प्रादुर्भाव झाला होता. जीजाबाईसाहेबांवर बाल शिवरायाचें अत्यंत प्रेम. या च प्रेमानें देवीच्या रूपानें ईश्वरभक्तीचें स्वरूप घेतलें व पुढें महाराजांच्या अंगांत शक्तिसंचार होऊं लागला. याला च न्या. मू. रानडे यांनीं Voice of God असें यथार्थपणें संबोधिले आहे. संकटसमयीं देवीची आज्ञा समजून घेण्यासाठीं एकांत स्थळीं ते बसत व भान नाहींसें झाल्यावर ते कांहीं शब्द उच्चारीत. हें शब्द टिपून घेण्यांत येत व त्याप्रमाणें धोरण आंखण्यांत येई. शहाजी राजांचा सहवास व प्रेम प्रायः त्यांना परिस्थितीमुळें मिळूं शकलें नाहीं. त्यामुळें मातृदैवत च महाराजांना प्रेमाचें व विश्वासाचें निधान झालें. आणखी ही जरा बारकाईनें अवलोकन केल्यास असें दिसून येईल कीं, त्या कालांत महाराष्ट्रांत क्षत्रिय समाजांत देवीच्या रूपानेंच ईश्वराला भजण्यांत येत असे. विदर्भ – मराठवाड्यांतलें प्रसिद्ध "मातापूर" (माहुर) हें देवीचें स्थान, गोवर्धन–स्यूणदेशांतलें "सतश्रंग" नावाचें शक्तिपीठ, कोल्हापुरच्या अंबाबाई किंवा महालक्ष्मी आणि दक्षिण महाराष्ट्रांतल्या तुळजाभवानी या देवीच्या स्थानांचा येथें प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. पुढें तुळजाभवानीच्या स्थानाला प्रतापगडच्या देवीच्या स्थानाची जोड मिळाली. मात्र दोन्ही स्थानांतल्या देवीचें नांव तुळजाभवानी च मानण्यांत येतें. श्रीसमर्थांना हें नांव अत्यंत प्रिय. त्याचा उल्लेख शिवरायांना एका बिकट व विशिष्ट प्रसंगीं त्यांच्याकडून संदेश पाठविण्यांत आला

१ Vide Ranade's "Rise of the Maratha Power" at Page 41.

त्यावेळीं याप्रमाणें केलेला आहे :—" बरें ईश्वर आहे साभिमानी, विशेष तुळजाभवानी, परंतु विचार पाहोनी, कार्य करणें." [1] आणखी एक त्यांचा श्लोक पहा. तुळजापुरची च देवी प्रतापगडला आली त्याला धरून तो आहे. ते म्हणतात:— तुळजापुर टाकोनी चालली पश्चिमेकडे, पारघाटीं **जगन्माता** सध्या येऊन राहिली." श्रीसमर्थ नवस फेडण्यास गेले होते तेव्हांची ही पद्यपंक्ति आहे. या च प्रसंगीं त्यांनीं आपलें अंतःकरण देवीपुढें याप्रमाणें उघडें केलें आहे. ते म्हणाले:—" रक्षिता देव देवांचा, त्याचा उत्साह इच्छिला," " एक चि मागणें आतां द्यावें तें मजकारणें, तुझा तूं वाढवी राजा शीघ्र आम्हां चि देखतां " " रामदास म्हणे माझें सर्व आतुर बोलणें, क्षमावें तुळजे माते इच्छा पूर्ण तें करी. [2]"

**( ४ ) महाराष्ट्रानें उभारलेलें देवालय :— संतश्रेष्ठ श्री तुकाराम**

महाराष्ट्रमहोदयाच्या कालांत सामान्य जनतेंत धार्मिक व नैतिक तत्वांचा प्रसार करून त्यांचें धर्मबल वाढविणें, त्यांना आत्यंतिक त्यागाचे धडे देणें आणि हिंदु–मुसलमान हा भेद न करतां ईश्वरासमोर सर्व सारखे आहेत अशी शिकवण प्रसृत करून सर्व परकीय संस्कृतीच आर्यसंस्कृतीच्या आहारीं आणणें हा प्रचंड उद्योग सर्व जातींतल्या मराठी संतांनीं ज्ञानेश्वरापासून तो तहत तुकारामापर्यंत केला. यांत स्त्रिया हि होत्या. जनांना न्यायनिष्ठुरता आणि अभयवृत्ति आमच्या संतमंडळींनीं शिकविली. संघटनेच्या द्वारें हजारों नव्हे लाखों धर्मवीर पताका घेऊन विठूचा गजर करूं लागले, हरिनामांत दंग झाले, पंढरपुरानजीक भीमा–चंद्रभागेच्या कांठीं झेंडा रोवते झाले. या ऐतिहासिक घटनेचें चित्र व मूल्य आपणास न्या. मू. रानडे यांच्या Rise of the Maratha Power या पुस्तकाच्या The Saints and Prophets of Maharashtra या अपूर्व प्रकरणांत उत्कृष्टपणें पहाण्यास मिळतें. ज्ञानेश्वरांनीं ज्याचा पाया घातला व नामदेवांनीं ज्याचा विस्तार केला तें देवालय सुमारें दोनशें वर्षें थोडेसें औदासिन्याच्या सावलींत सांपडलें होतें. परंतु बहामनी किंवा ब्राह्मणी नामधारी परधर्मीय परंतु सर्वस्वी हिंदु आणि मराठी वीरांच्या मुत्सद्यांच्या आणि कारकुनांच्या आधीन असलेल्या दक्षिणेंतील राज्यांच्या कालांत पैठण किंवा प्रतिष्ठान येथील श्री एकनाथस्वामी यांनीं या भागवत मंदिराला भागवत व रामायण आणि इतर उद्बोधक काव्य यांच्या द्वारा कधीं न डगमगणाऱ्या अशा स्तंभांची जोड मिळवून दिली. त्यांचें देवीचें स्तोत्र "दार उघड, बया, दार उघड" हें प्रभावी ठरलें. या स्तोत्रांत महाराष्ट्रांतील प्रमुख महालक्ष्मीची मनोभावें नाथांनीं विनवणी केली आहे. त्यांचा

---

१ दासबोध दशक १८ समास ६ ओंवी ९ वी.

२ प्रतापगडीं नवस फेडण्याकरितां गेले तेव्हां समर्थांनीं केलेलें देवीचें स्तोत्र.

अवतार ज्या वर्षी संपला त्या च स. १६०८ सालीं दोन महापुरुषांचा धर्मकार्य करण्यासाठीं "आनंदवनभुवनां"त जन्म झाला. ते ह्मणजे जांबचे श्रीसमर्थ आणि देहूचे श्रीतुकाराम. आपल्या हरिभक्तीनें श्रीतुकाराम महाराज हे संतश्रेष्ठ या पदवीस पुढें यथार्थपणें प्राप्त झाले. त्यांची भागवत मंदिरावर कळस चढविण्याच्या स्वरूपाची अद्भुत कामागिरी आहे. त्यांची ईश्वरशरणता, वैराग्य आणि भक्ति याला मोल नाहीं. त्यांनीं देहू, लोहगांव, आणि पुणें येथें कीर्तनाचा अक्षरशः पाऊस पाडला आणि आमचे बालाचे तरुण होणारे श्रीशिवराय साहजिकपणें त्यांच्याकडे आकर्षिले गेले. ते त्यांच्या कीर्तनास निर्भयपणें जाऊं लागले.

**(५) श्रीतुकारामांकडून श्रीसमर्थांकडे :— शिंगणवाडीचें सौभाग्य**

एकदां श्रीतुकाराम महाराजांना श्रीशिवरायांनीं अबदागिरी वगैरे (घोडा, कारकून, इ.) पाठवून आपल्या येथें येण्यास विनविलें, त्यावेळीं त्यांनीं जे उद्गार काढले ते विरक्त संताला शोभण्यासारखे च होते. दुसऱ्या एका प्रसंगीं महाराज कीर्तनास उपस्थित असतां परचक्र-वेढा पडला, त्यावेळीं श्रीतुकारामांनीं प्रभूचा जो निर्वाणीचा धांवा केला आणि "न करावी चिंता, भय न धरावें सर्वथा, दासां साहे नारायण, होय रक्षिता आपण" असे निर्भय वृत्तीचे व आश्वासनपर उद्गार काढले ते अपूर्व च होत. घनदाट मेघांच्या विसर्जनाप्रमाणें हें संकट नाहींसें झालें हें सर्वविश्रुत आहे. श्रीशिवरायांनीं आपला आग्रह सोडला नाहीं. तेव्हां श्रीतुकारामांनीं त्यांना पत्र पाठविलें आणि निमंत्रण स्पष्टपणें नाकारतांना त्यांनीं श्रीसमर्थांकडे जाऊन त्यांच्या ठिकाणीं मन चळूं न देण्याचा योग्य सल्ला दिला. पुढें श्रीशिवराय स्वतः या च बाबतींत दर्शनास आले असतांना श्रीतुकाराम महाराजांनीं हा च उपदेश केला. यावेळचे कांहीं अभंग असे आहेत:–"राया छत्रपति ऐकावें वचन, रामदासी ध्यान लावा वेगीं ॥ १ ॥ रामदास स्वामी सोयरा सज्जन, यासी तूं नमन अर्पी बापा ॥ २ ॥" असो.

श्रीसमर्थ कृष्णाकांठीं आल्यावर या महापुरुषांच्या भेटी होऊन त्याचा परिणाम घनदाट मैत्रींत झाला. संतविजयांत महिपतीनें हें सविस्तर कथन केलें आहे. श्रीसमर्थ स्वतः पंढरपूर क्षेत्रीं गेले व तेथें श्रीतुकारामांच्या कीर्तनांचें श्रवण करते झाले. एका कीर्तनाच्या विषयाला "पृथक मी सांगों किति, धर्मनीति सकळ," हा अभंग त्यांनीं घेतला होता. श्रीसमर्थांची ही कीर्तनें पंढरीच्या वाळवंटांत झालीं. श्रीविठ्ठलानें श्रीरामचंद्राच्या रूपानें श्रीसमर्थांना दर्शन दिलें ही घटना ही या वेळची च. पुढें या च क्षेत्रीं उभयतांच्या गांठींभेटी होऊं लागल्या व एका प्रसंगीं तर स्वतः श्रीशिवराय ही उपस्थित होते. त्यानंतर शिंगणवाडी येथें महाराष्ट्राच्या सौभाग्यानें स. १६४९ ला गुरुवार रोजीं श्रीशिवरायाला 'लघुबोध'

म्हणून प्रसिद्ध असलेल्या दासबोधांतील तेराव्या दशकांतील सहाव्या समासांतर्गत उपदेश श्रीसमर्थांनीं शिष्याची दीक्षा देतांना आपल्या अत्यंत प्रिय शिष्योत्तमाला केला. यापूर्वी श्रीसमर्थांनीं आपल्या शिष्याला एक अत्यंत सन्मानानें संबोधणारें पत्र पाठविलें होतें तें आतां पाहूं.

**(६) महाराष्ट्राच्या छत्रपतींना वंदन :— श्री छत्रपति शिवाजीमहाराज**

एका अर्थानें महाराष्ट्रानें आपल्या श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांना कसें प्रेमादरपूर्वक वंदन करावें याचा वस्तुपाठ च या पत्रांत श्रीसमर्थांनीं दिला आहे. या पत्रांतील ओंव्या पंध्राच आहेत. त्यांतील पुढील ओंव्यांत श्रीसमर्थांनीं आपलें श्रीशिवराय-प्रेम ओतलें आहे. या पहा त्या ओंव्या.

निश्चयाचा महामेरु, बहुत जनांसी आधारु।
अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी ॥ १ ॥

**देवधर्म गोब्राह्मण, करावया संरक्षण।**
**हृदयस्थ जाला नारायण, प्रेरणा केली ॥ ८ ॥**

या भूमंडळाचे ठायीं, धर्म रक्षी ऐसा नाहीं।
**महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं**, तुह्मा करितां ॥ १० ॥

कित्येक दुष्ट संहारिले, कित्येकास धाक सुटले।
कित्येकांस आश्रय झाले, शिव कल्याण राजा ॥ १२ ॥

सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति, सांगणें काय तुम्हांप्रति।
धर्मस्थापनेची कीर्ति, संभाळली पाहिजे ॥ १४

या च प्रसंगीं श्रीसमर्थांनीं श्रीशिवरायांना "सावधता" व इतर प्रकरणें निरूपिलीं आहेत. श्रीशिवरायांच्या संबंधानें त्यांचें प्रेम दासबोधाच्या अठराव्या दशकाच्या सहाव्या समासांत ही प्रगट झालें आहे, व तें "उत्तम पुरुष निरुपण" या नावांनें प्रसिद्ध आहे. या समासांतील पुढील ओंव्या श्रीसमर्थांच्या जीवीचें गुज व्यक्त करीत आहेत; ते म्हणतात:—"सकळ कर्ता तो ईश्वर, तेणें केला अंगिकार, तया पुरुषाचा विचार, विरळा जाणे ॥ १३ ॥ धर्मस्थापनेचे नर, ते ईश्वराचे अवतार, जाले आहेत पुढें होणार, देणें ईश्वराचें ॥ २० ॥" आम्ही ही या प्रसंगीं या शिष्योत्तमाला वंदन करतों.

## (७) महाराष्ट्र धर्मराज्य - वर्धिष्णु सार्वभौम मराठा - मंडळ

श्री छत्रपति शिवाजी महाराज यांनीं महाराष्ट्र धर्मराज्य स्थापण्याचा प्रचंड उद्योग केला, त्याचें पर्यवसान स्वतंत्र हिंदुपदपादशाही स्थापण्यांत होऊन त्याचें निदर्शक म्हणून श्रीशिवरायांना शनिवार ता. ६ जून १६७४ दिवशीं शके १५९६ आनंदनाम संवत्सरीं ज्येष्ठ शुद्ध १३ ला **वैदिक विधिपूर्वक** पंडित गागाभट्टाच्या हस्तें रायगडावर अत्यंत थाटानें व उत्साहानें राज्याभिषेक करण्यांत आला. या प्रारंभिलेल्या सत्कार्याचा च फलस्वरूप परिणाम लवकर च हिंदवी स्वराज्य म्हणजे सार्वभौम मराठा - मंडळ स्थापण्यांत झाला. श्रीसमर्थांच्या जीवीचीं आर्तें हीं च असावींत नाहीं बरें ?

---

## (१२)

# समर्थांची शिकवण व थिऑसफी

(लेखक – प्रो. **राजाराम सखाराम भागवत**, एम्. ए., ठाणें)

अलिकडच्या काळीं धर्माशीं संलग्न असलेल्या ज्या नव्या चळवळी जगांत उदयास आल्या आहेत, त्यांपैकीं सायकिकल रीसर्च, स्पिरिच्युॲलिझम्, व थिऑसफी या तीन च चळवळी अनुभव व साक्षात्कार यावर आधारलेल्या आढळतील. या तिघांस चमत्कारसंशोधन, परलोक – विद्या व आत्मविद्या अशीं मराठी नांवें अनुक्रमें देण्यांत येत असतात. यांपैकी सायकिकल रीसर्चच्या क्षेत्रांत सर्व च चमत्कारिक गोष्टींचें संशोधन येत असल्यामुळें त्या चळवळीचा धर्माशीं अगदीं थोडा संबंध येतो. परलोक – विद्येच्या क्षेत्रांत मरणोत्तर स्थितीचा प्रश्न मुख्य असून मृत माणसांचा जिवंत माणसांशीं संबंध जोडण्याचा उद्योग ती चळवळ करते. अर्थात् धर्माचा त्या चळवळीशीं अधिक संबंध आहे. पण परलोक – विद्येंत धर्माच्या क्षेत्रांतील इतर प्रश्न येत नाहींत. थिऑसफीच्या चळवळींत धर्माच्या क्षेत्रांतले यच्चयावत् सर्व मुद्दे येत असल्यामुळें या तिन्हीं क्षेत्रांपैकीं थिऑसफीचें क्षेत्र धर्माच्या अगदीं जवळ येणार हें उघड आहे. थिऑसफींतील धर्माची मांडणी सायन्सला धरून आहे. आधुनिक सायन्स प्रयोगप्रधान आहे. सायन्समध्यें ज्याला प्रयोग म्हणतात त्याला च धर्माच्या क्षेत्रांत अनुभव, प्रचीति, साक्षात्कार अशीं नांवें देण्यांत येत असतात. समर्थांचे ग्रंथ अवलोकिले, तर ठिकठिकाणीं "हें अनुभवासि ये" "मुख्य आत्मप्रचीति" "तें अनुभवें जाणावें" "हें तों प्रचीतीचें बोलणें" असें त्यांनीं सांगितलेलें आढळतें. अर्थात् समर्थांच्या शिकवणीला आधार तर्कअनुमानादिकांचा नसून अनुभव – साक्षात्कारांचा आहे हें समर्थभक्तांस विदित आहे. थिऑसफीच्या चळवळीस ही अनुभव – साक्षात्कारांचा च आधार आहे. सर्व जगभर अनुभव एक च असावयाचा. साखरेच्या चवीविषयीं नुस्तीं अनुमानें केलीं तर निरनिराळया लोकांचीं अनुमानें निरनिराळीं होतील. पण साखरेची चिमटी जिभेवर ठेऊन तिच्या चवीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला तर सर्व देशांत, सर्व काळीं सर्वांना एक च अनुभव आला पाहिजे, हें उघड आहे. या दृष्टीनें समर्थांचे साक्षात्कार व थिऑसफींतले साक्षात्कार यांचा अभ्यास करून त्यांची तुलना करणें उपयुक्त होईल. सर्व साक्षात्कारांची तशी तुलना करण्यास समर्थवाङ्मयांतला व थिऑसफींतला जो अधिकार लेखकास अवश्य आहे तो माझे ठायीं नाहीं. पण समर्थवाङ्मय व थिऑसफी यांचा माझा थोडाफार परिचय आहे. त्यामुळें या दोन चळवळींतल्या

अनुभवांत विलक्षण प्रकारचें साम्य आहे असें माझें मत झालें आहे. त्या अनुभवांपैकीं कांहीं अनुभव मी प्रस्तुत लेखांत वाचकांसमोर ठेवीत आहे. मला आशा आहे, कीं पुढील लेखांतील मुद्दे वाचून कांहीं जणांना तरी असें वाटेल, कीं समर्थ व इतर महाराष्ट्रीय संत यांचे अनुभव विस्तृत प्रमाणावर संकलित करून त्यांची थिऑसफीशीं तुलना केल्यास या दोन्हीं चळवळींचें हित होणार आहे. या दोन्ही चळवळी स्वतंत्र असल्यामुळें त्यांतील स्वतंत्र अनुभवांत साम्य आढळल्यास तें साम्य दोन्हीं चळवळींना दुजोरा देईल. खेरीज दोन्हीं चळवळींतील विषयाची मांडणी भिन्न आहे म्हणून एका च साक्षात्काराचीं वेगळीं वर्णनें आपणांस मिळून त्या साक्षात्कारांचें मर्म समजण्यास सोपें जाईल. पुढेंमागें कोणी तरी हा सारा उद्योग करावा या आशेनें या लहानशा लेखांत समर्थांच्या व थिऑसफीच्या साक्षात्कारांविषयीं मी दोनचार मुद्दे वाचकांसमोर ठेवीत आहे.

थिऑसफीचें असें म्हणणें आहे, कीं जगांतील निरनिराळ्या धर्मांच्या संस्थापकांनीं धर्मस्थापना व धर्मप्रसार या संबंधानें एक सर्वसामान्य धोरण ठेविलेलें आहे. सामान्य जनतेला जितकें ज्ञान पचेल आणि पेलेल व ज्या ज्ञानाचा सामान्य जनता दुरुपयोग करूं शकणार नाहीं तें व तितकें च ज्ञान हे धर्मसंस्थापक सर्वांना मुक्त हस्तानें देतात. या धर्माच्या भागास Exoteric 'बहिरंगी' असें म्हणतात. धर्मांतील जो भाग वरच्या दर्जाचा आहे, जो सामान्य जनांच्या आटोक्याबाहेरचा आहे, जो त्यांच्या समोर ठेवल्यानें गैरसमजुती होतील किंवा ज्याचा दुरुपयोग होईल तें ज्ञान हे संस्थापक बहुजनांपासून गुप्त ठेवतात. या भागास Esoteric 'अंतरंगी' असें नांव आहे. हें गुप्त ज्ञान अधिकारी व निवडक अशा लोकांस मिळावें यासाठीं जगांत संप्रदाय किंवा ज्यांना इंग्रजींत Mysteries असें नांव आहे त्या संस्था स्थापलेल्या असतात. Mysteries चे Higher Mysteries व Lower Mysteries असे दोन भाग असतात. पैकीं जगाच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या संप्रदाय संस्था ह्या Lower Mysteries असतात. त्यांत शिरणाराला गुप्त ज्ञानांपैकीं खालच्या पायरीवरचें ज्ञान मिळतें. तें मिळवून जो अधिकारी झाला त्याला च पुढें Higher Mysteries चें ज्ञान मिळूं शकतें. धर्मसंस्थापकांनीं Lower Mysteries चे संप्रदाय आपापल्या शिष्यांच्या हातीं दिलेले असतात आणि Higher Mysteries चा भाग स्वतःच्या हातांत ठेवलेला असतो. समर्थ रामदासांसारखा पुरुष जेव्हां सामान्य जनतेस ज्ञान देतो तेव्हां एका विशिष्ट मर्यादेपर्यंत च तो ज्ञान देतो. त्यापलिकडे कांहीं गुप्त ज्ञान आहे हें तो कमीअधिक स्पष्टपणानें सुचवील, पण तो तें प्रकट करणार नाहीं.

समर्थांचे ग्रंथ वाचल्यास थिऑसफींत दाखविलेलें हें धोरण वाचकांच्या प्रत्ययास येईल. कधीं कधीं समर्थांनीं

आकाशमार्गीं गुप्त पंथ। जाणती योगिये समर्थ।
इतरांस हा गुह्यार्थ। सहसा न कळे ॥ १–९–५

किंवा

मार्ग होये परी अंतरिक्ष। ४–४–१३

अथवा

येक योगी गुप्तपंथें। ब्रह्मभुवना पावले ॥ १–१०–१३

असें गुप्त ज्ञानाच्या अस्तित्वाचें स्पष्ट वर्णन केलें आहे. कधीं कधीं स्पष्ट न बोलतां समर्थांनीं महत्त्वाच्या मुद्यापाशीं यावें व तो मुद्दा न सांगतां तसा च सोडून द्यावा असें केलें आहे. उदाहरणार्थ, ज्ञानी पुरुषांचें वर्णन सांगतांना

म्हणौनि सद्गुरु वर्णवेना। हे गे हे चि माझी वर्णना।
अंतरस्थितीचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती ॥ १–४–३१

व

इतरांस हें काये सांगणें। खरें खोटें कोण जाणे।
साधुसंताचिये खुणे। साधुसंत जाणती ॥ ६–९–१८

अथवा

जीवन्मुक्तांचीं लक्षणें। जीवन्मुक्त जाणे ॥ ६–९–३३

असें समर्थांनीं सांगितलें आहे. चाणाक्ष वाचकानें येथें मुद्दाम थबकावें, असें समथ कां बोलतात त्याचा विचार करावा व पुढील भाग गुप्त असल्यामुळें तो मुद्दाम सोडून दिलेला आहे हें त्यानें उमजावें व मग तें वरचें ज्ञान मिळविण्याचा अधिकार स्वतःचे अंगीं आणण्याची त्यानें खटपट करावी अशी समर्थांची अपेक्षा आहे. आपल्या शिकवणींतील कांहीं भाग गुप्त व खोल आहे याची कल्पना वाचकांस येण्याकरितां कधीं कधीं त्यांनीं एक शब्द दोन अर्थानें योजलेला आहे. उदाहरणार्थ, त्यांनीं आपल्या श्रोत्यास आणि शिष्यांस 'संत' शब्द लावला आहे. (दा. १–६), आणि स्वतःहून श्रेष्ठ असणाऱ्या श्रीरामचंद्रादिकांस ही 'संत' म्हटलें आहे (दा. १–५), व एके ठिकाणीं

तैसा मी संतांचा अंकित। तुम्हां संतांपासीं बोलत। १–६–२०

असा स्वतःचा उल्लेख करून माझे पाठीमागें माझ्याहून मोठी असलेली श्रीरामचंद्रादिकासारखी मानव्याची पराकोटी गाठलेलीं माणसें असून मी त्यांचा

नोकर आहे व त्यांच्यापासून मी स्वतः उच्च ज्ञान मिळविलेलें आहे असा ध्वनि काढला आहे. श्रीरामचंद्रादिकांपासून समर्थांना जें उच्च ज्ञान मिळालें असणार तें वरील परिभाषेप्रमाणें Higher mysteries मध्यें येणार, जें समर्थांनीं स्पष्ट न सांगतां ग्रंथांत नुसतें ध्वनित केलें आहे, आणि जें समर्थ फक्त आपल्या अधिकारी शिष्यांना च सविस्तर सांगत तें गुप्त ज्ञान Lower mysteries मध्यें येणार आणि जें ग्रंथांत उघड मांडलें आहे त्याचा समावेश Exoteric विभागांत येणार. समजूतदारपणानें जो समर्थांचे ग्रंथ वाचील त्याला या साऱ्या विभागांच्या खुणा कमीअधिक स्पष्टपणानें सर्वत्र विखुरलेल्या आढळतील.

अर्थात् धर्माच्या मांडणीचें असें हें धोरण असल्यामुळें साक्षात्कारासारखे परम पवित्र अनुभव समर्थांच्या ग्रंथांत चवाठ्यावर मांडलेले आढळणार नाहींत हें उघड आहे. साक्षात्कार हा धर्मांतला अत्यंत मोठ्या ऐश्वर्याचा अत्यंत कोमल, अत्यंत उच्च, व अत्यंत तेजस्वी भाग होय. तो नीट उमजण्याचा व त्यापासून योग्य तो फायदा घेण्याचा अधिकार फार थोड्यांच्या ठायीं असतो. सामान्य जनतेसमोर तो ठेवल्यास दुराग्रह, भ्रम, भोळसटपणा, अज्ञान, गैरसमजुती, थट्टा, पाखंडीपणा, वगैरे दोषांची समाजांत पेरणी होण्याचा बळकट संभव असतो. म्हणून च धर्मसिद्धांताच्या पुराव्याचा हा जो अत्यंत महत्त्वाचा भाग तो नाइलाजास्तव अधिकारी माणसें सर्वांसमोर ठेऊं शकत नाहींत. यामुळें च एकवीससमासींत

> कांहीं साक्षात्कार जाला। तो सांगों नये दुसऱ्याला।
> जरी आळकेपणें सांगितला। तरी पुन्हां होणार नाहीं ॥ १९–४९
> म्हणोनी साक्षात्कार अलोलिक। प्रगट सहसा करूं नये॥ ४८

असा उपदेश समर्थांनीं केला आहे. तसें च स्वतःच्या अंतरंगाविषयींच्या अधिकाराबाबतही शहाण्या माणसानें

> आत्मस्थिती बोलों नये। १४–१–७१

असा दासबोधांत निर्बंध घातला आहे. अर्थात् साक्षात्कारांसारख्या अंतरंग गोष्टी समर्थवाङ्मयांत अगदीं उघड मांडलेल्या फारशा सांपडणार नाहींत, व ज्या सांपडतील त्या सूक्ष्म नजरेनें तपासल्यावर च सांपडतील हें सांगणें नको. आपल्या विषयप्रतिपादनास ही एक अडचण आहे.

समर्थांना श्रीरामचंद्राचा साक्षात्कार झाला होता असें त्यांच्या लिहिण्यावरून दिसतें. दशक ५ समास ६ व दशक ६ समास ७ मध्यें समर्थांनीं स्वतःविषयीं जे उद्गार काढले आहेत, ते पहाण्यासारखे आहेत. एकवीससमासींत त्यांनीं जास्त स्पष्ट लिहिलें आहे कीं, ज्या माणसास आज ही रामाचा साक्षात्कार हवा असेल,

त्यानें काय साधन करावें तें मी सांगूं शकतो ( १५-३७ ), निदिध्यास केल्यास निश्चित साक्षात्कार होतो असें ही त्यांनीं आणखी म्हटलें आहे ( १५-५१ ). त्यांच्या स्फुट प्रकरणांत "राघवाचा योग रामदासी," "रामीं रामदासीं भेट जाली," "राघवाचा वर पावलों सत्वर" असे उल्लेख आहेत. तेव्हां समर्थांस रामाचा साक्षात्कार झालेला होता या विधानास समर्थांच्या च म्हणण्याचा भक्कम आधार आहे. हा साक्षात्कार एक दोन वेळां झाला असेल असें कांहींकास वाटेल. पण "विदेशीं एक ते दोघे। वेगळे नव्हती कदा ॥" या त्यांच्या म्हणण्यावरून साक्षात्कार वारंवार झालेला असला पाहिजे असें ठरतें.

अशा प्रकारच्या साक्षात्कारांविषयीं थिऑसफीचें जें म्हणणें आहे तें पहाण्यासारखें आहे. जगांतील निरनिराळ्या धर्मांच्या इतिहासांत जे अधिकारी पुरुष होऊन गेलेले आहेत ते नाहींसे झालेले नसून ते आज पृथ्वीवर विद्यमान आहेत, त्यांची एक सुसंघटित संस्था आहे, तींत सुमारें पन्नास साठ अलौकिक पुरुष सध्यां आहेत, आणि त्यांमध्यें च व्यास, श्रीकृष्ण, शंकराचार्य, अगस्त्य, वगैरे व्यक्ति समाविष्ट आहेत, असें थिऑसफीचें सांगणें आहे. ही संस्था फार प्राचीन काळापासून पृथ्वीवर कार्य करीत आहे. थिऑसफीच्या वाङ्मयांत तीविषयीं कांहीं माहिती प्रसिद्ध झालेली आढळेल. अशा पुरुषांचा साक्षात्कार अलिकडे ही कांहीं लोकांस झाल्याचीं उदाहरणें त्यांत मिळूं शकतील. या संस्थेंतील अधिकारी पुरुषांशीं मुमुक्षूला आज ऋणानुबंध जोडावयाचा असल्यास तो कसा जोडावा याची ही माहिती त्यांत आलेली आहे. या संस्थेस आम्ही "सिद्धसंघ" असें नांव देत असतों.

जगांतील साधूंविषयीं समर्थ सांगतात कीं,

साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपीं मिळाले।
अवघे मिळोन येक चि जाले। देहातीत वस्तु ॥ ७-२-३१

वर उल्लेखिलेल्या संस्थेची जाणीव एक असते, त्या संस्थेंतील साधु तुम्हाआम्हा सारखे मनानें वेगळे असत नाहींत, असें थिऑसफीचें म्हणणें आहे. या गोष्टीचा प्रत्यक्ष साक्षात्कार असणाऱ्या एका थिऑसफीय ग्रंथकारानें या जाणीवेच्या ऐक्याबद्दल पुढील उद्गार काढले आहेत. The consciousness of the Great White Brotherhood ( सिद्धसंघ ) is like a great calm shining ocean, so strangely one that the least thrill of consciousness flashes from end to end of it instantaneously.

दासबोध दशक ५ समास ६ मध्यें सद्गुरू शिष्याला जो उपदेश देतो त्याचें अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन समर्थांनीं केलें आहे, तें असें:

जें अत्यंत गहन । माझ्या स्वामींचें वचन ।
जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ॥ ४१
तें हें माझें जीवींचें गुज । मी सांगेन म्हणतों तुज ।
जरी अवधान देसी मज । तरी आतां ये च क्षणीं ॥ ४२
शिष्य म्लान्वदनें बोले । धरिले सदृढ पाउलें ।
मग बोलों आरंभिलें । गुरुदेवें ॥ ४३

या काकुळतीच्या व करुणरसपूर्ण शब्दांनंतर कांहीं तरी अत्यंत खोल व अत्यंत गंभीर असें 'गुज' गुरु सांगणार आहेत अशी वाचकांची अपेक्षा होते व तें गुज ऐकण्याची त्याला तीव्र उत्कंठा लागते. तें 'गुज' काय आहे तें पहा:

अहं ब्रह्मास्मि माहांवाक्य । येथीचा अर्थ अतर्क्ये ।
तो ही सांगतों ऐक्य । गुरुशिष्य जेथें ॥ ४४
ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूं चि आहेसि ब्रह्म ।
येविषईं संदेह भ्रम । धरूं चि नको ॥ ४५

या गुजांत अद्भुत, आश्चर्यकारक, गंभीर वा गहन असें कांहीं च नाहीं. अहं ब्रह्मास्मि, या वाक्याचा तो साधा सरळ अर्थ आहे. एका भव्य राजवाड्यांत मी तुला नेणार आहे अशी आशा दुसऱ्याचे मनांत निर्माण करून त्याला भिकार झोपडींत न्यावयाचें व त्याच्या हृदयोर्मि जमीनदोस्त करावयाच्या, असें येथें समर्थांनीं केलें आहे, असें निःपक्षपाती वाचकाला वाटतें. पण खरोखरी तसें नाहीं. गुरूपदेशाचा एक प्रकार थिऑसफीय वाङ्मयांत सविस्तर वर्णिलेला आहे. त्यावरून दिसतें कीं, समर्थांनीं जो उपदेश वर्णिलेला आहे तो खरोखरी च धीर गंभीर आहे. पण त्यांतला कांहीं भाग त्यांस परिस्फुट करावयाचा नव्हता, म्हणून तो त्यांना मुद्दाम गाळावा लागलेला आहे. त्या उपदेशाचा ज्याला स्वतःला साक्षात्कार झालेला आहे अशा एका अनुभवी व्यक्तीनें जें थिऑसफीय वर्णन दिलेलें आहे त्यावरून कळून येतें कीं, या प्रसंगीं कांहीं उच्च ज्ञान सांगण्यांत येतें, पण तें गुप्त असतें. त्याला थिऑसफींत Key of knowledge म्हणतात. या प्रसंगाचें वेळीं शिष्याच्या हृदयांतील अंगुष्ठमात्र तेज फुलविण्यांत येतें, त्याचा कारणदेह चमकूं लागतो, अंतर्यामीच्या नाना शक्ति जोरकस केल्या जातात आणि जगदुद्धाराचें एक नवीन सामर्थ्य त्याच्या अंतरंगामध्यें ओतलें जातें. ज्यास

समर्थांचे विचार नीट समजून घ्यावयाचे असतील त्यानें हा थिऑसफीय भाग नजरेआड करून चालणार नाहीं.

जो शिष्याला "मोक्ष" देऊं शकेल तो च "सद्गुरु" होय असें समर्थांनीं सांगितलें आहे (५-२-१ व ७२). जो दुसऱ्याला मोक्ष देऊं शकतो त्याला स्वतःला मोक्ष मिळालेला असला पाहिजे हें उघड आहे. थिऑसफींत लिहिलेलें आहे कीं, वरील संस्थेंत No one below the rank of an Adept is permitted to assume full responsibility for a novice. शिष्यस्वीकार झाल्यानंतर गुरु व शिष्य हे एक होतात असें समर्थ सांगतात. उदाहरणार्थ, आत्मारामांत समर्थ म्हणतात:

जें स्वामीचा हृदईं होतें। तें शिष्यासी बाणलें अवचीतें। ८
स्वामीपरीसाचा स्पर्श होता। शिष्य परीस चि जाला तत्त्वता।
गुरुशिष्याची ऐक्यता। जाली स्वानुभवें॥ ९
निसंदेह स्वरूपमिळणीं। दोघे येक चि जाले॥ २४

एकवीससमासींत हे च विचार आहेत. हें ऐक्य कायम असतें; व गुरुशिष्य यांना मुद्दाम वेगळे केलें तरी ते वेगळे होऊं शकत नाहींत असें दासबोध सांगतो—

मग जरी वेगळा केला। तरी होणार नाहीं॥ ८-८-२०
मग जरी वेगळी केली। तरी होणार नाहीं सर्वथा॥ १-४-१३

हें ऐक्य प्रथमतः कसें करतात त्याचें वर्णन एकवीससमासींत आहे.

स्वामी सेवक आनंदले। हर्षें करूनी उचंबळले।
परस्परें गिळुनी ठेले। लोभ आला म्हणोनी। १६-१४
आपुलीं शरीरें पाहों गेले। तों तें पालटोनी गेलीं॥ १९

थिऑसफींत ही हा अनुभव नमूद आहे. स्वतःचा साक्षात्कार अनुभविला आहे अशा व्यक्तीनें पुढील वर्णन केलें आहे, तें पहा:

Thus for a few moments the two are one and not only does the master's *Aura* affect that of the pupil, but any special characteristics attained by the latter act on the corresponding centres of the master's aura and that flashes out in response. The inexpressible union of the pupil with the Master which begins during the ceremony of acceptance is a permanent

thing, and after that though the pupil may be far distant from the Master, on the physical plane, his higher vehicles are vibrating in common with those of his Teacher.

या दोन्ही वर्णनावरून हे दोन ठिकाणीं वर्णिलेले अनुभव एक च होत हें उघड आहे.

अनुभवसाम्याच्या अशा अनेक गोष्टी सांगतां येतील. उदाहरणार्थ, मनुष्य मुक्त झाल्यानंतर त्याच्या जन्माच्या येरजाऱ्या संपतात अशी सामान्य समजूत आहे. त्याच्याविरुद्ध थिऑसफीचें म्हणणें आहे कीं, मुक्त होण्याच्या अगोदर व अर्हत् पदाची ( चवथ्या महादीक्षेची ) प्राप्ती झाल्यावर पृथ्वीवर पुन: पुन: जन्म घेणें माणसाला भाग असत नाहीं. समर्थांचें म्हणणें तसें च आहे. साधकासंबंधानें ( सिद्धासंबंधानें नव्हे ) समर्थ सांगतात:

भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें ।
मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ॥ ५–९–४१

निरनिराळीं पवित्र स्थानें व तीर्थें जीं असतात त्या ठिकाणीं साधू लोकांनीं जाऊन शक्तीचीं केंद्रें स्थापलेलीं असतात व त्यामुळें तीं स्थानें जागृत राहिलेलीं असतात असें थिऑसफीचें म्हणणें आहे. समर्थ हि सांगतात:

साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ ।
साधु न येतां जिणें वेर्थ । तयां पुण्यक्षेत्रांचें ॥ ७–१०–११

समर्थांनीं जे मारुती स्थापलेले होते ते अशा प्रकारचे केंद्र असावेत. अनुभवसाम्याचीं जास्ती उदाहरणें देण्यास या लहानशा लेखांत अवकाश नाहीं. यासाठीं एक च महत्त्वाचें उदाहरण देऊन हा लेख पुरा करतों.

समर्थांचें "आनंदवनभुवन" हें प्रकरण समजण्यास अत्यंत कठीण आहे. लोक त्याचा अर्थ अनेक रीतींनीं लावतात. त्यांत कांहीं साक्षात्काराचा भाग असल्यामुळें व सामान्य जनांस वाजवीपेक्षां जास्त स्पष्टपणानें तो साक्षात्कार समजूं नये म्हणून त्याचे अनेक अर्थ होतील अशा रीतीनें समर्थांनीं तें मुद्दाम तसें लिहिलें आहे. समर्थ हयात असतांना आपल्याजवळच्या अधिकारी शिष्यांस आपल्या ग्रंथांतील सर्व गुप्त भाग उलगडून सांगत असणार च. पण ज्या गोष्टी अधिक जबाबदारीच्या आहेत त्या फक्त निवडक लोकांस च समजाव्या, इतरांस फक्त त्याबद्दल जिज्ञासा वाटावी अशा रीतीचा गुप्तपणा समर्थांनीं आपल्या साऱ्या ग्रंथांत मुद्दाम राखला आहे. या मुद्याचें विवेचन वर आलें च आहे. आनंदवन-

भुवन या प्रकरणाचे ज्या अर्थी अनेक अर्थ अनेक लोक लावितात त्या अर्थी आमच्या म्हणण्याविषयीं मतभेदास जागा राहूं नये म्हणून त्या प्रकरणांतील अगदीं स्पष्टार्थक जे भाग आहेत ते च आपण पाहूं या.

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंची होतसे । ७

याचा अर्थ असा कीं, समर्थांना एकदा रात्रीं स्वप्नांत कांहीं दृष्टांत झाला व त्या दृष्टांतांत त्यांनी ज्या ज्या गोष्टी पाहिल्या त्या त्या नंतर खऱ्या झाल्या.

हे साक्ष देखिली दृष्टी । ८

या गोष्टीची साक्ष समर्थ आपल्या स्वतःच्या अनुभवावरून देत आहेत. जेव्हां समर्थांना हा दृष्टांत झाला त्या वेळीं

मनासी प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला । ५२

म्हणजे त्या वेळीं त्यांच्या मनास तो दृष्टांत पटला आणि साक्षात्कारप्रसंगीं ज्या गोष्टी त्यांना सांगण्यांत आल्या होत्या त्यांवर त्यांना त्या वेळीं विश्वास वाटला.

स्मरलें लिहिलें आहे । ५७

म्हणजे हें वर्णन त्या दृष्टांताची आठवण करून त्या आठवणीवरून लिहिलें आहे. या दृष्टांतांत समर्थांनीं काय पाहिलें ? ( तर समग्र प्रकरण वाचल्यास दिसेल कीं, ) देवानें समर्थांच्या पक्षाचा कैवार घेतला, स्वतः सैन्यादि सामग्री गोळा केली, शत्रुपक्षावर मोहीम केली आणि शेवटीं औरंगजेब अपेशी झाला. यावरून, वादाचे सर्व प्रश्न एका बाजूस ठेवून आनंदवनभुवन प्रकरणाचा थोडक्यांत सरळ अर्थ असा होतो कीं, समर्थांस एकदां रात्रीं दृष्टांत झाला, त्या वेळीं त्या दृष्टांतांतील गोष्टी त्यांना खऱ्या अशा पटल्या, त्या दृष्टांतांत त्यानीं पाहिलें कीं, देवानें समर्थांचा पक्ष घेऊन शत्रुपक्षावर मोहीम केली आणि ती यशस्वी झाली.

या दृष्टांतांत समर्थांनीं पुढच्या अनेक गोष्टी पाहिल्या होत्या. हें प्रकरण लिहितांवेळीं त्यापैकीं बऱ्या च खऱ्या झालेल्या त्यांनीं पाहिल्या. कांहीं गोष्टी त्या काळानंतरच्या होत्या. ( कांहीं गोष्टी तर समर्थांच्या मृत्यूच्याही नंतरच्या होत्या. उदाहरणार्थ, औरंगजेबाचा शेवट समर्थांच्या मृत्यूनंतर सव्वीस वर्षांनीं झाला असें इतिहास सांगतो. ) हें प्रकरण लिहितांवेळीं ज्या गोष्टी भविष्यकाळाच्या उदरांत लपलेल्या होत्या त्याबद्दल समर्थांना आनंदवनभुवनांत अर्थात् कांहीं बोलतां येण्यासारखें नव्हतें. त्याविषयीं भविष्यकाळाकडे बोट दाखवून समर्थांनीं म्हटलें आहे, " पुढें घडेल तें खरें."

थिऑसफीचें म्हणणें आहे कीं, जगाच्या पाठीशीं जो सिद्धसंघ आहे, त्यांत मन्वादि अधिकारी असतात. निरनिराळ्या देशांचें राजकारण, संस्कृतींचे व राष्ट्रांचे

उदयास्त, युद्धें व त्यांतील जयापजय वगैरे अनेक गोष्टी मनूच्या अधिकारांत असतात व त्यानें इतिहासाची भावी योजना आंखलेली असते. जगांतील राजकारणी पुरुषांपैकीं बहुतेकांस या गोष्टींची माहिती नसते. मनु व त्याचे हस्तक या राजकारणी पुरुषांची प्यादी इतिहासाच्या पटावरून हवी तशी हलवून आपण योजलेला मानवी उत्क्रांतीचा संकल्प हरप्रयत्नानें तडीस नेतात. मनु हा फार मोठा अधिकारी असतो व महाज्ञानी असतो. त्याच्या कामांत मदतनीस होण्याचा अधिकार कित्येक संत, योगी, साधु यांस त्यानें दिलेला असतो. अशा अधिकारी संतांस मनूची योजना दृष्टांतरूपानें अगोदर दाखविली जाते व त्या संतांच्या अंगावर त्या योजनेपैकीं कांहीं जबाबदारीही टाकण्यांत येते. ती जबाबदारी वहिवाटण्याचें त्यांना सामर्थ्य यावें यासाठीं त्यांस दृष्टांत देऊन शहाणे करण्यांत येतें व अशा रीतीनें मनूनें आंखलेली योजना यशस्वी करण्यांत येते. याचा अर्थ असा होतो कीं, महाराष्ट्रांतील ऐतिहासिक योजनेची कांहीं जबाबदारी समर्थांवर टाकण्यांत आली होती व ती योजना त्यांस तडीस नेतां यावी यासाठीं दृष्टांतरूपानें ती त्यांस अगोदर दाखविण्यांत आली होती. अर्थात् हा भाग सारा गुप्त असणार. "गुप्त तें गुप्त जाणावें" असें समर्थांनीं आनंदवनभुवनांत म्हटलें आहे च. पण त्या दृष्टांतांतला कांहीं भाग त्यांनीं निवडक मंडळीसाठीं त्या प्रकरणांत थोडाफार उघड केला आहे. अलिकडच्या राजकारणांतील योजना दृष्टांतरूपानें एकाद्या व्यक्तीसमोर ठेवल्याचीं उदाहरणें थिऑसफीच्या वाङ्मयांत आहेत. सी. जिनराजदासकृत The Occult Investigations नामक ग्रंथांत अशा एका उदाहरणाची माहिती जिज्ञासूस सांपडेल.

---

## ( १३ )

# श्रीसमर्थांची शिकवण व भगवद्गीता

( लेखक — रा. **वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर**, बी. ए., एल्एल्. बी.
**अकोला** )

नारायणं नमस्कृत्य । नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं चैव । ततो जयं उदीरयेत् ॥

सध्यांच्या मानववंशांतील श्रेष्ठतम, असे जे नर – नारायण नामक ऋषिद्वय त्यांना, व एकांची राजशक्ति व दुसऱ्यांची ज्ञानशक्ति, त्या शक्तिद्वयाला वंदन करून, मी जय नामक ग्रंथाला प्रारंभ करतों, असें कृष्णद्वैपायनांचें ग्रंथारंभींचें वचन आहे. हा जय नामक ग्रंथ आज त्याच्या च विस्तार केलेल्या स्वरूपांत "महाभारत" म्हणून प्रसिद्ध आहे. हे नर – नारायण ऋषि, या भूगोलावर अधिष्ठित असलेल्या दैवी शासनसंस्थेचे, ( Divine Government of this Earth Globe ) मनु व व्यास या संज्ञांनीं संबोधित असलेल्या, पदाधिकारावरील अधिकारी महापुरुष आहेत. भगवान मनु हे भूगोलावरील अखिल मानवजातीच्या राजकीय, सामाजिक वगैरे आधिभौतिक विकासाचे, तसे च भगवान व्यास हे मानवजातीच्या मानसिक व आध्यात्मिक विकासाचे, सूत्रधारी आहेत. पृथ्वीवरील निरनिराळ्या देशांत मानवांच्या समाजरचनेला व धर्मज्ञानाला चालना देणारे थोर पुरुष व समाजाग्रणी निरनिराळ्या काळीं यांच्या च अंशानें जन्मतात. भारतीय काळीं त्यांच्या च अंशांनीं श्री भगवान कृष्ण व धनुर्धारी अर्जुन अवतरले, तर महाराष्ट्रीय इतिहासकालीं त्यांच्या च अंशांनीं छत्रपति श्री शिवाजी महाराज व श्री समर्थ रामदास स्वामी महाराष्ट्रांत जन्मले. श्रीकृष्णार्जुनांबद्दल, ते तसे अंशभूत असल्याबद्दल महाभारतांत स्पष्ट उल्लेख आहे.

नरनारायणौ यौ तौ, तौ एव अर्जुन – केशवौ ॥
विजानीहि महाराज । प्रवीरौ पुरुषोत्तमौ ॥
( उद्योगपर्व – अ. ९६, श्लो. ४९ )

भारतीय काळीं जें कार्य श्रीकृष्णांनीं अर्जुनाकरवीं केलें, तें च कार्य महाराष्ट्राचे इतिहासांत श्री समर्थ रामदासांनीं श्री शिवछत्रपतींचे करवीं केलें. यांत च ते उभयतां नारायणनरांशभूत होते हें स्पष्ट आहे. दैवी शासनसंस्थेंतील श्रीसमर्थांचा हा

( नारायणांश ) अधिकार असल्यामुळें मी ही त्या च श्लोकाचें अवतरण देऊन माझे लेखास प्रारंभ करितो.

महाराष्ट्राचे राष्ट्रकार्यांतील श्रीसमर्थांचा भाग वर उल्लेखिल्याप्रमाणें असल्याचें इतिहास-घटनेकडे पाहिलें असतां जास्त स्पष्ट होईल. भारतीय युद्धकालीन व महाराष्ट्रयुद्धाची परिस्थिति, या दोहोंमध्यें हृदयंगम साम्य आहे. भारतीय युद्ध कौरवांचे विरुद्ध होतें, तर महाराष्ट्रीय युद्ध यवनांचे विरुद्ध होतें. कौरव जसे अधर्मचरणी, जुलमी, परधर्मांचा, ब्राह्मणांचा व स्त्रियांचा अपमान, मानहानी व छळ करणारे होते, तसें च यवन ही परधर्मांचा, ब्राह्मणांचा व स्त्रियांचा अपमान, मानहानी व छल करणारे होते. भारतकालीं "गीताप्रवचन करणारे जसे योगेश्वर कृष्ण, त्याप्रमाणें महाराष्ट्रकालीं "दासबोध"-प्रवचन करणारे "वसिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचें" या वामनपंडितांच्या वाणीनें वर्णिलेले त्या च अधिकाराचे श्रीसमर्थ होते. भारतकालीं श्रवण करणारी धनुर्धारी अर्जुनरूपी भारतीय जनता होती, तर महाराष्ट्रकालीं भवानी तरवार धारण करणारी, शिवरायांचे देहांत केंद्रीभूत झालेली महाराष्ट्रीय जनता होती. "पांडवानां धनंजयः" हा जसा अर्जुनाचा अधिकार, तसा च महाराष्ट्रीयांमध्यें शिवछत्रपतींचा होता. गीता श्रवण करून अर्जुनानें कौरवांवर जय मिळवून धर्मराज्य स्थापिलें; तर महाराष्ट्रयुद्धांत शिवरायांनीं दासबोध श्रवण करून यवनांचा पाडाव केला व रामराज्याची पुनरावृत्ति घडवून, महाराष्ट्र भूमीचें "आनंदवनभुवन" केलें. हें साम्य परिस्थितीबद्दल झालें. पण ज्या गीतादास-प्रवचनानें हें साम्य घडवून आणलें, त्या प्रवचन-ज्ञानसाम्याचें निरीक्षण आतां यापुढें पाहूं.

**कै. न्या. रानडे** म्हणत असत कीं, दासबोध म्हणजे व्यवहारांतील आचाराचा ( cyclopedia ) कोश आहे. **लो. टिळकांनीं** सर्व भारतीय जनतेला भगवद्गीतेचें रहस्य कर्मयोग म्हणून अर्पण केलें आहे. समर्थांची ही शिकवण **त्या च कर्मयोगाची**, तितक्या च उज्वल व निर्दोष भाषेंत व पद्धतवार तऱ्हेनें दिल्याबद्दल लोकमान्यांची ग्वाही पुढीलप्रमाणें आहे. "कर्मयोगाचें खरें महत्त्व, शुद्ध व प्रासादिक मराठी भाषेंत सांगितलेलें, ज्यास पहावयाचें असेल त्यानें समर्थांच्या दासबोधाचें व त्यांतल्या त्यांतही विशेषेंकरून उत्तरार्धाचें पठन केलें पाहिजे. श्रीसमर्थांचा च उपदेश शिवाजी महाराजांस मिळालेला होता; व **मराठेशाहींत पुढें कर्मयोगाचीं तत्त्वें समजून देण्याची जेव्हां जरूर वाटूं लागली** तेव्हां शांडिल्यसूत्रें किंवा ब्राह्मसूत्रभाष्यें या ऐवजीं महाभारताची गद्यात्मक भाषांतरें होऊन बखरींच्या रूपानें त्यांचा अभ्यास सुरू झाला" ( गीतारहस्य पानें ४९८-४९९ ).

आतां प्रत्यक्ष भगवद्गीतेंतील श्रीकृष्णांची व दासबोध वगैरे ग्रंथांमध्यें समर्थांची, शिकवण काय व कशी आहे ती पाहूं.

**कर्मयोगाच्या तीन पायऱ्या**

( १ ) अकर्म ( आळस ) याचा निषेध व निंदा ; व कर्म ( उद्योग ) याची स्तुती व उपदेश व सावधानता.

( २ ) कर्माकर्माविषयीं व त्याचे फलाबद्दल अनासक्त वृत्ति म्हणजे वैराग्य.

( ३ ) कर्म – ब्रह्मार्पण अथवा निरहंकार बुद्धि व ईश्वराचें अधिष्ठान.

**आतां कर्मयोगाची पहिली पायरी** ( १ ) अकर्म ( आळस ) याचा निषेध व निंदा ; व कर्म ( उद्योग ) याची स्तुती व उपदेश व सावधानता.

**( अ ) भगवद्गीता**

( १ ) न कर्मणां अनारंभात् नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।
न च सन्यसनात् एव सिद्धिं समधिगच्छति ॥ ३ – ४

"कर्में करण्यास सुरुवात च न करण्यानें सिद्धी मिळत नाहीं, ( किंवा ) ( करीत असलेलीं कर्में ) सोडून देऊनही सिद्धी मिळावयाची नाहीं."

किंबहुना

( २ ) न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्म कृत् । ३ – ५

"कर्म केल्याविना एक क्षणभर सुद्धां कोणीही राहूं शकत नाहीं."

कारण,

( ३ ) शरीरयात्रापि च ते न प्रसिध्येत् अकर्मण: । ३ – ८

"अकर्मानें तुझी शरीरयात्रा सुद्धां चालूं राहणें शक्य नाहीं."

म्हणून

( ४ ) नियतं कुरु कर्म त्वं कर्मज्यायो हि अकर्मण: । ३ – ८

"नेमलेलें कर्म तूं कर, अकर्माहून कर्म श्रेष्ठ आहे."

**( ब ) श्री समर्थ**

आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण । ७ – ८ – ४९
ऐसा जो दुश्चीत आळसी । परलोक कैंचा त्यासी । ८ – ६ – २८
अंतरीं नाहीं सावधानता । येत्न ठाकेना पुरता । १२ – ९ – ७
म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ १२ – ९ – ८

* * *

म्हणौन आळस नसावा। तरी च पाविजे वैभवा।
अत्रीं परत्रीं जीवा। समाधान ॥ ११ – ३ – १३
आधीं कष्ट मग फळ। कष्ट चि नाहीं तें निर्फळ। ११ – १० – २०
आधीं कष्टाचें दुःख सोसिती। ते पुढें सुखाचें फळ भोगिती।
आधीं आळसें सुखावती। त्यासी पुढें दुःख ॥ १८ – ७ – ९
व्याप आटोप करिती। धके चपेटे सोसिती।
तेणें प्राणी सदेव होती। देखतदेखतां ॥ १९ – ३ – ७
जेहीं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून ठेले।
येर ते बोलतचि राहिले। करंटे जन ॥ १८ – ७ – १६

* * *

प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुम्ही कष्टी व्हाल। १२ – १ – २
प्रपंच सांडून परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायाला। १२ – १ – ३
प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण।
प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा ॥ १२ – १ – ९

* * *

येत्न तो देव जाणावा।
सावधू देव जाणावा।
साक्षपी अंश देवाचे।

याप्रमाणें उतारे अगणित होतील.

**आतां. कर्मयोगाची दुसरी पायरी** – कर्माकर्माविषयीं व त्याचे फलाबद्दल अनासक्तवृत्ति म्हणजे वैराग्य. "इहामुत्र फलभोगविरागः" "इहलोकींचे अगर परलोकींचे कर्मफलाचा उपभोग मिळण्याविषयींची पूर्ण उदासीनता" ही वैराग्याची व्याख्या सुप्रसिद्ध आहे.

### [अ] भगवद्गीता

(१) कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूः मा ते संगोस्तु अकर्मणि ॥ २-४७

"कर्म करणें येवढें च तुझ्या स्वाधीन आहे. त्याचें फल मिळणें तुझ्या स्वाधीन नाहीं. (म्हणून) कर्मफलावर हेतु ठेवून बसूं नकोस. (त्याचप्रमाणें) अकर्मा (आळसा) चीही पण आवड धरूं नकोस."

(२) तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो हि आचरन् कर्म परमाप्नोति पुरुषः॥ ३-१९

"म्हणून अनासक्त बुद्धीनें सतत कर्तव्यकर्में योग्य प्रकारें करीत जा; अनासक्त बुद्धीनें कर्म करणारा पुरुष परम पदाला प्राप्त करून घेतो."

(३) जोषयेत् सर्व कर्माणि विद्वान् युक्तः समाचरन्। ३-२६

"विद्वान माणसानें अनासक्त बुद्धीनें व योग्य तऱ्हेनें वागून सर्व कर्मांबद्दल जनतेमध्यें उत्साह उत्पन्न करावा."

(४) शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्। ४-२१

"अनासक्त बुद्धीनें केलेले कर्मानें किल्बिष प्राप्त होत नाहीं."

**[ब] श्रीसमर्थ**

(१) मनीं मानव वेर्थ चिंता वाहातें। अकस्मात होणार होऊनि जातें।
घडे भोगणें सर्व ही कर्मयोगें। मतीमंद तें खेद मानी वियोगें॥ म. श्लो. १७

(२) मना मानसीं दुख आणूं नको रे। मना सर्वथा शोक चिंता नको रे।
विवेकें **देहेबुधि** सोडूनि द्यावी। **विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी**॥ १२

(३) ऐसा जो सर्वसावध। त्यास कैंचा असेल खेद।
विवेकें तुटला समंध। देहबुद्धीचा॥ ११-३-२७

(४) उदास वृत्तिनें लोकीं। धन्य संसार होतसे॥

(५) सत्संगें निस्संग होतां। धन्य संसार होतसे॥

(६) तो चिंतेपासून सुटला। पराधेनतेपासूनि पळाला।
दुःखत्यागें मोकळा जाला। रोगी जैसा॥ १२-४-४

(७) विवेकें अंतरीं सुटला। वैराग्यें प्रपंच तुटला।
अंतर्बाह्य मोकळा जाला। निःसंग योगी॥ १२-४-१२

(८) आस्था नाहीं त्रैलोक्याची। स्थिती बाणली वैराग्याची।
येत्न विवेकधारणेची। सीमा नाहीं॥ १२-४-१४

(९) सांकडीमधें वर्तो जाणे। उपाधीमधें मिळो जाणे।
अलिप्तपणें राखो जाणे। आपणासी॥ ११-६-१३

(१०) उपाधीसी विस्तारावें। उपाधींत न संपडावें। ११-५-९

**आतां कर्मयोगाची तिसरी पायरी—कर्मब्रह्मार्पण अथवा निरहंकार बुद्धि व ईश्वराचें अधिष्ठान.**

## (अ) भगवद्गीता

(१) ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रं इवांभसा ॥ ५-१०

" जो सर्व कर्मे अनासक्त बुद्धीनें करून, तीं ब्रह्मार्पण करतो, त्याला पापाचा लेप होत नाहीं. ज्याप्रमाणें कमलपत्राला पाणी चिकटून राहत नाहीं." (त्याप्रमाणें)

(२) यत् करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यद् ।
यत्तपस्यसि कौंतेय तत् कुरुष्व मदर्पणम् ॥ ९-२७

" जें तूं करतोस, जें खातोस, जें हवन करतोस, जें दान करतोस, जें तप करतोस, तें तें अर्जुना, मला अर्पण कर."

## (ब) श्री समर्थ

(१) येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
**तिसरा आपण कैंचा चोरु** । आणिला मधें ॥ ४-९-११

(२) **आहे तितुकें देवाचें** । ऐसें वर्तणें निश्चयाचें ।
**मूळ तुटे उद्वेगाचें** । येणें रीतीं ॥ ११-३-२८

(३) आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण ।
जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ॥ ७-२-२०

(४) **सोडितां तया संगासी । ऐक्य होये निःसंगासी** । ७-२-२१

(५) **मीपणापासून सुटला । तो चि येक मुक्त जाला** । ७-६-५४

याप्रमाणें कर्मयोगाच्या तिन्ही पायऱ्या श्रीभगवद्गीता व श्री समर्थांची शिकवण या दोहोंमध्यें स्पष्ट रीतीनें सांपडतात. दोघांचीही ही च मुख्य शिकवण आहे. दोघांचेंही या बाबतींत पूर्ण ऐक्य आहे. दोन्हींच्या शिकवणींतील वैशिष्य म्हणजे अखंड उद्योग अखंड सावधानता. अनेक कार्यक्षेत्रांचें महत्त्व ओळखून त्यांचें तारतम्य पाहणें.

तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्यच ।

ही श्रीकृष्णांची शिकवण, तर समर्थांची ही शिकवण पहा:

देश काळ वर्तमान। सर्व हि अवेवधान।
कोणतें विधी विधान। सावधान सावधान॥

ही त्यांची ओंवी वाचली, म्हटली, किंवा ऐकली, म्हणजे असें वाटतें कीं, ही वाणी म्हणजे रानावनांत राहणारा व तपस्येनें निर्माल्यवत् शरीर झालेला असा कोणी सामान्य बैरागी नसून आपल्या प्रतापवान शंखाचा सिंहनाद करून आपल्या प्रचंड सेनेच्या अंतःकरणांत हर्षोत्साह उत्पन्न करणारा एखादा भीष्माचार्यांच्या तोलाचा, यवनांनीं गांजलेल्या महाराष्ट्रजनतेच्या अंतःकरणांत आपला तपःप्रभाव व तेज ओतून तिला युद्धाकरितां खडबडून जागा करणारा कोणी दिव्य व प्रतापी राजर्षी च आहे.

---

# ( १४ )

# महाराष्ट्रक्रांती व रामदासांची भूमिका

( लेखक — प्रो. **श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर**,
हिंदु विश्वविद्यालय, श्री क्षेत्र **काशी** )

(**टीप**—या लेखांत मी १७ व्या शतकांतील महाराष्ट्रक्रांतीचें उज्ज्वल स्वरूप व त्यांतील रामदासांची भूमिका व कामगिरी, यांची मांडणी करण्याचें योजलें आहे. याकरतां प्रथम तत्पूर्वीची ३०० वर्षांची ऐतिहासिक घटना व परिस्थिति, साधुसंतांचें कार्य, नव्या सर्वांगीण क्रान्तीची आवश्यकता, खऱ्या क्रान्तीचें स्वरूप हीं दिलीं आहेत. नंतर महाराष्ट्रक्रान्तीचें स्वरूप, मराठ्यांच्या इतिहासाचें रहस्य, यावनी सत्तेचें स्वरूप, सतराव्या शतकाचें क्रान्तीस्वरूप, महाराष्ट्रक्रांतीची मुख्य लक्षणें, शिवाजी व रामदास यांची परंपरा, रामदासांची भूमिका व कार्य, देशाचा मुख्य शत्रू, रामदासकालीन राजकीय, धार्मिक, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व नैतिक परिस्थिति, लोकांची वृत्ति, वैचारिक क्रान्ती आणि रामदासाची या सर्व अंगांबद्दलची भूमिका, याबद्दल उतारे देऊन विवेचन केलें आहे. )

## ( १ ) ऐतिहासिक घटना

तेराव्या शतकांत आर्यावर्ताचें स्वातंत्र्य गेलें. चौदाव्या शतकांत दक्षिणेचा सर्व देश तुर्कांनीं पादाक्रांत केला. १३१८ मध्यें शंकरदेवानीं स्वातंत्र्यार्थ देह ठेवला. त्याबरोबर देवगिरीचें देवत्व गेलें. राजधानी भ्रष्ट झाली. महाराष्ट्राचें स्वातंत्र्य गेलें. धर्मावर, समाजावर घोर संकट आलें. ब्राह्मण – क्षत्रिय वर्ग पतन पावला. तो कर्तव्यपराङ्मुख झाला. ज्ञानेश्वरनामदेवांनीं प्रेरलेल्या ज्ञान-भक्तिरूपी नवचैतन्याला कांहीं काल खंड पडला. बहुजनसमाज किंकर्तव्यमूढ होऊन निवृत्तिरुपी निष्क्रिय भजनमार्गाकडे वळला. मुसलमानी राजसत्तेचा जाच, मुसलमानी धर्माची बळजबरी व बाटवणूक, मुसलमानी समाजाचा शिरजोरपणा व आडदांडपणा, यांनीं आपला देश सर्व प्रकारें गांजून गेला. आपलीं देवालयें मोडलीं. तीर्थक्षेत्रें भ्रष्ट झालीं. कैक माणसें देशोधडीस लागलीं. स्त्रियांवर बलात्कार व अत्याचार घडले. १६ व्या शतकाचे अखेर महाराष्ट्राचे तीन राजकीय खंड पडलेः—अदीलशाही, निझामशाही व मोगलाई महाराष्ट्र. १६३६ मध्यें निझामशाही नष्ट झाली. मोंगलाच्या राजकीय आकांक्षापुढें व सामर्थ्यापुढें तिला वाचवितां आले नाहीं. जो बळी त्याचें राज्य, हा च न्याय चालू राहिला. अदीलशाही व मोगलाई आपल्या सैनिक सामर्थ्यानें महाराष्ट्राचे धनी व वाटेकरी बनले. या प्रकारें ३०० वर्षें आम्ही बिकट पारतंत्र्य व त्याच परिणाम सोसले.

## (२) आमच्या साधुसंतांचें कार्य

आमच्या साधुसंतांनीं आमची नैतिक व पारमार्थिक विचारधारा व परंपरा कायम ठेवली. एक प्रकारचें नवचैतन्य व नवी दृष्टी उत्पन्न केली. पण ते आमची पारतंत्र्यांतून सुटका करूं शकले नाहींत. राजकीय स्वातंत्र्याची कल्पना त्यांना शिवली नाहीं. त्यांनीं भक्तिमार्ग दाखविला, शक्तिमार्ग नाहीं. त्यांनीं ऐहिक संसार-व्यथा व व्याधींतून पार पडण्याच्या वाटा सांगितल्या, पण महाराष्ट्राच्या राजकीय स्वातंत्र्याची व भवितव्याची नवी आशा व जोरदार आकांक्षा उत्पन्न केली नाहीं. त्यांनी महाराष्ट्राला नवचैतन्य दिलें, परमार्थ दिला; पण त्याला राज्यक्रांतीचा उपदेश, राजकीय स्वातंत्र्याचा मंत्र सांगितला नाहीं. पारतंत्र्यांतून सुटण्याचें व सोडविण्याचें जरी कांहींना सुचलें तरी तें समजलें नाहीं. त्यांना तसा समय, योगायोग आला नाहीं. कोणत्या हि क्रान्तीला कोणीतरी कर्ता, त्राता व धर्ता अधिकारी पुरुष पाहिजे. तो संघटण करणारा, संघटित बळ वाढविणारा पाहिजे. तो आपल्या अन्तःस्फूर्तीनें, वाग्वीर्यानें व बाहुबलानें, युक्तीनें व शक्तीनें, नेतृत्वानें व कर्तृत्वानें लोकांना उद्दीपीत करून, संघटित करून व मार्ग दाखवून क्रान्ती व कार्य करूं शकला पाहिजे. हें क्रांतीचें कार्य महाराष्ट्रांत समर्थ रामदास व शिवाजी महाराज या पुरुषद्वयांनीं केलें.

## (३) क्रांतीचें खरें स्वरूप

इतिहासकार हे क्रान्तीच्या कसोटीवर च एखाद्या लोकांच्या मोठेपणाची व कर्तृत्वाची पारख करूं शकतात. सफल क्रान्तीनें च त्या लोकांचीं ध्येयें, आशा-आकांक्षा, नैतिक सामर्थ्य, बौद्धिक बल, क्षात्रशक्ति, प्रतीकारक्षमता, यांचें योग्य दिग्दर्शन होतें. कांहीं राज्यक्रान्त्या केवळ क्षात्रबलानें च घडतात. व त्यांचा उद्देश केवळ राज्यप्राप्तीचा असतो. त्यांच्यामागें कांहीं उदात्त विचार, स्वातंत्र्याच्या कल्पना, प्रजेचें कल्याण इत्यादि इष्ट हेतु नसतात. त्या अर्थकामप्रधान व जुलुम-जबरदस्तीच्या उपायांनीं घडलेल्या असतात. तुर्कांचें हिंदुस्थानांतील आक्रमण या स्वरूपाचें होतें. त्यांची टोळधाड अशा च प्रकारची होती. आक्रमित देशांच्या बलहीनतेचा फायदा घेऊन त्यांची सफल आक्रमणें झालेलीं होतीं. त्यांनीं केलेल्या क्रान्तीमध्यें कोणतें हि उच्च राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक अभिष्ट सांपडत नाहीं. त्यांचें राज्य म्हणजे शुद्ध सैनिक बळाची सत्ता.

दुसऱ्या क्रान्त्यांचें स्वरूप भिन्न असतें. त्यामध्यें नवे विचार, नवी व्यवस्था व नवी मानवनीति असते. अशा क्रान्त्या अचानक होत नाहींत. त्या नुसत्या

सैनिक बळजबरीनें होत नाहींत. प्रथम चालू परंपरा व परिस्थितीमध्यें बदल होतो. त्यामुळें नवी सुखदुःखें उत्पन्न होतात. त्याचा परिणाम चालू विचार व समजूती यांजवरची जुनी निष्ठा व श्रद्धा सैल होते. मग कोणी एखादा नेता आपल्या विचारसामर्थ्यानें अथवा क्षात्रसामर्थ्यानें नवें क्रान्तीक्षेत्र निर्माण करतो, व पुकारलेल्या क्रान्तीला संधी, भावना, उद्देश व वळण देतो. सामान्य लोक त्यामध्यें भाग घेतात. त्यांच्यामध्यें नवीन चैतन्य, उत्साह व भाव उत्पन्न होतात व ते त्याकरतां संघटित होतात व लढतात. अशा प्रकारची क्रान्ती खरी क्रान्ती होऊं शकते. तर च ती टिकते, सफल होते. अशा क्रान्त्या केवळ जुनीं राज्यें उलथून पाडण्याच्या स्वरूपाच्या नसतात.

## (४) महाराष्ट्रक्रान्तीचें स्वरूप

महाराष्ट्रक्रान्ती-तिच्या नवचैतन्याची लाट व राज्यक्रांतीची ललकार–ही केवळ तुर्कांची राजवट बदलणारी नव्हती. तिच्यामध्यें धर्म-क्रान्तीचा सूर, समाजसुधारणेचा नाद, राजकीय विचाराची प्रेरणा व राष्ट्रधारणेची स्फूर्ती होती. तिचा पुढारी एक नव्हता, अनेक होते. तिनें हिंदु विचारांची नवी मांडणी केली. हिंदु धर्माला नवें स्फुरण दिलें. हिंदु समाजापुढें नवा राष्ट्रीय उद्देश उत्पन्न केला, व त्याला नवीन स्वराज्याचें राजकीय ध्येय दिलें. महाराष्ट्रक्रान्ती नुसती राजकीय उलथापालथीची नव्हती. ती ज्ञानात्मक, धर्मात्मक व राष्ट्रात्मक होती. तिनें ज्ञानेश्वरनामदेवांनीं निर्मिलेल्या ज्ञानोत्कंठेची व भक्तिमार्गाची लाट व समाजभावनेची स्फूर्ती पुढें नेली, तिचा मूळ हेतू महाराष्ट्र आहे तसा च ठेवावयाचा नव्हता. त्याला राजकारणाचें उच्च स्थान, प्रगतीचा दुर्दम्य उत्साह द्यावयाचा होता, नवा महाराष्ट्रधर्म व नवें महाराष्ट्रराज्य यांची वाढ करावयाची होती. याकरतां सर्व मराठ्यांना संघटित, बलवान व उत्तेजित करावयाचे होते. ही महाराष्ट्रक्रान्ती उज्ज्वल स्वराज्यासाठीं, उच्च धर्म व आचारविचारस्वांतंत्र्याकरतां होती. ती ३०० शतकांचा यावनी कलंक व काळिमा, राजकीय अप्रतिष्ठा व दास्यत्व, विचाराची अधोगती व शीलाची भ्रष्टता धुवून काढणारी होती.

## (५) मराठ्यांच्या इतिहासाचें रहस्य

१७ व्या व १८ व्या शतकांत मराठ्यांनीं नवा इतिहास केला. हिंदुस्थानच्या इतिहासाला नवें वळण लावलें व ध्येय दिलें. राजपूतांच्या व विजयनगर राज्याच्या श्रमाचें, साहसाचें, पराक्रमाचें साफल्य केलें. त्यांनीं तुर्क मोगल साम्राज्यशाही व जुलूम नष्ट केला. हीं शतकें त्यांच्या पराक्रमाचीं, वैभवाचीं, उद्देशाचीं द्योतक आहेत. १६४७ ते १७०७ पर्यंत त्यांनीं स्वातंत्र्ययुद्ध केलें. १७१८ ते १८१८

पर्यंत त्यांनीं साम्राज्ययुद्ध केलें. १७ व १८ वीं शतकें हीं आपल्या देशांतील नुसता गडबडीचा व अंधाधुंदीचा काळ नव्हता. त्यामधून एक नवें हिंदुस्थान–आजचें हिंदुस्थान–निर्माण होत होतें. आपल्या राष्ट्रीय भावनेच्या उदयामध्यें व प्रगतीमध्यें तो एक निर्णयकारी व निर्माणकारी समय होता. तो पारतंत्र्याच्या व धार्मिक छळाच्या विरुद्ध एक मोठा उठाव व प्रतिकार होता. त्यावेळेस मोगली साम्राज्याचें व धर्मछळाचें परिणत स्वरूप पूरेपूर उघडें पडलें होतें. तो औरंगझेबाचा काळ होता.

महाराष्ट्रांत हा उठाव, हा प्रतिकार, हा विरोधाचा व नवरचनेचा प्रयत्न मोठ्या प्रमाणांत व चिकाटीनें झाला, व तो यशस्वी झाला. तो कां झाला, तर तेथें उज्ज्वल परंपरा, उत्कृष्ट प्रेरक साहित्य, निर्भय क्षात्रतेज, स्वराज्याची खरी भूक व धर्माची दाट भावना होती. त्यामुळें तेथें खरी संघशक्ति, विचारसामर्थ्य व क्षत्रिय बल निर्माण झालें. ब्राह्मण व क्षत्रिय पुढाऱ्यांनीं धर्माचें पालन, संस्कृतीचें रक्षण, संपत्तीची वाढ व वाटणी, आणि राष्ट्रीय शीलाचें व वैयक्तिक हक्काचें वर्धन केवळ **हिंदवी स्वराज्यांत च** शक्य व सुलभ आहे हा इतिहासाचा सिद्धान्त मांडला व पुकारला. आणि त्याच्या प्रातीकरतां शत्रूंना आव्हान केलें व त्यांना हरविलें; त्यांना सामान्य जनतेचा पाठिंबा व सहाय्य मिळालें. महाराष्ट्राच्या प्रत्येक वर्गाला दास्यत्व झोंबलें होतें. त्यांच्यातील अनेक कुटुंबें देशोधडीस लागलीं होतीं. त्यांच्या स्त्रियांची बेअब्रू, देवालयांची मोडतोड, धर्माची अवहेलना केली गेली होती. ते नेटानें लढले व सफल झाले. स्वराज्यसत्तेवांचून कोणती च समाज-स्थिति, धर्मनिष्ठा, अधिकार व कर्तव्यपरंपरा सुरक्षित नसते.

## (६) यावनी सत्तेचें स्वरूप

हिंदुस्थानासारख्या बहुविध पंथाच्या व मताच्या लोकांत एका विशिष्ट धर्मानें प्रेरलेल्या व धार्मिक आक्रमण करणाऱ्या अधिकाऱ्यांचें राज्य मूलतः च घातक व अनर्थकारी आहे. तुर्कांच्या राज्यांत तसें तें विकृत रूपानें झालें. त्यांनीं इस्लाम धर्माचा पुरस्कार केला व पुढाकार घेतला. त्यांनीं राज्याला एका धर्म–राज्याचें (Church State) स्वरूप दिलें. इस्लामी देशांत तें ठीक असेल. पण हिंदुस्थानांत तें अवास्तव होतें. धार्मिक उद्देशामुळें ते जुलुमजबरदस्तीचें, अन्यायाचें, लुटालुटीचें व सैनिक स्वरूपाचें झालें. त्यांचा धर्म एका ठराविक समजुतीचा, नीतीचा व योग्यतेचा होता. त्यामध्यें मुसलमानेतरांबद्दल न्यायाची, समानतेची व उदारपणाची नीति व वृत्ति नव्हती. त्यांचें राज्य अरेरावी सुलतानांचें, धर्मांध मौलवींचें, उलेमांचें, काजींचें व कुराणाचें झालें. त्यामध्यें जिझीय, जिहाद, काफीर, हर्ब (युद्ध) या कल्पनांना व योजनांना वाव मिळाला. त्यामध्यें सर्व

प्रजेची समानता नव्हती. त्यांचें स्वातंत्र्य, वित्त, स्वत्व यांचें अधिकृत संरक्षण नव्हतें. तें तेथील देशी लोकांच्या स्वास्थ्याच्या व कल्याणाच्या हेतूनें प्रेरित नव्हतें, आणि त्यांच्या धार्मिक व व्यावहारिक समान स्वातंत्र्यासाठीं नव्हतें. ही राज्याची इस्लामी कल्पना उलथून पाडणें, हेंच महाराष्ट्रक्रान्तीचें, महाराष्ट्रधर्माचें व महाराष्ट्र-राज्याचें खरें स्वरूप व दैवी व ऐतिहासिक कार्य होय. त्यामध्यें धर्मसमानता व धर्मस्वातंत्र्य, राजकीय स्वराज्य, समाजसुधारणा, विचारप्रगतीचें बीज व त्यापासून उत्पन्न होणारी राष्ट्रीय प्रभुशक्ति, उत्साहशक्ति व मंत्रशक्ति ह्या होत्या.

## (७) सतराव्या शतकाचें क्रांतीस्वरूप

सतरावें शतक हें क्रान्तीचें शतक. त्यामध्यें हिंदूंनीं विचारक्रान्तीस व राजकीय क्रान्तीस सुरवात केली. त्याच्या उत्तरार्धात पांच राजक्रान्त्यांचें अनुष्ठान सुरू होऊन, त्या बव्हंशीं १८ व्या शतकांत अधिष्ठित झाल्या. मराठे, राजपूत, शीख, बुंदेले व जाट हे सर्व मोगलीसत्ता व आक्रमण, धर्म व धोरण याविरुद्ध लढले, व आपापल्यापरीनें पुष्कळांशीं सफळ झाले. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध १६४७ ते १७०७ पर्यंत चाललें. राजपुतांचें १६७९ ते १७०९ पर्यंत. शिखांचें १६७६ ते १७०८ पर्यंत. बुंदेल्यांचे १६७१ ते १७३१ पर्यंत. जाटांचे १६६९ ते १७१८ पर्यंत. राजा शिवाजी, वीर दुर्गादास, गुरु गोविंदसिंग, राजा छत्रसाल, राजाराम जाट, अशा वीरांनीं ही स्वातंत्र्ययुद्धें यशस्वी केलीं. त्यांनीं च मोगली साम्राज्याचा पाडाव केला व तें धुळीस मिळविलें. या झगड्यामध्यें नवी राजकीय दृष्टी, नवे राजकीय उद्देश व नवे राजनेते उत्पन्न झाले, आणि त्यांच्या प्रभावामुळें हिंदुस्थानचें मध्यकालीन युग बदललें. पारतंत्र्याची दृष्टी जाऊन स्वातंत्र्य व स्वराज्य यांची स्फूर्ती आली. त्यांना मोगल सत्ता परकी वाटूं लागली. मोगल राजे व त्यांचे अधिकारी आपल्याला परकी समजत असत. त्यांचा धर्म, भाषा, रीतिरिवाज, समजुती, संस्था ह्या परकी होत्या. त्यांच्या परकीय भावनेची परिणती औरंगझेबाच्या वेळेस झाली. तो आपल्याला इस्लामी धर्माचा अनुयायी व प्रतिनिधी समजे. त्याला तो खास देवाचा धर्म असें मानी. त्याचा प्रसार करणें, त्याचें पुनरुज्जीवन करणें, त्याची सत्ता सर्व हिंदुस्थानभर स्थापणें, त्याच्या आज्ञांप्रमाणें शासनपद्धती चालविणें, हें तो आपलें मुख्य कार्य समजे. इतर धर्मांच्या अनुयायांना तो काफीर समजे. त्यांना कमी दर्जाचे लेखी व त्याप्रमाणें वागवी, आपलें राज्य व कायदा तो देवसंमत मानी. अशा राजकर्त्यांशीं, राजपद्धतीशीं व धर्मदुराग्रहाशीं ह्या क्रान्तीकारकांचा झगडा होता. त्यांचा विरोध हा नुसता राजकीय धोरणाबद्दलचा नव्हता. त्या यावनी पद्धतीशीं आमूलाग्र होता, व तो त्यांच्या दृष्टीनें आवश्यक होता.

प्रत्येक क्रान्तीला तिचीं ध्येयें, तत्वें, उपाय, साधनें व नेते लागतात. तिची खास शक्ति युक्ति असते, योजना व उत्साह असतात. तिच्या उत्पत्तीला, गतीला अनेक ऐतिहासिक परिचित, अपरिचित, व आकस्मिक घटना कारणीभूत होतात. इतिहासाची घडण एकाच सूत्रानें बांधली जात नाहीं. ती अनेक शक्तींच्या प्रभावानें व संघर्षणानें बनतें. त्यामध्यें भौगोलिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, जातिक व वैभूतिक कारणांचा समावेश करावा लागतो. तेव्हां च ऐतिहासिक घडामोडीचें व क्रान्तीचें खरें स्वरूप कळतें व त्याच्या रहस्याचा उलगडा होतो. महाराष्ट्रक्रान्तीचा विचार करतांना अशा च कारणांची मीमांसा करावयास पाहिजे. नुसत्या एका च धार्मिक अथवा राजकीय अंगाचा उहापोह करून चालणार नाहीं.

## (८) महाराष्ट्रक्रांतीचीं लक्षणें

महाराष्ट्रक्रांती ही वर्ग अथवा जातिक्रान्ती नव्हती, ती केवळ नव्या राजघराण्याची स्थापना नव्हती. तिचें स्वरूप सर्वांगीण राष्ट्रीय होतें. ती राजकीय दृष्टीनें संरक्षणात्मक व आक्रमक होती. धार्मिक दृष्टीनें व्यावहारिक होती. सामाजिक दृष्टीनें स्फूर्तीदायक व लोकचिंतावाहक होती. वैचारिक दृष्टीनें पुरोगामी व हितकरू होती. ती नुसती तुर्कमोगलांची शत्रु, इस्लामाची प्रतिस्पर्धी, त्यांच्या असहिष्णुतेची व छळाची प्रतिरोधी, व पारतंत्र्याची प्रतिकारी नव्हती. हें सर्व करून ती एक नवी दृष्टी, विचार, ध्येय, रचना व योजना, स्फूर्ती व सामर्थ्य देणारी होती. ती महाराष्ट्राच्या नवजीवनाची जननी होती. पुढें पाश्चात्यांच्या वर्चस्वामुळें व आपल्या गृहकलहामुळें तिची परिणती झाली नाहीं, ही मात्र निरंतर दुःखाची गोष्ट झाली. मराठ्यांनीं केलेल्या क्रान्तीचा व दाखविलेल्या कर्तृत्वाचा पाया १७ व्या शतकांत पूर्णपणें घातला गेला. त्याचा भव्य प्रासाद १८ व्या शतकांत उभारला गेला त्याचें मूळ मात्र तत्पूर्वी त्यांच्या भौगोलिक परिस्थितींत, सांस्कृतिक परंपरेंत, धार्मिक चैतन्यांत, राजकीय उठाठेवींत व वैभूतिक सामर्थ्यांत आणि चळवळींत सांपडतें. १७ व्या शतकाचा मुख्य भर परकीय सत्तेचा पाडाव व स्वकीय सत्तेची स्थापना (म्हणजे स्वराज्याचें अधिष्ठान) करण्याकडे होता. १८ व्या शतकांत तें स्वराज्य राखणें, त्याचें पुनरुज्जीवन करणें, तें वाढविणें व हिंदुस्थानचें साम्राज्य स्थापणें, या प्रकारचा मोठा प्रयत्न करण्याकडे होता.

## (९) शिवाजी व रामदास यांची परंपरा

शिवाजी व रामदास यांच्या वेळच्या क्रान्तीचें स्वरूप व भूमिका समजण्यास तत्कालीन परिस्थितीचा सर्वांगानें विचार केला पाहिजे.

शिवाजीच्या राजपूत पूर्वजांनीं यवनांच्या सेवेंतच आपली क्षात्र परंपरा व वृत्ति राखून पुढें त्यांच्या निर्बलतेचा फायदा घेतला व आपलें क्षात्रतेज, राजकीय आकांक्षा व भौमिक आसन दृढतर केलें आणि भावी स्वराज्याची तयारी केली. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील मराठे सैनिकांनीं व देशमुखवर्गानीं यवनांचे राजकीय आसन दृढ होऊं दिलें नाहीं. त्यांनीं दक्षिणेतील शाह्यांचें बळ व वर्चस्व आंतून पोखरलें. शिवाजीनें या गोष्टींचा फायदा घेऊन स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवली व पुढें तें आपल्या क्षात्रतेजानें, नीति व युक्तिबलानें स्थापलें. पण रामदासाची परंपरा ही अशी नव्हती. त्यांच्या वेळेस भक्तिमार्गाचें, संसारविन्मुखतेचें प्राबल्य झालें होतें. शिवाय जुनी कर्मठ परंपरा पूर्णपणें वावरत होती. त्या मार्गाची दृष्टी व्यक्तीच्या मोक्षाकडे विशेष होती. तेथें राज्य, स्वराज्य, जनसमाज, यांची चिंता नव्हती. त्यामुळें रामदासाला आपल्या विचाराची मांडणी, आपली दृष्टि, आपला पंथ व संघटना नव्यानें करावी लागली. यामध्यें शिवाजीप्रमाणे रामदासाना प्रभु श्रीराम व भगवान श्रीकृष्ण, यांच्या वीरकथांनीं भरलेल्या व उपदेशांनीं प्रेरलेल्या रामायण व महाभारत ग्रंथांनीं देशाच्या अवनत काळांत दिशा दाखविली व स्फूर्ती दिली.

## (१०) रामदासांची भूमिका व कार्य

रामदास हे स्वतंत्र व श्रेष्ठ विचाराचे महापुरुष होते. त्यांच्या विचारांत वास्तविकतेचें प्रतिबिंब होतें, परिस्थितीचें चित्रण होतें, तत्कालीन दुःखपरिमार्जनाचे उपाय होते; त्यांच्या भाषेंत ओज, ओघ, आकर्षण व सामर्थ्य होतें. ती हृदयभेदी, स्फूर्तीदायक, शक्तिसंचारी, दैवी तेजाने ओथंबलेली होती. त्यांचें शील व चारित्र्य योग्याचें, त्यागाचें, परोपकाराचें व लोकसंग्रही होते. त्यांची योजना संघटनाची व चळवळीची, पुढारीपणाची व लोकजागृतीची होती. त्यांची भूमिका स्वराज्य व स्वधर्मस्थापनेची, दुष्टनिर्दळणाची, देशद्रोही व देवद्रोही यांच्या नायनाटाची होती. ते महाराष्ट्रक्रान्तीचे खरे प्रतिनिधी व जनक होते. त्यांचे विचार उदात्त व राष्ट्रभावनोद्दीपक होते. त्यांच्या विचारामध्यें लोकसंरक्षण व संस्कृतीपोषण या दोन्ही कल्पना होत्या. त्यांच्यापुढें 'मराठे लोक' व 'महाराष्ट्रभूमि' हीं दोन्ही दृश्यें होतीं. त्या बरोबरच "हिंदू व हिंदुस्थान" हीं व्यापक ध्येयें होतीं. त्यांनीं आपल्या उपदेशांनीं, व चळवळींनीं, चारित्र्यानें व संघटनानें लोक जागविले, उठविले व कार्यतत्पर केले, विचार व ध्येयप्रवृत्त केले. त्यांना स्फूर्तीचे ग्रंथ दिले, कार्यक्षम पंथ दिला, दैवी गीता व गाथा दिल्या, उज्ज्वल इतिहास व चरित्र दिलीं, खरी विभूति दाखवून दिली, नेतृत्व दिलें, भक्त व सेवक दिले, उत्साह व विश्वास दिला, कार्य व ध्येय, सामर्थ्य व शक्ति हीं दिलीं, त्यांची युक्ति व बुद्धि प्रेरली. त्यांच्यामध्यें देशस्थितीबद्दल क्षोभ व प्रबल मनोविकार उत्पन्न केले.

त्यांना नव्या राष्ट्रीय विचाराची तेजस्वी, प्रखर, जोरदार भाषा व वाङ्मय दिलें. त्यांनीं राजकीय जुलमाची चीड, धार्मिक छळाची घृणा, पातिव्रत्य, शील व कर्तव्य यांच्या भ्रष्टतेविरुद्ध प्रतिकार उत्पन्न केला. त्यांचा उपदेश निर्भयतेचा, उठावाचा, युद्धाचा, प्रयत्नाचा, दुःष्टसंहाराचा होता. महाराष्ट्रक्रान्तीला त्यानी पांच क्रान्त्याचे प्रवाह जोडले: एक राजकीय, दुसरा धार्मिक, तिसरा व्यावहारिक, चौथा नैतिक व पांचवा वैचारिक आणि वाङ्मयीन.

## (११) देशाचा मुख्य शत्रू

प्रत्येक क्रान्तीमध्ये मुख्य शत्रू कोण हें ओळखावे लागतें. मराठ्यांनीं मोगल हे च आपलें खरे शत्रू म्हणून मानले. ते परदेशी होते, परधर्माचे होते, असहिष्णु व जुलमी होते. नीतीची व न्यायाची त्यांना फारशी चाड नव्हती. त्यांचें राज्य व त्यांचा धर्म यांनीं हिंदु धर्म व हिंदु राज्यें यांची फार च अवनती केली होती. औरंगझेबाची राजकीय कारकीर्द, साम्राज्यतृष्णा, व धार्मिक छळ यांमुळें हिंदी राजेरजवाड्यांची, हिंदू धर्मकर्मांची, लोकांच्या अब्रू व वित्तस्वातंत्र्याची स्थिती फारच हलाकीची झाली होती. तेव्हां स्वत्वरक्षण, स्वधर्मरक्षण, पावित्र्यरक्षण, स्वराज्यरक्षण यांकरितां "मरा नाहींतर मारा," "सहा नाहींतर उठा," असा च उपदेश करावा लागला. मुख्य प्रश्न तरण्याचा नाहातर मरण्याचा होता. देशरूपी सूर्यचंद्रवंशांना तुर्कमोगलरूपी राहुकेतूंचें खग्रास ग्रहण लागत चाललें होतें. त्या शत्रूपासून सुटणें हें च या अभिनव महाराष्ट्रक्रान्तीचें, तिच्या नेत्याचें मुख्य कार्य होतें. तें नुसतें स्वरक्षणानें, मर्यादित स्वराज्यानें भागणारें नव्हतें. तें आक्रमणानें, व्यापक साम्राज्यानें सुटणारें होतें. या च कल्पनेंत व उद्देशांत महाराष्ट्रक्रान्तीचें मर्म व तिच्या कथेचें व गाथेचें उज्ज्वल स्वरूप व संदेश आहे. त्यांत च तिचा दिग्विजय व धर्मविजय अनुस्यूत आहे. आणि ही च रामदासांची खरी भूमिका व उज्ज्वल क्रान्ती होय.

## (१२) रामदासकालीन राजकीय परिस्थिति व रामदासांची भूमिका

रामदासकालीन राजकीय परिस्थितीचें मुख्य लक्षण मोगलाचे चढतें वाढतें आक्रमण होतें. त्यामध्यें देशधर्माला व देशी राज्यांना मोठें संकट उत्पन्न झालें होते. त्याचप्रमाणें विजयनगरचा वाढता क्षय व युरोपीय लोकांचें वाढतें भय, हींहि घातक लक्षणें होतीं. त्यावेळेस कोणती च सत्ता बलवान, एकतंत्री, न्यायी, समानता व स्वातंत्र्यपोषक नव्हती, तिला आर्थिक ध्येय नव्हतें. ती नुसती कर-ग्राही व युद्धतत्पर होती. शासनव्यवस्थेंत सेनेचें, सरदारांचें, परकीयांचें, पर-धर्मीयांचें प्राबल्य होतें. ती बदलणें, तिला लोकोपयोगी, लोकोन्मुख, लोकहितैषी करणें कठीण होतें. जिकडे तिकडे अंदाधुंदी, आततायीपणा, व मुलुखगिरी

[library stamp]

नांदत होती तेव्हां तिला आमूलाग्र बदलणें इष्ट होतें. उत्तरेंत मोगलसत्तेनें व दुराचारानें देश व्यापला होता. औरंगझेबाची "महा योजना" अखंड हिंदुस्थानचें इस्लामी राज्य – पाकीस्तान – करावयाचें, इस्लामी धर्म व सत्ता वाढवावयाची अशी होती; जोपर्यंत हिंदुस्थान दारुल इस्लाम ( इस्लामस्थान ) होत नाहीं, तोपर्यंत याला दारुल हर्ब ( युद्धस्थान जिहाद व जिझीया स्थान ) करावयाचें असा होता.

दक्षिणेंत निर्बल, ऐषआरामी व स्वार्थलोलुप सुलतान व सरदार आल्यामुळें मोगलांचा युद्धरथ व राजकीय व्यूह आणि भेदनिती व धार्मिक डोळा तिकडे वळला. मोगली शासनव्यवस्थेंत व धार्मिक दृष्टीमध्यें अनुकूल बदल करणें अशक्य असल्यामुळें, तिला विरोध करणें, तिचा पाडाव करणें, तिचें आक्रमण थोपविणें व आपलें आक्रमण सुरू करणें, हा महाराष्ट्रक्रान्तीचा कार्यक्रम झाला. तिच्या नेत्यांनीं चढत्या वाढत्या महाराष्ट्रराज्याची व महाराष्ट्रधर्माची भूमिका घेतली, आणि तिची चतुःसूत्री स्वराज्य, स्वधर्म, स्वभाषा आणि यवनीमंडळ निर्यवन करावें अथवा यवनाक्रांत राज्य आक्रमावे, अशी आंखली आणि देशांतील देव व देवळें, धर्म व क्षेत्रें, वेदशास्त्रें व पुराणें, लोकसंस्था व समजुती, यांचें संरक्षण करावें असा उद्देश ठेवला. मोगलांचें आक्रमण हा देशावरील विज्वर प्रसंग. त्यांची शासननीति अनिर्बंधित व अनियमित, त्यांची नागरिकनीति भेदस्वरूपाची व असमानतेची. यासुळें मराठ्यांनीं त्यांना आव्हान केलें. त्यांच्यावर आक्रमण केलें. ही च महाराष्ट्रक्रान्तीची व चढावाची विचारसरणी, स्फूर्ती व भूमिका. त्यांना अशी क्रान्ती इष्ट, आवश्यक व शक्य होती. तिला नेते व द्रष्टे पाहिजे होते. तिच्या सफलतेमुळें ३०० शतकांचा कलंक व काळिमा धुवून निघाला. महाराष्ट्राचें राजकारण हें चढतें वाढतें होतें. त्यांचे पुरस्कर्तें व प्रणेते रामदास होते. त्यांच्याइतका प्रभावी उपदेशक व कार्यकर्ता झाला नाहीं. त्यांनीं जरी आपल्या कार्याला सुरवात महाराष्ट्रांत केली तरी, त्यांचा संचार सर्व देशभर झाला, व त्यांचा उपदेश हिंदुस्थानाकरतां होता. रामदास म्हणजे नुसतें धर्मज्ञान, भक्तिज्ञान, नीतिज्ञान व चातुर्यज्ञान नव्हे. त्यांनीं राजशक्तीचें खरें अधिष्ठान कशांत आहे, त्याचें स्वरूप व स्थान काय असावें, राजपुरुष, राजधर्म, क्षत्रियधर्म, प्रजाधर्म कसे असावे, या सर्व प्रश्नांचें वर्णन व उहापोह केला आहे. त्या धर्मांचे उत्तम गुण कोणते, उत्तम खुणा कोणत्या त्याहि सांगितल्या आहेत. महाराष्ट्राचें सामर्थ्य कशांत आहे, उदय कसा होईल, भवितव्य कोणतें, या सर्वांचें त्यांनीं अचूक दिग्दर्शन केलें आहे. ते दैववादी नव्हते, प्रयत्नवादी होते. पण प्रत्येक कार्याला ते चळवळीच्या सामर्थ्याबरोबर परमेश्वराचें अधिष्ठान भाकित असत. ते राष्ट्रीय पुढारी होते. त्यांना नवें सांगावयाचें होतें. त्यांना

स्फूर्तीचा संदेश, कर्तव्याचा उपदेश व प्रेरणा करावयाची होती. त्यांनीं देशाच्या रोगाचें, अवनतीचें अचूक निदान केलें. व महाराष्ट्राच्या चैतन्याचें, क्रान्तीचें नवयुग सुरू केलें. त्यांनीं राम व कृष्ण यांच्या अवतारकार्यांचा पुनरुच्चार केला व त्यांतील अमृत मराठे वीरांना पाजलें. ते धर्ममठांत वावरणारे केवळ जुने कर्मठ महंत नव्हते. ते राष्ट्रमठांत संचार करणारे अध्वर्यु समर्थ होते. ते विश्वकल्याणाची चिंता वहात. त्यांनीं आचारनीतीला, क्रियाकर्तृत्वाला, प्रपंचप्रयत्नाला प्राधान्य दिलें. त्यांनीं ज्ञानप्रसार केला. लोक शहाणे केले. ग्रंथ लिहिले. पंथ व मठ स्थापले. त्यांनीं समाजाच्या मूढ, दुष्ट, आळसी जीवनावर प्रखर कोरडे ओढले. त्यांनीं **नवमराठा** व **नवमहाराष्ट्र** उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. त्यांना सुधारणा शीलांत व कार्यांत, दृष्टींत व आचारांत अंतर्बाह्य पाहिजे होत्या. त्यांना धार्मिक लोकांचा दंभ व पोकळ डौल, विद्वानांचे वायफळ तर्कवितर्क, वितंडवाद नको होते. ते आपल्या धर्माचें, संस्कृतीचें व कर्तृत्वाचें, मोठेपणाचें एक उच्चतम प्रतीक होते. त्यांचें नवें महाराष्ट्र राज्य म्हणजे रामराज्य, आनंदवनभुवन होय.

**त्यांचे राजकीय उद्गार**—" लोकांसी राखणे राजी। तें राज्य प्रबळे बळें" " शक्तीनें मिळती राज्यें "

" बुडाला औरंग्या पापी। म्लेंच्छसंहार जाहला ॥
बुडाले भेदवाही ते। नष्ट चांडाळ पातकी ॥ "
" बुडाले सर्व ही पापी। हिंदुस्थान बळावले ॥
अभक्तांचा क्षयो जाला। आनंदवनभुवनीं ॥ "

**राजा रामासारखा पाहिजे** : " धर्माभिमानी क्षेत्राभिमानी। विद्याभिमानी विप्राभिमानी। ज्ञानाभिमानी सत्याभिमानी। भक्ताभिमानी कोदंडपाणी ॥ "

**राज्याचें स्वरूप रामराज्यासारखें असावें** : बहुवृष्टि नाहीं अनावृष्टि नाहीं। कदा ही भुमी पीक सांडीत नाहीं। जना दंड नाहीं तथा मार नाहीं। जरा मृत्यु ना व्याधि कांहीं च नाहीं ॥ " " सदासर्वदा न्याय, अन्याय नाहीं। नसे हो भुमी वोस उदास कांहीं ॥ " **याच राघवाचा पंथ हाच त्यांचा धर्मपंथ व राजपंथ होता** :

" म्लेंच दुर्जन उदंड। बहुता दिसाचें माजलें बंड।
यांचे करूनि दुखंड। राज्य करावे ॥
" सकळ लोक येक करावे। गनीम लाटून काढावे।
येणें करितां कीर्ति धांवे। दिगंतरीं ॥

“ आधीं गाजवावे तडाखे । तरी मग भूमंडळ धाके ।
ऐसे न होतां धके । राज्यासी होती ॥
“ बहुत लोक मिळवावे । लोक विचारें भरावे ।
कष्ट करूनि घसरावे । म्लेंच राजे ॥
“ आहे तितुकें जतन करावें । पुढें आणीक मेळवावें ।
महाराष्ट्रराज्य चि करावें । जिकडे तिकडे ॥
“ लोकीं हीमती धरावी । शर्तीची तरवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥
“ अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ ”
“ जयास जिवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये । ”
“ मारिता मारितां मरावें । तेणें गतीस पावावें । ”
फिरोन येता भोगावें । महद्भाग्य । ”
मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ।
देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्होळ करावा ।
मुलख बडवावा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं । ”
लोकांसी राखणें राजी । तें राज्य प्रबळे बळें ।
लोक हें राखतां राजी । सर्व राजी च होतसे ।
लोक राखोन कीजे । सकळ कांहीं । ”
बहुतांचे समाधान राखावें ।
जिकडे जग तिकडे जगन्नायक ।
कळला पाहिजे विवेक । ”
जगदीश आहे जगदंतरीं ”

## (१३) रामदासकालीन धार्मिक परिस्थिती व रामदासांची भूमिका

**त्या काळची धार्मिक परिस्थिति** कठीण होती. एके बाजूला मुसलमानांची असहिष्णुता, अत्याचार व क्रूरता, दुसऱ्या बाजूला दांभिक, भोंदू, पाखंडी यांचा सुळसुळाट. तुर्कांचा इस्लामधर्म व हिंदूंचा मानवधर्म यामधील हा झगडा होता. रामदासांनीं हा एक प्रकारचा देवासूरसंग्राम, रामरावणयुद्ध

कल्पिलेलें होतें. विश्वामित्राप्रमाणें रामदासांचें ब्राह्मतेज क्षात्रवृत्तीनें प्रेरलेलें व क्षात्रवृत्ती ब्रह्मतेजानें पुनीत झालेली होती. त्यांची धर्मनिष्ठा मानवबुद्धीनें बाणलेली होती, कोणत्या विशिष्ट देवाच्या संप्रदायानें बांधलेली नव्हती. त्यांना आपल्या विशिष्ट धर्माचें, संप्रदायाचें राज्य स्थापायचें नव्हतें. त्यांना प्रत्येक राजाला, राज्याधिकाऱ्याला, वर्गाला, वर्णाला, जातीला, स्वकर्तव्याला अनुसरून मानवधर्मानें वागावयास लावावयाचें होतें. राजधर्म, प्रजाधर्म, ब्राह्मणधर्म, क्षत्रियधर्म, हे सर्व मानवधर्माला पोषक पाहिजेत. त्यांचा सिद्धांत व दृष्टी Theocracy or church State [धर्मराज्य] ची नव्हती. जुन्या साधुसंतांनीं (ज्ञानेश्वर ते तुकाराम) ही मानवतेची दृष्टी उत्पन्न केली होती. देवाच्या दृष्टीनें मनुष्य हा समान आहे. "भूतां परस्परें जडो मैत्र जीवाचें" ही त्यांची उदात्त भावना होती. सदाचार, सत्कर्म, भूतदया हीं धर्माचीं मुख्य लक्षणें होतीं. त्यांनीं "भेदाभेद भ्रम अमंगळ" मानला होता. त्यांना कोणा हि धर्माचा मत्सर नको होता. "दया करणें जे पुत्रासी ते चि दासा आणि दासी", हा धर्म पाहिजे होता. त्यामुळें त्यांना इस्लामधर्माचा द्वेष होता. तो विशिष्ट, धर्मांध, प्रचारी, आक्रमक होता. पण आमच्या साधुसंतांचा धर्मोपदेश तसा नव्हता. "शुद्ध भक्तिभाव । परदारा, परधन, परनिंदा, परपीडण सांडोनियां । भजन हरीचे करा ।. सर्वांभूतीं समदृष्टी । हे चि भक्ति गोड मोठी ।" हरीनाम, हरीकीर्तन, हरीभजन, हरीसेवा, संतसंग, भूतदया यांचा महिमा त्यांनीं गायिला होता. तो शुद्ध मानवतेचा उच्च मानवधर्म होता. त्यामध्यें द्वेष, युद्ध, छळ यांना जागा नव्हती. देव देवळें यांचा नाश नव्हता, बळजबरी, बलात्कार नव्हता, त्यामध्यें व्यक्तिस्वातंत्र्याला, स्वभाव व स्वधर्म पोषणाला जागा व मोकळीक होती. त्यामध्यें नैतिक स्वातंत्र्य होतें. या साधुसंतांची भूमिका नैतिक व पारमार्थिक होती. सांप्रदायिक दुराग्रही नव्हती. ते देशकाल, वर्ग, जाती विसरत. त्यांना सर्वभूताठायीं परमेश्वर भासे. ते धर्मांधतेच्या, कट्टरतेच्या, जहालपणाच्या विरुद्ध होते. त्यांना स्वातंत्र्य, समता, मैत्री, करुणा पाहिजे होती. ते या दृष्टीनें क्रान्तीप्रेरक होते. कर्ममार्गीयांच्या विरुद्ध ज्ञानमार्गी व भक्तिमार्गीयांनीं हें मानवतेचें काम केलें. नाम रूपें व उपाधी यामध्यें न गुरफटतां त्यांनीं व्यक्तीला संधी व विचार व आचार स्वातंत्र्य दिले. मानव हा त्यानें च स्वतः उत्पन्न केलेल्या संस्था व समजुती, निष्ठा व उपाधी यांच्या पलीकडे पाहूं व जाऊं शकतो असें प्रतिपादलें.

रामदासांनीं या शिकवणुकीला व्यवहार्य व प्रादेशिक केले. त्यांनीं परमार्थाबरोबर प्रपंचाची, देवाबरोबर प्रयत्नाची, धर्माबरोबर अर्थाची व राजकारणाची आवश्यकता व महती दाखविली. **त्यांचे उद्गार :**

" साहेबास लोटांगणीं जावे । नीचा सारिखे व्हावे ।
आणि देवास न मनावे । हें कोण ज्ञान " ॥

" देव हरपला घरीं । येक देव नेला चोरीं ।
येक देव दुराचारीं । फोडिला बळें ।

येक देव जापाणिला । येक देव उदकीं टाकिला ।
येक देव नेऊन घातला । पायातळीं ॥ "

" देव जाले उदंड । देवांचे मांडले भंड ।
भूतादेवतांचे थोतांड । येक चि जाले ॥ "

मुख्य देव तो कळेना । कशास कांहीं च मिळेना ।
येकास येक वळेना । अनावर ॥ "

" ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥

कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपले इच्छेने ॥ "

" राज्य नेलें म्लेंचिं क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं ।
आपण अत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥

तीर्थें क्षेत्रें तें मोडिलीं । ब्राह्मणें स्थानभ्रष्ट जालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥

" या भूमंडळाचें ठाईं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
मऱ्हाष्ट धर्म राहिला कांहीं । तुम्हाकारितां ॥ "

" रघुनायकासारिखा देव नाहीं । क्रिया पाहता चोखडी सर्व कांहीं ॥ "

भक्ति अवघी बुडाली । आणि अभक्ति ठाकली ।
आणि ती येता निघोनि गेली । नीतिमर्यादा ॥

शब्दज्ञान उदंड जालें । कवित्व घरोघरीं केलें ।
समाधान निःशेष गेलें । हारपोनियां । "

" स्त्रिया भ्रतारासी सदा । सेवा न करितां पेटती द्वंद्वा ।
पुत्रीं टाकिली मर्यादा । मायबापांची ॥ "

"धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार॥"

"उत्कट भक्ति उत्कट ज्ञान। उत्कट चातुर्य उत्कट भजन।
उत्कट योग अनुष्ठान। ठाईं ठाईं॥"

**(१४) भौगोलिक परिस्थिति,**
**लोकांची वृत्ति आणि रामदासांची भूमिका**

रामदासकालीन महाराष्ट्र व हिंदुस्थान **हा भौगोलिक दृष्ट्या** जरी एक असला तरी **राजकीय दृष्ट्या** अखंड नव्हता. महाराष्ट्राचे सुद्धां भिन्न तुकडे झाले होते. घाट, मावळ व कोंकण प्रदेश यामध्यें हिंदु सरदार व राजे यांचें प्राबल्य होतें. देशमुख देशपांडे, पाटिल कुलकर्णी हे खरे राजकीय अधिकारी होते. हा प्रदेश त्या वेळच्या दळणवळणाच्या मुख्य मार्गापासून दूर होता. त्यामध्यें परकीयांना लढणें व आपली सत्ता गाजविणें प्रयासाचें होतें. तेथील लोक पारतंत्र्यामुळें ठेचलें गेले नव्हते. त्यांच्यापासून परकी सत्ता दूर होती. तेथें लुटालुट, जाळपोळ, जुलुम जबरदस्ती, युद्धें कमी झालीं. तेथें स्वातंत्र्याचें वारें अजून शिल्लक होतें, स्वातंत्र्यबुद्धि होती, आणि परकी सत्ताधारी केवळ नामधारक होते. जातीवंतांचा व जागीरदारांचा पगडा निष्ठुर नव्हता. जमीनदार व कुळें, अधिकारी व रयत, यांचे संबंध सलोख्याचे होते, त्यांच्यामध्यें क्षात्रतेज वावरत होतें, सैनिक शिक्षण होतें. ते जुलमाला, छळाला विरोध करणारे होते. ते बुजणारे, भिणारे नव्हते, त्यांचा धर्माचा, देशाचा, वतनाचा अभिमान जाग्रत होता. जर मोगलांचा Theory of Conquest वर भर होता तर त्यांचा Theory of reconquest वर विश्वास होता. मोगल धर्मनिष्ठ नागरिकतेचें अवलंबन आपल्या शासनकारभारांत करीत, तर मराठे मानवनिष्ठ नागरिकता आपल्या शासनव्यवस्थेंत अंगिकारीत. मराठे विजीगीषू वृत्तीचे, दिग्विजय तृष्णेचे वीर आहेत. त्यांचा विक्रमकाल महाराष्ट्राचा उज्ज्वल काल आहे. तो शस्त्रास्त्रपूजेचा, शक्ति व शास्त्रसंघटनाचा, विद्यावाङ्मयाचा काल आहे. रामदासांनीं ही विजीगीषूची भूमिका पत्करली व तदनुसार आपला उपदेश केला, आपलें वाङ्मय रचलें, आपले मठ स्थापिले, आपला संचार केला, आपलें राजकारण केलें, आपला धर्म सांगितला.

मराठ्यांच्या भूमीनें त्यांना बलवान व काटक केलें. तेथील घाटांचे वारे, दऱ्याखोऱ्यांचें पाणी, नदीकांठची सुपीकता, कोंकणांतील पावसाळा, देशावरील डोंगर व किल्ले यांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर झाला होता. तेथील शेतकरी, गुराखी, धनगर, भंडारी, कोळी, मावळे हे आळशी व दबून राहिले नाहींत.

ते जरी गरीब, साधे असले तरी बरे च चिवट, काटक व मर्द वृत्तीचे होते. ते शृंगारवीर रसाचे भोक्ते होते. त्यांची गीतें, गाणीं, पवाडे, लावण्या, ओव्या, कहाण्या ह्यामध्यें भक्तिरसाबरोबर इतर ऐहिक रस भरपूर होते. ते साहसी, निर्भयवृत्तीचे, जातिवंत लढवय्ये व चपल अश्वारोही होते.

रामदासाच्या मनावर सह्याद्रिघाट, कृष्णा व गोदावरीकांठ, यांतील प्रदेशाचा, तीर्थयात्रेच्या निमित्तानें झालेल्या प्रवासांत पाहलेल्या प्रदेशाचा तेथील लोकस्थितीचा व लोककथेचा, आणि रामायणकथेचा विशेष परिणाम झाला होता. महाराष्ट्रभूमि व लोक, देशाची दुःस्थिती आणि रामाचें चरित्र व देवत्व हीं च त्यांच्या राष्ट्रकार्याचीं स्फुरणें झालीं. "रामेंविण देश तो जाणा विदेश," असें त्यांनीं ठासून सांगितलें. रामराज्य हें च त्यांचें राजकीय ध्येय बनलें. राघवपंथ हा त्यांचा धर्मपंथ झाला.

## (१५) त्या काळची सामाजिक स्थिती व रामदासांची भूमिका

त्या काळची सामाजिक परिस्थिती फार निकृष्ट होती. ब्राह्मण क्षत्रिय कर्तव्य-भ्रष्ट झाले होते. समाजांत स्वेच्छाचार वाढला होता. नाना बंडें पाखंडे, नाना मतें उपासना वाढल्या होत्या. कोणी कोणाला विचारीत नव्हता. पोटे संन्यासी, श्ववृत्ति, कामांधता वाढली होती. लोकांमध्यें आत्मविश्वास प्रयत्नवाद कमी होता. देशद्रोह, देवद्रोह, स्वामीद्रोह, यांचें प्राबल्य होतें. जातीबंधनें तुटलीं होतीं. बाटलेले लोक कुऱ्हाडीच्या दांड्याप्रमाणें गोतास काळ झाले होते. स्त्रियांवर अत्याचार होत. कुटुंबें देशोधडीस लागलीं होतीं. अशा प्रसंगीं रामदासांनीं समाजाला सर्वांगीण उपदेश केला. त्याला नवी विचारसरणी व संघशक्तीचें ध्येय दिलें. त्याला आत्मविश्वासाची, प्रयत्नाची, धीराची, सामर्थ्याची शिकवणूक दिली. ती प्रपंचपरमार्थाची, परोपकारपुण्याची होती. त्यांना जयिष्णु वर्धिष्णु व बलवान समाज पाहिजे होता. त्यावेळचा समाज जातीपद्धतीचे सेवासूत्र विसरला होता. तो जागीर पद्धतीनें खिळखिळा झाला होता. समाजांतील ऐक्यभाव, एकसूत्रत्व, विश्वास, स्थैर्य नष्ट झालें होतें. लोकचिंता, लोककल्याण, लोकसंग्रह, हीं रामदासांच्या भूमिकेंतील मुख्य लक्षणें होत. लोकांना धर्म, नीति, न्याय, व्यवहार, शिक्षण, गृहस्थी, भूतदया, परोपकार, प्रयत्न इत्यादि शिकविणें हा त्यांचा खरा उद्देश होता. त्यांना मनुष्य पांगळा व भोंगळा नको होता.

**तत्कालीन लोकस्थितिसंबंधीं रामदासांचे उद्गार:"**

"दुःख दारिद्र्य उद्वेगें। लोक सर्वत्र पीडिले॥"

"सर्वांसी राखणें राजी। सर्वकाळ मृदोत्तरे।

येक चि जीव सर्वांचा । कट्टबंध ढळे चि ना ॥"
"नसे न्याय ना नीति सर्वै बुडाली"

जीवमनुष्यें, जातीविजाती, महंत, पंडित, ज्ञानी, योगी, तापसी — या कोणामध्यें सख्य नाहीं. कलह आहे. **रामदास उपदेश देतात :—**

"भेटो कोणी येक नर । धेड महार चांभार ।
त्याचें राखावे अंतर । याचें नांव भजन ॥"
"दुःख नेदावे कोणाला । उंच नीच जरी जाला ॥"
"सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ॥"
"दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ।
आवघे चि सुखी असावे । ऐसी वासना ॥"

**लोकस्थिति खालावली होती.**

"काया वाचा मन । चित्त वित्त जीव प्राण ।
द्रव्य दारेचे करी भजन ।"
"नाना मतें निर्माण जाली । नाना पाषंडें वाढलीं ।
नाना प्रकारीचीं उठिलीं । नाना बंडें ॥"
"जैसा प्रवाह पडिला । तैसा च लोक चालिला ।
कोण वारील कोणाला । येक नाहीं ।
"पृथ्वीचा जाला गलांठा । येकाहून येक मोठा ।
कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ।"
"शास्त्रांचा बाजार भरला । देवाचा गलबला जाला ।
लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ॥
ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें ।
अवघे अनायेक जाले । चहूंकडे ॥
मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तें चि थोर ॥"
कित्येक म्लेंच होऊन गेले । कित्येक फिरंगणांत आटले ।
देशभाषेनें रुधिले । कितीयेक ॥"

"मऱ्हाष्ट्र देश थोडा उरला। राजकारणें लोक रुधिला।
अवकाश नाहीं जेवायाला। उदंड कामे॥
कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले। तेणें गुणें उन्मत्त जाले।
रात्रंदिवस करूं लागले। युध्यचर्चा॥"
"नीच प्राणी गुरुत्व पावला। तेथें आचार चि बुडाला॥"
"ब्राह्मण बुद्धीपासून चेवले। आचारापासून भ्रष्टले।
गुरुत्व सांडून जाले। शिष्य शिष्यांचे॥
"विप्रीं सांडिला आचार। क्षेत्रीं सांडिला विचार।
नीतिमर्यादा उडाली। भक्ति देवाची बुडाली॥"
"मुलांचे चालीनें चालावें। मुलांच्या मनोगतें बोलावें।
तैसें जनासी सिकवावे। हळुं हळुं॥"
"सर्व ही पेरणे विद्या। लोकामध्यें हळुं हळुं'।
"नेणते जाणते करणें। कथा निरूपणें सदा।
"आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थविवेका
येथें आळस करू नका। विवेकी हो॥

**(१६) त्यावेळेची आर्थिक व नैतिक परिस्थिती**

पारतंत्र्यामुळें लोकांची त्यावेळची आर्थिक व नैतिक अवस्था फार च कठीण झाली होती. यावनी राज्याचे परीणाम आर्थिक व नैतिक दृष्टीनें फार च भयंकर झाले होते. लोकांना जणूं काय कल्पांतकाळ आला असें वाटायला लागलें होतें. अनेक लोकांना खायला, ल्यायला, रहावयाला, अन्न व वस्त्र, घरें नव्हतीं. यवनी सैन्यांनीं व अधिकाऱ्यांनीं, चोरडाकूंनीं हाहाःकार माजविला होता. बायकांची अब्रू, धर्माचें स्वातंत्र्य सदैव धोक्यांत होतें. लुटालूट, नासधूस, जाळपोळ, आणि अनेक तऱ्हेची पिळवणूक व मारहाण चालली होती. महर्घता, संकट, धोका, भय, कंगालपणा, धर्मभ्रष्टता यांनी लोक हवालदील झाले होतें. त्यामुळें आत्महत्या, धर्मांतर, चोऱ्या, दरोडे, वाढले होते. जिकडे तिकडे बेबंदशाही व अराजकता माजली होती. नितिन्याय कोठें हि नव्हता.

**याबद्दलचें रामदासाचें वर्णन**

"पदार्थमात्र तितुका गेला। नुस्ता देश ची उरला।
येणे करितां बहुतांला। संकट जालें॥"

" माणसा खावया अन्न नाहीं। आंथरूण पांघरूण तेंहि नाहीं।
घर करावया सामुग्री नाहीं। काय करीती ॥
" कितेक अनाचारीं पडलीं। कितेक यातिभ्रष्ट जालीं॥
कितेक आक्रंदलीं। मुलेंबाळें ॥
" विचार सुचेना कांहीं। अखंड चिंतेच्या प्रवाहीं। पडले लोक॥
प्राणिमात्र जाले दु:खी। पाहतां कोण्हीं नाहीं सुखी।
कठिण काळें वोळखी। धरीनात कोणी ॥
" परचक्रीं धरून नेलें। नीच यातीस दिधलें।
दुर्दशा होऊन मेले। या नाव आधिभौतिक ॥

## (१७) त्यावेळची वैचारिक क्रान्ती व रामदासांची भूमिका

त्यावेळची **वैचारिक क्रान्ती** कवींच्या कवनामध्यें, शाहीरांच्या पोवाड्यामध्यें, भाटांच्या दोह्यामध्यें, गुरूंच्या वाणीमध्यें, साख्यांमध्यें, राजांच्या, वकीलांच्या व बखरकारांच्या पत्रामध्यें, ' नामा ' Namah ' मध्यें, बखरीमध्यें, साधुसंतांच्या ग्रंथामध्यें, बोधामध्यें, काव्यामध्यें सांपडते. हिंदी कवी–भूषण, लालकवी, नरूकवी, मराठी शाहीर व बखरकार; शीख गुरू–गुरुगोविंद; मराठी राजे–शिवाजी; मराठी कवी, साधुसंत–रामदास; इत्यादि प्रसिद्ध पुरुषांच्या लिखाणांत ही वैचारिक क्रान्ती स्पष्ट रूपानें दृग्गोचर होते. त्या क्रान्तीची केंद्रें राजपूताना, पंजाब, बुंदेलखंड व महाराष्ट्र हीं होती. तिचीं लक्षणें पारतंत्र्याचा प्रतिकार, स्वातंत्र्याचें युद्ध, स्वधर्माचें रक्षण, समाजाचें दृढीकरण, जयिष्णु देवाचें पूजन, विजिगीषू राजाची निष्ठा, शक्तीचें उपार्जन, प्रयत्न, चळवळ व धैर्य यांचें शिक्षण, राष्ट्रीय वृत्तीचें संगोपन, अशीं होती. त्यांचा आपल्या वाढत्या भाग्यावर व उच्च भवितव्यावर दृढ विश्वास होता. लोकांचें मन पालटावें याकडे त्यांचें मुख्य लक्ष होतें.

### रामदासांचा मुख्य मंत्र

" शक्तीनें पावती सुखें " " कोण पुसे अशक्ताला "
" शक्तीनें मिळती राज्यें "

त्याबरोबर युक्ति पाहिजे.

"युक्तीनें चालती सेना" "युक्तीला पाहिजे शक्ति"
"यत्न तो देव जाणावा" "अचूक यत्न तो देवो"
"न्याय तो देव जाणावा"

"धीर धरा धीर धरा। हडबडूं गडबडूं नका।
काळ देखोनि वर्तावें। सांडावें भय पोटींचें॥"

"अखंड सावधान रे। प्रयोग प्रेत्न मान रे।
प्रसंग हा तुफान रे। नको चि वेवधान रे॥"

**समर्थांचा पंथ हा राघवपंथ-सामर्थ्यपंथ**-होता.

"समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे॥"
"धकाधकीचा मामला। कैचा घडे अशक्ताला॥
नाना बुद्धि शक्ताला। म्हणोनी सिकवाव्या॥"
"सुशब्दें राजी राखावा। सकळ लोक।"
"अखंड सावधान असावे। दुश्चित्त कदापि नसावें।"

## (१८) रामदासांच्या कार्याचें स्वरूप

रामदासांचें कार्य तीन प्रकारचें आहे. एक व्यक्तीची सुधारणा, दुसरें राष्ट्राचा उद्धार, तिसरें जगाचें कल्याण. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. "विश्व उद्धरीन हेळामात्रे" त्यांना आत्मचिंता, राष्ट्रचिंता, विश्वचिंता, व धर्मचिंता होती. देशाच्या अवनतीची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यांनीं १२ वर्षे देशपर्यटण केलें होते व देशपरिस्थिती जाणली होती. तिच्या उद्धारार्थ उपाय केले व सुचविले. 'हजारों शिष्य तयार केले. अनेक मंडळ्या व मठ स्थापले. कडक शिस्त व नियम राखले. सर्वांचें नेतृत्व व चालकत्व केलें. त्यांचें एक प्रकारचें आत्मचरित्र, कार्याचें स्वरूप व क्षेत्र, दासबोधाच्या उत्तरार्धांत आलें आहें. त्यांत चतुराची. खऱ्या महंताची व्यापक लक्षणें दिलीं आहेत."

"उत्तम गुण तितुके घ्यावे। घेऊन जनास सिकवावे।
उदंड समुदाये करावे। परी गुप्तरूपें॥
"अखंड कामाची लगबग। उपासनेस लावावे जग।
लोक समजोन मग। आज्ञा इच्छिती॥"

" लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।
जाण जाणोन धरावे । जवळी दुरी ॥ "

" महंतें महंत करावे । युक्तिबुद्धिनें भरावे ।
जाणते करून विखरावे । नाना देसीं ॥ "

" बहुत जनासी चालवी । नाना मंडळें हालवी ।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेकें होतें ॥ "

" जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थाचें लक्षण ॥ "

" सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें ।
परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ "

" लोकांमाजी तरे आणि जना तारी । धन्य तो संसारी दास म्हणे ॥

" निशिदिनीं जनचिंता लागलीसे उदारा ।
सकळ जन सुखावे तो कसा काळ पावे । "

" मुख्य हरीकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें ते सावधपण । सर्व विषयीं ॥

याप्रमाणें महाराष्ट्र क्रान्तीचें स्वरूप व रामदासांची भूमिका व कार्य सर्वव्यापी व सर्वांगी होतें. त्यांनीं महाराष्ट्राला तारलें, जागृतीचा उपदेश केला व देशाच्या इतिहासांत अजरामर स्थान प्राप्त करून देण्यास उदंड परिश्रम केले.

## ( १५ )

# श्रीसमर्थ रामदास आणि साहित्यशास्त्र

(लेखक–डॉ. **के. ना. वाटवे**, एम्. ए., पी एच्. डी., **पुणें**)

महाराष्ट्रसंतमालिकेंत श्रीसमर्थ रामदासांना एक विशिष्ट स्थान आहे. ब्रह्मानंदाच्या किंवा भगवद्भजनाच्या तंद्रींत रंगून गेलेल्या इतर संतांना आपल्या भोंवतालच्या प्रत्यक्ष परिस्थितीची जेवढी जाणीव होती तिच्यापेक्षां फार मोठी व तीव्र जाणीव समर्थांना होती. इतकें च नव्हे तर तिच्यावर कांहीं तोड हि त्यांना काढावयाची होती. म्हणून आपली उच्च परमार्थिक बैठक ढळूं न देतां महाराष्ट्रांतील खऱ्याखुऱ्या व्यवहाराला एक निश्चित कर्मयोगपर वळण देण्याचें त्यांनीं योजलें व आपल्या या विशिष्ट योजनेच्या सिद्धीसाठीं एक मार्गदर्शक बोधग्रंथ हि निर्माण केला. आपली विशिष्ट शिकवण उक्तीनें आणि कृतीनें फैलावून तिला अनुयायांची जोड दिली, व तिच्या सातत्य रक्षणासाठीं एक थोर संप्रदाय प्रवर्तित केला; हें जें सर्व केलें तें स्वतः जाणिवेनें, साक्षेपानें आणि व्यवहारावरील पकड ढिली न करतां केलें. आणि मग च लोकांना सांगितलें. त्यांच्यांत ब्रह्मवेत्याची कृतार्थता व कार्यकर्त्याचा आत्मविश्वास होता. त्यामुळें त्यांच्या संप्रदायप्रवर्तक 'दासबोधां'तील उक्तींचें स्वरूप सुहृत्संमित न होतां तें प्रभुसंमित झालें. तें केवळ निर्देशरूप ( Recommendatory ) न राहतां आदेशरूप ( Mandatory ) वठलें.

तसेंच, अक्षर परब्रह्मापासून तो 'ब्राह्मणें' अक्षर कसें काढावें येथपर्यंत सर्व लहान थोर पारमार्थिक व व्यावहारिक विषयांवर त्यांनीं आपले विचार ठसठशीतपणें व्यक्त केले आहेत. यानें 'दासबोधाला' तत्कालीन **पुरुषार्थ कोशाचें** महत्त्व आलें आहे. या **पुरुषार्थ कोशांत** त्यांनीं इतर विषयांबरोबर काव्यविषयक विचार हि प्रगट केले आहेत. समर्थांप्रमाणें ज्ञानेश्वर तुकारामादि संतांनीं हि प्रसंगपरत्वें व विवेचनाच्या ओघांत असे विचार व्यक्त केलेले आढळतात. नाहीं असें नाहीं, पण समर्थांच्या विवेचनपद्धतीचें वर उल्लेखिलेलें वैशिष्ट्य—म्हणजे कार्यप्रवणता, निश्चितता, हेतुपुरःसरता व ठसठशीतपणा—त्यांत नाहीं. समर्थांच्या या विचारांचे व इतर मराठी संत व कवि यांच्या एतद्विषयक उक्तींचें साकल्यानें केलेलें अवलोकन साहित्यशास्त्राच्या अभ्यासकाला मोठें प्रेरक व उद्बोधक ठरतें.

सुमारें बाराव्या शतकांपासून एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पादापर्यंतच्या सातशें वर्षांत विस्तारलेल्या प्राचीन मराठी काव्याचें स्वरूप काय, त्याचें नियमन

कोणत्या साहित्यशास्त्रानें होत होतें, त्या साहित्यशास्त्राचा व जुन्या संस्कृत साहित्य शास्त्राचा संबंध काय होता, प्राचीन मराठी काव्यांचें साहित्यशास्त्र अजिबात वेगळें होतें, का मुरड घालून घेतलें होतें, वेगळे असल्यास तें संस्कृत शास्त्रांपेक्षां पूर्ण होतें कां अपूर्ण होतें, मुरड घालून घेतलें असल्यास ती मुरड कोणत्या बाबतींत व कोणत्या दृष्टीनें घातली इत्यादि प्रश्न मनांत येतात. रामदासांच्या काव्यविषयक उक्तींना प्रामुख्य देऊन या सर्व प्रश्नांचीं उत्तरें संक्षेपानें देण्याचें या निबंधांत योजिलें आहे.

मराठी कवींनीं कोणती निराळी काव्यदृष्टी स्वीकारली हें नीट उमगण्यासाठीं तत्पूर्वी असलेल्या संस्कृत व प्राकृत वाङ्मयांत कवींची व काव्यशास्त्रज्ञांची कोणती काव्यदृष्टि होती, हें संक्षेपानें समजून घेतलें पाहिजे. संस्कृत काव्य हें वेदाइतकें जुनें असलें तरी संस्कृत काव्यशास्त्राचा दृश्य उगम भरताच्या 'नाट्यशास्त्रा'मध्यें आहे व त्याचा शेवट जगन्नाथाच्या 'रसगंगाधरा'पाशीं होतो. या उण्यापुऱ्या दोन हजार वर्षांत समृद्ध झालेल्या संस्कृत साहित्यशास्त्राचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें. भारतवर्षांत प्रथम उत्पन्न झालेली संस्था म्हणजे धर्म, ती प्रथम यज्ञरूप व नंतर ज्ञानयज्ञरूप झाली. या तिच्या पूर्व रूपांतून च परमेश्वरभक्ति निर्माण होऊन या तीन सर्वंकष रूपांत भारतीयांच्या सर्व ऐहिक व पारमार्थिक ध्येयांचा समावेश करण्यांत आला. म्हणून कोणतें हि शास्त्र असो वा विद्याकला असो वरील त्रिकोणांत ती बसविली जात असे. मानवी ऐहिक व्यवहार व त्याचें पारमार्थिक ध्येय लक्षांत घेऊन धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ निश्चित करण्यांत आले व मोक्ष हा त्यांतला श्रेष्ठ हें कायम झालें. त्यामुळें इतर अनेक शास्त्रांबरोबर साहित्यशास्त्राला आपलें हि ध्येय हे च चतुर्विध पुरुषार्थ असें सांगावें लागलें. 'नाट्यवेद' हा पांचवा वेद च असून त्याची उभारणी चार वेदांतून कांहीं अंश घेऊन करण्यांत आली आहे असें खुद्द भरत च नाट्यशास्त्रांत सांगतो. (ना. शा. १.१५-१७ गा. प्रत)

भरतमुनीनें प्रवर्तित केलेली ही साहित्यशास्त्रीय ध्येयाची धार्मिकता शेवटपर्यंत कायम राहिली. आतां अशा काव्यांचा व धर्माचा संबंध पुढें कितपत टिकला हा भाग वेगळा.

भामहापासून (का. लं. १.२) साहित्यदर्पणकार विश्वनाथापर्यंत (सा. द. १.२) सर्वांनीं 'चतुर्वर्गफलप्राप्ति' हें च काव्यशास्त्राचें ध्येय स्पष्ट सांगितलें आहे. सरस्वती, शंकर पार्वती, विष्णु इत्यादि देवता त्याच्या अधिष्ठात्र्या मानिल्या आहेत. संस्कृत कवींनीं निवडलेले काव्यविषय हि प्रायः धार्मिक आहेत.

रामायण, महाभारत, बुद्धचरित, पुराणें यांवर त्यांच्या कृती आधारलेल्या असून, बृहत्कथा वगैरे लौकिक भाग हि त्यामध्यें क्वचित् आढळतो. पण रामायण व महाभारत हे संस्कृत पंचमहाकाव्यांचे व प्रसिद्ध नाटकांचे खरे आधार होत. पुढें रूपकांत प्रकरणादि कल्पित भाग, व कथा आख्यायिकांतून दंतकथा व लौकिक इतिहास हें हि संस्कृत काव्यरचनेचे विषय झाले. याचें कारण संस्कृत कवींचें व काव्यशास्त्रज्ञांचें धोरण व्यापक, सर्वसंग्राहक व आनंदमूलक होतें. भरतानें च हें व्यापक धोरण आखलें होतें. त्याच्या नाट्ययोजनेंत, शमी, दमी, शोकार्त, सुखी, विद्वान्, अडाणी, भित्रे, शूर, सुविनीत, दुर्विनीत असे सर्व प्रकारचे लोक वसत असून तिच्यांतील विषयांना तर अन्तच नव्हता. थोडक्यांत सांगायाचें तर त्याचें नाट्य सर्व त्रैलोक्याचें 'भावानुकीर्तन' होतें. (ना. शा. १-१०६) आनंद किंवा विनोदन हें त्याचें प्रयोजन असलें तरी तें धर्म्य, यशस्य, हित, व लोकोपदेशजनन होतें (ना. शा. १-११६)

काव्यनिष्पत्तीची कवींमधील शक्ति निसर्गदत्त असून ती देवताप्रसादानें प्राप्त होते असें सर्वांचे उक्त अनुक्त पण सर्वाभिप्रेत मत आहे. राजशेखर कवित्व-जननक्षम आठ मातांमध्यें 'भक्ती'चा स्वतंत्र उल्लेख करतो. (भक्तिर्विद्वत्कथा बहुश्रुतता) रसगंगाधरकारानें तर प्रतिभाशक्तीचें उत्पत्तिकारण 'देवता महापुरुष प्रसादादि' हें एक सांगितलें आहे. याप्रमाणें संस्कृत काव्याची धर्मभूयिष्ठता दिसून येते. मात्र येथील धर्मतत्त्वांचें विवेचन सरळ, रुक्ष, हुकमतीच्या स्वरूपाचें नसून तें वक्रोक्तिगर्भ, सरस व मनवळवणीच्या पद्धतीचें होतें. त्याचें आवाहन बुद्धीपेक्षां भावनांना जास्त होतें.

कांहीं काळ संस्कृताच्या जोडीनें चाललेलें पण संस्कृत स्थगित झाल्यावर जोरावलेलें प्राकृत काव्य कोणत्या स्वरूपाचें होतें हें आतां पाहूं. कारण प्राकृत (किंवा अपभ्रंश) हें बोलून चालून प्राकृतजनाभिमुख व मराठीला अगदीं खेंटून असणारें आहे. थोडक्यांत बोलावयाचें तर प्राकृत काव्यदृष्टि संस्कृतहून फारशी विभिन्न नाहीं. यांतील ब्राह्मणधर्मीय कवींबरोबर च बऱ्याचशा जैन व कांहीं बौद्ध कवींची रचना (काण्ह व सरह यांचे दोहे) अधिक दिसू लागते. प्राकृत काव्यांत हि प्रवरसेनाचें 'सेतुबंध' वाक्पतिराजाचें 'गउडवहो' अशी महाकाव्यें, राजशेखराचें, राजकीय स्वरूपाचें 'कर्पूर मंजरी' नाटक, कांहीं दूत काव्यें (संन्नेहरासय) व वरीच पौराणिक व चरित्रविषयक रचना आहे. हालाच्या 'गाथा सप्तशती' सारखी लौकिक रचना व 'ढोला मारुरादुहा' यासारखी प्रेमकाव्यें हि आहेत. सामान्य लोकांत फैलावतां येतील अशी सुबोध तत्त्वें, त्यांच्या भाषेंत सांगितलेलीं देवांची व

संतांची रसाळ चरित्रें व धार्मिक आचार यामुळें प्राकृत लोकाभिमुख झालें. संस्कृत काव्य पंडितांसाठीं असल्यानें सामान्य जनांशीं इतके समरस तें झालें नव्हतें येवढा च काय तो फरक.

संस्कृत किंवा प्राकृत यांतील वर उल्लेखिलेल्या प्रायः ललित वाङ्मय शाखेनें ज्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं ( किंवा त्याच्या उद्दिष्ट हेतूमुळें तें लक्ष देणें त्याला शक्य नव्हतें ) असें वाङ्मय प्रथम संस्कृतांत व पुढें प्राकृतांत हि होतें. हें वाङ्मय म्हणजे वेदान्तवाङ्मय होय. याचा उगम वेदांच्या उत्तर भागांत असून तें उपनिषदांत फोंफावलें. पुढें ब्रह्मसूत्रें व गीता यांची भर त्यांमध्यें पडून तें सर्वमान्य झालें. 'प्रस्थान त्रयी' हा वेदान्तवाङ्मयाचा मूलाधार असून मानवी ज्ञानाची व जीवनाची परिसीमा तेथें च मानण्यांत आली. यावर महान् आचार्यांचीं भाष्यें, त्या भाष्यांवर उपभाष्यें, विवृत्या, टीका व विवरणें इतकीं आहेत कीं त्या विस्तारास तोड च नाहीं. त्यांतल्या त्यांत वाल्मीकीचें योगवासिष्ठ, विद्यारण्यांची पंचदशी, व भागवत पुराणांतील एकादश स्कंध यांचा स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. हें वाङ्मय मुमुक्षूंसाठीं होतें. संसाराला विटलेल्या, मोक्षपदप्राप्तीसाठीं समुत्सुक झालेल्या, व समित्पाणी होऊन सद्गुरूला शरण निघालेल्या जीवासाठीं तें होतें. भक्तिभावनेच्या बळांवर परमेश्वराकडे, किंवा बुद्धीच्या बळावर आत्मरूपाकडे वळलेल्यासाठीं तें होतें. चित्तशुद्धीसाठीं, व ऋणत्रयाच्या अपाकरणासाठीं संसार शक्य तों लौकर उरकून किंवा वैराग्य अगोदर उत्पन्न झालें असेल तर शक्य तों त्याआधीं सुद्धां संसाराकडे पाठ फिरवून निघालेल्या निवृत्तांसाठीं ते होतें. चित्तशुद्धीनंतर वैयक्तिक व राष्ट्रीय संसार धर्मानें, व न्यायानें व आवडीनें करून राजकारणें, धर्मकारणें वगैरे जीवितांतील विविध उलाढाली चालवून ऐहिक जीवन समृद्ध व सुखमय करूं पाहणाऱ्यांचा हि एक पंथ पूर्वी होता. ( मनु १२ ) याला 'प्रवृत्तिपंथ' म्हणत. पहिल्याला ज्ञानमार्ग किंवा संन्यास व दुसऱ्याला कर्मयोग मार्ग असें हि म्हणतां येईल. (गीतारहस्य–संन्यास व कर्मयोग हें प्रकरण पहा.) याला च गीतेंत दोन 'निष्ठा' म्हटलें आहे. यापैकीं निवृत्तांच्या साठीं प्रसार पावलेलें मोक्षैकप्रवण असें वाङ्मय ब्राह्मण धर्मीय संस्कृतांत विपुल. तसें च तें जैन व बुद्ध यांच्या हि संस्कृत प्राकृत ग्रंथांत पुष्कळ. या वाङ्मयाची पकड जनमनावर फार मोठी होती व ती पकड सर्व च संन्यासी, भिक्षु, साधू, बैरागी, क्षपणक आणि श्रावक अधिक बळकट करीत होते. भक्ति, ज्ञान व वैराग्य यां शिवाय इतर गोष्टी त्यांत नसत. काव्याबरोबर मराठींमध्यें जोरानें प्रवेश करणारी निवृत्तिपर वेदना ही हि एक बलवत्तर शाखा होती. आतां मराठी संत, साधुकवि, आख्यानकवी किंवा कलाकवी यांनीं यांतील कोणत्या शाखेकडे, व कसें लक्ष देऊन आपली मराठी भाषा

सुमारें सातशें वर्षेपर्यंत आपल्या लेखणीनें सजविली ते पहाण्याच्या मार्गास लागूं. कारण त्यांत च संतांची साहित्यविषयक दृष्टि स्पष्ट होणार आहे.

वाङ्मयांत तत्कालीन समाजस्थिति प्रतिबिंबित होते हा सिद्धांत ठोकळ मानानें व जरूर त्या सावधगिरीनें पत्करण्यासारखा आहे. म्हणून मराठी वाङ्मय-निर्मितीच्या काळची समाजस्थिति पाहणें जरूर आहे. त्या काळीं जुना ब्राह्मणधर्म विस्खळित झाला होता. कर्मकांडाचें, वचनांचें, संस्कृत भाषेचें व रूढीचें प्राबल्य माजलें होतें. त्यामुळें या धर्मयंत्रांतील लवचिकपणा, अनुसंधानक्षमता व सर्व-समावेशकत्व नाहींसें होऊन तो समाजशासनाला अपुरा पडूं लागला होता. प्राकृत जनांपर्यंत त्याच्या प्रेमाची पाखर अगदीं च पोहोंचेनाशी झाली. तशांत बुद्ध, जैन, महानुभाव व इतर पंथ यांनीं त्यास खिळखिळे करण्याचा क्रम चालविला च होता. अशा दुर्बल अवस्थेंत धर्म होता. ज्ञानेश्वरांनंतर कांहीं काळानें यादवांचें राज्य लयास जाऊन आदिलशाही व इतर अनेक शाह्या क्रमानें जोरावूं लागल्यानें महाराष्ट्रसमाज स्वराज्यछत्राला हि आंचवला. धर्म व राज्य यांनीं असें डोळे वटारल्यानंतर समाजानें कोणाच्या तोंडाकडे पहावयाचें? या भीषण स्थितींत मराठी काव्याची वाढ झाली. प्राचीन मराठी काव्याचा उगम झाला स्वराज्यांत व अंत हि पुन्हां स्वराज्यांत च.

वरील परिस्थितीला तोंड देण्यासाठीं भागवतधर्माची मुहूर्तमेढ नव्यानें रोवण्यांत आली. भागवतधर्मानें मोठ्या कौशल्यानें लोकस्थितीवर तोड तर काढली च पण त्या च बरोबर वेदशास्त्रांची बूज हि राखली. भागवतधर्म हें वैदिक कर्मकाण्डाविरुद्ध एक बंड होतें असें कोणी म्हणतात. पण या बंडाचा उद्देश मूळ व्यवस्था उध्वस्त करण्याचा नसून ती जास्त सोईची व खंबीर करण्याचा होता. तो आईविरुद्ध प्रेमाचा हट्ट होता. आईचा पक्षपात प्रेमानेंच कमी करून तिला समदृष्टि व उदार करण्यासाठीं तो होता. या भागवतधर्मानें आपलीं अन्य धर्माभिमुख भावंडें पुन्हा आईकडे परतविलीं. वर्णनिष्ठ व जातिनिष्ठ विषमतेची तीव्रता कमी केली व समाजास स्थैर्य आणिलें. एका प्रसिद्ध अभंगाप्रमाणें या भागवत धर्माचा पाया ज्ञानदेवांनीं घातला. नामदेवानें त्याचा विस्तार केला. एकनाथानें त्यावर ध्वज उभारिला व तुकोबा त्याचा कळस झाला. या पवित्र देवालयाच्या पुण्यपावन गाभाऱ्यांत मराठी संतकाव्य रचलें गेलें.

समग्र मराठी काव्याचें रूप लक्षांत येण्यास मराठी कवींचे दोन ठोकळ वर्ग केले पाहिजेत. एक वर्ग संतकवींचा. यांत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास हे साक्षात्कारी, मुक्त व लोकांस तारण्यासाठीं काव्यरचना करण्यास प्रवृत्त झालेले थोर अधिकारी साधु येतात. यांच्या शिकवणीची, काव्यप्रवृत्तीची, साधुत्वाची व कर्तबगारीची छाप ज्यांच्यावर पडली असा एक दुसरा वर्ग आहे.

त्याला 'कलाकवि' म्हणावें. त्यांतले सर्व च कवि साक्षात्कारी नव्हते. त्यांची भूमिका मुमुक्षूची; व काव्यहेतु धर्मबोधाबरोबर मोद देण्याचा. म्हणून रामायण, भारत व भागवत या तीन प्रमुख धर्मविषयक ग्रंथांच्या आधारें च त्यांनीं रचना केली. पण लक्ष दिलें त्यांतील कथांकडे. रुक्ष वेदान्त शक्य तों टाळला. व भक्तीला प्राधान्य देऊन ज्याला खऱ्या लौकिक अर्थानें काव्य म्हणतां येईल अशी कलायुक्त ललित रचना त्या जाणिवेनें केली. संतकवींनीं मात्र केवळ वेदान्तविषय घेऊन तो सुबोधपणें व स्वानुभवाच्या जिव्हाळ्यानें विवेचिला. त्यांची रचना प्रायः प्रवचनात्मक आहे. त्यांत प्रसंगविशेषीं काव्य आलें तें त्यांच्यपैकीं कांहींच्या ठायीं उपजत काव्यात्मता होती म्हणून. एकादा ज्ञानी व प्रतिभासंपन्न धर्मप्रवक्ता आपलें प्रवचन रसाळ करतो हें खरें. पण त्याचा मुख्य हेतु काव्य बोलण्याचा नसून कांहीं महासिद्धान्तांचे विवरण स्वानुभवाच्या भूमिकेवरून करण्याचा असतो. ज्ञानेश्वरसुद्धां आपल्या गीताप्रवचनांत आपल्या मराठी भाषाशैलीची व इतर गुणांची जाणीव व्यक्त करतात ती याच दृष्टीची आहे. मुक्तेश्वर, वामन, सामराज, विठ्ठल, नागेश, रघुनाथ पंडित, निरंजनमाधव व मोरोपंत इत्यादि कवींच्या वर्गाला कलाकवि किंवा आख्यानकवि म्हणावें. एकनाथ, वामन, वगैरे कांहीं कवि दोन्हीकडे थोडेथोडे झुकणारे आहेत. एकनाथांनीं एकनाथी भागवताबरोबर 'भावार्थरामायण' लिहिलें तर वामनानें आपल्या नवरसपूर्ण काव्यांच्या जोडीनें 'यथार्थदीपिका' व इतर वेदान्तप्रकरणें लिहिलीं.

प्राचीन मराठी कवींचे हे दोन वर्ग व त्यांतील अंतर ध्यानांत घेऊन मग मराठी काव्याची पाहणी केल्यानें संस्कृत-प्राकृतांतून वर वर्णिल्याप्रमाणें आलेल्या दोन वाङ्मय शाखांपैकीं कोणती कोणी पुढें विस्तारली हें स्पष्ट होईल. संतकविवर्गानें ज्या प्रकारचें वाङ्मय निर्माण केलें तो प्रकार निवृत्तिपर वेदान्त शाखेचा विस्तार होय. व कलाकवींनीं निर्मिलेलें भक्तिप्रवण पण कलायुक्त काव्य हा बहुंशीं संस्कृत साहित्य शाखेच्या प्रेरणेनें पोसलेला वाङ्मयप्रकार आहे. 'महाराष्ट्रीयांचें काव्य परीक्षण' या आपल्या निबंधांत कै. डॉ. केतकर यांनीं संतकाव्यापुरता तरी हाच विचार मांडला आहे. (पृ. ११) 'संत कवींना काव्य ही गोष्ट महत्त्वाची वाटत नव्हती. संतत्व ही गोष्ट महत्त्वाची होती. (पृ. ३३) असें ते पुढें म्हणतात तें हि अगदीं खरें आहे. निव्वळ काव्य रचणें हा त्यांचा उद्देश च नसल्यानें परंपरागत संस्कृत काव्यशास्त्राची चिकित्सा करण्याचें त्यांना प्रयोजन नव्हतें. त्यांना संस्कृत साहित्यशास्त्रांतील रस, अलंकार इत्यादि ठोकळ परिभाषा माहित होती. व तिचा उपयोग त्यांनीं आपल्या अध्यात्मपर व निवृत्तिप्रवण काव्य रचनेचें वैशिष्ट्य सांगण्यासाठीं च केला आहे. 'शान्त शृंगाराला जिंकतो, किंवा

शान्ताच्या घरी अद्भुतादि इतर रस पाहुणे म्हणून आले आहेत' या ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याचा अर्थ 'ज्ञानेश्वरींत तत्त्वज्ञान हा विषय प्रमुख असल्यानें तत्संबंधीच्या माझ्या काव्यांत शान्तरस प्रमुख आहे' एवढा च घ्यावयाचा आहे. संस्कृत साहित्यांतील रसांच्या गौणप्रधान भावाची शास्त्रीय चिकित्सा करून त्यांत शान्त श्रेष्ठ ठरतो हें सिद्ध करणें हा त्याचा अर्थ नव्हे. हें काम पूर्वी प्रसिद्ध साहित्य-शास्त्रविशारद अभिनवगुप्तानें केलें होतें. मागें सांगितल्याप्रमाणें अध्यात्मपर काव्यरचना करावयास प्रवृत्त झालेल्या ज्ञानी कवींना शान्तरस व भक्तकवींना भक्तिरस हें च काव्यप्रयोजन वाटावें हें योग्यच ठरतें. म्हणून च ज्ञानदेवांनीं

वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।
रसिकत्वींहि परतत्त्व—। स्पर्श जैसा ॥ ( ज्ञा. १८. ३४९ )

असे सहज दृष्टान्त देतांना ओघांत सांगितलें. एकनाथ ( ए. भा. ३०–३६ ते ३९), तुकाराम इत्यादि भक्तांनीं भक्ति ही मुक्तीपेक्षांसुद्धा श्रेष्ठ आहे असें सांगून ती भक्ति हें च काव्यप्रयोजन सांगितलें. मुक्तेश्वर, वामन इत्यादींनीं हि हाच विचार मांडला आहे. पण हे विचार संस्कृत साहित्यशास्त्रांत आलेले आहेत. शान्तरसाचें श्रेष्ठत्व अभिनवगुप्तानें सिद्ध केलें आहे. व भक्ति हा रस मानला पाहिजे हें म्हणणें अभिनव गुप्ताच्या पूर्वीचें आहे. भक्तिपर रचनेला भावकाव्य म्हणून स्वीकारण्यास पूर्वी कोणाची हरकत नव्हती. पुढें तर मधुसूदन सरस्वतींनीं ( भगवद्भक्ति रसायन ) व रूप गोस्वामींनीं ( भक्तिरसामृतसिंधु ) भक्तीला सार्वभौम पदावर बसविलें आहे. व त्या रसांत च सर्व रसांचा अन्तर्भाव होतो असें स्पष्ट दाखविलें आहे. सर्व च मराठी कवींनी मराठी भाषेचा कैपक्ष मात्र मोठ्या अभिमानानें घेऊन संस्कृतविमुख लोकांसाठीं सर्व ज्ञानभंडार मोठ्या उदारतेनें खुलें केलें. संस्कृतचा नक्षा थोडा उतरविला. पण त्यांनीं मराठी काव्यनियमनाचीं जीं तत्त्वें म्हणून पुढें आणलीं तीं संस्कृत साहित्यशास्त्राला सोडून नव्हतीं. व ती तत्त्वें हि त्यांनीं नवें शास्त्र बनविण्याच्या ईर्षेनें स्वतंत्रपणें व सर्वांगपरिपूर्णतेनें सांगितलीं नाहींत.

नाहीं म्हणावयास रामदासांनीं मात्र एका वेगळ्या समासांत ( १४. ३ ) मराठी संतकाव्याचें धोरण या स्पष्ट जाणिवेनें मांडलें आहे. तें इतकें ठसठशीत आहे कीं 'रामदासांचें साहित्यशास्त्र' असें नांव त्याला द्यावें असें डॉ. केतकर यांना युक्त वाटलें. इतकें च नव्हे तर रामदासांनीं 'साहित्यशास्त्रीय विचार संस्कृत ग्रंथकारांच्या पुढें नेला' असें हि ते म्हणतात ( पृ. ४६ ). याचा विचार आतां करावयाचा. यासंबंधींचे सलग विचार दासबोधांत दशक १४ समास ३ मध्यें आहेत. व त्याव्यतिरिक्त कवीश्वर लक्षण ( १. ७ ), सद्ग्रंथ लक्षण ( ७. ९ ), विवेक लक्षणांतील

उपदेशकाचें धोरण ( १९.१० ) इत्यादि ठिकाणीं ते स्फुटपणें प्रगट करण्यांत आले आहेत.

यांत पहिली गोष्ट ध्यानांत येते ती ही कीं रामदासांनीं 'कवि' हा शब्द च मुळीं रूढ अर्थी वापरलेला नाहीं. त्यांनीं कवीचा अधिकार इतका व्यापक व थोर सांगितला आहे कीं तिकडे दृष्टि फेंकण्याची छाती फार च थोड्यांची होईल. त्यांच्या मतें कवि हा 'आध्यात्म ग्रंथाची खाण', 'मोक्षाचा मुख्य पडीभरू', योग्यांचा पंथ, निरंजनाची खूण, स्वधर्माचा आश्रय, व भक्तांचें भूषण, असतो. त्याशिवाय तो सरस्वतीचें निजस्थान व 'नाना धाटी, मुद्रा, छंद, गद्यपद्य व पदप्रास करणारा' असतो. म्हणून 'नस्ता कवींचा व्यापार। तरी कैसा असता जगोद्धार। या व्याख्येप्रमाणें व्यास व वाल्मीकि हे कवि होते. ( १-७ ) हा कवि शब्दाचा अर्थ व्यापक असून मनु ( ४-२४ ) गीता ( ४-१६ व ८-९ ), सायन ( क्रान्तदर्शी ) इत्यादि ठिकाणीं दिलेल्या अर्थाचा कांहींसा वाचक दिसतो. ग्रंथलक्षणांत हि ही च स्थिति आहे. ( ७.९ ) तेथें ग्रंथ म्हणजे अद्वैतपर ग्रंथ. व मग या दृष्टीनें इतर काव्यें निरुपयोगी हें ओघानें आलें च.

> बहुत प्रकारें पाहातां। ग्रंथ नाहीं अद्वैतापरता।
> परमार्थास तत्वतां। तारूंच कीं॥ ७–९–२८
> इतर जे प्रपंचिक। हास्य विनोद नव रसिक।
> हित नव्हे तें पुस्तक। परमार्थासी॥ २९

वर दिलेलें कवीचें आणि ग्रंथाचें लक्षण मोक्षशास्त्रदृष्ट्या अत्यंत योग्य, उदात्त व बहुमोल आहे यांत लवमात्र शंका नाहीं. पण साहित्यशास्त्र नजरेसमोर ठेऊन तें केलेलें नाहीं. रामदासांना नवें साहित्यशास्त्र रचावयाचें नव्हतें. त्यांना अध्यात्मपर व भक्तिपर ग्रंथांची थोरवी वाढवून लोकांस मोक्षप्रवण करावयाचे होतें. शान्त व भक्ति या दोन च रसांना रस म्हणणें व इतर रस निषिद्ध मानणें हा साहित्यशास्त्राचा संकोच आहे, प्रगति नव्हे.

कवित्वलक्षणांत ही ( १४.३ ) कवित्वाचें विवेचन त्यांनीं या च धोरणानें केलें आहे.

> जेणें घडे भगवद्भक्ती। जेणें घडे विरक्ती।
> ऐसिया कवित्वाची युक्ति। आधीं वाढवावी॥ ( १४.३.४ )

ही भूमिका ठेऊन मग धीट, पाठ व प्रासादिक या कवींच्या तीन प्रकारांचें वर्णन त्यांनीं केलें आहे. कवित्वांत नरस्तुति नसावी, तें सरळ, सोपें व रसाळ असावें. त्यांत

"नाना तत्त्व चर्चासार" शंकांची प्रत्युत्तरें, पुरश्चरणें, तीर्थाटणें, इत्यादि असावीं व त्याचा परिणाम अखेर देहबुद्धि तुटण्यांत, भवसिंधु आटण्यांत व भगवंत प्रगटण्यांत व्हावा. 'कामिक रसिक शृंगारिक। वीर हास्य प्रस्ताविक। कौतुक विनोद अनेक असलें कवित्व धीट पाठ होय. (११) हे विचार अध्यात्माच्या तळमळीनें निघाले आहेत. यांत साहित्यशास्त्राची कदर नाहीं. शृंगार, वीर, करुणादि रस काय तुच्छ आहेत? पण ते संसारी माणसास च योग्य असें समर्थांचें मत. साहित्यशास्त्रीय नियोजतेची बुद्धि ठेऊन समर्थांनीं असें तरी म्हणावयास पाहिजे कीं, "कवींनो, तुम्ही परमेश्वरचरित्रें गा, त्यांत भक्ति हा मुख्य रस करा व त्याला पोषक म्हणून कां होईना इतर रस आणा."

आश्चर्याची गोष्ट ही कीं (किंवा आश्चर्य कसलें नैसर्गिक गोष्ट ही कीं) खुद्द समर्थांनीं आपल्या च काव्यरचनेंत या च धोरणानें करुण (करुणाष्टकें), वीर (रामायण-युद्धकाण्ड), बीभत्स (दा. ३.१ व ५.३५-४७) इत्यादि रस उत्तम तऱ्हेनें निर्मिले आहेत. दासपंचायतनांतील प्रसिद्ध संतकवि केशवस्वामी भागानगरकर यांच्या कृष्णपर काव्यांत शृंगाररस भरला आहे. तो इतका कीं राजाराम प्रासादी यांनीं 'भक्तमंजिरीमालेंत' त्यांना 'गीतगोविंद'कार जयदेवाचा अवतार म्हटलें आहे. तात्पर्यार्थ इतर संतकवींची जी अध्यात्मपर दृष्टि होती ती च रामदासांची. त्यांनीं साहित्यशास्त्र करण्याच्या दृष्टीनें काव्यविचार मांडला नाहीं. त्यांना आपल्या संप्रदायास उपयुक्त काव्यरचना पाहिजे होती म्हणून त्यांनीं यासंबधींचे कांहीं स्फुट विचार सांगितलें. त्यांच्या मनांत जें करावयाचें नव्हतें तें त्यांच्यावर लादावयाचें प्रयोजन च नाहीं. म्हणून तें त्यांनीं केलें नाहीं म्हणण्यांत त्यांना काडीचा हि उणेपणा आणण्याचें कोणाच्या मनांत सुद्धां नाहीं.

'काव्य निवृत्तिपर किंवा भक्तिरसप्रधान असावें' हा दण्डक नवें साहित्यशास्त्र निर्मिण्यासाठीं घातला नसून अध्यात्मपर शिकवणीच्या लगामी साहित्यशास्त्र लावावें म्हणून त्यालाही मुरड घालण्यांत आली आहे. शिवाय इतर संत कवि व रामदास यांनीं काव्यशास्त्राच्या विविध अंगाचा विचार करून त्यांत कांहीं नवें सांगितलें आहे असें दिसत नाहीं. त्यामुळें जुना काव्यशास्त्रीय विचार प्रगत झाला, पूर्ण झाला, परिणति पावला इत्यादि गोष्टी म्हणतां येतीलसें वाटत नाहीं. भक्तिरसाचा उत्कट आविष्कार ही त्यांची खरी कर्तबगारी आहे. कलाकवींनीं संतकवींचा हाच मुख्य भक्तिरस मान्य करून त्याच्या धोरणानें सर्व रसाची रेलचेल करून टाकिली आहे. ती करताना त्यांनीं संस्कृत वृत्तें, सर्गबंध, संस्कृत काव्य नाटकांतील कल्पना यांचा उपयोग बऱ्याच जागीं केला आहे. कांहीं कलाकवींची काव्यें त्यांतील देवदेवतांचीं नांवें गाळून वाचलीं तर शुद्ध लौकिक थाटाची वाटतात. व कांहींतर लौकिक

काव्यांनासुद्धां लाजेनें मान खालीं घालावयास लावणारीं आहेत. नागेश ( चंद्रावळी प्रकरण ) वामनपंडितांची कृष्णगोपीवर्णनपर काव्यें, मुक्तेश्वरादींची उत्तान शृंगारिक प्रकरणें हीं या गोष्टींची साक्ष देतील.

सर्व च कवींनीं बरीचशी साहित्यशास्त्रीय परिभाषा योजिली आहे. रस, भाव, सात्विकभाव, अलंकार व कांहीं अलंकाराची कांहीं नांवें, साहित्य, सारस्वत इत्यादि शब्द त्यांच्या लिहिण्याच्या ओघांत येतात. पण ही सर्व शब्दयोजना आपलें मूळचें अध्यात्मपर विवेचन लौकिक साहित्य शास्त्राच्या दृष्टिनें हि आकर्षक आहे असें लोकांस पटविण्याच्या बुद्धीनें करण्यांत आली आहे. खुद्द साहित्यशास्त्रीय व्यापक विचिकित्सा करण्याची जाणीव त्यांत नाहीं. तसें च काव्यकारण व काव्यप्रयोजन यांतही अध्यात्मिक भूमिकेनें पडणाऱ्या फरका खेरीज दुसरा महत्वाचा मुद्दा मराठी कवींनीं सांगितला नाहीं. तसेंच काव्यप्रयोजन सांगण्यांत संस्कृत कवींनीं दिलेल्या यश, अर्थप्राप्ती इत्यादि प्रयोजनांवर हल्ला करण्याचा मराठी कवींचा विचार आहे हें हि म्हणणें युक्त नाहीं ( डॉ. देशमुख – मराठीचें साहित्यशास्त्र पृष्ठ १०४). एक तर यश व अर्थप्राप्ती हीं प्रयोजनें संस्कृत कवींनी ही गौण मानिली होतीं व 'परनिर्वृति' ( उत्कट आनंद ) हें च 'सकल प्रयोजन मौलिभूत' म्हणजे मुख्य मानलें होतें हें ध्यानांत घेतलें पाहिजे. दुसरें असें कीं मराठींत सुद्धां कांहीं लौकिक स्वरूपाची काव्यरचना होत असली पाहिजे. तिचा धिःक्कार वरील उद्गारांत अभिप्रेत असेल. रामदासांनीं ज्या लौकिक रचनेवर कटाक्ष ठेऊन आपल्या रचनेचें वैशिष्ट्य सांगितलें त्या रचनेचें स्वरूप डॉ. केतकरांनीं दिलेंच आहे ( पृ. ५३ ते ७३ ) म्हणून मराठींतील कवींच्या प्रसंगोपात्त उद्गारावरून सूचित होणारें काव्यविषयक विचार संस्कृत साहित्यशास्त्रीय विचारांहून अगदीं निराळे नाहींत. रसांचा गौणप्रधान भाव, व काव्य प्रयोजनाची अध्यात्मपरता हीं दोन अंगें थोडी निराळी वाटलीं तरी त्यामुळें मराठी काव्य विचाराला अभिनवता किंवा पूर्णता हि येत नाहीं. उत्कट भक्तिरस निर्माण करणें किंवा भक्ति हें इतर काव्यरसांचें अधिष्ठान करून काव्य रचणें हा गोस्वामिप्रतिपादित सिद्धांत मात्र मराठी कवींनीं आचरणांत आणला. असो. याचा निष्कर्ष असा.

ज्ञानेश्वर–रामदासादि संतकवींना परमार्थ शिकवावयाचा होता. व तो हि पंडितेतर सामान्य जनांना. परमार्थ दोन पद्धतींनीं सांगतां येतो. १ नीरस, रुक्ष व दुर्बोध पद्धतीनें व २ सरस, रमणीय व सुबोध पद्धतीनें. पैकीं दुसरी पद्धत त्यांनीं स्वीकारल्यामुळें त्यांत काव्य आलें. तें हि काव्य सर्व च संतांना, सर्व च स्थळीं चांगलें वठवतां आलें असें नाहीं. पण जेथें काव्यमय रचना आली तेथें काव्यशास्त्राची परिभाषा ओघानें घातली गेली. त्यांना मुख्यपणें सांगावयाचा होता परमार्थविचार.

तो त्यांनीं कांहीं स्थळीं काव्याच्या गोड अनुपानानें सांगितला इतका च त्याचा काव्याशीं संबंध. असें असल्यानें काव्यशास्त्रावर नवे विचार सांगत बसण्याची त्यांना जरूर च काय? त्यांनीं रूढ संस्कृत साहित्यशास्त्रांतील आपणास पाहिजे होत्या त्या गोष्टी घेतल्या, त्यांना च प्राधान्य दिलें, त्यांचें तोंड परमार्थाकडे वळविलें व आपला कार्यभाग उरकून घेतला. यापूर्वीं बऱ्या च ठिकाणीं परमार्थविचार रुक्षपणें, व पांडित्यप्रदर्शन करून सांगण्यांत येई व काव्य प्रायः लौकिक विषयांवर होई. मराठी कवींनीं या दोन प्रवृत्तींची सांगड घालून परमार्थाला काव्याची जोड दिली, सोप्या सरळ मातृभाषेला पठणाचें विस्तृत अधिष्ठान दिलें व सर्वसामान्य जनसमुदायाला हिताचा मार्ग दाखविला हें च, याचें सार होय.

---

(१६)

श्री

# समाजसुधारक समर्थ

(लेखक–रा. **गजानन वासुदेव कवीश्वर**, एम्. ए., इंदूर)

एके काळीं अति उन्नतावस्थेंत असलेल्या या भारतवर्षाच्या वातावरणांत गेल्या अर्ध शतकांत सुधारणा, पुरोगामित्व, समाजोन्नति, व्यक्तिस्वातंत्र्य, दलितोद्धार, इत्यादि शब्दांचे प्रतिध्वनि इतक्या जोरजोरानें दुमदुमून राहिले आहेत कीं त्यांच्या अतिपरिचयामुळें च बहुजनांकडून त्यांच्या वास्तव अर्थाची अवहेलना होण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे, अशी कधीं कधीं साधार धास्ती वाटूं लागते. पुरोगामित्वाचा टिळा लावून समाजोन्नतीचा दुंदुभि मोठ्यानें वाजवीत किति तरी साहित्यिक आज महाराष्ट्रशारदेच्या प्रांगणांत धुमाकूळ घालीत आहेत; परंतु खरें पुरोगामित्व म्हणजे काय असा मूलगामी प्रश्न विचारल्यावर त्यांतले कितीएक खरोखर समाधानकारक उत्तर देऊं शकतील, आणि त्याहून विशेष म्हणजे पुरोगामित्वाची एखादी योग्य कसोटी निश्चित केली म्हणजे कितीकांचें स्वतःचें साहित्य तिच्या परीक्षेंत उत्तीर्ण होईल याची वानवा च वाटते. साहित्य सोडून जीवनाकडे वळलों तर पुरोगामित्वाच्या बाता मारणाऱ्या कितीएकांचें स्वतःचें चारित्र्य प्रतिगामी, कधींकधीं अधोगामी, दिसून येतें. समाजाचा किंवा त्यांतल्या कांहीं विशिष्ट भागाचा उद्धार करावयास निघालेल्या कांहीं उत्साही सुधारकांच्या लीलांचा परिणाम शेवटीं त्या च समाजांत कलह उत्पन्न करण्याकडे झालेला दिसून येतो. सुधारणेचें मोहक कातडें पांघरलेली कोणाकोणाची चळवळ अखेरीस केवळ हीन स्वार्थाची वळवळ असल्याचें दृष्टोत्पत्तीस येऊन किळस येते. रूढिस्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या कांहींचा अंतरींचा हेतू स्वतःच्या वैषयिक व ऐंद्रियिक वासनाकामनांना मोकाट चरण्यासाठीं समाजाची संमति व अनुमति मिळविणें इतका च आहे असें कालेंकरून नजरेस येतें.

हें असें कां व्हावें? कित्येक आधुनिक समाजसुधारकांचा हा असा बोजवारा कां उडावा? "आधुनिक सुधारणेचा ऑफ्स" अशा शीर्षकाखालीं मर्मभेदी टीका करण्याची संधि कांहीं नियतकालिकांना कां प्राप्त व्हावी? या असल्या सुधारणेपेक्षां आमची पूर्वीची च स्थिति अनेक परींनीं बरी होती असे वैतागाचे उद्गार काढण्याची पाळी जनतेवर कां यावी? या प्रश्नांचा कळकळीनें विचार केला असतां त्याचें स्पष्ट

उत्तर श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या साहित्यांत व जीवनचारित्र्यांत उत्कृष्टपणें सांपडूं शकेल. समाजसुधारणेचा खरा अर्थ व ती घडवून आणण्याच्या मार्गाचें खरें वर्म समर्थांनीं अचूक ओळखलें होतें. आणि म्हणून च गेल्या अर्धशतकांत ठायीं ठायीं उठलेल्या नानाविध चळवळींनीं जें साध्य होऊं शकलें नाहीं तें समाजोन्नतीचें प्रचंड कार्य या समर्थ राष्ट्रपुरुषानें एकट्यानें करून दाखविलें. समाजांत नवचैतन्य उत्पन्न केलें; रावापासून रकांपावेतों हृदयांत कर्तव्यजागृति निर्माण केली; स्वार्थपरायण जनमनाला परार्थपरायण आणि म्हणून च परमार्थपरायण केलें; उत्साहाची, आत्मविश्वासाची, धैर्याची एकच प्रचंड लाट सर्वत्र खेळवून दिली. आणि इतकेंच नव्हे तर कोणत्याही काळांत त्यांच्या चारित्र्याचें व साहित्याचें मनन केल्यास तसाच परिणाम पुनरपि घडून येण्याची शक्यता निर्माण करून ठेविली. समर्थांच्या या यशस्वितेचें मर्म कोणतें याचा कांहींसा विचार आमच्या अल्पमतीप्रमाणें समर्थांच्या कृपाशिर्वादेंकरून या लेखांत आम्हीं वाचकांपुढें ठेवणार आहों. हें मर्म आम्ही चार सूत्रांत विभागिलें आहे.

यांपैकीं पहिलें सूत्र म्हणजे समाजसुधारणा ही प्रारंभापासून शेवटापावेतों व्यक्तिसुधारणा च होय हें आहे. समाज हा व्यक्तींचा झालेला असतो; आणि व्यक्तींहून वेगळें असें समाजाला कोणतें ही अस्तित्व नाहीं. ही अत्यंत साधी भासणारी गोष्ट च अनेक प्रसंगीं विसरली जाते. समाजांतल्या व्यक्तींच्या हृदयांत सुधारणा होत नाहीं तोंपावेतों सामाजिक सुधारणेच्या बाता मारणें फोल आहे. ज्या समाजांतील वैयक्तिक जीवन अधिक श्रेष्ठ व सात्विक आहे तो च समाज अधिक उन्नत व पुरोगामी समजला पाहिजे. येऱ्हवीं, त्यांत केवळ कांहीं चालीरीती चांगल्या असल्या तरी त्यांतील सर्वसाधारण व्यक्तीचें जीवन व अंतःकरण स्वार्थी, आक्रमणशील, परजातींचें रक्त पिळून स्वतःच्या देशांत टोलेजंग इमारती व कारखाने उभारण्याची इच्छा करणारें,

नेत्रीं द्रव्य दारा पाहावी। श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी।
चिंतनीं द्रव्य दारा चिंतावीं। या नाव बद्ध ॥ ५-७-४० ॥

नाना चिंता नाना उद्वेग। नाना दुःखाचे संसर्ग।
करी परमार्थाचा त्याग। या नाव बद्ध ॥ ४२ ॥

या कोटींतलें असलें तर तो समाज खऱ्या सुधारणेच्या मार्गावर आहे असें विचारवंत कधींही म्हणणार नाहीं. समाजसुधारणा व व्यक्तिजीवन यांचा हा संबंध केवळ शाब्दिक महत्वाचा आहे असें कोणीं समजूं नये; या संबंधाकडे दुर्लक्ष केल्यानें च या विषयाचे कित्येक निरीक्षक, अभ्यासक, व परीक्षक फसले आहेत, किंवा इतरांच्या सत्याभास-

युक्त युक्तिवादानें फसविले गेले आहेत. समाजसुधारणेची व्यक्तिजीवनाशीं फारकत करून विचार करूं लागलें म्हणजे एकस्या दुकस्या चालीरीतींना भलतें च महत्व प्राप्त होऊन समाजाविषयीं चुकीचें मत प्रदर्शित केलें जाण्याचा फार संभव असतो. विधवाविवाह, प्रौढविवाह, इत्यादींच्या चळवळी बऱ्या च प्रमाणांत इष्ट व उपयुक्त असतील; परंतु केवळ या चालींवर च नजर ठेवून बहुजनसमाजाच्या वैयक्तिक जीवनाकडे दुर्लक्ष केलें तर त्या समाजाच्या संस्कृतीबद्दल योग्य मत प्रदर्शित केलें जाणार नाहीं. मौज अशी आहे कीं व्यक्तिजीवनाकडे लक्ष योग्य प्रकारें केंद्रीभूत असलें म्हणजे असल्या विशिष्ट चालीरीतींचें एकंदर जीवनांत व संस्कृतींत कोणतें स्थान आहे हें तेव्हां च ध्यानांत येतें. विधवाविवाहाचा पुरस्कार करणारी परंतु इतर प्रकारें अत्यंत स्वार्थी व दुष्ट स्वभावाची व्यक्ति आणि असल्या गोष्टींना विरोध करणारी परंतु परोपकारी व सुशील व्यक्ति यांत कोण श्रेष्ठ आहे हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आतां जो नियम व्यक्तीला तो च समाजालाही लागू पडेल; कारण व्यक्तीशिवाय समाज म्हणून काय चीज आहे? मात्र या गोष्टीकडे दुर्लक्ष करून काल्पनिक समाजपुरुषाची स्थापना करून, 'सामाजिक प्रश्नांचा' बाऊ करून, कोणी सुधारणेच्या गोष्टी करूं लागला म्हणजे असल्या विशिष्ट बाबींना अवास्तव महत्व येऊन (त्या बाबींना मुळीं च महत्व नसतें असें नाहीं) मूळ उन्नतीकडे दुर्लक्ष होतें. अशा विशिष्ट गोष्टींसाठीं चळवळी होऊं नयेत असें आमचें मुळीं च म्हणणें नाहीं. आमचें म्हणणें इतकें च कीं अशा चळवळी करणाऱ्यांनीं व त्यांचें अनुकरण करूं पहाणाऱ्या अनुयायांनीं हें सदैव ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, खऱ्या समाजसुधारणेच्या मार्गांतला ही चळवळ म्हणजे एक टप्पा अगर साधन मात्र असून, वैयक्तिक जीवनांत सर्वांगीण इष्ट पालट घडून आल्या-शिवाय सुधारणेचें अंतिम साध्य प्राप्त झालें असें कोणी स्वप्नांतही समजूं नये. या गोष्टींवर प्रत्यही भर देण्यांत आला तर स्वतःला सुधारक, पुरोगामी, नवमतवादी नवनीतिकार, समजणाऱ्या कितीतरी व्यक्तींना योग्य आत्मपरीक्षण करितां येऊन त्यांचें आणि इतरांचें ही कल्याण होईल! समर्थांनीं सुधारणेचें हें मर्म अचूकपणें ओळखलें होतें. त्यांची हांक सदैव व्यक्तीच्या हृदयाला उद्देशून आहे. टांकसाळीं-तून एक छापाचीं नाणीं बाहेर पडावींत, त्याप्रमाणें एकादी सार्वजनिक चळवळ करून, सभा भरवून, ठराव पास करून, समाजांतील व्यक्तींचे संघ एकदम सुधारणेच्या वरच्या पायरीवर चढतील अशी त्यांची समजूत नव्हती. प्रत्येक भिन्न भिन्न व्यक्तीच्या हृदयांत पालट घडून आल्याशिवाय खरी चिरस्थायी समाजसुधारणा घडून यावयाची नाहीं ही त्यांची खात्री होती. आणि म्हणूनच त्यांच्या ग्रंथराजाचा कितितरी भाग (मूर्खलक्षण, उत्तम लक्षण, कुविद्यालक्षण

रजोगुण लक्षण, तमोगुणनाम, सत्वगुणनाम, सद्विद्यानिरूपण, विरक्तलक्षण, पढतमूर्खलक्षण, वैराग्यनिरुपण, शिष्यलक्षण, बद्धलक्षण, मुमुक्षलक्षण साधकलक्षण, सिद्धलक्षण, दुश्चीतनिरुपण, सिकवणनिरूपण, राजकारण निरूपण, महंत लक्षण, निस्पृह वर्तणुक, विषयत्याग, येत्नसिकवण, इत्यादि इत्यादि ) वैयक्तिक जीवनाच्या सर्वांगीण सुधारणेच्या अमूल्य व अत्यंत कळकळीच्या उपदेशाप्रीत्यर्थ खर्च झाला आहे. किंबहुना, श्रीमद्दासबोधाच्या असामान्य लोकप्रियतेचें व अपूर्व अक्षर महत्वाचें एक प्रमुख अधिष्ठान म्हणजे च तो भाग होय. ज्या राष्ट्रांतील व्यक्तीपुढें हा उपदेश अशा प्रकारें ठेवला गेला तें राष्ट्र धन्य होय ! ज्या राष्ट्रांतील व्यक्तींनीं आपलें जीवन त्या उपदेशानुसार ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला तें राष्ट्र द्विवार धन्य होय ! आणि ज्या राष्ट्रांतील व्यक्ति तो उपदेश बव्हंशानें तरी आचरणांत आणण्यांत यशस्वी झाल्या तें राष्ट्र त्रिखंडांत त्रिवार धन्य होय ! तें च राष्ट्र खरें सुधारलेलें ; तो च समाज खरोखर उद्धारलेला ; ते च लोक पुरोगामित्वाच्या मार्गावर असलेले. त्यांच्या सर्वांगीण उन्नत जीवनांत इतर सर्व किरकोळ सुधारणांचा समावेश झालेला आढळून येईल. आमच्या देशांतील समर्थ रामदास, संत तुकाराम, भक्त एकनाथ, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, आदि संतसुधारकांत आणि आधिभौतिक संस्कृतीच्या चकचकाटानें क्षणमात्र दिपलेल्या कित्येक उतावळ्या आधुनिक समाजसुधारकांत हाच महत्वाचा भेद आहे. द्वितीय पक्षीय सुधारकांनीं व्यक्तीच्या एकंदर जीवनाकडे दुर्लक्ष करून कांहीं एका विशिष्ट बाबींचा च उदोउदो करण्यांत सार्थक मानलें ; प्रथमपक्षीय विभूतींनीं प्रत्यहीं जीवनाच्या सर्वांगीण उदात्तीकरणाला नजरेसमोर ठेवून आपली लेखणी, वाणी, व वागणी चालविली. आणि म्हणून च द्वितीय पक्षीयांच्या चळवळी क्षणभंगुर ( आणि कांहीं प्रसंगीं तर प्रत्यक्ष कलहोत्पादक व अहितकारक ) ठरल्या ; पण उलट रामदासादिकांचीं कार्यें चिरस्थायी, जगदुद्धारक, त्रिकालाबाधित स्वरूपाचीं ठरलीं.

व्यक्तींच्या उन्नतीची काळजी घ्या, म्हणजे सामाजिक उन्नति स्वतःची काळजी आपोआप घेईल, या महत्वाच्या सूत्राचें आतांपावेतों विवेचन केलें. समर्थांच्या यशस्वितेचें दुसरें सूत्र म्हणजे आध्यात्मिक उन्नति ही च व्यक्तीची खरी सुधारणा हा त्यांचा उपदेश हें होय. सुधारणा, उन्नति, पुरोगामित्व हे सारे सापेक्ष शब्द आहेत हें उघड च आहे. अंतिम ध्येयाप्रत घेऊन जाणारी प्रत्येक गोष्ट या सदरांत पडेल ; पण म्हणून च अंतिम ध्येयाविषयीं भिन्न भिन्न कल्पना असलेले लोक निरनिराळ्या व प्रसंगविशेषीं विरुद्ध गोष्टींना सुधारणा अगर पुरोगामी हें विशेषण लावीत असतात. आधुनिक काळांत कित्येकांचे मतानें समाजसत्तावाद हें च मानवी जीवनाचें ध्येय असावेंसें दिसतें ; कोणी व्यक्तिस्वातंत्र्याला ध्येय

मानतात; इतर कोणाला तें ध्येय राष्ट्रीयतेंत दिसतें; तर आणखी कित्येक समता हें च अंतिम ध्येय मानतात. केवळ सुखवाद्यांचा तर उल्लेख च नको. आतां अशा प्रत्येक ध्येयांत कांहीं प्रमाणांत इष्टता असली तरी सूक्ष्म विचारांनीं यांतले कोणतें ही अंतिम ध्येयाच्या स्थानाला खरोखर पात्र दिसत नाहीं. राष्ट्रीयवादाची उपयुक्तता मान्य केल्यावर ही, राष्ट्रासाठीं तरी व्यक्तीनें कां मरावें हा प्रश्न उरतो च. या विश्वांतील भिन्नभिन्न व्यक्तींत जन्मता च गुणभिन्नता प्रत्यक्ष दिसून येत असतां कांटेतोल समता शक्य व इष्ट कशी हा एक मोठा गहन प्रश्न आहे. व्यक्तीला स्वातंत्र्य हवें हें खरें; पण कोणी व्यक्ति त्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करूं लागेल तर त्याच्यावर बंधन घालण्याचा समाजाला कितपत अधिकार असला पाहिजे याचा विचार व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांना करावा च लागेल. समाजांतील हुशार, मूढ, सुमार्गी, कुमार्गी, धैर्यवान, भीरु, साऱ्या च व्यक्तींच्या हातांत सत्तेची सारखी वांटणी केल्यानें समाज उत्कर्षास जाईल किंवा कांहीं निवडक योग्य व्यक्तींच्या हातीं राष्ट्राचीं सूत्रें सोपवून इतरांनीं त्यांचें अनुकरण केल्यानें अधिक हित होईल याचा अखेरचा निकाल अद्याप इतिहासाला द्यावयाचा आहे. या सर्व प्रश्नांकडे श्रीमद्दास-बोधाच्या दृष्टीनें, म्हणजे च आर्ष भारतीय संस्कृतीच्या दृष्टीनें, पाहिलें तर पुढील उत्तरांत मार्गदर्शन सापडूं शकेल. मानवी जीवनाचें अंतिम ध्येय, सर्व सुधारणेचा अंतिम निकष, उन्नतीचें शेवटचें शिखर, पुरोगामित्वाचा ध्रुव, म्हणजे व्यक्तीची अध्यात्मिक प्रगति हें होय. या प्रगतीच्या अंतिम स्थितीचें, म्हणजे ब्रम्हप्राप्तीचें, वर्णन करणें शक्य नाहीं; प्रत्यक्ष निगमांनीं ही तेथें हात टेकले आहेत. ती स्थिति —

सांगणोवांगणीचें काम नव्हे। आपुल्या अनुभवें जाणावें।
प्रत्ययाविण सिणावें। तें चि पाप ॥ १०–१०–९३

पण तरीही प्रस्तुत विषयासाठीं सामान्य भाषेंत ठोकळ मानानें त्याच्या मार्गाची अगर साधनांची रूपरेषा दिग्दर्शित करावयाची असल्यास सर्वात्मैक्यभाव ( १०-१०-३५ ) व इंद्रियसंयमन या दोन शब्दांचें साह्य घेतां येईल. या च हेतूनें समर्थांनीं आत्मनिवेदन ( १०–८–२२ ), वैराग्य १–१–३१, (५–६–६१, १२–४ ), परमार्थ ( १–९ ), विषयत्याग ( १२–७ ), आत्मज्ञान ( ६–२–४३, १०–९–२३, १०–१०–६३, ६४, ६५ ) इत्यादि शब्द योजले आहेत. या विश्वांतली कोणतीही गोष्ट चांगली अगर वाईट, पुरोगामी अगर प्रतिगामी ठरविण्याची समर्थांची कसोटी ही आहे. खरा ग्रंथ कोणता असें विचारिलें तर ते म्हणतील—

जेणें परमार्थ वाढे। आंगीं अनुताप चढे।
भक्ती साधन आवडे। त्या नांव ग्रंथ ॥ ७-९-३० ॥

खरें कवित्व कोणतें असें विचारलें तर ते म्हणतील—

जेणें अनुताप उपजे। जेणें लौकिक लाजे।
जेणें ज्ञान उमजे। या नाव कवित्व॥ १४-३-४८॥

जन्माचें सार्थक कशानें होईल?

देह परमार्थी लाविलें। तरी च याचें सार्थक जालें।
नाहीं तरी हें वेर्थ चि गेलें। नाना आघातें मृत्यपंथें॥ १-१०-६१॥

जगांत सर्वांना च मृत्यूपंथें जायचें आहे; पण तरीही कोणी कोणी राहातात. ते कोण?

असो ऐसे सकळ हि गेले। परंतु येक चि राहिले।
जे स्वरूपाकार जाले। आत्मज्ञानी॥ ३-९-५९॥

स्वातंत्र्यासाठीं सारे च ओरडत असतात; कित्येक लढतात, मारतात, मरतात. पण खरा स्वतंत्र प्राणी कोणता?—

विवेकें अंतरीं सुटला। वैराग्यें प्रपंच तुटला।
अंतर्बाह्य मोकळा जाला। निःसंग योगी॥ १२-४-१२॥

असो. अशी कसोटी समर्थांनीं ज्ञानी पुरुषास (५-५-३२, ३३; ५-६-१, ६-१-१९), थोरपणास (६-४-१९), सुखी प्राण्यास (३-१०-६४, ६५), वैभवास (१-९-२३); किंबहुना विश्वांतल्या प्रत्येक गोष्टीस लावली आहे.

आणि समर्थांची ही दृष्टि आणि कसोटी इतकी व्यापक, मूलगामी व बिनतोड आहे कीं, उपरिनिर्दिष्ट व तत्सम इतर सामाजिक व राजकीय प्रश्नांचीं सुसंगत उत्तरें अभ्यासकांना या कसोटीच्या आधारें मिळूं शकतील असें वाटतें. ज्या समाजरचनेंत व्यक्तींच्या आध्यात्मिक उन्नतीला अधिकाधिक वाव व साह्य मिळेल ती रचना इष्ट, सुधारलेली व पुरोगामी समजली पाहिजे. जें व्यक्तिस्वातंत्र्य त्याच्या या उन्नतीला कारणीभूत होईल तें च चांगलें; इतर व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे त्याच्या अधोगतीला परवाना व म्हणून शाप च होय. जी समता व्यक्तींना अध्यात्मिक अधःपाताचा मार्ग दाखवेल तिच्यापेक्षां विषमता च बरी (पहा २।१।११) विधवाविवाह, प्रौढविवाह, प्रीतिविवाह, स्त्रीशिक्षण, सहशिक्षण, घटस्फोट, सहभोजन, साक्षरताप्रसार, इत्यादि सर्व सामाजिक प्रश्नांचा हि उलगडा समर्थांच्या या विचारसरणींत सापडूं शकेल. मानवी जीवनाचें अंतिम उद्दिष्ट आध्यात्मिक उन्नति हें आहे हें एकदां नीट ध्यानांत घेतलें म्हणजे समर्थांनीं राजकारणाला मानवी कर्तव्यांत दुय्यम स्थान देऊन--

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषईं ॥ ११-५-४

असा क्रम लावून दिल्याबद्दल कोणास ही आश्चर्य वाटावयास नको. राजकारणाचें महत्व किती ही मान्य केलें तरी वर म्हटल्याप्रमाणें व्यक्तीनें राष्ट्रासाठीं कां मरावें, राजकारणांत जीवन कां व्यतीत करावें, देशासाठीं कष्ट कां सोसावे, (अर्थात आरामशीर आणि केवळ द्रव्योत्पादक 'राजकारणा'चा येथें विचार चालला नाहीं हें सांगणें नको च), समाजासाठीं कां झिजावें असा प्रश्न उरतो च. आणि याचा खोल विचार करून अखेरीस 'स्वतःच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं' हें च उत्तर पौर्वात्य आणि पाश्चात्य नितिशास्त्रवेत्यांना सर्वांत अधिक सुसंगत व समाधानकारक आढळून आलें आहे. 'Self-realisation through self-sacrifice,' 'He who loses soul finally finds it,' 'The ultimate end is neither individual, nor social, but personal' इत्यादि उद्गार हें च मत प्रदर्शित करतात. आणि राजकारण व आध्यात्मिक उन्नति यांचा हा असा साधनसाध्य संबंध नीट ध्यानांत घेतला असता तर राजकारणाला दुय्यम स्थान दिल्याबद्दल एका विद्वान महाराष्ट्रीय लेखकानें (एका सुंदर व ही इतकी बाब वगळल्यास फार समतोल व विचारपूर्ण अशा लेखांत) समर्थांना 'प्रतिगामी' असें विशेषण लावण्याचा अविचार केला नसता ('पुरोगामी साहित्याची दिशा' ले. द. के. केळकर, 'समीक्षक' मासिक, नोव्हेंबर १९४२, पृ. ५६). आध्यात्मिक विचारांची पार्श्वभूमी नसलेल्या राजकारणाचे भयानक परिणाम जगांत आपण प्रत्यक्ष पाहात च आहों ना? समर्थांना राजकारणाचें वावडें होतें, अगर त्यांना त्याचें महत्व कळलें नव्हतें असें कोणी ही म्हणूं शकणार नाहीं. त्यांच्या चरित्रांत आणि लेखनांत यासंबंधीं वाटेल तेवढे दाखले सांपडतील. पण तरी ही त्यांनीं राजकारणाला दुय्यम स्थान देऊन अध्यात्मनिरूपणाला प्रथम स्थान दिलें, यांत त्यांचा कोणता ही प्रतिगामीपणा नसून उलट अत्यंत श्रेष्ठ व सुसंगत असा सारासारविवेक च त्यांनीं प्रदर्शित केला आहे यांत शंका नाहीं. राजकीय च काय, कोणती ही चळवळ असली तरी समर्थांच्या मतानें त्यांत "भगवंताचें अधिष्ठान पाहिजे" (२०-४-२६) आणि खऱ्या समाजसेवकाचें, देशसेवकाचें, राष्ट्राधिकाऱ्याचें ध्येय स्वजातीयांना केवळ श्रीमंत, वैभवशाली, राजकीय दृष्ट्या स्वतंत्र, जागतिक घडामोडींचे सूत्रधार करणें हें नसून, समर्थांच्या कल्पनेप्रमाणें अशा व्यक्तीनें —

वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक ।
हळुहळु पुण्यश्लोक । करीत जावे ॥ १३-१०-२३

याहून अधिक उच्च ध्येय जनसेवा करूं पहाणाऱ्यापुढें ठेवल्याचें क्वचित च आढळेल. या ओंवींतल्या शेवटच्या चार शब्दांत अनंत अर्थ भरला आहे; विचारवंत वाचक तो स्वतःच मनन करून समजूं शकतील. त्यांना हवें तें सर्व त्यांत सांपडेल.

समर्थांची समाजसेवेची आणि समाजसुधारणेची ही अत्यंत मूलगामी भूमिका नीटपणें लक्षांत घेतली म्हणजे त्यांच्या यशस्वीपणाचें तिसरें मर्म ओघानें च दृष्टीसमोर येईल. तें म्हणजे उपदेशाचा उपदेशकाच्या जीवनाशीं मेळ. इतरांचीं आध्यात्मिक उन्नति करूं पहाणाऱ्या, त्यांना हळूहळू पुण्यश्लोक करण्याची महत्वाकांक्षा व सदिच्छा यांनी प्रेरित झालेल्या, सुधारकाचें स्वतःचें जीवन कोणत्या कोटीचें हवें हें काय सांगावयास हवें? नाहीं तर,

अद्वैतनिरूपणें अगाध वक्ता। परी विषंई लोळंगता।
ऐसिया गुरूचेनि सार्थकता। होणार नाहीं॥ ५-२-३१

येरागबाळाचें तें काम नव्हे. आरामखुर्चीवर बसून राजकारणाच्या उलाढाल्या करणें शक्य असेल; पण आरामखुर्चीवर बसून समाजसुधारणा, समर्थांच्या कल्पनेप्रमाणें समाजसुधारणा, करणें अशक्य आहे. समर्थांनीं यासंबंधांत दासबोधांत ठिकठिकाणीं फार च स्पष्ट व सडेतोड उद्गार काढले आहेत; ते सारे च येथें उद्धृत करणें शक्य व आवश्यक नाहीं. एके ठिकाणीं ते म्हणतात—

शांती करून करवावी। तऱ्हे सांडून सांडवावी।
क्रिया करून करवावी। बहुतांकरवी॥ ११-५-१६

स्वतःबद्दल ग्वाही देतात--

हे प्रचितीचें बोलिलें। आधीं केलें मग सांगितललें॥ ११-१०-२४

केवळ वाचाळाबद्दल काय म्हणतात पहा—

क्रियेविण शब्दज्ञान। तें चि स्वानाचें वमन।
भले तेथें अवलोकन। कदापी न करिती॥ १२-१०-३०

लोकांवर आपले सांगण्याचा परिणाम कां होत नाहीं याचें कित्येकांना आश्चर्य वाटतें. त्यांचेसाठीं समर्थ सांगतात—

बोलण्यासारिखें चालणें। स्वयें करून बोलणें।
तयाचीं वचनें प्रमाणें। मानिती जनीं॥ १२-१०-३९॥

कां वेर्थ चि ज्ञान बडबडिला। परी वैराग्ययोग नाहीं घडला।
जैसा कारागृहीं अडकला। पुरुषार्थ सांगे॥ १२-४-८॥

स्वतां निस्पृह असेना। त्याचें बोलणें चि मानेना।
कठीण आहे जनार्दना। राजी राखणें॥ १९-६-३॥

अध्यात्मिक सद्विचारांची बैठक नसलेल्या आपल्या कांहीं साहित्यिकांचें आणि समाज-सुधारकांचें खासगी चारित्र्य व त्यांच्या लेखणीवाणींतला या उलट समाजोद्धाराचा दंभ व आवेश यांतली किळसवाणी विसंगति पाहिली, म्हणजे समाजोन्नतीचें गाडें यांच्यामुळें पुढें जाणें तर राहो च, पण उलट यांच्या लीलांनीं तें मागें च आलें तर त्यांत नवल कोणतें?

समर्थांच्या समाजसुधारकाच्या भूमिकेच्या यशाचें चौथें कारण म्हणजे समाजांतील व्यक्तींशी वागण्याची त्यांची सौम्य व आकर्षक पद्धति हें होय. बोंचक विडंबनाच्या, हीन व्यंगचित्रांच्या, मर्मभेदी अपशब्दांच्या द्वारें समाजांतील कांहीं ठराविक विशिष्ट वर्गावर सदा सर्वदा प्रखर टीका करून त्याला सुधारण्याची इच्छा बाळगणाऱ्या आजकालच्या कित्येक सुधारकांनीं व उद्धारकांनीं समर्थांच्या पुढील उद्गारांकडे योग्य लक्ष पुरविल्यास फार चांगलें होईल.

मुलाचे चालीनें चालावें। मुलाच्या मनोगतें बोलावें।
तैसे जनास सिकवावें। हळुहळु॥ १३-१०-२४

दुर्जन प्राणी समजावे। परी ते प्रगट न करावे।
सज्जनापरीस आळवावे। महत्व देउनी॥ १९-९-२३

जितुकें कांहीं आपणासी ठावें। तितुकें हळुहळु सिकवावें।
शाहाणे करूनि सोडावें। बहुत जन॥ १९-१०-१४

अर्थात व्यक्तींचा नामनिर्देश न करतां केवळ एखाद्या सर्वसाधारण विचारसरणीवर अगर चालीरीतीवर टीका करतांना समर्थांनींही अत्यंत ओजस्वी व सडेतोड भाषा वापरण्यास कमी केलें नाहीं. (उ. पहा ८-१-२९; ६-६-४४; ३-१०-५२; ८-६-७) पण एखाद्या अनिष्ट रूढीवर टीका करणें निराळें; आणि समाजांतल्या एखाद्या वर्गाची कुचेष्टा करुन स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न करणें निराळें. या दोन पंथांतला भेद समर्थांनीं पुढील ओव्यांत सुंदरपणें व्यक्त केला आहे—

म्हणोन सांगाती असावे । मानत मानत शिकवावे ।
हळुहळु सेवटा न्यावे । विवेकानें ॥ १२–१०–४१

परंतु हे विवेकाचीं कामें । विवेकी करील नेमें ।
इतर ते बापुडे भ्रमें । भांडों च लागले ॥ ४२ ॥

समाजसुधारक समर्थांच्या असामान्य यशस्वितेचें मर्म अशा प्रकारें चार सूत्रांत विशद केल्यानंतर येथें जातां जातां एक महत्वाचा खुलासा करणें आवश्यक वाटतें. वर सांगितल्याप्रमाणें वैराग्य, परमार्थ, आत्मज्ञान इत्यादि गुणविशिष्ट अध्यात्मिक उन्नति हें च मानवी जीवनाचें अंतिम ध्येय आहे असें मानणाऱ्या समर्थांनीं साधारण सांसारिक जीवनाविषयीं पूर्ण अनास्था बाळगली असली पाहिजे, आणि म्हणून त्या जीवनाला सत्य मानणाऱ्या आम्हांला समर्थांचें कार्य मार्गदर्शक होऊं शकणार नाहीं अशी शंका कोणी उपस्थित करण्याचा कदाचित संभव आहे. यांच्या समाधानार्थ आम्ही येथें असें म्हणूं चाहतो कीं अद्वैत वेदांताच्या खऱ्या व सुसंगत भूमिकेस अनुसरून समर्थांच्या मतानेंही ब्रह्मज्ञान प्राप्त होऊन हा संसार मिथ्या आहे असें पूर्ण ज्ञान होईपावेतों सर्वसाधारण मनुष्यानें हें जीवन सत्य मानणें च साहाजिक व युक्त आहे. तें ज्ञान होईल तेव्हां खरें; पण त्यापूर्वी मात्र या जीवनाच्या अनुभवांतली सत्यता नाकारतां येत नाहीं. आणि समर्थांनीही याची जाणीव ठेऊन च या संसारी जीवनासाठीं योग्य क्रमही आखून दिला आहे (४–७); संसारिकानें कोणत्या प्रकारें त्याग करावा हेंही त्यांनीं मुद्दाम वेगळें सांगितलें आहे (५-१०-२, ३); संसारिकासाठीं आदर्श दिनचर्या दिग्दर्शित केली आहे (११-३); या जीवनांतल्या नानाविध शास्त्रांविषयीं, कलांविषयीं व ज्ञानांविषयीं योग्य आस्था दाखविली आहे (४-१); आणि या संसारिक व प्रापंचिक जीवनाचें महत्व मान्य केलें आहे ११-५-७,८; १२-१-८,९; विशेषेंकरून पहा १२-१०-१२). सारांश, संसाराविषयीं फाजील तिरस्कार व अविश्वास त्यांनीं शिकविला नाहीं; मात्र त्यांत खरें सुख नाहीं हें वारंवार सांगून त्याच्याविषयीं अनासक्ति पाहिजे हें ठांसून प्रतिपादिलें आहे. सांसारिक जीवनाची सापेक्ष सत्यता मान्य करून तें जीवन अशा च प्रकारें व्यतीत करावें कीं त्याचा व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतींत एक पायरी म्हणून उपयोग व्हावा असें फार सयुक्तिक व श्रेष्ठ मत समर्थांनीं प्रतिपादिलेलें दिसून येतें. विश्वांतल्या कोणत्या ही तत्वज्ञानांत याहून अधिक श्रेयस्कर मत क्वचित च आढळेल. आणि या प्रापंचिक जीवनाची व त्यांतील अनुभवाचीही सापेक्ष सत्यता मान्य केल्यामुळें च समर्थांनीं सिद्ध, महंत, मुमुक्षू इत्यादिकांसह सर्वांना च लोकसंग्रहाचा, जनसेवेचा, जगदुद्धाराचा अति पवित्र

संदेश दिला आहे ( ११-६-१६,१७; ११-१०-१८; १२-१०-२; १४-६-३३; १५-६-१५ इ.) जर रोजच्या जीवनांतले हे सारे अनुभव, या साऱ्या वस्तू, हे सारे लोक, आहे या स्थितींत देखील पूर्णपणें मिथ्या च मानले पाहिजेत असें समर्थांच्या मायावादाचें स्वरूप असतें, तर असल्या मिथ्या गोष्टींना सुधरविण्याचा उपदेश त्यांनीं कशाला केला असता?

समर्थांच्या अध्यात्मविषयक तत्वज्ञानाचें याहून जास्त विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. म्हणून शेवटीं समर्थांच्या समाजसुधारकाच्या भूमिकेंतलें सर्व मर्म सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याच्या पात्रतेच्या ज्या एका ओंवींत त्यांनीं स्वमुखानें च फार मार्मिकपणें वर्णन करून ठेवलें आहे, तिकडे वाचकांचें लक्ष वेधून हा लेख संपवितों.

अंतर्निष्ठ तितुके तरले। अंतरभ्रष्ट तितुके बुडाले।
बाह्याकारें भरंगळले। लोकाचारें ॥ १८-१-२४

---

# ( १७ )

॥ श्रीरामसमर्थ ॥

## कवि विनायकांच्या आणखी दोन कविता

### ( गणेश शंकर देव, धुळें )

पुण्याचे रा. दत्तात्रेय अनंत आपटे ऊर्फ अनंततनय यांनीं "वीणाकाव्य-मालेचा द्वितीय झणत्कार" म्हणून प्रकाशित केलेल्या "विनायकाची कविता" या ग्रंथाच्या शक १८४७ च्या दुसऱ्या आवृत्तींत पृष्ठांक ९० वर **दसऱ्याचें सोनें** म्हणून कविता प्रसिद्ध झालेली आहे. पण तेथें या कवितेचीं सात च कडवीं दिलेलीं आहेत. आम्हांला मिळालेल्या प्रतींत या कवितेचीं आठ कडवीं आहेत, म्हणजे तिसरें कडवें जास्त आहे, आणि, अर्थभेद होत नसला तरी, एक दोन पाठांतरें हि आहेत. म्हणून ती कविता समग्र खालीं दिली आहे.

### सोनें

"वारी जावो रे सावरिया" —ही चाल

दैवाची लीला **न कळे**; आहे तेंच बली जगतीं — धृ०

अशक्यास त्याजवळ न थारा
त्याचाच जगीं सर्व पसारा
अघटित घटना घडवी, संतत वागे स्वैरगती १

" विष – या – द्या " " विषया – द्या " होतें.
शिर तुटतें अमृताच्या घोटें
अमृत विषाचें दैवबलें ये जहरपणा अमृतीं. २

**सुलोचनापति दैवविलासें**
**मरून पडला समरीं हांसे**
**निधनाहातीं पडे सोडवी सावित्री स्वपती.** ३

दैवबलानें सागर तरले
अजिंक्य ऐसे दानव हरले
कौरव गेले, रावण गेला त्यांची काय मिती. ४

संदेश दिला आहे ( ११-६-१६,१७; ११-१०-१८; १२-१०-२; १४-६-३३; १५-६-१५ इ.) जर रोजच्या जीवनांतले हे सारे अनुभव, या साऱ्या वस्तू, हे सारे लोक, आहे या स्थितींत देखील पूर्णपणें मिथ्या च मानले पाहिजेत असें समर्थांच्या मायावादाचें स्वरूप असतें, तर असल्या मिथ्या गोष्टींना सुधरविण्याचा उपदेश त्यांनीं कशाला केला असता ?

समर्थांच्या अध्यात्मविषयक तत्वज्ञानाचें याहून जास्त विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. म्हणून शेवटीं समर्थांच्या समाजसुधारकाच्या भूमिकेंतलें सर्व मर्म सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याच्या पात्रतेच्या ज्या एका ओंवींत त्यांनीं स्वमुखानें च फार मार्मिकपणें वर्णन करून ठेवलें आहे, तिकडे वाचकांचें लक्ष वेधून हा लेख संपवितों.

अंतरनिष्ठ तितुके तरले। अंतरभ्रष्ट तितुके बुडाले।
बाह्याकारें भरंगळलें। लोकाचारें॥ १८-१-२४

---

॥ श्रीरामसमर्थ ॥

# कवि विनायकांच्या आणखी दोन कविता

## ( गणेश शंकर देव, धुळें )

पुण्याचे रा. दत्तात्रेय अनंत आपटे ऊर्फ अनंततनय यांनीं "वीणाकाव्य-मालेचा द्वितीय झणत्कार" म्हणून प्रकाशित केलेल्या "विनायकाची कविता" या ग्रंथाच्या शक १८४७ च्या दुसऱ्या आवृत्तींत पृष्ठांक ९० वर **दसऱ्याचें सोनें** म्हणून कविता प्रसिद्ध झालेली आहे. पण तेथें या कवितेचीं सात च कडवीं दिलेलीं आहेत. आम्हांला मिळालेल्या प्रतींत या कवितेचीं आठ कडवीं आहेत, म्हणजे तिसरें कडवें जास्त आहे, आणि, अर्थभेद होत नसला तरी, एक दोन पाठांतरें हि आहेत. म्हणून ती कविता समग्र खालीं दिली आहे.

### सोनें

"वारी जावो रे सावरिया" —ही चाल

दैवाची लीला **न कळे**; आहे तेंच बली जगतीं —धृ०

अशक्यास त्याजवळ न थारा
त्याचाच जगीं सर्व पसारा
अघटित घटना घडवी, संतत वागे स्वैरगती १

"विष-या-द्या" "विषया-द्या" होतें.
शिर तुटतें अमृताच्या घोटें
अमृत विषाचें दैवबलें ये जहरपणा अमृतीं. २

**सुलोचनापति दैवविलासें**
**मरून पडला समरीं हांसे**
**निधनाहातीं पडे सोडवी सावित्री स्वपती.** ३

दैवबलानें सागर तरले
अजिंक्य ऐसे दानव हरले
कौरव गेले, रावण गेला त्यांची काय मिती. ४

नग्न अडाणी फिरले रानीं
तेच पुढें जन ठरले ज्ञानी
विद्याशास्त्रविशारद पंडित करिती मूढ कृती. ५
वैभवशाली सत्ताधारी
गुलाम फिरती दारोदारीं
तुलसीपत्रें सुकलीं "सबजा" ये सकलांवरती. ६
धैर्य निमालें भरली भीती
असत्य पिकलें; नुरली नीती;
देशप्रीती निंद्य जहाली, व्यसनें स्वहितपथीं. ७
"सुवर्णभू"ची रक्षा झाली
"सोन्या" जागीं पानें आलीं
"सीमोल्लंघन" **झालें** दैवा! बघसी अंत किती. ८

धरणगांव
१७-१०-०४ } "**विनायक**"

I regret the meter though sweet you
can not enjoy without me. V. K.

या कवितेच्या आम्हांला मिळालेल्या प्रतीचें महत्त्व स्वतंत्र आहे. कारण, त्या प्रतींत मूळ कविता जरी दुसऱ्या कोणाच्या हातची असली, तरी कवीची सही, गांवाचें नांव, तारीख आणि नंतरचा इंग्रजी मजकूर व त्याखालील कवीचीं आद्याक्षरें हीं खुद्द कवि विनायकांच्या हातचीं आहेत. ही प्रत ज्या पाकिटांत उपलब्ध झाली, त्या पाकिटावर कवींचे बंधु रा. दत्तात्रय जनार्दन करंदीकर, पोलीस जमादार, एदलाबाद, यांचा पत्ता असून पाकिटावरील धरणगांव पोस्टाचा शिक्का ता. १७ ऑक्टोबर १९०४ चा, आणि एदलाबाद पोस्टाचा शिक्का ता. १८ ऑक्टोबर १९०४ चा आहे. आणि ता. १८ ऑक्टोबर १९०४ ला "दसरा" होता हि. यावरून असें वाटतें कीं, या कवितेच्या अनेक प्रती दुसऱ्याकडून करवून घेऊन त्याखालीं आपली सही वगैरे स्वतःच्या हातानें करून, आपल्या आप्तेष्टांना, दसऱ्याचें "सोनें" म्हणून, कवि विनायकांनीं त्या पाठविल्या असाव्या.

ही **सोनें** ही कविता आणि पुढें दिलेली **देशभक्ताची पूजा** ही कविता, अशा या दोन्हीं कविता, कवि विनायकांचे पुतणे, आणि आमचे स्नेही, धुळ्याचे


श्री.
" कर्मण्येवाधिकारस्ते
मा फलेषु कदाचन । "
गोपाळ जनार्दन करंदीकर,
बी. ए., एल्. एल्. बी.
हायकोर्ट वकील.
धुळें, ता. १९०
बांदिशाळा वंद्य मानिती, पूजिती
कोंडिती देशभक्तां जियें
शूळावरी देशभक्तांस देती
जयस्तंभ लोकांस ते
~~होती जिथे देशभस्म तिचें कीर्ति~~
~~रक्षा चितेची होता आवेगा~~
देशाधिकारास जी लोटिते
मानिती भारत संतानते.
देशभक्ता गाळनीच्या म्हणे कवी धन्य ते

वकील रा. नारायण विश्वनाथ करंदीकर, यांनीं सत्कार्योत्तेजक सभेच्या या सुवर्णमहोत्सवग्रंथासाठीं दिल्या, एवढें च नव्हे, तर या दोन्ही कवितांच्या आपल्या जवळील अस्सल प्रती सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं ठेवण्यासाठीं रा. करंदीकर यांनीं कायमच्या दिल्या आहेत. रा. करंदीकर यांचेकडून मिळालेली दुसरी कविता अशी :

## देशभक्ताची पूजा

बंदिशाला वंद्य मानिती, पूजिती
कोंडिती देशभक्ता जिथें

शूलावरी देशभक्तास देती
जयस्तंभ लोकांस ते

होमी चिता देशभक्ता, तिचें
मानिती भस्म संरक्षितें

देशभक्ता गाउनीया झाले कवी धन्य ते

"देशभक्ताची पूजा" हें कवितेचें नांव आम्ही योजिलेलें आहे, मूळांत तें नाहीं.

सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेच्या सभेसाठीं कवि विनायकांनीं वर्णिलेला "जीवितमहिमा", आपल्या बंधूंना त्यांनीं पाठविलेलें "सोनें", आणि त्यांनीं केलेली "देशभक्ताची पूजा", या तिन्ही कवितांचें महत्त्व निरनिराळें आणि स्वतंत्र आहे. पन्नास वर्षांपूर्वी कां होईना, पण मित्रमंडळींत वांटण्यासाठीं "जीवितमहिमा" ही कविता छापून घेण्यांत आली होती. "सोनें" या कवितेचें महत्त्व तिच्या नवीन सांपडलेल्या तिसऱ्या कडव्यांत आणि पाठांतरांत जसें आहे, तसें तें कवि विनायकांनीं आपल्या बंधूंना "सोनें" पाठविण्याच्या पद्धतींत हि आहे. पण या दोन्हीं कवितांहून "देशभक्ताची पूजा" या तिसऱ्या कवितेचें महत्त्व अधिक आहे. रा. करंदीकर सांगतात कीं, मनांत घोळत असलेल्या कवितेचे चरण कवि विनायक गुणगुणत असत. एक दिवस स्नान करीत असतांना स्फुरलेली आणि स्नान चालू असतां गुणगुणलेली, "देशभक्ताची पूजा" ही कविता लिहून ठेवण्यासाठीं, स्नान आटोपतां च आपल्याकडून कवि विनायकांनीं कागद मागितल्यामुळें, आपण हातीं लागला तो कागद कसा पुढें केला, आणि तो घेऊन त्यावर ही कविता कवि विनायकांनीं कशी लिहीली आणि ती लिहीत असतांना च त्यांत खोडाखोड हि त्या च वेळीं कशी केली, याची आठवण रा. करंदीकरांना, हा प्रसंग नुकता च घडल्यासारखी, ताजी, आहे. ही सारी कविता कवीच्या हस्ताक्षरांत असल्यामुळें

या कवितेचें महत्व आहे हें तर खरें च, पण या कवितेचें आणखी महत्त्व आहे तें हें कीं, ती कविता या ग्रंथांत च प्रथम प्रकाशित होत आहे. न जाणों, चारसहा व्यक्तींशिवाय आणखी कोणाच्या नजरेस ती कविता आजपर्यंत पडली नसेल हि. सत्कार्योत्तेजक सभेच्या एका संस्थापकाची ही कविता या ग्रंथांत प्रसिद्ध करतां आली याचा आनंद वाटतो.

पण या कवितेचें महत्त्व वाटण्याला आणखी एक कारण आहे. कवि विनायकांच्या बहुतेक सर्व च कवितांतून त्यांच्या अंतःकरणांतील देशभक्ति प्रतीत होते. पण या कवितेवरून त्यांच्या जळजळीत देशभक्तीची जाणीव प्रखरत्त्वानें होत आहे. "देशभक्ताची पूजा" ही कविता वाचून रा. आपटे यांनीं प्रकाशित केलेल्या कवि विनायकांच्या "देशभक्ताचा अपूर्व सोहळा" या खालील कवितेचें स्मरण होतें.

देशभक्ता प्रासाद बंदिशाला
शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला
चिता सिंहासन शूल राजदंड
मृत्यु दैवत दे अमरता उदंड

या कवितेंत बंदिशाला, शृंखला, चिता, शूल आणि मृत्यु यांच्याकडे देशभक्त कोणत्या दृष्टीनें पहातात तें सांगितलें आहे; तर "देशभक्ताची पूजा" या कवितेवरून देशभक्तांच्या बंदिशाला, त्यांचे शूल, त्यांच्या चिता, त्या चितांचें भस्म यांच्याकडे कवि विनायक कोणत्या दृष्टीनें पहात होते, एवढें च दिसून येतें असें नव्हे, तर त्या वेळची जनता हि कोणत्या दृष्टीनें पहात होती, तें हि दिसून येतें. "विनायकाची कविता" या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत कै. प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं म्हटल्याप्रमाणें, "त्या वेळच्या जनतेंत अस्फुटपणें जे विचार, जे भाव, ज्या मनःप्रवृत्ति जाग्रत होत होत्या त्यांना विनायकानें तोंड फोडिलें. विनायक हा तत्कालीन जनतेचा वाचस्पति होता. त्याच्या काव्याचे द्वारां त्या वेळची लोकस्थिति गाऊं किंवा बोलूं लागली."

भारतवर्षाच्या कोणत्या प्रांतांतील, कोणत्या देशभक्ताच्या चितेंतील भस्म ललाटीं धारण करण्याच्या उसळलेल्या लाटेचें, कोणत्या वर्तमानपत्रांत आलेलें, वर्णन वाचून कवि विनायकांना या कवितेची स्फूर्ति झाली, हें जाणतां येण्यासारखें असल्यामुळें, आज विद्यमान असणाऱ्या अनेकांच्या हयातींत घडलेल्या या ३४, ३५, ३६ वर्षांपूर्वीच्या रोमांचकारी प्रसंगाचा स्पष्ट निर्देश करण्याची आवश्यकता नाहीं! या गोष्टी न सांगतां हि समजतील, निदान समजाव्यात!

---

श्रीशः शरणम्

# श्रीमध्वाचार्य व श्रीसमर्थ यांचा संप्रदाय

( लेखक – रा. **बाळाचार्य खुपेरकर, कोल्हापुर** )

( १ ) आपल्या वैदिक धर्मामध्यें वेदांत तत्त्वज्ञानासंबंधीं स्वतंत्र बुद्धीनें विचार करून आपल्या मताचा सर्वत्र प्रचार करणारे असे जे आद्य शंकराचार्यासारखे चार-दोन अवतारी पुरुष या भरतखंडामध्यें निर्माण झाले, त्यामध्यें च श्रीमध्वाचार्य यांची गणना केली जाते. “प्रथमो हनुमान्नाम द्वितीयो भीम एव च। पूर्णप्रज्ञस्तु तृतीयस्तु भगवत्कार्यसाधकः॥” या वचनांत वायुदेवाचे कालभेदानें तीन अवतार झाले असें वर्णिलें आहे. “धर्मविरोधी दुर्जनांचा नाश करून सत्त्वगुणसंपन्न सज्जनांचें रक्षण करावें आणि त्यांच्या द्वारें वैदिक धर्माचा प्रचार सर्वत्र करावा.” हें जें भगवतांचें कार्य तें करण्यासाठीं परम भागवत जे मुख्य प्राणेश यांनीं प्रथम रामावतारामध्यें हनुमंताचा अवतार धारण केला. नंतर पुढें पुन्हां भीमसेनाच्या रूपानें ते अवतीर्ण झाले आणि शेवटीं त्यानीं तिसरा अवतार जो धारण केला तो च पूर्णप्रज्ञ ऊर्फ मध्वाचार्य या नांवानें प्रसिद्ध झाला आहे.

( २ ) चार्वाकादि नास्तिक आणि बौद्ध, जैनादि पाखंडी लोक यांनीं वैदिक-धर्मीय समाजामध्यें बुद्धिभेद करून त्या समाजास सत्यधर्मापासून भ्रष्ट करण्याचा प्रयत्न चालविला होता. हा प्रयत्न हाणून पाडण्याचें कार्य प्रथम प्रथम गौतम कणादादि महर्षींनीं दार्शनिक ग्रंथ लिहून केलें. या षड्दर्शनानीं अवैदिक मताचा जरी संपूर्ण निरास केलेला होता तथापि पुन्हां कालगतीनें या चार्वाकादि मतांचा उत्कर्ष होत असल्याचा भास कांहीं काल दिसून आला. त्यावेळीं आरंभीं कुमारिल भट्टानीं सर्वत्र संचार करून बौद्धादिकानीं प्रचलित केलेल्या असन्मताचा चांगला च समाचार घेतला. पुढें आद्य आचार्यांनीं ( शंकराचार्य ) तें च कार्य स्वतःचें शिरावर घेऊन अखिल भरतखंडभर अद्वैतमताची ध्वजा फडकाविली. शंकराचार्यांनीं वेदांत तत्त्वज्ञानांतील अद्वैत सिद्धांताची जरी उभारणी केली तथापि तत्कालीन परिस्थितीचा उत्कट परिणाम जो त्यावेळच्या वैदिक समाजावर झालेला होता त्या परिणामांतून सर्वांशानें त्या समाजाला सोडविणें हें जरा कठीण झालें. या कारणानें “सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः” या न्यायानें बौद्धांच्या सार्वत्रिक झालेल्या “सर्वं शून्यं शून्यं” या तत्त्वाचा त्याग करून हें सर्व जगत् संवृत्तीनें म्हणजे मायेनें व्यापलें आहे, अतएव

हें मिथ्या आहे, क्षणिक आहे, दुःखमय आहे या बौद्धांच्या तत्त्वाचा शंकराचार्यांना स्वीकार करावा लागला. बौद्धांच्या या मायावादाचा अंगीकार केल्यानें शंकराचार्यांना त्यांच्या पुढील बहुतेक आचार्यांनीं "प्रछन्न बौद्ध" या विशेषणानें च संबोधिलें आहे. "सर्व शून्य आहे" या बौद्ध तत्त्वाचा जरी शंकराचार्यांनीं त्याग केलेला दिसतो, तथापि तो तात्विक नसून ब्रह्मवादासारखें त्या च बौद्ध सिद्धांताला दुसरें नांव देऊन हा वैदिक नवीन सिद्धांत म्हणून त्यांनीं तो जनतेच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला. आणि तो पूर्वी कुमारिल भट्टानीं या भरतभूमींतील बौद्धानीं माजविलेल्या दुर्मतरूप जटिल तृणांकुरांचा सर्व विनाश करून या भूमीची मशागत चांगली करून ठेविली असल्यानें येथें चांगला रुजला व त्याचीं मधुर फळें हि सर्वांना चाखावयास मिळालीं.

( ३ ) शंकराचार्यांनीं याप्रमाणें बौद्धांच्या मगरमिठींतून जरी त्यावेळीं वैदिक धर्मीयांना चांगल्या रीतीनें सोडविलें तरी त्यानीं मायावादाचा पुरस्कार करून सर्व जगत् हें प्रतिभासिक अतएव मिथ्या आहे या कल्पनेचा केलेला प्रचार मात्र पुढें कोणाला हि मान्य झाला नाहीं. विज्ञान भिक्षु, रामानुज, भास्कर, मध्व, निंबार्क, वल्लभ वगैरे पुढील अनेक आचार्यांनीं या मायावादाचा धिक्कार करून "जगत् हें प्रातिभासिक, मिथ्या नसून सत्य आहे" वगैरे सिद्धांत स्थापित केले. रामानुजाचार्यांनीं शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांत थोडी मुरड घालून विशिष्टाद्वैत या नांवानें तो प्रचारांत आणला तथापि मायावादाला मात्र त्यांनीं बिलकूल मान्यता दिली नाहीं. मायेचें म्हणजे पर्यायानें अज्ञानाचें खंडण करण्यासाठीं रामानुजाचार्यांनीं आपल्या ब्रह्मसूत्र भाष्यांत पुष्कळ च चांगला प्रयत्न केला असून तो यशस्वी हि झाला आहे. बौद्धांनीं रूढ केलेला शून्यवाद शंकराचार्यांनीं दूर करून ब्रह्मवाद प्रस्थापित केला. इतकी गोष्ट गळीं उतरलेली पाहून पुढ रामानुजाचार्यांनीं एक पाऊल पुढें टाकून बौद्धांच्या संवृत्तीला म्हणजे मायेला धक्का दिला. आणि मायेनें च म्हणजे अज्ञानानें हें सर्व जग निर्माण झालें आहे, हा सर्व दृश्य पसारा भ्रमात्मक अतएव मिथ्या व अविश्वसनीय आहे, या मताचा पुष्कळ अंशानें निरास केला. बौद्धमतखंडणाच्या कार्यांतील इतकी कामगिरी या दोन आचार्यांनीं पूर्वी करून भूमिका चांगली तयार करून ठेविल्यामुळें पुढें बाराव्या शतकामध्यें मध्वाचार्यांचा अवतार होऊन त्यांनीं स्वतंत्रपणें "**मायावाद-खंडण, प्रपंचमिथात्वानुमानखंडण, उपाधिखंडण** वगैरे सारखे प्रकरण ग्रंथ लिहून बौद्धांच्या मायावादाला साकल्यानें गाडून टाकिलें. बौद्धानीं हजारपांचशें वर्षें वैदिक समाजावर जो "हें सर्व दुःखमय आहे, हें सर्व मायामय आहे, हें सर्व क्षणिक आहे" इत्यादि मताचा पगडा बसविला होता, तो दूर करण्यासाठीं गौडपादाचार्यांच्या मांडुक्य कारिकेपासून आरंभ होऊन पुढें तो प्रयत्न क्रमाक्रमानें

दृढमूल होत जात मध्वाचार्यांच्या कालापर्यंत चांगला च फोफावून नंतर त्यांच्या उपदेशजलानें फलसमृद्ध झालेला दृष्टीस पडतो.

(४) पूर्वप्रज्ञाचार्य ऊर्फ मध्वाचार्य यांचा जन्म उडुपीजवळ पाजक क्षेत्रांत इ.स. ११९९ सालीं झाला असून १२७८ सालीं त्यानीं आपलें अखिल भरतखंडांतील अवतारकार्य पुरें करून हिमालयांतील बदरिकाश्रमीं ध्यानधारणेसाठीं प्रवेश केला. अच्युतप्रेक्षाचार्य हे यांचे मोक्षगुरु होत. मध्वाचार्य यांनीं ज्या तत्त्वज्ञानाचा सर्वत्र प्रचार केला त्या तत्त्वज्ञानाचा सारांश असा कीं —

ह्या जगतांत नेहमीं आपल्याला सुख च असावें दुःखाचा लवलेश ही लागूं नये अशी ज्या सुखाची जीवाला सतत आशा लागलेली असते, तें सुख जीवाचें स्वरूपभूत असून देखील, त्या जीवस्वरूपावर प्रकृतीचें आवरण पडलें असल्याकारणानें तें स्वरूपभूत सुख प्राण्यांच्या अनुभवाला येत नाहीं. त्यामुळें हे अज्ञजीव आपल्या आयुष्यावधींत बहुविध कर्में करितात. तीं कर्में त्या जीवाला पुढें अनेक जन्म आणून देण्याला कारणीभूत होतात आणि स्वकर्मसंपादित देह संसर्गामुळें जीवाला नानाविध दुःखाचा अनुभव घ्यावा लागतो. "अदुःखमितरत्सर्वं जीवा एव तु दुःखिनः। तेषां दुःखप्रहाणाय श्रुतिरेषा प्रवर्तते ॥" जीवाखेरीज इतर सर्व दुःखशून्य आहे. केवळ जीव हे च दुःखी आहेत. त्या दुःखी जीवांची दुःखनिवृत्ति व्हावी यासाठीं च वेदवाणी ही प्रवृत्त झाली आहे. करितां वेदांत सांगितलेल्या उपदेशानुसार जीवानें आपआपल्या स्वस्ववर्णाश्रमविहित कर्में "यत्करोषि यदश्नासि......" या गीतावचनाला अनुसरून भगवदर्पणबुद्धीनें करावीं, म्हणजे त्यायोगें जीवाच्या अंतःकरणाची शुद्धि होऊन त्यावरील प्रकृतीचें आवरण कमी होतें आणि तो जीव सकल सद्गुणैश्वर्यसंपन्न अशा भगवंताचा साक्षात्कार करून घेण्यास अधिकारी होतो. अशा अधिकारी जीवानें "तमेवं विद्वानमृत इह भवति,। धातुःप्रसादान्महिमानमात्मनः। आत्मा वा अरेश्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः"। इत्यादि श्रुतिवचनाला अनुसरून परमात्मज्ञान व परमात्म्याचा कृपाप्रसाद होण्यासाठीं सद्गुरूच्या मुखांतून अध्यात्मविषयाचें श्रवण करावें. ब्रह्ममीमांसासूत्रें गुरुद्वारा श्रवण करून त्यामध्यें सांगितलेल्या पद्धतीने परमात्मतत्वाचा विचार करून तत्संबंधीं निश्चय प्राप्त करून घ्यावा. अशा रितीनें वेदांतवाक्यांचें, श्रवण, मनन निदिध्यासन घडलें म्हणजे त्यायोगानें जीवाला परमात्म्याचा कृपाप्रसाद होऊन अपरोक्ष साक्षात्कार घडतो व त्यायोगें 'भगवन्महात्म्याचें ज्ञान होऊन जीवाचें ठिकाणीं स्वतःवरील किंवा स्वकीयावरील प्रेमापेक्षां अनंतपटीनें अधिक असा अखंड प्रेमप्रवाह उत्पन्न होतो. या परमेश्वरविषयक

अखंड प्रेमप्रवाहाला भक्ति असें नांव आहे. या भक्तीच्या च साह्यानें जीवावरील प्रकृतीचें आवरण दूर होतें आणि जीव मुक्त होतो म्हणजे स्वरूपभूत निजसुखाचा अनुभव घेतो. जगदीश्वरकृपेनें च अज्ञजीवांना ज्ञान उत्पन्न होतें. व ज्ञानी जीवांच्या आनंदांत अधिक भर पडते. असें हे मुक्त जीव परमात्मसाक्षात्कारानंतर हि भगवंतांचे गुणानुवाद गात, त्याच्या दर्शनसुखाची माधुरी घेत श्रीहरीचे दास होऊन श्रीहरीसांन्निध्यांत "एतत्साम गायन्नास्ते" या श्रुतिवाक्यामध्यें वर्णिल्याप्रमाणें यथेष्ट आहारविहार करीत अक्षय्य सुखाचा आस्वाद घेत आनंदांत मग्न होऊन राहतात. ज्ञानोत्तर मुक्तस्थितींत हि जीव आणि ईश यांच्यामध्यें भेद हा कायम असतो. तेथें हि जीवानें भगवंताचें पूजन-अर्चन करून स्वानंदाभिवृद्धि करून घ्यावी. मुक्तस्थितींत हि जीवनपरमात्म्यांतील सेव्यसेवक भाव कधीं नष्ट होत नाहीं. या मतांत वर्णिलेला जीव आणि ईश, जीव आणि जीव, जीव आणि जड, जड आणि जड, व जड आणि ईश यांच्यांतील भेद हा त्रिकालाबाधित असल्यानें च या मताचा उल्लेख सर्वत्र भेदवादी आचार्यांचें मत असा केला जातो. या मतामध्यें भगवान विष्णूची उपासना ही प्रामुख्यानें सांगितली असून इतर देवतांची हि उपासना त्यांच्यांतील अधिकारभेद ध्यानीं घेऊन तारतम्यानें सांगितली आहे. माध्य वैष्णवांचें सर्व आचारविचार या तत्वप्रणालीला च अनुसरून श्रुतिस्मृत्यादि वचनांच्या प्रामाण्यावर उभारलेले आहेत. हा संप्रदाय भक्तीप्रधान असल्यानें परमात्म्याच्या हातांतील आयुधांनीं स्वशरीर अंकित करणें, त्याच्या गुणोत्कर्षाची द्योतक केशव नारायणादि नामें स्वकीयांना देणें इत्यादि प्रकारानें भक्तीचा परिपोष करण्याविषयीं श्रीमदाचार्यांनीं सर्वांना दंडक घालून दिला आहे.

(५) श्री मध्वाचार्य, त्यांच्या अवतारकार्यापूर्वीची भरतखंडांतील धार्मिक परिस्थिति, त्यांनीं प्रचलित केलेलें तत्त्वज्ञान, त्याचा समाजावर झालेला तत्कालीन परिणाम व त्या सांप्रदायाचें सामान्य स्वरूप हें सर्व वाचकांनीं ध्यानीं घेऊन "श्रीसमर्थ व त्यांचा संप्रदाय" याकडे त्यानीं आपली दृष्टी द्यावी. आम्ही या दोन्ही सांप्रदायामध्यें असलेल्या साम्याचीं कांहीं विशिष्ट उदाहरणें क्रमानें वाचकांचे पुढें येथें मांडीत आहों. त्याचा विचार श्रीसमर्थभक्तानीं अवश्य करावा अशी आमची त्यांना विनंति आहे.

(६) श्री समर्थांचें मूळ घराणें ठोसर या आडनांवानें प्रसिद्ध असून त्यांचे जांब येथील व आसपासचे सर्व भाऊबंद हे माध्व सांप्रदायी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असल्याबद्दल सर्वत्र प्रसिद्ध आहे. अर्थात् कुलपरंपरेनें श्री समर्थ रामदास हे माध्व मताचे असल्यानें त्यांच्या सर्व आचाराविचारांवर माध्व संप्रदायाची च छाप पडावी हें साहजिक च आहे. श्री मध्वाचार्य हे जसे वायूचे अवतार तसे च

श्रीसमर्थ हि वायुपुत्र हनुमानाचे अवतार. मध्वाचार्यांचें उपास्य दैवत श्रीरामचंद्र तर श्री समर्थांनीं हि श्री रामचंद्राच्या च मूर्तीची स्थापना चाफळला करून श्रींच्या उत्सवाची योजना सार्वत्रिक केली. समर्थ सांप्रदायामध्यें रामनामांकित मुद्रेच्या धारणाचा जो विधी आज सर्वत्र प्रचारांत आलेला दिसून येत आहे हा माध्व संप्रदायांतील अंकनभक्तीचा च अवशेष आहे असें म्हणणें प्राप्त होतें. मारुतीची उपासना ही या उभय सांप्रदायामध्यें प्रामुख्यानें केली जात आहे. पूजा नैवेद्यादि तंत्रामध्यें हि समर्थ सांप्रदायामध्यें माध्व सांप्रदायाचें च अनुकरण केलें जात आहे. शंकराचार्यांनीं प्रचलित केलेल्या पंचायतन पूजेचा कोणता हि प्रकार आज चाफळ किंवा सज्जनगड या ठिकाणीं अनुसरलेला दिसत नाहीं. उलट माध्वांच्या पूजेंतील तारतम्यानुसार च या दोन हि ठिकाणीं सध्यां पूजाविधी उरकला जातो. शांकर सांप्रदाय व माध्व सांप्रदाय यांच्या पूजाविधीमध्यें जसा फरक आहे तसा नैवेद्य-समर्पणाच्या तंत्रांत हि फरक आहे. शांकरसांप्रदायी लोक हे कोणत्या हि आपल्या इष्ट देवतेला नैवेद्य समर्पण करण्यापूर्वी वैश्वदेव करून घेतात. आणि नंतर आपल्या पात्रांत प्रथम वाढलेला तेव्हढा च अन्नभाग देवतेला निवेदन करितात. माध्व सांप्रदायामध्यें याहून भिन्न असें तंत्र आहे. माध्व सांप्रदायी लोक प्रथम सर्व शिजविलेलें अन्न भगवंताला समर्पण करून तन्निवेदित अन्नानें नंतर वैश्वदेव करितात. सज्जन-गडावर आजकाल हि हें माध्व सांप्रदायांतील च नैवेद्याचें तंत्र जसेंच्या तसें अनुसरलें जात आहे. अर्थात् ही विशिष्ट गोष्ट माध्व सांप्रदायाचा कांहीं अनुस्यूत धागा समर्थसांप्रदायाशीं पूर्वापार चालत आलेला असल्याशिवाय केवळ साहजिक च होत असेल असें कोणी मानणार नाहीं. माध्व सांप्रदायांतील जगत्सत्यत्वादि सिद्धांत, निसर्गांतील भेद वगैरे हि गोष्टी समर्थांच्या वाङमयांत सर्वत्र विखुरलेल्या दृष्टीस पडतात. (दासबोध दशक १३ समास १० पहावा.) "निसर्गानें सिद्ध केलेला भेद हा ब्रह्मदेवाच्या बाला हि मोडतां येणार नाहीं" असें सडेतोड लिहिणारे श्रीसमर्थ हे माध्व सांप्रदायी नव्हेत असें कोण समर्थभक्त तरी म्हणेल ? प्रपंच परमार्थ यांचा समन्वय करणारे श्री समर्थ प्रपंचाला मायामय मिथ्या म्हणणारे असतील असें समजणें च आम्हास असमंजसपणाचें वाटतें, श्री समर्थांच्या सर्व अवतारकार्याचें साकल्यानें जर आलोचन केलें तर समर्थ हे प्रपंचाला रज्जुसर्पतुल्य केवळ आभासात्मक मानीत असतील असें कोणाला हि वाटणार नाहीं. सर्व प्रपंच हा भ्रमरूप असून दुःखमय व क्षणिक आहे अशा प्रकारच्या बुद्धानें केलेल्या राष्ट्रघातक आणि अवैदिक उपदेशाचें निरसन बाराव्या शतकांत ज्याप्रमाणें श्री मध्वाचार्य यानीं केलें त्याप्रमाणें च हनुमंताचे अवतारभूत अशा श्री समर्थ रामदास स्वामीनीं हि सोळाव्या शतकांत केलें. एकंदरींत तात्पर्य श्री समर्थसंप्रदायावर माध्व सांप्रदायाची आचार व

विचार या दोन हि दृष्टीनें पुष्कळशी छाया पडलेली दिसते. स्थूल मानानें आम्ही हा विचार वाचकांपुढें मांडला आहे. समर्थवाङ्मयभक्तानीं या गोष्टीचा अधिक विचार करावा †.

---

† सज्जनगडावर तेथील श्रींच्या सेवेसाठीं जीं दोनतीन घराणीं वतनदार म्हणून समजलीं जातात, त्यांचे घरीं संशोधन करितां माध्वसांप्रदायाचे कांहीं ग्रंथ उपलब्ध झाले व त्या घराण्यापैकीं १।२ घराणीं माध्वसांप्रदयाचींच आहेत याचा हि विचार नव्या संशोधकांनीं ध्यानीं घ्यावा. — लेखक

## (१९)

# वऱ्हाडांतील समर्थांचे शिष्य
# आणि
# त्यांची सांप्रदायिक कामगिरी

(लेखक – रा. **यशवंत खुशाल देशपांडे**, एम्. ए., एल्एल्. बी., एम्. आर. ए. एस्., शारदाश्रम, **यवतमाळ**)

### (१) प्रास्ताविक

सत्कार्योत्तेजक सभा, धुळें, या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगीं, संस्थेनें ५० वर्षांत केलेल्या वाङ्मयविषयक संशोधन आणि प्रकाशन या कार्यासंबंधीं आदर व्यक्त करण्याकरितां, गौरवग्रंथांत प्रस्तुत लेख लिहिण्याचें योजिलें आहे. या संस्थेच्या विद्यमानें श्री. शंकररावजी देव प्रभृति कार्यकर्त्यांनीं जे परिश्रम केले आहेत त्यांचें दृश्य फल म्हणजे संस्थेनें प्रकाशिलेला एवढा मोठा ग्रंथसंभार होय. श्री. शंकररावजी देव यांनीं ५० वर्षें परिश्रम करून समर्थवाङ्मयाचें जें अविश्रांत संशोधन आणि संपादनकार्य केलें आहे तें मूर्त स्वरूपांत महाराष्ट्रजनतेसमोर आहे. त्यांनीं उजेडांत आणलेल्या समर्थवाङ्मयमहोदधींत एक पळीभर वाङ्मयोदक टाकून त्या कार्याविषयीं आपला आदर व्यक्त करण्यापलिकडे या लेखाचा उद्देश नाहीं.

### (२) समर्थांचे प्रमुख शिष्य

समर्थांनीं आपल्या आयुष्यांत जें कार्य केलें तें पुढें चालविण्याकरितां आणि त्यांनीं स्थापित केलेला संप्रदाय अव्याहत चालावा म्हणून समर्थांनीं अनेक शिष्य तयार केले होते; आणि त्यांना महाराष्ट्रभर, एवढें च नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही, जेथें जेथें महाराष्ट्रधर्मांचे मूळ रुजलें होतें, तेथें तेथें आपले मठ स्थापन करण्याची आज्ञा दिली होती. समर्थांच्या बखरींत ७२ शिष्यांना महाराष्ट्रांत व कर्नाटकांत मठ करून दिले होते म्हणून उल्लेख आहे. संतविजयांतही महीपतीनें समर्थांच्या अनेक प्रमुख शिष्यांचीं नांवें दिलीं आहेत. कारंजा येथील जनार्दन गोसावी यांच्या मठांत आम्हांस एक महत्त्वाची यादी सांपडली आहे. तिच्यामध्यें “श्रीरामदास समर्थ सांप्रदायी महाराज सत्पुरुष” असा शिरोल्लेख आहे. त्या यादींत समर्थांच्या ३७ प्रमुख शिष्यांचीं आणि मठाधिपतींचीं नांवें असून, त्यांच्यामागून झालेल्या प्रसिद्ध सत्पुरुषांचींहीं नांवें आहेत. या यादींत आलेल्या ग्रामनामांवरून, समर्थ

संप्रदायाचा, त्यांच्या हयातींत च, महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरही केवढा प्रसार झाला होता, त्याची कल्पना येईल. समर्थशिष्यांचीं नांवें सर्वश्रुत असलीं तरी तीं येथें एकत्र देणें महत्त्वाचें आहे.

१ दत्तो गोसावी
२ शिवाजी महाराज
३ कल्याण गोसावी डोमगांवकर
४ दत्ताबा गोसावी
 सिरपुर पालीसमीप
५ आकाबाई शहापुरस्थ
६ गिर्माजी गोसावी भोईजस्थ
७ **गोपाळ गोसावी**
 **बालाघाटस्थ**
८ कृष्णाजी गोसावी – हरबाजी
 गोसावी पंढरपुरस्थ
९ सीताराम गोसावी महाकवि
 कोकणस्थ
१० अनंत गोसावी नारळकर
११ मौनी गोसावी – आनंद
 गोसावी निलंगेकर
१२ रंगनाथ गोसावी – भीम
 गोसावी अडसूळकर
१३ उद्धव गोसावी
१४ वेणुबाई शहापुरस्थ
१५ बहिणाबाई सिऊरगांवकर
१६ वासुदेव गोसावी कण्हेरीकर
१७ अण्णा गोसावी
१८ पीपाजी गोसावी कुडाळकर
१९ जयवंत गोसावी कोकेकर
२० माधो गोसावी पारनेरकर
 केशव गोसावी
२१ **भोलाराम गोसावी**
 **अळस्पूर**
२२ **बाळकराम गोसावी**
 **पुसतकर**
 १ रोकडोबा गोसावी
 १ बापु गोसावी
२३ शिवाजी गोसावी परंडेकर
२४ दिनकर गोसावी तिसगांवकर
२५ रामाजी गोसावी पालीकर
२६ मुसळ गोसावी कृष्णातीरकर
२७ मेरु गोसावी कर्नाटकस्थ
 मन्यारगुडी १ सेतु गोसावी
२८ **देवदास गोसावी**
 **दादेगांवकर**
२९ **देवदास गोसावी**
 **चंद्रपूरस्थ**
 १ रघुनाथ गोसावी
 १ अनंत गोसावी
 १ प्रल्हाद गोसावी
 १ रामचंद्र गोसावी
३० रुद्राजी गोसावी शहापुरस्थ
३१ दिनकर गोसावी
 परळीकर उपाध्ये देवाचे
३२ हरिहर गोसावी भालगांवकर
३३ **मल्हार गोसावी सूरजी-**
 **अंजनगांवकर**
३४ अंबिकाबाई जुन्नर प्रांत
३५ अंबाबाई कन्हेरकर
३६ भानजी गोसावी चाफळकर
३७ तुकोबा गोसावी आकोलकर
 १ विश्वनाथ गोसावी

## ( ३ ) शिव छत्रपतींची सनद

वरील यादींत श्री शिवाजी महाराजांचें नांव प्रामुख्यानें आहे. तें किती सयुक्तिक आहे, हें समर्थांच्या व छत्रपतींच्या चरित्रावरून दिसून येईल. राज्याभिषेक शक ५ या वर्षी छत्रपतींनी समर्थांस जी सुप्रसिद्ध सनद करून दिलीं, तींत उल्लेख आहे तो असा.

" मजवर कृपा करुनु सनाथ केले. आज्ञा केली कीं, तुमचा मुख्य धर्म राज्य साधन करुनु धर्मस्थापना देव ब्राह्मणाची सेवा, प्रजेची पीडा हरण करूनु पाळणरक्षण करावें. हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्ही जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पावतील. त्याजवरुनु जो जो उद्योग केला व दुष्ट तुरक लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करुनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐसीं स्थळें दुर्घट करावीं. ऐसें जें जें मनीं धरिलें तें तें स्वामींनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केले. या उपरी राज्य सर्व संपादिलें तें चरणीं अर्पण करुनु, सर्वकाळ सेवा घडावी, ऐसा विचार मनीं आणिला तेव्हां आज्ञा जाहली कीं, तुम्हांस पूर्वी धर्म सांगितले ते च करा? सन्निध सेवा होय. ऐसें आज्ञापिलें. यावरुनु निकटवास घडुनु, वारंवार दर्शन घडावें, श्रीची स्थापना कोठें तरी होऊनु संप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली ××× जेथें जेथें श्रीच्या मूर्तिस्थापना जाहली तेथें उछावपूजा घडावी यास राज्य संपादिलें. त्यांतील ग्रामभूमि कोठें काय नेमावी ते आज्ञा व्हावी. तेव्हां आज्ञा जाहली कीं, विशेष उपाधीचें कारण काय? तथापि तुमचे मनीं श्रीची सेवा घडावी, हा निश्चय जाहला; त्यास यथाअवकाश जेथ जें जें द्यावेसें वाटे तें तें द्यावें. व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसें करीत जावें. याप्रकारें आज्ञा जाहली. या वरुनु देशांतरी सांप्रदाय व श्रीच्या स्थापना जाहल्या त्यास ग्रामभूमीचीं पत्रें करुनु पाठविलीं. श्रीसन्निध चाफळीं वगैरे "

एवढा विस्तृत उतारा देण्याचें कारण त्यामध्यें श्रीसमर्थ आणि छत्रपति यांचा महाराष्ट्रधर्मविषयक किती घनिष्ट आणि दीर्घकालीन संबंध होता आणि त्यांच्या परस्परविषयक भूमिका काय होत्या, त्या असंदिग्ध शब्दांत नमूद केल्या आहेत. याशिवाय ती सनद शिवछत्रपतींनीं स्वतः दिली असल्यामुळें त्याला ऐतिहासिक दृष्टीनेंही पुरावा म्हणून महत्व आहे. (प्रस्तुत उतारा एका मठांत असलेल्या सनदेच्या नकलेवरून घेतला आहे.)

## ( ४ ) समर्थांचे वऱ्हाडांतील शिष्य

वर दिलेल्या सत्पुरुषांच्या यादींत पांच शिष्य वऱ्हाडचे असल्याचें दिसून येतें. समर्थ विद्यमान असतांना च वऱ्हाडांत समर्थांच्या शिष्यांनीं मठ स्थापन

करून समर्थांचें संप्रदायकार्य सुरू केलें होतें. एवढें च नव्हे, तर मठ स्थापन झाल्यानंतरही समर्थांचा संचार होऊन वऱ्हाडांत शिष्यांच्या कार्याचें निरीक्षण होत असावें असें अनुमान करावयास आधार आहे. श्री. शंकररावजी देव यांनीं कारंजा येथील बाळकराम रोकडाराम मठांतील बाळकरामांच्या कवितांचें बाड धुळयास नेलें आहे. त्यांत कारंजा येथील मठस्थापनेनंतर बाळकरामांची आणि समर्थांची बाळापूर येथें किल्लयाजवळ असलेल्या श्री बालाई देवीच्या मंदिरांत भेट झाली असा एका कवितेंत उल्लेख आहे. (विद्यमान मठपतीकडून मिळालेली माहिती).

वऱ्हाडांतील लोकांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला आणि तेथें त्यांच्या हयातींत च मठस्थापना करून त्यांचें संप्रदायकार्य पुढें चालविण्याचा आरंभ झाला, या गोष्टीला एका दृष्टीनें फार महत्व आहे. त्यावेळीं सबंध वऱ्हाड प्रांत मोंगलांच्या राज्यांत मोडत होता. दिल्लीच्या बादशहातर्फे सुभेदार व इतर प्रमुख अधिकारी औरंगाबाद, इलीचपूर आणि बऱ्हाणपूर येथें रहात असून राज्यव्यवस्था संपूर्ण मुसलमान नोकरशाहीच्या हातीं होती. मूर्तिभंजनाचे आणि मंदिरध्वंसनाचें कार्य जोरांत चालू होतें. अशा परिस्थितींत हिंदुधर्मप्रसाराचें आणि धार्मिक एकीकरणाचें कार्य सुरू केलें हें अत्यंत प्रशंसनीय आहे. विशेषतः ज्या मोंगल अमलांतील कारंजा शहरावर शिवाजीच्या सरदारांनीं धाडी घालून यथेच्छ लूट केली, त्या च शहरांत, मोंगलांची सत्ता असतांना, समर्थांचे मठ स्थापण्यांत यावे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे.

## (५) समर्थ सांप्रदायी मठ

आज वऱ्हाडांतून अनेक शहरीं आणि गांवोगांवीं समर्थ संप्रदायाच्या शाखा आणि उपशाखा पसरलेल्या आहेत. बहुतेक ठिकाणीं अशा मठांतून रामनवमी, दासनवमी, हनुमज्जयंति इत्यादि उत्सव होत असून शिवाय दासबोधाचीं पारायणें आणि त्यावर प्रवचनें होत असतात. बऱ्याचशा मठांचें आणि शाखामठांचें इतिहासदृष्ट्या आणि वाङ्मयदृष्ट्या संशोधन व्हावयाचें आहे. आज आपणांस वऱ्हाडांत समर्थशिष्यांनीं स्थापिलेले मठ हाताच्या बोटावर मोजण्याइतके दृष्टीस पडतात ती गोष्ट खरी. तथापि वरील सर्व मठांच्या परंपरेचें संशोधन झाल्यास आणखी बरेच मठ खास समर्थशिष्यांनीं स्थापन केले, असें दृष्टीस येण्याचा संभव आहे. धर्म आणि राजकारण यांच्या बाबतींत वऱ्हाडांतील हिंदु समाज परमावधीचा पराधीन झाला असतांना, वारकरी संप्रदायाप्रमाणें किंबहुना त्याहून हि अधिक, असा हा समर्थांचा संप्रदाय हिंदूंच्या एकीकरणास आणि हिंदुत्वाच्या संरक्षणास प्रभावीपणें कारणीभूत झाला, हें विधान वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं. ज्यांची स्थापना खास समर्थशिष्यांकरवीं झाली असे तीन तरी मठ आपणांस वऱ्हाडांत दाखवितां येतात. ते म्हणजे (१) भोळारामांचा एलीचपुर येथील मठ, (२) मल्हार

गोसावी यांचा सुरजी अंजनगांव येथील मठ, आणि (३) बाळकराम-रोकडारामांचा कारंजा येथील मठ. याशिवाय देवदास वडणेरकर म्हणून एका समर्थ-शिष्याचा उल्लेख एका ग्रंथांत येतो. पण त्याच्या मठाचा अथवा त्याच्या परंपरेचा अद्याप शोध करण्यांत आला नाहीं. वडणेर, ज्याला हल्ली वडणेर बी. बी. अथवा वडणेर स्टेशन म्हणतात, तेथें एक रामदासी मठ आहे. तेथें शोध करणें अवश्य आहे. कारंजामठांतील सांप्रदायिक यादी वर दिली आहे, तींत गोपाळ गोसावी बालाघाटस्थ आणि देवदास गोसावी चंद्रपूरस्थ हीं दोन नांवें आढळतात. त्यांच्या मठांचा आणि परंपरेचा तपास करणें अवश्य आहे. तुकोबा गोसावी आकोलकर म्हणून आणखी एक नांव यादींत आहे. वऱ्हाडांतील अकोला शहरांत हि एक रामदासी मठ आहे. परंतु अकोला नांवाचीं गांवें महाराष्ट्रांत सर्वत्र असल्यामुळें, संशोधनाच्या अथवा तपासाच्या अभावीं, त्यासंबंधीं तर्क म्हणून सुद्धां विधान करणें अप्रयोजक होईल.

## (६) भक्तरहस्यग्रंथ आणि समर्थशिष्य

आतां आपणांस माहिती असलेल्या समर्थशिष्यांसंबंधानें काय कळतें तें पाहूं. अनंतकविकृत "भक्तरहस्य" नांवाचा एक अप्रसिद्ध ओवीबद्ध ग्रंथ यवतमाळ येथील "शारदाश्रम" संस्थेच्या संग्रहांत आहे. तो शक १७१९ (इ. स. १७९७) मध्यें लिहिला आहे. त्यांत २९ व्या अध्यायांत लिहिलें आहे कीं, बाळकराम पुसतकर, भोळाराम अळसपूरकर आणि देवदास वडनेरकर हे तिघे हि एका च वेळीं समर्थांचें शिष्यत्व पत्करावयास गेले होते.

> ऐसे गुरु ते बहुवस। परि सद्गुरु येक रामदासास।
> जावोनि धरावी त्याची कास। भवपारास तो करि ॥ ५९
> ऐसा मनिं केला विच्यार। तो झाला देवदास वडनेरकर।
> भोळाराम आळसपुरकर। बाळकराम थोर तयामाजि ॥ ६०
> तिघे मिळोनि आले परळिस। शरण आले रामदासास।
> म्हणे कैसा तुटे भवपाश। शरण पायास म्हणोनि ॥ ६१

प्रस्तुत अध्यायांत बाळकराम-रोकडाराम यांचें विस्तृत चरित्र आलें असून, बाकी दोघांचा वर आला तेवढा च उल्लेख आहे. उद्धवसुतकृत रामदासचरित्रांत भोळाराम आणि बाळकराम हे दोघे हि बरे च दिवस समर्थांच्या सान्निध्यांत असल्याचें दिसून येतें. भोळाराम यांनीं एलिचपूर येथें मठ स्थापिला. आज ह्या मठांत कोणी अधिपति नाहीं. पण दासमारुतीची मूर्ति असून तेथें पंचकमिटीमार्फत उत्सवादिक

होत असतात. शहराबाहेर दक्षिणेस कोटापाशीं भोळारामाच्या समाधीचें वृंदावन आहे. देवदास वडणेरकर या समर्थशिष्यासंबधानें आज कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. वडणेर येथें रामदासी मठ आहे. त्या दिशेनें शोध व्हावयास पाहिजे.

### (७) कारंजा येथील जनार्दन गोसावी यांचा मठ

वर दिलेल्या सत्पुरुषांच्या यादींत देवदास चंद्रपूरस्थ असें नांव आहे. आणि त्याखालीं रघुनाथ गोसावी, अनंत गोसावी, प्रल्हाद गोसावी आणि रामचंद्र गोसावी अशीं चार नांवें आहेत. ह्यांपैकीं प्रल्हाद आणि रामचंद्र हीं नांवें कारंजा येथील जनार्दन गोसावी यांच्या परंपरेंत आहेत. हा मठ डोमगांवकर कल्याण गोसावी यांच्या परंपरेंतील असल्याचें मठांत विद्यमान असलेली जनार्दन गोसावी यांची पत्नि सांगते. याशिवाय मठांतील संग्रहांत रघोजी भोसले यांनीं श. १६७२ मध्यें डोमगांव आणि गडंढरे या गांवांच्या 'घास दाणीयाची खंडणी माफ असल्याच्या' सनदेची नकल, त्याचप्रमाणें शक १७११ मधील भीमाजी गोसावी मठपति डोमगांव स्थान यास त्रिंबक वगैरे माणकेश्वर सुभेदार सरकार परंडा यांनीं स्वामीस डोमगांव वगैरे ४ गांवांचा सरदेशमुखी व मोकासा वगैरे हक्क दिल्याच्या सनदेची नकल आहे. या शिवाय हा मठ डोमगांव शाखेपैकीं आहे असें म्हणावयास मठांतील कागदपत्रांत पुरावा नाहीं. या मठांतील पुरुषांची वंशावळ येणेंप्रमाणें आहे:

नरसिंहधर (खडीधामणी येथील जोशी आणि धर्माधिकारी)
- गोविंदभट
  - पुरुषोत्तम
    - मुकुंद
      - रघुनाथ
      - विश्वनाथ
        - नारायण
        - राजाराम
        - रामकृष्ण (माधव गोस्वामी यास दत्तक)
- दामोदरभट
  - लक्ष्मणभट
    - प्रल्हाद गोसावी
      - रामचंद्र गोसावी
        - जयराम
        - माधव गोसावी
          - रामकृष्ण गोसावी (दत्तक)
            - रामचंद्र
            - नारायण (उज्जनकर नारायणस्वामी म्हणून प्रसिद्ध असून हे श्रीवासुदेवानंद सरस्वति यांचे गुरु होत.)
            - लक्ष्मण
              - जनार्दन (यांची विधवा स्त्री विद्यमान)

या वंशावळींतील प्रल्हाद गोसावी हा च समर्थसंप्रदायांत आला. शक १६३८ मध्यें प्रल्हाद रामदासी यानें लिहिलेली भावार्थ रामायणाची प्रत मठांत आहे, तींत प्रल्हाद गोसावी याचें वास्तव्य खडीधामणी येथें असल्याचें लिहिलें आहे. त्याच सुमारास प्रल्हाद गोसावी यांनीं कारंजा येथें मठ स्थापिला असावा. कारण फ. स. ११२४ (शक १६३६) ची प्रल्हाद गोसावी यास महमदशहा बादशहा याचे अमलांत दिलेली व राव मानसिंग यांचा शिक्का असलेली सनद मठांत आहे. तसेंच वाशीम येथील प्रसिद्ध नबाब हशमतजंग बहादुर यांनीं प्रल्हाद गोसावी यांचे पुत्र रामचंद्र बावा रामदासी यांना फ. स. ११८५ मध्यें दिलेली एक सनद आहे. इ. स. १८५८ मध्यें इनाम कमिशनसमोर रामचंद्र बावाचे नातु व माधव गोसावी यांचे पुत्र रामकृष्ण गोसावी यांनीं इनामासंबंधीं अर्ज दिला आहे. हे रामकृष्ण गोसावी ता. १४-११-१८८७ रोजीं मयत झाले. रामदास रामदासी वर्ष ४ अंक ४६ (शक १८४०) या अंकांत प्रस्तुत मठाची वंशावळ दिली आहे. तींत फरक असलेला दिसून येईल. प्रस्तुत वंशावळ मठांतील जुन्या कागदपत्रावरून तयार केली आहे. प्रल्हाद गोसावी यास समर्थांचा उपदेश होता, असें एका जुन्या टिपणांत दाखविलें आहे. समर्थ समाधीचा काळ शक १६०३ असून ज्या अर्थीं शक १६३८ मध्यें प्रल्हाद गोसाव्यांनीं लिहिलेली एक पोथी आहे त्यावरून समर्थांच्या काळीं प्रल्हाद गोसाव्यांचें अस्तित्व आणि समर्थांचा अनुग्रह त्यांनीं घेणें अगदींच असंभवनीय नाहीं.

हशमतजंग बहादुर यांची रामचंद्र बावा यास सनद आहे, या नबाबाच्या कारकीर्दींत च वाशीम येथें बालाजीची मूर्ति जमिनींत सांपडली व त्याकरितां प्रसिद्ध भोसल्यांचे सरदार भवानी काळू यांनीं प्रचंड मंदिर बांधलें. या मंदिरास वरील नबाबांनीं व नागपुरकर भोसल्यांनीं इनाम दिल्याचा उल्लेख बालाजीच्या मंदिरासमोर असलेल्या शिलालेखामध्यें आहे. भवानी काळू आणि कारंजा मठाचे अधिपति रामचंद्र बावा हे दोघे हि मूळचे खडीधामणी या गांवचे वतनदार असल्यामुळें भवानी काळू यांच्यामार्फत च या गोसावीबुवास वरील नबाबाकडून आणि जानोजी भोसल्याकडून सनदा मिळाल्या आहेत. प्रस्तुत मठांत रामपंचायतन मूर्ति आणि समर्थांची हातानें काढलेली जुनी तसबीर आहे. मठाधिपति कोणी च नसून मठांत फक्त एक बाईच आहे. मठांत महत्त्वाचा लिखित ग्रंथसंग्रह व्यवस्थित ठेवला असून रामनवमी उत्सव, दासबोधाचीं पारायणें इत्यादि अद्यापहि होत असतात. बरेच ग्रंथ धुळ्यास श्री. शंकररावजी देव यांच्याकडे गेले आहेत.

## (८) बाळकराम रोकडाराम–मठ कारंजा

कारंजा येथें बाळकरामाचा आणि रोकडारामाचा जो दुसरा एक मठ आहे त्याची परंपरा अबाधित आहे. या उभयतांची हकिकत भक्तरहस्य ग्रंथांत २९ व्या

अध्यायांत समग्र आली आहे. मठांत हि परंपरेसंबंधानें कागदपत्र आहेत. बाळकराम मूळचे सिंदखेड ( माहूर प्रांत ) येथील. वडिलांचें नांव केशोबावा, मातेचें नांव गोदाई, माध्यंदिनीय ब्राह्मण. बाळकरामाची पत्नि साळुबाई. लग्नानंतर बाळकराम, देवदास व भोळाराम या त्रिवर्गांनीं परळीस जाऊन समर्थांचा अनुग्रह घेतला. अनंत कवि बाळकरामासंबंधानें म्हणतात :

ऐसा अनुभव बाळकरामासी । तेची शब्द येती मुखासी ।
कांहीं केले मग काव्यासी । अनुभव सुखासी आपुला ॥ ७१

तेची सुख आनोनी ध्यानी । उभा राहतसे कीर्तनीं ।
नीराभिमान निर्लोभ मनीं । नाचे कीर्तनीं भक्ताचे ॥ ७२

ऐसी भावभक्ती आंगीं जडली । तो पुढें रामनौमी आली ।
देवप्रतिष्ठा ब्राह्मणपुजा केली । संवृधी ( ? ) पुजीली भक्तीनें ॥ ७४

प्रतिदिनीं जेवीति ब्राह्मण । आपण करावे उपोषण ।
यावरी करावें कीर्तन । करावे पुराण दासबोध ॥ ७५

तो ळळीत करीता दशमीस । बाळलीला वर्णी विशेष ।
तो येउनी उभा अयोध्याधीश । रूप सगुणास देखिले ॥ ७६

नंतर आई दत्त यांची यात्रा करून ( माहूर येथील रेणुका देवी आणि श्री दत्तात्रय ) पुसदला आले. तेथें मठ बांधून शिष्यसमुदाय वाढविला. पुसद येथें उत्तरेच्या बाजूस पुस नदीतीरीं रोकडा या नांवाचा मारुती आहे. त्याचे प्रसादानें बाळकरामास पुत्र झाला, म्हणून त्याचें नांव रोकडाराम ठेविलें. पुसदहून बाळकराम व पुत्र रोकडाराम हे कारंजा येथें आले व त्या ठिकाणीं त्यांनीं बेंब्रळपाटीवर मारुतीची थापना केली व गांवांत मठ स्थापिला. त्या मठांत च हल्लीं रोकडारामांची समाधि व सांप्रदायिक राममूर्ति असून मठाचे विद्यमान अधिपतिही तेथेंच राहतात. कारंजास आल्यावर रोकडारामाचें लग्न द्वारकाबाईशीं झालें. तिला मूल होईना म्हणून राधाबाई नांवाची दुसरी पत्नी केली. त्यांना बापु गोसावी म्हणून पुत्र झाला. रोकडारामाने आपले वडिलांचा म्हणजे बाळकरामांचाच उपदेश घेतला. रोकडारामासंबंधानें अनंत कवि म्हणतात :

पीतयासंगे वाजवी टाळ । तापें करीत गदारोळ ।
रागरागिणी जाणोनि वेळ । कवित्व रसाळ म्हणावे ॥ १०८

कांहीं कीर्तन विद्या अभ्यास । भागवतीं मन रात्रंदिवस ।
बरे शोधिले दासबोधास । परी गर्भास ( मर्मास ) न कळेची ॥ १४

गुरुचा अनुग्रह झाल्यावर

सद्गुरुकृपा ते चि ऐसी । तात्काळ फळली रोकडारामासी ।
काव्यें केली कृपासरिसी । अनुभव तैसीं बोलणीं ॥ १२८
कीर्तनीं उभे ठाकावे । सगुण प्रताप वर्णावे ।
स्वरूपाचे अनुभव घ्यावे । सहज पाहावे मुद्रेसी ॥ १२९
समसमान दृष्टी पहाणे । अनुभव रोकडा चि बोलणें ।
जगासी तात्काळ बाणे खुण । ठसा पूर्ण भावभक्ती ॥ १३०
म्हणोनिया नांव रोकडा । बोल बोलावा चोखडा ।
उधार नोहेचि तो रोकडा । भक्ती जोडा यासी नसे ॥ ३१
या रीती करीती कीर्तना । भक्ती लावावे बहुत जन ।
शिष्य केले वर्णावर्ण । बाळक स्त्रीया कारण उपदेशीले ॥ १३२

या मठांत बाळकराम व रोकडाराम यांच्या कवितांचीं बाडें असून मठाच्या संग्रहांत रोकडारामानें स्वतः लिहिलेली दासबोधाची प्रत आहे. तसेंच श्रीधर कवीनें लिहिलेलें ओवीबद्ध मच्छिंद्रपुराणही या मठांत आहे. या ग्रंथाची प्रत अद्याप दुसरीकडे कोठें आढळत नाहीं. या मठांतही सर्व सांप्रदायिक उत्सव, रामायण दासबोध इत्यादि सांप्रदायिक ग्रंथांचीं पारायणें व पुराणें होत असतात.

मठाची परंपरा याप्रमाणें आहे. केशोबावा – बाळकराम (समर्थांचा अनुग्रह) – रोकडाराम – बापुसाहेब ऊर्फ बापु गोसावी – सखाराम गोसावी – लक्ष्मण गोसावी – मारुती गोसावी. मारुती बुआस पुत्र दोन, रामभाऊ आणि गणपति बुआ. दोघे ही विद्यमान असून गणपति बुआ हे सांप्रदायिक पुराणकीर्तन करीत असतात. मठस्थापनेनंतर बाळकरामाची आणि समर्थांची गांठ बाळापूर येथें बाळाई देवीच्या मंदिरांत पडली होती, हें वर आलेंच आहे.

## (९) मल्हार गोसावी — सुरजी अंजनगांव

वर उद्‌धृत केलेल्या समर्थसांप्रदायी सत्पुरुषमालिकेंत मल्हार गोसावी सुरजी अंजनगांवकर हें नांव आहे. यांच्या संबंधानें माहिती, त्यांचा नातु उद्धवसुत यानें लिहिलेल्या ओवीबद्ध रामदासचरित्र या ग्रंथांत विस्तृतपणें आली आहे. या चरित्राच्या हस्तलिखित प्रती भोळारामाच्या मठांत एलीचपुर येथें, जनार्दन गोसावी यांच्या मठांत कारंजा येथें आणि खुद्द कवीच्या वंशजाकडे सुरजी अंजनगांव येथें आहेत. याशिवाय प्रस्तुत चरित्र, सुमारें ४०।४५ वर्षांपूर्वी, मुंबई येथें प्रकाशित

झालें असून त्याची एक जीर्ण प्रत प्रस्तुत लेख लिहीत असतांना आमच्यासमोर होती. रामदासस्वामींचा माधवदासास माहुलीसंगमीं अनुग्रह झाला. नगर येथें माधवदासाचा केशवस्वामीस उपदेश झाला. आणि केशवस्वामी प्रथम हातगांव ( मोगलाईंत ) येथें आणि नंतर व्याहामांडव येथें गृहस्थाश्रमी होऊन राहिले. तेथें च उद्धवसुत यांना अनुग्रह झाला. प्रत्येक अध्यायाचे आदिअंतीं आपला गुरु केशवस्वामी यांची स्तुति केली आहे. माधवदास आणि केशवस्वामी यांचीं चरित्रें उद्धवसुतानें आपल्या ग्रंथांत ५० व्या अध्यायांत वर्णिलीं आहेत. त्याचप्रमाणें उद्धवसुतानें मल्हार गोसावी याचें चरित्र आणि आपली वंशविषयक माहिती रामदास चरित्राच्या ५१ व्या म्हणजे शेवटच्या अध्यायांत दिली आहे. त्यावरून खालील वंशवृक्ष होतो.

त्र्यंबकपंत—मल्हार गोसावी—उद्धव गोसावी—लक्ष्मण ( उद्धवसुत )

त्र्यंबकपंत ( गोत्र अगस्ति ) हे वऱ्हाडांत सुरजी अंजनगांव आहे, तेथचे राहणारे, दैवत मल्हारि आणि तुळजापुरची देवी. याला एक पुत्र झाला, त्याचें नांव मल्हारी. त्याचें लग्न झाल्यावर त्याच्या अंगीं वैराग्य बाणलें. त्यानें प्रपंच सोडून यात्रेनिमित्तानें घर सोडलें. घोडेगांवीं कुलदेवतेचें दर्शन घेतलें, तेथून भीमातीरीं पेडगांवीं गेला,

तों रामदासस्वामींचा । प्रताप फाकला वैराग्याचा ।
तेथें किती शिष्यांचा । मेळा आला भिक्षेसी ॥ १७

त्यांचा समागम धरून । आला सज्जनगडालागुन ।
घेतलें समर्थाचें दर्शन । करी नमन सद्भावें ॥ १८

याप्रमाणें समर्थदर्शन झाल्यावर कित्येक दिवस त्यांच्या सेवेंत घालविले. इकडे मल्हारीचे आईबाप, त्याच्या तरुण पत्नीस बरोबर घेऊन, घोडेगांव, पेडगांव मार्गानें शोध करीत सज्जनगडास आले. समर्थांजवळ त्यांनीं सर्व हकिकत सांगितली. मला कोणी नाहीं, असें खोटें च मल्हारीनें समर्थास सांगितलें होतें; त्याबद्दल त्याची बरीच कानउघाडी केली. घरीं जाऊन संसार कर आणि पुत्र झाल्यावर परत ये, असें सांगून त्याला परत पाठविलें. त्यावेळीं मल्हारीचें वय २५ वर्षांचें होतें. घरीं सुरजी अंजनगांवास गेल्यावर संसार केला, व एक पुत्र उद्धव नांवाचा झाला. नंतर परत समर्थांकडे जाण्याची त्यानें तयारी केली, इतक्यांत समर्थ समाधिस्त झाल्याची वार्ता त्याच्या कानीं पडली. या वार्तेमुळें त्याला विषाद उत्पन्न झाला. आधींच संसारांतून मन निघालें होतें, तेव्हां मल्हारी यानें काशीवास स्वीकारला. तेथें श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि हनुमंत यांच्या मूर्ति ओतिल्या, आणि रामनवमी उत्साह आणि समर्थांची

पुण्यतिथि तेथें करूं लागला. पुढें या मूर्ति त्यानें अंजनगांवास पाठवून दिल्या व आपण संन्यास स्वीकारला. इकडे उद्धवांचें मौंजीबंधन विवाह वगैरे झाले. मूर्ति आल्यावर मूर्तींची स्थापना करून संप्रदायाप्रमाणें रामनवमी वगैरे उत्साह सुरु झाले. उद्धव हा व्यवहारानिमित्त वऱ्हाडांतून शहरास औरंगाबादेस गेला, तेव्हां व्याहामांडव्यास केशवस्वामी ( समर्थसांप्रदायी ) यांची गांठ पडली व त्यांचा त्यानें अनुग्रह घेतला.

## (१०) उद्धवसुतकृत रामदासचरित्र

या उद्धवास लक्ष्मण नांवाचा मुलगा असल्याचें रामदासचरित्र ग्रंथावरून दिसतें.

शरणागत सद्गुरूचा । अंकित केशवस्वामीचा ।
बाळक उद्धवराजाचा बोलेल । तें परिसावें ।। ३९–१३०

त्याचप्रमाणें

अभंगीं घालोनि माझें नांव । करील ग्रंथगौरव ।
म्हणे लक्ष्मणउद्धव । लडिवाळपणें ।। १०–४८

बाकीच्या सर्व अध्यायांत कवीनें केशवस्वामीचा उल्लेख करून स्वतःस उद्धवसुत हें नांव दिलें आहे. ग्रंथ सुरवात करण्यापूर्वी जें नमन आहे त्यांत

श्री मार्तंड प्रसन्न ।। श्री माधवदास समर्थ ।। श्री केशव स्वामि समर्थ ।। श्री उद्धवराज.

याप्रमाणें आदरार्थी नांवें आलीं आहेत. यावरून उद्धवसुत हा स्वतः उद्धव नसून त्याचा पुत्र लक्ष्मण होय असें निश्चित वाटतें. ५१ व्या अध्यायांत मल्हारीसंबंधानें बोलतांना

ऐसें कित्येक दिवसावरी । मूर्ती पाठविल्यावरी ।
आपण संन्यास ग्रहण करी । पितामह तो आमुचा ।। ९१

असें स्पष्ट म्हटलें आहे. उद्धव तो च उद्धवसुत अशी शंका घ्यावयास रामदासचरित्रांत च दोन स्थळें आहेत. एकतर ५० व्या अध्यायांत व्याहामांडव्यास केशवस्वामींनीं मला उपदेश केला असें म्हटलें आहे.

मग तेथोनिया निघाले । व्याहामांडव्यासी राहिले ।
मज दीनासी उपदेशिले । तये ठायीं जाणिजे ।। ७७

ऐसा सद्गुरु केशवराज । उपदेश केला मज़ सहज ।
अज्ञानपणीं निजगुज । सांगितलें कर्णपुटीं ॥ ७८

त्याचप्रमाणें

माझिये पित्याचा पिता । त्र्यंबकपंत परमात्मा ।
भक्ती करीतसे तत्वता । मल्हारी मार्तंडावरी ॥ ९१-५

त्यासी येक चि पुत्र जाहला । तो मल्हारी नामाथिला ।
दिवसेंदिवस वाढूं लागला । मातापितयांसी आनंद ॥ ६

यावरून मल्हारी हा ग्रंथकर्त्यांचा बाप असावा असें वाटतें. परंतु यापूर्वी दिलेलीं प्रमाणें सबळ आहेत. "माझिये पित्याचा पिता" या जागीं "माझिये पित्याचा पितामह" असावयास पाहिजे होतें. आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती ही कीं, उद्धवाला हि व्याहामांडवा येथें केशवस्वामीचा अनुग्रह झाला होता असें ५१ व्या अध्यायांतील ५६ ते ६० या ओंव्यावरून दिसतें. मल्हारी गोसाव्यांचा मठ स्वतंत्रपणें नाहीं, परंतु सुरजी अंजनगांव येथें त्यांचे वंशज असून काशीहून आणलेल्या मूर्ती त्यांच्या घरीं आहेत, आणि अद्याप हि त्यांच्याकडे रामनवमी इत्यादि उत्सव सुरू आहेत अशी माहिती लागली. सुरजी अंजनगांव हें प्रसिद्ध देवनाथ महाराजांचें जन्मस्थान असून तेथें त्यांचा मठ आहे व त्यांची शिष्यपरंपरा सुरू आहे. मल्हारी गोसावी यांची वंशपरंपरा विद्यमान वंशजापर्यंत मिळणें शक्य आहे.

उद्धवसुत यांनीं केलेल्या रामदासचरित्रांत कर्तृत्वाचा शक दिला नाहीं. तथापि या ग्रंथाची शक १७०१ मध्यें लिहिलेली प्रत कारंजा येथील जनार्दन गोसावी यांच्या मठांत आहे. त्यावरून या ग्रंथाची अंतिम मर्यादा निश्चित आहे. तथापि मल्हारी गोसावी समर्थांजवळून गेला, तेव्हां त्याचें वय २५ वर्षांचें होतें व तेथून लवकर च उद्धवाचा जन्म झाला. त्या च सुमारास समर्थांचा काल झाला अशी वार्ता आली. समर्थांच्या समाधीचा शक १६०३ आहे. ग्रंथ उद्धवाचा असो अथवा त्याचा मुलगा लक्ष्मण ऊर्फ उद्धवसुत याचा असो, तो समर्थसमाधीनंतर ४०।५० वर्षांच्या आंत च तयार होणें संभवनीय आहे.

## (११) समर्थसंप्रदायाचें विस्तृत संशोधनक्षेत्र

वर दिलेल्या सत्पुरुषमालिकेंत देवदास चंद्रपूरस्थ आणि भक्तरहस्यांत नमूद असलेला देवदास वडणेरकर हे एक च कीं भिन्न हा हि प्रश्न संशोधनाभावीं आज तरी अनिर्णीत च आहे. या सर्व शंकास्थानांवरून एक गोष्ट स्पष्ट आहे ती ही कीं,

वऱ्हाडांत समर्थसंप्रदायासबंधानें संशोधनाकरितां बरें च मोठें क्षेत्र खुलें आहे. त्याकडे वऱ्हाडांतील तरुण, उत्साही आणि विद्याव्यासंगी गृहस्थांचें लक्ष वेधावें अशी आमची इच्छा आहे.

## (१२) उपसंहार

वरील विवेचनावरून ही गोष्ट निश्चित दिसून येते कीं, समर्थांच्या कार्यक्षेत्रांतून वऱ्हाड वगळला गेला नव्हता. वऱ्हाडांत त्यावेळीं दिल्लीच्या मोगलांचें राज्य होतें, तरी समर्थ विद्यमान असतांना च वऱ्हाडच्या निरनिराळया भागांत समर्थशिष्यांनीं समर्थसंप्रदायाचे मठ स्थापन केले होते, आणि रामनवमी, हनुमज्जयंति इत्यादि उत्सव, रामायण, दासबोध इत्यादि ग्रंथांचीं पारायणें आणि पुराणांच्या रुपानें त्या ग्रंथांतील उपदेश हिंदुजनतेंत प्रसार पावत होता आणि विपरीत परिस्थितींत सुद्धां धार्मिक संघटणाचें कार्य अव्याहत सुरू होतें. समर्थकालीन मठांची परंपरा विद्यमान कालापर्यंत अबाधित सुरू आहे. या मठांमधून अनेक अधिकारी पुरुष निर्माण होऊन त्यांनीं या क्षेत्रांत कार्य केलें आहे. राम, हनुमंत इत्यादि राष्ट्रदेवतांची उपासना आणि त्यांचें गुणगान यांची प्रथा वऱ्हाडांत किती बद्धमूल झाली आहे आणि त्यांचें सर्व श्रेय समर्थसंप्रदायानें वऱ्हाडांत जी कामगिरी केली त्याला च आहे, हें आज वऱ्हाडांत अनेक शहरीं आणि गांवीं असलेले समर्थमठ आणि जागजागीं असलेलीं श्रीरामाचीं आणि हनुमंतांचीं मंदिरें व तेथें असलेलीं कार्यें यावरून स्पष्ट दिसून येतें.

समर्थसंप्रदाय आणि त्याचें वऱ्हाडांतील कार्य यासंबंधीं अभ्यास करावयास केवढें मोठें क्षेत्र आहे, याची जाणीव उत्साही तरुणांस झाली तर या लेखानें बरेंच कार्य झालें, असें होईल. इति शम्।

# समर्थांचें व्यक्तिवैशिष्ट्य दर्शविणारे शब्दप्रयोग

( लेखक—रा. **श्रीधर सखाराम पंडित**, शिवाजीनगर, **पुणें** )

ब्रह्मांडरचनेहून जाड। कवि प्रबंद रचना ॥ १-७-३३

श्रीसमर्थांचें व्यक्तिवैशिष्ट्य शब्दाशब्दागणिक प्रतीत होत आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दांत व्यक्त होणारा आवेश, भक्ति, उत्कटता, अर्थगांभीर्य यांचें अनुकरण करूं म्हटल्यानें हि होणें शक्य नाहीं.

रघुनाथभजनें ज्ञान जालें। रघुनाथभजनें महत्त्व वाढलें। ६-७-३१

असें त्यांचें होतें. तेव्हां त्यांची बरोबरी इतरांनीं काय करावी !

तीन साडेतीन शतकांपूर्वी त्यांनीं योजलेले कांहीं शब्द आज प्रचारांतून लुप्त झाले आहेत; जसें आलस्य, अनेत्र, अंतुरी, पानेडी = पाण्यांत.

कांहींचे अर्थ बदलले आहेत; जसें: इति = यति, शोक = आनंद, गार = खळगी.

कांहीं शब्दांचे अर्थ फार मननानें आणि पूर्वापर संबंध पाहून इषत् इषत् लक्षांत येतात; जसे: "पदत्रासकर्ते" ( १-७-१७ ). पद + त्र + कर्ते = तीन पदें = शब्दार्थ, वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, किंवा तत् + त्वं + असि = 'तत्वमसि'चा स्पष्टार्थ करणारे असा ही अर्थ होऊं शकेल.

कांहीं नामार्थी शब्दांचीं क्रियापदें बनविलीं आहेत; जसें: नमस्कारावे—नमस्कारीत; चुकावेना; देव त्रैलोक्य तर्तवी = तारतो ( स्फु. प्र. ५ - ११ ).

श्रींची ग्रंथरचना आधुनिक व्याकरणास तंतोतंत जुळणार नाहीं. कारण त्यांची ओघवती रसवंती दुथडी भरून धों धों शब्द करीत वाहूं लागल्यावर मुख्य विषय च गांठण्याचें तिचें अनुसंधान राहतें. तिला इकडे तिकडे बघण्यास सवडच नसते किंवा तशी दिली जात नाहीं. शब्द काय किंवा शब्दप्रयोग काय, भावार्थ उत्कटत्वानें दाखवीत असले म्हणजे झालें. श्रींची वाणी वीर, करुणा, हास्य, रौद्र, बीभत्सादि रसांस सारखी च पोषक राहते, हा तिचा विशेष होय. कोणता हि प्रसंग वाचकांपुढें चलत् चित्रपटाप्रमाणें निर्माण करून त्या पटाच्या च शीघ्र गतीनें ती पुढें पुढें सरत असते. रामायणाचीं दोन्हीं कांडें वीररसानें रसरसलीं च आहेत.

रिपू झोडिले पाडिले वृक्षघातें। भुमीं लोळती दैत्य होऊनि प्रेतें। सुं.६४
बळें हाणतां भंगलें सर्व कांहीं। कदा टाकिल्या घेतले शूळ तेहीं।
रणीं भीडतां शूळ ते चूर्ण जाले। महांवीर ते मल्लयुध्यासि आले॥ यु. ८-४३

करुणाष्टकांत करुण रसाचा पूर्ण परिपाक पहावयास मिळतो.

जडली उपाधी अभिमान साधी। विवेक नाहीं बहुसाल बाधी।
स्वामीवियोगें पळ ही गमेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ६७-७
सगद्गदें बोलतसे सुशब्दें। श्रवताति नीरें नयनारविंदें।
पुसोनिया राघव वास पाहे। कै मागुता देखेन यासि माये॥ ८

हास्य —

अपूर्व जालें न्हवतां निमीशा जळोन गेल्या अवघ्या च मीशा।
उरलीं खरांटें जैश्या समीशा। विद्रप जाला वदनीं अमीशा॥ ९

बीभत्स —

बरा धर्म माझा बरा मूत्र माझा। बरा पू बरा वाहतो कान माझा। ७१

अद्भुत —

सीताचातक ते वनीं दमतळीं अत्यंतसी तापली।
मेघशाम तुशार वक्र (क) मळीं घ्यावा असे श्रांतली।
तो सूर्सीतळ वायुजें हि जवळी वार्ता असे आणिली।
माते चाल तुझी स्वभेटि सोहळी रामें असें वांछिली॥ २४७-१

रौद्र —

रजनिचर विभांडी दोंकरें पोट फाडी।
गडगडीत गडाडी आंतडी सर्व काढी। १४९

वात्सल्य —

सपक्षिकूळासह कोकिळा हो। सीते सुशब्दीं तुम्हीं रंजवा हो।
हे धाकुटी योगिणी कुंजवासी। तुम्हीं च तेथें सखिया तयेसी॥ ६९

वरील रसांच्या वेंच्यांत वैशिष्ट्य हें च कीं, सदैव रामरुपीं रंगलेले आणि विश्वाचा प्रपंच करणारे समर्थ असून हि, कविता—प्रपंच करण्यांत चुकले नाहींत. धीट, पाठ, प्रासादिक, हे जे काव्याचे तीन वर्ग त्यांनीं पाडले त्यांतील उच्च वर्गांत च त्यांचें लीलेनें केलेलें काव्य केव्हां हि जमा होत आहे.

दुसरा विशेष असा कीं, गंभीर विषय चालू असतां मध्यें च त्यांत विनोद करणें. उदाहरणार्थ, ३-९-१५ त समर्थ म्हणतात:

मृत्य न म्हणे परनारी । राजकन्या ॥

अर्थ असा कीं, मृत्यूला परस्त्रीकडे सुद्धां दृष्टि टाकणें अनुचित वाटत नाहीं. काय हें त्याचें धार्ष्ट्य ! या च समासांत ओव्या ७ ते ४० मध्यें मृत्यूच्या कर्तृत्वावर भर देतात, तर ओव्या ४६ ते ५८ मृत्युपंथानें जाणारांच्या कृतीवर भर देतात. समासाचा शेवट विरोधाभासानें होतो.

असो ऐसे सकळही गेले । परंतु येकचि राहिले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥

या समासांत प्राचीन व प्रचलित शब्दांचीं रूपें कशी दिसतात, तें पहा—

येक, यक=एक, (पैकीं यक हा फार्सी शब्द होय). जाले=झाले, ऐसे=असे

दशक १८ समास ९ हा निद्राविलासाचा असून त्याच्या अंतीं

ज्ञाता तत्वें सांडून पळाला । तुर्ये पैलीकडे गेला ।

असें सांगून समर्थांनीं अध्यात्मांत सुरकुंडी मारली आहे, आणि जाग्रति, स्वप्न, सुषुप्ती व तूर्या अवस्थांना निद्रा च ठरविल्या आहेत.

कै. लोकमान्यांनीं श्रीसमर्थांचें वैशिष्ट्य "उत्कट भक्ती आणि आमरणांत ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्म" असें आपल्या गीतारहस्याच्या पृष्ठें ४३४–३५ वर दाखविलें आहे. हा च ठसा समर्थांच्या सर्व वाङ्मयावर उठून दिसणें अपरिहार्य आहे.

उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट च्यातुर्य उत्कट भजन ।
उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं ॥ १९-६-२२

यांत त्यांचें च चरित्र प्रतिबिंबित होत आहे. उत्कट=कमालीचें, कडेलोट, प्रकर्षानें बेहद्द. अल्पवयांत लग्नमंडपांतून निघून जाणें, एक तप पुरश्चरण करणें आणि तितका च काळ तीर्थयात्रेंत घालविणें या गोष्टी मनाची उत्कटता च दर्शवीत नाहींत काय?

लोकमान्यांच्या अभिप्रायाखेरीज स्वतः श्रींच्या ग्रंथांत त्यांच्या वैशिष्ट्याबद्दल काय शब्दपुरावे मिळतात ते पाहूं. वर म्हटलें च आहे कीं, त्यांचें एकंदर लेखन अतुलनीय आहे. हें च त्यांचें वैशिष्ट्य होय. श्रीज्ञानेश्वरीबद्दल जसें म्हटलें जातें कीं

ज्ञानेश्वरीचे पाठीं । जो कोणी करील मराठी ।
तेणें सुवर्णाचे ताटीं । नरोटी ठेविली ॥

तसें च वर्णन श्रीसमर्थवाङ्मयाबद्दल केल्यास प्रत्यवाय येणार नाहीं. उदाहरणार्थ, १–२–१४ पहा.

रत्नखचित मुगुट झळाळ । नाना सुरंग फांकती कीळ ।
विलेपनें साहित्यभाळ । प्रकाशलें तेणें ॥

असा अत्यंत समर्पक मूळ पाठ असतां त्यांत कोणी

कुंडलें तळपती नीळ । वरी जडिले झमकती ॥

असा नीरस शोध घातला आहे. शालजोडीस कांबळ्याचें ठिगळ तें यास च म्हणतात. श्रीयुत गुरुवर्य नानासाहेब देवांचे वाचकांवर महदुपकार आहेत कीं, त्यांनीं ग्रंथ जशाचा तसा, त्यांतील फेरबदलासह, प्रसिद्ध केला आहे. तथापि हा पाठभेद दासबोधाच्या गुटका आकारांत (१८४४ च्या) किंवा अन्य प्रतींत देणें शक्य झालें नाहीं तेथें त्यांच्या वाचकांची दिशाभूल होणें सहज च आहे. अस्तु.

ग्रंथराज दासबोधांत ११-१०, १५-२, ११-६ इत्यादि स्थळीं श्रींचें चरित्र स्वलिखित दिसून येतें. ग्रंथांत १-१० मध्यें सुद्धां वर्णिलेल्या कांहीं चमत्कारांचें साम्य त्यांच्या च चरित्रांतील घटनेशीं फार जुळतें. "येक फिरती तीर्थाटणें।", "येकीं परम वीतरागें। गिरीकंदरें सेविलीं॥, "येक अखंड नामस्मरणें। निष्ठावंत राहिले॥", "येक बैसले असतांचि भ्रमती। नाना स्थानीं समुद्रीं॥" शके १५७७ त परळीहून जांबेस जाऊन मातुश्रीचें अंतकाळीं दर्शन घेणें; एका वणिकाचें जहाज बुडत असतां वांचविणें. "येक प्रेतें उठविती" शके १५४५ त दशकपंचक गांवच्या कुळकर्ण्याचें शव उठविलें. श्रींचा प्रघात स्वतःविषयीं बोलत असतांहि "कोणी येके पुसिलें। कोणी येकें उत्तर दिलें।" असें म्हणण्याचा होता, असें दासबोधांतील कांहीं उल्लेखांवरून दिसतें. तेव्हां वर नमूद केलेले प्रकार जरी निरनिराळ्या व्यक्तींचे वाटले, तथापि ते त्यांच्याबद्दलचे हि होऊं शकतील असें म्हणण्यास हरकत नाहीं.

द. ११ स. १० हा संपूर्ण समास आत्मचरित्रपर च होय.

हें प्रचीतीचें बोलिले। आधीं केलें मग सांगितलें।
पाहिजे तरी घेतलें। कोणी येकें॥ २४

निदान या ठिकाणीं ते स्पष्ट च म्हणत आहेत कीं, असलें निस्पृह वर्तन आपण स्वतः अगोदर केलें, आणि मग च त्याचा उपदेश करीत आहोंत. या च प्रमाणें निस्पृहाच्या व्यापलक्षणांत

ऐसे कीर्ती करून जावें। तरी च संसारास यावें।
दास म्हणे हें स्वभावें। संकेतें बोलिलें॥ १५-२-३०

वैशिष्ट्य हें च कीं,

वाणी तैशी करणी ज्याची श्रद्धा तयावरी जडते ।

विचार, उच्चार आणि आचार यांत मेळ हें च थोरांचें लक्षण होय.

महाराष्ट्र देशांत धर्मग्लानि होऊन मुत्सद्दी लोक राजकारणांत गुंतले होते, त्यांना जेवायला सुद्धां फुरसत नव्हती, व्यापार उदीम करणारे पोटाच्या धंद्यांत चूर होते, स्मार्तवैष्णवादिपंथीय आपापलें वर्चस्व प्रस्थापण्याकडे लक्ष देत होते, असल्या गलबल्यांत च कोणी एकानें "अव्हाट चि केली वाट । सामर्थ्य बळें ॥" त्याची "भूमंडळीं सत्ता चाले । गुप्त रूपें ॥" तो "जेथें तेथें प्रत्यये बाणे । प्राणिमात्रासी ॥" हा कोणी एक म्हणजे समर्थ च नव्हेत काय? या समासांत दुर्लभ, अंतराय, तीक्ष्णबद्दल तिक्षण, अव्हाट, उदंड, मत्छर ( मत्सर ), खनाळ ( दुर्गमस्थान ), कैवाड ( कैवार ) इत्यादि तत्कालीन शब्द आले आहेत. 'बहुत' या हिंदी शब्दांबद्दल 'उदंड' प्रचारांत आणणें इष्ट होय.

आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मगावे शिष्यासी ।

हे उद्गार हल्लीच्या गुरुबाजीस चटावलेल्या गुरूंच्या तोंडून निघते, तर समाजाचा अधःपात खास होता ना!

आपणा मागें जगदीशासी । भजत जावें ॥ १२-१०-३४

ही च सद्गुरूची इच्छा असते. शिव छत्रपतींसारखे राज्य झोळींत टाकणारे शिष्य असूनही ज्यांनीं स्वमठाप्रीत्यर्थ कित्येक मास सेवा घेतली नाहीं ते समर्थ एकमेव निस्पृह होत.

भाषेचें वैशिष्ट्य:—मगावे ( मागावे ), तरतेन ( तरल्यानें ), नेदावे ( न द्यावें ), मृद ( मृदु ), क्षमावे ( क्षमावें ), आलस्य ( आळस ), सदालस्य, अनालस्य, निरालस्य इत्यादि शब्द केले आहेत. वोळेसा=वळेल असा. 'तरतेन' प्रमाणें च "तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें।" अशीं अनेक स्थळें आहेत.

श्रींची निरिच्छता हा गुण १२-१०-३४ मध्यें व्यक्त झाला आहे. या गुणामुळें च ते महंतांना म्हणतात:

महंत हो नका नका । बहुत वैभवें धका ।

उदास दास तापसी । फिरे लिला जसी तसी ॥ स्फु. श्लो. १२

निष्काम बुद्धि —

अहेत हेत तो धरा । विचार सारसा धरा । १३
कोठें च पडेना दृष्टी । ठाई ठाई त्याच्या गोष्टी । १९-९-२८

राजकारणविषयक हा समास फार महत्त्वाचा आहे. श्रींचे शिष्य "ज्ञानी आणि उदास" असून हि त्यांना "समुदायाचा हव्यास" राहात असे. विश्वप्रपंच च ज्यांनीं केला त्यांच्या शिष्यांनीं समुदायाचा हव्यास केल्याशिवाय तो कसा झाला असता बरें? श्रींचा व्याप

हा धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।

असा होता. म्हणून शिष्यसमुदाय शक्तिसंपन्न राहावा लागे. पुन्हां

कीर्ती पाहातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ती नाहीं ।

अशी हि :निरलसतेची शिकवण होती च. म्हणून अल्प काळांत समर्थसंप्रदाय बळावला आणि

आक्रा आक्रा बहु आक्रा । काये आक्रा कळेचिना ।

असा गुप्तपणें होऊन राहिला.

सगळा दासबोध लिहून "समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥" असें म्हटलें आहे. आणि पुनः "सकळ करणें जगदीशाचें । आणि कवित्व चि काय मानुशाचें ।" असें म्हटलें आहे. जीवनांतील प्रत्येक कर्माकर्माचा कर्ता भोक्ता परमेश्वर होय अशी एकदां दृढ भावना केल्यानंतर त्यांतील कोणत्या हि क्रियेचा अभिमान राहात नाहीं.

द. १३ स. ५ हें कहाणीचें रूपक फार मनोहर आहे. गूढ गुंजनाची समर्थांना फार आवड असे.

चंचळ नदी गुप्तगंगा । स्मरणें पावन करी जगा ।

* * *

येक बळाचे निवडले । ते पोहत चि उगमास गेले ।
उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप ॥ ११-७-१०

* * *

चुकाऱ्या गेला राजा । चौघा जणांचा ॥

* * *

पण तोंडें भक्षितो पणजा । मूल बापास मारी वोजा ।

गूढ गुंजनाचीं अशीं अनेक स्थळें दासबोधांत आहेत. कहाणीच्या रुपांत विश्वाची उभारणी संहारणी स्पष्ट केली आहे. ती ज्यांना समजली ते च जगोद्धार करतात असें म्हटलें आहे. समर्थांच्या शिकवणीचे आणखी प्रकार पहा :

अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा । ९४- ३

जीवांत जीव घालावा । चालावा भक्तिमार्ग हा ॥ ४
सर्व हि पेरणें विद्या । लोकांमध्यें हळुहळु । ६

मीत्रीकी सर्व लोकांसी । मनापासुन जाहली ।
वेध हा लागला मोठा । लोक भाट चि जाहले ॥ ११

सोईच्याधाईच्या लोका । सवे चि लागली सदा ।
राजकी भोवते येतीं । ते हीं त्यासी च मीळती ॥ १७

भक्तीचा जिव्हाळा मोठा । खोटा मार्ग असेचिना ।
रामदास म्हणे माझा । रामत्रैलोक्यनायेकु ॥ २०

सारांश, या संक्षेपित उताऱ्यांत श्रींचें "हरिकथानिरूपण, नेमस्तपणें राजकारण" यांची सांगड कशी असते हें आलें आहे. स्थल संकोचास्तव अधिक उतारे देणें शक्य नाहीं. हा भाग मूळांतून च पहावा.

समर्थांच्या उपदेशांतील शेवटला भाग असा उतरलेला असतो कीं, त्यानें उपदेश ऐकणाऱ्याचा राग नाहींसा व्हावा. "पुन: मेळवून घ्यावे । दूरील दोरे ॥" असें ते नुसते सांगून राहात नाहींत, तर प्रत्यक्ष कित्येक स्थळीं "न्यून पूर्ण क्षमा केले । पाहिजे श्रोतीं ॥" असें दासबोधांतील समासाचे अंतीं त्यांनीं म्हटलें आहे.

पंचीकरण, नित्यानित्यविवेक, आणि महावाक्य मनन या तिहींनीं सदा स्वरूपानुसंधान ठेवावें असा समर्थांचा उपदेश असला तरी आचारधर्म सोडतां कामा नये, तसें च जनींजनार्दनाची उपासना झाली पाहिजे या दोन गोष्टींवर त्यांचा भर दिलेला असे. स्वरुपानुसंधान त्यांचें तर सदैव राही. आणि म्हणून शारदा आणि सद्गुरूनमनांत "तयेसी माझा नमस्कार । तदांशें चि आतां ॥" १-३-२६, "म्हणौनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हे चि माझी वर्णना ।" १-४-३१ असें म्हटलें आहे.

दास जनीं विजनीं लय लावी । क. १८९

हा श्रींचा विशेष होय. विजनांत लय लागणें सोपें आहे. परंतु जनांत – समाजांत असतां आणि नित्य व्यवहार करीत राहतां लय लागणें समर्थांना च शक्य होय.

करुणाष्टकांतील ७८ वें अष्टक फार महत्त्वाचें आहे. कारण, यांत श्रींचा राजयोग चालू असतां म्हणजे श्री शिव छत्रपतींच्या आदरांत असतां कित्येक राजदरबारी किंवा गांवकुटाळ पर्यायानें त्रास देत असावेत, असें पुढील निवडक चरणांवरून वाटतें. एक तर रामभजनांत त्यांना व्यत्यय येत असावा.

रघुनायकावीण हा सीण आहे । ७८–१
पदार्थी बळें लाविता चीत भंगे । ७८–३
मनीं नावडे भोग हा राजयोगें । ७८–६
मनीं मछरें निंदिती येकमेकां । ७८–७
जना सारिखें बोलणें ही घडेना ।
म्हणोनी जनीं सर्वथा ही पडेना । ७८–१०
उपाधीगुणें लागतो पक्ष घेणें । ७८–१२

याकरितां

पराधेनता रामदासीं घडेना । ७८–१५

असें ठरवून पुढील ७९ व्या अष्टकांत प्रारंभींच म्हटलें आहे कीं,

मना चाल ऊठी वना दुर्गमाते । न गुंते भवागारदारादिकांते ।

याच अष्टकाच्या शेवटच्या दोन श्लोकांनीं त्यांनीं आपलें समाधान कसें केलें तें पहा.

सुषुप्ती अवस्थेसि भूमीं निजावें । उसें रामपाद स्मरोनी धरावें ।
दिशांचा महापट्ट तो पांघरावा । सिताकारणें साह्य वन्ही करावा ॥ १४
यथावीध देहो वनामाजि जावा । तथा गारदारादिकांही पिडावा ।
श्रीरामोस्मि बोधें स्मरावा स्मरावा । रामीं रामदास्यें स्वशांती निवावा ॥ १५

कदाचित श्रीसमर्थांना वरील त्रास झाला नसून त्यांच्या एकाद्या महंतास झाला असेल आणि तो स्वतःवर कल्पून त्यानें कसें वर्तन ठेवावें हें वरील दोन अष्टकांत त्यांनीं उपदेशिलें असण्याचा हि संभव आहे. सारांश, वरील दोन्ही अष्टकें फार मनन करण्याजोगीं आहेत.

श्री समर्थ अनेक वेळ कांहीं ग्रंथरचना करण्याकरितां, राजकारणाचा विचार करण्याकरितां, कठीण प्रसंगीं मार्ग सुचविण्याकरितां एकांतांत जात असत. शिवतरच्या घळींत शिवसमर्थांच्या अनेक भेटी झाल्या आहेत, दासबोध लिहिला

आहे, दिवाकरभटांनीं अनुभवामृताची पोथी येथें च संपूर्ण केली होती, आणि म्हणून

जयांस येकांत मानला। अवघ्या आधीं कळे त्याला।
येकांतीं स्मरण करावें। अवघ्याआधीं पडे ठावें।
अंतरात्म्यासरिसें फिरावें। कांहीं तरी ॥ १८।१०।४९

इत्यादि प्रसंगोचित उद्गार यथार्थ दिसतात.

श्री समर्थ कित्येक वेळीं स्वतःचे च हाल मौजेनें सांगत असत. "गिरी देखिला दास संतुष्ट जाला" (१३४-६८) हे प्रथम वनांत गेल्यावेळचे आनंदोद्गार दिसतात. परंतु तेथें कांहीं काळ राहिल्यानंतर आधिभौतिक ताप त्यांना सहन करावा लागला त्यावेळच्या हालांची चेष्टा ते करून दाखवितात.

गवी माजि जाल्या असंभाव्य पीसा । जया चाविताति दिसे तो चि पीसा ।
चटाटा बळें सेविती रक्त मौशा। सदा सर्वदा हा चि मोठा तमासा॥ १३४-१७

स्वदेहाकडे तटस्थ वृत्तीनें बघणें सामान्य नव्हे.

चाळणा करावी म्हणून श्री समर्थ लोकांना सांगत. त्याप्रमाणें ते आपल्या शिष्यांची हि चाळणा करून पहात असत, हा त्यांचा स्वभाव-विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे- "पळा पळा ब्रह्मपिसा येतो जवळी" म्हणत, हातांत खड्ग घेऊन शिष्यमंडळीचें धैर्य पहाण्यास धांऊन गेले तेव्हां कल्याणावांचून सर्व मंडळीस पळतां भुई थोडी झाली. कल्याण मात्र डगमगले नाहींत.

"मुलांना शिकवण" हें ५४ वें करुणाष्टक, "शिका रे शिका रे" हें १०० वें करुणाष्टक, अशीं हीं बालवाङ्मयाची उत्तम उदाहरणें दाखवितां येतील. "बरें दांत घांसोनियां तोंड धोंवे" (५४-२). जा, ये, न्हा, प्रमाणें च धू किंवा धो धातू चालविली आहे. जा चें जावें, ये चें यावें, न्हा चें न्हावें, या सारखें च धो चें धोवें केलें आहे. "भले सांगती न्याय तेथें भिजावें॥" (५४-४), भल्या म्हणजे सज्जनांच्या सहवासांत राहून कोरडा पाषाणवत् राहूं नकोस, त्यांचा न्यायी वर्तनाचा उपदेश त्वां उचलावास असा या चरणाचा अर्थ दिसतो. भिजावें=द्रवावें, ओलें व्हावें, कोरडें नसावें, इत्यादि. परंतु ज्यांना हें वैशिष्टय माहीत नाहीं ते कांहीं तरी अपपाठ रूढ करीत असतात, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. समर्थांच्या वाङ्मयाचा कसून अभ्यास होण्याची आवश्यकता किती आहे हें यावरून च ठरते. जे अर्थ समर्थांच्या ध्यानीं मनीं नसतात, ते त्यांच्या माथीं मारण्यांत काय अर्थ आहे?

समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान ।१८-६-११

उत्तमपुरुषनिरुपणांतील ही ओवी श्रीशिवरायास अफझुलखानाच्या वधानंतर घेतलेल्या भेटींत म्हटल्याचें शके १८३३ च्या दासबोध प्रतींतील चरण टीपेंत दिलें आहे. परंतु

समईं धारिष्ट धरणें । अद्भुत चि कार्य करणें ।

इत्यादि उपदेश कार्य झाल्यानंतर करण्यांत स्वारस्य काय? या आज्ञा नसून महा पुरुषाची रीत म्हणावी तर "समर्थापासीं उत्तम जन । राहिला पाहिजे साभिमान ।" हा आज्ञार्थी चरण आहे. तेव्हां एकंदरींत नीट उलगडा होत नाहीं.

"आनंदवनभुवन" (स्फु. प्र. ५८) हें समर्थांचें काव्य सर्व दृष्टींनीं अपूर्व होय. "चंचळ नदी गुप्त गंगा" चें स्पष्टीकरण "रामगंगा महा नदी" असें येथें केलें आहे. "आक्रा आक्रा बहु आक्रा । काय आक्रा कळेचिना" असें स्वसंघटनेस उद्देशून मोघम म्हणून ठेवलें आहे. "बुडाला औरंग्या पापी । म्लेंचसंहार जाहला ।" हे इतके जळजळित उद्गार श्रीसमर्थांनीं च काढावेत. "विजई दीस जो आहे । ते दिसीं सर्व उठती ।" १५८१ प्रतापगडचें युद्ध काय? "सर्वस्व मीच देवाचा । माझा देव कसा म्हणों ।" शंकराचार्यांच्या एका ईशस्तुतींत म्हटलें आहे कीं, सागराची च लाट म्हणणें उचित होय, लाटेचा सागर म्हणणें शोभणार नाहीं, देवा, तूं सागर व मी लहर होय. या च विधानाचा अनुवाद वरील समर्थोक्तींत पहावयास मिळतो. इतकी अनन्य भक्ति क्वचित च दिसून येते.

खौळला (स्फु. प्र. ५८-१२) = खवळला; गौसणी = गवसणी (६३-९) यौढा = यवढा (६६-४) इत्यादि ठिकाणीं 'औ' हा 'अव' बद्दल योजला आहे. ही प्राचीन पद्धत दिसते. घर्डिले = वाटले (६४-६). घर्डा = चटणी.

वोळतां भवानी माता । महींद्र दास्य इंच्छिती ।

हें भविष्य खरें ठरून मराठ्यांचा दरारा केवढा वाढला होता, हें पेशवाईतील

ब्राह्मणी राज्य जोरदार, घोड्यावर स्वार, होते शिपाई ।
जबर सद्दि कैकांनीं पाहिली शत्रु ठेविले नाहीं ॥

या काव्यांत प्रत्ययास आलें च होतें.

भेद देवालयामध्यें । आभेद देव पाहतां । ६८-११

अहाहा, इतकी धर्मसहिष्णुता होती तेव्हां कोणता धार्मिक समाज समर्थांच्या संघटनेस विरोधी राहिला असता? खिस्ती चर्च, मुसलमानांची मशीद, पारशांची आग्यारी, बुद्धांचा चैत, अगर इतर कोणत्याहि धर्मीयांचें उपासनामंदिर पाहिल्यास

बाह्यतः त्यांचे रचनाकौशल्यावरून भेद प्रतीत होतील. परंतु मतांतराचे लोक ज्या परमेश्वराची प्रार्थना करितात, त्या परमेश्वरांत द्वैत असणें शक्य आहे काय? मुळींच नाहीं. तेव्हां एक पाऊल पुढें जाऊन असें हि म्हणतां येईल कीं, विविध धर्मसंस्थापकांचे देहांत बाह्यतः भेद दिसले, तरी त्यांच्यातील चैतन्य एक च होय.

देहे देवालयामधें। पाहाणें देव तो बरा। ६८-१
देव वर्णील तो ज्ञाता। ज्ञानें मोक्ष ची पावतो॥ ९

थोर लाहान देवालयें। देव तो त्यामधें असे।
देव देवालयें वीण। कोणी च न दिसे जनीं॥ १०

वेदांतांत चैतन्याच्या पलिकडे निर्गुण ब्रह्मापर्यंत उडी आहे. त्याचें वैर कोणाशीं च नसणार, उलट सर्वांशीं सहानुभूतीनें वेदांती वागेल, बाह्याकाराबद्दल व्यर्थ वाद आणि मारामाऱ्या पाहिजेत कशाला, अशी समर्थांची येथें शिकवण आहे.

शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी॥

अशी प्रशंसा समर्थांनीं केली आहे. शिष्यानें गुरूची स्तुति करणें रूढी च आहे. येथें गुरूनें शिष्याची स्तुति करणें अलौकिक होय. हा श्रींचा विशेष. त्याचें कारण, गुणवंत च गुणाची पारख करूं शकतो. नरनारायण किंवा देवभक्तांच्या जोडीप्रमाणें समर्थशिवबांची जोडी होती. त्यांनीं परस्परांच्या कार्यांचा पाठपुरावा केल्याकारणानें एकमेकांबद्दल एकमेकांना अत्यंत आदर असणें स्वाभाविक होय. समर्थांचें स्वभाववैशिष्ट्य हें च कीं, वयानें आणि ज्ञानानें वस्तुतः ते शिवबांना गुरुस्थानीं असून हि त्यांना बरोबरीनें वागवीत होते. राजे निजधामाला गेल्यानंतर त्यांनीं गडाखालीं येणें हि वर्ज केलें. शिवबा हे नमुनेदार राजे आणि धर्मसंस्थापक म्हणून त्यांचा कित्ता सर्वांनीं गिरवावा याकरितां वरील उद्गार आहेत.

सेवकु मानवीयांचे। कष्टती बहुतां परी।
सेविला देव देवांचा। तेणें मी धन्य जाहलों॥ मा. पं.४-३

हे धन्योद्गार श्रीसमर्थांनीं केव्हां काढले असतील बरें?

इवलेसें रोप लावियेलें द्वारीं। वेलु तयाचा गेला गगनावरी।

असा शिवाजीचा आणि मराठी राज्याचा उत्कर्ष पाहून च हीं वचनें मुखांतून निघालीं असण्याचा संभव आहे. कारण, समर्थांचा अवतार च कृष्णाकांठीं झालेली

धर्मग्लानि मोडून धर्मस्थापना करण्याकरितां होता. यास पुरावा मानपंचक १–२५ मध्यें मिळत आहे तो असा :

रामदासीं ब्रह्मज्ञान । सारासार विचारणा ।
धर्मस्थापनेसाठीं । कर्मकांड उपासना ॥

आनंदवनभुवनांत ते म्हणतात :

बंड पाषांड उडाले । शुध अध्यात्म वाढले ।
राम कर्ता राम भोक्ता । आनंदवनभूवनीं ॥ ३९

श्रीसमर्थांच्या व्यक्तिवैशिष्ट्यद्योतक शब्दप्रकारांचा विचार याही पेक्षां अनेक पटीनें करतां येणें शक्य आहे. परंतु तो अधिकार माझा नाहीं. समर्थवाङ्मयाशीं माझा जो कांहीं अल्प स्वल्प परिचय आहे, त्या प्रमाणांत ही वेडीवाकुडी सेवा समर्थचरणीं सादर करतों; ती ते गोड मानून घेतील असा भरंवसा आहे.

---

## ( २१ )

श्री

# समर्थकृपेचीं वचनें तो हा दासबोध

( लेखक — रा. अनंत सखाराम वणीकर, अहमदाबाद )

मी सामान्य माणूस. श्रीसमर्थांना कोणी हि परब्रह्म समजत असला, किंवा आपलें सर्वस्व मानीत असला, तरी तेवढ्यानें त्याला सभेच्या सुवर्णमहोत्सवाच्या स्मृतिग्रंथासाठीं निबंध लिहिण्याचा अधिकार प्राप्त होतो, असें नव्हे. परंतु सभेच्या चिटणीसांची आज्ञा अमान्य करणें शक्य नसल्यामुळें, या क्षणीं माझ्या मनांत जो एक विचार उत्कटत्वानें प्रादुर्भूत झाला आहे, तो च या लहानशा टांचणांत गोवून पाठवीत आहे. सभेची अल्पशी सेवा करण्याची आपण मला ही संधी दिली, याबद्दल मला धन्यता वाटते.

ग्रन्थराजाला आम्ही तर शिरोधार्य मानतो च, पण स्वतः श्रीसमर्थ त्याचा केवढा गौरव करीत आहेत! ग्रंथाची समाप्ति करतांना त्यांनीं उद्गार काढले आहेत —

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥ २०-१०-३०
ग्रंथाचें करावें स्तवन । स्तवनाचें काये प्रयोजन ।
येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा ॥ ३३
देहे तवं पांचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथीचा ।
आणि कवित्वप्रकार मनुशाचा । काशावरुनी ॥ ३४
सकळ करणें जगदीशाचें । आणि कवित्व चि काय मानुशाचें ।
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काये ध्यावें ॥ ३५

यावरून हें सिद्ध होत आहे कीं, या ग्रंथाचें कर्तृत्व श्रीसमर्थ आपणाकडे घेत नसून जगदीश दाशरथीकडे सोंपवीत आहेत. म्हणून वेदाप्रमाणें च श्रीमत् ग्रन्थराज दासबोध अपौरुषेय आहे, असें मला म्हणावेंसें वाटतें. सर्व च सत्पुरुषांच्या प्रासादिक ग्रंथांविषयीं असें म्हणतां येईल. सत्पुरुषांच्या मुखानें परमेश्वर च बोलत असतो.

जया अंतरीं भगवंत । अचल राहिला निवांत ।
तो स्वभावें जें बोलत ।

तें तो बोलत नसून त्याच्या हृदयांतरीं अखंड वास करणारा जो परमेश्वर तो बोलत असतो.

ग्रन्थराज दासबोधाची अशी ही थोरवी आहे. त्याविषयीं कोणाची अश्रद्धा नसते च, पण पुष्कळांना शंका येत असते कीं, मनुष्याचा नियम नाहीं, पण परमेश्वर च परस्परविरोधी असा उपदेश कसा करील? ग्रन्थराजांतील पुढील वचनांसारखीं वचनें पाहून वाचक बुचकळ्यांत पडतो:

(१) एका ठिकाणीं

धातुपाषाणमृत्तिकापूजन। चित्रलेप सत्पात्रपूजन।
आपले गृहीचें देवतार्चन। ४–५–५

करावयास सुचवितात, तर दुसरीकडे

धातु पाषाण मृत्तिका। चित्रलेप काष्ठ देखा।
तेथें देव कैंचा मूर्खा। भ्रांति पडिली॥ ६–६–४४

असें सडेतोड भाषण करून पूजकाला मूर्खांत आणि वेड्यांत काढतात! खरें काय मानावें?

(२) नाहीं उपासनेचा आधार। तो परमार्थ निराधार।
कर्मेंविण अनाचार। भ्रष्ट होती॥

याप्रमाणें, एका ठिकाणीं, उपासनेची आणि कर्माचरणाची तरफदारी केलेली आढळते, तर अन्यत्र, उपासना म्हणजे निवळ भ्रम होय, असें स्वच्छ म्हणतात:

मी तूं हा भ्रम। उपासना हि भ्रम॥ १०–६–११

अशी परस्परविरोधी वचनें पाहिलीं म्हणजे वाचकाचें मन गोंधळून जातें! उपासना खरी मानून करावी, कां भ्रम समजून टाकावी?

(३) येकाक्षर होतां श्रवण। तत्काळ चि होईजे पावन॥ ७-६-३४

अशी, एकीकडे, नुसत्या श्रवणाची महती सांगत असतां, दुसरीकडे, अर्थ न पाहतां नुसतें श्रवण करणाराला शुद्ध पाषाण म्हणतात, तेव्हां काय समजावें?

अर्थांतर पाहिल्यावीण। उगे चि करी जो श्रवण।
तो श्रोता नव्हे पाषाण। मनुष्यवेषें॥ ८-६-७

(४) आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ विवेका।
येथें आळस करूं नका। विवेकी हो॥

ही ओवी आम्ही प्रपंचीं माणसें आधाराला घेऊन व ज्याच्या त्याच्या तोंडावर फेंकून, बिलकूल आळस न करतां, संसारांत 'गढून जात असतों, तों जुन्या दासबोधांत श्रीसमर्थ

असतां सुखमये संसार। तरी कां टाकिते थोरथोर ॥

असा प्रश्न करून

नाहीं तरी नेमस्त त्यजावा। हे चि आज्ञा पोटस्ते ॥

अशी आपल्या पोटांतली इच्छा दर्शवितात आणि आम्हांस घोटाळ्यांत पाडतात !

असे परस्परविरोधी उपदेशाचें दाखले आणखी किती तरी देतां येतील.

प्रश्न असा, समर्थकृपेच्या वचनांत असा परस्परविरोध कां आढळावा ?

या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, भिन्न भिन्न भूमिकेवरील शिष्यांचा निरनिराळा अधिकार पाहून प्रत्येकास झेपेल, अनुसरतां येईल, असा च उपदेश श्रीसमर्थ करीत असतात.

अधिकार पाहोन कार्य सांगणें ॥

हे जसें खरें, तसें च

अधिकार पाहोन उपदेश करणें ॥

याला वैद्याच्या अनुपानाचा दृष्टांत चांगला लागूं पडतो. कल्पना करूं, एक रोगी वैद्याकडे गेला. वैद्यबुवा दुसऱ्या रोग्यांची परिक्षा करीत होते, म्हणून हा एका बाजूस मुकाट्यानें जाऊन बसला. वैद्यबुवा एकएका रोग्याची हकिकत ऐकून, नाडी पाहून, पथ्यापथ्य सांगून, औषध देऊन त्यास वाटे लावीत होते. त्यानें एकास सांगितलें, हें औषध साखरेंत घ्या, तर दुसऱ्यास म्हणाले, साखर अजिबात् वर्ज करा, खाल तर रोग बळावेल. तिसऱ्या रोग्यास म्हणाले, तूप मुळीं च खाऊं नका, श्रम करूं नका, तर चवथ्यास म्हणतात, खूप दूध तूप खात जा, नमस्कार घालीत जा, चांगले बलवान व्हा आणि देशकार्यांत देह झिजवा. तो आमचा रोगी हें सर्व पहात आणि ऐकत च राहिला. त्याला वैद्यबुवांचें वर्तन धरसोडीचें वाटलें. त्याच्यावरील त्याची श्रद्धा उडाली. तो जाऊं लागला. वैद्यबुवांची नजर त्याच्याकडे गेली. त्यांनीं त्यास हांक मारून, कां चालला म्हणून विचारलें. त्यानें मोकळ्या मनानें सांगितलें कीं, आपण एकास एक सांगतां तर दुसऱ्यास त्याच्या अगदीं उलट सांगतां, हें पाहून आपल्यावर माझा विश्वास बसेना, म्हणून चाललों. पाल्हाळ करणें नको; वैद्यबुवांनीं त्याला समजावून सांगितलें, तें त्यालाहि पटलें, त्यानें मोठ्या श्रद्धेनें त्यांचें औषध घेतलें आणि तो रोगमुक्त झाला.

तसें च आमचे श्रीसमर्थ मोठे धन्वंतरी आहेत व जो त्यांना शरण जाऊन श्रद्धापूर्वक ऐकतो, त्याला ते भवरोगापासून मुक्त करतात. सर्वांना ते एक च औषध सांगत नाहींत. ज्याची त्याची पूर्वतयारी व अधिकार पाहून प्रत्येकास अनुरूप आणि सुसाध्य असा मार्ग दाखवितात. कोणाला शुकाप्रमाणें वैराग्य करावयास सांगतात, तर कोणास जनकाप्रमाणें राज्याचा भार वाहावयास लावतात, एकाला सगुणध्यान सांगतील तर दुसऱ्यास निर्गुणध्यान शिकवितील. कोणा निष्ठावंताकडे पिकदाणी साफ करून आणण्याचें काम सोंपवितील तर कोणाचें सुंदर अक्षर पाहून त्यास ग्रन्थलेखनांत गुंतवून ठेवतील. महाबळेश्वरकर दिवाकरासारख्या 'बुद्धि हि महाबळ' असलेल्या शिष्याला राजदरबारीं जाण्या-येण्याचें काम सांगतील, तर कल्याणासारख्या निस्पृहाला भिक्षा मागून जगदुद्धाराचें कार्य नेमून देतील.

आमच्या प्रकृतीचें निदान करून आम्हांला औषध देण्याला आज प्रत्यक्ष श्रीसमर्थ कोठें आहेत? श्रीमत् ग्रन्थराजांत भवरोगावरील सारीं औषधें सांठविलेलीं आहेत. आपण च आपली प्रकृति पाहून त्याप्रमाणें औषध घ्यावें व पथ्य पाळून भवरोगापासून मुक्त व्हावें. वैद्याच्या संग्रहीं जशीं कांहीं औषधें सौम्य असतात, कांहीं मध्यम असतात व कांहीं अगदीं जालीम असतात, त्याप्रमाणें दासबोधांत हि सर्व प्रकारचीं औषधें आहेत. संसार करण्यापासून संसार सोडण्यापर्यंत अरण्याच्या मिरासीपासून राजसिंहासनापर्यंतचीं सर्व औषधें त्यांत आहेत. ज्यानें त्यानें स्वतःचे वैद्य बनून पचेल व मानवेल तें औषध घ्यावें.

(रा) ज्यांत पथ्य मुळीं च नाहीं, जें गुणकारी असून घेण्याला अगदीं सौम्य आहे असें औषध पाहिजे असल्यास

नित्य नेम प्रातःकाळीं। माध्यानकाळीं सायंकाळीं।
नामस्मरण सर्वकाळीं। करीत जावें॥ ४-३-३
चालतां बोलतां धंदा करितां। खातां जेवितां सुखी होतां।
नाना उपभोग भोगितां। नाम विसरों नये॥ ७
बाळपणीं तारुण्यकाळीं। कठिण काळीं वृधाप्यकाळीं।
सर्व काळीं अंतकाळीं। नामस्मरण असावें॥ १४

(म) गुरुमुखापासून थोड्या अनुपानासह सेवन केल्यास गुणकारी औषधः

दिसेना तरी काये जालें। परंतु तें सर्वत्र संचलें।
सूक्ष्म चि कोंदाटलें। जेथें तेथें॥ ६-२-१९

दृष्टीस लागली सवे। जें दिसेल तें चि पाहावें।
परंतु गुज तें जाणावें। गोप्य आहे ॥ २०
प्रगट तें जाणावें असार। आणि गुप्त तें जाणावें सार।
गुरुमुखें हा विचार। उमजों लागे ॥ २१

(दा) कांहीं औषधें रेचक आहेत. तीं सेवन केल्यास मनांतली सारी खळबळ निघून जाईल.

आपल्या देहांतील न कळे। मा तें अवघें कैंचें कळे।
लोक होती उतावळे। अल्पज्ञानें ॥ १९-८-३०
धन्य परमेश्वराची करणी। अनुमानेना अंतःकरणीं।
उगीच अहंता पापिणी। वेढा लावी ॥ ३३
थोडें जिणें अर्धपुडी काया। गर्व करिती रडाया।
शरीर आवघें पडाया। वेळ नाहीं ॥ ३९

(स) निदानींचें औषध सांगतात:

माया सांडून मुळास जावें। तरी च समाधान पावावें।
ऐसे न होतां भरंगळावें। भलतीकडे ॥ २०-९-१३
माया उलंघायाकारणें। देवासी नाना उपाय करणें।
अध्यात्मश्रवणपंथे चि जाणें। प्रत्ययानें ॥ १४
ऐसे न करितां लोकिकीं। अवघी च होते चुकामुकी।
स्थिति खरी आणि लटकी। ऐसी वोळखावी ॥ १९

याप्रमाणें हा ग्रंथ प्रत्ययाचा आहे. तो मुख्यतः आत्मप्रचीतीनें लिहिला आहे व वाचकांनीं आणि पारायणें करणारांनीं त्याचा प्रत्यय घेऊन च पहावयाचा आहे. त्यांत च महाराष्ट्राचें कल्याण आहे. त्याचा निदिध्यास महाराष्ट्रास लागावा, अशी प्रार्थना आहे.

# श्रीसमर्थसंप्रदाय व स्त्रीसमाज

( लेखक — कु. **गार्गी भाटवडेकर**, पी. ए., **मुंबई** )

## प्राचीन समाजांत स्त्रियांचें स्थान

समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत सर्वत्र स्त्रीपुरुषांची सारखीच प्रतिष्ठा आढळते. कौटुंबिक, सामाजिक घडामोडींत दोघेही सहकार्य करीत असतांना दिसतात. उत्तरोत्तर बदलत्या अवस्थेंत स्त्रियांचें आर्थिक संपादनांतील सहकार्य कमी होत गेल्यामुळें त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेंतही फरक पडत चालला. समाजाचा एक स्वतंत्र घटक म्हणून तिला मिळणारी मान्यता कमी झाली. यामुळें च आर्थिक, धार्मिक, बौद्धिक, आध्यात्मिक, क्षेत्रांत तिच्या आवडीनिवडी, आकांक्षा यांना स्वतंत्र स्थान नाहींसें झालें. या स्थित्यंतरांत पूर्वींची तडफदार, बुद्धिमान, कर्तृत्वशील स्त्री दिसेनासी झाली. परावलंबन, अबलत्व यांचे शिक्के लागून बौद्धिक क्षेत्राप्रमाणें आध्यात्मिक उन्नतीच्या बाबतींतही ती अनाधिकारी ठरली.

या स्थित्यंतराचें प्रत्यंतर प्राचीन ऐतिहासिक दाखल्यावरून येण्यासारखें आहे. वेद, उपनिषद्, महाभारत व सूत्रकालांत स्त्रियांच्या जीवितांतील हें स्थित्यंतर प्रत्ययास येतें. गार्गी, वाचक्नवी व याज्ञवल्क्य व मैत्रेयी आणि याज्ञवल्क्य यांच्या संवादावरून वेदकालीन स्त्रियांच्या बौद्धिक परिणतीची कल्पना येईल. वेदांतविषयक तात्विक प्रश्नांची स्वतंत्र चर्चा करण्याइतकें बौद्धिक बळ वरील दोन स्त्रियांत दिसतें. ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांच्या कर्त्या लोपामुद्रा, घोषा यासारख्या लेखिकाही वेदकालांत आढळतात. महाभारतांतही विदुषी व वक्त्या स्त्रियांचीं किती तरी उदाहरणें आढळतात. सुलभा – जनमेजय – संवादांत स्त्रीपुरुषांतील तात्विक अभेदाची कल्पना सुलभेनें करून दिली व जनमेजयाला संवादांत पराजित केलें. पंचचूडा व नारद यांचा संवादही तत्कालीन स्त्रीसमाजाची योग्यता पारखण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. वस्त्रहरणप्रसंगीं द्रौपदीनें धर्मा-धर्मासंबंधीं केलेलीं प्रश्नोत्तरें निर्भीड व तार्किक बाण्याचीं आहेत. या दोन कालांतील प्रतिष्ठा धर्मसूत्रकालांत ओसरली. स्त्रियांना वैश्यशूद्रांप्रमाणें च धार्मिक, सामाजिक व पर्यायानें कौटुंबिक क्षेत्रांतील घडामोडींतून सहजगत्या वगळण्यांत आलें. स्त्रियांना स्वतंत्र मन, बुद्धि, आत्मा नाहीं अशा तऱ्हेची विचारसरणी निर्माण झाली. वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनांत बुद्धधर्मगत भिक्षुभिक्षुणींच्या स्वैर व्यवहारानें स्त्रियांबद्दल अनुदार दृष्टीच कायम राहिली.

## परमार्थविषयक अनधिकार व त्याची कारणमीमांसा

या मतप्रणालीनें स्त्रियांना परमार्थातही अनधिकारी ठरविलें पति, मुलेंबाळें यांचें सुखसंपादन हाच तिचा परमार्थ अशी समजूत उत्पन्न झाली. बौद्धिक उन्नतीनें साधणारा स्वयंसिद्ध निर्लेप परमार्थ साधतां न येण्याइतकी ती दुर्बल ठरली.

वेदमहाभारतकालाप्रमाणें पौराणिक ग्रंथांतही कपिल–देव हूतीसारखा एकादा परमार्थविषयक संवाद आढळतो. गीतेनेंही ईश्वरोपासनेविषयीं स्त्रीशूद्रांना समान अधिकार दिले होते. धर्मसूत्रकालांत या विचारसरणीला पाठबळ राहिलें नाहीं. स्त्रिया परमार्थसाधनांत अनधिकारी ठरल्या.

समाजांतील परमार्थसाधनाच्या रूढ मार्गांपैकीं ज्ञान, योग व ध्यानधारणादि मार्ग स्त्रियांना स्वाभाविकपणें झेंपण्यासारखें नव्हते. वेदांताचा ज्ञानमार्ग व सांख्यादि तत्वज्ञानांतील ध्यानधारणामार्ग हे दोनही स्त्रियांना अनुकूल मार्ग नव्हते. एकांत बौद्धिक परिणतीची परिसीमा व दुसऱ्यांत आसन प्राणायामादिकांचा अतिरेक. या दोन बिकट मार्गांचा अवलंब करणें स्त्रियांना अवघड होतें. याशिवाय स्त्रियांच्या परमार्थविषयक अनधिकाराचीं आणखीं कांहीं कारणें होतीं. सांसारिक अलिप्तता, कर्तव्यकठोर वृत्ति, बुद्धिप्रामाण्य यासारखीं परमार्थसाधनाला आवश्यक असणारीं लक्षणें स्त्रियांमध्यें सहजगत्या उत्पन्न होणें शक्य कोटींतील नाहीं. सुखदुःखसमान प्रवृत्तीसारखी आणखी कांहीं लक्षणेंही स्त्रियांमध्यें उत्पन्न होणें शक्य नाहीं. या सर्व गोष्टींस तिचें शारीरिक दुर्बलत्व व भावनाप्राधान्य कारणीभूत होतें अशा समजुतीला पुढें शास्त्रानें पाठिंबा दिल्यामुळें स्त्रियांचा परंपरारूढ अनधिकार शास्त्रसिद्ध झाला.

परमार्थसाधनाचे बिकट मार्ग आणि स्त्रियांच्या शक्तीबद्दलची विपरीत कल्पना या दोन गोष्टी त्यांचा परमार्थविषयक अनधिकार सिद्ध करण्यास कारणीभूत झाल्या. परमार्थसाधनाचे सुलभ उपाय व स्त्रियांच्या नैसर्गिक शक्तींचा योग्य विचार पुढें ज्या विचारवंतांनीं केला, त्यांचें तत्वज्ञान निर्माण होईपर्यंत स्त्रियांची हीच स्थिति अंशतः कायम राहिली.

### परमार्थसाधन

स्त्रियांना परमार्थसाधन सुलभ आहे किंवा नाहीं हें ठरविण्यास परमार्थ म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना असली पाहिजे. आत्मोद्धार व भूतदया ह्या जीवनांतील श्रेष्ठ बिंदू आहे. आत्मोद्धारास अनुकूल भूमिका उत्पन्न झाली म्हणजे भूतदया आपोआप उत्पन्न होते. अहिंसा, पावित्र्य, निर्मात्सर्य, निस्पृहता, इत्यादि, गुणांचा विकास म्हणजे आत्मोद्धार. सर्वसाधारण प्राणिमात्रांचें सुखसंवर्धन हें परमार्थसाधनांतील महत्त्वाचें कार्य. ही प्रवृत्ति निर्माण होण्यासाठीं आवश्यक

असलेली निर्लेप, निर्मम, सुखदुःखसमान वृत्ति, स्त्रियांना सहजसाध्य नाहीं, असा गैरसमज अधिकाधिक बळावत चालला. श्रवण, मनन, कीर्तन, ग्रंथलेखनादि परमार्थाचे बहिर्मार्ग आक्रमक करण्यास विशिष्ट बौद्धिक विकास आवश्यक असल्यानें ते स्त्रियांना सहजसुलभ होणार नाहींत, असा समज निर्माण होणें स्वाभाविक होतें.

## वैदिक व अवैदिक संप्रदायाचे स्त्रियांविषयींचे दृष्टिकोन

वैदिक व अवैदिक संप्रदायांत स्त्रियांबद्दल भिन्न विचारसरणी प्रचलित होती. वैदिक धर्मग्रंथापैकीं श्रुतिस्मृतींनीं स्त्रियांना परमार्थांत गौणत्व दिलें. मौंजीबंधन, उपदेशग्रहण, यजन, अध्ययन, अध्यापनादि मार्ग उत्तरोत्तर स्त्रियांना निषिद्ध समजण्यांत आले. वैदिक ग्रंथाच्या विचारसरणीची परंपरा सांख्यादि इतर वैदिक संप्रदायांनीं चालविली. वैदिक धर्म बौद्धाच्या शिकवणीनें रूपांतर पावला, शंकराचार्यांनीं वैदिक धर्मांतील कांहीं अनुदार विभागाचा परित्याग केला, परंतु ज्ञानमार्गाचा व आत्मानात्म विचाराचा गहन मार्ग त्यांत कायम राहिल्यामुळें स्त्रियांना परमार्थ साधनांत प्रवेश मिळणें शक्य नव्हतें. वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवन कालांत उत्पन्न झालेल्या वैदिक व अवैदिक पंथांपैकीं कांहींनीं स्त्रियांविषयीं नव्या उदार धोरणाचा तर इतरांनीं पूर्वीच्या अनुदारतेचा च, अवलंब केला. जैन, बौद्ध, महानुभाव या तीन पंथांनीं स्त्री-पुरुषांचें परमार्थक्षेत्रांतील समत्व मान्य केलें. त्यांच्या सहिष्णुतेतील सामाजिक धारणेच्या दृष्टीनें हा एक महत्त्वाचा भाग होता. बौद्धधर्मांतील भिक्षुभिक्षुणींच्या व्यवहाराचा दाखला समोर असल्यानें वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनांत वर्णविहित समाजरचना व स्त्रीशूद्राविषयींची विषम दृष्टि कायम राहिली च. पूर्वी गीतेनें भक्तिमार्गाच्या तत्त्वज्ञानांत स्त्रीशूद्रांचे परमार्थ-विषयक अधिकार मान्य केले होते. परंतु हें तत्त्वज्ञान संस्कृतांत असल्यानें बहुजन-समाजाच्या आचार व विचारसरणींत त्यास स्थान नाहींसें झालें होतें. पुढें वेदांताच्या कर्मठ विचारसरणीनें भांबावलेल्या व परकीय आक्रमणानें त्रासलेल्या महाराष्ट्रीय समाजाला संघटित करण्याच्या इराद्यानें वैदिक धर्मांतून उत्पन्न झालेल्या भागवत संप्रदायानें परमार्थसाधन सर्वांना सुलभ करण्याच्या हेतूनें भक्तिमार्गाचा अवलंब केला. भक्तिमार्गासारख्या सुलभ साधनामुळें परमार्थांत स्त्रियांचा सहज प्रवेश होऊं शकला.

## भागवतधर्माची स्त्रियांचे उद्धारासंबंधीं कामगिरी

धार्मिक विचारसरणीबद्दल, संस्कृतांतील वेदांतर्गत आत्मानात्म विचाराच्या अतिरेकानें उत्पन्न केलेल्या अनास्थेचा परिहार भागवतधर्मानें केला. जुन्या

तत्त्वज्ञानांत सामाजिक धारणेच्या दृष्टीनें अनुकूल फेरफार करून त्याचा प्राकृतांत आविष्कार केला. स्त्रीशूद्रादिकांबद्दल सहिष्णुता हा त्यांतील महत्त्वाचा भाग होता. युरोपांत पोपचें धार्मिक क्षेत्रांतील महत्त्व कमी करून धर्मोपासनेचा व ज्ञानाचा मार्ग बहुजनसमाजाला खुला करून देण्याचें कार्य जसें लूथरादि बायबलप्रणीत धर्मद्रेष्ट्यांनीं केलें, तसा च कांहींसा हा धार्मिक स्थित्यंतराचा प्रयत्न होता.

भागवत संप्रदायाच्या पुरस्कारानें स्त्री पुरुष, शूद्र व इतर अहिंदु ज्ञातींनीं हि आत्मोद्धार केल्याच्या कित्येक कथा उपलब्ध आहेत.

## संतांचें स्त्रीविषयक तत्त्वज्ञान

संतांपैकीं कित्येकांनीं केवळ विचारापुरती तर कांहींनीं प्रत्यक्ष आचारांत ही स्त्रियांच्या परमार्थसाधनास मान्यता दिली. रामदासांखेरीज इतर संतांच्या विचारसरणींत क्वचित् पूर्वपरंपरेंतील अनुदारतेचा ध्वनि उमटला आहे. समर्थांनीं स्त्रियांबद्दलची ही विचारसरणी अमलांत आणण्याचा कटाक्ष बाळगलेला दिसतो. समर्थांनीं स्वतः इतकें उदार तत्त्वज्ञान स्वीकारलें तरी त्यांच्या शिष्यपरंपरेंत ही स्त्रियांबद्दलची अनुदारता कायम राहिली हें विशेष आश्चर्यकारक होय.

पूर्वपरंपरेचें कठोर धोरण ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामादिकांनीं स्वीकारलें नसलें तरी या विचारसरणीची छाया त्यांच्या तत्त्वज्ञानांत कायम आहे. स्त्रियांचा सहवास, स्त्रीसंग, विषयलालसेच्या अनुरोधानें स्त्रीसमाज याबद्दल साऱ्या संतांनीं परमार्थविषयांत प्रतिकूलता च व्यक्त केली आहे.

ज्ञानेश्वरांनीं शारीर तपाचा विचार करीत असतां (ज्ञानेश्वरी अ. १७ ओवी २११) मातृत्व हा च स्त्रियांचा पहिला व शेवटचा संबंध असावा असें पुढील शब्दांत सूचित केलें आहे.

जन्मतेनि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें आंगें।
तेथूनि जन्म आवघें। सोवळें कीजे ॥

परमार्थसाधनांत स्त्रियांचा सहवास अडथळा उत्पन्न करणारा आहे. अशी विचारसरणी या उद्गारांत व्यक्त होत नाहीं काय?

योगवासिष्ठांतील वैराग्यप्रकरणांत स्त्रीजुगुप्सेंत एकनाथांनीं स्त्रैणांची भरपूर निंदा केली आहे. मोक्षसंपादनार्थ आवश्यक असणारा त्याग स्त्रीसंगत्यागाखेरीज उत्पन्न होऊं शकत नाहीं, स्त्री ही जगांतील एक दुःखरूप शृंखला आहे, अशा अर्थाचे शब्द वैराग्यप्रकरणांतील स्त्रीनिंदा विभागांत आले आहेत.

स्त्रियांच्या सात्विक शालीनतेची तरफदारी करीत असतां एकनाथांनीं भागवतांतही स्त्रीसंगाचा पुढील शब्दांत निषेध केला आहे.

स्त्रीभोगाचें जें सुख। तें जाण पां केवळ दुःख।
तोंडीं घालतां मधुर विख। परिपाकीं देख प्राणांतू॥ ८-७३
दीपरूपाचेनि कोडें। पतंग जळोनि स्नेहीं बुडे।
तेवीं स्त्रीसंगें अवश्य घडे। पतन रोकडे अंधतमीं॥ ७७

श्रद्धा, समता, वैराग्यादि भावनांनीं युक्त अशा परमार्थोद्दत स्त्रियाच अनुग्रहास योग्य असें एकनाथ म्हणतात.

स्त्रियांचा तो संग नको नारायणा। काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या॥

या अभंगांत तुकारामांनीं सजीव स्त्रीचाच नव्हे तर लाकूड, मेण पाषाण यांच्या पुतळ्यांचाही स्पर्श नको अशी मागणी ईश्वराजवळ केली आहे.

## समर्थांचा कार्यभाग

वेदांतांत व पूर्वपरंपरेंत रुजलेली ही अनुदारता समर्थांच्या ग्रंथांत कोठें ही आढळत नाहीं. स्त्रियांबद्दलचे अवाच्य उद्गार त्यांनीं कोठेंही काढलेले नाहींत. दासबोधांत स्त्रैणांची निंदा मूर्खांच्या लक्षणांत आढळली, तरी इतरत्र व येथेंही अवाच्यता नाहीं. स्त्रियांची आध्यात्मिक योग्यता त्यांनीं पूर्णपणें ओळखली आहे.

नाना पुरुषांचे जीव। नाना स्त्रीयांचे जीव।
येक चि परी देहस्वभाव। वेगळाले॥ १७-२-२०

या शब्दांत प्रकृतिभिन्नत्व असूनही स्त्रीपुरुषांचें मानसिक व बौद्धिक चैतन्य सारखें च असें समर्थ म्हणत आहेत. याच ग्रंथांत अन्यत्र वेगळ्या शब्दांत ही च समता त्यांनीं पुढील शब्दांत व्यक्त केली आहे.

पुरुषाचा जीव स्त्रियांची जीवी। ऐसी नाहीं उठाठेवी। १६-८-२५

स्त्रियांच्या नैसर्गिक शक्तींचे मोल त्यांनीं यथार्थतेनें पारखल्याची साक्ष त्यांच्या शिष्यीणींच्या कामगिरीवरून होईल.

इतर संतांच्या चरित्रांतही अनेक संतिणींची व परमार्थोद्दत स्त्रियांची परंपरा पहावयास सांपडते. संतपरंपरेंत ज्ञानेश्वराबरोबर मुक्ताबाई, नामदेवाबरोबर जनाबाई, तुकारामाबरोबर बहिणाबाई, यांचा उल्लेख अनेकदां आढळतो. यापैकीं कांहींनीं स्वोद्धाराच्या हेतूनें स्वतंत्र अभंगरचना केली, इतरांनीं पतीच्या परमार्थ-

प्रवणतेमुळें व्यावहारिक घडामोडींना कंटाळून परमार्थसाधन केलें. ज्ञानेश्वर-एकनाथादि संतांनीं स्वकुटुंबियाव्यतिरिक्त इतर स्त्रियांस उद्धरल्याचें ऐकिवांत नाहीं.

आपल्या तत्त्वज्ञानाची प्राणप्रतिष्ठा करण्याच्या उद्देशानें समर्थांनीं शिष्य-संप्रदाय स्थापन केले. सुवासिनी, गतधवा, अनाथ, पतित साऱ्या स्त्रियांना सऱ्हास परमार्थसाधनाचा मार्ग त्यांनीं खुला करून दिला. दासबोधांत सांगितल्याप्रमाणें त्यांच्या मनानें संसारदुःखानें तापलेला तोच परमार्थसाधनाला अधिकारी ठरतो (५-३-३३) या कसोटीप्रमाणें सांसारिक सुखदुःखाबद्दल उदासीन झालेल्या स्त्रियांना त्यांनीं उपदेशानुग्रहानें उद्धरलें. त्यांच्या शिष्यसमुदायांत सुवासिनी, गतधवा, अशा सर्व स्त्रिया असून त्यांच्या योग्यतेप्रमाणें मठ, देवळें, यांची वेतनसंपादनव्यवस्था, गृहकृत्यें, कीर्तन, वाचन, ग्रंथलेखन, यासारखीं वेगवेगळीं कार्यें त्यांचेकडे सोंपविलेलीं असत.

पुरश्चरण व तीर्थयात्रा आटोपून वयाच्या ३६ व्या वर्षी समर्थ महाराष्ट्रांत कृष्णातीरीं संचार करूं लागल्यानंतर त्यांना अनेकविध स्वरूपाचे जे अनुभव आले त्यांत स्त्रियांची दैन्यावस्था ही प्रत्ययास आली. भिक्षामिषानें मध्यान्हीस एकदां ते मिरजेस गेले असतां एक तरुण विधवा स्त्री भागवत वाचीत असलेली त्यांना आढळली. भागवताचें सार निवेदन करण्याची समर्थांनीं पृच्छा केली. बाईला सांगता येईना. म्हणून तिनें विचारलेल्या प्रश्नांना ओंवीबद्ध उत्तरें देऊन समर्थांनीं तिच्यामध्यें आत्मजिज्ञासा उत्पन्न केली. बाईची वृत्ति विरक्तीनें परमार्थप्रवण बनलेलीं अशा वेळीं समर्थांची भेट झाल्यानें तिला आत्मोद्धाराचीं जिज्ञासा उत्पन्न झाली. समर्थशिष्यिणींपैकीं प्रमुख वेणाबाई त्या ह्या च होत. "भिक्षामिसे लाहानथोरें। परीक्षून सोडावीं॥" असें एक वाक्य भिक्षेचें महात्म्य सांगत असतां दासबोधांत येऊन गेलें आहे. त्याप्रमाणें समर्थ स्वतः ठिकठिकाणीं संचार करून पतितांना परमार्थाचा ओढा लावीत. अशा च एका प्रसंगीं वेणाबाईमध्यें त्यांनीं आत्मजिज्ञासा उत्पन्न केली. समर्थांची त्यांचेवर अत्यंत निष्ठा होती. त्याबद्दलच्या अनेक आख्यायिका उपलब्ध आहेत. वेणाबाईचा मठ हल्ली मरीची क्षेत्रांत आहे. समर्थांच्या निष्ठेबद्दल एक गोष्ट अशी सांगतात कीं, एकदां आपले-पणाच्या भरांत कृष्णातीरीं वाळत असलेल्या वेणाबाईच्या वस्त्राची मेखळा समर्थांनीं कंठीं धारण केली, आणि उद्धव नांवाच्या शिष्यानें पूजाधारणेसाठीं प्रश्न केला तेव्हां "उत्कट आणि येकनिष्ठ" भक्ताच्या ठिकाणीं गुरूची अशी कृपादृष्टी होते असा जबाब दिला.

मनीची जीवीची गोष्टी यथार्थ। भक्ति वेणीसी सांगती समर्थ॥

(प्रताप १३-४७)

अशी वेणाबाईंची योग्यता होती. वेणाबाईंच्या हातचा स्वयंपाक समर्थांना अतिशय प्रिय असे. वेणाबाई एकदां सज्जनगडास राहिल्या असतां सतत १५ दिवस समर्थांनीं वेणाबाईखेरीज कोणाच्याही हातचा स्वयंपाक ग्रहण केला नाहीं. वेणाबाईंच्या बद्दल समर्थांची दृष्टि पक्षपाती असे असें म्हणणारांना समर्थांची शासनाबद्दलची दृष्टि सांगितली पाहिजे. वेणाबाईंच्या हातून अपराध घडला असतां कडक शासन करण्याचा समर्थांचा परिपाठ असे. वेणाबाई ही समर्थशिष्यीणींपैकीं एक कर्तृत्ववान स्त्री होती.

आजच्या उपलब्ध सामुग्रीवरून वेणाबाईंच्या लेखनासंबंधीं संशोधकांनीं विविध स्वरुपाचे तर्क केले आहेत. एवढें निश्चित कीं, वेणाबाईकडून समर्थांनीं कीर्तन, ग्रंथलेखन वगैरे मार्गांनीं परमार्थसाधन करवून घेतलें.

समर्थप्रतापकार गिरिधरांनीं जीं रामायणें लिहिलीं आहेत त्यापैकीं सुंदरकांडाचे पहिले १०० श्लोक व संकेतरामायणाचीं पहिलीं सहा कांडें वेणाबाईंचीं असावींत असा तज्ञांचा अंदाज आहे. "सीतास्वयंवर" नांवाचें एक उत्कृष्ट काव्य वेणाबाईंचें म्हणून उपलब्ध आहे. सीतास्वयंवराखेरीज त्यांचीं कांहीं स्फुट पदें व अभंगरचना उपलब्ध आहे. "श्री रामगूहसंवाद" व "कौल" हीं त्यांची रामचरित्रावरील बऱ्यांपैकीं काव्यें आहेत. *

वेणाबाईंच्या या लेखनावरून त्या बहुश्रुत असाव्यात असें दिसतें. भारत, भागवत, रामायण हे जुन्या परंपरेंतील प्रसिद्ध अभिजात ग्रंथ त्यांना चांगले अवगत असावेत. श्रवण, कीर्तन, ग्रंथलेखनादि मार्गांत समर्थसहवासानें वेणाबाई प्रवीण झाल्या होत्या. समर्थांसारख्या करड्या गुरूच्या शिष्यविषयक कसोटीला उतरण्याइतकी योग्यता वेणाबाईनें मिळविलेली दिसते. समर्थांच्या सेवेंत राहून त्यांनीं कालक्रमणा केली. समर्थांच्या मठांपैकीं कांहीं मठांची व्यवस्था वेणाबाई पहात असत. परंतु वेणाबाई बुद्धिमान असल्यानें मठ व्यवस्थेपेक्षां उच्च स्वरूपाची ग्रंथलेखन कीर्तनादि परमार्थ–साधनाची कामगिरी समर्थांनीं त्यांचेकडे सोंपविलेली असे. इतर समर्थशिष्यीणींपैकीं अनेकांकडे गृहकृत्यादि इतर कार्यें सोंपविल्याची माहिती उपलब्ध आहे.

समर्थसेवेंत परमार्थ साधन करीत असतांना कीर्तनोत्तर वेणाबाईंचें प्राणोत्क्रमण झालें. वेणाबाईंचें उत्तरकार्य समर्थांनीं स्वहस्तें केलें. समर्थांप्रमाणें वेणाबाईंचा

* "श्री वेणाबाईकृत रामायण" रामदास आणि रामदासी मासिकाच्या २३४ व्या अंकापासून सुरू होऊन २५१।५२ या जोड अंकांत पुरें झालें आहे. या रामायणाचीं पहिलीं पांच च कांडें आहेत. शेवटचीं दोन कांडें वेणाबाईंनीं लिहिलीं च नाहींत. —संपादक

देखील मोठा शिष्यसंप्रदाय होता. प्रसिद्ध समर्थचरित्रकार 'समर्थप्रताप' कार गिरिधर हे वेणाबाईचें पट्टशिष्य होत. ते स्वतःस "वेणी गिरिधर" असें संबोधितात. वेणाबाईच्या शिष्यसंप्रदायाचा उल्लेख समर्थप्रतापांत (१२-५५) आढळतो. बाइयाबाई नांवाच्या वेणाबाईच्या एक शिष्या होत्या. वेणाबाईखेरीज आकाबाई, सतीबाई, बहिणाबाई, निरुबाई, अंबिकाबाई अशा किती तरी स्त्रियांचीं नांवें समर्थांच्या स्त्रीशिष्यमालिकेंत आढळतात. आकाबाई या वेणाबाई इतक्या च समर्थसंप्रदायांत प्रसिद्ध आहेत. चाफळ येथील मठाचा कारभार पाहण्याकरितां त्यांची योजना केली होती. समर्थांनीं परमार्थसाधनास स्त्रिया अधिकृत व्हाव्यात म्हणून त्यांचेवर स्वतंत्र कार्याची जबाबदारी कित्येक वेळा टाकलेली असे. व्यवहारांतील किती तरी जोखमीचीं कामें त्यांनीं शिष्यीणींच्यावर सोंपविलेली असत. निरनिराळ्या ठिकाणचीं वर्षासनें गोळा करण्याचें काम आकाबाईकडे होतें, यावरून त्यांच्या कर्तृत्वाचा भाग लक्षांत येईल. सतीबाईकरितां समर्थांनीं स्वतः मारुतीचें देवालय व मठ स्थापन केला होता. बहिणाबाई या सेऊरास समर्थांची कीर्ति ऐकून त्यांचे भजनीं लागल्या होत्या. अंबिकाबाई या गगनबावडा संस्थानांतील राशिवडे येथील मठाची व्यवस्था पहात. शिवाजी महाराजांचे अमात्य निळोपंत यांच्या पत्नी निरुबाई या देखील समर्थांच्या पट्टशिष्यीणींपैकीं होत.

समर्थसंप्रदायानें महाराष्ट्रांत विविध ठिकाणीं वसविलेल्या वेगळ्या वसाहती-प्रमाणें असलेल्या मठांत जेवणखाण, पाहुण्यांचें आगत-स्वागत, वर्षासनें गोळा करणें, परमार्थसाधनानिमित्त भजनकीर्तनादि उपासनांचा अवलंब करणें इत्यादि कार्यभाग स्त्रियांवर सोंपवून स्वावलंबन, आत्मविश्वास, भूतदया, समता, इत्यादि परमार्थसाधनसुलभ गुणांचा परिपोष त्यांचेमध्यें घडवून आणला.

समर्थांचें स्त्रीविषयक धोरण अत्यंत उदात्त असून हि त्यांच्या शिष्य-परिवाराच्या तत्त्वज्ञानांत, विचारसरणींत पूर्वपरंपरेंतील अनुदारतेची छाया दिसते च. अशा प्रकारचा विरोध कां उत्पन्न व्हावा याची कारणमीमांसा करण्यापूर्वी त्यांतील प्रमुख सांप्रदायिकांच्या विचारसरणीचा ध्वनि लक्षांत घेणें आवश्यक आहे.

## समर्थसांप्रदायिकांचें स्त्रीविषयक तत्त्वज्ञान

समर्थसांप्रदायिकांनीं सऱ्हास साऱ्या स्त्रीसमाजाला परमार्थसाधनाचा मार्ग खुला ठेवलेला नाहीं. त्यांतून कित्येक स्त्रीवर्गाला बहिष्कृत केलें आहे. शिष्यत्व, उपदेशानुग्रह, गुरुत्व या भूमिकांना कोणत्या स्त्रिया लायक असतात याविषयीं श्रीसमर्थ व त्यांचे सांप्रदायी यांच्यांत एकमत नाहीं. गुरुत्वाला व शिष्यत्वाला कांहीं विशिष्ट स्त्रिया लायक नसतात अशी विचारसरणी कांहींनीं प्रगट केली आहे.

स्वानुभवदिनकर कलाप ४ किरण ४ मध्यें दिनकरांनीं सांगितलें आहे:

आणि परस्त्रिया ज्या कां सुवासिनी। त्या हि त्याज्य केवळ प्रबोधनीं।
ज्यांचिया कटाक्षमात्रें अव्यसनी। योगी भ्रंशती तत्काळ ॥ ७ ॥

उपदेशानुग्रहास या स्त्रिया योग्य नाहींत, असें दिनकरांचें मत दिसतें. या बाबतींत आणखीही विधिनिषेध त्यांनीं सांगितला आहे.

तथापि विरक्त सुशीळा न्यस्तकामा। मुमुक्षभावें धरूनि प्रेमा।
भर्तारेंसहित सद्गुरु सर्वोत्तमा। शरण आलिया जरि ॥ १० ॥

तरि भर्तारसहित अनुग्रह। विरक्तासी करावा निःसंदेह।
भ्रर्तारेंविण कदापि स्त्रीसमूह। उपदेशूं नये ॥ ११ ॥

या शब्दांत विरक्त स्त्रियांना च केवळ, व तो सुद्धां त्या पतिसमवेत शरण आल्यास पतिसमक्ष अनुग्रह करावा असा कटाक्ष बाळगला आहे.

आणि विधवा अथवा सुवासिनी। असलिया तरुण कामिनी।
तयांसी कदापि हि भल्यांनीं। प्रबोधवार्ता करूं नये ॥ १२ ॥
जरि विधवा जाली सार्थकोद्यता। तरि तीसी तीर्थाटण करवावें तत्त्वता।
तीर्थाटणें निष्काम विरक्तता। प्राप्त होईल सहजें ॥ १३ ॥
सुवासिनी तरुण स्त्रियेसी। भर्तार देव निश्चयेंसी।
त्याचिया भजनें तियेसी। उत्तम गति सहजें ॥ १४ ॥

या शब्दांत कोणत्या स्त्रियांना उपदेशानुग्रह करावा व कोणाला करूं नये हें स्पष्ट सांगून विधवा स्त्रियांना विरक्ति उत्पन्न करण्याचे मार्ग सुचविले आहेत.

वरीलपैकीं शरणागत स्त्रियांना विहिरी, मठ, देवळें, देव देवतार्चनरूप सेवेचा मार्ग दाखवावा असा स्पष्ट निर्णय समर्थनिर्याणानंतर १४ वर्षांनीं दिनकर स्वामींनीं दिला आहे. पति हा च सुवासिनींचा देव व त्याची भक्ति ही च तिची मुक्ति अशी परंपरेचीही री ओढली आहे. गुरूपदेश भर्ताराच्या आज्ञेनें घ्यावा, भर्तारांत मोक्षमार्गाची इच्छा उत्पन्न करावी, अशा तऱ्हेचें परावलंबन परमार्थमार्गांत स्वानुभवदिनकरकार दिनकर या समर्थशिष्यांनीं कायम ठेवलें आहे. स्वानुभवदिनकर कलाप ६ किरण ५ मध्यें अशा अर्थाचे शब्द आहेत.

समर्थांचे श्रेष्ठ बंधु रामीरामदास यांनीं "सुगमोपाय" या ग्रंथांत "गुरुशिष्य-लक्षणवर्णन" या दुसऱ्या प्रकरणांत

सद्गुरुमध्यें एक शरण्य एक अशरण्य । असद्गुरुमध्यें हीं वरेण्य एक अवरेण्य ।
स्त्रिया आणि हीन वर्ण । तेथें गुरुत्व चि नाहीं ॥ ४ ॥

असा निर्णय दिला आहे. त्यांच्या मतें स्त्रियांना गुरुत्वही नाहीं व शिष्यत्वही नाहीं. पतित स्त्रिया आणि सुवासिनी अशिष्यांत जमा केल्या आहेत (प्र. २ ओवी ५५). सुवासिनींना अध्यात्मविद्यामार्ग खुला असू नये असें सांगून त्यास परंपरेचा आधार दिला आहे. स्त्रियांनीं जपतपअनुष्ठान करावयाचें तें भर्तृप्रेमासाठीं. पूर्वापार आत्मज्ञानी स्त्रिया आहेत; परंतु "परस्त्रीप्रबोधपरंपरा" आपल्या कानावर नाहीं असें ते म्हणतात.

पूर्वोत्पर आहेति च आत्मज्ञानी । आणि स्त्रियाही अति सुसीळा जनीं ।
परि परस्त्रीप्रबोधपरंपरा कानीं । नाइकिजेति जनीं ॥ ६७ ॥

कदापि विधवा अनाथा न्यस्तकामा । सुसीळा भजविल्या श्रीरामा ।
विजितेंद्रियें यथान्यायें तरि क्षमा । करील जानकीनाथ ॥ ६८ ॥

श्रीरामभजनें तरल्या गतभर्तृका । प्रसिद्ध पुराणीं गुणवत्यादिका ।
परतु अन्य धर्मे तरल्या सभर्तृका । ऐसें नाहीं कोठें ही ॥ ६९ ॥

एवं परस्त्रिया आणि पतित । शिष्य नव्हती हे निभ्रांत ।

अशा तऱ्हेचे अभिप्राय श्रेष्ठांनीं व्यक्त केले आहेत.

समर्थांनीं स्वतः लोकाचार, परंपरा यास न जुमानतां स्त्रियांना संप्रदायांत प्रविष्ट करण्याचें जें नैतिक धैर्य दाखविलें तें सामान्य शिष्यांना दाखवणें अशक्य होतें. यामुळें अशा तऱ्हेची अनुदारता शिष्यांच्या व सांप्रदायिकांच्या विचारसरणींत राहिली असावी. परंपरेचा प्रभाव कित्येक थोर संतांनाही सुटला नाहीं, मग या सामान्य व्यक्तींची काय कथा? राजकारण, समाज, धर्म, इत्यादि क्षेत्रांत नवी परंपरा निर्माण करणाऱ्या युगप्रवर्तकांचें सामर्थ्य इतर सांप्रदायिकांत आढळतें च असें नाहीं. पूर्वपरंपरेची, पूर्वग्रहांची, लौकिक समजुतींची छाया त्या क्षेत्रांत प्रविष्ट होऊन तें तें तत्वज्ञान गढूळ होत असतें. एकादें तत्त्वज्ञान निर्माण झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होत असतांना त्यांत बरें वाईट फरक होतात च. पुष्कळदां हीं स्थित्यंतरें मूळाशीं विरोध करूं लागतात. अशी

स्थिति समर्थ व त्यांचे सांप्रदायिक यांचेमध्यें उत्पन्न झाली आहे. हीं स्थित्यंतरें अखेर मूळ तत्त्वज्ञानांत मालिन्य उत्पन्न करतात, व मूळाला च विपरीत स्वरूप प्राप्त होतें. समर्थशिष्यांच्या तावडींत सांपडलेला हा समर्थांचा मूळ संप्रदाय नव्हे. आज त्यांत अनेक तऱ्हेचें मालिन्य उत्पन्न झालें असेल. परंतु हें च त्याचें मूळ स्वरूप असें समजण्याचें कारण नाहीं. समर्थसंप्रदायांत कांहीं मूळ आचार शिल्लक राहिले, तर कांहीं नवीन उत्पन्न केले आहेत. स्त्रीशिष्यांच्या बाबतींतील वरील स्वरूपाचा पक्षपात प्रतिकूल व विपरीत स्थित्यंतराचा द्योतक आहे.

परमार्थसाधनांत स्वावलंबन हा पहिला टप्पा आहे. त्यानंतर आत्मविश्वास, निरपेक्ष कार्यनिष्ठा, निस्पृहता वगैरे गुण आपोआपच सिद्ध होत जातात. ही भूमिका स्त्रियांकरितां परमार्थसाधनाचें एक स्वतंत्र कार्यक्षेत्र निर्माण करून समर्थांनीं उत्पन्न केली.

वेणाबाईच्या बाबतींत समर्थांनीं विशेष परिश्रम केले असा पक्षपाताचा आरोप त्यांचेवर येतो. त्याचें निराकरण असें करतां येईल कीं, वेणाबाईनें आपल्या कर्तृत्वानें आपली योग्यता पटवून दिल्यामुळें समर्थांना त्यांचेबद्दल आत्माविश्वास वाटूं लागला. ज्या त्या शिष्यीणींच्या योग्यतेप्रमाणें प्रत्येकीनें भिन्न भिन्न साधनांचा अवलंब केला. कांहींनीं ग्रंथलेखनादि बौद्धिक मार्गाचा परमार्थसाधनार्थ अवलंब केला. तर इतरांनीं भजन, परोपकारादि मार्गांचें आक्रमण केलें. यावरून स्त्रियांच्या योग्यतेबद्दलही साशंक होण्याचें कारण नाहीं. समर्थशिष्यांपैकीं पुरुष वर्गांत कल्याणस्वामी, गिरिधरस्वामी, व दिनकर या च व्यक्तींनीं केवळ ग्रंथरचना केली. त्याप्रमाणें च स्त्रियांमध्यें फार थोड्या लेखिका झाल्या. यामुळें समर्थांवर पक्षपाताचा आरोप कसा येऊं शकतो? गुरूनें सारखा च अनुग्रह केला, तरी शिष्याच्या बुद्धिमत्तेनुसार त्या अनुग्रहाचें परावर्तन होतें असें भवभूतीनें म्हटलें आहे.

समर्थांच्या शिष्यपरिवारांत स्त्रियांचा सऱ्हास समावेश झाला आहे. सुवासिनी, पतित, अनाथ, गतधवा, अशा साऱ्या स्त्रिया त्यांत आहेत. त्या त्या स्त्रियांमधील सत्प्रेरणा, परमार्थोद्यतता, वैराग्य, आत्म-जिज्ञासा, श्रद्धा वगैरे गुणांची साक्ष पटल्यावर च समर्थांनीं त्यावर अनुग्रह केला असावा.

परमार्थविवरण स्वतः करून इतरांकडूनही करवावें, उदंड समुदाय एकत्र करून त्यामध्यें पारमार्थिक जागृति घडवावी, अशी महंतांसंबंधीं समर्थांची अपेक्षा आहे. वेणाबाईच्या हातून ही अपेक्षा बऱ्याच मर्यादेपर्यंत सफल झाली आहे. त्यांच्या शिष्यवर्गांत ज्याप्रमाणें कल्याण, उद्धव, दिनकर, गिरिधर यांचेमध्यें

त्यांचा आदर्श प्रगट झाला आहे, त्याप्रमाणें स्त्रीशिष्यांत वेणाबाईमध्यें त्यांचें स्त्रियांसंबंधीचें धोरण व्यक्त झालें आहे.

सांप्रदायिकांनीं स्त्रिया व परमार्थसाधन या संबंधांत धरसोडीची वृत्ति दाखविली असली, तरी स्त्रिया परमार्थसाधनाला पूर्णपणें सिद्ध होऊं शकतात अशी समर्थांची ठाम विचारसरणी आहे. ही परंपरा समर्थांनीं च उत्पन्न केली व महाराष्ट्रांत दृढमूल केली.

---

( २३ )

# श्री समर्थ आणि धर्मप्रचार

( लेखक – वैद्यराज **वा. कृ. दाणी**, बी. ए., भिषगाचार्य, आयुर्विद्यानिधि,
संचालक – भारतीय हिंदुधर्म मिशन, केंद्र कार्यालय, **दारव्हा** )

हिंदुधर्म हा मिशनरी धर्म नाहीं असा आक्षेप आहे. हिंदु लोकांची दृष्टि स्वतःपुरती आहे, जगापुरती नाहीं, त्यांच्यांत धर्मप्रचारवृत्ति नाहीं, ते आपल्याहून बाहेरच्यास आपल्यांत घेत नाहींत व म्हणून हा धर्म हळुहळु संख्येच्या दृष्टीनें आटत जाईल अशीं मनोराज्यें कांहींचीं चालू आहेत.

आमच्या मतानें हा प्रश्न प्रचारशास्त्रांतील एक महत्त्वाचा मुद्दा च होय. पाश्चात्य प्रचारशास्त्र आणि आमचें प्रचारशास्त्र ह्यांतील महत्त्वाचा फरक येथें पाहण्यासारखा च आहे. पण हें सांगण्यापूर्वी ह्या आक्षेपांतील प्रश्नास प्रथम उत्तर देऊन नंतर त्या प्रश्नाचा गाभा हि फोडून व उकलून पाहिला पाहिजे.

मनुस्मृतीच्या १ ल्या अध्यायाच्या २३ व्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मदेव हा च जगांतील पहिला धर्मप्रचारक होय. त्यानें च अग्नि, वायु, रवि व अंगिरा या चार ऋषींपासून चार वेदांचें ग्रहण करून संपूर्ण वेदाचा उपदेश करणारा असा पहिला मान मिळविला. ही मुख्य गादी देवर्षि नारद यांनीं च पुढें चालविली. नारद हे अमर असल्यामुळें त्यांचा साक्षात्कार अनेकास झालेला आहे. त्यांच्याच बरोबर उत्पन्न झालेले सनक, सनंदन, सनदकुमार, सनातन, दत्तात्रय आदि अनेक थोर पुरुष ह्या धर्माचा प्रचार जगभर करते झाले ही गोष्ट हिंदुधर्माच्या विविध ग्रंथांतून आलेली आहे. अनेक ऋषिमुनि ह्या च धर्माचे प्रचारक होते. **आफ्रिके**मध्यें ( **अप्रियक** खंडांत ) कण्व ऋषि प्रचारार्थ गेल्याचा उल्लेख आहे. काश्यपांनीं कश्यप सागराचे ( कास्पीयन सी ) ठायीं धर्मप्रचारार्थ मठ स्थापला होता. भारतांतील शर्मांनीं ( शर्मन = जर्मन् ) म्हणजे ब्राह्मणांनीं युरोपांत जाऊन धर्मप्रचार केला ह्या गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या च आहेत. याप्रमाणें च आठ हि दिशांना भारतांतील वैदिक धर्मप्रचारक प्रचारार्थ पूर्वी गेलेले आहेत ही गोष्ट सिद्ध करतां येते.

वैदिक धर्मप्रचारकांची ही कला बुद्ध व जैन आदि इतर भारतीयांनीं हि उचलली व ख्रिस्ती मिशनरी हि त्यांची च नक्कल शिकले. यावरून धर्मप्रचाराची मूळ कल्पना व पद्धति हिंदूंची च होय इतकें सहज लक्षांत येईल. जेव्हां जगभर

वैदिक धर्म च एकमात्र होता तो काळ गेल्यावर म्हणजे जनमेजयाच्या काळानंतर वैदिक धर्माची भौगोलिक मर्यादा आकुंचित होत आली, व अधीसीय कृष्णाच्या काळापर्यंत ती ईस्ट इंडीज बेटें, मलाया व इंडोचायना येथपर्यंत च येऊन ठेपली. पुढें शंकराचार्यांच्या काळांत हिंदुस्थानपुरती च ती मर्यादित झाली, व तेथपासून हिंदुधर्मास बाहेर फारसा वाव दिसत नाहीं.

हिंदुस्थानांत बाहेरून आक्रमणें सुरु झाल्यावर फक्त धर्मसंरक्षणाचें च कार्य काय तें मुख्यतः करावें लागले व तें च श्रीसमर्थांच्या काळापर्यंत चालू होतें. श्री शंकराचार्यांनीं बौद्ध व जैन यांच्यातून परत सर्व लोकांस वैदिक हिंदुधर्मांत घेण्याचें जें महत्कार्य केलें त्याहि वरून धर्मप्रचाराची दुसरी बाजू ह्या हि वेळीं जागृत होती हें स्पष्ट दिसतें. आद्य शंकराचार्यांनीं चार दिशेला सतत धर्मप्रचार चालू रहावा म्हणून चार आचार्यपीठें स्थापन केलीं व इतर आचार्यांनीं हि तशी च कामगिरी केली. ह्या चार तत्त्वज्ञानी आचार्यांनंतर संत-परंपरा मोठ्या प्रमाणांत अखिल भारतांत सुरू झाली व महाराष्ट्रांत हि ती अखंड च राहिली. संतांनीं भागवत धर्माची म्हणजे वैदिक भक्तिमार्गाची महती व साधना वाढविली व त्यामुळें च बहुजनसमाज हिंदुधर्मांत उद्धरून राहिला.

लोक कमकुवत झाले, बाह्य विषयांत अत्यंत लोलुप झाले, म्हणजे च अभ्युदयास हि अपात्र होतात ही महत्त्वाची शिकवण निवृत्तिमार्गी संतांनीं आद्य शंकराचार्यांपासून दिली. कोणता हि अभ्युदयवादी वा प्रवृत्तिवादी पुरुष हा जर आधीं निवृत्त मार्गांतून गेला नसेल तर तो अयशस्वी होतो हा महत्त्वाचा सिद्धांत हिंदुधर्मप्रचारशास्त्राचा गाभा होय. केवळ पोटभरू पगारी धर्मप्रचारक ह्या कार्यास निरुपयोगी होत. परमेश्वरास ज्यांनीं सर्वस्व अर्पण केलें आहे व जो आपल्या उपास्याहून भिन्न राहिला नाहीं तो च अहंकारहीन असूं शकेल व अहंकारत्यागा-शिवाय कार्य सफळ होऊं शकत नाहीं. ह्यासाठीं म्हणजे कार्यवृद्धि होण्यासाठीं च बहुजनसमाजांत निवृत्तीचा प्रचार समर्थांपूर्वींच्या संतांनीं केला. व त्यानंतर श्रीसमर्थांचा अवतार झाला. श्रीसमर्थांपूर्वीं (बॅक ग्राऊंड) पार्श्वभूमि अशा तऱ्हेनें तयार झाली होती.

### — श्रीसमर्थांच्या काळांत —

ज्या समाजांत धर्मप्रचार करावयाचा तो समाज निवृत्तगामी बनून तयार होता. पण ज्या व्यक्ति प्रचार करणार त्यांना तयार करावयाचें होतें.

ऐसा सर्वात्मा श्रीराम। सांडूनि धरिती विषयकाम।
ते प्राणी दुरात्मे अधम। केले पावती॥

जयांसीं वाटे सीण व्हावा। तेणें विषय चिंतीत जावा।
विषय न मिळतां जीवा। तगमग सुटे ॥

वक्ता म्हणे हो येकभावें। भगवद्भजन करावें।
तेणें होईल स्वभावें। समाधान ॥

(दासबोध)

श्रीसमर्थांनीं प्रथम स्वतः परिपूर्ण म्हणजे समर्थ होऊन मग शिष्यप्रचारक तयार केले व त्यांच्या ठिकाणीं वरील उपदेश करून भक्ति, ज्ञान, व वैराग्य प्रथम उत्पन्न केलें. ज्याच्या ठिकाणीं भक्ति, ज्ञान व वैराग्य नाहीं, तो धर्मप्रचारक वा "हिंदुमिशनरी" होऊं शकत नाहीं हा महत्वाचा पाठ त्यांनीं शिकविला. अनेक गांवीं मठ स्थापून त्यांनीं तेथें महंतांची स्थापना केली. मठ हा शब्द शंकराचार्यांच्या वेळीं हि रूढ होता च. मठ ह्याचाच अर्थ मिशन होय. "महंत" हा शब्द हल्लींच्या "बिशप" ह्या शब्दास प्रतिशब्द म्हणून लावतां येईल.

तंजावरपीठपति शहापुरकर भीमस्वामी यास पाठविलेल्या एका पत्रांत श्रीसमर्थ म्हणतात —

प्रवृत्तीसी पाहिजे राजकारण। निवृत्तीसीं पाहिजे विवरण।
जेथें अखंड श्रवण मनन। धन्य तो काळ ॥

प्रवृत्तीमध्यें व्यक्तीच्या अभ्युदयापासून समष्टीच्या अभ्युदयापर्यंत सर्वांचा समावेश होत असतो. ह्या दोन्हीं अभ्युदयाचें मूळ राजकारणांत आहे व म्हणून राजकारण करणें ही च खरी प्रवृत्ति होय.

मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्व विषईं।

पहिल्या हरिकथानिरूपणांत धर्माचा पहिला भाग जो निवृत्ति व तदंतर्गत अंतर्मुख झाल्यानें होणारा विषयत्याग व वैराग्य व नंतर भगवत्प्राप्ति ह्या सर्वांचा भक्तिमार्गांत समावेश होतो व त्या नंतरच्या दुसऱ्यांत धर्माचें दुसरें अंग जी प्रवृत्ति, जींत व्यष्टि व समष्टींचा अभ्युदय सांठविलेला आहे, व ज्यामुळें च जगाची बिघडलेली घडी पुन्हां प्रस्थापित करतां येते, तें राजकारण ह्याचा समावेश होतो.

जनमेजयाच्या काळापासून बिघडूं लागलेलें धर्मकारण व त्याचमुळें धर्मावर सर्वस्वीं अवलंबून असलेलें जागतिक राजकारण श्रीसमर्थांपूर्वी फक्त निवृत्तींत म्हणजे हरिकथानिरूपणांत जें प्राण धरून होतें तें श्रीसमर्थांच्या काळांत श्रीसमर्थांच्या भगीरथ प्रयत्नांमुळें च त्यांच्या श्रीनारदव्यासपरंपरेस धरून पुन्हां नवीन सुरु केलेल्या

धर्मप्रचारशास्त्रामुळें च, धर्मकारण व तदंतर्गत धार्मिक राजकारण, फळास येऊं लागलें. ब्राह्मण व क्षत्रीय यांच्या जोड्या हातांत हात घालून धर्माची धुरा खांद्यावर धरून चालूं लागल्या.

महाराष्ट्रांत स्थापन झालेल्या ह्या नवीन 'मठ' कार्याची धुरा सर्व भरतखंडांत नाचली. सर्व भरतखंडांत समर्थांचे मठ स्थापन झाले. मठकार्याप्रमाणें राजकार्यास हि बहर आला. श्री शिवाजी महाराजांची एक इच्छा आपण "अश्वमेधयज्ञ" करावा, अशी होती. चक्रवर्तित्वाशिवाय हा यज्ञ कसा होणार? भारताचें चक्रवर्तित्व धारण करण्याची च ती इच्छा होती. श्री शाहू राजे दिल्लीच्या बादशहापासून स्वराज्याची सनद मिळविणारे मानसिक गुलाम होते. चक्रवर्ती होण्याची इच्छा एका भाऊसाहेब पेशव्याखेरीज आणखी कोणांत त्यानंतरच्या काळांत दिसली नाहीं. श्रीसमर्थांनीं उत्स्फूर्त केलेलें व श्री शिवरायांनीं संकल्पित केलेलें हें चक्रवर्तीपद दिल्लीच्या तक्तापाशीं मानसिक दौर्बल्यामुळें अडखळत आहे हें दिसल्यामुळें च भाऊसाहेबांना तें तक्त आपल्या घणांनीं फोडावें लागलें. त्यासरशी महाराष्ट्राची नव्हे तर भरतखंडांतील सर्व भावड्या हिंदूंची मानसिक दुर्बलता फोडून टाकली. "हिंदुधर्माचें साम्राज्य हें विषयोपभोगासाठीं नव्हे तें जगदोद्धारासाठीं असतें," व "हिंदुपदपादशाही ही हिंदुस्थानांतील नामधारी हिंदूंच्या च जीवाचा केवळ तरणोपाय नव्हे तर **रूमशामवर भगवा झेंडा लागतां च** अखिल निखिल मानवजातीच्या उद्धाराचा तरणोपाय होणार आहे" ह्या उदात्त कल्पना श्रीसमर्थ व श्री शिवाजी यांच्यानंतर जर कोणांत जागृत झाल्या असतील तर त्या फक्त श्री सदाशिवरावांत च होत्या. त्यानंतर मठ राहिले, कफन्या राहिल्या, कमंडलु व दंड राहिले इतकें च नव्हे तर दुसऱ्या बाजीरावापर्यंत राजदंड हि राहिले, पण श्रीसमर्थांचा "मठ"– मिशन – नष्ट झालें.

आजच्या निराशेच्या काळांत हा च सर्व बाह्य देखावा डोळ्यासमोर दिसतो. परंतु खरोखर हें च समर्थांचें "मठ" कार्य होय काय? श्रीसमर्थांनीं हिंदुधर्मप्रचार कार्याच्या परंपरेंत स्वतःचें एक विशिष्ट स्थान उत्पन्न केलें, एक स्वतंत्र प्रचारशास्त्र निर्माण केलें, दासबोधांतील "महंताचीं लक्षणें" ह्यांत "मिझनरी" कसा पाहिजे हें शब्दशः आलेलें आहे. आजचें धर्मनिरपेक्ष हिंदुत्व हें मॅझिनीप्रमाणें राष्ट्रीयत्व कदाचित असेल, परंतु समर्थांप्रमाणें "महाराष्ट्रीयत्व" हि नव्हे, मग खरें "हिंदुत्व" तर नव्हे च नव्हे. कारण त्यांत हरिकथानिरुपणास, ईश्वरनिष्ठेस, निवृत्तीस, **पोथीजात** वैदिक विचारास थारा नाहीं. शास्त्रप्रामाण्यास 'पोथीजात' हे टिंगल करणारें विशेषण लावण्यांत च पुरुषार्थ मानला जातो. "हरिकथा-निरुपण" ह्यांत वैयक्तिक अहंकारास थारा नसतो. वैराग्याशिवाय तें होऊं शकत

नाहीं. वैयक्तिक जाहिरातबाजीस समर्थांनीं कसें बाजूस लोटलें व अनेक उत्सव, समारंभ व मेळे चालू करून, लोकसंग्रह करून व आपलें नांव कोठें च दिसूं न देतां, स्वतः बाहेरून, अलिप्त राहून, आपल्या गुप्त जागेंतून समारंभाची शोभा पाहत समाधान मानण्याचें वळण आचरणानें दिलेलें आहे.

लवकरच हा निराशेचा काळ हि पालटला पाहिजे. सर्व जगाची धर्मभूमि भरतखंड होय. तिच्यांतील आनंदवनभुवन ४० जिल्ह्यांचा महाराष्ट्र होय. नर्मदा ते तुंगभद्रा जो प्रदेश तो च महाराष्ट्र. विश्वोद्धाराची गुरुकिल्ली श्रीसमर्थ सद्गुरूंनीं पूर्वी ह्या च महाराष्ट्राजवळ मराठी भाषेंतून दिली. तिनें उद्धाराचीं कपाटें उघडण्याचा अधिकार महाराष्ट्राचा च होय. सर्व आकुंचित व अनीश्वर (godless) विचारांना धुडकावून, ईश्वरीय वैदिक धर्मद्वारें विश्वांतील मानवजातीच्या उद्धारासाठीं सर्वस्वाची कुरवंडी करून, श्रीसद्गुरूंच्या ठायीं अहंकारास लीन करणारे धर्मप्रचारक निर्माण होऊन श्रीसमर्थ व श्रीशिवाजी यांचें "मठ" कार्य म्हणजे च धर्मप्रचारकार्य पूर्ण केलें जावो ही च श्रीभगवंतचरणीं अंतःकारणपूर्वक प्रार्थना!

---

# (२४)

# श्री समर्थ आणि संगीत

(लेखक–रा. **राजाराम गणेश पंडित**, कृष्णधाम, **माहुली**)

॥ पद ॥

गायनी कळा सरस गायनी कळा ॥ ध्रु०

बहुत विद्या बहुत कळा। सकळ कळा विकळा ॥ १

जगजीवन मनमोहन हा रे। निवळ निवळ निवळा ॥ २

दास म्हणे रे साधक वेधक। सार सौम्य सबळा ॥ ३

—समर्थकृत पदपदांतरें पृ. ६१

(१) संगीतामध्यें गायन, वादन व नर्तन या तीन कलांचा समावेश होतो. पैकीं नर्तनकला विशेष प्रचारांत नसल्यामुळें सर्वसामान्य लोक संगीत म्हणजे गायनवादन असेंच समजतात. गायन व वादन हे श्रवणविषय असून नर्तन हा दर्शनविषय आहे. उदाहरणार्थ, एकाद्या घराच्या वरच्या मजल्यावर जर संगीताचा जलसा चालू असला, तर रस्त्यानें जाणारी येणारी मंडळी त्यापैकीं फक्त गायन-वादनें च ऐकूं शकतात; तेथील नृत्य किंवा हावभाव पाहूं शकत नाहींत. त्यामुळें प्रत्यक्ष जलसा पाहणारांना जितका आनंद होतो, तितका आनंद केवळ गायनवादन ऐकणाऱ्या रस्त्यांतील मंडळींना होऊं शकत नाहीं. तथापि तेवढ्या श्रवणानंदासाठीं कित्येक लोक रस्त्यावर ताटकळत उभे राहिलेले आढळतात. अशी स्थिति असतांना श्रीसमर्थांच्या च संगीतप्रेमाचें कौतुक कशास करावयास पाहिजे, असें कोणीही म्हणेल.

(२) कौतुक अशासाठीं करावयाचें कीं, समर्थांचे संगीतावरील उत्कट प्रेम त्यांच्या दासबोधादि ग्रंथांतून जसें उफाळून व्यक्त झालेलें आहे तसें तें इतरत्र कोठें हि पहावयास सांपडत नाहीं. फुलावरून झाडाची परीक्षा करावी व बोलावरून मनाची परीक्षा करावी, अशी जी एक शिष्टसंमत म्हण आहे, तीप्रमाणें हि श्री समर्थांच्या वाङ्मयाकडे पाहिल्यास, त्यांच्या इतका संगीताचा कळकळीचा पुरस्कर्ता व मुक्तकंठ स्तुतिपाठक आजवर क्वचितच झाला असेल, असें म्हणावें लागतें. त्यांचें हे संगीतविषयक वाङ्मय कोणतें, हें आतां आपण पाहूं:—

(३) राष्ट्रांतील प्रत्येक उत्साही व्यक्तीला, आत्मोन्नतीसाठीं व लोककल्याणासाठीं ज्या ज्या विषयांचा अभ्यास करण्याचा समर्थांनीं आदेश दिला आहे, त्यामध्यें त्यांनीं संगीत विद्येचा हि अंतर्भाव केलेला आहे.

प्रथम लिहिणें दुसरें वाचणें। तिसरें सांगणें अर्थांतर ॥ १
सहावें तें गाणें सातवें नाचणें। टाळी वाजवणें आठवें तें ॥ ३
—स्फु. ओ. १४.

ज्याला अनुकूलता असेल त्यानें लिहिण्यावाचण्याच्या शिक्षणाप्रमाणें च गाण्यावाजवण्याचें हि शिक्षण घेणें इष्ट आहे, असा त्यांचा अभिप्राय होता. परंतु त्या धामधुमीच्या काळांत आजच्या सारखी संगीत विद्यालयें अस्तित्वांत नव्हतीं. म्हणून त्यांना सांगावें लागलें कीं,

जाणत्यापासीं गावें गाणें। जाणत्यापासीं वाजवणें।
नाना आळाप सिकणें। जाणत्यापासीं ॥ ६
—दास० १८–२.

(४) संगीतविद्या शिकावयाची म्हणजे संगीतशास्त्राची केवळ मूलतत्वें जाणत्या गुरूपासून समजावून घेऊन भागत नाहीं; तर गुरूच्या गाण्यावाजविण्याचें हुबेहूब अनुकरण हि करून पहावें लागतें. सफाईदार रीतीनें व आकर्षकपणें गातां किंवा वाजवितां येणें यांत च कला असते. शास्त्र व कला मिळून संगीतविद्या होते. अशा संगीतविद्येचें शिक्षण पूर्ण झाल्यावर साहजिक च रसिक मंडळी नूतन गायकाला गाणें म्हणण्याचा आग्रह करूं लागतात. अशा वेळीं त्यानें काय करावें तर,

दुसऱ्याचें अंतर जाणावें। आदर देखोन म्हणावें।
जें आठवेल तें गावें। हें मूर्खपण ॥ १८-३-१६

ज्याची जैसी उपासना। तेंचि गावें चुकावेना।
रागज्ञाना ताळज्ञाना। अभ्यासावें ॥ १७

(५) संगीताचा शिक्षणक्रम पुरा केला असला तरीसुद्धां नवशिक्षिताला रागज्ञानाची आणि तालज्ञानाची सतत उजळणी ठेवावी लागते. नाहींपेक्षां असा प्रसंग येतो कीं, त्यानें मोठ्या ऐटीनें चार मंडळींत गावयास बसावें व मध्यें च तालसूर चुकून जाऊन सारा रंगाचा बेरंग व्हावा. म्हणून च समर्थ इषारा देतात कीं,

गर्व गाणें गाऊं नये। गातां गातां गळों नये ॥ १४-४-३

आपल्या गायनविद्येचा बिलकूल गर्व न बाळगता गवयानें अगदीं साधेपणानें व सावधपणानें गाण्याचा परिपाठ ठेवावा; म्हणजे हळू हळू त्याला संगीत नैपुण्य प्राप्त होईल. अशा निपुणाचा समर्थांनीं केवढा तरी गौरव केला आहे.

सुघड संगीत गाणें करील ते शहाणे।
तयासी तुळितां उणें सकळ कांहीं ॥

रसाळ कोमळ ताळें सुललित उफाळें। सरळें खेळेंमेळें गायनी कळा ॥ १
सुरस मधुर स्वरें भेदीकचि उतरें। चतुरासी चतुरें समाधान ॥ २
अंतरंगें तरंगें नभ चि भरलें रंगें। आलापें रागरंगें गलित तनु ॥ ३
सकळ कुशळ जनमनेंसीं मिळतां मन। परम समाधान रामदासीं ॥ ४

—पदपदांतरें पृ. १४०

(६) यानंतर संगीत पारंगताला 'वैभवा'कडे नेणारे दोन मार्ग श्रीसमर्थांनीं दाखवून दिले आहेत. पहिला मार्ग असा कीं ज्याच्या अंगात संगीताच्या जोडीला बहुश्रुतपणा व वक्तृत्व असेल त्यानें

कलयुगीं कीर्तन करावें। केवळ कोमळ कुशल गावें।
कठीण कर्कश कुटें सांडावें। येकीकडे ॥ १४–४–१

नाना नेटक नागर। नाना नम्र गुणागर।
नाना नेमक मधुर। नेमस्त गाणें ॥१५

ताळ तुंबरे तानमानें। ताळबद्ध तंतगाणें।
तूर्त तार्किक तनें मनें। तल्लीन होती ॥ १६

राग रंग रसाळ सुरंगें। अंतर संगीत रागें।
रत्नपरीक्षा रत्नामागें। धांवती लोक ॥ २७

कीर्तनकार चांगला गाणारा असला म्हणजे त्याच्या कीर्तनाला अलोट गर्दी होते; पण जोपर्यंत त्याचें स्वतःचें आचरण त्याच्या कीर्तनांतील निरूपणाशीं विसंगत असतें, तोपर्यंत त्याच्या उपदेशाचा लोकांच्या मनावर कांहींहि परिणाम होत नाहीं व ते त्याला विशेष मानीत नाहींत. म्हणून होतकरू कीर्तनकारानें

जैसें बोलणें बोलावें। तैसेंचि चालणें चालावें।
मग महंतलीळा स्वभावें। आंगीं बाणे ॥ १२–९–२३

सांग महंती संगीत गाणें। तेथें वैभवास काय उणें।
नभामाजी तारांगणें। तैसे लोक ॥ २७ ॥

(७) हा झाला वक्तृत्वसंपन्न गायकाचा मार्ग. पण ज्या गायकापाशीं उत्कृष्ट गानकौशल्य असून वक्तृत्व नसेल, त्यानें आपल्या गायकीच्या सामर्थ्यावर देशाटन करून उदंड कीर्ति व लोकप्रियता संपादन करावी. मात्र त्यानें आपल्या गाण्याच्या बैठकींतून व जलशांतून देवाधर्माची व देशकालवर्तमानाची जाणीव करून देणारी गाणींच गावीं; म्हणजे ती त्याची गायनविद्या कृतकृत्य होईल. असा समर्थांनीं अंतःकरणपूर्वक निर्वाळा दिला आहे.

संगीत गायनी विद्या। सर्व सद्या मनोरथा।
विदेश पाहतां नाहीं। धन्य ते गायनी कला ॥ १

आवडी सकळै लोका। प्रीतीनें भजती जनीं।
इच्छिलें पुर्विती सर्वै। धन्य ते गायनीकला ॥ २

वेधिलीं सर्वही चित्तें। बोधिली लोक भाविकें:
अद्भूत गुण देवाचे। धन्य ते गायनी कला ॥ ३

येकाकी महंती येते। उदंड कीर्ति वाढते।
विख्यात सकळै लोकीं। धन्य ते गायनी कला ॥ ४

राहती लोक ते राजी। आवडी उपजे मनीं।
वर्णितां कीर्ति देवाची। धन्य ते गायनीकला ॥ ५

—स्फु. प्र. ३९.

वरील स्फूर्तिदायक उतारा सर्व गायनशाळांतून विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर राहील अशा रीतीनें ठळक अक्षरांत निःसंशय लिहून ठेवण्यासारखा आहे. गायनविद्येची इतकी स्तुति करून हि श्रीसमर्थांचें समाधान झालें नाहीं; त्यांनीं जेव्हां तिला अगदीं ब्रह्मविद्येच्या शेजारीं नेऊन बसविली तेव्हां च त्यांना बरें वाटलें. ते म्हणतात,

सोनें आणि परिमळें। इक्षुदंडा लागती फळें।
गौल्य माधुर्य रसाळें। तरी ते अपूर्वता ॥ १४-५-३

रागज्ञानी ताळज्ञानी। सकळकळा ब्रह्मज्ञानी।
निरभिमानें वर्ते जनीं। तरी हे हि अपूर्वता ॥ ५

(८) येणेंप्रपाणें ब्रह्मज्ञान आणि रागज्ञान या दोन्ही वस्तु एकत्र नांदण्या-योग्य आहेत, असें त्यांनीं आपलें निर्भीड मत देऊन टाकलें, वास्तविक ब्रह्मज्ञान्याला रागज्ञानाची आणि तालज्ञानाची काय जरूरी आहे? पण समर्थांचा दृढ विश्वास होता कीं, ब्रह्मज्ञानाच्या प्रसारालासुद्धां संगीत हें एक उत्तमोत्तम व प्रभावी साधन आहे. असो!

आता समर्थप्रेमी वाचकाना आमची अगत्याची विनंति आहे कीं त्यांनीं श्रीसमर्थांचे संगीतासंबंधीचे हे मनोगत लक्षांत घेऊन,

शुकसारिका शोभेना। शब्द तयाचा ॥ १४-४-३२

अशा अतिगोड आवाजाच्या बालकबालिकांना संगीताच्या अध्ययनार्थ उत्तेजन देत जावें, म्हणजे त्यांतून च समर्थांना अभिप्रेत असलेल्या 'अपूर्व' व्यक्ति निर्माण होतील.

(९) शेवटीं श्रीसमर्थांच्या लडिवाळ वाणीनें आपण प्रार्थना करूं या कीं,

संगीत गाणें दे रामा। आलाप गोडी दे रामा॥ ध्रु०
रसाळ मुद्रा दे रामा। शब्द मनोहर दे रामा॥ २
दस्तकताळी दे रामा। नृत्यकळा मज दे रामा॥ ४
दास म्हणे रे गुणधामा। उत्तम गुण मज दे रामा॥ ६

—पदपदांतरें पृ. ७७.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ........ नं. ........
ता. ........
३१ पै.

# ( २५ )

## सोलीव सुख

( लेखक — **सर मोरोपंत जोशी, उमरावती** )

( १ ) प्रथम "सोलीव सुख' हें प्रकरण येथें उद्धृत करितों.

**॥ सोलीव सुख ॥**

जय जया जी सद्गुरुवर्या । पूर्ण ब्रह्म प्रतापसूर्या ।
तुज नमोनी आचार्या । करुणासिंधो ॥ १

जे भवसमुद्रीं पोळले । विषयमदें अंध जाहले ।
चौऱ्याशींत वाहूं लागले । मार्ग सुचेना तयांसी ॥ २

ऐसें विश्व बहुत बुडालें । मी जीव म्हणोनी धावूं लागलें ।
मुळींचें स्मरण विसरले । मी कोण ऐसें ॥ ३

तयासी मुक्त कराया पूर्ण । तूं बा उतरलासि ज्ञानघन ।
रोगिया औषधी देऊन । भवमोचन करिशी ॥ ४

ऐसें औदार्य तुझें सघन । म्हणोनी आलों मी शरण ।
दयार्णवा कृपा करून । मज दातारें तारावें ॥ ५

आपण आपणाते पावे । ऐसें माझें मनीं बोलावें ।
तें दातारें गोचर करावें । रोकडे ब्रह्म ॥ ६

ऐसा शिष्याचा प्रश्न ऐकोनी । ज्ञानाचें भरतें आले स्वामीलागोनी ।
आसन सांडोनिया तये क्षणीं । कडकडोनी भेटले ॥ ७

रे बाळका ! ऐक निर्धार । तुझा प्रश्न तो वाग्दोर ।
माझे कंठीं बैसला साचार । बरें घेई निजवस्तु ॥ ८

मग स्नेहाळें नवल केलें । वोसंगासी शिष्या घेतलें ।
अर्धमात्रा रस काढिलें । पूर्ण फुंकिले कर्णरंध्रीं ॥ ९

खडतर औषधी दिव्य रसायन । नयनीं झोंबलें जाऊन ।
डोळियाचा डोळा फोडून । चित्सूर्य भेदिले ॥ १०

पूर्ण अंश गगनीं भेदिला । अर्क तो पिंडींमाजि उतरला ।
त्रिकूट श्रीहाट चुराडा केला । सेखीं भरला गगनगर्भी ॥ ११

उग्र तेज लखलखाट । तेथें जाहला चौदेहांचा आट ।
भ्रांति पडली बळकट । तेव्हां बाळ निचेष्ठित पडे ॥ १२

ऐसें पाहोनि सद्गुरुनाथ । पद्महस्त मस्तकीं ठेवित ।
वत्सा सावध त्वरित । निजरूप पहा आपुलें ॥ १३

जागृत करुनि ते वेळीं । अजपाची दोरी देऊनि जवळी ।
विहंगम डोल्हरी तये वेळीं । अलक्ष्य लक्षीं बैसाविले ॥ १४

धैर्याचें आसन बळकट । आणि इंद्रियें ओढूनि सघट ।
धरें उर्ध्वपंथे वाट नीट । अढळ पदीं लक्ष लावी ॥ १५

पुढें करोनिया जाणिव । मागे सारोनि नेणिव ।
जे जे जाणिव अभिनव । ते तूं नव्हेसी तत्वता ॥ १६

तें मार्गाची करूं नव्हाळी । प्रथम घंटानादाची नवाळी ।
दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहत कोल्हाळ ॥ १७

आतां अग्रीं लक्ष लावी । काय दिसेल तें न्याहाळी ।
चंद्रज्योती प्रकाशली । व्यूह बांधिला बळकट ॥ १८

तें सुख अंतरीं घेऊनी । पुढें चाल करी संगमीं ।
तेथें विजुऐशा कामिनी । चमकताती सुवर्णरंग ॥ १९

तें ही जाणोनी मागें सारी । । पुढें सूर्य बिंब अवधारी ।
ज्वाळा निघती परोपरी । डंडळू नको कल्पांतीं ॥ २०

वायोमुख करोनि तेथें । गिळी वगे सूर्यकिरणातें ।
मग देखसी आनंदमार्तंडाते । तेजोमय मम पुत्रा ॥ २१

अनंत भानु तेज अद्भुत । खदिरांगार ज्वाला उसळत ।
धारिष्ट तेथें न निभत । दुर्घट व्यूह तेथींचा ॥ २२

तेथें हुषारीचें काम । अग्रीं लक्ष लावोनि नेम ।
तीरें लावोनि सुगम । मागे सारी सूर्यांते ॥ २३

पुढें दिसेल जें नवल। तें पाही हंसमेळ।
चंद्रकीरण शीतळ। पाहसी तूं मम वत्सा ॥ २४

तेव्हां मागील दाह शमेल। शीतळाई सर्वांग होईल।
चंद्राची प्रभा सुढाळ। फडफडीत चांदणें ॥ २५

ते चि डोळियाचा डोळा पाही। देहातीत वर्म विदेहीं।
चिन्मय सुखाची बवाई। भोगीं आपुलें कीं गा ॥ २६

अनुभवाची शीग भरली। आम्रापरी उसळली।
भूमंडळीं प्रभा पडली। कर्पूरवर्ण नभ जालें ॥ २७

तया मध्यभागीं सघन। अढळपद दैदीप्यमान।
उर्वरित ब्रह्म जाण। ध्रुव बैसला अढळते ॥ २८

तें तुझें स्वरूप नेटे बोटें। जेथें समस्त आणणें आटे।
ऐकें जालासी धिटे। बळकटपणें बलाढ्य ॥ २९

ऐसें सुख योगियां लाधलें। तेव्हां देहाचें मरण गेलें।
सांगणें ऐकणें मुरालें। एकत्वपणें एक चि ॥ ३०

शांती येऊनि माळ घाली। अलक्ष सेजे निजली।
हंसपदें ऐक्य जाली। सुख सुखातें निमग्न ॥ ३१

तेथील अनुभव घेऊनि। स्वानुभव पाहे कलटुनि।
आला मार्ग ते क्षणीं। दिसेनासा जाला कीं ॥ ३२

त्रिकूट श्रीहाट गोल्हाट। बुडालें ते औट पीठ।
इडा पिंगळा सुषुम्नातट। विराले ते स्वात्मसुखें ॥ ३३

स्थूळ सूक्ष्म कारण। नेणो काय जालें महाकारण।
इंद्रियें चुबकलीं जाण। धांव मोडली तयांची ॥ ३४

पंचभूतांचें खवलें। तयांचे ठाव चि पुसले।
अपरिमित आनंदले। निमग्न जाले सुखांत ॥ ३५

सखोल भूमिके ऐसें जालें। सुख सुखासि घोटलें।
स्वयें आत्मत्व प्रगटलें। माझे देहीं रोकडें ॥ ३६

मग सहज समाधि जिरवून। शिष्य उठला घाबरा होऊन।
हें सद्गुरुचें देणें। काय उत्तीर्ण म्यां व्हावें॥ ३७

जरी स्तुती तयाची करावी। माझी मती नाहीं बरवी।
अनिर्वाच्य गती बोलावी। परा वाचा कुंठित॥ ३८

आतां जी मी लडिवाळपणें। तुमचे कृपेनें करितों स्तवन।
सूर्यापुढें खद्योत जाण। तैशा परी बोल हे॥ ३९

जय जयाजी करुणासिंधू। जय जयाजी भव रोग वैदु।
जय जयाजी बाळबोधू। कृपाघना समर्था॥ ४०

जय जयाजी अविनाशा। जय जयाजी परेशा।
जय जयाजी अध्यक्षा। दयार्णवा॥४१

जय जयाजी पूर्णचंद्रा। जय जयाजी अलक्ष्य विहारा।
जय जयाजी भवसिंधुभास्करा। आनंद प्रभु॥ ४२

तुझी स्तुति करितां सांग। वेद स्तुति झाले अव्यंग।
तेथें प्राकृत मी काग। वर्णावया योग्य नव्हे॥ ४३

कल्याण म्हणे जी रामदासा। माझा मुकेपणाचा ठसा।
ते मोडोनि वसोसा। मज आपण ऐसें केलें॥ ४४

ऐकोन मृदुवचन। कुरवाळलें तयालागून।
गुरुशिष्य हें बोलणें। उरलें नाहीं ते वेळीं॥ ४५

एकपणें एक चि जालें। ऐक्सरूपी सम मिळालें।
करूनियां सुख ऊसळलें। नाहींपण जाऊनी॥ ४६

सुगरिणीचा पाक जाहला। नभा भजनीं वाढिला।
अक्षयपदीं सुगरावला। संत जेवती स्वानंदें॥ ४७

अनिर्वाच्य बोल बोलिलें। साधकाचे उपेगा आले।
सिद्ध तरी डोलों लागलें। बद्ध मुमुक्षु होताती॥ ४८

या परते आन नाहीं बोलणें। श्रीराम दाशरथीची आण।
एकपत्नी तो सुजाण। आपुलें पद दे दासा॥ ४९

इति श्री दासबोध ग्रंथ । त्यांतील हा सोलीव अर्थ ।
श्रोते ऐकतां यथार्थ । समाधिस्त होती ॥ ५०

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

(२) हें प्रकरण रा. पांगारकर यांच्या रामदास ग्रंथाचे दुसरे आवृत्तीचे प्रारंभीं छापलेलें आहे. यांत वर्णन केलेला अध्यात्मिक अनुभव संतमतांत सर्वांना माहीत असा आहे. समर्थांनीं कल्याणस्वामींचे मागण्यावरून "रोकडें ब्रह्म" दाखविल्याचें यांत वर्णन आहे. बुद्धीनें व मनानें अग्राह्य व भाषेनें वर्णन न केले जाणारे अतींद्रिय अनुभव संतांना येतात. त्यांचें वर्णन यांत आहे. साधारणपणें दीर्घ उद्योगानें अभ्यास व विरक्तपणा यांचे योगानें हे अनुभव येतात असें असलें तरी कल्याणस्वामींचे बाबतींत त्यांना ही ब्राह्मी स्थिति केवळ गुरुकृपेनें प्राप्त झाली. गुरु नानक, कबीर, तुलसीदास आणि शीख गुरु यांची परंपरा पंजाबांत चालू आहे व ही च शिकवण हल्लीं आग्रा येथें राधास्वामी पंथाचे गुरु "दयालबाग" नांवाच्या संस्थेंत देत असतात. हा प्रकार राजयोगाचा असून नामस्मरण, ध्यान व नादानुसंधान हीं त्याचीं अंगें आहेत. बियास येथें या च पंथाची एक शाखा आहे. चिदाकाशांत खालीं ५ व त्यावर ३ असे लोक आहेत, असें वर्णन आहे. या सर्वांचा अनुभव व्यक्तिमात्रास येणें शक्य आहे असें वरील संत सांगतात. वरील प्रकरणांत "त्रिकुटी" म्हणून एक लोक वर्णन केलेला आहे. संतमताप्रमाणें "सहस्त्रदलकमला" नंतर हा लोक येतो. सूर्य चंद्र विद्युल्लता वगैरे ओलांडून जाऊन नंतर पहिला लोक येऊन नंतर त्रिकुटी येते. पांचवा लोक म्हणजे सत्यलोक किंवा सचखंड येथें शुद्ध चैतन्याचा लाभ घडतो. वरील प्रकरणांत "अलक्ष्य शेजे निजविले" असें वर्णन आहे तो सहावा लोक. समर्थांनीं कल्याणस्वामींना गुरुमंत्र कानांत फुंकून एकदम "अलक्ष्य" ऊर्फ अलख लोकाचा अनुभव दाखविला. त्यांत च ब्रह्माचा अनुभव आला. सर्व इंद्रियांचे अनुभव कसे मागें च राहतात व सुषुम्ना नाडींतूनही जीवात्मा कसा पलीकडे जातो याचेंही वर्णन या प्रकरणांत आहे.

श्री रामदासांचे काळींही संतांचा मार्ग हाच जारी होता व आजही ती च परंपरा सुरू आहे. मुसलमानांत सुफी पंथाचाही हा च मार्ग आहे. वरील प्रकरणावरून सर्व संतांचा मार्ग एक च होता असें शाबीत होतें. हल्लीं असलेले अनुभवी संतही हल्लीं ह्याच मार्गानें अध्यात्मिक उन्नति होते असें शिकवितात. हा मार्ग स्त्री पुरुष, उच्च किंवा हीन जाति, अगर कोणते ही धर्माचे इसमास मोकळा आहे. मेहनत स्वतः करून पूर्वीच्या संतांना झालेले अध्यात्मिक व अतींद्रिय अनुभव कोणालाही आज घेतां येतील. गुरुमुखाची आवश्यकता हा मार्ग व त्याचा

अभ्यास कसा करावा हें समजून घेण्यासाठीं आहे. अनुभवी गुरूपासून ही माहिती घेऊन प्रयत्न स्वतः करून व्यक्तिमात्राला काय अनुभव येतो हें करून पाहण्याजोगें आहे. आणि या मार्गाची थोरवी ही च कीं, केवळ गुरु सांगतो म्हणून कोणतेंही ज्ञान न पत्करतां प्रत्यक्ष स्वतःला अनुभव येईल व त्यामुळें त्या व्यक्तीची तरी पूर्ण खातरी होईल, असा हा मार्ग आहे.

हल्लींचे अनुभव घडलेले गुरु आपले अनुभव वर्णन करतात. त्यांचा लोकांना फसविण्याचा कांहीं हेतु असणें शक्य नाहीं. कारण, असे गुरु कांहीं मागत नाहींत व घेतही नाहींत. त्यांना कोणत्याही ऐहिक पदार्थाची चाह नाहीं. संसारांत राहूनही हा मार्ग साधण्याजोगा आहे. योगाभ्यासांत सांगितलेले यमनियम मात्र अवश्य पाळावे लागतात.

आज काळ असा आहे कीं, इंद्रियांचे विद्यमानें च जगाचें ज्ञान होतें असा सार्वत्रिक अनुभव असल्यामुळें अतींद्रिय असा कांहीं ज्ञानमार्ग असेल ही गोष्ट देखील खरी वाटत नाहीं. परंतु ज्यांत शेवटीं स्वतःची खातरी होईल असे अनुभव येण्याची शक्यता आहे तो मार्ग पडताळून पाहण्यांत कोणतेंही नुकसान नसून लाभ होणें शक्य आहे. रामदासांना जर अनुभव आले, तर आपणांस ते न येतील असें तरी कां मानावें?

॥ श्रीराम ॥

# श्रीरामदासपंचायतनांतील केशवस्वामी भागानगरकर

(लेखक – प्रिन्सिपाल **दामोदर केशव ओक**, बी. ए. **नागपुर**)

मजवरि दया करो तो ब्रह्मज्ञ – ख्यात केशवस्वामी।
मागतसें हरिचरण-स्मृति-वर या नमुनि केशवस्वा मी॥
( मोरोपंत – सन्मणिमाला )

भाग्याभिधाननगरे सुरदर्शनार्थं।
गच्छन्यथा किमपि नर्मपरैस्तुरुष्कैः॥
कृष्टोऽधिचूडमधिदर्शयति स्म सद्यः।
स्वान्वर्थ भावमवतात्स हि केशवोऽस्मान्॥
( विठोबा अण्णा – सुश्लोकलाघव )

पंचायतनाची कल्पना आपल्यांत फार प्राचीन काळापासून आहे. विष्णु, शंकर, देवी, गणपति व सूर्य ह्या पांच देवता हें आपलें पहिलें पंचायतन. त्यानंतर राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न व मारुति ह्यांना रामोपासक आपलें पंचायतन मानूं लागले. ही च कल्पना पुढें निरनिराळ्या संप्रदायांत रूढ होऊन ज्ञानेश्वर – पंचायतन, एकनाथपंचायतन व रामदासपंचायतन हीं त्या त्या संप्रदायाचे लोक मानूं लागले.

रामदासपंचायतनांत रामदास, जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, केशवस्वामी व आनंदमूर्ति ह्या शिवकालीन पांच महाराष्ट्रीय संतांचा समावेश होतो. ह्या सर्वांत रामदास हे प्रमुख समजले जात, व त्यांस ‘ समर्थ ’ असें म्हणत. प्रस्तुत स्थळीं आपण फक्त केशवस्वामींचें जीवनवृत्त, कवित्व, कार्य इत्यादि बाबींसंबंधींचा विचार करणार आहों. तथापि ह्या लेखाच्या दृष्टीनें ह्या पांचही जणांसंबंधीं थोडी ढोबळ माहिती वाचकांस करून देणें इष्ट वाटतें :—

## १ श्रीसमर्थ रामदास

जन्म — शके १५३०, चैत्र शुद्ध नवमी, माध्यान्ह.
निर्याण — शके १६०३, माघ वद्य ९
मठ — कोठकोठें आहेत तें सांगण्यापेक्षां, भरतखंडांत ते कोठें नाहींत हें आम्हांस कोणी सांगितल्यास आम्ही त्याचे आभारी होऊं.

**२ जयरामस्वामी** —

जन्म — शके १५२१, श्रावण वद्य ८.

समाधि — शके १५९४, भाद्रपद वद्य ११.

मठ — वडगांव.

**३ रंगनाथस्वामी** —

जन्म — शके १५३४, मार्गशीर्ष शुद्ध १०.

समाधि — शके १६०६, मार्गशीर्ष वद्य १०.

मठ — निगडी.

**४ केशवस्वामी** —

जन्म — ( ? )

समाधि — शके १६०४, पौष शुद्ध १३ ( १६०८ ? )

मठ — भागानगर ( हैद्राबाद–दक्षिण )

**५ आनंदमूर्ति** —

जन्म — शके १५५०.

समाधि — शके १६१८, कार्तिक शुद्ध १४.

मठ — ब्रम्हनाळ.

वरील शकांकडे पाहिल्यास हे पांचही जण साधारणपणें समवयस्क असून जयरामस्वामी हे वयानें सर्वांत वडील आणि आनंदमूर्ति सर्वांत धाकटे होते. हे सर्व मोठे साधु असून त्यांनीं लोकोपयोगासाठीं पुष्कळ काव्यरचना केलेली आहे; व आपला धर्म, आपला देश, व आपली भाषा यांसाठीं इतर ही खटाटोप पुष्कळ केला आहे. केशवस्वामी महाराष्ट्रापासून फार दूर राहात असत. बाकी सर्वांचे मठ सातान्याच्या परिसरांत जवळ जवळ आहेत.

**(१) केशवस्वामींचें जीवनवृत्त** —

केशवस्वामींच्या वडिलांचें नांव आत्मारामपंत कल्याणकर. हे कल्याणीचे राहाणारे असून भागानगर येथील तानाशा नांवाच्या एका श्रीमान जमीनदाराचे कारभारी होते. हे ईश्वरभक्तिपरायण ऋग्वेदी ब्राह्मण असून ते देशलेखक ( देशपांड्या ) होते. ह्यांच्या पत्नीचें नांव गंगाबाई. ह्या दांपत्यास त्यांचें उतार वय होईपर्यंत अपत्यप्राप्ती झाली नाहीं. यामुळें आपणास अपत्यप्राप्ति व्हावी व ती झाल्यास आपल्या कुलाची कीर्ति वाढवील अशी व्हावी, नाहीं तर संतान च नको अशा प्रकारें तें दांपत्य देवास आळवीत असे. पुढें त्यांस ईश्वरकृपेनें पुत्रप्राप्ति झाली. त्या मुलाचें नांव केशव असें ठेवण्यांत आलें. हा मुलगा पांच वर्षांचा होईपर्यंत मुका

होता. यामुळें त्यांचें मन खट्टू झालें होतें. पण पुढें शंकराचार्यांच्या कृपाप्रसादानें त्यास वाचा फुटली. त्यानंतर त्याचें मौंजीबंधन होऊन तत्कालीन रिवाजाप्रमाणें त्यास कांहीं वेदाध्ययन व व्यवहारांत अवश्य असणाऱ्या गोष्टी म्हणजे लेखन, वाचन, हिशेब ठेवणें वगैरे शिकविण्यांत आल्या. श्रीधरपंत सबनीस म्हणून कोणी सूर्योपासक भाविक गृहस्थ कल्याणीचे च राहणारे होते. त्यांनीं आपली कन्या केशवास दिली व अशा रीतीनें तो गृहस्थाश्रमी बनला. हा केशव म्हणजे च केशवस्वामी भागानगरकर होत.

केशवस्वामींस अपत्यप्राप्ति झाली होती किंवा नाहीं तें समजत नाहीं. तथापि त्यांस पुत्रसंतति होती, असें दिसतें. हे गृहस्थाश्रमी होते. काशिराज नांवाचे सत्पुरुष त्यांचे मोक्षगुरू होते.

पूर्वी जलद प्रवास करण्याचें साधन घोडा होतें. शिवकालांत साधारणतः सर्वांना घोड्यावर बसतां येत असे. समर्थ, केशवस्वामी व रंगनाथ हे घोड्यावर उत्तम बसत असत. असे उल्लेख ठिकठिकाणीं आढळतात. निरनिराळ्या मठांच्या महंतांना घोड्यांचा नाद फार असे. मठांतील कागदपत्रांत घोड्यांच्या खरेदीविक्रीच्या व त्यांच्या रोगांवरील औषधांच्या नोंदी आढळतात. रामदासी संप्रदायिकांना घोड्यावर बसतां आलें च पाहिजे, असा दंडक होता कीं काय न कळे.

एकदां चाफळास रामनवमीचा उत्सव होता. उत्सवासाठीं पुष्कळ संत आले होते, परंतु केशवस्वामी आले नव्हते म्हणून समर्थांनीं त्यांचें स्मरण केलें. त्या वेळीं केशवस्वामी पूजा करीत होते. त्यांनाही अंतरज्ञानानें आपलें स्मरण समर्थांनीं केल्याचें कळलें. तेव्हां केशवस्वामींनीं —

तात्काळ सांगुनि शिष्याला। बैसावयासि घोडा आणविला।
सरंजाम करूनि तयाला। चांफळाला निघाले ॥ ३६ ॥
अश्वारूढ होऊनि जाण। पिटिला वारू अतित्वरेनें।
दोन प्रहर होतांचि पूर्ण। आले निघोन स्वामीपासीं ॥ ३७ ॥

सकाळीं भागानगराहून निघून दोन प्रहरीं म्हणजे ७।८ तासांत चांफळास पोंचणें बरें च कठिण आहे, असें वाटतें. तथापि घोडा चपळ व सशक्त असला आणि त्याच्यावरील स्वाराची मांड पक्की असली, तर इतका प्रवास ७।८ तासांत करणें अगदीं अशक्य आहे, असें नाहीं.

केशवस्वामी तरुण वयांत व्यसनी होते, अशी आख्यायिका आहे. साधूचीं व्यसनें म्हणजे अर्थात् भांग आणि गांजा. समर्थ अगदीं निर्व्यसनी होते व त्यांना व्यसनांचा अत्यंत तिटकारा असे. समर्थांच्या उपदेशानें त्यांनीं हीं व्यसनें सोडिलीं.

केशवस्वामी ते धुरीण व्यसनी। विसरले ते गुणा गडांत येऊनी।

असें दासविश्रामधामकार सांगतात. समर्थांसारखा मार्गदर्शक केशवस्वामींस भेटला हें त्यांचें पूर्वजन्मार्जित सुकृत च असलें पाहिजे.

केशवस्वामींचे वडील व मातोश्री हीं पंढरीच्या वाऱ्या करीत असत, व केशवस्वामी देखील पंढरीची वारी करीत. परंतु त्यांचें आराध्य दैवत कोणतें होतें, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. त्यांनीं राम, शंकर, हरी, खंडोबा, विठ्ठल, रेणुका, भवानी इत्यादिकांवर पदें रचिलीं आहेत. परंतु —

नाहीं नाहीं मज लौकिकाची चाड। रामभक्ती मज लागलीसे गोड ॥ १
जनलोक उदंड हासती। परी मी न सोडीं आपली प्रेमभक्ती ॥ २
सोयरे म्हणती लागलें यासी वेड। निर्लज्ज होउनि नाचतों तुजपुढें ॥ ३
केशवस्वामी लागली तुझी गोडी। प्राण जावो परी पाय न सोडीं ॥ ४

ह्या पदावरून त्यांची रामाविषयीं दृढ निष्ठा दिसून येते. रामदासपंचायतनांतील संतांनीं अमुक च देवतेची उपासना करावी, असा दंडक नव्हता, म्हणून व इतर कांहीं कारणामुळें केशवस्वामींना रामदास्य च गोड वाटलें असावें.

केशव स्वामींचा जन्मशक उपलब्ध नाहीं. शके १५६६ मध्यें ह्यांची व समर्थांची भेट झाली. त्या प्रसंगीं जयरामस्वामी, तुकाराम, रंगनाथस्वामी, रघुनाथस्वामी, आनंदमूर्ति, धरणीधर देव व वामनस्वामी देखील उपस्थित होते. ह्या भेटीच्या वेळीं हे ३०।३५ वर्षांचे असावे, असें गृहीत धरावयास हरकत नाहीं. ह्याचा अर्थ समर्थ व हे जवळजवळ समवयस्क होते. हे शके १६०४, दुंदुभी संवत्सर, पौषमास, गुरुवार त्रयोदशीं (शुद्ध कीं वद्य) रोजीं समाधिस्त झाले, असें 'भक्तमंजरीमाला' कार सांगतात. पण ह्यांचे शिष्य संतराज हे आपल्या गुरूंचा समाधिशक १६०८ हा देतात.

केशवस्वामींची समाधि भागानगरास रंग्रेज गुड्यांत मुचकुंदा (मुसा) नदीच्या तीरीं एका शेतांत आहे. तिची पडझड फार झाली होती. परंतु अलीकडे श्री. कै. वामनराव रामचंद्र नाईक यांनीं तिची दुरुस्ती करून तिच्यावर एक कमान बांधविली आहे. ह्या समाधीच्या शेजारी कांहीं रंगारी व बहुतेक ढोर लोकांची वस्ती आहे. रंगारी मंडळी केशवस्वामींच्या वेळेपासून त्यांच्या शिष्यवर्गांत गणली जात असे व समाधीचे पुजारी रंगारी च आहेत, अजूनही त्यांचे अभिमानी त्या च लोकात आढळतात. राजाराम प्रासादी सांगतात कीं समाधीला कांहीं इनाम भागानगर येथील यवनाधिपानें करून दिलें होतें. परंतु तें आतां चालू नाहीं.

राजारामप्रासादींनें 'भक्तमंजरीमाला' शके १७५६ मध्यें रचिलीं. त्या वेळेस समाधी सुस्थितींत असेल व इनामही चालू असेल. पण आज वस्तुस्थिती अगदीं ह्याच्या उलट आहे. हें सर्व आपल्या च उपेक्षेचें फळ आहे !

केशवस्वामींचे शिष्य व अभिमानी रंगारी च कां ? हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

**(२) संतवाङ्मयाचें मनन—**

केशवस्वामींनीं आपल्या कवितेंत रामदास व रंगनाथ यांचा उल्लेख केला आहे. त्यांना समर्थांविषयीं अत्यंत आदर वाटत असे. त्यांचें पद—

रामदास माउली अनाथाची। रामदास माउली ॥

हें प्रसिद्ध च आहे. तसें च त्यांचा ओवीबद्ध पत्रव्यवहारही प्रसिद्ध आहे. त्यांत त्यांनीं समर्थांसंबंधीं

श्रीरामदासा परमसखया। स्वानंदपान्हा गुरुवर्या !।

असे प्रेमळ उद्गार काढिले आहेत. केशवस्वामींनीं समर्थांना 'गुरुवर्य' असें म्हटलें तें योग्य च आहे, कारण त्यांचा अधिकार च तसा थोर होता. तसें च

शांति ज्याची वनिता। भक्ति ज्याची दुहिता।
बोधपुत्र तत्वता। त्रिभुवनीं विजयी ॥

हें पद समर्थांना च उद्देशून केशवस्वामींनी रचून आपल्या शिष्यांस सांगितलें, अशी आख्यायिका आहे.

रंगनाथांविषयीं केशवस्वामींना फार अगत्य वाटत असे. त्यांच्यासंबंधानें

(१) निजरंग चोखडें। रंगनाथ रुपडें।
मागें आणि पुढें। दिसे उघडें आम्हां ॥

(२) माझा रंगमूर्ति मज तुम्हीं दावा वो !।
त्याविण उदास देहभावा वो ! ॥

(३) रंगा येईं वो ! रंगाबाई !। माझें मन रंगलें तुझे पायीं ॥

अशीं तीन पदें आढळतात. रंगनाथासारख्या शिपाई गड्याला निरनिराळ्या कामांनिमित्त वारंवार वेळीं अवेळीं, केशवस्वामींकडे भागानगरास जावें लागत असल्यामुळें त्यांच्यामध्यें घरोबा व प्रेमळपणा उत्पन्न झाला असावा. शिवाय रंगोबाची (समर्थ रंगनाथस्वामींना रंगोबा असें म्हणत) कर्तबगारी पाहून केशवस्वामींच्या मनांत रंगनाथाविषयीं विशेष आपलेपणा वाटत असावा, असें वरील उद्गारांवरून दिसतें.

समर्थांच्या कवितेचें केशवस्वामींनी फार बारकाईनें निरीक्षण केलें असावें. समर्थांचे पुढील उद्गार

तुवां पाषाण तारिले। तरीं आम्ही जडजीव उद्धरिले।
तुवां देव मुक्त केले। बंधनापासुनी ॥ इत्यादि

आणि केशवस्वामींचें पद —

दोघे सारिखे सारिखे। परस्पर जिवलग सखे ॥ ध्रुवपद ॥
राम तारी जडपाषाण। साधु जडजीवां उद्धरण ॥
राम सेवी दंडकारण्य। साधू सेवी ब्रह्मारण्य ॥ इत्यादि

यांत बिंबप्रतिबिंबभाव प्रतीत होतो. फरक एवढा च कीं समर्थ रामाशीं धिटाईनें बोलत आहेत. तसें च केशवस्वामींना —

शिरीं ब्रह्मांड कोसळे जेव्हां। निजस्वरूप निश्चळ तेव्हां ॥

ह्या पदाची स्फूर्ति समर्थांच्या—

कोसळोनि पडो हें आकाश। आणिकाची वास न पाहूं ॥

ह्या उद्गारांपासून झाली असावी.

केशवस्वामींचीं पदें —

जळीं पाषाण कोरडा। तैसा राहूं नको जडा ॥ इत्यादि
तोचि केवळ रे पाषाण। त्यासि कैसें गोडपण ॥ इत्यादि

आणि तुकाराम महाराजांचे उद्गार —

पालथे घागरी घातलें जीवन। न धरी च जाण तेंही त्याला ॥
पाषाण जीवनीं असतां कल्पवरी। पाहातां अंतरीं कोरडा तो ॥

यांतील साम्य पाहण्यासारखें आहे.

केशवस्वामींचें पद —

साधू तोचि ओळखावा। देव तेथेंचि पाहावा।

व तुकाराममहाराजांचा अभंग —

जे कां रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले ॥

हीं तर जवळ जवळ एक च आहेत.

आतां आपण थोडें आणखी मागें जाऊं या. केशवस्वामींना

सद्गुरूचा धर्म जागो। त्याचे पायीं चित्त लागो ॥

ह्या पदाची स्फूर्ति ज्ञानदेवांच्या —

धर्म जागो देवाजीचा, जो कां परोपकारी ॥

ह्या पदावरून झाली असावी.

केशवस्वामींनीं एकनाथ महाराजांपूर्वीं होऊन गेलेल्या ‘ विवेकसिंधु ’ कार मुकुंदराजांचा उल्लेख एका पदांत अप्रत्यक्षपणें केला आहे तो महत्वाचा आहे. त्या पदाचा आरंभ

तो मज आठवतो गुरुराजा । प्राणविसावा माजा ॥

असा असून त्यांत पुढें

विवेक सिंधूचीं चिद्रत्नें । लेवविलीं मज यत्नें ॥

असें म्हटलें आहे. हे उद्गार ‘ विवेकसिंधूं ’ तील

विवेकसिंधूची शब्दरत्नें । कंठीं धरिजे प्रयत्नें ॥ ९१

ह्या चरणांशीं मिळतीं आहेत. ह्या दोन्हीं ठिकाणांतील शब्दसाम्य व अर्थसाम्य पाहिल्यास केशवस्वामींनीं वरील पद मुकुंदराजांस उद्देशूनच रचिलें असावें,' हें स्पष्ट होतें. मुकुंदराजांविषयीं पूज्यबुद्धि दाखविण्यास तसेंच महत्वाचें कारणही आढळतें —

आतां इकडील ऐका कथन । केशवबा उदासी पूर्ण ।
प्रसन्न ज्या असें जगज्जीवन । भक्तिभाव निर्मळ सद्दढ ॥
धन्य ब्रह्मवेत्ते सत्पुरुष गोसावी । मुकुंदराजाचा संप्रदायी ।
विवेकसिंधू आदि अर्थ हृदयीं । जडलासे पूर्ण निपुण योगी ॥

ह्या आत्माराम महाराजांच्या उक्तीवरून केशवस्वामी मुकुंदराजांच्या संप्रदायांतील होते, असें ध्वनित होतें, व तें खरें असावें असें वाटतें; कारण केशवस्वामींचा शिष्य संतराज यानें आपल्या ‘ चिंतानिवारण ’ नामक काव्यांत आपली गुरु-परंपरा दिली आहे ती अशी :— जगन्नाथ-नृसिंहभारती-मुकुंदराज-रामचंद्र-हरिनाथ व केशव. पण मुकुंदराजांनीं ‘विवेकसिंधूं’त आपली परंपरा सांगितली आहे ती अशीः—मुकुंदराजाचे गुरू रघुनाथ ( रामचंद्र ) व रघुनाथाचे हरिनाथ ( श्रीहरी ). ह्यांतील कांहीं नांवें जुळतात, पण असें दिसतें कीं संतराजाला परंपरा नीट माहीत नसल्यामुळें, त्याच्या हातून नांवांची उलटापालट झाली असावी. शिवाय प्रस्तुत प्रकरणांतील अभंग २८ व २९ यांत रंगबोध व सहजबोध हीं नांवें आलेलीं आहेत तीं रंगनाथ व सहजानंद ( रंगनाथांचे परमेष्टि गुरु. ह्यांची समाधि

गुलबर्ग्याजवळ आहे ) यांचींच असल्यास रंगनाथस्वामींचाही मुकुंदराजांच्या परंपरेशीं संबंध होता, असें म्हणतां येईल.

एकंदरींत मुकुंदराज, केशवस्वामी व रंगनाथस्वामी ह्यांच्या परस्पर-संबंधासंबंधीं संशोधन करणें ही संशोधकांच्या प्रयत्नांस चालना देणारी एक महत्वाची बाब आहे एवढें खरें.

वर विचारसाम्याचीं उदाहरणें दिलीं आहेत तशीं आणखी किती तरी आढळतील. समर्थ आणि त्यांचे समकालीन संत यांच्या वारंवार भेटीगांठी होत असत. तेव्हां त्यांच्यांत निरनिराळ्या विषयांसंबंधीं बोलणें चालणें होणें, वेदान्तपर चर्चा होणें व तत्कालीन परिस्थितीसंबंधानें विचारविनिमय होणें अपरिहार्य होतें. त्यांच्या भेटी होत असत, हें आपणास माहीत आहे. तेव्हां ते आपसांत आपल्या विचारांची, मतांची व कल्पनांची देवाण घेवाण करीत असत, असें समजणें चुकीचें होणार नाहीं.

केशवस्वामींच्या कवनांत प्रसंगोपात्त त्यांच्या पूर्वींच्या संतांच्या उद्गाराचें प्रतिबिंब आढळतें. याचा अर्थ, आमच्या मतें, केशवस्वामींचा पूर्वसूरींच्या ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास व अभ्यासाच्या आणि मननाच्या योगें जें कांहीं उत्कृष्ट म्हणून आढळेल तें आत्मसात् करण्याचा हव्यास, हा होय. ज्यानें स्वयंस्फूर्तीनें हजारों पदें, अभंग, श्लोक, सवाया वगैरे रचिल्या त्याला दुसऱ्याचे शब्द, कल्पना वगैरे उसन्या घेण्याची वस्तुतः गरज नाहीं. परंतु खऱ्या प्रतिभासंपन्न व निरहंकृति सज्जनास आपल्यापेक्षां श्रेष्ठ ग्रंथकारांच्या प्रसादानें आपल्या कृतीचें सौंदर्य वाढविण्यांतच आनंद वाटतो.

**( ३ ) केशवस्वामी व मुसलमान समाज —**

केशवस्वामी मुसलमानांच्या राज्यांत राहात असत. तेव्हां मुसलमानांशीं त्यांचा संबंध येणें साहजिकच होतें. ते बहुधा त्यांच्याशीं मिळून मिसळून वागत व तत्कालीन बादशहावर आपली छाप ठेवून हिंदुधर्माच्या विरुद्ध असलेली त्यांची प्रवृत्ति शक्य तितकी सौम्य कशी होईल ह्यासंबंधीं त्यांची विवंचना सदा चालू असे. ते मोठे धोरणी असल्यामुळें व त्यांच्या वाणींत माधुर्य आणि मोहनी असल्यामुळें मुसलमान समाजावर बराच इष्ट परिणाम झाला असला पाहिजे. आपखुशीनें बाटणाऱ्या व जुलमानें धर्मभ्रष्ट केल्या जाणाऱ्या हिंदूंची संख्या यवनांच्या राज्यांत पुष्कळच मर्यादित राहिली, याचें सर्व श्रेय केशवस्वामींस आहे. इतकेंच नाहीं तर त्यांनीं कांहीं यवनांना देखील आपल्या अध्यात्मशास्त्राचें ज्ञान करून दिलें. त्यांचें कार्यक्षेत्र किती विस्तृत होतें, किंवा कोणता प्रदेश त्यांच्या देखरेखीखालीं होता, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. परंतु आमची कल्पना अशी आहे, कीं भागानगरापासून चंदी–चंदावर [जिंजी–तंजावर] पर्यंत ते व त्यांचे शिष्य प्रचारकार्य करीत

असावे. ह्या त्यांच्या प्रयत्नाला पुष्कळच गोड फळें आलीं असावीं, असें समजण्यास एक सबळ आधार आहे.

तंजावर येथील जुन्या राजवाड्यांत जुन्या हस्तलिखित ग्रंथांचें मोठें भांडार आहे. त्यास 'सरस्वती महाल' असें म्हणतात. त्यांत एक अपूर्व वस्तु आहे, ती म्हणजे एका मुसलमान भाविकानें केलेली गीतेवरील ओवीबद्ध टीका ही होय. वाचकांना ह्या टीकेचा थोडासा विस्तारानें परिचय करून देण्याचा मोह आवरत नाहीं.

ह्या टीकेचें नांव 'अंबरहुसेनी' टीकाकारानें आपल्याविषयीं टीकेच्या शेवटीं माहिती दिली आहे ती अशी :—

(श्लोक) याकुताम्बर खानो ऽ भूदंबराबर खानतः।
तत्पुत्रो ऽस्ति जगद्वंद्यो हुसेनांबर खानराट् ॥

(ओवी) वदानां (न्यां?) च्या (चा) शिरोमणी।
ब्रह्मज्ञानियांचा मुगुटमणी।
म्हणोनि हुसेनांबर खानजनी। प्रसिद्ध असे.॥

ह्यावरून हा हुसेनांबर मोठ्या कुळांतील दिसतो.

पोथीच्या शेवटीं 'श्रीशके (१५७५) पंधराशें पंचात्तरीं। विजयनाम संवत्सरीं। आश्वीन शुद्ध दशमी सोमवारीं। अंबरहुसेनी टीका संपूर्ण जाली ॥' असा समाप्तिकाळ नमूद केलेला आहे.

आणखी विशेष आश्चर्याची गोष्ट अशी, कीं—

'श्री शके १५७६ जयनाम संवत्सर, दक्षिणायन शरद्दतौ आश्विन शुद्ध तृतीया सोमवारीं चंजीमध्यें लिहिलें. बाळाजी त्रिमलेन ॥ श्लोक ७०० ओव्या ८१६" असा लेखकानें लेखनकाळ दिला आहे. ह्याचा अर्थ ही टीका तयार होऊन एक वर्ष होण्याचा आधींच जिंजी येथें बाळाजी त्रिमलानें ती उतरून घेतली. ह्यावरून हुसेनांबराचें चाहते तिकडे बरेच असावे, असें दिसतें.

समर्थ शके १५७७ त रामेश्वराकडे गेले व त्यांनीं 'चंदावरीं एकोजीराजांस अनुग्रह' दिला. ह्या घटनेपूर्वी ही 'अंबरहुसेनी टीका' निर्माण झाली होती, म्हणून ती निर्माण करण्याची प्रेरणा हुसेनांबरास केशवस्वामींकडून झाली असावी, असें आम्ही म्हणतों. मग ती प्रेरणा प्रत्यक्ष झाली असो, कीं अप्रत्यक्ष म्हणजे त्यांच्या एखाद्या निष्ठावंत शिष्याच्या उपदेशामुळें झाली असो. ही टीका लिहिण्यापूर्वी हुसेनांबर निदान ४।५ वर्षें तरी महाराष्ट्रीय संतांच्या सत्समागमांत असला पाहिजे, हें उघडच आहे.

केशवस्वामींचा शहाबेग नांवाचा एक शिष्य होता. तो आपल्या पदांत—

केशवस्वामी संपूर्ण आंगे जालों ।
म्हणे शाबेग तरायासी आलों ॥

आणि—

केशवस्वामी केवळ सौख्यरासी ।
मनोभावें शरण रिघा त्याशी ।
पदोपदीं सहज जोडे काशी ।
म्हणे शाबेग समाधी अनयासी ॥

असें म्हणतो. यावरून केशवस्वामींच्या ठिकाणीं त्याची केवढी पूज्यबुद्धी होती, हें दिसून येतें. केशवस्वामीस शरण गेल्यानें काशीयात्रा घडते, असें तो म्हणतो. इतका तो हिंदूंच्या भावनांशीं समरस झाला होता. हा जन्मजात मुसलमान होता कीं मूळचा हिंदु असून त्यानें इस्लामी धर्म स्वीकारला होता हें समजण्याचें कांहीं साधन उपलब्ध नाहीं. तथापि तो जन्मजात मुसलमान असावा, तो बाटून मुसलमान झाला असता, तर तो कडवा मुसलमान बनून हिंदुधर्माचा कट्टा शत्रू बनला असता. अशा प्रकारचीं उदाहरणें इतिहासज्ञांच्या परिचयाचीं नाहींत असें नाहीं.

श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील निरनिराळ्या बाडांत शाबेगा (शहाबेगा) शिवाय आणखी शाहु फकीर, सैयदशहा, शा-अल्ली व शाह हुसेन फकीर यांचीं पदें आढळतात. शाह हुसेन फकीर यांचीं ७८ बाडांत आढळतात. हीं सर्व बाडें १५०।२०० वर्षांपूर्वींचीं आहेत. ह्या मुसलमान भक्तांच्या स्थल-कालासंबंधीं कांहीं माहिती उपलब्ध नाहीं.

एकंदरींत आपल्या संतांचा मुसलमानांना भक्तिमार्गाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न कसा चालू होता, त्याचें दिग्दर्शन वरील विवेचनानें अल्पस्वल्प प्रमाणांत होण्यासारखें आहे.

**(४) हिंदी पदें—**

केशवस्वामींनीं हिंदी भाषेंत म्हणजे जिला पूर्वीं व्रजभाषा म्हणत असत त्या भाषेंत—हिंदी याने हिंदुस्थानी भाषेंत नव्हे—कांहीं पदें रचिलीं आहेत आणि तत्कालीन परिस्थितीचा विचार करतां त्यांना तसें करणें भाग होतें, कारण ते मुसलमानी राज्यांत राहात होते. दक्षिणेस अहमदनगर, विजापूर वगैरे मुसलमानी राज्यें होती. त्यांची सरकारी कामकाजाची भाषा फारशी असे. मुसलमानांचें पीर, औलिया,

मौलवी वगैरे आपला धर्म वाढविण्याचा प्रचार, राजसत्तेच्या पाठबळावर, धूमधडाक्यानें चालवीत असत. त्याला आळा घालण्यासाठीं आपल्या संतांना आपल्या धर्माचा प्रचार हिंदी भाषेंतून च करावा लागे. शिवाय आपले संत तीर्थयात्रेच्या निमित्तानें काशीपासून रामेश्वरापर्यंत पर्यटन करीत असत. त्या वेळीं सामान्य जनसमूहाशीं व्यवहार करण्यास सोईचें व्हावें म्हणून त्यांना हिंदी भाषा अवगत करून घेण्याची आवश्यकता असे. शिवाय, केशवस्वामींना प्रसंग विशेषीं मुसलमान समाजापुढें व मिश्र समाजापुढें कथाकीर्तनें करण्याचा प्रसंग येत असे. हिंदूंप्रमाणें मुसलमानांना हि आपल्या परिणामकारक वक्तृत्वाच्या व प्रत्ययज्ञानाच्या प्रभावानें ते मंत्रमुग्ध करीत असत.

आपल्या सर्व संतांनीं केशवस्वामींप्रमाणें च संस्कृतनिष्ठ हिंदी भाषेंत काव्यरचना केली आहे. तशा प्रकारची भाषा ही च त्या काळीं राष्ट्रभाषा समजली जात असे व त्या पदावर तिला कायम ठेवावयाचें असेल, तर तिचें तें च स्वरूप आपण कायम ठेविलें पाहिजे.

## (५) कविता-कुमुदिनी—

राजारामप्रासादी आपल्या 'भक्तमंजरीमालें'त लिहितात :—

नाना प्रकारचे करोनि ग्रंथ। कवनीं तोषविला पंढरीनाथ।
अभंग, पदें असंख्यात। शुद्ध वेदान्त ज्यांमाजी॥
(अध्याय २७ ओवी ५२)

परंतु केशवस्वामींचा कोणता हि ग्रंथ अद्याप उपलब्ध झाला नाहीं. त्यांनीं हजारों अभंग, पदपदांतरें, आणि कित्येक श्लोक आणि सवाया वगैरे रचिल्या आहेत. त्यांत बहुधा वेदान्ताचें च विवरण आहे. पुराणेतिहासविषयक पदें फार च थोडीं आढळतात. उपदेशपर व भगवस्तुतिपर बरींच आहेत. परंतु त्यांचा गुरुभक्तीवर भर विशेष आहे. त्यांनीं पुष्कळ ग्रंथ केले असतील, हें संभवनीय आहे. कारण ते शीघ्र कवि होते. त्यांनीं 'एकादशीचरित्र' नामक ग्रंथ (ओवीबद्ध ?) रचिला आहे, असा लोकप्रवाद आहे.

प्रथम ती. कै. वामन दाजी ओक यांनीं 'काव्यसंग्रह' मासिकाच्या द्वारें ४६० पदें छापिलीं. त्यानंतर आतां सुमारें ५० वर्षांनंतर श्री. श्रीधरराव नाईक, ब्यारिष्टर (भागानगर) यांनीं वे. शा. सं. नरहरशास्त्री खरशीकर यांच्याकडून शुद्ध करवून घेऊन 'श्रीकेशवस्वामींची कविता' ह्या पुस्तकांत नवीन उपलब्ध झालेलीं ८४७ पदें, ४५ सवाया, २१८ श्लोक वगैरे कविता प्रसिद्ध केली आहे. ह्याखेरीज कोठें क्वाचित् किरकोळ पुस्तकांतून पदें वगैरे थोडी कविता प्रसिद्ध झाली आहे.

तथापि अद्याप पुष्कळ च कविता अप्रकाशित आहे. फार लांब जा कशाला ? श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील बाडांक १७४२ ही एक मंदिरांतील अपूर्व आणि प्रेक्षणीय वस्तु आहे. त्या बाडाच्या आरंभींच्या २३१ पानांपर्यंत केशवस्वामींचीं पदपदांतरें आहेत व २३२ ते ४४९ पानापर्यंत नुसते २६२३ श्लोक आहेत. ह्या शिवाय सदहू 'मंदिरां'तील १००।१५० बाडांत ह्यांची थोडी फार कविता आहे च. तसें च पंढरपुरास 'हरिविजय', 'रामविजय' ह्या ग्रंथांचे कर्ते श्रीधरस्वामी यांच्या मठांत, पुण्याच्या भारत – इतिहास – संशोधक – मंडळांत व नागपुर येथील मध्यप्रांत-संशोधन-मंडळाच्या संग्रहीं यांचें वाङ्मय आहे. ह्याखेरीज महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून व घरोघर पसरलेलें वाङ्मय आहे, तें तर अगणित च आहे. ह्या वाङ्मयाचें संकलन, संशोधन व प्रकाशन कसें होणार, केंव्हा होणार व कोण करणार तें एक देव जाणे !

केशवस्वामींना, समर्थांप्रमाणें च, गाण्याचें अप्रतिम अंग होतें. त्यांनीं रचिलेलीं सर्व पदें कीर्तनांत म्हणण्यासाठीं रचिलेलीं आहेत, व तीं निरनिराळ्या रागरागिण्यांत म्हणतां येतील अशी त्यांची रचना आहे. हे उत्तम कीर्तनकार होते. कीर्तन करीत असतां भक्तिरसांत स्वतः रंगून जाऊन श्रोत्यांस तल्लीन करून सोडीत व श्रोते देहभान विसरून जात. आत्मारामस्वामी म्हणतात :—

केशवस्वामींचे वक्तृत्व मोठें । अनुभविक बोलणें ज्याचें थेट ॥
कथा नव्हे ते निधानलूट । सत्पुरुषश्रेष्ठें ज्या मानिलें ॥

लूट कशाची ? भक्ति-ज्ञान-वैराग्यरूपी भांडाराची. सत्पुरुषश्रेष्ठ म्हणजे श्रीसमर्थ रामदासस्वामी. अशा कथेची गोडी चाखावयास तसेंच भाग्य लागतें !

केशवस्वामींच्या कवितासागरांत अवगाहन करणें बरें च कठिण आहे. ते कधीं रंगारी बनतात (श्रीकेशवस्वामींची कविता, पद ५९८ व पदसंग्रह, भाग १, पद ४६७), तर कधीं परीट बनतात (के. स्वा. कविता, पदें ५९९ व ६८७). मूढ जनांना भगवंताच्या भजनाच्या रंगांत रंगवून (दंग करून) सोडण्यासाठीं रंगारी बनतात आणि लोकांचा पापरूपी मळ धुवून त्यांना निर्मळ (पापरहित) करण्यासाठीं परीट बनतात. तसें च लोकांना शुभ शकुन सांगण्यासाठीं ते जोशी होतात (पदसंग्रह, भाग १, पदें ३४३, ५०८ व ५०९). ते दळतात, कांडतात, झाडतात, सारवतात, सडासंमार्जन करितात (के. स्वा. कविता, पदें ६०८, ६०७, ६०९, ७४०, ७३९ व ७३८). ते वासुदेव बनतात (के. स्वा. क. पदें ५९३ व ६१३), ते सौरी होतात व ते खेळियाचे रूप घेऊन खेळ खेळतात. त्यांच्या निरनिराळ्या भूमिका पाहिल्या म्हणजे वाटतें कीं जणुं काय ते बहुरूपी होते; ते जात्यावर बसून दळतांना गाणीं देखील म्हणतात (के. स्वा. क. पद २०० व ४४४).

केशस्वामींचीं उपदेशपर पदें पुष्कळ आहेत:–'देव चिंती तो देवासि पावे' [के. स्वा. क. पद ३४०], 'आपला ठेवा आपण भोगावा' (के. स्वा. क. पद ३७१). 'प्रपंच वैरी त्यागावा' (के. स्वा. क. पद ४५८) 'सावधान सावधान। ऐक उघडून कान' (के. स्वा. क. पद ४८६), 'येथें कोणाचें कोणीच नाहीं रे!' (के. स्वा. क. पद ६०३) अशीं पदें निवडावीं तरी किती?

मनुष्यजन्माला यावयाचें कशासाठीं? तर 'या मनुष्यजन्मा तरि च यावें रे!। आपण तरावें जग उद्धरावें। धन्य धन्य ऐसें म्हणवावें रे!' (पदसंग्रह, भाग १, पद ७३४). लोकोद्धार करण्यासाठीं जन्मास यावयाचें. ऐहिक सुखोपभोग भोगण्यासाठीं नव्हे. केवढें उच्च ध्येय हें!

केशवस्वामी ईश्वराच्या भेटीसाठीं इतके आतुर झालेले दिसतात कीं ते देवाशीं अगदीं वर्दळीला येतात. 'कां न येशी? तुज काय पडलें वोझें। प्राण गेल्या मग काय पाहूं तूझें।' (पदसंग्रह, पद ४३३,. देवाशीं अशी दांडगाई करणाऱ्याच्या मनगटांत तपश्चर्येचें बळही तसें च असावें लागतें!

केशवस्वामींच्या पदांत प्रासंगिक पदें पुष्कळ असणें शक्य आहे. परंतु ती कोणतीं हें समजणें कठीण आहे. 'करा पौर्णिमा ये गांवीं। स्थापूं येथें चि गोसावी' (के. स्वा. क. पद ६९८) हें प्रासंगिक असावें व तें कोठें तरी मारुतीची स्थापना करून तेथें हनुमज्जयंतीच्या उत्सवाच्या प्रसंगीं रचून म्हटलें असावें.

केशवस्वामींचा गुरुभक्तीवर भर विशेष आहे. ते म्हणतात

सद्गुरूचें नाम ते माझी विश्रांती। म्हणें अहोरात्रीं राम राम।
(के. स्वा. कविता, पद ९९)

गुरूच्या ठिकाणीं त्यांची कशी अढळ निष्ठा होती ती पहा—

आणिक दैवत मी नेणें। एक सद्गुरुचरण जाणें। (के. स्वा. क. पद ७३३)
तो मज आठवतो गुरुराजा। प्राणविसावा माझा। (पदसंग्रह, पद ३९६)
गुरुचरणींचा वासी रे। समाधी त्याची दासी रे!। ( " पद ३४३)
आला रे आला। गुरुराज महाराज माझा आला। ( " पद ५०२)
आनंद केला बा गुरुराया। हरिली सकळही माया। (के. स्वा. क. पद ४३)

'आलारे आला गुरुराज माझा आला' ह्या पदांत त्यांनीं वीररसयुक्त भाषेंत गुरुचें वर्णन केलें आहे. गुरूला घोडेस्वार बनवून ढाल, तरवार, कट्यार वगैरे आयुधांनीं सुसज्ज करून एका मोठ्या मोहिमेवर पाठविलें आहे. ह्या मोहिमेचें

उद्दिष्ट काय ? संसाराचें मूळ उखडून टाकणें, संसारबंधनरूपी बेडी तोडणें व काळाचा जबडा फोडणें हें उद्दिष्ट. शिष्याच्या कल्याणाविषयीं गुरुजींना केवढी कळकळ ही ! ह्या पदांतील कल्पना हृद्य असून तें मूळांतून च वाचकांनीं एकदां समग्र वाचून पहावें, अशी विनंति आहे.

केशवस्वामींचें चित्त गुरुचिंतनांत रंगून गेलें होतें हें

मारिलों कुटीलों परि मी कबूल होईं ना। ) पदसंग्रह, भाग १ ला
चोरिलें गुरूवाक्य तें मी परतोनि देईं ना।) पद ६४९

ह्या पदावरून दिसून येतें. परंतु त्यांचे हे पूज्यपाद गुरु कोण होते, तें आपणास माहीत नाहीं, हें आपलें दुर्दैव होय. ज्या कोणा शिष्याची केशवस्वामींप्रमाणें गुरुचरणीं अढळ निष्ठा असेल तोच गुरुकृपेला पात्र होऊं शकेल. त्यांनीं गुरूचें वर्णन

तो जगद्गुरु लक्षितां मनीं। ) पदसंग्रह, भाग १ ला
दुजा लक्षितां नाढळे जनीं।) पद ७५९

असें केलें आहे. हें सर्व पद वाचकांनीं अवश्य पहावें. त्यावरून गुरूची अचाट कर्तृत्वशक्ती दिसून येते, व ते गुरूला सर्वज्ञ व सर्वशक्तिमान मानीत असत, हें उघड होतें. म्हणूनच तुकाराममहाराजासारखे संत 'सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय। धरावे ते पाय आधीं त्याचे।' असें आपणास मोठ्या प्रेमानें सांगत असतात.

समर्थ व केशवस्वामी हे एका च 'संघां' तील असल्यामुळें त्यांच्या वागणुकीचें धोरण एकसारखें च असणें साहजिक आहे. समर्थ सांगतात—

मुलाचे चालीनें चालावें। मुलाच्या मनोगतें बोलावें।
तैसें जनासी सिकवावें। हळू हळू॥ १३-१०-२४

त्याप्रमाणें च केशवस्वामींनीं धोरण आंखलें असावें. शेतकऱ्याला त्याच्या भाषेंत वेदान्त समजावून देण्यासाठीं त्यांनीं एक सुंदर रूपक केलें आहे. तें पद असें—

श्रवणाचें चाडें हें धरिलें। ) पदसंग्रह, भाग १
गुरुमुखें निजबीज परिलें॥) पद ७०६

ह्यांतील भाषा शेतीची माहिती असलेल्या मनुष्यास सहज समजूं शकेल.

केशवस्वामींनीं संन्यासी कोण व वानप्रस्थ कोण हें सांगितलें आहे (पदसंग्रह, भाग १, पदें ३४४, ३४५). त्यांनी ढोंगी लोकांवर चांगले च कोरडे ओढिले आहेत (प. सं. भाग, पद ७२२ व के. स्वा. क. पदें ४३०, ४६६, ४७२, ७०२, ७२२ इत्यादि). केशवस्वामी पूज्य कोणाला समजतात व अपूज्य कोणाला

समजतात, मनुष्याला सुख केव्हां होतें व केव्हां होत नाहीं .इत्यादि ज्यांत.सांगितलें आहे तीं पदें महत्वाचीं व वाचनीय आहेत (पदसंग्रह, भाग १, पदें ३३३ ते ३३६).

कांहीं पदें कूट आहेत व कांहींत वेदांततत्वें प्रतिप्रादिलेलीं आहेत. कांहीं पदांचें मर्म न कळल्यामुळें तीं अश्लील आहेत कीं काय, असें वाटण्याचा संभव आहे [के. स्वा. क. पदें ३३ व २४४]

केशवस्वामींचे श्लोक मोठें गोड असून ते वेदांत, भक्ति इत्यादि विषयांवर आहेत. कांहीं कांहीं श्लोक वाचतांना वामन पंडितांची आठवण होते.

केशवस्वामींची भाषा सरळ, शुद्ध व सोपी असून तींत जुनी अपरिचित अशीं शब्दांचीं रूपें आढळत नाहींत. ते मुसलमानी राज्यांत राहात असून त्यांच्या काव्यांत यावनी शब्द क्वचितच आढळतात. त्यांनीं रचिलेली सर्व कविता उपलब्ध असती, तर त्या संग्रहास कवितासागर म्हणतां आलें असतें. परंतु आपल्या दुर्दैवानें, वस्तुतः आपल्या अनास्थेमुळें, त्यांची बरीच कविता नष्ट झाली आहे. सध्या जितकी प्रसिद्ध आहे व जितकी हस्तलिखित स्वरूपांत उपलब्ध आहे तितकी च जरी विचारांत घेतली, तरी त्या संग्रहाला 'कविता-कुमुदिनी' असें म्हणतां येईल. वाचकांनीं 'कुमुदिनी'चे कांठीं स्वस्थ चित्तानें बसून तिच्यांतील सुवासिक कमळांचा यथेच्छ आस्वाद घ्यावा, अशी त्यांस विनंति आहे.

**(६) केशवस्वामींचें कार्य—**

समर्थपूर्वकालीन व समर्थकार्यारंभकालीन समाजस्थितीचें वर्णन समर्थांनीं आपल्या 'अस्मानी व सुलतानी' ह्या प्रबंधांत व दासबोधांतही केलें आहे. त्यावरून तत्कालीन समाजस्थितीचें चित्र डोळ्यांपुढें स्पष्टपणें उभें राहतें. समर्थांनीं बारा वर्षें भरतखंडांत पर्यटण केलें आणि डोळे व कान उघडे ठेवून परिस्थितीचें निरीक्षण केलें. त्या वेळेस भरतखंडांत मुसलमान राज्यकर्त्यांचें प्राबल्य असून जिकडे तिकडे अन्याय व अत्याचार यांचें साम्राज्य पसरलेलें होतें. गांवोगांव मुसलमानांच्या धाडी येत व त्या गांवचें गांव लुटून फस्त करीत. त्यामुळें लोक सर्वदा हवालदील असत. जीवित व वित्त यांची शाश्वती नसे. लोक अन्नास मोताद झाले होते. स्त्रिया भ्रष्टविल्या जात व कित्येक देशांतरास नेऊन गुलाम म्हणून विकल्या जात. अवर्षण व दुष्काळ यांमुळें लोकांची अन्नान्नदशा झाली होती. आंथरावयास व पांघरावयास धड वस्त्र नाहीं व राहावयास झोंपडी देखील नाहीं, अशी सर्वांची विपन्नावस्था झाली होती. मुसलमानांच्या छळांतून सुटका कशी करून घ्यावी, हें कोणाला च कळेना. तो जाच टाळण्यासाठीं कोणी आत्महत्या करीत, कोणी मुसलमानांचा धर्म स्वीकारीत, तर कोणी परागंदा होत, अशी परकीय व परधर्मी राजसत्तेमुळें देशाची

धार्मिक, सामाजिक व राजकीय स्थिति अगदीं शोचनीय झाली होती. हे सर्व प्रकार समर्थ बालपणापासून पाहात होते. व ह्यांतून लोकांची सुटका कशी होईल ह्यासंबंधीं विचार करीत होते. विचार करितां करितां त्यांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली, कीं —

लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे ।
लोक सहजचि वोढे । कामासाठीं ॥ (दा. बो. १४-६-२२)

म्हणजे, एखादा अडलेला कार्यभाग घडवून आणण्याचें कोणीं मनांत आणलें, तर त्यास मदत करण्यास लोक तयार होतात. हें जाणून त्यांनीं लोकोद्धार करण्याच्या प्रयत्नास आरंभ केला व आपल्या मनाशीं जी योजना ठरविली, तिच्यासंबंधीं विवेचन प्रस्तुत स्थळीं विस्तारभयास्तव करितां येत नाहीं.

समर्थ स्वतः ब्राम्हण होते. तेव्हां तत्कालीन ब्राह्मणांच्या दुर्दशेबद्दल त्यांच्या हृदयास पीळ पडणें साहजिक होतें. ब्राम्हणवर्ग इतका अधोगतीस गेला होता कीं,

नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचारचि बुडाला ।
वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ? ॥ १४-७-२९

ब्रह्मज्ञानाचा विचारू । त्याचा ब्राह्मणासीच अधिकारू ।
'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' । ऐसें वचन ॥ ३०

ब्राह्मण बुद्धिपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडुन जाले । शिष्य शिष्यांचे ॥ ३१

कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरासीच भजती ।
कित्येक तुरुक होती । आपुले इच्छेनें ॥ ३२

म्हणून ब्राह्मणवर्गांत च प्रथम जागृति उत्पन्न करावी, असें त्यांनीं ठरविलें असावें. ब्राह्मणाचा अधिकार 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' असा मोठा, पण परिस्थितीपुढें त्यांनाही मान वांकविणें भागच होतें. पण ब्राह्मण म्हणजे कोण ? समर्थ सांगतातः—

करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
तेचि जाणावें ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ ६-४-२४

ब्राह्मणु ब्रह्मवेत्ता तो । ब्राह्मणु ब्रह्मनिश्चयी ।
ब्राह्मणु ब्रह्मस्थितीचा । ब्राह्मणु म्हणजे गति ॥ (स्फुट प्रकरणें)

'ब्रह्म जानातीति ब्राह्मणः' म्हणजे ज्यांनीं ब्रह्म जाणलें तें ब्राह्मण. ब्राह्मण कुलांत जन्म झाला म्हणून ते ब्राह्मण असें समर्थ समजत नसत. ज्यांच्यावांचून आपले

चालणार नाहीं, असे ते तेजस्वी ब्राह्मण असावें, असें त्यांचें मत होतें. केशवस्वामी देखील हेंच सांगतात:—

ब्रह्मनिष्ठ तें ब्राह्मण मुख्य पाहीं।
यातीकूळ प्रमाण त्यांसी नाहीं. ॥ (पदसंग्रह भाग १—७४७)

ज्यांनीं ब्रह्म जाणलें तें ब्राह्मण. ह्या बाबतींत जाति व कुल यांचें महत्व नाहीं. ह्या पदावर केशवस्वामींनीं आपल्या कीर्तनांत भाष्य करून आपल्या श्रोत्यांना अधोगती-पासून खात्रीनें परावृत्त केलें असेल. अधोगतीस चाललेल्या ब्राह्मणांनीं निराश व बेफाम होऊं नये म्हणून समर्थांनीं त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून त्यांचें धोरण व धूर्तता हीं दिसून येतात:—

गुरु तो सकळांशीं ब्राह्मण। जऱ्ही तो जाला क्रियाहीन।
तरी तयासीच शरण। अनन्य भावें असावें ॥ ५-१-६
जरी ब्राह्मण मूढमती। तरी तो जगद्वंद्य ॥ १५

इतकें सर्व सांगितल्यावर समर्थ ब्राह्मणांना लाख रुपयांची गोष्ट सांगतात. ता कोणती?

वरें ऐसा प्रसंग जाला। जाला तो होऊन गेला।
आतां तरी ब्राह्मणी आपणाला। शाहाणें करावें॥ १४-८-१

ब्राह्मणांच्या पाठीमागें च समर्थांचा असा तगादा कां? ब्राह्मणांची आनुवंशिक बुद्धिमत्ता हें त्याचें कारण. मनांत आणतील तर ते च एखादी गोष्ट तडीला नेतील हा भरवंसा. असो.

कोणतेंही कार्य करावयाचें ठरल्यानंतर त्याचें उद्दिष्ट काय व तें साध्य करण्याचे मार्ग कोणते, हें समर्थांनीं आपल्या मनाशीं ठरविलें असावें. परंतु हें अवघड व रुळलेल्या मार्गाच्या बाहेरचें काम एकट्याच्या हातून सिद्धीस जाणें शक्य नसल्यामुळें आपल्याशीं सहकार्य करण्यास तत्पर अशा देशाभिमानी व धर्माभिमानी थोर व्यक्तीचा शोध करणें त्यांना भाग च होतें.

समर्थ आपलें तीर्थाटण आटपून शके १५६६ मध्यें महाराष्ट्रांत परत आले. नंतर त्यांनीं महाबळेश्वर, वाई, माहुली इत्यादि ठिकाणीं फिरून निरनिराळ्या मंडळींच्या भेटी घेतल्या व त्यांच्याशीं खाजगी रीतीनें चर्चा करून लोकमताचा कौल घेतला. योग्य संधी साधून जरंड्याच्या मारुतीस साक्षी ठेवून त्यांनीं सुज्ञ व सुविद्य मंडळींची एक परिषद भरविली. सदरहू प्रसंगीं जयरामस्वामी, तुकाराम महाराज, रघुनाथस्वामी, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ति, धरणीधर देव, केशवस्वामी,

वामनस्वामी, इत्यादि थोर पुरुष उपस्थित होते. कोणकोणत्या गोष्टींचा तेथें उहापोह झाला, हें समजण्यास कांहीं मार्ग नाहीं. तथापि तत्संबंधानें आजकालच्या राजकारणी पुरुषांस कल्पना करितां येण्यासारखी आहे. तेथें निरनिराळ्या महत्वाच्या बाबींसंबंधीं वाटाघाट होऊन महाराष्ट्राचा उद्धार कोणत्या रीतीनें करावयाचा हें निश्चित झालें असावें व त्या कार्याच्या सिद्धीसाठीं मार्ग आंखावयाचे ते पुढील धोरणानें आंखावे असें ठरलें असावें:—

मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्व विषयीं॥ ११–५–४

चौथा अत्यंत साक्षेप। फेडावे नाना आक्षेप।
अन्याय थोर अथवा अल्प। क्षमा करीत जावे॥ ५

अशा आणखी पुष्कळ गोष्टी समर्थांनीं सांगितल्या असतील, विवेचिल्या असतील व निश्चित केल्या असतील. इतर मंडळीनेंही कांहीं सूचना केल्या असतील. त्या सर्वांचें मंथन करून जी कांहीं योजना ठरली असेल ती कोणाला संपूर्णतया मान्य झाली असेल व कोणाला अंशतः मान्य झाली असेल. कोणी नुसती सहानुभूति च दाखविली असेल व कोणी कांहीं कारणानें फटकून वागण्याचेंही ठरविलें असेल. परंतु समर्थांनीं चिकाटी न सोडतां ती पूर्णपणें पार पाडण्यासाठीं एक मंडळ स्थापन केलें असावें. ह्या मंडळाची रचना सध्याच्या प्रांतिक स्वायत्ततेच्या काळांत संयुक्त जबाबदारीच्या तत्वावर मंत्रीमंडळ बनविण्याच्या पद्धतीसारखी असावी. मंत्रीमंडळांत त्यांच्यापैकीं च एक, त्यांनीं च ठरविलेला, मुख्य व बाकीचे सहकारी मंत्री. सर्वांनीं मुख्य मंत्री (पंतप्रधान) यांच्या तंत्रानें चालावयाचे व शक्य तोंपर्यंत मतभेद टाळावयाचे असें ठरलें असावें. असें हें जें रामदासप्रमुख मंत्रीमंडळ स्थापण्यांत आलें त्यासच पुढें 'रामदासपंचायतन' असें कालांतरानें लोक म्हणूं लागले असावे.

ह्या पंचायतनांत समर्थांबरोबर केशवस्वामी, जयरामस्वामी, रंगनाथस्वामी व आनंदमूर्ति यांचा अंतर्भाव झाला होता व त्यांनीं एकंदरींत एकजुटीनें आपलें कार्य केलें असें दिसतें. शिवकालीन इतिहासांत ह्या पंचायतनाचें विशेष महत्व आहे आणि म्हणून च ह्या पंचविभूतींच्या कार्यासंबंधीं महाराष्ट्रीयांस अत्यंत आदर वाटतो. समर्थांच्या असामान्य कर्तृत्वासंबंधीं बरा च इतिहास उपलब्ध आहे. परंतु त्यांच्या सहकाऱ्यांसंबंधीं फार च थोडी माहिती उपलब्ध आहे. समर्थांनीं आपल्या सहकाऱ्यांची जी निवड, मोठ्या धोरणानें, केली ती, आपल्या अंगीकृत कार्यास पोषक होतील असे त्यांच्या आंगचे विशिष्ट गुण पाहून केली असली पाहिजे, हें उघड आहे. त्यांच्या आंगचे वरवरचे गुण आपणांस त्यांच्यासंबंधीं जी थोडी माहिती

आहे तीवरून कळून येतात, परंतु त्यांखेरीज समर्थांच्या कसोटीस हे चौघे उतरतील असे कांहीं असामान्य गुण त्यांच्या आंगीं असले पाहिजेत, असें वाटतें.

केशवस्वामी भागानगरास म्हणजे मुसलमानी राज्यांत राहात असत. तिकडे राष्ट्रीय भावना उत्पन्न करण्यासाठीं ह्या पंचायतनापैकीं कोणीतरी असणें अवश्य च होतें. तेव्हां दुसरा कोणी परप्रांतस्थ, तिकडची परिस्थिती न जाणणारा तिकडे जाऊन राहिला असतां, तर त्यांचा संचार व प्रचार तितकासा यशस्वी झाला नसता. त्यांनीं त्या भूभागांतील हिंदु जनतेस हिंदुत्वनिष्ठ बनविण्याची व आपला धर्म, आपला देश, आपली भाषा ह्यांच्यासंबंधीं त्यांच्यामध्यें जागृति करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली होती, असें दिसतें व ती यशस्वी रीतीनें पार पाडली, हें एक मोठें च देशकार्य त्यांनीं साधिलें आहे,

केशवस्वामींच्या कार्यासंबंधीं कांहीं लिहावयाचें म्हटल्यास तें जवळजवळ अशक्य च आहे, कारण सामुदायिक जबाबदारी असल्यामुळें पंचमूर्तींपैकीं चौघांजणांस स्वतंत्र अस्तित्वच नव्हतें. शिवाय कार्यपद्धतीसंबंधीं जे दंडक घालून ठेविले होते ते

राजकारण बहुत करावें । **परंतु कळों च नेदावें ।**
परपीडेवरी नसावें । अंत:करण ॥ ११-५-१९

उत्तम गुण तितुकें घ्यावे । घेऊन जनास सिकवावे ।
उदंड समुदाय करावें । **परी गुप्तरूपें** ॥ ११-१०-१८

धूर्तासि धूर्तपण कळलें । तेणें मनास मन मिळालें ।
परी हें गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्वें ॥ १९-२-२८

अशा प्रकारचे होते. तेव्हां आपल्या कोणत्या हि कृतीचा कोणाला पत्ता लागूं नये, अशा रीतीनेंच केशवस्वामींना वागावें लागें. शिवाय, आज त्यांचा मठ जाग्यावर नाहीं, वंशजांचा ठावठिकाणा नाहीं, अखंडित शिष्यपरंपरा चालू नाहीं, त्यांच्या-संबंधीं एखादें चिठोरें देखील उपलब्ध नाहीं, अशा स्थितींत त्यांच्या कार्याचें स्वरूप कोणास कसें दिसणार व त्याचें वर्णन कोण कसें करूं शकणार?

समर्थांनीं ११०० मठ स्थापिले. त्यांतील महंतांच्या व शिष्यांच्या द्वारें ते शिवरायास किंवा त्यांच्या स्थानिक अधिकाऱ्यांस शत्रूंचा बातमी पोंचवीत असावे, असें कल्याणस्वामींचें जें सांकेतिक पत्र प्रसिद्ध आहे, त्यावरून म्हणतां येतें. हीं गुप्तपणें बातमी पाठविण्याची कामें उघडपणें होणें शक्यच नव्हतें. अशा प्रकारचीं हीं सर्व कामें बिनबोभाट व्हावयाचीं म्हणजे तीं निरोपानेंच होणार, तेव्हां त्यांचा लेखी दाखला कोण कसा हजर करणार?

केशवस्वामी व समर्थ यांचा कांहीं पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे. तो सर्वथैव विश्वसनीय आहे. पण त्यांत क्षेमसमाचारापलीकडे कांहीं नाहीं. त्यांच्यामध्यें सांकेतिक पत्रव्यवहार पुष्कळ झाला असावा, अशी आमची कल्पना आहे. तसें च रंगनाथस्वामींना सज्जनगडावरून भागानगर व भागानगराहून सज्जनगड अशा उलटसुलट किती फेऱ्या माराव्या लागल्या तें त्यांनाच माहित !

ह्या पांचही विभूती परमार्थाच्या मार्गांत आणि महाराष्ट्राच्या प्रपंचाच्या कार्यांत इतक्या एकजीव होऊन गेल्या होत्या, कीं असुक कार्य एकानें केलें व असुक दुसऱ्यानें केलें असें ठरवितां येत नाहीं. ह्यांच्या कार्यांची गुंफण इतकी घट्ट आहे, कीं तिचे धागेदोरे उलगडणें शक्य च नाहीं. शिवाय, आजकालच्या लोकांप्रमाणें, त्या काळीं, आपल्या कार्याविषयीं डांगोरा पिटण्याची पद्धति नव्हती. सर्व कारभार फार जपून आणि अगदीं गुप्तपणें करावे लागत. त्यामुळें केशवस्वामींचें कार्य स्वतंत्रपणें दिसत नाहीं आणि यांतच त्यांच्या कार्याचें वैशिष्ट्य आहे. तेणेंकरून पंचायतनाची संघटणा व शिस्त हीं दिसून येतात. अशी शिस्त पाळली गेली नसती तर त्यांच्या कारभारांत विस्कळीतपणा उत्पन्न होऊन त्यांचें कार्य यशस्वी झालें नसतें. ह्या पंचविभूतींत केशवस्वामी खरे भाग्यवान होत. ते कार्य करून व नांवलौकिक मिळवून गेले. त्यांच्या पाठीमागें आतां सुखदुःख नाहीं. पण आपण मात्र लाजेनें मान खालीं घातली पाहिजे एवढें खरें !

(७) **उपसंहार**—संत ह्या नात्यानें केशवस्वामींची योग्यता फार मोठी आहे. रंगनाथस्वामींनीं आपल्या संतनामावळींत ह्यांचा उल्लेख केला आहे. तसें च उद्धवचिद्धन, सिद्धचैतन्य, व शिवराम यांनीं आपापल्या संतनामावळ्यांत यांचें मोठ्या आदरानें नामसंकीर्तन केलें आहे. 'व्यंकटेशस्तोत्र' कर्ते देवदास, यांनीं आपल्या संतमालिकेंत समर्थ व केशवस्वामी यांचा उल्लेख एकत्र केला आहे, व पुढें रंगनाथस्वामींचा आहे. पण जयरामस्वामी व आनंदमूर्ति यांचा नामनिर्देश च नाहीं. यावरून पंचायतनांत त्यांना विशेष मानाचें स्थान होतें, असें म्हणावें लागतें. नागेश वेडियाकृत मानसपूजा ह्या त्रुटित काव्यांत केशवस्वामींचा उल्लेख आहे.

केशवस्वामींनीं आपल्या कवितेंत आपल्या नांवापलीकडे कांहीं च उल्लेख केला नाहीं, याचें कारण कळत नाहीं. पुष्कळ कवींनी इतर कांहीं माहिती न सांगितली, तरी आपल्या गुरूच्या नांवाचा उल्लेख मोठ्या पूज्य बुद्धीनें केलेला आढळतो. परंतु केशवस्वामींनी तसें केलें नाहीं. यावरून 'आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च। श्रेयस्कामो न गृण्हीयाज्ज्येष्ठापत्यकलत्रयो:'॥ अशासारखी त्यांची समजूत असावी, किंवा ते फार च विनयशील असावे.

केशवस्वामी चांगले संस्कृत जाणणारे, वेदांतशास्त्रज्ञ व व्यवहारकुशल असावे. पण त्यांच्या कवितेवरून त्यांची विद्वत्ता व व्यासंग ह्यासंबंधीं निश्चित अनुमान करितां येत नाहीं. मुकुंदराजकृत 'विवेकसिंधू'चा उल्लेख मात्र त्यांच्या एका पदांत आला आहे. हा ग्रंथ समर्थांनीं देखील पाहिला होता व त्याची छाया दासबोधावर पडली आहे. यावरून रामदासी संप्रदायाचा मुकुंदराजाशीं तसा च कांहीं महत्वाचा संबंध असावा, असें वाटतें. पण तो कोणता, हें लक्षांत येत नाहीं.

केशवस्वामी भागानगरास म्हणजे मराठीच्या मूळ पीठाच्या परिसरांत राहात असले तरी प्रचाराच्या दृष्टीनें तेलंगण व कर्नाटक यांतील लोकांशीं त्यांचा संबंध आला असला पाहिजे आणि म्हणून त्यांची कानडी व तेलगु ह्या भाषांत कविता असावी, अशी आमची कल्पना आहे. तरी त्या भागांतील संशोधकांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष पुरवावें अशी त्यांस विनंति आहे.

केशवस्वामीसंबंधानें व तदनुषंगानें रामदास पंचायतनासंबंधानें आम्हांला जे कांहीं सांगावयाचें होतें तें वर सांगितलें आहे. अशा प्रकारचे लेख लिहिण्यास अवश्य असणारी सामग्री उपलब्ध नाहीं. यामुळें या लेखांत पुष्कळ च उणीवा आहेत ह्याची जाणीव आम्हांस आहे. परंतु पुढेंमागें पंचायतनासंबंधानें कोणास एखादा लहान मोठा ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा झाल्यास आमचा हा लेख त्यांच्या थोडासा तरी उपयोगी पडावा अशा अपेक्षेनें हा नम्र प्रयत्न केला आहे. त्यांस दासविश्रामधाम, सांप्रदायिक विविध विषय, अनेक कविकृत पदसंग्रह, केशवस्वामींची कविता, समर्थांची लघुकाव्यें, तुकारामांची गाथा, विवेकसिंधु, महाराष्ट्र-कविचरित्र, इत्यादि ग्रंथांचा आधार घेतला आहे.

हा लेख लिहिण्याची संधी 'सत्कार्योत्तेजक सभे'च्या चालकांच्या कृपेनें लाधली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. 'सभे'ची भरभराट होवो, अशी ईशचरणीं प्रार्थना आहे.

शेवटीं, केशवस्वामींस वंदन करून, त्यांच्या च शब्दांत परमेश्वराजवळ मागणें मागतों कीं—

इतुकें दे मजला दे मजला । मागतसें हरि ! तुजला ॥ ध्रुवपद ॥
येती संत घरासी । भक्तीभावें पूजीन त्यांसी ॥ इतु० ॥ १
भगवद्भजनीं लागो । तुझिये स्वरुपीं मन हें वागो ॥ इतु० ॥ २
अक्षय वैभव देईं । अखंड केशव सद्गुरुपायीं ॥ इतु० ॥ ३

श्री

# रामेण रामदासेन लिखितं वाल्मीकिरामायणम्

( लेखक — रा. **नरहर दामोदर शास्त्री**, काव्यभूषण, धुळें )

ही रामायणाची एकंदर ७१० पत्रांची अपूर्व पोथी समर्थभक्त श्री. नानासाहेब देव, चिटणीस, सत्कार्योत्तेजक सभा - धुळें, यांनीं कोठून कशी संपादन केली, मूळ पोथीच्या पत्रांचा आकार, आजूबाजूस समास किती सोडला व समास सोडून नुसत्या लेखनाचा गाभा किती इत्यादि माहिती ' श्रीरामदासी संशोधन ' द्वितीय खंड यांत ६५३।६५४ बाडांकांत सदर सभेमार्फत शक १८५६ च्या अधिक आषाढांत प्रसिद्ध झाली आहे ती अवलोकन केल्यास वरील पोथीची पूर्ण कल्पना येईल. या हस्तलिखित रामायणाच्या पोथीची प्रत करण्याचें काम मिति श्रावण वद्य २ शके १८६३ दिनांक ९।८।४१ पासून मिति माघ शु. २ शके १८६४ दिनांक ६।२।४३ दीड वर्षपावेतों माझ्याकडे श्री. देव यांनीं सोपविलें होतें. तें काम मी दररोज एकसारखे तीन तास लिहून पुरे केलें. केवळ कामाच्या दिवसांची च मोजदाद केल्यास सदर रामायणाची प्रत करण्यास मला १ वर्ष १० दिवस लागले. त्यामुळें ह्या रामायणाच्या पोथीशीं माझा अशा रीतीनें निकट परिचय झाला आहे.

या प्रतींतील कांडांचा लेखनकाल विचारांत घेण्यासारखा आहे. लेखकानें आदिकांड आणि आरण्यककांड हीं दोन कांडें शक १५४४ त लिहिलीं, नंतर किष्किन्धाकांड आणि सुंदरकांड अशीं शक १५४५ त लिहिलीं, युद्धकांड शक १५४६च्या आरंभी लिहिलें आणि पुढें वीस वर्षांचा काळ लोटल्यावर शक १५६७ त उत्तरकांड लिहिलें आणि तेथून चार वर्षांनीं शक १५७१ त अयोध्याकांड शेवटीं लिहून ग्रंथ पुरा केला आहे. ही प्रत श्रीसमर्थांची च असेल तर लेखनाचे हे शक महत्त्वाचे आहेत. शक १५५४ ते १५६६ हा काळ श्रीसमर्थांचा तीर्थाटणांत गेला, त्या काळांत लेखन होणें शक्य नव्हतें.

पोथीच्या प्रत्येक पत्रावर कोठें १५ किंवा १६ तर कोठें १७ ओळी आहेत. प्रत करित असतांना ताडून पाहण्यास समर्थवाग्देवतामंदिरांत लाहोरची मुद्रित बालकांड व अयोध्याकांड हीं कांडें व मुंबईचें छापीव सारें वाल्मीकिरामायण हीं होतीं. तीं सारीं पाहून कोठें कोठें मधून मधून काय काय फरक दिसला व ह्यांत त्यापेक्षां विशेष हि काय दिसून आलें हें वाचकांच्या निदर्शनास आणावें हें ह्या

निबंधांत लिहिण्याचें मी योजलें आहे. पाठांतराची गणती च नाहीं. न जाणों या चोवीस हजार श्लोकांत शंभर हजार पाठांतरें असतील.

माझ्या निदर्शनास आलें आहे, कीं संतशिरोमणि एकनाथ महाराज यांनीं आपलें भावार्थरामायण लिहिलें तेव्हां त्यांच्यापुढें या पोथीसारखी च प्रत होती, मुंबई प्रतीसारखी नव्हे. हनुमन्नाटककारासारख्याच्या जवळहि ह्याच पाठांची पोथी होती, दुसरी नव्हती. ही प्रत प्रकाशित होणें अत्यंत अगत्याचें आहे. ती श्रीसमर्थांच्या हातची आहे, असें तज्ज्ञांनीं ठरविलें आहे. त्यामुळें तिला मोल नाहीं.

**या प्रतींतील सर्वसाधारण विशेष गोष्टी**

( १ ) अर्थ एकच असला तरी या प्रतींत आणि मुंबई प्रतींत निरनिराळी रचना फार आढळतें. जसें सुंदरकांड २६।४० मुंबई प्रतींत 'देवलोकमितो यातस्त्यक्त्वा देहं महीतले' असें आहे. त्या ऐवजीं या प्रतींत—'देवातिथेयं शुद्धात्मा प्रतीच्छति गतो ऽनघः' असें आहे.

( २ ) भागुरि महर्षीच्या मताप्रमाणें अव आणि अपि या उपसर्गातील आद्य अकाराचा लोप होतो. जसें अपिधान-पिधान. अवगाह्य वगाह्य. परंतु या पोथींत अधि या उपसर्गातील अकाराचा लोप केलेलींहि रूपें आढळतात. जसें अधिष्ठित–धिष्ठित.

( ३ ) एका च अर्थाचीं भिन्न क्रियापदें आढळतात. जसें उ. कां. श्लो. ३० चें चरण दुसरें – मुंबईप्रत – " तस्माद्देवि ददाम्यद्य पुत्रमात्मसमं तव।" या पोथींत " तस्मात्तु वितराम्यद्य पुत्रमात्मसमं तव "

( ४ ) मुंबईप्रतींत पुष्कळ ठिकाणीं तद् या सर्वनामाचीं रूपें वापरलीं आहेत, त्या ठिकाणीं या पोथींत इदम्चीं रूपें व ज्या ठिकाणीं एतद्चीं रूपें वापरलीं आहेत त्या ठिकाणीं इदम्ची वापरलेलीं दिसून येतात. जसें मुंबई रामायणांत – " नाम तस्याकरोत् प्रीतः सार्धं देवर्षिभिस्तदा " ( उ. का. स. ३ ) या पोथींत – " नाम चास्य करोत् प्रीतः सार्द्धं देवर्षिभिस्तदा " मुंबई रामायणांतील शब्दांबद्दल समानार्थक पर्यायशब्द या पोथींत दिलेले आढळतात. जसें क्रुद्ध शब्दाबद्दल रुष्ट. पहा ( यु. कां. सर्ग ७० )

( ५ ) पोथींत तद् या सर्वनामाचा नपुंसक नामांकडे ज्यावेळीं संबंध असतो ( असा प्रकार फक्त प्रथमा व द्वितीया विभक्तीच्या एकवचनांत ) तेव्हां त्याचीं रूपें नपुंसक करावयाचीं तीं तशीं न करितां पुल्लिंगी केलेलीं आढळतात व किम् या सर्वनामाचा प्रथमेच्या एकवचनप्रसंगीं कश्चित् असा प्रयोग न करितां किञ्चित् असा केला आहे. ( पहा सुं. कां. सर्ग ६३ ) तं वनम्।

(६) मुंबई रामायणांत प्रायः कर्तरि प्रयोग असला तर या पोथींत कर्मणि प्रयोग असतो. (सुं. कां. सर्ग ३६ यु. कां. स. २८)

(७) जेथें आत्मनेपदी वर्तमानकालवाचक धातुसाधितें कर्तरिप्रयोगांत लिहावयास पाहिजेत ती या पोथींत कर्मणि प्रयोगांत लिहिलेलीं कांहीं कांडांतून आढळून येतात. (सुं. कां. सर्ग १२ श्लोक १)

(८) प्रथम भूतकाळांत स्वरादि धातुपूर्वी आ व व्यंजनादि धातुपूर्वी अ लावावयाचा असतो तो आगम या पोथींत बहुतेक लावलेला नाहीं.

उदाहरणार्थ :— प्रध्मायन्त... ...शङ्खवेणुगणाः। २-८२-२; स रामोऽभिपतत् क्षिप्रम्। २-३९-१५; विप्रयुज्यत कौसल्या। २-५५-२१; जवेनास्य गमं पथि।५-५७; सुमन्त्रो रामवचनं यथोक्तं प्रतिवेदयत्। २-५८-२५-२६; न तत्र रोचयद्वासम्। ३-२-४; तदर्थं प्रेषयत् सर्वान्। ५-११; विहाय निपतद्भूमौ। ५-४४; मुनिर्वाक्य मुदीरयत्। ७-१०३; निपातयन्त शस्त्राणि। ७-९३, प्रस्खलंस्तुरगा अपि। ७-१०३; विज्ञापयत वैदेहीम्। ७-१२८; क्रोधोऽभिवर्धत ७-१२९ उपसर्पत वैदेही। ७-१३०; ततोऽभिषिञ्चन्। ७-१३५; दृष्टिं वानरेष्वेव पातयत् ७-१३८; रामः पृथ्वीमनुपालयत्। ७-१४२; विमानमधिरोहत। ७-७५; ततः प्रस्थापयत्तूर्णम्। ५-५७; तोयधारा इव स्रवन्। ३-३९-२३; हतशेषं निवर्तत। ३-३६-८; संभ्रामत् स गृहाद्गृहम्। ५-५१;

(९) पाणिनिकृत लिंगानुशासनाप्रमाणें घञ् प्रत्ययान्त नामें पुल्लिंगी पाहिजेत. तसा अन्य ग्रंथांतून सर्वत्र प्रयोग केला असून या पोथींत नपुंसकलिंगी प्रयोग केला आहे. उदाहरणार्थ — अपराधं च किं प्राप्य। ७-४; सुग्रीवस्य संदेशं सिद्धं कथयतीव मे। ५-३७-१२; पतिव्रतावरोधस्तु दोषमावहते महत्। ६-६०; चित्रकूटनिवासं च तत्रस्थैरेव तैः श्रुतम्। २-५८-२, नूनं हि तपसो नास्ति फलयोगं कृतस्य च। २-६६-२४; या खेरीज इतर पुल्लिंगी शब्द नपुंसकलिंगीं वापरले आहेत. उदाहरणार्थ — विघ्नमीदृशमुत्पन्नम्। ५-५७; तदेतच्छैलमुन्मूलम्। ७-१६; ददौ खड्गं महत्दिव्यम ७-१६, सागर सुमहद् बध्वा। ६-६१;

(१०) मुंबई रामायणांत उपमानपद तें च या पोथींत असतें, परंतु बऱ्या च ठिकाणीं तें निराळें असल्याचें दिसून येतें. उदाहरणार्थ —

| **या पोथींत** | **मुंबई रामायणांत** |
| --- | --- |
| सर्प इवश्वसन्।३-८-२६; | क्रुद्धो नागइव श्वसन्।३-२-२० |
| देवानामिव वासवः।३-११-११ | देवानां मघवानिव।३-६-८ |
| ब्रह्माणमिव वासवः।३-१२-११ | ब्रह्माणमिव काश्यपः।३-७-१३ |

| | |
|---|---|
| विधूमैरिव पावकैः । ३-१३-८ | विशिखैरिव पावकैः । ३-८-७ |
| छाययेव सुवृत्तया । ३-१३-११ | छाययेवानुवृत्तया ३-८-११ |
| रोहिण्या चन्मद्रा यथा । ३-२५-२ | चित्रया चन्द्रमा यथा । ३-१७-४ |
| सनिर्यासेव वल्लरी । ३-२८-२३ | सनिर्यासेव सल्लकी । ३-२०-२४ |
| लवणोर्मिरिवोत्थितः । ३-३०-२२ | लवणाम्भइवोत्थितम् । ३-२२-२ |
| पाकहन्ता यथा युद्धे । ३-३१-२८ | चक्रहस्तो यथा युद्धे । ३-२३-२९ |
| विधूमार्क इवोदितः । ३-३२-१३ | विधूमोऽग्निरिवोत्थितः । ३-२४-१६ |
| त्रिशीर्ष इव शैलराट् । ३-३६-९ | त्रिशृङ्गइव पर्वतः । ३-३६-७ |
| ग्रहगस्त इवोडुराट् । ५-३४ | ग्रहग्रस्तइवांशुमान् । ५-३५-३६ |
| स तेनाग्निप्रकाशेन रथेन । ३-३७-३७ | ततः सूर्यनिकाशेन । ३-२८-१४ |

( ११ ) कालवाचक शब्दाची ज्या ठिकाणीं सप्तमी विभक्ति पाहिजे त्या ठिकाणीं द्वितीया विभक्ति योजिल्याचें कोठें कोठें आढळतें ; जसें—" यमेव दिवसं राजा चक्रे गोदानसत्क्रियाम् । तमेव दिवसं तत्र युधाजित् समुपेयिवान् ॥

( १२ ) शुद्ध ( स्वार्थी ) धातूचीं रूपें ज्या ठिकाणीं योजावयास पाहिजेत, त्या ठिकाणीं या पोथींत णिजन्त ( प्रयोजक ) धातूचीं रूपें वापरल्याचें मधून मधून आढळून येतें. जसें—" सुयज्ञगृहमागम्य प्रवेश्य च विनीतवत् ' ( अयो० कांड स० १६ श्लोक १ )

( १३ ) मुंबई रामायणांत धातुसाधितविशेषणाच्या मागें नि हा उपसर्ग लावला आहे त्या ठिकाणीं या पोथींत वि हा उपसर्ग लाविलेला आहे. उदाहरण – ' सत्पथे निष्ठितस्य ' ' सत्पथे विष्ठितस्य ' ( उ-का-स ९ श्लोक ५ )

( १४ ) मुंबई रामायणांत ज्या ज्या ठिकाणीं प्रश्रितं वाक्यं असें असतें त्या त्या ठिकाणीं प्रसृतं असें लिहिलेलें आढळतें. उदाहरण—' प्रहस्तः प्राश्रितं वाक्यम् ' याऐवजीं ' प्रहस्तः प्रसृतं वाक्यम् ' असें आहे. ( उ० कां. ११ वा सर्ग )

(१५) या पोथींत बहुतेक ठिकाणीं सर्गांतील विषयाला अनुसरून सर्गाचीं नांवें दिलेलीं आहेत. तशीं ती मुंबई रामायणांत नाहींत — जसें ' अमात्य वर्णनं नाम ' इत्यादि.

महर्षि भगवान् पाणिनि यांना संमत नाहीं म्हणजे अपाणिनीय रूपें अन्य आर्षग्रंथातून हि आढळून येतात ही जरी गोष्ट खरी असली, तथापि प्रथमभूत-काळांत धातूस जो अडागम किंवा आडागम ( कलम ८ यांत लिहिल्याप्रमाणें अ किंवा आ लावणें ) न केल्याचीं हीं क्रियापदें इतरत्र ग्रंथांत फारशीं न आढळून येणारीं या पोथींत उल्लेख करण्यासारखीं बरींच असल्यानें पाणिनिव्याकरणाचा संस्कार

या पोथींत बराच कमी आहे असें दिसून येतें. शिवाय क्रियापदें व त्यांचे काळ व नामाचीं रूपें व आत्मनेपद, परस्मैपद यांत हि पुष्कळ फरक, अदलाबदल असल्याचें दिसतें. तात्पर्य या पोथींत आर्ष प्रयोग (अपानिनीय रूपें) विपुल आहेत.

आतां किंचित् कांडवार विचार करूं.

## (१) आदिकांड

या पोथींत पहिल्या कांडास आदिकांड असें नांव दिलें आहे. या रामायणाच्या पोथींत हें आदिकाव्य आहे असें कोठें म्हटलेलें नाहीं. या कांडाचे मुंबईरामायणांत ७७, लाहोरच्या प्रतींत ७२ व ह्या पोथींत ८१ सर्ग आहेत. या पोथींतील आदिकांड हे लाहोरप्रतीशीं सर्व प्रकारानें बहुतांशीं जुळतें आहे. मधूनमधून शब्दांचा, रचनेचा वगैरे थोडा फरक आढळून येतो, पण तो उल्लेख करण्याइतका फार नाहीं. या पोथीच्या या कांडाच्या ८१ सर्गांपैकीं ७८ वा सर्ग संपेपावेतों वरील तीनही रामायणाच्या कथा, मधून मधून रचनेची भिन्नता हिशेबांत धरली नाहीं तर बहुतेक सारख्या च आहेत.

जनकाच्या घरीं मुलांचा विवाहसमारंभ होऊन दशरथाच्या अयोध्याप्रवेशापावेतोंचें कथानक तिन्ही रामायणांत जेथें संपलें त्या सर्गाचा अनुक्रमांक मुंबईरामायणाचा ७७ वा, लाहोरचा ७२ वा आणि ह्या पोथींतला ७८ वा असा आहे. ह्या पोथींत ७९-८०-८१ सर्गांतल्या कथा खालीं थोडक्यांत देतों.

### सर्ग ७९ वा

कांहीं दिवसानंतर दशरथानें भरताला बोलावून सांगितलें कीं, तुझे मामा तुला घेण्यास आले आहेत. तूं आजोबांच्या भेटीस जा. त्याप्रमाणें शत्रुघ्नासह भरतानें जाण्याचा उपक्रम केला. ही गोष्ट कैकयीस संमत झाली. तिनें अनुज्ञा दिली. त्याप्रमाणें त्यानें मुख्य मुख्य प्रधान, सेना बरोबर नेण्याचा विचार करून दशरथाची आज्ञा घेऊन त्याचा निरोप घेतला. दशरथानें निरोप देतांना त्यास फार महत्वाचा उपदेश केला तो असा—शत्रुघ्नाला बरोबर ने. त्याचें रक्षण कर. तो तुला सोडून रहाणार नाहीं असें कर. तेथील प्रजाजन तुझ्या गुणांनीं तुझ्यावर प्रेम करतील तसें वाग. माझ्याप्रमाणें आजोबास मान दे. नम्रपणें वाग. ब्राह्मणांपासून धर्मशास्त्र, नीतिशास्त्र व धनुर्वेद हीं शीक. घोडा, हत्ती, आणि रथ यांतून व्यायाम करीत जा. शिल्पकलांचें ज्ञान संपादन कर. आपलें कुशल कळविण्यासाठीं नेहमीं दूत पाठवित जा. असा निरोप देत असतांना भरतास गहिंवरून आलें. मातोश्रीस नमन करून भरत निघाला. राम-लक्ष्मण व नगरवासी जन हे चार मैल पावेतों भरतास पोंहचविण्यास गेले. नंतर भरतशत्रुघ्नांनीं रामास शिरसा नमस्कार केला. कैकयी, लक्ष्मण व मी ह्या आमची आठवण ठेव, असें

म्हणून सर्व मंडळी माघारी फिरली. कांहीं दिवसांनीं भरत राजगृहाजवळ आला. आल्याची बातमी कळविण्यासाठीं दूत पुढें पाठविला. भरताची नगरांतून मिरवणूक काढून त्याला थाटानें राजगृहीं आणलें. आल्यावर भरतानें सर्वांस नमस्कार केला. तो तेथें बरेच दिवस आनंदांत राहिला. भरत आजोळीं गेल्यावर राम देवाप्रमाणें वडिलांचा सन्मान ठेवित असे. नागरिकांची, मातृवर्गाची व थोर माणसांचीं महत्वाचीं कामें राम आस्थापूर्वक करीत असे. सर्व नगरवासी लोकांस राम फार आवडत असे.

**सर्ग ८० वा**

भरत आजोळीं असतां कोणे एके वेळीं सकाळीं उठला. आजोबास नमस्कार करून म्हणाला, मला गुरूंजवळ शिकण्याची आज्ञा द्या. धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, चित्रकला, गणितशास्त्र, हत्ती घोडा रथ हीं यानें, तसें च गायनविद्या, नानाप्रकारच्या कला व वेदांग यांत निष्णात असून विनयशील असे गुरु असावे. अशा गुरूंच्या सेवेंत राहून आत्मकल्याणास्तव ज्ञान संपादन करावें अशी माझी इच्छा आहे. आपली संमति पाहिजे. हें केकयराजानें ऐकून अध्यापकवर्गास सांगितलें. त्यांच्या सेवेंत राहून भरतानें शास्त्रांत प्राविण्य मिळविलें. असें हें झाल्यावर अयोध्येस दूत पाठवावे असें भरतास वाटलें. त्याप्रमाणें एका वयस्क ब्रह्मवेत्त्या मित्राला बोलावून सांगितलें कीं, चपल घोडे घेऊन अयोध्येला लवकर जा. वडिलांस कौसल्येस त्याप्रमाणें माझ्या आईस मी येथें ज्याप्रमाणें वागतों तें तूं सर्व सांग. रामाची भेट घेऊन गौरवपूर्वक सांगावें कीं, तुमचा दास भरत तुमच्या चरणांवर मस्तक ठेवून प्रेमानें कुशल विचारतो. लक्ष्मणाला आलिंगन देऊन कुशल विचारावें. मातोश्री कैकयी, कौसल्या आणि सुमित्रा यांस माझा प्रणिपात सांगावा. भरताच्या आज्ञेवरून दूत अयोध्येला आला. सांगितल्याप्रमाणें सर्वांस कुशल कळविलें. तें ऐकून सर्वांस आनंद झाला. राजा, राम, कौसल्या, कैकयी आणि सुमित्रा यांनीं दूताला उलट निरोप सांगितला व त्याचा सत्कार करून त्यास भरताकडे परत पाठविलें.

**सर्ग ८१ वा**

ह्या दोन्ही मुलांची राजास आठवण फार होत असे. चारींहि मुलें राजास प्रिय होतीं. पण राम गुणरत्नाकर असल्यानें सर्वांत जास्त आवडत होता. ह्या ठिकाणीं या सर्गांत रामाच्या अंगीं असलेल्या गुणांचे उत्कृष्ट वर्णन केलेलें अर्थदृष्ट्या सारखें च मुंबईरामायणाच्या अयोध्याकांडांत पहिल्या सर्गांत व कांहीं दुसऱ्यांत आलेलें आहे. त्यावरून लक्षांत येईल. अशा रामास युवराज करावें असें दशरथाच्या मनांत आलें. राजाचें मनोगत वशिष्टप्रभृति गुरुजन, नागरिक व देशवासी जन या लोकांनीं जाणून ते एकत्र जमले. रामास युवराज करावें, असा निश्चय करून तसें दशरथ राजास त्यांनीं सांगितलें. त्यानंतर दशरथ राजा त्यांस असें म्हणाला

कीं, मी धर्मानें राज्य करीत असतां माझ्या मुलास तुम्ही कां म्हणून युवराज करूं इच्छितां ? असें दशरथानें त्यांचें मत पाहण्याकरितां विचारलें असतां सर्व मंत्र्यांनीं, नागरिकांनीं राम गुणवान् आहे असें सांगून त्यांचें सविस्तर गुणवर्णन केलें. तेव्हां त्यास राज्याभिषेक केव्हां होईल व आम्ही केव्हां पाहूं असें आम्हांस झालें आहे असें ते म्हणाले.

या वरील तीन सर्गांपैकीं पहिल्या दोन सर्गांचा भाग मुंबईरामायणांत मुळीं च नाहीं. ८१ व्या सर्गांतले वर्णनाचे कांहीं कोठें कोठें जशाचे तसे च तर कोठें वाक्यरचना, शब्दरचना निराळी करून मुंबईरामायणांत अयोध्याकांडाच्या पहिल्या १-२ सर्गांत असल्याचे वर आलें च आहे. लाहोररामायणांत मात्र तीन हि सर्ग अयोध्याकांडाच्या सर्ग १-२-३ यांत जवळजवळ तसे च आलेले आहेत. १-२-३ सर्गांच्या शेवटीं अनुक्रमें ' भरतगमनं नाम ', ' भरतदूतागमनं ' नाम, ' प्रकृतिसमागमो ' नाम, असें लिहून संपविले आहेत. ह्या रामायणाच्या पोथींतील आदिकांडांतील हे ७९-८०-८१ सर्ग ह्या रामायणाच्या पोथींत हि अयोध्याकांडांत पुन्हां अनुक्रमें पहिला, दुसरा व तिसरा म्हणून जवळ जवळ तसे च पुनः आले आहेत. मात्र श्लोकसंख्येंत फरक आहे तो असा—

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आदिकांडांत | ७९ सर्ग | श्लोक | ५० | अयोध्याकांडांत | १ ला | श्लोक | ३९ |
| ,, | ८० ,, | ,, | २३ | ,, | २ रा | ,, | ३० |
| ,, | ८१ ,, | ,, | ३९ | ,, | ३ रा | ,, | ६६ |

त्या हि सर्गांचा शेवट अनुक्रमें ' भरतप्रस्थानो ' नाम, ' दूताभिगमनो ' नाम, ' प्रकृतिसमागमो ' नाम, असें लिहून झाला आहे. यावरून हें आदिकांड ज्या पोथींतलें आहे, त्या पोथींतलें च अयोध्याकांड नसावें. असें ह्यावरून दिसतें व लेखनकाल पाहतां तें सत्य आहे. अनुक्रमणिका सर्ग पाहतां आदिकांडांत ' अयोध्या-संप्रवेशश्च प्रवासो भरतस्य च । अयोध्यावासिनां चैव प्रमोदः परिकीर्त्यते ॥ २८ ॥ ' यांत ' प्रवासो भरतस्य च ' असें असल्यावरून मामाच्या घरीं जाण्याचा जो भरताचा प्रवास तें आदिकांडांत पाहिजे हें स्पष्ट दिसतें.

या रामायणाच्या पोथींतला या कांडांतला तिसरा सर्ग १५० श्लोकांचा असून त्यांत रामायणांतल्या पुढें वर्णन करावयाच्या कथांचा अनुक्रम सांगून सर्ग व श्लोक यांची संख्या सांगून प्रत्येक कांडाचीं नांवें सांगून त्यांत सर्ग किती व श्लोक किती हें सांगितलें आहे. व पोथींत एकंदर सर्गांची संख्या किती व श्लोकांची संख्या किती हें सांगितलें आहे.

## (२) अयोध्याकांड

पूर्वी दशरथानें दोन वर दिले त्यांची चांगली आठवण करून दिली असें कैकयीनें मंथरेस सांगून, पूर्वी राक्षसांबरोबर दशरथ युद्ध करीत असतांना राक्षसांच्या भीतीपासून मी त्याचें रक्षण केलें, कारण तशी विद्या मला अवगत होती, ती विद्या कशी प्राप्त झाली ह्याविषयीं कैकयीनें मंथरेस हकीकत सांगितली ती अशी —

मी लहानपणीं जीर्ण वस्त्र परिधान केलेला, दाढी ज्याची वाढलेली, भस्म ज्यानें फासलें आहे, इत्यादि वर्णनाचा वृद्ध ब्राह्मण पाहून त्याचा उपहास केला. त्यानें न रागावतां उलट प्रसन्न च होऊन ती विद्या दिली. त्यामुळें मी दशरथाचें संरक्षण करूं शकलें. हें कथानक मुंबई रामायणांत नसून तें मात्र या पोथींत या कांडांत ११ व्या सर्गांत आहे. ते श्लोक —

न खल्वस्ति बलं किञ्चिन्मम राक्षसवारणे ।
मम विद्याबलं त्वस्ति येनाहं दुष्प्रधर्षिणी ॥ ४३
विद्यायाश्चागमं कुब्जे शृणु वक्ष्याम्यहं स्वयम् ॥ ४४
मयापहसितो बाल्ये मूर्खवेषो द्विजोत्तमः ।
जीर्णवस्त्रपरिच्छन्नः श्मश्रुलस्तृणभूषणः ॥ ४६
भस्मभूषितसर्वाङ्गः वृद्धो हर्षुलसंकथः ।
अविज्ञातकथाभावः चेष्टाभिरनवास्थितः ॥ ४७
प्रसन्नश्चाह मां विप्रः सुशीतां मधुरां गिरम ।
प्रीतोऽस्म्यश्वपतेः कन्ये ब्रूहि किं करवाणि ते ॥ ४८
समया प्रह्वया भूत्वा बध्वा चाञ्जलिकुड्मलम् ।
उक्तो वाक्यमिदं कुब्जे लज्जया ललिताक्षरम् ॥ ४९
न किञ्चिदहमिच्छामि कृतमेतावता मम ।
यन्मे क्रोधं परित्यज्य प्रसन्नस्त्वं द्विजोत्तम ॥ ५०
एवमुक्तेन तु मया तेन हर्षितचेतसा ।
ममातिसृष्टा विद्येयं बहुमानान्मया धृता ॥ ५१

रामानें मंथरेची कांहींतरी खोडी केली होती. त्याची तिनें आठवण ठेवून राज्याभिषेकाच्या वेळीं रामाचें वाईट करण्याची तिनें बुद्धि केली, असें ह्या रामायणाच्या पोथींत वर्णन आहे. 'राघवे न हिता पापा स्मरन्ती पूर्वकिल्बिषम्। कस्मिंश्चिदपराधेहि क्षिप्ता रामेण सा पुरा॥' (अयो० सर्ग ९)

कैकयीनें रामास वनांत पाठविण्याच्या कामीं मंथरेचें इतकें कां ऐकिलें याबद्दल या पोथींत जास्त उल्लेख आहे तो असा—

कैकयी लहानपणीं केकयदेशांत बापाच्या घरीं होती. एकदा ब्राह्मणाचें वेडसर रूप पाहून त्याकडे तिनें सदोष दृष्टीनें पाहिलें. त्यानें तिला शाप दिला कीं ज्या अर्थी तूं रूपाच्या गर्वानें ब्राह्मणाकडे सदोष दृष्टीनें पाहतेस त्या अर्थी तुला जगांत लोक अशा गर्हणीय दोषदृष्टीनें पाहतील. त्याबद्दल श्लोक—

केकयेषु तु या बाल्ये ब्राह्मणं मूर्खरूपिणम्।
असूयितवती बाला येन शप्ता महात्मना॥
यस्मादसूयसे विप्रं त्वं रूपमदगर्विता॥ ३६

तस्मात्त्वमप्यसूयां च लोके प्राप्स्यसि कुत्सिताम्।
इति शापसमापन्ना मन्थरावशमागता॥ ३७

## ( ३ ) आरण्यकांड

मुंबई रामायणांत ५६ व्या सर्गानंतर प्रक्षिप्त म्हणून जो सर्ग दिला आहे, तो सर्ग या पोथींत ६७ वा असून त्यास 'हविःप्रादानिको नाम सर्गः' असें शेवटीं म्हटलें आहे.

यांत २४ व्या सर्गाच्या आरंभीं 'एवं तस्य तदा याताः शरदोऽर्धत्रयोदश' असें लिहिलें आहे, तें मुंबईरामायणांत नाहीं. वनवास करून रामास येथपर्यंत किती वर्षे झाली हें यांत दाखविलें आहे.

मुंबईरामायणांतल्या बाराव्या सर्गांतील १७ ते ५७ आणि ५८ वा अर्धा असे ४१ श्लोक अगर तत्समानार्थक दुसरे श्लोक या पोथींत नाहींत.

मुंबईरामायणांतील अयोध्याकांडाच्या ११८ व्या सर्गांत 'मी जनक राजास कशी प्राप्त झालें' हें सीतेनें अनसूयेला सांगून स्वयंवरांत रामानें धनुर्भंग केला नंतर दशरथराजास निमंत्रण करून मला रामास दिलें. अशा तऱ्हेनें मी रामास प्राप्त झालें. याप्रमाणें स्वयंवराची त्रोटक हकीगत आहे. परंतु या पोथींत या कांडाच्या चौथ्या सर्गाच्या शेवटीं जनकानें स्वयंवरांत पण फक्त लावला एवढें सांगून सर्ग संपविला. (य इदं धनुरुद्यम्य राजा सज्जीकरिष्यति। सुताया मेद्य सीतायाः स वै भर्ता भविष्यति) नंतर या च कांडांतील पांचव्या सर्गांत सीतेनें अनसूयेस स्वयंवराची हकीगत सांगितली तो २३ श्लोकांचा सर्ग असून त्यांत याप्रमाणें सांगितलें— 'स्वयंवराकरितां तें धनुष्य ठेवून राजे लोकांस निमंत्रण करण्यासाठीं दूत पाठविले. राजे स्वयंवरगृहांत जमले. तें धनुष्य वांकविण्यास राजे असमर्थ होऊन परत गेले.

अशा रीतीनें स्वयंवराचें काम बंद पडलें. नंतर जनक राजास चिंता वाटूं लागली. ह्या गोष्टीस पुष्कळ काळ लोटला. राम लक्ष्मणासह शिकारीकरितां फिरत असतां त्यानें परत जातांना ह्या धनुष्याचें महत्त्व ऐकिलें. माझ्या पतीस (रामास) धनुष्याबद्दल फार कौतुक वाटून रामानें माझ्या वडिलांकडे येऊन नमस्कारपूर्वक धनुष्य पहाण्याची आपली इच्छा प्रकट केली. माझे वडील रामाच्या वडिलांचे मित्र होते. तें पाहून त्यानें मोडलें. लागलीच मी दिल्याबद्दल रामाच्या हातांवर उदक सोडणार, परंतु वडिलांची आज्ञा पाहिजे असें रामानें सांगितलें. मग दशरथास बोलावून मला रामास अर्पण केलें. ही येथें हकीगत असून आदिकांडांत विश्वामित्रानें यज्ञ पाहण्यासाठीं रामलक्ष्मणांस धनुष्य पाहण्याची इच्छा झाल्यानें त्यांना बरोबर नेलें. जर राम धनुष्य सज्ज करील तर त्याला मी सीता देईन असें जनकानें सांगितलें. राजभटांकडून धनुष्य आणविलें. राम तें हातांत घेऊन सज्ज करीत असतांना च तें धनुष्य मोडलें. दशरथास बोलावून समारंभ करून सीता रामास अर्पण केली अशी कथा आहे.

अनसूयेची भेट होऊन तिनें सीतेस अंगराग (उटी) दिला. ही कथा या पोथींत आरण्यककांडांत च आहे हे यांतील अनुक्रमणिकेला धरून च आहे. 'अतः काण्डं तृतीयं तु आरण्यकमितिस्मृतम्। यत्र रामो महाबाहुर्दण्डकं प्राविशद्वनम्। अनसूयासमस्या च अङ्गरागस्य चार्पणम्' असें अनुक्रमणिकेंत आहे तसें च 'शबरीदर्शनं चैव पम्पायां परिदेवनम्। इति काण्डं तृतीयं तु आरण्यकमिति स्मृतम्॥' या अनुक्रमणिकेच्या श्लोकांत लिहिल्याप्रमाणें पंपा सरोवरावरील विलाप या पोथींत आरण्यककांडांत आहे. अत्यंत विस्तारानें तो मुंबईरामायणांत किष्किन्धाकांडांत आहे. 'राक्षसयुद्धो' नाम या नांवाच्या तेहतिसाव्या सर्गांतल्या वर्णनाप्रमाणें वर्णन मुंबई रामायणांत नाहीं.

या पोथींत चौसष्टाव्या सर्गांत मारुतीनें समुद्र तरून जाण्यासाठीं मोठें शरीर धारण केलें. वानरांची भीति दूर व्हावी म्हणून आपला पराक्रम वर्णन केला. (प्रत्ययार्थे स्ववीर्यस्य कुलं वक्ष्यामि यादृशम्। मम जन्म यथातत्वमद्भुतं मातरिश्वनः॥ सर्ग ६४ वा). परंतु आपला जन्म वायूपासून कसा झाला, वरप्रदान कसें प्राप्त झालें, ती सर्व हकीकत सविस्तर यांत आहे. मुंबईप्रतींत तो विस्तार नाहीं.

समुद्रोल्लंघन करण्यास जातेवेळीं इन्द्र, विष्णु, रुद्र, शंकर, मरुत् आणि सप्तर्षि इत्यादिकांचें सामर्थ्य तुला मिळो. तुझें मंगल होवो. अशीं आशीर्वचनें म्हणून मोठ्या हर्षानें वानरांनीं मारुतिरायांची स्तुति केली तो उत्तम रचनेचा सर्ग मुंबईरामायणांत नाहीं.

हें कांड श्रीमत् शके १५४५ संवत्सरांत लिहून झालें असें शेवटीं लिहिलें आहे. हें लिहिण्यापूर्वी ' यान्ति न्यायप्रवृत्तस्य तिर्यञ्चोपि सहायताम । अपन्थानं तु गच्छन्तं सोदरोऽपि विमुञ्चति ॥' हा मुरारिकवीच्या अनर्घराघवांतील अनुरूप श्लोक लेखकानें उद्धृत केला आहे.

**(५) सुंदरकांड**

या कांडाच्या ३३ व्या सर्गात खालील श्लोक आहे. तो मुंबई रामायणांत नाहीं. श्रीएकनाथमहाराजांच्या भावार्थ रामायणांत व हनुमन्नाटकांत थोड्याबहुत फरकानें आहेत यावरून ह्या प्रतीसारखीं प्रत नाथमहाराजांच्या संग्रहीं होती असें दिसतें. तो श्लोक असा :—

सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्यैव भाविनि ।
प्रेषितं तव रामेण सुवर्णस्याङुलीयकम् ॥

हनुमन्नाटकांत (वेंकटेश्वर छापखान्याची प्रत अंक ६ श्लोक १५ वा)

सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्यैव मैथिलि ।
प्रेषितं रामचन्द्रेण सुवर्णस्याङ्गुलीयकम् ॥

भावार्थरामायणांत (सुंदरकांड अध्याय ११ यांत श्लोक ३ रा)

रामनामाङ्कितं दिव्यं श्रीरामस्याङ्गुलीयकम् ।
सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्य च भामिनि ॥

या पोथींत 'अङ्गुलीयकदर्शन' या नांवाचा हा तेहातिसावा सर्ग आहे. तत्पूर्वी 'शोकापनोदन' नांवाचा १३ श्लोकांचा सर्ग आहे, त्यांत 'स त्वां कौशल्यमब्रवीत्' हें चरण शेवटीं असलेले श्लोक फार रसभरित आहेत. त्या वर्णनाचे श्लोक मुंबईरामायणांत नाहींत.

मारुतीचें समुद्रोल्लंघन, त्याच्या विश्रांतिसाठीं मैनाकानें समुद्राच्या वर येणें, तसें वर येण्यास त्यास समुद्रानें सांगणें, मैनाकाची व मारुतीची भेट आणि त्यांचा संवाद, सिंहिकेचा वध इत्यादि कथा मुंबईरामायणांत या कांडाच्या पहिल्या सर्गांत आहेत. त्या ह्या रामायणाच्या पोथींत किष्किंधाकांडांत हि नाहींत व सुंदरकांडांत हि नाहींत हा मोठा फरक आहे. अनुक्रमणिकासर्गावरून या कथा पोथींत सुंदरकांडाच्या आरंभीं पाहिजेत असें दिसतें. अनुक्रमणिकेंत 'अतःपरं प्रवक्ष्यामि काण्डं सुन्दरसंज्ञितम् । हनुमत्प्लवनं यत्र सुरसायाश्च दर्शनम् ॥ मैनाकस्य गिरेश्चैव दर्शनं परिकीर्तितम् । निधनं सिंहिकायाश्च.:..... ॥ ७५।७६ ॥

मुंबईरामायणांत या कांडाचे ६८ सर्ग आहेत. ह्या पोथींत तितकेच आहेत. श्लोकांचे अनुक्रमांक साऱ्या कांडांत दिलेले नाहीं. मुंबईरामायणांत २७ व्या सर्गांत [ ] अशा कंसांत लिहिलेले प्रक्षिप्त श्लोक १७ ते २९ व ४१।५२।६५ या पोथींत नसून तत्समानार्थक निराळे हि नाहींत. मुंबईरामायणांतले ३१।३२ सर्ग यांतील कथानकाबद्दल या पोथींत सर्ग २८ सावा आहे. मुंबईरामायणांत मारुतीनें रामाच्या नेत्रादि अवयवांचें वर्णन सर्ग ३५ यांत केलें आहे. ते श्लोक १५ व्या पासून विसाव्यापर्यंत आहेत. परंतु या पोथींत त्यापेक्षां २०।२० श्लोक अवयव-सौष्ठवाच्या वर्णनाचे ३१ व्या सर्गांत जास्त आहेत.

मुंबईरामायणाचा या कांडाचा २ रा सर्ग यांतील सर्व कथांचा आरंभ म्हणजे या पोथींतील या कांडातल्या १ ल्या सर्गांतील कथांचा आरंभ होय. मुंबई रामायणांत या कांडाचे ७।८ हे दोन सर्ग मोठ्या वृत्ताचे पुष्पकविमानाच्या वर्णनाचे आहेत. तसें वर्णन या पोथींत नाहीं. अनुक्रमणिका सर्गांत तर " दर्शनं पुष्पकस्येह विमानस्य च वर्णनम् " असें आहे.

रावणाच्या महालांत सीतेच्या शोधासाठीं रात्रीं मारुति गेला असतां त्यानें मंदोदरीस पाहून ही च जानकी आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं मंदोदरीच्या तोंडाचा वास मारुतीनें घेतला. तो वास कमळाच्या वासाप्रमाणें नाहीं असें समजून ही सीता नाहीं म्हणून तो सचिंत झाला हें जास्त वर्णन या पोथींत आहे. ( सुंदरकांड सर्ग ८ पहा )

उपजिघ्रन्मुखं तस्या वानरेण महात्मना । न प्राप्तं पद्मगन्धं च मुखे तस्याः पुनः पुनः ।। अन्येयमिति निश्चित्य....... । असें वर्णन आहे.

( वरील श्लोकांत ' उपाजिघ्रत् ' या क्रियापदाबद्दल ' उपजिघ्रत् ' हें भूतकाळाचें रूप योजलें आहे )

## ( ६ ) युद्धकांड

या पोथींतील या कांडाचे १११ वा व ११२ वा हे सर्ग मुंबई रामायणांत नाहींत. त्यांतील कथा अशी—कालनेमि नांवाच्या राक्षसास रावणानें सांगितलें कीं मारुति हा द्रोण व चंद्र या पर्वतावर उगवलेलीं औषधि घेण्यास जात आहे. तरी तूं सूर्योदयाच्या पूर्वी त्याच्या वाटेवर जाऊन मायेनें एक आश्रम तयार कर. ऋषिरूप धारण करून मारुतीचें आदरातिथ्य कर. तेथील मगरीकडून मारुतीस ठार करावें. ह्या कामगिरीबद्दल मी तुला अर्धें राज्य देईन. त्याप्रमाणें कालनेमीनें तेथें जाऊन स्वतः अग्निहोत्र्याचें रूप धारण करून जपमाळ हातांत घेऊन मारुतीची मार्गप्रतीक्षा करीत बसला. मारुतीनें येऊन त्यास नमस्कार केला. त्यानें त्याचें स्वागत केलें. खाणेंपिणें

करून विश्रांति घेऊन जा म्हणून कालनेमि म्हणाला. मारुतीनें आपली सर्व हकीगत सांगितली. मारुतीनें पिण्यासाठीं पाणी मागितलें. ज्या तळ्यांत ती मगरी होती, तें तळें त्यास दाखविलें. मारुति पाणी पीत असतां त्याचा उजवा पाय मगरीनें ओढला. मारुतीनें तिला जमीनीवर आणून तीक्ष्ण नखांनीं फाडलें. ती दिव्य अप्सरा विद्युन्माली नांवाची झाली. तिनें आपल्या शापाचें कारण सांगून हा ऋषि नसून मायावी राक्षस आहे, कालनेमि असें त्याचें नांव आहे, असें सांगून तद्विषयक सर्व माहिती सांगून त्यास ठार कर, असें सांगून ती अंतर्धान पावली. नंतर मारुतीनें त्यास ठार करून द्रोण व चंद्र या पर्वतांवरील राक्षस पहारेकरी यांचा पराभव केला. पर्वत आणून औषधीचा रस सुषेणानें लक्ष्मणाच्या नाकांत सोडल्यावर लक्ष्मण उठला. ही हकीगत या पोथींत विस्तारानें आहे. या दोन्ही सर्गांतले मिळून ९३ श्लोक श्रीएकनाथमहाराजांच्या भावार्थरामायणांत युद्धकांडांत अध्याय ४५-४६-४९-५० यांत थोड्या फरकानें आलेले आहेत. त्यांची संख्या खालीलप्रमाणें —

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अध्याय | ४५ | वा | श्लोक | १ | ते | ३० |
| ,, | ४६ | वा | ,, | १ | ते | २० |
| ,, | ४९ | वा | ,, | १ | ते | १७ |
| ,, | ५० | वा | ,, | १ | ते | २६ |

यावरून या पोथी सारखी च रामायणाची पोथी श्रीएकनाथमहाराजांच्या अवलोकनांत होती असें दिसतें. ही कथा मुंबई रामायणांत मुळींच नाहीं हें वर सांगितलें च आहे.

या पोथींतला ११३ वा सर्ग 'होमस्थानाचा नाश' 'मंदोदरीस घेऊन जाण्याचा प्रयत्न' 'मंदोदरीचा रावणास उपदेश' हा मुंबई—रामायणांत नाहीं. रामाशीं समेट व्हावा या इच्छेनें बिभीषणानें रावणास जानकी रामास परत दे म्हणून सांगितल्यावर रावण क्रोधानें आरक्तनयन होऊन त्यानें बिभीषणास लाथ मारली असें अनुक्रमणिकासर्गांत आहे. (जघान यत्र पादेन भ्रातरं वै बिभीषणम्) पण ह्या पोथींतला त्या वर्णनाचा तो सोळावा सर्ग पाहतां असा प्रकार झाल्याचा त्यांत उल्लेख नाहीं. तेव्हां अनुक्रमणिकेप्रमाणें असलेल्या रामायणांतलें हें युद्धकांड नसावें कीं काय?

या पोथीच्या या कांडाच्या आठव्या सर्गांत अशी कथा आहे कीं, मारुतीनें केलेलें लङ्कादाहाचें भयंकर कृत्य पाहून रावणाची आई कैकसी हिला फार दुःख झालें. तिनें बिभीषणास रावणास बोध करावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें रावणास बोध केल्याच्या वर्णनाचा प्रसंग मुंबईरामायणांत नाहीं. पण त्यांतले श्लोक

थोड्याबहुत फरकानें श्रीएकनाथमहाराजांच्या भावार्थरामायणांत आहेत ( पहा भावार्थरामायण युद्धकांड सर्ग ३५ संस्कृत श्लोक १ ते ३।४।६ ते १३ . )

## ( ७ ) उत्तरकांड

मुंबई रामायणांत या कांडांत प्रत्येक सर्गाच्या शेवटीं मोठ्या वृत्ताचे जे श्लोक दिले आहेत ते ह्या पोथींत नाहींत . ते सर्ग येणेंप्रमाणें--सर्ग १, ८ ते १०, ४०,५४ ते ५६, ५८, ५९, ६१, ६४, ६६, ६७, ७०, ७५, ७७, ७९, ८६, ९४ ९५, ९६. तसेंच मुंबई रामायणांत [ ] अशा कंसांत लिहिलेले श्लोक या प्रतींत हि बहुतेक नाहींत असें म्हटलें तरी चालेल.

## —रामेण रामदासेन—

ह्या पोथीच्या आदिकांडाच्या शेवटीं ही आदिकांडाची पोथी कोणी कधीं लिहिली व संपविली याचा उल्लेख केला आहे तो असा--

शक संवत् १५४४ दुंदुभिनाम संवत्सरे माघ शुद्ध रवौ अस्मिन् शुभादिने 'रामेण रामदासेन लिखितमिदं पुस्तकम्'

असा उल्लेख आहे . ह्या संस्कृत वाक्याचा अर्थ रामभक्त राम यानें हें पुस्तक अर्थात वाल्मीकिरामायणाचें हें अदिकांड शके १५४४ दुंदुभिनाम संवत्सरे माघ शु० १३ रविवार ह्या शुभदिनीं लिहून संपविलें . रामेण ह्या पदाचें विशेषण रामदासेन म्हणजे रामस्य दासेन – रामाच्या दासानें – भक्तानें असा याचा अर्थ. त्या रामदासाचें– रामभक्ताचें नांव राम असें होय. श्रीसमर्थरामदासस्वामी महाराज यांचें नांव नारायण असल्याचा उल्लेख आहे. 'रामदासेन लिखितम्' म्हणजे समर्थमहाराजांनीं लिहिलें असा अर्थ केल्यास रामेण हें पद जुळत नाहीं असें सकृद्दर्शनीं दिसतें. पण श्रीरामदासी संशोधन द्वितीय खंड यांत श्री० नानासाहेब देव यांनीं रामेण – राघवनाम्ना, रामेण रामदासेन म्हणजे श्रीसमर्थांनींच होय असें म्हटलें आहे, व त्याला प्रमाणें हि दिलीं आहेत .

## एक विलक्षण साम्य

ही रामायणाची प्रत करित असतांना कांडाच्या समाप्तीच्या वेळीं रामेण रामदासेन यांतील रामदासेन असें वाचल्यावर समर्थांचें च नांव डोळ्यापुढें उभे रहात असे व मी एके वेळीं आनंदरामायणांत वाचलेले राम-रामदास ते च हे कीं काय, असें वारंवार मनांत येई. आनंदरामायणांतील कथानक या खालीं मी देत आहे. त्याचा चिकित्सक योग्य तो विचार करतील.

मुंबईच्या जगदीश्वर छापखान्यांत गोवर्धनदास लक्ष्मीदास ठक्कर यांनीं शके १८०९ त आनंदरामायण नांवाचें वाल्मीकिविरचित रामायण छापून प्रसिद्ध केलें आहे. त्या रामायणाच्या प्रस्तावनेंत नव्वद रामायणें संस्कृत भाषेंत उपलब्ध असल्याचें लिहून त्यांचीं नांवें हि दिलीं आहेत. त्यांपैकीं हें आनंदरामायण होय. त्यांतील यात्राकांडाच्या २ऱ्या सर्गाच्या शेवटीं शंकरानें पार्वतीस सांगितलें तें असें – सविस्तर रामायण सांगणें शक्य नाहीं. त्यांतलें सार घेऊन तुझ्या प्रेमास्तव यात्राकांड सांगेन. रामदास हा पुढें विष्णुदासाला सांगेल. हें रामदास व विष्णुदास यांचें नांव शंकराचें तोंडून ऐकल्यावर पार्वतीनें यात्राकांडाच्या तिसऱ्या सर्गाच्या शेवटीं खालीं लिहिल्याप्रमाणें महादेवास प्रश्न केला.

रामदास कोण? विष्णुदास कोठला? त्याचा रामदास गुरु कसा? हें मला सांगा. शंकर म्हणाले, भरतखंडांत दंडकारण्यांत गोदावरीच्या कांठीं अञ्जक नांवाच्या क्षेत्रांत नृसिंह नांवाचे ऋषि होतील. त्यांचा मुलगा राम नांवाचा. त्याचा शिष्य विष्णु नांवाचा. हे गुरुशिष्य नेहमीं रामसेवेंत तत्पर होतील. ते रामाचे दास्य करूं लागल्यामुळें ते दोघे ब्राह्मण रामदास, विष्णुदास म्हणून पुढें गोदावरीच्या दक्षिण तीरावर प्रसिद्धि पावतील. रामदास हे गयेला जाऊन पितृश्राद्ध करून पृथ्वीवरील सारीं तीर्थें क्रमाक्रमानें हिंडून गृहस्थाश्रमांत राहून गोदावरीच्या कांठीं विद्यार्थ्यांस पढवितील इत्यादि. हें नामांतील साम्य मला विलक्षण वाटतें.

एकदा शिष्य विष्णुदास हे गुरु रामदास यांस नानाप्रकारच्या कथा ऐकून कांहीं विचारण्याच्या बुद्धीनें रामदासगुरूंस विचारतील. या कथेवरून लक्षांत येईल कीं, राम हा गृहस्थाश्रमी कोणी असून रामभक्तीमुळें रामदास नांव प्राप्त झालें म्हणून तो रामदास राम म्हणावयास बाध नाहीं. व त्याचें रहाण्याचें ठिकाण गोदावरीतीर आहे. ते च हे समर्थ असें म्हणतां येत नाहीं. कारण हे रामदास राम गृहस्थाश्रमी होते असें वर आलें असून वडील नृसिंह नांवाचे होते.

याप्रमाणें या रायायणाच्या पोथीच्या कामीं माझ्या अल्प मतीला जें स्थूलमानानें दिसलें तें या निबंधांत नमूद केलें आहे. रामचरित (समग्र रामायण) माझ्या हातून लिहविण्याचा हा सुपुण्ययोग श्री. नानासाहेब देव यांनीं घडवून आणला त्याबद्दल त्यांचे आभार मानून ज्यांच्या प्रत्यक्ष देखरेखी खालीं व दररोज श्रींच्या दर्शनलाभामुळें व नमस्कारानें हें प्रत करण्याचें काम माझ्याकडून निर्विघ्न पार पडलें त्याबद्दल समर्थवाग्देवतामंदिरांत नेहमीं सांनिध्यरूपानें असलेल्या समर्थांच्या चरणीं साष्टांग नमस्कार करून हा निबंध पुरा करितों.

---

# श्री समर्थकालीन मठ व त्यांची दिसणारी कामगिरी

( लेखक —इतिहासभूषण रा. सा. **बाबासाहेब देशपांडे, पुणें** )

( १ ) श्रीसमर्थांचा जन्म गोदाकांठीं, सर्व आप्त गोदापरिसरांत.

( २ ) बाराव्या वर्षीं च सावधानता व नाशिकाजवळ पुरश्चरणास आरंभ.

( ३ ) बारा वर्षे भगवंताचें अधिष्ठानप्राप्तीकरितां पुरश्चरण. नाशिकाजवळ टाकळीस असतांना च शहाजीराजांची भेट.

( ४ ) तीर्थयात्रेच्या निमित्तानें सन १६३२ पासून १६४४ पर्यंत सर्व भरतखंडांत हिंडून देशस्थितीचें पूर्ण निरीक्षण.

( ५ ) गोदापरिसरांत जन्म पावलेला महापुरुष कृष्णातटाकीं व त्यांतून च मसूरास, अगर त्याजवळ आपले पुढील कार्यास सुरवात कां करितो व शहाजीराजांच्या जहागीरपरगण्यांत च कां करितो ?

( ६ ) चाफळखोऱ्यांत च १६४४ नंतर आरंभीचीं कित्येक वर्षे त्यांनीं दऱ्याखोऱ्यांतून च काढण्याचें कारण काय असावें ?

( ७ ) जनास दिसे हा दुश्चित। परी तो आहे सावचित,<br>
अखंड जयाचें चित्त। परमेश्वरीं॥ १४-७-१५

( ८ ) हें त्यांचें चित्त परमेश्वरीं अखंड लागलें म्हणजे काय ?

( ९ ) जनतेस त्यांनीं काय सांगितलें कीं, ज्याची चटक त्यांस लागली ?

(१०) आपल्या कृतीचा आपल्या ठिकाणीं अहंकार जडूं नये म्हणून लोकसंग्रह त्यांनीं गुप्तपणें केला, अथवा गुप्तपणें च लोकसंग्रह करणें त्या वेळच्या परिस्थितींत त्यांस योग्य होतें ?

(११) आपला वेष बावळा ठेवून, पिसाटाप्रमाणें कृति करून, जनतेची परीक्षा व निरीक्षण करून, हीन दीनता दाखवून, लोकांवर छाप पाडून, त्यांस आपलेकडे खेचण्याचा त्यांनीं अखंड प्रयत्न केला, पण तो गुप्तपणें केला, तो कोणास कळूं दिला नाहीं, हें कां ?

(१२) हा प्रयत्न केला त्यावेळीं कृष्णापरिसरांत महंमद अदिलशहाचा अंमल होता. तो हिंदूंचा कट्टा शत्रू असून, त्यांचे हालचालींवर त्याची कडक नजर असे. अशा स्थितींत लोकसंग्रह करून, त्यांजकडून उद्दिष्ट कार्यें करून घेऊन पुढील होणाऱ्या राजकारणाचा पाया भरभक्कम घालणेकरितां सर्व कार्यें करावयाचीं तीं गुप्तपणेंच करणें भाग होतें व दिङ्मूढ झालेल्या लोकांस हरिकथानिरूपणाचें

द्वारें एक ठिकाणीं आणून श्री रामरायाचें च चरित्र त्यांचे मनावर ठसवून, "सामर्थ्य आहे चळवळे चें। जो जो करील तयाचें। परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे॥" हें जनतेस पटविण्यास हरिकथानिरूपण हा च एक मार्ग खुला होता.

(१३) अगोदर लोक एक ठिकाणीं आणणें, मग त्यांस कथामृत— आणि तें हि रामरायाचें—समर्थांच्या समर्थ वाणीनें पाजवून, त्यांस त्याची चटक लावून, मग आपण स्थळस्थळांतून निसटून जाऊन, खरी चटक लागणारांस आपल्यामागें शोध करीत फिरावयास लावून, योग्य ठरल्यास, सर्वतोपरी विश्वासास पात्र ठरल्यास, जवळ दूरी ठेवणेची प्रथा पाडली. पण हें सर्व उदंड गुप्तरूपें केलें!

(१४) हरिकथानिरूपणानें पुढील राजकारणाचा पाया श्रीसमर्थांनीं, कृष्णा-परिसरांत, ठाईं ठाईं भजनें सुरू करून – आपण मात्र मधून मधून परीक्षा घेणें-करितां जागा सोडून खनाळामध्यें जाऊन राहून, सर्व विश्वाची चिंता तेथें च करीत राहून, कोणचे उपाय योजले असतां जनास आपल्या इष्ट हेतुकरितां खेचतां येईल, त्यांस वेड लागेल, आपलेशिवाय त्यांस चैन च पडणार नाहीं, आपण सांगूं तें करण्यास ते कसे व किती आतुरतेनें तयार होतील, त्यांचा आत्मविश्वास कसा वाढेल, त्याजमध्यें उत्कट भक्ति कोणच्या उपासनेनें निर्माण करतां येऊन कार्यसिद्धी करून घेतां येईल ही च चिंता त्या महापुरुषास लागून त्या दिशेनें त्यांनीं जगांत खेळ मांडला. ज्या खेळानें श्रीराम राजी होतील, ज्या खेळानें जनता-जनार्दन राजी होईल व इष्ट साध्य होईल, तो च खेळ श्रीसमर्थांनीं मांडला व आपणास साह्य करणारे खेळगडी कोण मिळतात, हें निरीक्षण करण्याकरितां श्रीरामश्रीहनुमानउपासना सुरू केली. भजनप्रेमानें त्यांनीं भक्तिमार्गाचा जोर केला, डळमळणारीं मनें स्थिर केलीं.

(१५) सह्याद्रींतील निर्जन स्थळें, घळ्या, दरीखोरें श्री समर्थांचीं निवास-स्थळें बनलीं. तेथें त्यास भेटण्यास जाणाऱ्या लोकांत भक्ति, तीव्र निष्ठा, तळमळ, सेवा करण्याची उत्सुकता व अनन्यता स्वाभाविक च उत्पन्न झाली. ज्यानें आपलें सर्व आयुष्य जनताजनार्दनाचे सेवेस अखंड अर्पण केलें, ज्यानें आपल्या सुखांस, जनतेस सुख व्हावें म्हणून, तिळांजळी दिली, आधीं स्वतः भयंकर कष्टसायास केले, मग जनतेस सांगावयास सुरुवात केली; खडतर तपश्चर्या करून, लोकस्थितीची पूर्ण जाणीव करून घेऊन, ते ज्या दुःसह स्थितींत होते त्या स्थितींतून त्यास कसें बाहेर काढून, मग ज्यास जें कार्य योग्य तिकडे त्याची योजना करण्याचें काम त्यांनीं किती गुप्तपणें पार पाडलें हें पाहिलें म्हणजे मन थक्क होऊन जातें. अशा तऱ्हेनें परीक्षा झाल्यावर, प्रत्येकाचे अधिकार काय आहेत हें निरीक्षण झाल्यावर,

त्यांस दुरीजवळी धरलें, महंत होण्यास योग्य असतील त्यांस महंत केले, त्यांस युक्तिबुद्धिवान केले व नाना ठिकाणीं नाना देशांत पाठविले, त्यांस सर्वत्र विखुरले, फेकले, व इष्टकार्यसिध्द्यर्थ त्यांची खात्री करून घेऊन त्यांस रवाना केले. पण असे उदंड समुदाय केले ते गुप्तरूपें केलें. आपण स्वतः येकांत व तो हि सह्याद्रीचे खनाळांत, दऱ्याखोऱ्यांत, सृष्टीच्या परमावधीच्या सौंदर्याच्या माहेरांत नितांत रमणीय प्रदेशांत श्रीच्या सांन्निध्यांत केला आणि तो हि अधिकार पाहून जवळ केलेल्या जनांसहित केला. तेथें त्यांनीं या अशा जवळी केलेल्या जनांसहित अभ्यास केला व काळाचें सार्थक केलें. तेथें, यापुढें जगांत जाऊन देवकार्य, धर्मकार्य, मराठा तितुका मेळवण्याचें कार्य, आपुला महाराष्ट्रधर्म वाढविण्याचें कार्य करण्याचा अभ्यास पुरा झाल्यावर, त्यांस देशोदेशीं पाठविले. हा अभ्यास गुप्तरूपें, गुप्त ठिकाणीं, निर्जन अरण्यांत परमेश्वराचे सांन्निध्यांतच झाला. हे जे आधीं कष्ट, भयंकर कष्ट केले, त्याचीं मधुर फळें पुढें श्रीरामकृपेनें महाराष्ट्रास चाखावयास मिळालीं. सुप्त महाराष्ट्रास स्वतः खडतर तपश्चर्या करून, परमेश्वराचें अधिष्ठान संपादन करून, ह्या धगधगीत पुण्यराशी महापुरुषानें जागृत केलें. त्यास कर्तव्याची दिशा दाखविली. अखंड चालना सुरू ठेवली. आपले आयुष्यांतील एक क्षणही त्यांनीं वाया घालविला नाहीं. अखंड कामाची लगबग ठेवली. अशा तऱ्हेनें लोक तयार झालेवर त्यांनीं आपणांस मिळालेल्या शिक्षणाप्रमाणें दुसरे लोक तयार करण्याचा सपाटा लावला.

( १६ ) आपण आसेतुहिमालय पर्यटण केलें. अनेक दुर्गम स्थळें पाहिलीं. कोठें काय आहे, जनतेची स्थिती कशी आहे, काय केलें असतां जनतेला नीट मार्ग दाखवितां येईल, कोणाची योजना करावी, अनुपान काय असावें, हें १२ वर्षे देशाटन करून त्यांनीं ठरविलें. या दुर्घट कार्यास सर्वस्वीं वाहून घेणारीं माणसें, कणखर वृत्तीचीं, आचरणाचीं, मरून जातील पण हटणार नाहींत, अशीं कोठें मिळतील म्हणून त्यास अखंड ध्यास लागला. श्रीरामांनीं त्यांस संदेश दिला. "जा कृष्णापरिसरांत." सर्व भरतखंडांतील पर्वतांत सह्य पर्वत जुना व अति कणखर असें भूगर्भशास्त्रवेत्ते म्हणतात. या कणखर प्रदेशांतील रहिवासी कणखर तर खरे च, पण त्यांचा कणखरपणा त्यांस पूर्णपणें पटवून देण्यास तत्कालीन परिस्थितींत दोन पुरुष दोन दिशांनीं प्रयत्न करीत होते. श्री समर्थ गोदातीरीं जन्मून, सर्व तयारी करून, आपली कार्यभूमि कृष्णातटाक ठरवून, तिच्या तटाकीं च कार्य करण्यास येऊन वरीलप्रमाणें त्यांनीं कार्यास सुरवातही केली. दुसरा पुरुष महाराष्ट्राचा स्वातंत्र्यदाता श्री शिवछत्रपतीश्रीसमर्थांस बाळपणीं च विश्वाची चिंता लागली, व मातोश्रीनें एकांतांत काय करतोस म्हणून विचारतां च, "आई, चिंता करितो विश्वाची," असें उत्तर खणखणीत दिलें व सर्व जन्मभर त्यांनीं विश्वाची च चिंता केली व त्या चिंतेचें

निरसन आपल्या आयुष्यांत च करून ते मुक्त झाले. तसें च विश्वाचें अखंड चिंतन करणारा दुसरा पुण्यश्लोक पुरुष श्री शिवराय. १५ व्या वर्षी च ज्यानें "हें हिंदवी स्वराज्य व्हावें असें श्रीच्या मनांत फार आहे" असें पत्र दादजी नरस प्रभूस लिहिलें, व ज्यानें श्रीसमर्थांप्रमाणें च आपला देह राष्ट्रकार्यास पूर्णपणें अर्पण करून, अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली व महाराष्ट्रास परदास्यांतून मुक्त केलें. ह्या दोन महापुरुषांचीं मनें ज्या पुण्यस्थानीं ज्या प्रयागांत एक झालीं तें शिंगणवाडी, चाफळाजवळील स्थळ, महातीर्थ होय! गंगा-यमुना या महानद्यांच्या संगमानें बनलेलें जसें महा पवित्र तीर्थ प्रयाग उत्तरेस अखंड निर्माण झालें, तसें च श्रीसमर्थ व श्री शिवराय यांच्या मीलनानें शिंगणवाडी हें महा तीर्थ प्रयागराज बनलें. येथें च हे दोन महामन पुरुष एकरूप झाले. श्री रामाचा श्री समर्थास मिळालेला संदेश यथार्थ ठरला. सह्याद्री हा या दोन्ही पुरुषांचें कार्यक्षेत्र. येथून च पुढील कार्यास दिशा मिळाली. येथून नाना देशीं, नाना दिशेस महंत विखुरले. येथील च महाबल अतिबल झालें. महाबळेश्वर व अतिबलेश्वर आज ही खिन्न अंतःकरणानें आपणांकडे पाहत आहेत. "महाबळ" (मावळे) अतिबळ सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत च झाले, व त्यांनीं अतुल पराक्रम केलें. एकानें उदंड समुदाय गुप्तरूपें केलें, त्यांतून अधिकार जाणून, त्यांस महंत करून देशोदेशीं विखुरले; व दुसऱ्यानें ही त्याचप्रमाणें परीक्षा करून, अत्यंत खडतर दिव्यें करून, तावून सुलाखून, अधिकार देण्यास योग्य, विश्वासास पात्र ठरल्यावर त्यांस महंत, पुढारी, सेनानायक बनवून, लोकसमुदाय करण्यास, पण तें गुप्तरूपें करण्यास प्रवृत्त केले. गंगेनें हिमालयांतून निघून आपल्या कक्षेंत येणाऱ्या सर्व प्रदेशास पावन केलें, यमुनेनेंही ते च कार्य केलें. अशा रीतीनें सर्व प्रदेश पावन करीत करीत, सर्वांस उल्हसित करीत करीत, त्या दोन्हीं महानद्या एका च ठिकाणाहून, एक च उद्देश मनांत धरून, सर्व जगांस सुखी करावें म्हणून, अनंत दुर्गम स्थळांतून वाट काढीत, पुनश्च त्यांचें मीलन प्रयागास होऊन, एकरूप होऊन जगदोद्धार करीत, सागरांत लीन झाल्या. त्याप्रमाणें श्रीसमर्थ व श्री शिवराय यांनीं, अनंत संकटें भोगून, जनहितांकरितां देह पणास लावून, अखंड परमेश्वरभक्तीच्या सहाय्यानें आपलें उद्दिष्ट गांठून, या महाराष्ट्रास ऋणी करून ठेवलें. महाराष्ट्र या दोन्हीं महापुरुषांचे शिक्षणास पारखा झाला आहे. या दोन्हीं पुरुषांच्या चरित्राचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. त्यांनीं लावलेला नंदादीप अखंड तेवत ठेवला पाहिजे. तो विझूं देतां कामा नये. त्यांत स्नेहसंवर्धन अखंड सावधानतेनें करीत राहिलें पाहिजे, वात सारली पाहिजे. वातीनें आपला देह जाळून दुसऱ्यास, 'स्नेहा'च्या मदतीनें प्रकाश देण्याचें काम अखंड करीत राहिले पाहिजे. देवापुढें नवरात्रांत नंदादीप

लावून तो अखंड तेवत ठेवण्याचा हेतु हा च-खचित हा च!! स्नेह सरूं न देतां, अखंड त्यांत, वारंवार जाग्रत राहून, भर घालून, आपणांस जाळून घेणाऱ्या, आत्मयज्ञ करणाऱ्या, वातीस पुढें सारून स्नेहाच्या मदतीनें त्यास अखंड प्रकाशमान ठेवण्याचें काम आज तागायत आमच्या परमपूज्य माता व भगिनी करीत आल्या आहेत. हा नंदादीप विझला तर आपणावर खास संकट येणार ही भावना त्या आमच्या परमपूज्य स्त्रियांत आजही आहे. ही गोष्ट खरी नव्हे काय? स्नेहवर्धन झालें नाहीं, परस्परमीलन झालें नाहीं, स्वार्थत्यागाची तयारी मुळीं च नाहीं, तेथें नाश खास होणार च; यांत बिलकूल शंका नाहीं. नंदादीपाची ही शिकवणूक आम्हीं विसरलों. आम्हांस खर्च जास्त होतोसें वाटूं लागलें. मूळांतील अर्थ गेला, अनर्थ पावलोंपावलीं दारांत उभा राहिला!

(१७) श्री समर्थांनीं प्रबोधशक्तीच्या अनंत द्वारांनीं लोकांचीं अंतरें जाणलीं, लोकांस चटक लावली, बोलण्यासारखें चालण्याचें जगास शिकाविलें; आपण स्वतः क्रिया करून दुसऱ्यास तसें करावयास लावलें; म्हणून च ते समर्थ पदवी पावले. ते जनताजनार्दनासी तादात्म्य झाले. त्यांनीं सर्वांची मनोगतें जाणून योग्य तेंच केलें. त्यांनीं पुढें होणाऱ्या महत् कार्याची पूर्व तयारी, महंत निर्माण करून त्यांस देशोदेशीं विखरून मठ निर्माण करून, बिलकुल शंका उत्पन्न होणार नाहीं अशा रीतीनें, त्यांनीं महाराष्ट्रधर्माचा प्रसार करावा अशी योजना केली. लोकांची परिस्थिती कशी आहे, त्यांचीं मनें कशीं तयार केलीं जातील हें पहाण्याकरितां, सर्व महंतांनीं

कुग्रामें अथवा नगरें। पहावीं घरांचीं घरें।
भिक्षामिसें लाहानथोरें। परीक्षून सोडावीं॥

हें कशाकरितां सांगितलें? भिक्षा मिळवून पोट भरण्याकरितां खास नव्हे! त्रिवार नव्हे! नित्यनूतन हिंडून देशाटण करण्यास कां सांगितलें? अशा तऱ्हेनें हिंडून कोण कसे, कोणावर विश्वास ठेवला असतां आपला कार्यभाग होईल, कोणाच्या पाठीमागें किती लोक आहेत. व असे लोक मिळविले असतां विनाकारण वेळ न जातां अनायासें अशा पुरुषांमागें इतके लोक मिळूं शकतील, हें जाणून त्याप्रमाणें च करावें, असें कां सांगितलें? एकांतांत च अनेक युक्त्या सुचतात, आणि म्हणून च व्याप आटोप करावे, धकेचपेटे सोसावे, आणि मग दैववान व्हावे असें समर्थ सांगतात. कष्ट! कष्ट! कष्ट! यत्न! यत्न! यत्न! प्रयत्न! हा समर्थांचा उपदेश आहे. जो कष्ट करणार नाहीं, यत्न करणार नाहीं, त्यास कांहीं च प्राप्त होणार नाहीं, हा उपदेश, हा मंत्र, महामंत्र, समर्थ अट्टाहासानें त्यावेळीं सांगत व त्याचा परिणाम काय झाला हें इतिहास सांगतो.

( १८ ) आजही श्री समर्थ आपणांत आहेत, श्री ग्रंथराजरुपानें, श्री दासबोधरुपानें, आपणास ते आज तो च उपदेश करीत आहेत. स्नेह नाहीं, त्याग नाहीं, तेल नाहीं, वात नाहीं, प्रकाश कसा पडणार ? गाढ अज्ञान! गाढ अंधकारांत काय दिसणार ? कांहीं दिसावें, कांहीं समजावें, कांहीं वाट सांपडावी, कांहीं सोय लागावी, कांहीं सौख्य मिळावें, अशी खरोखर च इच्छा असल्यास, श्रीसमर्थांस च शरण गेलें पाहिजे, व महाराज, प्रगट व्हा, मार्ग दाखवा. प्रबोधशक्ति द्या, या जीवास संकटांतून सोडवा अशी अहर्निश प्रार्थना करून, यत्नास लागलें पाहिजे ! 'येहलोक व परलोक, दोहींकडे सारखा च विवेक' लागतो तर. सर्व करणें तें येहलोक वा परलोकांमधील सुखें मिळविण्याकरितां गुप्तरुपानें च केलें पाहिजे. आपण करावें, करवावें, हें ब्रीदवाक्य लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागा असें समर्थ सांगतात. उपासना पुढें करून, श्री हनुमंताची उपासना, श्रीरामाची उपासना पुढें करून, त्यांतून काय निष्कर्ष काढावयाचा हें श्रीसमर्थांनीं जनतेस शिकवून त्यास मार्ग दाखविला. कामाचा कधीं च कंटाळा नसावा, अखंड कामाची लगबग असावी, सर्वांचीं कामें करून देण्याची संवय करावी; अतएव जेणें करून लोक राजी राहतील, व अशा उपकार करणाऱ्या, दिशा दाखविणाऱ्या माणसांच्या मागें धांवतील, देहत्यागास ही तयार होतील, अशी स्थिती जनतेंत निर्माण करावी, ही श्रीसमर्थांची शिकवण! उपासनेचा आश्रय मोठा आहे, उपासना करणार नाहीं, ती जाणून सार्थ करणार नाहीं, त्यास परमेश्वराचा आश्रय मिळणार नाहीं व त्यास जयही कदापि मिळणार नाहीं आणि ज्याचे पाठीवर कोणी समर्थ नाहीं, त्यास भलताच वाटेल त्या वेळीं कुटील, म्हणून उपासना करावी, भजन करावें, असें श्रीसमर्थ सर्वांस सांगतात.

( १९ ) उपासना, भजन करीत असतां, ज्याची उपासना वा भजन आपण करितों, त्यासारखें होण्याचा आपण प्रयत्न करावयाचा हा मूळ अर्थ. तो श्रीसमर्थकाळीं त्या वेळच्या भयंकर परिस्थितीमुळें लोपल्यामुळें श्रीसमर्थास एवढा अट्टाहास करावा लागला. आज ही आम्ही श्रीहनुमंतास वा श्रीरामास पाणी घालणें व गंधफूल चढविणें एवढें केलें कीं, धार्मिक बनतों. अभंगाचा अर्थ न समजतां वा त्याप्रमाणें काडीइतकें जन्मभर न वागतां, फक्त बाह्य साधनांच्या द्वारें आपण वारकरी झालों, एवढें च समाधान मानून जन्मभर वागणाऱ्यास जसें आत्मज्ञान होणें शक्य नाहीं व फलप्राप्ति होणें हें मुळीं च शक्य नाहीं, त्याचप्रमाणें, ज्यांचें भजन करावयाचें तें कशाकरितां हें समजलें नाहीं वा तें समजून आचरणांत आणलें गेलें नाहीं, तर कोणचें हि सार्थक होणें शक्य नाहीं.

(२०) माझा श्रीसमर्थवाङ्मय, महंत आणि मठासंबंधीं, वाचून असा ग्रह आणि तो पूर्ण ग्रह झाला आहे कीं, या महंत आणि मठ देशोदेशीं स्थापण्याचा हेतु दोन प्रकारचा, बाह्यत: हरिकथानिरूपण, भक्तिमार्गाचें प्रोत्साहन व एकीकरण, कष्ट करण्याचें, यत्नवादी बनण्याचें आवाहन, अंतस्थ, लोकांचें एकीकरण, उपासनारूपानें परमेश्वराचें अधिष्ठान, आत्मविश्वास, संशोधन, वाटेल ते कष्ट करून इष्ट साध्य करून घेण्याची तयारी, त्यागाची परमावधी, संकटीं धैर्यधारिष्ट दाखविण्याची उद्युक्तता, व हें सर्व उत्तम रीतीनें साधण्यास अखंड सावधानता व गुप्तपणा, देशकाल वर्तमान समजून घेण्याची तयारी, प्रसंगाप्रमाणें वागण्याची तात्काल तयारी, अव्यवधान बिलकुल नसून, घडोघडी सुचितपणा व तडातडीचा प्रबोध. अशा तऱ्हेनें तयारी झाल्यावर, देव मस्तकीं धरून, अवघा हलकल्लोळ करण्याची तयारी! हा हलकल्लोळ कशाकरितां? ही परिस्थिति उत्पन्न करण्याकरितां केलेला खटाटोप पहातां हें सर्व धर्मस्थापनेकरितां व धर्मस्थापना स्वराज्यावांचून होणें शक्य नाहीं म्हणून स्वराज्य स्थापणाऱ्या पुरुषास पूर्णपणें मदत करण्याकरितां व ती मदत उघडपणें देणें जावत्काल शक्य नाहीं, चार माणसें एके ठिकाणीं जमणेंही जेथें शक्य नाहीं अशावेळीं, सर्व च कृत्यें गुप्तपणें करण्याकरितां श्रीसमर्थांची अखंड तळमळ! माझें म्हणणें आणि तें हि अनुभवजन्य म्हणणें असें कीं, हे सर्व मठ, गुप्तपणें एके ठिकाणीं जमा होण्याचीं ठिकाणें, व महंत म्हणजे गुप्त मंडळ्यांचे चालक! यांनीं हें काम बेमालूम केलें. आजच्या काळांत देखील प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांत गुप्त हेरांचीं जाळीं स्वदेशांत व परदेशांत पसरल्याचें दृष्टीस वारंवार येतें. पितामह भीष्माचार्य शरपंजरीं असतां, श्रीकृष्ण शोकाकुल धर्मराजास त्यांजकडे घेऊन गेले, व धर्मास राजनीति सांगा, त्याचें सांत्वन करा, असें म्हणाले. पितामह भीष्मांनीं धर्मास पहिला प्रश्न विचारला तो, तुझे हेर बरोबर काम करतात ना? तुला बातम्या वेळेवर व बरोबर पोहोचवितात ना? ते तुझे डोळे आहेत व त्यांजवर च तुझें राज्य आहे, हें तूं जाणतोस ना? ही च गोष्ट आज सर्वत्र दृष्टीस पडते. या शास्त्राचा अभ्यास एके काळीं आमच्या ह्या देशांत परमावधीस पोहोंचला होता! महाभारत, शुक्राचार्य, बृहस्पति, चाणक्य, कामंदकी वगैरे अनेक महापुरुषांनीं व ग्रंथांनीं जगानें त्यांच्यापासून शिकावें असा या विषयांवर अभ्यास केलेला आजही आपणांस पहावयास मिळेल. श्री समर्थ व श्री शिवराय यांचा या शास्त्राचा अभ्यास फार वर्णनीय असून त्याचा फायदा त्यांनीं पुरेपूर घेतला. श्रीसमर्थांनीं अखिल भारतांत ११०० मठ स्थापले, ते हिमालयापासून रामेश्वर व गयेपासून हिंगलाजमातेपर्यंत स्थापले. श्री शिवराय आग्र्यास अडकले! महाराष्ट्रावर महत्संकट कोसळलें. गांठ परम धूर्तासी पडली.

त्यास श्रीशिवरायांनीं उत्तम प्रकारें चकविलें. जन्मभर ती आठवण तो विसरला नाहीं. आपण फसलों, आपणांस कसें चकविलें व त्याचा परिणाम आपणांस अंतकाळापर्यंत कसा भोगावा लागला हें तो पुरुष कधीं विसरला नाहीं. संकट-काळीं ही शिवराय देवधर्म विसरले नाहींत, आणि म्हणून च " ये यथा मां प्रपन्द्यते तांस्तथैव भंजाम्यहम्" ही भगवंतांची उक्ति दोन्हीं बाजूंनीं खरी ठरली.

(२१) याचवेळीं सुटका झाल्यावर मथुरेच्या श्रीसमर्थमठांत कृष्णाजी, काशीजी व विसाजी हे तीन बंधु, प्रख्यात मुत्सद्दी, योद्धा, वक्ता, शिल्पशास्त्रविशारद, महा पंडित मोरोपंत पिंगळे यांचे मेहुणे कां उपस्थित झाले? श्री शिवाजी महाराज दक्षिणेस, पूर्वेस, पश्चिमेस न जातां आग्र्याहून उत्तरेस च कां गेले? व मथुरेस च रातोरात श्रावण वद्य १२ रोजीं जाऊन दुसरे दिवशीं शिवराय संपूर्ण बैरागी कां बनले? मथुरेस त्यांनीं बाल संभाजीस काशीजी व विसाजी यांचे ताब्यांत देऊन व आपलें स्वतःचें पत्र येतां च त्यास संभाळून राजगडीं आणावें म्हणून सांगून, तो आपला पंचप्राण शंभू त्यांचे स्वाधीन कां केला? यास एक च कारण, ते समर्थशिष्य श्रीसमर्थमठांत या अत्यंत महत्त्वाच्या कामगिरीकरितां च उपस्थित झाले असले पाहिजेत. शंभू मेला, त्याची क्रियाही करून त्याचा तपास च या पुढें न व्हावा म्हणून तो मेल्याची बातमी उठवून पुनः पुनः वजाऊन महाराज आपल्या पुढील मार्गास लागले! कृष्णाजी महाराजांचा वाटाड्या झाला. दोन हजार मैलांचा रानावनांतून प्रवास, संकटें आ पसरून वाटेंत उभीं राहिलेलीं, गांवा निहाय हुकूम–फर्मानें सुटलेलीं, दहा हजार स्वार तपासाकरितां रवाना झालेले. अशा भयंकर दिव्यांतून अनेक वेळां जाळ्यांत सांपडले असतां श्रीशिवराय देशीं सुखरूप परत कसे आले याचा विचार पूर्णपणें करण्यासारखा आहे! ज्या ज्या प्रदेशांत समर्थांचे मठ व मठपति होते, तिकडून च कृष्णाजी त्यांस कसा घेऊन येतो? यावरून त्या अस्मानी सुलतानीच्या काळांत देखील कृष्णाजी हा सर्व देश, निदान ज्या भागांतून तो शिवरायास घेऊन आला तो देश, पूर्वी पाहून आला होता खास! व त्यास सर्व मठांची माहितीही होती हें निश्चित! भरलेल्या नद्या, महानद्या, अरण्यें ओलांडून आडरानांतील रस्त्यानें हा महाराष्ट्राचा पंचप्राण सुखरूप आणण्यांत कृष्णाजी, निराजी रावजी, बाळाजी आवजी, तानाजी मालुसरा, राघो मित्र, या निःसीम स्वामीभक्तांनीं जी कामगिरी केली ती त्यावेळच्या महाराष्ट्रानें मुक्तकंठानें वाखाणली असेल! शिवरायांनीं देशीं आल्यावर या सर्वांचा गौरव अवश्य केला. कृष्णाजीस "विश्वासराव" पदवी दिली, पालखीपदस्थ केला. सुवर्णाचा वर्षाव केला, प्रत्येकाचें दारिद्र्य नाहींसें केलें. ही सर्व कामगिरी करण्यांत हेरगिरी कामास आली. श्रीसमर्थमठ

स्थापण्याचें सार्थक झालें. शिवराय त्यानंतर आठ वर्षांनीं सिंहासनाधीश्वर झाले. महाराष्ट्राचें कार्य झालें. देव मस्तकीं धरून सर्वत्र हलकल्लोळ झाला. गोदा, भीमा, भामा, कृष्णा, तुंगा, अखंड वाहत असतां स्नानसंध्या करणें दुरापास्त झालें होतें, त्यांच्या पवित्र सलिलांत नंतर स्नानदानें होऊं लागलीं! "उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया" अशी या आनंदवनभुवनाची परिस्थिति करण्यास हे दोन पुण्यश्लोक महापुरुष कारण झाले म्हणून उपकृत महाराष्ट्रानें त्यांना कधींहि विसरतां कामा नये. त्यांचें अखंड स्मरण ठेवून त्यांच्या शिकवणीप्रमाणें यथाकाळ वागण्यांत च महाराष्ट्राचें कल्याण आहे.

---

( २९ )

## शककर्ते समर्थ

( लेखक — प्रिन्सिपॉल **जगन्नाथ रघुनाथ घारपुरे**, बी. ए., एल्‌एल्‌. बी., एफ्‌. आर्‌. एस्‌. ए. ( लंडन ), सीनियर ॲडव्होकेट, फेडरल कोर्ट, **मुंबई**)

कलिःशयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरत्‌ ॥

वरील अवतरण ऐतरेय ब्राह्मणांतील हरिश्चंद्राच्या कथेंतलि आहे. त्यांत ग्रथित केलेलें तत्व अत्यंत महत्वाचें त्रिकालाबाधित सत्यस्वरूपी आहे. अकिंचित्कर कर्तव्यपराङ्मुख किंवा कर्मविमुख स्थिति असणें हें कलीचें गमक समजावें, म्हणजे अत्यंत हीन दशेचें तें लक्षण होय. त्याप्रमाणें पुढें पुढें चलनवलनाच्या चढत्या प्रमाणावर व्यक्ति किंवा समाज उद्युक्त झाला म्हणजे द्वापर व त्रेता या स्थितिद्वयांतून निघून शेवटीं सुयशस्कर उद्योग झाला म्हणजे तें कृतयुग समजावें. अशा युगांच्या प्रवृत्तीला जे कारणीभूत होतात त्यांना **युगकर्ते** किंवा **शककर्ते** समजण्यांत येतें.

आपल्या भारतवर्षांत अशा श्रेष्ठ व्यक्ति ज्या झाल्या, आधुनिक कालांत व विशेषेंकरून महाराष्ट्रांत ज्यांच्यामुळें विचारक्रांति व तत्सम पराक्रमक्रांति घडून आली, त्यांत प्रामुख्यानें **श्री शिवाजी महाराज** व **श्री समर्थ रामदास स्वामी महाराज** या येतात. विशेषेंकरून त्या वेळची व तत्पूर्वींची भारतवर्षांची व महाराष्ट्राची स्थिति व उपरिनिर्दिष्ट महनीय व्यक्तींच्या योगानें त्यांत झालेलें रूपांतर यांचा विचार केला म्हणजे या व्यक्तींस " शककर्ते " म्हणणें प्राप्त च होतें.

यांच्या प्रयत्नानें सनातन धर्माची पुनः प्रतिष्ठा झाली. व या च मार्गानें आचार्यांनीं चालू केलेल्या पद्धतीनें आक्रमण करून निवृत्तिनाथ ज्ञानदेवादि महाराष्ट्रीय संतांनीं " एकमेवाद्वितीयं ब्रह्म ", " तत्वमसि " हीं तत्वें महाराष्ट्रांत प्रचलित करून महाराष्ट्रीयांकडून आत्मसात्‌ करविलीं. भारतवर्षांतील आपसांतलि मतभेदापासून किंचित्‌ उसंत मिळूं लागतो तो महंमदीयांच्या आक्रमणास प्रारंभ झाला. व हळु हळु त्याच्या ज्वाळा सर्व हिंदुस्थानभर पसरल्या.

शिवाजी महाराजांच्या वेळचा महाराष्ट्र म्हणजे साधारणपणें भडोच ते अंकोलापावेतों पश्चिम किनारा, तसें च उत्तरेस नागपुर भंडारा, व तेथून पूर्वेच्या

बगलेनें दक्षिणेकडे चांदा बेदर, कल्याणी, सोलापुर, विजापुर, हुबळी, व अंकोल्यापावेतोंचा प्रदेश त्या वेळच्या महाराष्ट्रांतील समजण्यास हरकत नाहीं. या प्रदेशांतील बलसाड ते गोंवा – फोंडा हा पश्चिम किनाऱ्यावरील भाग व त्याला पूर्वेच्या बाजूवरील असलेल्या इंदापुरापावेतों पश्चिमेकडून पूर्वेकडे व दक्षिणेकडील गोंव्यापासून पूर्वेकडे सरळ रेषा काढल्यास सदरहु रेषांतरित जो प्रदेश येतो त्यास साधारणपणें शिवकालीन शिवराज्यांतर्गत महाराष्ट्र समजण्यास हरकत नाहीं. त्या वेळची महाराष्ट्राची स्थिति म्हणजे राष्ट्रीय जीवनाला मूलभूत व आधारभूत अशीं जीं राजकीय, सामाजिक व धार्मिक अंगें तीं सर्व विस्कळित होऊन गेलेलीं असून, समाज अत्यंत खालावलेला होता. समुद्रालगत असलेल्या प्रदेशांत म्हणजे गोव्यापासून दमणपावेतों समुद्र, आखातें व खाड्या यांच्या लगत्यांतील सर्व प्रदेशांत ठिकठिकाणीं फिरंग्यांनीं उच्छाद चालविला होता, तर अंतःप्रदेशांत मुसलमानी धर्मानुयायांचें आक्रमण तितक्या च कठोर जाज्वल्यतेनें चालू होतें. देवालयें व त्यांतील देव यांची केविलवाणी स्थिति झालेली होती. यवनांच्या वारंवार येणाऱ्या टोळधाडींमुळें मिळकती व स्त्रिया यांचे धिंडवडे उडत. फिरंग्यांनीं आमूलाग्र वैदिक संस्कृतीचे उच्छेदनाचा वसा च घेतला होता. स्त्रिया, मुलें व पुरुष यांना भ्रष्ट करून च ते थांबले नाहींत. वैदिक, संस्कृत व एतद्देशीय वाङ्मयही सर्व निर्मूल करण्याचे व्यवस्थित प्रयत्न त्यांचे चालू होते.

किती येक ग्रामें चि तें वोस जालीं । पिकें सर्व धान्यें च नाना बुडालीं ।
किती येक धाडीवरि धाडि येती । द्वयां सैन्यकाचेनि संव्हार होती ।। २
कियी येक ते घ्राणकर्णें चि घेती । किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती ।
किती मोट बांधोन तें बूडवीती । पिछोडे चि बांधोनि हीरोनि नेती ।। ७
किती गुज्रिणी ब्राह्मणी भ्रष्टवील्या । किती शांमुखी जाहाजी फांकवील्या ।
किती येक देशांतरीं त्या विकील्या । किती सुंदरा हाल होऊनि मेल्या ।। ९

(अस्मानी सुलतानी — प्रबंध पहिला)

ही झाली परकीय आक्रमणाची अवस्था. अंतर्गत व स्थानिक स्थितींत तरी कांहीं स्थायीभाव असावा, तर तें हि नाहीं.

नाना मतें निर्माण जालीं । नाना पाषांडें वाढलीं ।
नाना प्रकारीचीं उठिलीं । नाना बंडें ।। ११–२–१६
पृथ्वीचा जाला गलांठा । येकाहून येक मोठा ।
कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ।। १८

शास्त्रांचा बाजार भरला। देवांचा गलबला जाला।
लोक कामनेच्या व्रताला। झोंबोन पडती॥ २३
ऐसें अवघें नासलें। सत्यासत्य हारपलें।
अवघे अनायेक जाले। चहूंकडे॥ २४
मतामतांचा गल्बला। कोणी पुसेना कोणाला।
जो जे मतीं सांपडला। तयास तें चि थोर॥ २५
असत्याचा अभिमान। तेणें पाविजे पतन।

तसें च

कित्येक म्लेंच होऊन गेले। कित्येक फिरंगणांत आटले।
देशभाषानें रुधिले। किती येक॥ १९-२-३

त्यामुळें

मऱ्हाष्टदेश थोडा उरला। **राजकारणें** लोक रुधिला।
अवकाश नाहीं जेवायाला। उदंड कामें॥ ४

अशा प्रकारची त्या वेळची महाराष्ट्राची व बहुतेक सर्व भारतवर्षाची स्थिति होती.

श्री समर्थांचा जन्म शके १५३० च्या चैत्र शुद्ध ९ च्या मध्यान्हीं सूर्य असतां झाला. श्री शिवाजी महाराजांप्रमाणें च श्री समर्थांच्या अवतारपूर्वकालीन दंतकथा प्रसृत आहे. त्यांत त्यांचे पूर्वज व मातापितरांविषयीं प्रसंग वर्णिलेले आहेत. कै. न्यायमूर्ति रानडे यांनीं म्हटल्याप्रमाणें अशा शककर्त्या विभूतींच्या मोठेपणाला कोणच्याही दंतकथेची अपेक्षा नसते. त्यांचे स्वतःचे पराक्रम त्यांतून दृग्गोचर झालेलीं हीं च प्रात्यक्षिकें त्यांचा मोठेपणा प्रस्थापित करण्यास समर्थ असतात.

पांचव्या वर्षी म्हणजे शक १५३५ सालीं मौंजीबंधन, नंतर श्रीरामानुग्रह, वडिलांचें इहलोकांतून निर्याण, आणि शक १५४२ सालीं 'सावधान' शब्द ऐकतां च विवाहमंडपांतून पलायन केल्यावर बारा वर्षें टाकळीनजीक गोदातटाकीं तपश्चर्या व नंतर बारा वर्षें तीर्थयात्रा. नंतर कांहीं काळ आपली तपोभूमी टाकळी येथें घालवून पुढील कार्यक्रमास प्रारंभ झाला.

बारा वर्षें तीर्थयात्रा करीत असतांना अर्थात् श्री समर्थांचें निरीक्षण सतत चालू असलें च पाहिजे. या निरीक्षणाचा परिणाम जागोजागीं उपमा, दृष्टांत, वस्तुस्थितिकथन यांच्या रूपानें जें वाङ्मय उपलब्ध झालें आहे त्यावरून आपल्यास

विशद होतो. विशेषेंकरून दशक ३ समास ७ यांतील वर्णन अंगावर कांटे उभारणारें आहे. तसें च वर्णाश्रमाची भ्रष्टता, ब्राह्मणांची कर्तव्यच्युति व हीनमनस्कता, अधिकाऱ्यांचा अरेरावीपणा व जुलूम व अशा च मनाला उद्वेग व विषाद वाटविणाऱ्या गोष्टी श्री समर्थांच्या दृष्टीपुढें प्रामुख्यानें आल्या असल्या पाहिजेत. या सर्व संचारांत समर्थांच्या दृष्टीस विशेषेंकरून जी गोष्ट आली असेल ती ही कीं, लोकांचें मनोदौर्बल्य व प्रयत्नपराङ्मुखता. प्रारंभीं दिलेल्या अवतरणांतील गाढ निद्रेचें सर्वत: प्राबल्य व आत्मविश्वासाचा अभाव. त्या काळच्या राजकीय स्थितीचा विचार केला म्हणजे तो महाराष्ट्राचा उदयोन्मुख काळ प्राप्त झाला होता असें दुरून निरीक्षण करणाऱ्याच्या लक्षांत येण्यासारखें होतें. लहानपणापासून फार दिवस शेळयांच्या कळपांत वाढलेल्या वाघाच्या पिलाप्रमाणें महाराष्ट्र स्वस्वरूपास पारखा झाला होता. त्या स्वरूपाचें संधान दाखविणारा कोणी द्रष्टा पाहिजे होता. समर्थांच्या तीर्थयात्रेंत त्यांची व शहाजी राजे यांची नाशिक प्रदेशांत गांठ पडली असण्याचा बराच संभव आहे. अशा वेळीं शहाजीच्या मनुष्यबळाची समर्थांना प्रत्यक्ष जाणीव झाली असली पाहिजे. व मनुष्यबळावर सर्व कार्यें अवलंबून असतात हा सिद्धांत, जसा आज मितीला, तसा च त्या वेळींही त्रिकालाबाधित असला पाहिजे. समर्थांच्या तीर्थयात्रेच्या समाप्तीचा काळ आणि श्री शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंस्थापनेचा प्रारंभ जवळ जवळ एक च येतो. अशा वेळीं राजकीय प्रयत्नांना बुद्धिबळाची जोड झाली, क्षात्रतेज व ब्रह्मतेज एकवटून कार्यारंभ झाला तर अंतीं यशप्राप्ति खात्रीनें मिळणार ही खूणगांठ समर्थांनीं बांधली असली पाहिजे.

श्री आद्य शंकराचार्यांनीं घालून दिलेल्या सांप्रदायाप्रमाणें महाराष्ट्रीय संतशिरोमणी श्री ज्ञानेश्वर महाराज यांनीं त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून त्यास वाट पुशीत च महाराष्ट्रांतही तोच सांप्रदाय सार्वजनीक असा केला व श्री एकनाथ महाराजांनीं त्यास उजळ करून समग्र वेदांत प्रक्रिया च एकवटीनें जुळवून बहुजन-समाजास सहजसुलभ अशी केली. या संतमालिकेच्या वाङ्मयानें संस्कृत ग्रंथांतील आमूलाग्र वेदांतप्रक्रिया मराठींत आणून तें ज्ञानभांडार महाराष्ट्रजनतेस सुगम्य व सुलभ केलें व अखेरचें दालन उघडण्याचें काम श्री तुकाराम महाराजांनीं केलें. वरील संतांच्या प्रयत्नांमुळें वारकरी अथवा भागवत सांप्रदाय सर्व लोकांना सुलभ झाला. परधर्मीयांच्या आक्रमणाला पायबंद बसला ही कामगिरी बहुमोल होती यांत शंकाच नाहीं. त्यामुळें स्वधर्म–संरक्षणाचें तत्व व "स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:" हा दंडक सर्वांच्या हृन्मंदिरांत प्रस्थापित झाला. परंतु परचक्र किंवा परधर्मीयांचें आक्रमण यांना कायमचा पायबंद नुसत्या संरक्षक उपायानें केव्हां होऊं

शकणार नाहीं व कायमचा तर नाहीं च नाहीं. नुसत्या संरक्षक तत्वावर संतुष्ट न राहातां आक्रमणाचाही अवलंब केल्याशिवाय लोकांना शांति व स्वास्थ्य मिळणें अशक्य, अशी गांठ मनाशीं बांधून समर्थांच्या प्रयत्नवादाची साखर तोंपावेतों प्रचलित असलेल्या वारकरी पंथांत पडल्यामुळें पदार्थांत गोडी येऊन तो कार्यक्षम झाला. भक्तिमार्गाचा अग्रमान त्यांनीं कायम च ठेविला, परंतु ह्यांतील तत्वें कार्यक्षम होण्याला त्याला प्रयत्नाची जोड दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें च समर्थांच्या शिकवणीचें वैशिष्ट्य व तें तत्काळपावेतों कोणी ही प्रतिपादिलें नाहीं व दंडकानें तर केव्हांच नाहीं. हा प्रयत्नवाद आपाततः दिसतो इतका साधा नसून त्याचा प्रारंभ व प्रसार फार काळजीपूर्वक जोपासनेनें झाला पाहिजे व समर्थांच्या वाङ्मयाचें किंवा कार्याचें थोडक्यांत, एका शब्दांत, रहस्य सांगावयाचें झाल्यास 'प्रयत्न' हा च शब्द योग्य दिसतो. महाराष्ट्राचा कायाकल्प त्या दोन शतकांत जो आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो त्याची मुख्य मात्रा प्रयत्न. प्रयत्न हें च त्याचें निदान व प्रयत्नानें च त्याची चिकित्सा केली.

मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्व विषईं ॥
चौथा अत्यंत साक्षेप।

हें समर्थांचें साधनचतुष्टय. याचे योगानें **शयान** राष्ट्र जें कलिग्रसित असें मृतप्राय पडलें होतें त्यांत द्वापराचा प्रवेश करवून शैथिल्य सोडविण्यास लाविलें, त्रेताचे सहाय्यानें त्यांत उभे रहाण्याची स्फूर्ति आणिली आणि कृताची कृतकृत्यता अंतिम पराक्रमानें त्याजकडून संपादिली. वरील साधनचतुष्टयाचा उपयोग किती काळजीनें केला तें एकेक साधनाची समर्थपद्धती पाहिल्याशिवाय लक्षांत येणार नाहीं. **पहिली भक्ति** म्हणजे **भजन** (द. १० स. ७), दुसरें **राजकारण**, हें तर समर्थांच्या वाङ्मयाचें मुख्य बीज आहे. किंबहुना सबंध दासबोध वाचला म्हणजे राजकारण, सावधपण व साक्षेपपण हे त्याचे त्रिविध आत्मे च आहेसे वाटतें.

शक्तीनें मिळतीं राज्यें। युक्तीनें येत्न होतसे।
शक्तियुक्ति जये ठायीं। तेथें श्रीमंत धांवती ॥

× × ×

मराठा तितुका मेळवावा। आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा।
येविषयीं न करितां तकवा। पूर्वज हांसती ॥

× × ×

आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मेळवावें।
महाराष्ट्रराज्य करावें। जिकडे तिकडे ॥

× × ×

सामर्थ्य आहे चळवळेचें। जो जो करील तयाचें।
परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे ॥ २०–४–२६

हा समर्थांचा संदेश. ह्यावर सर्व प्रयत्नाचें अधिष्ठान. प्रयत्नाचें युग प्रवृत्त करण्यास वं त्याची वृद्धि करण्यास क्षात्रतेजाचें व ब्रह्मतेजाचें हे दोन प्रतिनिधी व त्यांचे प्रयत्न च कारणीभूत झाले, अर्थात ते **युगकर्ते व शककर्ते.**

# समर्थांची शिकवण कालबाह्य होणारी नसून शाश्वत आहे

( लेखक — आचार्य **श्रीराम गोसावी, नाशीक** )

## जुनी श्रद्धा

राक्षसनिषूदन राजा रामचंद्राच्या जन्मतिथीलाच व जन्मकालीं समर्थांचा जन्म झाला, या गोष्टींत आपण अध्यात्मवादी लोक यवनभाराक्रांत भारताच्या तत्कालीन राजकीय मुक्तीची दैवी योजना पाहतों. वयाच्या बाराव्या वर्षी आध्यात्मिक ध्येयानें प्रेरित होऊन विवाहमंडपांतून पलायन करणारा मुलगा पुढें बारा वर्षे जनस्थानच्या तपोवनांत तप करतों यांत आपणा भाविक सामान्य लोकांस एक प्रकारची असामान्यता वाटते. याहीपेक्षां बारा वर्षे तीर्थयात्रा करून आल्यावर समर्थांनीं जो दीर्घ चातुर्याचा कर्मयोग आचरला व धार्मिक भूमिका पत्करून जो अपार लोकसंग्रह केला, यांत समर्थांचे अपार विभूतिमत्व आपण पाहतों. योगिराज ज्ञानदेवांनीं आपल्या अपूर्व काव्यमय वाणीनें अध्यात्माचा रसरंग सर्व महाराष्ट्रभर उसळला. भक्त सम्राट् तुकारामांनीं आपल्या अनन्य विठ्ठलभक्तीनें आपलें स्थान महाराष्ट्रांत अभंग केलें. पण त्याहीपेक्षां ‘ आधीं केलें मग सांगितलें ’ या ठणठणीत तत्त्वावर भगवंताचे दैवी अधिष्ठान मिळवून व ‘ समुदायाचा हव्यास ’ कांहीं एक विशिष्ट हेतू मनीं धरून समर्थांनीं आपल्या कृष्णाकांठच्या केंद्रावरून ज्या ‘ अखंड तजविजा चाळणा ’ केल्या, दीर्घ सूचनेनें मोठ्या धारणेचे महंत तयार करून सर्वत्र समर्थसंप्रदाय फैलाविला, व प्रबोध शक्तीच्या अखंड द्वारांनीं जे असंख्य स्वजन शक्तीयुक्तीनें भारून महाराष्ट्र हिंदवी राज्यास सहाय्य केलें व ‘ रघुनाथ भजनाच्या ’ रुपानें महाराष्ट्रराज्यस्थापनेचा जो रोकडा चमत्कार शिवाजी महाराजांच्या बाहुबलावर दाखविला व सर्व कार्याचा रस्ता दासबोध ग्रंथांत लिहून कायम केला. या समर्थांच्या कामगिरीस हिंदुस्थानच्या इतिहासांत दुसरी तोड नाहीं, असें आपण समर्थभक्त मोठ्या समर्थनिष्ठेनें म्हणतो व हिंदु राष्ट्राचा पुनरुद्धार करील तर समर्थसंप्रदायच करील असा विश्वास बाळगतो.

## नवीनांचा आक्षेप

पण समर्थांविषयीं ही उपरोक्त दृष्टीही आधुनिक कालांत ‘ जुनी–सनातनी–अतएव त्याज्य वाटू लागली आहे. आमच्या आधुनिक मित्रांचा ‘समर्थसांप्रदायावर’ एक आक्षेप आहे. तो असा. समर्थांस होऊन आतां बरीच वर्षे लोटून गेलीं.

इतिहासक्रमांत त्यांच्या संप्रदायानें त्यांच्या काळीं कांहीं कार्य केलें असेल. पण तो काळ आज राहिला नाहीं. आधुनिक भारताची जनता ही समर्थकालीन हिंदु जनतेप्रमाणें धर्मप्रमाण व धर्मप्राण राहिली नाहीं. आध्यात्मनिष्ठेवरून लोक भौतिक-निष्ठेवर आले आहेत. आध्यात्मविज्ञानाची जागा जड-निसर्ग विज्ञानानें घेतली आहे. आत्मिक अंतरंग साधनापेक्षां भौतिक बहिरंग साधनांवर जनतेचा विश्वास अधिक बसत चालला आहे. धर्माची जागा राष्ट्रवादानें घेतली आहे. राजसत्तेची जागा लोकशक्तीनें घेतली आहे. मानवी हाताची जागा यंत्रानें घेतली आहे. जर्मन इटलीचा राष्ट्रवाद मनास जितकें आकर्षण करतो तितका तुमचा तो जुना पुराणा झालेला समर्थसंप्रदाय लोकांस आता आकर्षू शकत नाहीं. दासबोधापेक्षां मार्क्स व एंजेलचे ग्रंथ लोकांस अधिक आवडतात व रशियन समाजवादी क्रांतीनें तर लोकव्यवहाराचे, नीतीचे, व राजकारणाचे सर्वच दृष्टिकोण इतके पार पालटून टाकले आहेत कीं, तुमच्या त्या समर्थांच्या धर्मनिष्ठ, जातिनिष्ठ व पुराणग्रंथनिष्ठ एकतंत्री व धर्मतंत्री शिकवणुकीचा आतां काय उपयोग आहे. आजच्या भौतिक शास्त्रयुगांत तुमच्या समर्थांची धर्मनिष्ठ शिकवण भोळ्या भावनेची वाटते. आजच्या यंत्रयुगानें जीं परिवर्तनें केली आहेत, तीं समर्थांस कधीं माहीत तरी होती काय? यंत्रानें निर्मिलेल्या सुखसोयींनीं विलासी बनलेल्या लोकांना तुमचें ते विरागी रामदास व त्यांची ती शिकवण कशी आवडणार? सर्व जातिबंध तोडून समाजसत्तेची जेथें आवड निर्माण झाली आहे, तेथें वर्णधर्माचा अभिमान बाळगणाऱ्या आपल्या रामदासांचे 'रामराज्य' आतां कोणास हवें आहे? यांत्रिक युद्धशक्तीपुढें आतां आपल्या समर्थांच्या कुबडीचा काय उपयोग? आज लोक अव्यक्त देवापेक्षां व्यक्त मानव्याची पूजा करूं इच्छितात. मार्क्स व एंजेलची जडवादी संस्कृति जेथें ध्येयवादाचा उच्चांक प्रतीत होत आहे, तेथें आपल्या रघुनाथवादी ब्राह्मणनिष्ठ रामदासी संस्कृतीचे यापुढें कसें चालणार?

## कालबाह्यतेच्या आक्षेपाचा विचार

नवीनांच्या उपरोक्त आक्षेपांत साध्य व साधनें, तत्व व तपशील एतत्संबंधीं अनेक विचारांची एकच गल्लत आहे. त्यांत अनेक हेत्वाभास वापरले आहेत व असिद्धांना सिद्ध गोष्टी म्हणून गृहीत धरल्या आहेत. म्हणून कालबाह्यतेचा आक्षेप मुख्य धरून वादाचा क्षेत्रसंकोच केल्यानें उत्तर प्रत्युत्तर करणें ठीक होईल. म्हणून उपरोक्त प्रश्नाच्या सरबत्तींतून 'समर्थांची शिकवण कालबाह्य झाली आहे काय' या प्रश्नाचाच विचार करूं. खरोखर

म्हटलें तर कालबाह्यतेचा हा आक्षेप सर्वच जुन्या ज्ञानावर व ज्ञानी लोकांवर घेतां येण्यासारखा आहे. पण कोणत्याही ज्ञात क्षेत्रांतील आधुनिक सारे पंडित आपल्या पूर्वाचार्यांवर हा आक्षेप सरसकट कधींही घेतांना दिसत नाहींत. प्लेटोच्या रिपब्लिकचें ऋण अरिष्टाटलला आपल्या पॉलिटिक्समध्यें मानावें लागले आहे; इतकेंच नव्हे तर आधुनिक समाजसत्तावादीही त्याचें ऋण मानतात. प्रयोगांनीं व अनुभवांनीं ज्या ज्ञानाला सिद्धांतस्वरूपता आली तें सर्व ज्ञान भौतिक शास्त्रज्ञही केवळ जुनें म्हणून टाकून देत नाहींत तर आपल्या भावी संशोधनाला तें भूतकालीन ज्ञान पाया म्हणून वापरतात. आपल्या कॅपिटल या महाग्रंथांत खुद्द कार्ल मार्क्सनेंही इतिहासक्रम ठरवितांना भूतकालाचें ज्ञान प्रमाण मानले आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं नवीन काळांत नवीन ज्ञानप्रगति होत नाहीं. परंतु पूर्वाचार्यांचे कांहीं ज्ञान अशा स्वरूपाचें असतें कीं तें केवळ नवीन काळ आला म्हणून जुनें ठरून त्याज्य ठरत नाहीं. ही गोष्ट प्रत्येक ज्ञानक्षेत्रांत शास्त्रज्ञांच्या अनुभवास आलेली आहे. व्यवहारांतील यांस एकादें उदाहरण द्यावयाचें झालें तर सूर्याचें तेज हें एका दृष्टीला रोजच्या पाहाण्यानें जुनेंसें वाटेल पण शास्त्रीय दृष्टीनें तें ताजेंच आहे. हिमालयांतून वाहणारा जान्हवीचा प्रवाह हा एका दृष्टीनें जुना आहे पण तत्वदृष्ट्या पाहूं जातां वाहातेपणानें त्यांतील पाणी ताजेंच आहे. याचप्रमाणें समर्थांच्या दासबोधाला कांहीं शतकें लोटलीं म्हणून त्यास कालबाह्य ठरविणें योग्य होणार नाहीं. पृथ्वीभ्रमणाचा सिद्धांत कालदृष्टीनें कितीही जुना असला म्हणून तो कालबाह्य झाला असें म्हणतां येणार नाहीं. कारण पृथ्वी आजही फिरत आहे व त्या भ्रमणामुळें होणारें दिनमान किंवा ऋतुमान आजही आपल्या प्रतीतीस येत आहे. त्याचप्रमाणें समाजजीवनाचीं जीं कांहीं स्थिरतत्वें किंवा स्फूर्तितत्वें समर्थांनीं दासबोधांत सापेक्षेनें प्रतिपादिलीं आहेत, तीं सर्व केवळ २५० वर्षांपूर्वीं प्रतिपादिलीं म्हणून कालबाह्य ठरविणें योग्य होणार नाहीं. जोपर्यंत आजच्या मानवाचें शरीर हें पूर्वमानवाच्या शारीर तत्वावर बनले आहे तोवर त्या तत्वावर उभी असलेली वैद्यविद्या ही प्राचीन कालांत लिहिली, याच केवळ कारणासाठीं निरुपयोगी किंवा त्याज्य ठरवितां येणार नाहीं. त्याचप्रमाणें सामाजिक मन हें जर कांहीं नियमांनीं बद्ध होणारें तत्व असेल व तें नियम ओळखून समर्थांनीं दासबोध लिहिलेला आढळून आला तर आजही समर्थांची शिकवण उपयोगी व खरी ठरेल. मानवी व्यवहाराच्या कांहीं शाश्वत नियमांवर लक्ष्य ठेवूनच मार्क्सनेंही आपले इतिहासक्रमाचे नियम बांधले आहेत, त्यास आज एक शतकांचा काळ लोटला म्हणून कोणी कालबाह्य म्हणत नाहीं किंवा आणिक चार शतकें लोटलीं म्हणून खोटे ठरणार नाहींत. कारण परिवर्तनशील काळाच्या

परिणामाचा विचारही त्यानें आपले इतिहासक्रम ठरवितांना विचारांत घेतला आहे.

## दासबोधांतील नित्यस्वरूपी ज्ञान

रामदासांची अध्यात्मविद्या ही आध्यात्मिक ध्येय असणारासाठीं आजही खरी आहे व तिच्या साक्षात्काराचे सप्रचीत मार्ग आजही त्यांनीं सांगितलेल्या मार्गांनीं प्रयोगसिद्ध होण्यासारखे आहेत; अर्थात् तीं आध्यात्मिक मूल्यें डोळ्यापुढें न ठेवतां भौतिक मूल्यांकडे बघणारांस 'त्याचा तो विषय नव्हे' एवढेंच फार तर म्हणतां येईल. ज्यास खुशालचेंद्रसारखे बसून ऐतखाऊपणा करावयाचा आहे त्यानें व्यापारशास्त्र फार तर शिकूं नये इतकेच फार तर म्हणतां येईल, पण तें शास्त्र खोटें आहे, असे त्यानें म्हणू नये. आणि म्हटल्यास त्या मूर्खाचें वचन ऐकण्यास दुसऱ्या शहाण्या इसमानें कां तयार व्हावें? तेव्हां रामदासांच्या आध्यात्मिक शिकवणुकीसंबंधीं हा विचार थोडक्यांत झाला. पण समर्थांच्या अध्यात्मिक शिकवणुकीशिवाय त्यांची व्यावहारिक व राजकीयही शिकवण आहे. व तिचा आजच्याही काळांत उपयोग आहे. कारण मानवी मन व लोकव्यवहार यांचीं नित्य तत्वें लक्षांत घेऊनच समर्थांनीं तीं व्यावहारिक व राजकीय प्रकरणें लिहिलीं आहेत व त्या प्रकरणांचा आजच्याही काळीं तितकाच उपयोग आहे, असें तीं वाचणारास दिसून येईल. दासबोधांतील निस्पृहवर्तणूक, महंतलक्षणें, उत्तमपुरुषलक्षणें, राजकारणानिरूपण आजही लोकांत काम करूं इच्छिणाऱ्या नेत्यांस उपयुक्त आहेत. जर्मन किंवा रोमन भाषेंत त्या प्रकरणाचीं आजही भाषांतरें झालीं तर तीं हिटलर मुसोलिनीसही बोधप्रद वाटतील यांत संशय वाटत नाहीं. पुढारीपणाचीं तत्वें व साधनें उपरोक्त प्रकरणांत निःसंशय नित्य स्वरूपाचीं आहेत. व्यक्तीचें व लोकांचें जीवन उद्योगी व म्हणून सुखी कसें होईल याचा दासबोधांतील विचार मानवी जीवन व यश या दोन्ही शाश्वत तत्वांचा विचार करूनच समर्थांनीं प्रकट केले आहेत. तें जर तसे नसते तर आजही लोकांच्या मनाची पकड जें समर्थांचें वाङ्मय घेतें, तें तसें घेतें ना. अशी वस्तुस्थिति असतां कालबाह्यतेचा मुख्य आक्षेप टिकूं शकत नाहीं. समर्थांचें तत्कालीन व प्रासंगिक वाङ्मय वगळतां समर्थांचें शाश्वत वाङ्मय पुष्कळ आहे: व ज्या अर्थानें प्लेटो व अरिष्टाटल, गटे व शेक्सपीअर यांच्या वाङ्मयाला जगाच्या वाङ्मयांत सार्वकालीन स्थान आहे, त्याच अर्थानें समर्थांचें लोकशिक्षणाचें वाङ्मय शाश्वतस्वरूपाचें असून मानवजातीला कालाच्या अंतापर्यंत सूर्यासारखा प्रकाश देत राहील, असा विश्वास आहे.

## समारोप

या एकाच कारणासाठीं समर्थांचा व समर्थवाङ्मयाचा योग्य अभिमान महाराष्ट्रास वाटला पाहिजे. हें उत्कृष्ट वाङ्मय परप्रांतीय व परराष्ट्रीय भाषेंत भाषांतरलें गेलें पाहिजे. समर्थांची राष्ट्रीय योग्यता साऱ्या जगांत दिसली गेली पाहिजे. हें कार्य समर्थवाग्देवतामंदिरांतून होईल अशी मला आशा आहे. ज्या ध्येयनिष्ठेनें समर्थभक्त देवांनीं या कार्याला महाराष्ट्रांत सुरुवात केली त्या ध्येयनिष्ठेची ध्वजा हातीं घेऊन सारें भूमंडळ अक्षरशः समर्थांच्या सामर्थ्यानें भारलें गेलें पाहिजे. असें कार्य करण्याचे सामर्थ्य समर्थांच्या कृपेनें समर्थभक्तांत येवो असें म्हणून हा अल्प लेख संपवितो.

# समर्थसंप्रदायाची दक्षिणेंतील एक विद्यमान परंपरा

( लेखक–प्रो. रा. वि. ओतुरकर, एम्. ए., पुणें )

सातारा जिल्ह्यांत कोरेगांवपंढरपुररस्त्यावर निम्म्या वाटेवर म्हणजे सुमारें ३० मैलांवर गोंदवलें म्हणून एक गांव आहे. त्या गांवास ज्या थोर पुरुषाच्या नांवामुळें महत्त्व आलें आहे ते श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे होत. हे समाधिस्थ होऊन अजून पुरतीं ३० वर्षेंही लोटलीं नाहींत. ( समाधिकाल–मार्गशीर्ष वद्य १० सोमवार शके १८३५–ता. २२ डिसेंबर १९१३ ). यांना प्रत्यक्ष पाहिलेली मंडळी अजून किती तरी आहेत. त्यांना प्रत्यक्ष पहाण्याचा योग प्रस्तुत लेखकास आला नाहीं. पण त्यांचा एक फोटो सर्वत्र आढळतो. त्यांत स्वामी भव्य देही, पद्मासन घालून बसलेले, उजवा हात कुबडीच्या आधारावर ठेवून त्यांत जपासाठीं माळ धरलेली, समोर दासबोधाची पोथी, मुद्रा ‘ अंतरिं निडारले नयन ’ या तऱ्हेची शांत व गंभीर, अंगावर लंगोटीखेरीज दुसरें वस्त्र नाहीं, कपाळास तीन रेषांचें गंध व मध्यभागीं टिळा, गळयांत पुष्पहार, याप्रकारें वर्णन करतां येईल असे दिसतात. गोंदवले गांवीं ओढ्याचे पलीकडे कोरेगांव पंढरपुर रस्ता सोडून बाजूला यांची समाधि आहे, ती सज्जनगडावरील श्रीसमर्थांच्या समाधीप्रमाणेंच तळघरांत असून वर रामलक्ष्मणांच्या मूर्ती आहेत. देवळांतील सभामंडपांत उभे राहून तळघरांतील समाधीचें दर्शन घेतां येतें. या पादुकांची स्थापना स्वामींचे शिष्य बेलधडीचे ब्रह्मानंद महाराज यांनीं शके १८३६ मार्गशीर्ष वद्य १ रोजीं केली. स्वामींचा निर्याणदिन मार्गशीर्ष वद्य १० आहे. म्हणून या समाधीचे जागीं दरसाल मार्गशीर्ष वद्य १ ते १० पर्यंत मोठा उत्सव होत असतो. या उत्सवांत उत्तरेस इंदूर हरदा जालनापासून ते दक्षिणेस हुबळी गदगपर्यंतचे अनेक भाषा बोलणारे भाविक येतात व आपापल्या भाषेंत नामसंकीर्तन करतात. स्वामींच्या मागें मठाधिपतींची परंपरा नाहीं. पादुकांची स्थापना झाल्यावर संस्थान चालविण्यासाठीं आतां ट्रस्ट निर्माण झालेला आहे. त्या ट्रस्टींतर्फें तेथें कोणी तरी कारभारी असतात. येथें वारंवार जमणाऱ्या भाविकांनीं चालविलेल्या नामसंकीर्तनांत कानडी व मराठी भक्त सारख्याच आतुरतेनें भाग घेत असलेले पाहून व अशा रीतीनें कानडी मराठी वादाची होळी झालेली पाहून प्रस्तुत लेखकास अतिशय आनंद झाला. वर सांगितलेले श्री ब्रह्मानंद महाराज यांचे पुतणे श्री. भीमराव गाडगुळी हे हल्लीं गदगला वकील आहेत. त्यांना श्री गोंदवलेकर स्वामींसंबंधीं माहिती विचारण्यासाठीं

मी इंग्रजींतून पत्र लिहिलें, ( मला कानडी येत नाहीं आणि मला वाटलें कीं, मराठी त्यांना येत नसेल ) तेव्हां त्यांनीं उत्तर लिहिलें त्याच्या शेवटच्या तीन ओळी जशाच्या तशा देतों: “आपलें सद्भावना पाहून ८-१० वळी जास्त लिहिले आहे. ते खासगी असे समजावे. मला मराठी मात्र भाषा नाहीं. **श्रीसमर्थांविषयीं मराठींत च लिहावें**. ही भावनेनें लिहिले आहे. रामदास रामदासी मासिकचा मी वर्गणीदार आहे. कळावे लोभ असावा ही प्रेमपूर्वक विनंती” ( जाड ठसा माझा. )

## स्वामींचा आयुष्यक्रम

वर्णनाचें ओघांत श्री स्वामी महाराजांची चरित्रविषयक माहिती देणें राहून गेलें तिकडे वळतों. स्वामींचें मूळ आडनांव घुगरदरे. हे देशस्थ यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे वसिष्ठ गोत्री ब्राह्मण. यांच्या घराण्यांत गोंदवलें गांवचें कुळकर्णीपण चालू होतें. स्वामींच्या आजोबाचें नांव लिंगोपंत, त्यांचे पुत्र रावजी. यांस नारायणराव वाघमारे ऊर्फ कलढोणकर यांची कन्या गीता ही दिलेली होती. तिला शके १७६६ त माघ शु. १२ *बुधवारीं पांच घटका सकाळीं रवि मीन लग्नीं असतां पुत्र झाला. त्या पुत्राचें नांव “गणेश” असें ठेविलें. अगदीं लहानपणीं देखील गणेशाचें चित्त खेळापेक्षां कीर्तनभजनाकडे विशेष असे. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी मध्यरात्रीं कोणांस कळूं न देतां गांवाबाहेर नदीकांठीं जावें व समाधि लावून ध्यानस्थ बसावें असा प्रकार गणेशानें केलेला चरित्रांत नमूद आहे. व्रतबंध झाल्यावर पुढें वयाच्या १२ व्या वर्षी त्याचा विवाह संभाजीपंत गोडसे, कुळकर्णी खातवळीकर, यांच्या मुलीशीं झाला. विवाहोत्तर मुलीचें नांव सरस्वती असें ठेविलें. पण गणेशास झालेला विवाह न रुचून तो गुरुशोधार्थ तीर्थाटनास निघाला. हिंडतां हिंडतां निजामच्या राज्यांत येळेगांव येथें तुकाराम महाराज यांचें दर्शन झालें. भाविक यांना शंकराचे अवतार मानतात. हे नाथपंथी असून पिशाचवृत्तीनें रहात. हातांत चिलीम, खाकेंत कुत्रें, डोक्यास कानटोपी असा या तुकाराम महाराजांचा एक फोटो प्रस्तुत लेखकानें पाहिला आहे. स्वामींना यांचेपासून गुरूपदेश मिळाला. गुरूपदेश दिल्यावर शिष्याची कसोटी पहाण्यासाठीं या गुरूंनीं योजलेला एक प्रकार त्यांच्या चरित्रांत पुढीलप्रमाणें वर्णन केला आहे. त्यांच्या

* स्वामींचीं हल्लीं दोन चरित्रें उपलब्ध आहेत; एक गद्य व दुसरें पद्य. गद्यचरित्रांत जन्मतिथी माघ शु. १० दिलेली आहे. पण गद्यचरित्र अगदीं च सामान्य प्रतीचें आहे. पद्य चरित्रांत तीथ देऊन वार वेळ बारकाव्यानें दिलेली आहे. अधिक चौकशी करितां ही च जन्मतीथ बरोबर आहे असें कळतें. स्वामींनीं रचलेला “अमृतघुटका” प्रसिद्ध करणारांनींही त्यासोबत प्रसिद्ध केलेल्या फोटोखालीं माघ शु. १२ शके १७६६ ही च तीथ दिलेली आहे.

रहात्या ठिकाणाजवळ तीन खेळकर मुलें दंगा करतांना पाहून तुकाराम महाराजांनीं आपल्या शिष्यास एक खड्डा खणण्यास सांगितलें. "त्या खड्डयांत मुलें पुरून माती पसरून त्यावर स्वस्थ बैस. कोणी कांहीं विचारलें तरी अवाक्षर बोलूं नको" ही आज्ञा! आणि आज्ञाधारक शिष्य ती पाळता झाला! लवकरच त्या मुलांचे आईबाप धांवत येऊन तुकाराम महाराजांस पुसूं लागले, तेव्हां त्यांनीं आपणच त्या ढिगाऱ्यावर मौन धरून बसलेल्या शिष्याकडे बोट दाखविलें. तेव्हां आईबाप शिष्यास विचारूं लागले, तरी तो बोलेना, कारण आज्ञाच तशी होती. अखेर त्यांनीं वैतागानें मारझोड केली, पण ऊंहूं! शिष्यानें आपलें मौनव्रत सोडलें नाहीं. अखेर गुरुमाउली प्रसन्न झाली, तिनें शिष्याचें सांत्वन केलें व आईबापांचीं मुलें त्यांस परत दिलीं. अगदीं अंध भाविकतेखेरीज असल्या कथेवर विश्वास बसणें अशक्य आहे. प्रस्तुत लेखकाचा या कथेवर विश्वास नाहीं. पण तुकाराम महाराजांनीं आपल्या शिष्याची अगदीं कडक कसोटी घेतली असली पाहिजे एवढा मथितार्थ मात्र त्या कथेंतून निघतो तेवढा ध्यानांत घेऊन पुढें जाण्यास हरकत नाहीं.

गुरूपदेशानंतर मोठी तपश्चर्या करून ते स्वतःच्या गांवाकडे येण्यास निघाले. प्रथम आपली बहीण सौ. भीमाताई इच्या गांवीं जाऊन तिला भिक्षेच्या मिषानें भेट दिली. नंतर सासुरवाडच्या गांवीं गेले. तेथें सासूनें त्यास कोणीं योगी असें समजून विचारलें, "माझ्या कन्येचा घरधनी कोठें परागंदा झाला आहे तो कसा परत येईल?" स्वामींनीं उत्तर केलें, "अखंड नामस्मरण केल्यास परत येईल." पुढें गांवीं गेले. मातोश्रीस भेट दिली व नंतर गृहस्थाश्रमास योग्य अशा रीतीनें आपली वतनवाडी संभाळून संसार केला.

पुनः शके १७९६ त ते तीर्थयात्रेस निघाले. यावेळीं त्यांनीं पत्नीस बरोबर घेतलें. प्रथम येळेगांवीं गुरुदर्शन घेतलें. त्या प्रसंगीं सरस्वतीबाईनें तुकाराम महाराजांस नमस्कार केला. महाराजांनीं प्रसन्न होऊन "वर माग" असें म्हटल्यावर तिनें पुत्रप्राप्तीची इच्छा व्यक्त केली. ही गोष्ट गणेशास रुचली नाहीं. त्यानें पत्नीस तिच्या नातलगांकडे पोहोंचवून तिला घरीं जाण्याचा निरोप दिला व आपण एकटेच तीर्थयात्रेस निघाले. या यात्रेंत त्यांस इंदूरचे भय्यासाहेब मोडक, रावसाहेब पळशीकर वगैरे शिष्य लाभले. इंदूर येथें मुक्काम असतां गोंदवले येथें स्वतःचे वडील वारल्याचें अंतर्ज्ञानानें जाणून त्यांनीं मुंडन करविलें व वडिलांच्या और्ध्व-देहिक क्रियेसाठीं गोंदवल्यास परत आले. तेथें आल्यावर त्यास एक मुलगा झाला. पण तो अल्पायुषी निघाला. पुढें सरस्वतीही स्वर्गवासी झाली. यानंतर द्वितीय

विवाहाचा प्रश्न उद्भवला असतां स्वामींनीं आठपाडीचे सखारामपंत देशपांडे यांची दोन्हीं डोळ्यांनीं अंध अशी मुलगी विवाहास पत्करली. दुसऱ्या चांगल्या मुली मिळत असतां या मुलीशीं त्यांनीं विवाह केला हें विशेष. शके १८१३ त त्यांनीं गोंदवलें येथें राममंदिर बांधविलें. कांहीं काळ प्रपंच केल्यावर प्रपंचाचा कंटाळा आला, तेव्हां त्यांनीं पत्नीस माहेरीं पाठवून दिलें, आपलें घर व धन ब्राह्मणांकडून लुटविलें व आपण तीर्थयात्रेस निघाले. काशीस जाऊन परत येतांना वाटेंत पुनः इंदूर, हरदा वगैरे ठिकाणीं कांहीं दिवस मुक्काम केल्यावर पुनः गोंदवलें मुक्कामीं परत आले.

यानंतर पुन्हां त्यांनीं कांहीं दिवस संसार केला. त्या काळांत त्यांना दोन मुली व एक मुलगा झाला. पण दुर्दैवानें तीं सर्व अल्पायुषी निपजलीं. पुढें त्यांनीं विठाबाई नांवाची एक कन्या दत्तक घेतली, व तिचें वासुदेवराव मार्डीकर यांच्याशीं लग्न करून दिलें. त्यावेळीं भर लग्नप्रसंगीं मांडवांत एक घोडें मरणाच्या पंथीं लागलें असतां स्वामींनीं तें उठविलें अशी कथा आहे. याच काळांत सध्यां नाशिकला पंचवटींत रहात असलेले महाभागवत शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी हे त्यांचेजवळ शिष्य म्हणून राहिले व त्यांनीं त्यांची एकनिष्ठ सेवा केली. इतकी कीं, स्वामीस झोंप लागली असतां उठल्याबरोबर अमुक एक वस्तु लागेल म्हणून त्यांनीं ती हातीं घेऊन उशाशीं अंग चोरून जागत बसावें. या डॉ. कुर्तकोटीखेरीज गोविंदपंत कुळकर्णी, विष्णुबुवा कुंभोजकर, बाळंभट गाडगुळी—जे पुढें ब्रह्मानंद महाराज झाले—तम्मण शास्त्री नवलगुंद, कृष्णशास्त्री उप्पनबेटीगिरी, शंकरशास्त्री म्हासुर्णेकर, भाऊसाहेब केतकर, आप्पासाहेब भडगांवकर, अंताजीपंत दाढे वगैरे अनेक शिष्यवृंद त्यांचेभोंवती जमा होऊन प्रत्येकानें आपापल्या शक्तीप्रमाणें स्वामींची सेवा केली. वरील यादी वाचून लक्षांत येईल कीं, सेवा करणाऱ्यांत नुसत्या अर्धशिक्षितांचा किंवा अशिक्षितांचा भरणा नव्हता. ज्यांना सुशिक्षित समजलें जातें असे अनेक लोक त्यांच्या भजनीं लागले.

अखेर शके १८३५ मार्गशीर्ष वद्य १० सोमवारीं भोंवतालच्या सर्व भक्तवृंदांस

भजन करावया लावोन । समाधि लाविली आपण ।
ब्रह्मांड भेद करोन । ज्योत मिळविली रामरूपीं ॥

## स्वामींचा आचार व उपदेश

स्वामींच्या जीवनाची रूपरेषा याप्रमाणें थोडक्यांत सांगितल्यावर त्यांचेबद्दल मिळालेली अधिक माहितीही येथें देतों. श्री. नारायण विष्णु गोडबोले म्हणून पुण्यांत एक कापडाचे व्यापारी आहेत. लहानपणीं स्वामींशीं त्यांचा निकट परिचय

आला असतां त्यांनीं श्री. गोडबोले यास सांगितलें कीं, "स्वतंत्र वृत्तीनें वाग, इंग्रजी शिकूं नको." या त्यांच्या उपदेशावरून श्री. गोडबोले यांनीं ऑइल इंजिन चालविण्याची विद्या संपादन केली. स्वामींचा स्वदेशीचा आग्रह असे. साखरेचा एक कारखाना काढण्यास त्या काळांत त्यांनीं उत्तेजन दिलें व दळण्याची गिरणी यंत्रानें चालविण्याऐवजीं ती बैल लावून चालविण्याचा प्रयोग त्यांनीं करून पाहिला. इ. स. १९०० चे सुमारास पुण्यास बाबासाहेब केळकर यांचे घरीं एकवार स्वामींचीं व लो. टिळक यांची भेट झाली होती असें म्हणतात. भेटींत काय घडलें त्याची हकिकत ऐकीव असल्यानें विश्वसनीय वाटत नाहीं. गोंदवलें मुक्कामीं अनेक गोरगरीबांचीं लग्नें लावून द्यावीं, लग्नसमारंभ अगदीं साधेपणानें साजरे करावे, अनेक गाई कसाबांचे हातून मोल देऊन सोडवून घ्याव्या, त्यांची आश्रमांत चरण्याची सोय करावी, स्वतः शेतांत काम करावें, उत्सवांत अनुग्रहीत लोकांकडून भजनसप्ताह करवावा, कोणाकडून कांहीं चूक झाल्यास त्यास रामनाम म्हणण्याची शिक्षा द्यावी, आपल्या शिष्यास कधीं आजारपण आल्यास त्याची खस्त आपण खावी अशाप्रकारें स्वामी आपला काळ घालवीत असत.

स्वामींच्या उपदेशांत नेहमीं नामस्मरणाचा आग्रह असे. मनुष्य ज्ञानी असला तरी त्यानें व्यवहारधर्म सोडूं नये, पंक्तीउच्छेद करूं नये, वृत्ति उच्छिन्न होऊं देऊं नये, परमार्थांत चमत्काराला महत्त्व नाहीं, मन हें संकल्पविकल्पात्मक आहे, त्यास त्या संकल्पविकल्पांतून काढून देवाच्या नामस्मरणांत गुंतवावें, व अशा तऱ्हेनें देहवृत्तीवर विजय मिळवावा. हीं स्वामींच्या उपदेशाचीं मुख्य तत्वें होत. देवालयांत नित्य तुळसीदासाचें रामायण, अध्यात्म रामायण, एकनाथी भागवत, दासबोध, मनाचे श्लोक व भावार्थ रामायण, या ग्रंथांचें ते पठण करवीत. ह्यांपैकीं दासबोध, एकनाथी भागवत व भावार्थ रामायण या तीन ग्रंथांचें स्वामींचे नित्य वाचन असे; व या ग्रंथांतील, विशेषतः दासबोधांतील, एकाद्या ओवीवर अगर वचनावर स्वामी प्रवचन करीत. प्रवचनांत अर्थातच नामस्मरण व अन्नदान ह्या दोहोंच्या महत्वाचें आग्रहपूर्वक प्रतिपादन असे. स्वामीस शैववैष्णवांमध्यें वाद होणें अप्रिय असल्यामुळें च कीं काय ते राममंदिराजवळ शंकराची आग्रहपूर्वक प्रतिष्ठापना करीत.

स्वामींनीं स्वतः केलेली ग्रंथरचना अशी थोडीच आहे. त्यांत वर उल्लेखिलेला "अमृतघुटका" नांवाचें एक पंचवीस ओव्यांचें काव्य व अठरा अभंग हे प्रसिद्ध आहेत. त्यांतील अठरावा अभंग पुढीलप्रमाणें—

आठरा अध्याय गीता ज्ञान। मुख्य ध्यावें नामस्मरण॥
चारी वेद सांगी सार। आम्हा आधी हरीनाम॥

भागवतीं बोले वर्म । नामीं उभें परब्रह्म ॥
योगी करित अमृतपान । नामें स्थिरावलें मन ॥
दीनदास म्हणे सार । नाम साधनची थोर ॥
—श्रीराम

या अभंगावरून स्वामी स्वतःस " दीनदास " म्हणवून घेत हें लक्षांत येतें.

## चरित्रसाधनें

(१) एक अस्सल पत्र

स्वामींनीं आपल्या हयातींत बराच पत्रव्यवहार केला. त्यांतील एक पत्र गोंदवलें संस्थानचे एक ट्रस्टी श्री. गणेश महादेव दामले यांचे कृपेनें माझ्या हातीं लागलें. पत्र मोडींत काळ्या शाईनें लिहिलें आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें देत आहे.

" श्रीरामभक्तपुरण रा. रा. भागवत * यास आशिर्वाद विशेष लिहिणे याचे कारण आपल्याकडून तीर्थरूपाचे प्रकृती कशी आहे हें काहींच लेहेले नाही तर आसे न करता खुशालीचे वर्तमान लेहून कळवावे आणि आखंड नामस्मरणांत घरीच असावें. आपले स्मर्ण कोणास न दिसावे, प्रकृतीच्या भायर जाऊ नये † बुद्धीण आसंग आसूण वागावें. सुज्ञाप्रति फार काय लिहावें हा आशिर्वाद...तुम्ही प्रकृती तिर्थरूपांची चांगली करावी तोंपर्यंत आाणि जप पुरा होता पर्यंत कोठे जाऊ नये, इकडे सुद्धा येऊ नये....कळावे हा आशीर्वाद."

पत्राखालीं सही नाहीं व पत्रावर मितीही नाहीं. परंतु पत्र निःसंशय स्वामींचें आहे असा निर्वाळा श्री. दामले यांनीं दिला.

(२) फोटो

लेखाचे प्रारंभीं वर्णन केलेल्या फोटोखेरीज स्वामींचे आणखी एक दोन फोटो प्रस्तुत लेखकाचे नजरेस आले. एकांत स्वामींच्या चरणांशीं उजव्या बाजूस बेलधडीचे ब्रह्मानंद महाराज व डाव्या बाजूस डॉ. कुर्तकोटी सेवातत्पर असे बसले आहेत व पाय रगडीत आहेत व दुसऱ्या फोटोंत डॉ. कुर्तकोटी व आणखी एक कोणी शिष्य स्वामींच्या दोन्हीं बाजूंस हात जोडून उभे आहेत, असें दिसतें.

---

* हे भागवत म्हणजे महाभागवत शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी होत, असा श्री. दामले यांचा अंदाज आहे.

† भायर = बाहेर

(३) ओवीबद्ध चरित्र

लेखाचे प्रारंभीं उल्लेखिलेलें स्वामींचें "श्रीसद्गुरुलीलामृत" नांवाचें लिहिलेलें ओवीबद्ध चरित्र निःसंशय वाचनीय आहे. चरित्राचे लेखक श्री. गोपाळ विष्णु फडके वैद्य बुधगांव यांनीं तें शके १८४५ त लिहिलें. त्यास सांगलीचे श्री. हरिभाऊ हरिदास यांची छोटी प्रस्तावना आहे. सबंध चरित्र दोन भागांत व तेरा अध्यायांत लिहिलें आहे. एकंदर ओवीसंख्या ४३८८ आहे. हा चरित्रग्रंथ भाविकपणानें लिहिला असल्यानें त्यांत कांहीं चमत्कारांचें वर्णन आहेच, पण त्यांत श्रीधराचा रसाळपणा, भक्तिविजयाची आतुरता, व दासबोधाची शिकवण, या तीहींचें मधुर मिश्रण झालें असल्यानें ग्रंथ वाचनीय झाला आहे. ह्या विसाव्या शतकांत इ. स. १९२३ सालीं असा ग्रंथ लिहिला गेलॉं हें पाहून तर कौतुक वाटतें. स्वामींची शिष्यपरंपरा हल्लीं कर्नाटकांत बेलधडीस, वऱ्हाडांत जालना येथें व दक्षिण महाराष्ट्रांत हुबळी येथें चालू आहे. ह्याखेरीज इतरत्रही अनेक ठिकाणीं शिष्यशाखा आहेत.

या शिष्यवृंदांत केतकरमंडळींचा विशेष उल्लेख केला पाहिजे. स्वामी समाधिस्थ झाले तरी त्यांना पाचारण केलें असतां ते येतात अशी यांची व अनेक भाविकांची श्रद्धा आहे. त्यांच्या वंशांतील श्री. रामचंद्र चिंतामण केतकर हे हल्लीं सरकारी नोकर असून त्यांचा मुक्काम मालाड येथें असतो. त्यांच्याजवळ एक वर्णाक्षरांची काचेच्या तावदानाची पेटी आहे ती उघडून त्यावर एक पैसा ते ठेवतात व पैशावर हात ठेवून तो सैल सोडतात, व आपण ध्यानस्थ होतात. असें झाल्यावर हात सपाट्यानें पेटींतील अक्षरांवरून स्वैर हालूं लागतो व केतकर बोलूं लागतात. ते केतकरांचे शब्द नसून स्वामींचे होत अशी भाविकांची श्रद्धा आहे. हा प्रकार प्रस्तुत लेखकानें अनेकवार समक्ष पाहिला आहे. त्यावर कोणाचा विश्वास असो नसो, पण श्री. केतकर हे त्या समाधिकालांत जें बोलतात तें मात्र अति वक्तृत्वपूर्ण व बोधपूर्ण असतें यांत शंका नाहीं. एरव्हीं स्वतः केतकर असे बोलणारे वक्ते आहेत हें परिचितांसही खरें वाटणार नाहीं, इतके अबोल व अंतर्मुख वृत्तींचे ते आहेत. या लेखाचे निमित्तानें श्री. केतकरांस स्वामींना पाचारण करण्याची विनंति प्रस्तुत लेखकानें केली असतां त्यांनीं तें मान्य केलें व आपण समाधीवृत्तींत वर सांगितल्याप्रमाणें बोलण्यास सुरुवात केली. त्यांत बोलण्याचा मुद्दा असा कीं, "मी श्रीसमर्थांचा निरोप बहुजन समाजास सोपा करून सांगितला, माझें काम निरोप्याचें आहे. महत्त्व निरोप्याला नाहीं, त्यानें दिलेल्या निरोपास आहे, कारण तो श्रीसमर्थांचा आहे." या उपदेशपूर्ण

वाक्यांतील निर्ममत्व व निरहंकार वृत्ति स्वामींच्या साधुत्वास व ज्यांच्या मुखें स्वामी बोलले त्या केतकरांच्या नम्र वृत्तीस साजेशीच आहे.

## समर्थ व गोंदवलेकर स्वामी

एक शंका मनांत अजून राहिली, ती ही कीं, स्वामींना दासबोध ग्रंथ कोणत्या निमित्तानें प्रिय झाला व त्यांनीं समर्थांची शिकवण चालविली म्हणजे काय? महाराष्ट्रांत आज तरी भागवतधर्मी संतांची परंपरा समर्थपरंपरेपेक्षां जास्त विस्तार पावलेली व दृढमूल आहे असें असतां, यांना समर्थपरंपरेंत कोणी कसे गोंवलें? या प्रश्नाचें एक उत्तर त्यांच्या गुरुपरंपरेनें देण्याचा यत्न केला आहे. ती गुरुपरंपरा पुढीलप्रमाणें श्लोकबद्ध प्रसिद्ध आहे.

श्री रामदासं भवबंधनाशम्। कल्याणमीड्यम् गुरु बाळकृष्णम्।
चिंतामणिं रामपदाब्जभृंगम्। श्रीरामकृष्णं परतः परंच ॥ १ ॥
श्रीमत् तुकाराममनंतशक्तिम्। सच्चिद्घनं लोकमलघ्नकीर्तिम्।
मत् सद्गुरुं राघवरूपमीशम्। श्रीब्रह्मचैतन्यमगाध बोधम् ॥ २ ॥

अशा रीतीनें श्रीरामदास, कल्याण, बाळकृष्ण ( मु. पुसद ), चिंतामणी ( मु. उमरखेड ), तुकाराम ( मु. येळेगांव ), श्री ब्रह्मचैतन्य महाराज ( मु. गोंदवलें ), अशी परंपरा स्वामींच्या भक्तांकडून सांगितली जाते. पण या परंपरेचें चिकित्सक रीतीनें परीक्षण केलें असतां अनेक शंका येतात. पहिली, रामदास ते गोंदवलेकर स्वामी यांच्या कालांत २२५ वर्षांचें अंतर हें अवघ्या सहा जणांच्या गुरु परंपरेनें तोडलें जाणें अशक्य नसलें तरी कांहींसें असंभवनीय वाटतें. दुसरें, गोंदवलेकर स्वामींचे गुरु तुकाराम महाराज हे नाथपंथी पिशाच वृत्तीनें वावरणारे. हे समर्थांच्या ग्रंथांवरून प्रवचन किंवा उपदेश करीत अशी माहिती मिळत नाहीं व नाथ—पंथाचें भागवतधर्मीयांशी अधिक साधर्म्य. खुद्द श्री गोंदवलेकर स्वामींच्या उपदेशाचें सार जें नामस्मरण, अन्नसंतर्पण, गोरक्षण, व देहवृत्तीवर विजय यांत समर्थांच्या वैशिष्ट्यापेक्षां भागवतधर्मीयांच्या लक्षणेशीं अधिक अनुरूपता आढळते. पण स्वामींनीं आपल्या हयातींत केलेला स्वदेशीचा पुरस्कार, व्यवहार-धर्म न सोडण्याचा आग्रह, या गोष्टी, तसेंच डॉ. कुर्तकोटींसारखे कार्यकर्ते त्यांचे शिष्यवर, याकडे लक्ष दिल्यास त्यांचें समर्थांशीं साधर्म्य सूक्ष्म दृष्टीस दिसून येईल. खुद्द समर्थांच्या ग्रंथांतील प्रतिपादनांतही नव्वद टक्के जागा परमार्थ विचारानें व्यापली आहे. आधुनिकांस समर्थांचें जें वैशिष्ट्य वाटतें तें त्या कालीं समर्थांस किंवा त्यांच्या शिष्यास कोणी सांगितलें असतें, तर त्यांना तें कितपत

रुचलें, पटलें, असतें कोणास ठाऊक? अगदीं आधुनिक काळांत महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांचें चरित्र घ्या. दिवसाचा सारा वेळ स्नानसंध्या, पूजा, रोग्यांची पहाणी, आळंदीची यात्रा, तेथें नृसिंहसरस्वतींच्या पुण्यतिथीचे दिवशीं स्वतः जातीनें वाढण्याचें उष्टीं काढण्याचें काम करणें, असा हा पुरुष, वरवर पहाणारास तो राजकारणी होता हें खरेंही वाटलें नसतें. पण समीपवर्तीयांस ठाऊकच आहे कीं, त्यांच्या चिंतनांत देशाच्या राजकीय स्थितीच्या विचाराला सूक्ष्म पण निश्चित स्थान होतें. तसें श्री गोंदवलेकर स्वामींचें असेल असें मानण्यास थोड्या बहुत पुराव्यावरून जागा आहे. मानवी ध्येयसिद्धीचें, तसेंच राजकीय वा पारमार्थिक मोक्षाचें सर्वच मार्ग स्थूल दृष्टीला स्पष्ट दिसतील असे सरळ नसतात. त्यांत वळणें वांकणें असतात. जे भागवतधर्मीय संत एकेकाळीं "संताडे" म्हणून निंदिले गेले, त्याच संतांच्या कामगिरीचा शिवकालीन राजकारणास पूर्व तयारी म्हणून उपयोग झाला असें आज पुष्कळांस वाटतें हें खरें कीं नाहीं?

* * *

## श्री. शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांची भेट व विचारविनिमय

येथपर्यंतचा मजकूर लिहून झाल्यावर स्वामींचे शिष्यवर श्रीमत् शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांची नाशिक येथें भेट होण्याचा सुयोग आला. बुधवार ता. ७ एप्रिल १९४३ (चैत्र शु. ३) रोजीं दुपारीं ४॥ ते ५॥ व रात्रौ १० ते १२॥ असे तीन सवातीन तास श्रींशीं संभाषण झालें, व मनास अतिशय आनंद झाला. संभाषणांतील त्यांच्याविषयींचा व्यक्तिविषयक मजकूर मी कांहीं लिहूं नये अशी श्रींची आज्ञा असल्यानें मोठा संकोच उत्पन्न झाला आहे. सुमारें २६ वर्षांमागें श्रींनीं तिन्नेवेली येथें प्रसिद्ध होत असलेल्या 'कल्पक' नांवाच्या मासिकांत (जानेवारी १९१७, वर्ष १२ अंक १) स्वामी महाराजांचा "माझे गुरु" म्हणून उल्लेख करून त्यांची माहिती देणारा लेख प्रसिद्ध केलेला आहे, त्यांत स्वामींचें वैशिष्ट्य थोडक्यांत उत्कृष्टपणें दाखविलें आहे. त्यांत स्वामींच्या वागणुकींतील चित्ताचें समत्व, बौद्धिक वादविवादापेक्षां सदाचारावर भर, अहंकारावर विजय मिळविण्याची शिकवण, कोणत्याही तत्वाचें बौद्धिक आकलन करून घेण्यापेक्षांही त्याची प्रचीति करून घेण्याचा आग्रह, व पूर्ण अपरिग्रहवृत्ति स्वीकारून सत्पुरुषाची सेवा करावी व तद्द्वारें परमेश्वरस्वरूपाचा बोध करून घ्यावा ही शिकवण इत्यादि मुद्यांचें सोपें विवेचन केलेलें आहे.

"आठ वर्षें स्वामींजवळ अगदीं C. I. D. प्रमाणें होतों व सांगण्यास अभिमान वाटतो कीं, He stood the test"; श्री म्हणाले, "त्यांच्या

सहवासांत असतां माझ्या मनांत अनेक संकल्पविकल्प येत, पण माझ्या गुरुंना दुसऱ्याचें मनोगत ओळखण्याचें सामर्थ्य असावें, एरव्हीं अनेक प्रश्नांचीं उत्तरें मी विचारल्यावांचून मला परस्पर मिळतीं ना. ते करीत असलेल्या प्रवचनांत साधी सुटसुटीत वाक्यें येत व तीं अर्थपूर्ण असत. एकच प्रसंग सांगतों. प्रवचनांत 'विषय' म्हणजे काय, असा प्रश्न निघाला असतां स्वामी म्हणाले, 'स्वानंद-स्मरणाव्यतिरिक्त जें स्फुरण तोच विषय." स्वामींच्या नित्याचरणाविषयीं बोलतांना 'श्री' म्हणाले, "स्वतःकडे कांहीं महत्त्व येऊं देऊं नये असें त्यांचें वागणें असे. त्यांच्या दर्शनास भेटीस जे येत त्यांची ते च इतकी विचारपूस व चौकशी करीत व त्यांचें कांहीं उणें पडूं नये म्हणून इतके जपत कीं, त्यांत ते स्वतःस विसरून जात. त्यांची विचारसरणी व मतें प्रागतिक व कालास उपयुक्त अशीं असत. आपल्या लोकांत एकमेकांशीं वागण्यांत जो बेफिकीरपणा उत्पन्न झाला आहे तो जाऊन त्याऐवजीं समाजांत सामुदायिक जाणीव उत्पन्न झाली पाहिजे व तिला भगवंताचें अधिष्ठान पाहिजे. त्यासाठीं नामस्मरण आवश्यक आहे असें त्यांचें मत होतें. यासंबंधीं स्वामींनीं एक समर्पक दृष्टांत दिला आहे. ते म्हणाले, 'फार दिवसांचें खरकटें भांडें स्वच्छ करावयाचें असलें, तर चतुर मोलकरीण तें स्वतः घासण्याचे श्रम घेण्यापूर्वी पाण्यांत भिजत ठेवतें व नंतर तेंच भांडें तिला सहज स्वच्छ करतां येतें; त्याप्रमाणें पूर्व संस्कारांचें मालिन्य नाहींसें होण्यास चित्तरूपी भांडें नामस्मरणाच्या पाण्यांत भिजत ठेवणें आवश्यक आहे, नंतरच तें स्वच्छ होऊन चांगल्या कामास वापरतां येईल.' स्वामींना धर्मांत सुधारणा होणें आवश्यक वाटत असे. ते अस्पृश्यांना मंत्रोपदेश देत, सकेशा विधवांसही मंत्रोपदेश देत. समाराधनेच्या प्रसंगीं अस्पृश्यांच्या पंक्तींतून ते स्वतः वाढीत (नंतर स्नान करीत). ही त्यांची वागणूक त्यांचें कट्टर सनातनी लोकांपासून भिन्नत्व प्रस्थापित करण्यास पुरेशी आहे. मात्र त्यांना, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, वृत्ति उच्छिन्न होऊं देणें मान्य नव्हतें. सारांश, स्वामींनीं प्रपंच व परमार्थ यांचा उत्कृष्ट मेळ कसा घालावा व समाजाला संभाळून सुधारणा कशी करावी तें आपल्या उदाहरणानें समाजास दाखवून दिलें. या दृष्टीनें पाहिलें तर ते समर्थांचे शिष्य कसे तें लक्षांत येईल."

शेवटीं श्रींनीं स्वामींच्या निर्याणाचा प्रसंग वर्णिला. ते म्हणाले, "मार्गशीर्ष शु. १५ म्हणजे निर्याणापूर्वी १० दिवस आधीं स्वामींनीं आपण जगाचा निरोप घेणार असें सांगितलें. स्वतःच्या मागें कोणास गादीवर बसवूं नये; मठपरंपरा निर्माण करावी एक श्री शंकराचार्यांनीं किंवा श्री समर्थांनीं, इतरांनीं मठ व शिष्यपरंपरा निर्माण करण्याच्या भानगडींत पडूं नये, असें त्यांचें आग्रहाचें सांगणें

होतें. निर्याणदिनापूर्वी तीन दिवस आधीं कांहीं निमित्त करून मला दूर पाठविलें व मार्गशीर्ष वद्य १० स या जगाचा निरोप घेतला."

हें सर्व बोलत असतां श्री अगदीं सद्गदीत झाले. अखेरच्या निर्याणाचा प्रसंग सांगतांना तर मनांतील मुद्यांची गर्दी व भावनांच्या आवेगानें कंठ अवरुद्ध होऊन शब्द बाहेर येऊं नये अशी स्थिति झाली. रात्रींचे बारा वाजून गेले, सर्वत्र शांत होतें, स्वतः श्रीही आतां पिकलें पान झाले आहेत. भरतभूमीच्या विद्यमान परिस्थितींत पहिल्या दर्जाच्या पुरुषांचेंही कर्तृत्व पिचून जावें, पुण्य खर्ची पडावें, तगमग व्यर्थ जावी, व पुढें काय होणार या विवंचनेंत उर्वरित आयुष्य कंठण्याचा प्रसंग यावा, असें प्रत्ययास येतें. याच हालअपेष्टेच्या तपश्चर्येंतून स्वातंत्र्याचें 'आनंदवनभुवन' केव्हां ना केव्हां तरी दिसणार; तोपर्यंत आपण सत्पुरुषांच्या पुण्यकृत्याचा मागोवा घेण्याचें सत्कार्य करणें, निदान अशा 'सत्कार्यास उत्तेजन' देणें एवढेंच आपलें कर्तव्य रहातें; तें येथें यथामति सत्कार्योत्तेजक सभेच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगीं सभेस सादर केलेलें आहे.†

---

† हा लेख लिहितांना श्री. दामले, श्री. गाडगुळी, श्री. केतकर, श्री. गद्रे, श्री. गोडबोले, डॉ. कुर्तकोटी (शंकराचार्य) यांचें मोठें साह्य झालें, त्याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे.

## ( ३२ )

# रामदासांची काव्यदृष्टि

( लेखक -- प्रो. **रामचंद्र श्रीपाद जोग**, एम्. ए., पुणें )

रामदास हे कवि कीं उपदेशक असा एक समर्पक प्रश्न कित्येक वेळां विचारण्यांत येतो व त्याचें उत्तर ते कवीपेक्षां उपदेशक च अधिक होते असें कांहींसें दुहेरी देण्यांत येतें. जुन्या संतकवींना कवि शब्द लावावा कीं नाहीं याबद्दल डॉ. केतकरासारख्या विचक्षण लेखकास प्रश्न पडतो. त्यांच्या मतें रामदास स्वतः कवि हा शब्द 'ज्ञानी' या अर्थानें योजीत असत. रामदासांनीं कवित्वासंबंधीं इतर कवींच्या मानानें बरीच अधिक चर्चा केली आहे. त्यांच्या साहित्यशास्त्रावर एक सबंध प्रकरण केतकरांना आपल्या 'महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण' या प्रबंधांत लिहितां आलें. रामदासांच्या काव्यदृष्टीसंबंधीं लिहितांना त्यांनीं स्वतः कवित्वासंबंधीं काय लिहिलें आहे हें पाहणें मनोरंजक व आवश्यक हि असेल. परंतु प्रस्तुत निबंधामधील दृष्टि थोडीशी वेगळी आहे. कवीची काव्यासंबंधींची दृष्टि काय आहे हें पाहाण्यापेक्षां सामान्यपणें काव्यदृष्टि काय असावी हे लक्षांत घेऊनच येथें चर्चा करावयाची आहे. काव्य हें सौंदर्यास विषय करून च प्रवृत्त होतें. तें सुंदर होण्याचीं अनेक कारणें असतात. त्यांत विचारसौंदर्य असतें, भावसौंदर्य असतें, रचनासौंदर्य असतें, कल्पनासौंदर्य असतें, भाषासौंदर्य असतें. काव्यसौंदर्याच्या या साऱ्या घटकांबाबत लेखकाची दृष्टि किती चोखंदळ असते यावरूनच त्याच्या काव्यदृष्टीचा अजमास करावयाचा असतो. काव्य कसें असावें याचा टीकाग्रंथांवरून परिचय असून हि तें लिहितांना कवीस सौंदर्यदर्शन आणि त्याचें साधन झालेलें नसणें शक्य आहे. म्हणूनच रामदासांचीं कवित्वासंबंधींचीं नुसतीं मतें पाहून च भागणार नाहीं.

रामदासांच्या काव्यविषयक मतांमध्यें कांहीं भाग वाच्यार्थानें घेणें योग्य होणार नाहीं असें केतकरहि म्हणतात. उदा० "लौकिक ग्रंथास तो ग्रंथ च नव्हे असें जें ते ( रामदास ) बोलतात ; ती केवळ आलंकारिक भाषा समजावी ; " "जो पारमार्थिक नव्हे तो ग्रंथच नव्हे असें रामदास म्हणतात. हें मत जरासें आग्रही दिसतें ;" "धीटपाठ कवित्वाच्या व्याख्येंत रामदासांनीं प्रत्येक शब्द मोजून घालण्याइतकी तर्कशास्त्रीय शुद्धि राखली नाहीं," इत्यादि केतकरांच्याच विधानांवरून कवित्वाविषयीं रामदासांची च कसोटी त्यांच्या काव्याला लावणें उचित होणार नाहीं असें वाटतें. कवित्व कसें असावें किंवा तें कसें नसावें या विषयीं रामदासांनीं प्रकट केलेलीं निदान कांहीं मतें तरी त्यांच्या स्वतःच्या च काव्यलेखनास जुळणारीं

नाहींत हें सहज दिसून येतें. कवित्व 'मृदु मंजळ कोमळ' किंवा "गौल्य माधुर्य रसाळ' असावें असें ते म्हणतात. त्यांच्या काव्यास यांतील किती शब्द लागू पडतील याची शंका वाटते. 'कवित्व नसावें पाल्हाळ' 'बोलिलेंचि न बोलावें,' 'छंदभंग न करावे,' 'कवित्व नसावें रंगभंग। दृष्टान्तहीन' हे निषेधाचे उद्गार त्यांच्या स्वतःच्या च काव्याचा पुष्कळ अंशांनीं निषेध करीत आहेत ही गोष्ट सहज लक्षांत येण्याजोगी आहे. "धीट म्हणजे धीटपणें केलें। जें जें मनासि आलें।" किंवा "शीघ्रचि कवित्व जोडिलें। दृष्टी पडिलें तेंचि वर्णिलें।" इत्यादि धीटपाठ कवित्वाविषयीं रामदासांनीं जें सांगितलें त्यावरून स्वतः त्यांचें च काव्य अनेक वेळां डोळ्यांपुढें राहत नाहीं काय? सारांश, कवीनें स्वतः काव्याविषयीं जें कांहीं म्हटलें तेवढेंच लक्षांत घेऊन भागत नाहीं. इतकें च नव्हे, तर रामदासांच्या बाबतींत त्यांतील बऱ्याच गोष्टी त्यांना प्रतिकूल ठरण्याचा संभव आहे; भक्ति अथवा विरक्ति हें ज्यांत मिळेल तोच खरा ग्रंथ असें म्हणणाऱ्या रामदासांच्या काव्यांत हि या दोन गोष्टींशीं अपरिहार्य संबंध नसणाऱ्या व्यावहारिक तत्त्व-प्रतिपादनाचा भाग बराच मोठा आहे. त्या भागाला हि वरील कसोटी लावणें हें बरोबर होणार नाहीं. म्हणून कवित्वाविषयींची सर्वसामान्य दृष्टि स्वीकारून च त्यांच्या कवित्वाचा विचार व्हावयास हवा.

रामदासांचा मुख्य ग्रंथ दासबोध आणि इतर बरेंच लेखन उपदेशाच्या, तत्त्वप्रतिपादनाच्या स्वरूपाचें आहे. 'दासबोध हें एक काव्य नसून एक मोठें विचारभांडार आहे' असें केतकर म्हणतात. विचाराची आणि काव्याची सर्वस्वीं फारकत असली पाहिजे असें नसलें, तरी केतकरांच्या या विधानाचा अर्थ ग्राह्य समजावयास प्रत्यवाय नाहीं. रामदासांना आपल्या लेखनाच्या द्वारें कांहीं कथानक सांगावयाचें होतें, किंवा कांहीं व्यक्ति व त्यांच्या भावनांची गुंतागुंत उकलून दाखवावयाची होती, किंवा कांहीं कल्पनाविलास करून दाखवायचा होता असें नाहीं एवढाच त्या विधानाचा अर्थ आहे. 'श्रीसमर्थग्रंथभांडारा'मधील दासबोध, जुना दासबोध, लघु अध्यात्म प्रकरणें, बारा ओव्याशतकें, अभंगांचीं पंचकें, अष्टकें अथवा दशकें, राजकारण, राजकारणी पुरुष व प्रसंग, पंचीकरणादि अभंग स्फुट ओव्या अथवा अभंग इत्यादि सारा लेखन–विस्तार उपदेशाच्या किंवा प्रतिपादनाच्या स्वरूपाचा आहे. काव्यांत घालावयाजोगीं प्रकरणें म्हणजे रामायणाचीं दोन कांडें, करुणास्तोत्रें, कांहीं विविध श्लोकबद्ध प्रकरणें एवढींच होत. असें असूनहि रामदासांच्या कवित्वाविषयीं विचार करतांना दासबोध वगळून चालणार नाहीं. रामदासांच्या दासबोधामधील सौंदर्य इतर कोणत्याहि प्रकारचें असण्यापेक्षां विचारांचें आहे, आणि या विचारांच्या पाठीमागें 'प्रचीतीचें'

बळ आहे. दासबोध वाचावासा वाटला तर तो या विचारसंपदेच्या बळावर वाटतो. हे विचार त्यांनीं सरळपणें व्यक्त केले आहेत, त्यामध्यें अलंकरणाचा भाग कांहीं नाहीं. तरीहि ते वाचल्याबरोबर वाचकास पटावेत अशा प्रकारें सांगण्याची कांहीं हातोटी रामदासांच्या लेखनांत आहे. यांतील मूर्खलक्षणें किंवा पढतमूर्खलक्षणें वाचून आत्माभिज्ञा न झाली, तरी प्रत्यभिज्ञा खास होते. एवढेंच नव्हे तर त्यापासून मनोरंजनहि होतें. हीच स्थिति विरक्त, गुरु, शिष्य, बद्ध, मुमुक्षु, महंत, निस्पृह, करंट इत्यादि अनेक प्रकारच्या लोकांच्या वर्णनासंबंधीं खरी आहे. विविध प्रकारच्या असंख्य लोकांच्या स्वभावांतील बारीक सारिक सूक्ष्म स्वभावविशेषांचें रामदासांना असणारें यथार्थ ज्ञान त्यांतून प्रकट होत असतें. कांहीं काल्पनिक व्यक्ति निर्माण करून त्यांचें स्वभावदर्शन सविस्तर करणें हें साहित्यिकाचें महत्त्वाचें कार्य समजलें जातें. तसें रामदासांनीं केलेलें नाहीं हें मान्य करावें लागेल. पण त्यामुळें त्यांचें मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म ज्ञान व त्याचा अभ्यास हीं कमी ठरणार नाहींत. त्यांचें जीवनाचें प्रत्यक्ष अवलोकन फार दांडगें असल्यानें त्याविषयींचीं त्यांचीं विधानें सर्वथा पटणारीं अशीं वाटतात. तत्कालीन सामान्य माणसाचें सामान्य जीवन कसें असे याची कल्पना हवी असेल तर दासबोधाचा तिसरा दशक (पूर्वार्ध) वाचावा. त्यांत कांहींशी ऐकान्तिक दृष्टि स्वीकारलेली असली तरी सामान्य बहुजनसमाजाचें तें जीवनचित्र वास्तव म्हणून च स्वीकारावें लागेल. जीवनाचें चित्र काढणें किंवा त्याचा अर्थ लावणें हें आजकाल साहित्यिकाचें महत्त्वाचें कार्य समजलें जातें. रामदासांनीं तें जाणून, व्यवस्थितपणें केलें नसेल. परंतु तें त्यांच्या ग्रंथांमधून झालें आहे यांत शंका नाहीं. कलाकृति किती हि ललित झाली, तरी तिला कांहीं विचाराचा पृष्ठवंश आवश्यक लागतो. नाहीं तर तीमधील सौंदर्य विसविशीत वाटतें. म्हणजे सौंदर्यपूर्णतेस त्याची अपरिहार्य अशी गरज असते. काव्यांमधील हें महत्त्वाचें अंग रामदासांच्या लेखनांत भरपूर आहे. त्याचें बाह्य स्वरूप निरलंकृत, अनेक वेळां ओबडधोबड, बहुधा लालित्यविरोधी, पण दणगट असें असतें. विचारांचा विलास त्यांत कमी असला, व्यंजना त्यांत नसली, तरी सरळ, सकस, समर्थ, सुदृढ आणि म्हणून सुरूप अशी विचारसंपदा त्यांच्या काव्यांत भरली आहे हें, त्यांच्या भक्तांना सांगावयास नको च, कवित्वदृष्ट्या त्यांच्याबद्दल विशेष अनुकूल नसणाऱ्यांना हि मान्य होईल.

काव्यदृष्ट्या रसपरिपोषाची बाजू तितकीच महत्त्वाची असते. किंबहुना इतर वाङ्मयापासून काव्याचा निराळेपणा दाखविण्यासाठीं याच तत्त्वाचा विशेष अधिकार सांगण्यांत येतो. रामदासांच्या काव्यांत तत्त्वप्रतिपादनाचाच भाग अधिक असल्यानें रसपरिपोषास वाव फार कमीच आहे. रसपरिपोषास योग्य असें लेखन म्हणजे

व्यक्तिचरित्रें अंतर्भूत असणारें कथनकाव्य, किंवा आत्मलेखनात्मक अभंग किंवा भक्तिपर स्तोत्रें. रामदासांनीं लिहिलेल्या करुणास्तोत्रांमध्यें भक्तिरसाचा आविष्कार बऱ्याच प्रमाणांत झालेला असून खरा रसाळ असा त्यांच्या काव्यांतील भाग हाच म्हणतां येईल. इतर कोठेंहि आढळणार नाहीं एवढी भाववशता या स्तोत्रांमध्यें रामदासांनीं प्रकट केली आहे. लौकिक विषयांत समाजाची अवनति पाहून त्यांचें अंत:करण जेवढें कळवळे तेवढें इतर कोणत्याहि कारणानें कळवळत नसे. त्यांचें 'आनंदवनभुवन' हें छोटेसें काव्य रसदृष्ट्याहि अत्यंत वाचनीय असें म्हणतां येईल. दु:ख, चीड, त्वेष, समाधान, प्रेम व आनंद या भावनांचें तें चलच्चित्रच वाटतें. पण एकंदरींत कोमल भावनांचा आविष्कार रामदासांकडून क्वचितच होतो. बहुतेक सारी दृष्टि वीररसाकडेच असल्याचें दिसतें. त्यांच्या कथनात्मक लेखनांत युद्धकांडामध्यें साहजिकच तो प्रकर्षानें दिसतोच, पण सुंदरकांडामध्येंहि तोच भरला आहे. भीमरूपी स्तोत्रांचाहि विषय तोच आहे, या वीररसास साहाय्यक म्हणून रौद्र, भयानक व कोठें कोठें बीभत्साचाहि आविष्कार झालेला दिसून येतो. शृंगार व करुण यांस फारशी जागा नाहीं. प्रकृत्याच ते करुणरसास प्रतिकूल होते. दौर्बल्याची पराकोटीची चीड वाटत असल्यानें खरें करुणरसात्मक काव्य त्यांच्या हातून लिहिलें जाणें शक्य नव्हतें. मूर्ख, दुर्बळ, करंट, म्हैसमंगळु अशा लोकांविषयीं त्यांना मुळींच सहानुभूति नसे असें वाटतें. दुर्बळांचा शृंगार तरी काय असावयाचा? त्याचें त्यांनीं काढलेलें सहानुभूतिशून्य चित्र दासबोधांतील तिसऱ्या दशकांत आपल्याला दिसतें च. रामदासांच्या मनांतील प्रधान भावना समाजोद्धाराची. तिजपुढें इतर कोमल भावनांना स्थान नव्हतें. म्हणून अशा भावनांचा आविष्कार त्यांच्या काव्यांतून झाला नाहीं हें साहजिकच होतें. समाजोद्धाराकरितां च प्रेषिताची भूमिका घेऊन उपदेश व तत्त्वप्रतिपादन त्यांनीं केलें. 'वह्नि तो चेतवावा रे' म्हणून युद्धकांड आणि भीमरूपी स्तोत्रें अथवा तत्सदृश लेखन त्यांनीं केलें. साहजिकच त्यास आवश्यक व अनुकूल अशा भावनांचाच आवश्यक तेवढ्याच प्रमाणांत त्यांच्याकडून आविष्कार झाला, यापेक्षां अधिक प्रमाणांत तें व्हावें अशी अपेक्षा करणें च चूक होईल.

काव्याला रमणीयता आणणारा आणखी एक भाग म्हणजे अलंकारयोजना होय. संस्कृत काव्यांत असलेली अलंकारसंपत्ति मराठी काव्यांत कोणीच अपेक्षीत नाहीं. संस्कृतमध्यें श्लेषाचा उपयोग अलंकाररचनेकरितां फार होतो. शुद्ध संस्कृत-रहित मराठींत त्याचा फारसा उपयोग करतां येत नाहीं. म्हणून अनेक संस्कृत अलंकारांची योजना मराठींत करणें अवघड जातें. परंतु उपमारूपक–उत्प्रेक्षा इत्यादि अलंकारांच्या योजनेनें वाक्यार्थास विपुल सौंदर्य आणतां येतें हें ज्ञानेश्वर

आणि त्यांचे समकालीन महानुभाव कवि यांनीं चांगलेंच पटवून दिलें होतें. म्हणून अध्यात्मासारखा रुक्ष विषयहि त्यांना काव्यमय करून दाखवितां आला. काव्याचा हा आदर्श पुढें बाजूस पडला ही एक अनिष्ट, पण लक्षांत घेण्याजोगी गोष्ट आहे. ज्ञानेश्वरांच्या उपमारूपकांत समर्पकतेबरोबर सौंदर्य साधलेलें असतें. त्याप्रमाणांत तें एकनाथांच्या लेखनांत आढळत नाहीं. त्यांचे नातू मुक्तेश्वर यांनीं सौंदर्याच्या बाजूला अधिक यश मिळवलें. पण तुकाराम–रामदास–वामनपंडित यांनीं काव्याच्या या बाजूकडे दुर्लक्ष्यच केलेलें दिसतें. तुकारामाचे उपमा-दृष्टान्त समर्पक असले तरी सुंदर असतात असें नाहीं. वामनपंडितांच्या काव्यांत रूक्ष व ठराविक उपमा-रूपकें असतात. रामदासांनीं उपमारूपकांचाहि फारसा उपयोग केला नाहीं. त्यांच्या प्रतिपादनांत सरळपणा भरला आहे. तेंच त्याचें सौंदर्य आहे. केतकर म्हणतात:– "इतक्या अनेक शब्दांत जर कांहीं मुख्य कल्पना असेल तर ती हीच कीं अलंकार घालण्याच्या किंवा व्यंग्यार्थाला प्राधान्य देण्याच्या इच्छेनें, किंवा दुसऱ्या अनेक क्लृप्त्या लढवून कवीनें आपला सरळपणा घालवूं नये." रामदासांची काव्यासंबंधींची ही कल्पना मात्र त्यांच्या स्वतःच्या काव्यास संपूर्णतः लागू पडणारी आहे, या सरळ प्रतिपादनास आणखी अधिक सौंदर्य आणावें असें त्यांना वाटत नाहीं, म्हणून अलंकारांची योजना होत नाहीं; व मूळचाच सरळपणा असल्यानें अधिक सुबोधता आणण्याकरितांहि उपमा – दृष्टान्तांची आवश्यकता त्यांना वाटत नाहीं. आजकाल गद्यामध्येंहि प्रतिपादनाच्या सोईकरितां उपमादृष्टान्तांची योजना करण्यांत येते. पण या अलंकरणाची किंवा प्रतिपादनाच्या सोईची मातब्बरी रामदासांना कधीं वाटली नाहीं. कारण तें त्यांना नको होतें आणि प्रतिपादन सहज सुगमच असे.

कवीची सौंदर्यदृष्टि व्यक्त होण्याचा एक गौण मार्ग म्हणजे त्यानें केलेल्या वृत्तांची अथवा पद्यप्रकारांची निवड होय. रामदासपूर्वकालीन कवींनीं किंवा तुकारामबोवां-सारख्या समकालीनांनीं याविषयीं फारशी विचक्षणा केली नव्हती. ज्ञानेश्वरांनीं किंवा त्याच्या प्रभावळीमधील इतर मंडळींनीं ओंवी आणि अभंग यापलीकडे दृष्टि फेंकिली नाहीं. ओंवी हेंच एकनाथांनीं आपलें मुख्य काव्यवाहन ठेविलें होतें. ज्ञानेश्वरापेक्षां तींत कांहीं थोडा फरक केला होता एवढें च. तुकारामबुवांनीं अभंगांचा च अंगीकार प्राधान्यानें केला. हे जुने पद्यप्रकार गद्याला अधिक जवळ येत. रामदासांनीं या दोहोंचा स्वीकार करून हि कांहीं संस्कृत वृत्तांचा उपयोग केलेला आहे. यांत भुजंग – प्रयात, प्रमाणिका व अनुष्टुभ् यांचा बऱ्याच प्रमाणांत, व क्वचित् चामर, मालिनी, व तिलका किंवा शा० विक्रिडित यांसारखीं वृत्तें आलीं आहेत. या वृत्तांचा उपयोग रामदासांनीं केवळ गेयतेच्या दृष्टीनें केला होता, कीं कांहीं विशेष प्रकारच्या भावनांना योग्य म्हणून त्यांची योजना झाली हा विचार

मनोरंजक असला, तरी उपलब्ध काव्यावरून कांहीं निश्चित अनुमान काढतां येईल असें वाटत नाहीं. रामदासांच्या काव्यांत प्रमुख असणारी वीररसानुकूल धडाडीची भावना व्यक्त करण्यास प्रामुख्यानें या साऱ्या वृत्तांचा उपयोग त्यांनीं केला असला तरी क्वचित् आढळणाऱ्या करुण भावनेस हि त्यांनीं त्यांच्या द्वारें अभिव्यक्ति दिली आहे. या संस्कृत वृत्तांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी च आहे, व त्यांच्या रचनेंत अवघडपणाचा भाग हि कमीच आहे. असें असूनहि त्यांच्या नीटनेटकेपणाकडे अथवा शुद्धतेकडे त्यांनीं बरेंच दुर्लक्ष्य केलें असें म्हणावें लागतें. वृत्तांमध्यें बसावे म्हणून शब्दांचे हाल करूनहि वृत्तशुद्धि नीट न साधल्याचीं उदाहरणें असंख्य आहेत. काव्याचें बाह्यांग जी भाषा व वृत्तयोजना यांसंबंधींचा एक प्रकारचा बेगुमानपणा त्यांच्या काव्यांत सर्वत्र दिसून येतो. भाषा आणि वृत्तें हीं कवीच्या सोईकरितां आहेत, कवि त्यांच्याकरितां नाहीं अशी एक तऱ्हेची वीरवृत्ति त्यांच्या लेखनांत दिसून येते. 'अर्थीरि तात्पर्यं, न तु शब्दरि' हा त्यांचा बाणा असावा असें वाटतें. या त्यांच्या उदाहरणानें मराठी कवितेवर रचनादृष्टया अनिष्ट परिणाम होणें अपरिहार्य होतें. आरंभींचीं संस्कृत-वृत्तात्मक रचना करणाऱ्या पंडित कवींच्या काव्यावर या वृत्तीचीच छाप दिसून येते. परंतु रामदासांचें व्यक्तित्व त्यांच्या ठिकाणीं नसल्यानें भाषा आणि वृत्तरचना यासंबंधींची अनास्था त्यांच्याबाबत दोषरूपच ठरली. पुढील शतकांत मोरोपंतांनीं या दोनहि बाबतींत प्रशंसनीय कामगिरी केली नसती तर मराठी काव्याच्या भाषेचें स्वरूप आज काय असतें याची कल्पनाच करवत नाहीं.

'अर्थीरि तात्पर्यं' ही रामदासांच्या काव्यलेखनाची प्रधानवृत्ति होती हें खरें. तथापि रचनेंमधील किंवा शब्दयोजनेमधील कांहीं कांहीं चमत्कृतिपूर्ण गोष्टींचा त्यांना मोह पडे व तिची पुनरुक्ति ते इतकी करीत कीं त्या चमत्कृतीचा कंटाळा येऊन तिजमधील सौंदर्य अथवा आकर्षकता निघून जाण्याची पाळी यावी. अभंगांमधून मागच्या ओळीमधील शेवटचीं चार अक्षरें घेऊनच पुढच्या ओळीचा आरंभ किंवा उठाव करावयाचा या युक्तींत लालित्यापेक्षां चमत्कृतीचाच भाग अधिक आहे. तोहि क्वचित् कोठें साधला तर त्याची आकर्षकता राहील. पण अभंगामागून अभंग या पद्धतीनें लिहिले गेल्यास त्याला अनवीकृतत्वाचें (monotony) रूप येतें हें रामदासांच्या लक्षांत येत नसे असें दिसतें. तसेंच एखादा वाक्यखंड त्यांना खरोखरीच चांगला सुचे. उदा० 'म्हणती आमुचें घर,' 'या नांव मुमुक्षु', 'तो एक पढतमूर्ख', किंवा 'व्यर्थ संसार जातसे'. हे वाक्यखंड सुटसुटीत व अर्थपूर्ण आहेत. परंतु त्यांचा उपयोग सौंदर्याच्या मर्यादेंत करून घेण्याचा संयम त्यांना रहात नाहीं. कंटाळा येईपर्यंत ते त्यांचा उपयोग करीत

राहतात. नवव्या दशकाचा पहिला समास बघावा. एका ओंवींत पहिल्या तीन चरणांत तीन प्रश्न करून चौथ्यांत 'मज निरोपावें' असें म्हणावयाचें व लगेच पुढच्या ओंवींत त्या तीनहि प्रश्नांस उत्तरें देऊन चौथ्या चरणांत परब्रह्माशीं त्यांचा संबंध जोडावयाचा अशी रचना सबंध समासांत आहे. उदा०

निराकार म्हणिजे काय । निराधार म्हणिजे काय ।
निर्विकल्प म्हणिजे काय । मज निरोपावें ॥

निराकार म्हणिजे आकार नाहीं । निराधार म्हणिजे आधार नाहीं ॥
निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाहीं । परब्रह्मासी ॥

हीच रचना अगदीं अशीच पुढील २६-२७ ओंव्यांत याच नमुन्याबरहुकूम चालू आहे. या साऱ्या समासावरून परब्रह्म हें निर्गुण आहे एवढी कल्पना येते. पण ज्या पद्धतीनें हें केलें आहे तिचा समासाच्या शेवटपर्यंत जाईतों तिटकारा येण्याची पाळी येते. यांत रचनासौंदर्य काय आहे हें कळणें कठिण आहे. अर्थस्पष्टीकरणाच्या दृष्टीनेंहि 'अरूप म्हणिजे रूपचि नाहीं । अलक्ष म्हणिजे लक्षत नाहीं ।' अशा उत्तरांनीं कांहीं विशेष नवीन लाभलें असें नाहीं. अर्थगौरवाच्या दृष्टीनें विशेष लोभनीय न वाटणारी पुढील सारखी रचनाहि कदाचित् अनुप्रासाच्या लोभानें, पण बहुधा त्यापेक्षांहि कांहीं निराळ्या चमत्कृतीच्या नादानें रामदास करतातः—

कटकटी खटखटी रागें । चटपटी वटवटी सदा ।
चुर्चुरी चुर्मुरी रागें । व्यर्थ संसार जातसे ॥

कर्करी खर्खरी रागें । गर्गरी भर्भरी मदें ।
पर्परी घर्घरी अंतीं । व्यर्थ संसार जातसें ॥

किंवा पुढील ओळी पहाव्यात.

' दुमदुमदुमदुमदुमित भुगोळे । स्वर्ग मृत्यु पाताळे ॥
धुमधुमधुम धुकट कर्णी । विधीस बैसले टाळे ॥
हळहळहळहळ अतिकोल्हाळहळ । हरसी पंचक डोळे ॥
खळखळखळखळ उचंबळत । जळसिंधूसि मोहो आंदोळे ॥

या पदाच्या सहा हि कडव्यांतून हा असा च प्रकार आहे. धनुर्भंगामुळें उडालेल्या धामधुमीची जाणीव क्षणभर वाचकास हि झाल्यावांचून राहणार नाहीं. चमत्कृतीकडे असणारें रामदासांचें लक्ष्य इतर अनेक स्थलीं दिसून येतें. दासबोधामधील चौदाव्या दशकांतील चौथ्या समासामध्यें त्यांनी एकेका ओंवींत क पासून क्ष पर्यंत साऱ्या

अक्षरांचे अनुप्रास साधून दाखविले आहेत. विषय उपदेशाचा च आहे; त्यास अनुप्रासाची आवश्यकता नव्हती व अनुप्रासानें सौंदर्यापेक्षां चमत्कृती च साधली आहे असें एक दोन ओंव्या वाचल्या तरी कळून येईल. पुढील दोन ओंव्या पहाव्या.

घष्टणी घिसणी घस्मरपणें। घसर घसरूं घसा खाणें।
घुमघुमों चि घुमणें। योग्य नव्हे॥

फुकट फाकट फटवणें नाहीं। फटकळ फुगडी पिंगा नाहीं।
फिकें फसकट फोल नाहीं। भकाध्या निंदा॥

अनुप्रासाची ही च हौस चामरवृत्तामधील एका भीमरूपी स्तोत्रांत व्यक्त होते. उदा०

काळकूट तें त्रिकूट धूट धूट ऊठिलें।
दाटथाट लाट लाट कूट कूट कूटिलें॥
घोर मार ते सुमार लूट लूट लूटिले।
चिर्डिलेचि घर्डिलेचि फूट फूट फूटिले॥

रामदासांचा दासबोध व इतर बरेचसें काव्य विचारभांडार जसें आहे तसें च तें ज्ञानभांडार हि आहे. त्यामुळें कोणत्या हि विषयाचा परामर्श चालू असला कीं असेल नसेल ती सारी माहिती देण्याची रामदासांची प्रवृत्ति दिसते. त्या विषयाचा इतका तपशील त्याठिकाणीं भरलेला असतो कीं हें काव्य आहे कीं वस्तूंची यादी आहे असा संभ्रम वाचकास पडावा. घरांत राहणारे अनेक कृमिकीटक (दा. १-१०) रोग, संकटें, पापाबद्दल यमलोकींच्या शिक्षा (दा. १-६ ते ८), देवदेवता (दा. ४ स. ५), देवस्थानांत करावयाच्या व्यवस्था (४-७) विविध प्रकारचे गुरु, मंत्र, नाना परीक्षा, निरनिराळे काळ, लेखनभेद, अर्थभेद, गोसाव्यांचे प्रकार, वनस्पति, भाज्या, पक्वान्नें, इत्यादींच्या याद्या किंवा भरपूर तपशील अनेक ठिकाणीं आपल्यास दिसतो. जेथें हा तपशील भरण्याचा च हेतु असतो तेथें आक्षेप घेणें शक्य नाहीं. पण इतर प्रतिपादनाच्या ओघांत या तपशीलानें च बराच भाग व्यापला असला तर तें काव्यदृष्ट्या दोषावह होतें. माणसाचें घर हें त्याला आपलें वाटलें तर इतर अनेक प्राणी त्यांत घर करून राहिलेले असतात, त्यांचें हि तें असतें, हा सागण्याचा मुद्दा. तो पटावा म्हणून कांहीं उदाहरणें देणें योग्य होय. परंतु कांहीं मर्यादेपलीकडे हा तपशील वाढविणें आवश्यक नाहीं, व योग्य हि नाहीं. त्या तपशीलापुढें प्रतिपादनाचा मुख्य मुद्दा बाजूस च राहतो. शिवाय इतक्या तपशीलाचा

वाचकास पुढें कंटाळा येतो. पण तपशील भरण्याच्या नादांत रामदासांना आणि त्यांच्या अनेक समकालीन कवींना ही दृष्टि रहात नसे. सामराज, विठ्ठल, नागेश इत्यादि अनेक कवींच्या काव्यांत संधी मिळेल तेथें प्रमाणबद्धतेकडे दुर्लक्ष्य करून असा तपशील भरलेला आढळतो. त्यांत अनेक वेळां कालविपर्यासाचा दोष हि आढळतो. रामदासांनीं पूर्वकालच्या कथा घेऊन रचना फारशी केलेली नसल्यानें ते या दोषांतून मुक्त झाले आहेत. या साऱ्या कवींना तपशील भरण्यांत एक प्रकारचें सौंदर्य भरलें आहे असें वाटे यांत शंका नाहीं. कलेच्या प्रान्तांत आज तपशीलाच्या प्राचुर्यास महत्त्व नाहीं, कारण आजची अभिरुचि बदललेली आहे. पण पूर्वीची अभिरुचि भिन्न असावी म्हणून च अनेक कवींस सामान्य असणारा हा विशेष रामदासांच्या काव्यांत हि दिसून येतो.

भाषेच्या सौंदर्याची पहिली अट म्हणजे तिची शुद्धता. वृत्तरचनेच्या हव्यासानें अथवा एकंदर एतद्विषयक बेफिकीरपणामुळें रामदासांनीं इकडे दुर्लक्ष केलें ही गोष्ट सांगण्याची आवश्यकता नाहीं. संस्कृत भाषेचें त्यांचें अध्ययन पुरेसें झालें नसावें. जे तत्सम शब्द त्यांनीं आपल्या काव्यांत योजिले त्यांचीं बहुधा अपभ्रष्ट रूपें च त्यांनीं योजिलीं असावींत असें वाटतें. त्यामुळें त्यांची भाषा शुद्ध मऱ्हाटी म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. कांहीं गुण भाषेचा व कांहीं गुण लेखकाचा, मिळून ज्याला ते गौल्यता असें संबोधीत ( असें वाटतें ) ती त्यांच्या भाषेंत दिसून येत नाहीं. लेखकाच्या व्यक्तित्वामधील फटिंगपणा, स्पष्टोक्ति, दणगटपणा, या गोष्टी भाषेमध्यें हि प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. आपल्या मनांतील अर्थ व्यक्त करील असा शब्दसंग्रह मात्र त्यांनीं जमा केला होता व क्वचित् नवीन शब्द हि बनविण्यास ते मागें घेत नसावेत. वृत्तरचनेच्या सोईकरितां भाषेचे हाल त्यांनीं फार केले व एवढें करून वृत्तशुद्धता संपूर्णपणें साधली असें हि नाहीं. अनुकरणात्मक अभ्यस्त शब्दांची त्यांना भारी हौस होती. पण साऱ्या अव्यवस्थितपणाच्या पाठीमागें एक प्रकारचें सामर्थ्य असल्याचा भास होतो व हा च त्यांच्या भाषेचा सौंदर्यविशेष होय.

रामदासांची काव्यदृष्टि ही अशी आहे. तीमध्यें काव्याच्या बाह्यांग सौंदर्याला फारच खालचें स्थान आहे. भाषा आणि रचना यांमधील लालित्याकडे त्यांचें पूर्ण दुर्लक्ष आहे; त्यांमधील चमत्कृतीकडे त्यांचें थोडें अधिक लक्ष आहे. उपमा उत्प्रेक्षादि काव्याला रम्यत्व आणणारीं जीं इतर अंगें तीं त्यांना फारशीं साधतात असें वाटत नाहीं. त्या दृष्टीनें त्यांचा प्रयत्न हि तितका च कमी आहे. रचना व कल्पना यांचा भाग सोडून भावनांकडे वळल्यास कांहीं ठराविक भावना च त्यांना रंगवितां येतात असें दिसतें. त्यांची स्वतःची वृत्ति विरक्त पण लढाऊ होती. जगाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण नाजुक, हळवा किंवा स्वप्नाळु मुळीं च नसून

सकस, वास्तववादी, युयुत्सु असा होता. तेव्हां वीरवृत्तीच्या भावना च वर्णन करणें त्यांना आवडत असे. त्यास उपयोगी म्हणून संसाराचें उद्वेग उत्पन्न करणारें चित्र ते काढूं शकतात. म्हणून रौद्र, भयानक, बीभत्स रसांकडे त्यांची प्रवृत्ति अधिक आहे. त्यामुळें अर्थ किंवा शब्द यांपैकीं एकाचें हि माधुर्य साधण्याचा प्रश्न च उपस्थित होत नसे. ओजोगुण — तीव्र किंवा असह्य होऊं शकेल इतक्या मर्यादेपर्यंतचा ओजोगुण हें च त्यांच्या काव्याचें वैशिष्ट्य आहे. ललितापेक्षां भव्योदात्ताकडे त्यांचें अधिक लक्ष आहे. त्यांच्या काव्याचें मूल्यमापन लालित्याच्या मापानें करणें च अयोग्य आहे. तो त्यांचा स्वभाव नव्हे, पेशाहि नव्हे, जीवनध्येय तर नव्हे च नव्हे. कवीपेक्षां प्रेषिताची च भूमिका त्यांची होती. गद्यामध्यें लिहिण्याचा परिपाठ त्यावेळीं नव्हता म्हणून च त्यांनीं पद्याचा आश्रय केला असें म्हणणें चूक होणार नाहीं. पद्याचा आश्रय केला म्हणून त्यांच्या वाङ्मयास कवित्वाची ठराविक कठोर कसोटी लावण्याचा मोह होतो आणि कदाचित् निराशा होण्याचा प्रसंग येतो. उपदेश, तत्त्वप्रतिपादन हें च त्यांच्या वाङ्मयाचें स्वरूप आहे आणि समाजोद्धार हें त्यांचें ध्येय आहे. तें ध्येय एवढ्या प्रमाणांत साध्य होत आहे कीं, त्यांच्या वाङ्मयांत रम्य कल्पना, सुंदर अलंकार अथवा भावनांचे विविध खेळ आहेत कीं नाहींत याचा विचार च सहृदय वाचकांच्या मनांत येत नाहीं. त्यांचें वाङ्मय मोठें आहे, मग त्याला काव्य म्हणा वा न म्हणा.

---

## (३३)

# दासबोधांतील कांहीं व्याकरणविशेष

( लेखक—रा. **हरि नारायण नेने**, बी. ए., **नागपुर** )

आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ।
असतां न करावा खेद । भक्तजनीं ॥

सांप्रतच्या महोत्सवाप्रीत्यर्थ निर्माण केलेल्या वाङ्मयमंदिरांतील शोभिवंत व चित्ताकर्षक इतर दालनें पाहाण्याला आपण समर्थभक्त उत्सुक झालेले आहां; तेथील शोभा संपूर्ण पाहून झाली व समर्थांच्या वाङ्मयमूर्तीचें दर्शन आपण त्या त्या बाजूनें मनासारखें घेतलें, म्हणजे सवड करून आपण या लहानशा झरोक्याकडे यावें इतकी च नम्र सूचना आहे. येथून हि समर्थांच्या मूर्तीची एक विशेष शोभा आपणाला पाहावयास सांपडेल. 'उपेक्षितांचें अंतरंग' पाहाण्याकडे आपल्या करुणबुद्धीचा लय अलीकडे लागत आहे. हा झरोका दिसायला अगदीं रुक्ष आहे, यामुळें 'प्रथमं वन्दे' असें म्हणून त्याला दुर्जनाच्या पंक्तीला बसवूं नका. आपण सर्व मंदीर पाहून झाल्यावर इकडे उशीरा आलांत तरी चालेल. समर्थांच्या मूर्तीचा एक अपूर्व किरण या झरोक्यांतून दिसल्यावर येथें वेळ घालविल्याबद्दल आपणांस विषाद वाटणार नाहीं अशी आशा आहे.

(२) समर्थ जिवंत असतांना त्यांच्या संनिध राहून, मनांत उद्भवलेल्या प्रश्नांचीं उत्तरें मिळण्याला भरपूर अवसर होता; पण समर्थांच्या निर्याणानंतर आपल्या मनांतील आक्षेप कोण दूर करणार, आलेले किंतु कोण निवारणार असा विचार येऊन सचिंत झालेल्या आपल्या सेवकांना पाहून समर्थांनीं आपल्या निर्याणकालीं आरंभीं दिलेल्या ओवींतील मजकूर सांगितला व त्यांचें समाधान केलें. दासबोध हें माझें स्वतःसिद्ध स्वरूप आहे; 'नाना किंत निवारिले। नाना संशयो छेदिले। नाना आशंका फेडिले। नाना प्रश्न ॥' (१-१-१२) असा हा दासबोध माझी वाङ्मयमूर्ति आहे; "नाना धोके देहबुद्धीचे। नाना किंत संदेहाचे। नाना उद्वेग संसाराचे। नासती श्रवणें ॥ १-१-२६' अशी फलश्रुती या ग्रंथाच्या श्रवणानें होईल; 'समर्थकृपेचीं वचनें। तो हा दासबोध ॥' २०-१०-३०; म्हणून या वाङ्मयमूर्तीची जो माझा भक्त मनोभावानें सेवा करील, त्याच्याजवळ मी सदोदित आहे' अशा प्रकारचे आशीर्वादात्मक व समाधान करणारे उद्गार काढून, वयाचे ७३ वें वर्षी माघ वद्य ९ शके १६०३ सालीं शनिवारीं सज्जनगडावर श्रीसमर्थ

रामस्वरूपीं लीन होऊन गेले. प्रतिसमर्थ अशा वाङ्मयमूर्तीचें यथार्थ दर्शन होण्यास मराठीवाङ्मयाच्या व मराठीभाषेच्या ऐतिहासिक दृष्टीचा थोडा मंत्र जपला पाहिजे.

( ३ ) कालाच्या ओघाबरोबर भाषेचें बाह्य स्वरूप बदलत असतें. ' तीरें संस्कृताचीं गहनें। तोडूनि मऱ्हाटिंया केलीं शब्दसोपानें । रचिलीं धर्मनिधानें। निवृत्तिदेवें ॥ ९॥ म्हणौनि भलेतेणें एथ न्हावें । प्रयागीं माधवीं विश्वरूपातें पाहावें। एतुलेनि संसारा देयावें तिलोदक ॥ १० ॥ ( अध्याय ११, ज्ञानेश्वरी ), अशा प्रकारची सामान्य जनांना सुबोधपणानें ब्रह्मज्ञानाचें भोजन देणारी ज्ञानेश्वरी, सातशें वर्षांच्या प्रदीर्घ कालानंतर विद्वानांना देखील अपरिचित वाटते. सुदैवानें दासबोधाची भाषा तितकी अपरिचित नाहीं. तथापि सुमारें २६० वर्षांहून अधिक वर्षें या ग्रंथाला होऊन गेल्यानें कांहीं कांहीं बाबतींत वाचकांना अडथळे येतील हें स्वाभाविक आहे. पुढें येणाऱ्या विवेचनांत आधाराकरितां घेतलेल्या ओंव्या, धुळें प्रतींतील आहेत हें ध्यानांत ठेवावें.

( ४ ) भाषेच्या अवस्थान्तराच्या दृष्टीनें समर्थरामदासांचा काल म्हणजे शिवशाहीचा काल. समर्थांचा जन्म शक १५३० व निर्याणकाल शके १६०३ ( इ. स. १६०८ ते १६८१ ). शिवाजी महाराजांची कारकीर्द इ. स. १६३० ते १६८० होती. शिवशाहीच्या पूर्वी मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें यादवकाल व बहामनी काल असे दोन टप्पे होऊन गेले होते. यादवकालांतील मराठीचें शुद्ध स्वरूप ' बहामनी ' कालांत फारशीच्या प्रभावामुळें व मुसलमानी राज्यसत्तेमुळें इतके विकृत व कलुषित झालें होतें कीं, मराठीचें मराठीपण कितपत उरतें याची शंका वाटूं लागली होती; पण शिवशाहीचा उदय म्हणजे स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा उदय. महाराष्ट्रधर्म, महाराष्ट्रसंस्कृति, मराठा देश, मराठी भाषा, इत्यादि क्षेत्रांत ढासळलेली बाजू सावरून घेण्याच्या बाबतींत व तिला उन्नतीस नेण्याचे कामीं शिवाजी महाराजांचे प्रयत्न जसे विशेष कारण झाले, तसेच एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास इत्यादि संतकवींचे काव्यग्रंथ हि कारणीभूत झाले असें म्हणणें प्राप्त आहे. दरबारांतील व इतर व्यवहारांतील मराठीभाषा किती हि विकृत व अपभ्रष्ट झाली, तरी घरांतील वातावरणांत प्रचलित असलेली धर्मव्यवहाराची भाषा कितीतरी सोज्वल व मराठी राहिली. एकीकडे दरबारी फारशी भाषेचें प्रचंड आक्रमण थोपवून धरणें व दुसरीकडे संस्कृताभिमानी अहंमन्य पंडिताच्या प्राकृतभाषाविषयक उपहासाला जोरानें तोंड देणें असें दुहेरी काम संतकवींना करणें भाग पडलें. लोहाची मांदुस केली। नानारत्नें साठविलीं। ते अभाग्यानें त्यागिलीं। लोखंड म्हणौनि ॥ तैसी भाषा प्राकृत। अर्थ वेदान्त

आणि सिद्धान्त। नेणोनि त्यागी भ्रांत। मंदबुद्धीस्तव ॥ ( दासबोध, ७-१-३४-३५ ), असे तळमळीचे उद्गार समर्थांना हि काढणें अवश्य वाटलें.

( ५ ) कै. राजवाडे यांनी, 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड आठवा' या ग्रंथाच्या उपप्रस्तावनेंत शिवशाहीच्या प्रारंभींची मराठी भाषेची केविलवाणी स्थिति अत्यंत मार्मिकपणानें चिकित्सिली आहे. विजापुरांतील सर्वश्रेष्ठ कारभारी दियानतराव त्यांनी निळोपंत बहुतकर यांस पाठविलेल्या पत्रांतील भाषेची छाननी करून कै. राजवाड्यांनी पुढीलप्रमाणें सार काढलें आहे: 'या लेखांत एकंदर ९१ शब्द आहेत; त्यांपैकीं बरोबर ३० शब्द फारशी आहेत; आणि वाक्यप्रयोग फारशीच्या धर्तीवर आहेत. ९१ शब्दांपैकीं अस्सल फारशी ३० शब्द गाळले असतां बाकी जे ६१ शब्द राहतात, त्यांतून २-३ शब्द खेरीज करून बाकी सर्व शब्द फारशी शब्दाचे मराठी तर्जुमे आहेत.'' ( खंड ८ वा, पानें १७-१८ ). इ. स. १६२८ पासून १७२८ पर्यंत मराठींतील दरबारी पत्रांत फारशी शब्दांचा भरणा कोणत्या प्रमाणानें होत होता, याचा थोडक्यांत आढावा देऊन कै. राजवाडे पुढीलप्रमाणें विधान करतात तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. 'दरबारी पत्रांत मुसलमानी अमलामध्यें इ. स. १६२८ त शंभर शब्दांतून सरासरीच्या मानानें १४ शब्द मराठी येत; शिवाजीचें स्वराज्य चालू असतां, इ. स. १६७७ त शेकडा ६२ शब्द मराठी येत; आणि शाहू राज्यावर असतां इ. स. १७२८ त शेंकडा ९३ शब्द मराठी येऊं लागले. परराज्याचा भाषेवरती केवढा परिणाम होतो याचा हा रोखठोक ताळा आहे.' ( उपप्रस्तावना, पानें २४-२५ ). वरील विचारसरणी समजून घेतल्यास, असें म्हणणें भाग आहे कीं, त्या वेळच्या दरबारी मराठी भाषेच्या स्वरूपापेक्षां, महाराष्ट्रकवींच्या तत्कालीन काव्यग्रंथांत च मराठीचें खरें मराठीपण उरलें होतें एवढें च नव्हे, तर आपल्या सात्विक व तेजस्वी विचारांनीं मराठी जनतेच्या हृदयावर आपला प्रभाव अहर्निश गाजवित राहून, ते ग्रंथ नेहमींच्या वाचनांत राहिल्यानें, मराठे लोक आपल्या स्वरूपाला विसरले नाहींत. दासबोधासारखे ग्रंथ फारशीचा संस्कार पचवून पुनश्च मराठी च राहिले.

( ६ ) उदाहरणार्थ, दशक १८ मधील ६ वा समास आपण घेऊं. या समासाला 'उत्तमपुरुषनिरूपण' असें नांव असून, अफजूलखानाचा वध करून महाराज श्रीसमर्थांच्या दर्शनास आले असतां त्यावेळीं हा समास सांगितला असें स्पष्ट दिसतें व परंपरेची तशी समजूत हि आहे. या समासांत एकंदर २२ ओव्या असून प्रत्येक ओवींत सुमारें १० ते बारा शब्द आहेत; म्हणजे सामान्यपणें २५० वर शब्द या समासांत आहेत. यांपैकीं शेकडा ६० हून अधिक शब्द संस्कृत आहेत; जसें, वस्त्र, भूषण, प्रसंग, शोभा, बीज, मर्यादा, सर्वत्र, इत्यादि. संस्कृत शब्दांत

थोडा विकार होऊन मराठींत आलेले असे सुमारें शेकडा २५ आहेत, जसें, शृंघारणें, सतेज, च्यातुर्य, सीघ्र, राक्षेस, तुळजाभोवानी, कार्यें, आंगिकारु, येश, इत्यादि. नस्तां (नसतां), वेणार, मिळों नेणे, सारिखा, जाला पाहिजे, पाहोनी, जेणें, पैल, करूनियां, उदंड, इत्यादि मराठी शब्द सुमारें शेकडा १५ आहेत. यांत फारशी शब्द अगदीं वेचून काढले तरी, 'बेइमानी व तजवीजा,' असे दोन च सांपडतात. येथें फारशींतील 'नजीक, बद्दल, ऐवजीं' यासारखी शब्दयोगीअव्ययें, औषधाला देखील नाहींत. तेथें 'समया**सारिखा**, समर्था**पासीं**, या**कारणें** गुणा**मधें**' इत्यादि मराठी अव्ययांची उदाहरणें आढळून येतात. 'सज्ज केलें, शोभा न पवे, मर्यादा न धरी, नेम चालेना, अंतर पडे, प्रसंग पाहोन चालावें, हटनिग्रहीं न पडावें, तट पडिले, धारिष्ट धरणें, बहुत जनाचें साहाणें, चिंता वाहाणें, पैल्यार पाविजे, इत्यादि वाक्प्रचार फारशीच्या प्रभावानें निस्तेज न होतां, आपल्या मराठी तेजानें येथें मिरवत आहेत. येथें 'व' (म्हणजे आणि) व 'कीं' (नामवाक्याचा आरंभ दर्शविणारें अव्यय) यांचा मागमूस देखील नाहीं. सारांश शिवकालीन दरबारी पत्रव्यवहार पाहिला असतां, दासबोध हा ग्रंथ त्या मानानें किती तरी 'संपूर्ण मराठी' आहे असें वाचकांना दिसेल.

(७) कांहीं लोक कुचेष्टेनें म्हणतात कीं, "दासबोध पद्यबंध नसून गद्यबंध असतां तर किती बरें झालें असतें! आपणा सर्वांच्या सुदैवानें तो तसा नाहीं हें महाभाग्य आहे. दासबोध पद्यबंध असल्यानें च त्याचें मराठीपण व सुबोधत्व आहे असें अतिशयोक्तिपूर्वक विधान करण्यास कांहीं च शंका वाटत नाहीं. उदाहरणार्थ, नुकत्या च प्रसिद्ध झालेल्या 'श्रीसमर्थहृदय' या ग्रंथाच्या शेवटीं 'श्रीसमर्थांचें एकमेव गद्यपत्र' दिलें आहे. त्याची दासबोधांतील कोणत्या हि पानाशीं तुलना केली तरी सुबोधतेच्या दृष्टीनें दासबोध किती तरी सोपा म्हणावा लागेल व तो तसा आहे हि. 'हें इतुके म्यां आवडीच्या कळवळयाने लिहिले आहे मने मन साक्ष असेल परंतु तुम्हास उपचारसा वाटोन रजीस होल तरी न होणे जैसा दिवाकरभट तैसे तुम्ही हा इत्यर्थ आहे बरें कललें पाहिजे तुमचा आमचा येकात प्रसंग जालियावरी मग ऐसे लिहिता न ये म्हणौनि ये संधीमधे प्रसग फावला पुढें फावेना म्हणौनि लावे करून लिहिले...इत्यादि.' हें पत्र वाचतांना जसें पावलोंपावलीं अडखळल्यासारखें होतें तसें दासबोध वाचतांना होत नाहीं. पत्रांतील भाषेप्रमाणें श्रीसमर्थांनीं आपले विचार जर गद्यांत मांडले असते, तर दुर्बोधतेमुळें ग्रंथाच्या तेजस्वी विचारांना आवरण पडलें असते व सामान्य जनता त्यांना मुकली असती.

(८) भाषीय चिकित्सेच्या दृष्टीनें, कोणत्या हि ग्रंथाच्या भाषेचें स्वरूप यथार्थ समजण्यासाठीं त्या ग्रंथाची शुद्ध संहिता उपलब्ध असणें अत्यंत अवश्य

आहे. दासबोधाच्या १९ व्या दशकांतील 'लेखन क्रिया निरूपण' या समासांतील कांहीं ओव्या या दृष्टीनें वाचनीय आहेत.

ब्राह्मणें बाळबध अक्षर। घडसुनी करावें सुंदर।
जें देखतांचि चतुर। समाधान पावती॥

अक्षर मात्र तितुकें नीट। नेमस्त पैस काने नीट।
आडव्या मात्रा त्या हि नीट। आर्कुली वेलांड्या॥

पहिलें अक्षर जें काढिलें। ग्रंथ संपे तों पाहात गेलें।
येका टांकेंचि लिहिलें। ऐसें वाटे॥

कोठें शोधासि आडे ना। चुकी पाहातां सांपडे ना।
गरज केली हें घडे ना। लेखकापासुनी॥

एसा ग्रंथ जपोन ल्याहावा। प्राणीमात्रास उपजे हेवा।
ऐसा पुरुष तो पाहावा। म्हणती लोक॥

— दासबोध

(९) कै. राजवाडे यांच्या मतानें, जुन्या पोथ्याचें किंवा पत्रादिकांचें लेखन पुढीलप्रमाणें असलें पाहिजे. '(१) प्रथम लेख जसेचे तसे छापावे. (२) ते मिळाले कोठून, ते अस्सल आहेत कीं नक्कल आहेत, ते आहेत कोणत्या स्थितींत, वगैरे माहिती पूर्ण द्यावी. (३) त्यांतील कठीण व दुर्बोध एकोन एक शब्द व वाक्यें छानून तपासावी, व त्याचा अर्थ द्यावा. (४) त्यापासून अनुमानें काय निघतात तें मुद्देसूद लिहावें. (५) व शेवटीं त्यापासून संगतवार वृत्तांत काय निघतो तें दाखवावें.'

संहितेच्या शुद्धतेच्या दृष्टीनें कै. राजवाडे यांनीं घालून दिलेला दंडक अत्यंत महत्त्वाचा आहे.

(१०) सत्कार्योत्तेजक सभा-धुळें, या संस्थेनें, डोमगांव येथील मठांत असलेल्या श्रीकल्याणस्वामींच्या प्रतीवरून प्रसिद्ध केलेला 'दासबोध' कै. राजवाडे यांच्यावरील दंडकाला धरून आहे. मुळांत जसें आहे तसें च छापण्याची कसोशी या आवृत्तींत केली आहे. जेथें शंका आली ती त्या स्थळीं स्पष्टपणें सांगितली आहे. ही प्रत तयार करितांना तुलनेसाठीं आणखी हि कांहीं हस्तलिखितें त्यांच्या जवळ उपलब्ध होतीं असें दिसतें (पान ५४७ धुळें प्रत)–रघुनाथपंडितांच्या 'नलदमयन्ती' आख्यानाची, जशी संहितेच्या दृष्टीनें, श्रीयुत प्रियोळकर यांची प्रत मान्य, तशीं च 'दासबोधा'च्या बाबतींत ही प्रत मान्य वाटते. कै. पांगारकर

यांना कल्याण स्वामीचे बंधु दत्तात्रय स्वामी यांच्या हातची प्रत, ग्वालेर लष्कर, येथील आबासाहेब यांच्या मठांत सांपडली. त्या प्रतीच्या शेवटीं पुढील लेख आहे. ' श्रीरामदासस्वामीचा सेवक । दत्तात्रेय नामें लेखक: तेणें लीहीला ग्रंथनायक। दासबोध ॥ १ ॥ शके सोळाशें साहा १६००६ क्रोधन नाम संवच्छरे भाद्रपद मासे शुक्ल पक्षे नवमी शुक्रवारे तदीनी समाप्त। शुभं भवतु। श्रीरघुनाथार्पणमस्तु ॥ ६ ॥' पण प्रस्तावनेंत २२ पानावर ' उभय प्रतींतील अशुद्धें ' असें एक प्रकरण कै. पांगारकर यांनीं देऊन त्याला टीप जोडली आहे. 'संस्कृत नियमाप्रमाणें जे शब्द निर्विवाद शुद्ध आहेत ते शब्द शुद्ध करून घेणें च युक्त आहे. वाचकांच्या हातीं अशुद्ध पाठ देण्यांत कांहीं च शहाणपणा नाहीं.' खऱ्या शुद्ध संहितेच्या दृष्टीनें कै. पांगारकर यांची कल्पना सुसंगत वाटत नाहीं; व त्यांनीं दिलेल्या उदाहरणांवरून तर ती चुकीची च म्हणावी लागते. 'मछ, मछर' यांच्या जागीं 'मत्स्य व मत्सर' असे शब्द घालणें; 'अंतःकर्ण, स्फुर्ण, विवर्ण' यांबद्दल 'अन्तःकरण, स्फुरण, विवरण' यांची योजना करणें; 'शैन्य, स्वापद, स्परुष' बदलून 'सैन्य, श्वापद, स्पर्श' असें शुद्धीकरण; 'आहर्निशी, माहावाक्कीं, आर्धऊर्ध' यांच्याऐवजी 'अहर्निशी, माहावाक्यीं, अधऊर्ध्व' या शब्दांची निवड; 'वग्तृत्व, त्रुषा, पिप्लीका' यांच्या ठिकाणीं 'वक्तृत्व, तृषा व पिपीलिका' या शब्दांची पसंती; 'वेधना, कुबुधी, युध्यास' यांना टाकून 'वेदना, कुबुद्धि, युद्धास' यांचा अंगिकार; समशा, उदेग, क्षेत्रदेव' यांचा त्याग करून 'समस्या, उद्वेग, क्षत्रदेव' हे संस्कृत शब्द पत्करणें अशा प्रकारें दोन्ही विश्वासार्ह प्रतीवर गैरविश्वास दाखवून सयुक्तिक कारण न दाखवतां केलेला फरक योग्य नाहीं. रामदास हे शिवशाहींतील लेखक आहेत. शिवशाहींतील जनता जी मराठी भाषा बोलते, त्यांतील शब्दांचा उच्चार जसा केला जातो, त्यावेळची बोलण्याची जी लकब असेल ती लक्षांत घेऊन शुद्धाशुद्धता ठरविली पाहिजे. धुळें-प्रतीवरून असें दिसतें कीं, इतर प्रतींवरून ती पुढें प्रत कोणी तरी योग्य पुरुषानें शुद्ध करून घेतली आहे. इतकें असून हि कै. पांगारकरांना अशुद्ध वाटणारे शब्द तेथें बदलले नाहींत. शिवकालीन पत्रव्यवहार पाहिला, तर कै. पांगारकर कसे चुकतात व मुळचे लेखक कसे यथार्थ योजना करितात हें कळून येईल, उदाहरणार्थ, 'महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास' अथवा 'साधन परिचय' या ग्रंथांत पानें ४२ ते ४४ यांमध्यें 'शिवाजी व एकोजी संबंध' दाखविणारें, शके १५९८ मधील, पत्र आहे-त्यांत पुढील शब्द येतात. 'यैसीयास (अशास), समई (समयीं), वेव्हार (व्यवहार), तेवडा (तेव्हडा), कुस्ण (कृष्ण), ज्योतिसी (ज्योतिषी), बुधीस (बुद्धीस), कस्टी (कष्टी), दुस्ट (दुष्ट), युध्याचा (युद्धाचा), अरधा (अर्धा),' इत्यादि त्या पत्रांतील शब्द पाहिले

म्हणजे मूळ प्रतींतील असे पाठभेद बदलणें चुकीचें कसें आहे हें कळून येईल. असें असलें तरी तुलनेच्या दृष्टीनें धुळेंप्रत व पांगारकरी प्रत उपयोगाच्या आहेत. धुळें प्रतींत पूर्वीं च शुद्ध केलेले पाठ पांगारकरी प्रतींत मूळचे तसें च आहेत. पण धुळें प्रतींत कांहीं पाठभेद आहेत ते पांगारकरी प्रतींत नाहींत; यावरून या दोन्ही प्रतींना जवळ असणारी अशी तिसरी एकादी प्रत उपलब्ध व्हावयास पाहिजे असें वाटतें. नमुन्यासाठीं पुढील उदाहरणें पहा.

| धुळें प्रत | पांगारकरी प्रत | दशक–समास–ओवी |
|---|---|---|
| **मानी** तो सत्वगुण। | **वाटे** तो सत्वगुण। | २–७–८३ |
| शुभाशुभे**न**कर्म**णा**। | शुभाशुभ**ैः**कर्मभि**श्च**। | ३–६–८ |
| **बरवी** घरवात मांडिली। | **पुन्हां**........ | ३–३–३० |

(११) आमच्याजवळ महानुभाव कवि संतोषमुनि कृष्णदास याच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'ची एक जुनी हस्तलिखित प्रत आहे. कवीनें हा ग्रन्थ शके १४८६ (इ. स. १५६४) मध्यें केला असून त्याची ही हस्तलिखित प्रत एकनाथोत्तर-कालीन असावी असें दिसतें. त्यामध्यें हि दासबोधाप्रमाणें कांहीं शब्द लिहिलेले आढळतात, जसें वज्रगिया (वज्रांगिया), मालगठी (मालगंठी), नीश्याण (निशाण), माहाद्वार (महाद्वार), येश्वदा (यशोदा), आतिविस्तारीं (अतिविस्तारीं) इत्यादि. सारांश तुलनात्मक दृष्टीनें महानुभावीय तत्कालीन वाङ्मयांत ती च पद्धत आढळून येते, म्हणून तत्कालीन शब्दोच्चारानुसार योजिलेले शब्द अयोग्य व अशुद्ध कसे म्हणावेत?

(१२) भाषेचें स्वरूप लक्षांत घेतांना ग्रंथाचा विशिष्ट लेखनकाल ही ध्यानांत घ्यावयास पाहिजे. श्रीदासबोध ग्रंथाची रचना केव्हां व कशी झाली याविषयीं अगदीं निर्बाध अशीं प्रमाणें नाहींत. परंतु कांहीं अंतर्गत प्रमाणांवरून (सार्थ दासबोध, कै. पांगारकर, प्रस्तावना, पानें ७–९; श्रीसमर्थहृदय, समर्थभक्त देव; पानें ३२०–२३) असें दिसतें कीं, विचाराच्या साखळींप्रमाणें दशक १ ते ७ हा दासबोधाचा प्रथम भाग; नंतर विषयपूर्तीसाठीं आठवा दशक जोडला; व यानंतरचा दशक ९ ते २० हा तिसरा भाग. दशक १ ते ८ हा पूर्वार्ध होय, व बाकीचा भाग उत्तरार्ध आहे. उत्तरार्धांतील समास पाहिले म्हणजे प्रसंगानुसार निरनिराळ्या विषयांचें निरूपण केलेलें दिसतें. प्रत्येक समास म्हणजे स्वतंत्र व्याख्याना-सारखें वाटतें. शके १५६६ (इ. स. १६४४) मध्यें श्रीसमर्थ कृष्णातीरीं आले व ही च त्याची कर्मभूमी. दशक सहावा, समास चवथा यामध्यें कलियुग गणना आहे त्यावरून, शके १५८१ (इ. स. १६५९) मध्यें सहाव्या दशकाची रचना संपत

आली असावी असें स्पष्ट दिसतें. त्यानंतर लवकर च सातव्या दशकाअखेर रचना तयार होऊन, आठवा दशक त्याला जोडला गेला. यानंतरचा भाग म्हणजे दशक ९ ते २०, शके १६०३ पर्यंत तयार झाला असावा.

( १३ ) दासबोधाच्या रचनेचा वरील इतिहास पाहिला म्हणजे दासबोधाच्या भाषेंत फरक कां पडत गेला याचा हि उलगडा होतो. 'आधीं केलें। मग सांगितलें ॥' असा 'आत्मप्रतीतीचा' रंग उत्तरोत्तर अधिक खुलत गेला त्याचें हि कारण वरील इतिहासांत सांपडेल. वास्तविक पाहातां दासबोधांत, यादवकाल, बहामनीकाल, व शिवशाही या तिहींची प्रतिबिंबें दिसतात. पण उत्तरार्धात शिवशाहीचें प्रतिबिंब विशेष दिसतें; पूर्वार्धाच्या आरंभींच्या भागांत यादवकालीन व बहामनीकालीन खुणा अधिक प्रतीत होतात; तर दशक सात व आठ यांमध्यें बहामनी व शिवशाही यांच्या खुणा विशेष उपलब्ध होतात. '**त्यागेंविण** न्हे कीं साधक (५-१०-१); **देहाचेनि योगें** संशयो (५-१०-१५); तें चि सिद्धाचें लक्षण। **निश्चयेंसीं** (५-१०-२७); **मागां** जालें निरूपण (५-१०-९); **संसारिकां** त्याग **येणें**। **प्रकारें** ऐसा (५-१०-२); मंदबुद्धी**स्तव** (मुळें; ८-१०-६६); भवनदी**चा** प्रवाहीं (७-८-१६); नाहीं पापा**सि** गणना (५-८-८); ऐसा मुमुक्षु **जाणिजे**। संकेतचिन्हें **वोळखिजे**। (५-८-४४); **श्रोतां** व्हावें (२-३-१); पुढिले समासीं **आघवीं**। निरोपिलीं ॥ (२-१-७४); तो चि **विबुधीं वंदिजे** (१६-१-११); रूपलावण्य अभ्यासितां न ये (येत नाहीं, शक्य नाहीं, १४-६-१); दोरी**करितां** (मुळें) भुजंग (८-३-२); इत्यादि यादवकालीन व्याकरणाचीं चिन्हें आरंभीं आरंभीं जितकीं दिसतात तितकीं पुढें दिसत नाहींत. म्हणौनि, म्हणौनियां अशी रूपें फार च विरळा येतात; 'म्हणोनि' असें बहामनीकालीन रूप त्यापेक्षां अधिक आढळतें, व 'म्हणोन' असें रूप बरें च वेळा सांपडतें. बहामनी कालांत पुढील-प्रमाणें कांहीं बाबी दिसतात; देहीं **असोनि** विदेह जाला (५-८-२८), लोभा**चे** (लोभाच्या) हातींचा गेला । अकस्मात॥ (५-८-३७), आपणा**स** (आपणासि) निंदी सावकास (५-८-३७); मनें **विषये**त्याग केला (५-१०-४); माया अविद्ये**चे** (च्या) निरासीं (७-५-१०); पुढि**लें** समासीं (८-४-५५); **ऐकोनि**, म्ह**णोनि** (१६-१-५); फिरोन पाहे (१६-३-२१); समजोन (१६-७-१६); वायोविण (८-१-२८); स्तंभे**विण** (८-१-२८); **इतुकेन** (इतुके**नि**, ७-५-४४); केलें पाहिजे (५-१०-४५); सिकविलें तें **ऐकेना** (आईकेना, १९-३-१९); सभेमध्यें लाजों **नये** (लाजणें इष्ट नाहीं, २-२-१५); हीनाचें रुण घेऊं नये (नका, २-२-२०); भक्तिचे**न** योगें (१-१-४) **अवघेंचि** (आघवेंचि) अनुवादलें। न वचे (१-१-१३); इत्यादि. यानंतर रामदासकालीन

रूपें पुढीलप्रमाणें आहेत. **कोण्या** गुणें देवाधिदेवा पाविजेल (५-८-१०); म्हणे माझी **वयेसा** गेली । **वर्थेचि** आवघी । (५-८-६); लक्ष्णासि (लक्षणासि) **काये** उणें (५-१०-४२); माये**च्या** माथां (८-२-२१); परमार्थे**च्या** साधनासी (७-७-७४); अज्ञाना**च्या** उर्मी (८-१०-४४); **पाहिल्या**विण (८-६-७); **येक्या** ग्रंथें, दुजया**नें** (७-९-४); कांहीं **केल्या** सुटेना (७-७-४५); विशेष लक्षांत ठेवण्याजोग्या बाबी म्हणजे पुढील होत. द्वितीयेचा व चतुर्थीचा **ला** प्रत्यय पहिल्या सात दशकांत औषधास देखील सांपडत नाहीं. व पुढें हि अत्यंत अल्प प्रमाणांत दिसतो. **पाहिजे** या रूपाची मूळपीठिका उत्तरार्धांत जवळ जवळ विसरल्या-सारखी दिसते. **आघवा** या शब्दाच्या जागीं **आवघा**, **अवघा** असें शब्द येतात. 'केलेया, गेलेया' इत्यादिकांच्या जागीं 'केल्या, गेल्या' अशीं रूपें आढळतात. 'दुजया**नें**' यांतील 'नें' प्रत्यय यादवकालीन नाहीं. 'भवनदी**चा** प्रवाहीं' (७-८-१६) याच्या जागीं 'भवनदी**च्या** प्रवाहीं' असें रूप दिसेल. सृष्टी**चां** ठाइं (८-९-५९), पूजे**चां** अंगि (८-७-९) अशीं रूपें यादवकालीं होतीं, पण पुढें कमी होतां होतां, या रूपांत 'च्या' दिसूं लागला. **स्तंभें**विण (८-१-२८) यांतील **विण** शब्दयोगी अव्ययापूर्वीं तृतीयेचें रूप न दिसतां, **वायो**विण (८-३-५९), **पाहिल्या**विण (८-६-७) असें सामान्यरूप दिसावयास लागतें. दासबोधावर फारसीचा परिणाम मुळीं च झाला नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. पूर्वार्धांत अगदीं क्वचित च फारसी शब्द येतात, पण उत्तरार्धांत 'आपला **मगज** राखणें, कारबार, नजर, बाजारी, हिशेब, आकलबंद, किली, कुलूप, तजवीजा, तगादा, फडनवीस, तकवा, मिरासी, मुलकी, दगा, जिनसाना, पहिलवान, सुरनवीस, शाहार (नगर), तमाशा, गरज, मज्यालसी, शोक,' इत्यादि शब्द अगदीं बेतानें वापरलेले दिसतील. दासबोधांत असले सर्व शब्द अगदीं निवडून काढले तरी पन्नासाच्या आंत च भरतील. विशेषतः १५ ते २० या दशकांत ते आढळतात. याचा अर्थ जनतेच्या अगदीं शेवटच्या थरापर्यंत या शब्दांनीं आपला प्रांत व्यापून टाकला होता. तेव्हां असा सिद्धान्त मांडण्यास संशय वाटत नाहीं कीं, दासबोधांत ज्या समासांत फारसी शब्द आढळतात, तो समास समर्थांच्या आयुष्याच्या उत्तरभागांतील असावा. प्रबोध, प्रचीत व प्रयत्न या त्रिविध मंत्राचें तेज जसें उत्तरार्धांत दिसतें, तसें पूर्वार्धांत दिसत नाहीं. तेव्हां यावरून हि असा नियम काढणें चुकीचें होणार नाहीं कीं जेवढे अनुभवाचे व प्रतीतीचे बोल आहेत, ते विशेषतां उत्तरार्धांत आहेत. त्या ठिकाणीं एखाद्या ग्रंथाचा आदर्श पुढें ठेवून त्याचें निरूपण आपण करीत आहों असें समर्थांना वाटत नसून, अंतःकरणांतील तळमळ शब्दरूपानें प्रगट होत आहे असें आपणांस वाटतें. या दृष्टीनें दुसऱ्या शतकांतील मूर्खलक्षणें, उत्तमलक्षणें किंवा कुविद्यालक्षणें

आपण वाचूं लागलों, म्हणजे असें वाटतें कीं, मनुस्मृतीच्या मराठी ओवीबद्ध रूपांतराचा एखादा अध्याय आपण वाचत आहोंत. पण तें च अठराव्या समासांतील पांचवा समास 'करंटपरीक्षानिरूपण', सहावा समास 'उत्तमपुरुषलक्षण', किंवा एकोणीसाव्या दशकांतील पहिला समास 'लेखनक्रियानिरूपण', चौथा समास 'सदेवलक्षणनिरूपण', इत्यादि आपण वाचूं लागलों, म्हणजे जनतेच्या अंतरंगाला जाऊन भिडणारें जिवंत वाङ्मय आपण वाचत आहोंत असें वाटतें. या विचारांना एकाद्या महत्त्वाच्या ग्रंथाचें अधिष्ठान आहे कीं नाहीं याचा विचार हि आपल्या मनाला न शिवतां, हे प्रतीतीचे, अनुभवाचे, व अंतःकरणाचे बोल आहेत अशी आपली मनोदेवता कौल देते. विसाव्या दशकांतील, आठवा समास 'देहक्षेत्रनिरूपण' हा अगदीं अध्यात्मिक आहे, पण त्यांतील तेज कांहीं निराळें च आहे. 'ईश्वरें केवढें सूत्र केलें। सूर्यबिंब धावाया लाविलें। धुकटाकरवीं धरविलें। अगाध पाणी ॥ झिडकझिडकूं धावे वारा। जैसा काळाचा म्हणियारा। ढग मारुनी दिनकरा। मोकळे करी॥' इत्यादि ओव्या अनेक वेळा वाचाव्याशा वाटतात. याच्याशीं पहिल्या आठ दशकांतील अध्यात्मिक भाग ठेवला, तर तो रुक्ष वाटतो. सारांश जितका जितका विचार उत्कट, तितका तितका तो समास उत्तरार्धांतील असावा असें विधान करण्यास हरकत नाहीं; अशा प्रकारें विचाराप्रमाणें भाषेच्या स्वरूपांत फरक आढळून येतो. म्हणून भाषेचें स्वरूप ठरवितांना कोणत्या कालखंडांत तो तो भाग लिहिला गेला याचा विचार करणें जरूर असतें.

आतापर्यंत भाषेच्या बाह्यस्वरूपाचा विचार करितांना कोणत्या गोष्टींच्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे याचा विचार झाला; आतां दासबोधाच्या भाषेचा प्रत्यक्ष विचार करूं.

(१४) **शब्दसमूह** — एवढ्या मोठ्या ग्रंथांत फारशी शब्द ५०-७५ च्या आंतच सांपडतात म्हणून तें प्रमाण फारच अल्प आहे. यादवकालीन शब्द हि रामदासकालापर्यंत काव्यांत आढळून येतात; जसे, 'अमुप (पुष्कळ) ३-१-१९; मोटाळें (गाठोडें) ३-१-३२; वरपडा जाला; (व्याकुळ झाला) ३-१-४८; झळंबलें (पाणीं होणें, धीर सुटणें) ३-१-५०; बुझावी (समजवून देतो) ३-२-६; कळांतरें (व्याज) ३-२-३७, इत्यादि. वर्णप्रक्रियेमुळें बरेच शब्द नवीन वाटतात, वस्तुतः ते जुने च शब्द आहेत. नमुना म्हणून कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. (**अ**) संश**यो** निश्च**यो** (१-१-१२) सम**यो** (१-१-३२) **राहो** (१-१-२५) वा**यो** (३-१-२९) यांत 'उ' च्या जागीं 'ओ' आला आहे. (**आ**) **आवदसा** (३-१-६), **लाहानथोर** (१६-५-४), **आतिशय**

( ३-२-३३ ); **आवेव** ( ३-२-८ ) येथें ‘ अ ’ चा ‘ आ ’ झाला आहे. ( इ ) **लज्या** ( ३-२-४३ ), प**छ्या**डिले ( १७-१-७ ), **च्या**मुंडिनी ( १६-६-२० ) यांत संस्कृतप्रमाणें चवर्गाचा उच्चार केला आहे; म्हणून त्यांत उच्चारानुरूप ‘ य ’ अधिक आला आहे. ( ई ) **वे**वस्ता ( ३-१-२७ ), **वे**वसाई ( ३-२-४४ ), **वे**वाद (१६-७-२३), वेथा (३-२-६), यांमध्यें ‘ व्य-(व्+अ)-(व्+ए) - वे ’ अशा रीतीनें बदल होतो. ( उ ) सं**व्हा**र (८-५-२६), **वौं**श ( वंश १६-२-१), येथें अंत्य ‘ य ’ व ‘ श ’ यापूर्वी ‘ म् ’ मध्यें होणारा फरक उच्चारानुरूप आहे. ( ऊ ) सुक्षमी, ( सूक्ष्मी, १६-७-३७ ), पंगती ( पंक्ति, १६-३-२७), तीक्षण, (तीक्ष्ण ३-१ ३१), यांत उच्चार सुलभ व्हावा म्हणून ‘ स्वरभक्ति ’ ही क्रिया झाली आहे. ( ऋ ) **ये**थार्थ ( १-१-२७ ), येशकीर्ति ( १५-२-२१ ), रामायेण ( १६-१-५ ), इत्यादिकांत ‘ य ’ च्या जागीं ‘ ये ’ दिसत आहे. असा प्रकार यादवकाली क्वचितच होता, पण बहामनीकालांत तो हळुहळु वाढत जाऊन, रामदासकालांत विस्तृत प्रमाणावर दिसूं लागला. सौख्यदा**ये**के ( १६-४-२३ ), गा**ये**मुख ( १६-४-६ ), दे**हे** ( १६-१-१३ ) इत्यादिकांत तोच विकार आहे. ( ॠ ) सिं**ह्या**सनावरी ( १६-२-३२ ), दे**ह्या**त्मयोगें ( १६-७-१४ ), न्यू**न्य** ( १६-५-३० ), यांत अंत्य ‘ अ आ ’ पूर्वी ‘ य् ’ वर्णाचा आगम झाला आहे. ( ऌ ) किर्ण ( किरण, १६-२-२ ), स्फुर्ण ( स्फुरण, १६-७-४ ), झुर्णीस ( झुरणीस, ३-२-१६ ), यांत ‘ र ’ मधील, अंत्य ‘ अ ’ चा लोप झाला आहे. ( ॡ ) अ**स्ती**पंजर ( अस्थि, ३-१-१६ ), वेव**स्ता** ( व्यवस्था ३-१-२७ ), वसुं**द**रा [ वसुंधरा १६-३-२० ], इत्यादिकांत, दुसऱ्या व चौथ्या अक्षरांच्या जागीं, पहिलें व तिसरें अक्षर अनुक्रमें आलें आहे. [ ए ] प्रकुती [ प्रकृति, १६-७-१२ ] त्रुप्त ( तृप्त १६-५-१३ ), प्रजन्य [ पर्जन्य, १६-९-९ ], इत्यादिकांत मूळच्या ‘ ऋ ’ चा ‘ रु ’ व ‘ र् ’ पूर्वीच्या ‘ अ ’ चा लोप झाला आहे. ( ए ) सेवटीं ( १६-३-२६ ), सिघ्र (१६-६-२०), औशवें [१६-५-१६], सुन्याकार (३-१-४९) तश्कर [ १६।२।१७ ], स्वासोस्वास [ १३-७-२२ ], यांमध्यें ‘ स-श-ष ’ यांना होणारा विकार लक्षांत ठेवावा. ( ऐ ) समई ( समयीं, ३-२-१० ), प्रळइं ( १६-९-१६ ) विषीं ( विषयीं, १६-२-२१ ), या ठिकाणीं ‘ य ’ चा ‘ इ ’ झाला आहे. ( ओ ) सा**यो**ज्यमुक्ति ( सायुज्य, ३-२-५६ ), परा**धे**नता ( परा**धी**नता, ३-२-५२ ), आ**कों**चन ( आ**कुं**चन, १६-६-४ ), इत्यादि उदाहरणांत ‘ गुणविकार ’ दिसतो. ( औ ) स**दे**व ( स**दै**व १५-३-७ ), अ**लो**किक ( अलौकिक, १६-६-१३ ), या उदाहरणांत ‘ ऐ-औ ’ च्या जागीं ‘ ए-ओ ’ आले आहेत. ( क ) फळश्रुती ( १-१-३० ), कळिवर ( ३-१-४२ ), यांत ‘ ल ’ चा ‘ ळ ’ झाला आहे. ( ख ) थिरे ( स्थिरे १६-९-७ ), पष्ट ( स्पष्ट, १६-१-१५ ), यांत आद्य ‘ स ’ चा लोप

झाला आहे. ( ग ) पुढील शब्दांतील संधिनियम पहाण्याजोगे आहेत; अभ्यांतरीं ( अभि-अभ्य-अभ्य+अन्तरीं, ३-१-१७ ), कित्तेक ( किति+एक=कित्येक-कित्तेक, १६-३-२२ ), जगदेश्वरें ( जगत्–जगत+ईश्वरें, १६-३-२५ ), कवेश्वर ( कवि–कव+ईश्वर, १६-१-७ ), निरार्थक ( निर्–निर+अर्थक, १६-२-७ ), प्रत्योत्तर ( प्रति–प्रत+उत्तर, १६-७-१६ ), इत्यादि. सारांश मूळ संस्कृत शब्दांतच उच्चारामुळें वरील प्रकारचे 'विकार' झाल्यानें शब्द निराळे भासूं लागतात. तत्कालीन उपलब्ध व्यवहारावरून ही गोष्ट स्पष्ट होण्याजोगी आहे. संस्कृतज्ञ सुशिक्षित मनुष्यहि व्यवहारांत लोकांशीं बोलतांना किंवा लोकांच्याकरितां लिहितांना तत्कालीन प्रवृत्तीप्रमाणें बोलतो किंवा लिहितो; तेव्हां अशा प्रकारच्या शब्दांना अशुद्ध म्हणून चालणार नाहीं.

( १५ ) **वाक्प्रचार**—देवावर भार घालणें, ( ८-१०-३८ ), क्षिती न करणें ( ८-१-२३ ), संदेहीं पडणें, ( ८-१-३८ ), पोटीं येणें ( ८-४-२ ), भीड धरणें (१४-९-२९), पूर्वपक्ष उडवणें (१३-८-३७), साहित्य न घडे ( दृष्टांत जमत नाहीं, १३-१०-३ ), बेबंद जाले ( १३-५-१३ ), मगज राखणें ( ११-१०-२३ ) राजीं राखणें ( १९-७-७ ) चिंता वाहे, ( १५-२-२३ ), इत्यादिप्रकारें वाक्प्रचाराचा संचय दासबोधांत भरपूर आहे. फारशींतील वाक्प्रचाराची जरी थोडी भर पडली व यादवकालीन कांहीं वाक्प्रचार दिसेनासे झाले (जसें–बीजें करणें, रूप करणें इत्यादि ) तरी या बाबतींत सांठा एकसारखा वाढताच आहे.

वाक्यरचनेंत विशेष बदल झालेला नसला तरी कांहीं वाक्यें ध्यानांत ठेवण्याजोगी आहेत. **जागा जालिया** आपैसा बुझों लागे ( जागा झाल्यानें आपोआपच मनुष्याला समज पडूं लागतो ) ७-४-४२; केल्या कर्माचें फळ ( केलेल्या कामाचें फळ ) ८-७-६; ऐसा विश्वास धरतां लाज नाहीं, ( ईदृशं विश्वासं धारयतस्तस्य न लज्जा ) ८-७-२८; वेगळा केला न वचे ( केला जात नाहीं, करतां येत नाहीं ) ८-५-२; कथिलें न वचे सर्वथा ( केव्हां हि सांगणें शक्य नाहीं, सांगतां येत नाहीं ) ७-३-१९; पक्षा रक्षिलें पाहिजे ( पक्षो रक्षणीयः ) १४-२-१; धीरपाठें परपार। पाविजेत नाहीं ( धीटपाठेन परपारो न प्राप्यते ) १४-३-१२; साधकास पाहिजे साधन ( साधकैः साधनं सादरं दृश्यते ) ७-९-४१; ज्ञानेंविण निरूपण। बोलों चि न ये। (ज्ञानेन विना निर्वचनं न शक्यते ) ७-९-५८; जेव्हां पाहिजे तेव्हां सिद्ध ( यदा काम्यते तदा सिद्धम् ) १७-१-९; येकांत स्थळीं समजोन पाही ( एकान्तस्थले सम्यक् दर्शनीयम् ) २०-९-२०; हें उघड बोलतां न ये ( इदं स्पष्टं वक्तुं न शक्यते ) ८-३-१५; इत्यादि.

( १६ ) **धातुसाधितें**—जात, येत, बसत, इत्यादि वर्तमानकालवाचकें पूर्वींप्रमाणें च आढळतात. ' **पाविजत** आहे, **देइजत** आहे ' अशा रूपांऐवजीं ' **पाविजेत** आहे, **देइजेत** आहे ' अशी कर्मणि वर्तमानकाळवाचकें येतात. ' देयावें, घेयावें, ' इत्यादि विध्यर्थी विशेषणांजागीं ' **द्यावें**, **घ्यावें** ' अशीं रूपें येतात; तसें ' देयावेया, घेयावेया ' यांच्या जागीं ' **द्यावया**, ' **घ्यावया** ' असे शब्द येतात. ' कराविया, बोलाविया ' यांच्या स्थानीं ' **कराव्या**, बोला**व्या** ' असा बदल होतो. ' केलें, गेलें, ' इत्यादि भूतकालवाचकांचीं सामान्यरूपें होतांना ' केलेया, गेलेया ' अशीं रूपें न होतां, ' केल्यानें, गेल्यानें, असा फरक होतो. ' म्हणौनि, जाणौनि ' या पूर्वकालवाचकांची स्थित्यंतरें कालानुसार होतात. यादवकालीं बरेच वेळां येणारी रूपें म्हणजे ' म्हणौनि-म्हणौनियां ' अशीं होतीं. पुढें पुढें हीं रूपें अगदीं कमी कमी होत गेलीं. बहामनी कालांत ' म्हणोनि ' असें रूप विशेष दिसूं लागलें; रामदास-कालांत ' असोन, असोनु ' अशीं रूपें अधिक सांपडतात. ' असून, करून ' रूपें हि रामदासकालांत दिसतात. ' करौं-करों-करुं ' अशीं हेत्वर्थकरूपें यादवकालीन आहेत. यांपैकीं ' करों ' हें रूप कमी कमी होऊं लागलें. बहामनी व रामदासकाल यांत ' करों-करुं ' अशीं दोन्ही रूपें आढळतात. ' **फिरफिरों** ठाइं पडावा ( फिरूनाफिरून, २०-३-२६ ) **राहराहों** शोध घ्यावा (१५-१-४.) ' इत्यादि पद्धतीचीं रूपें अगदीं क्वचितच आढळतात. ' निवडूं जाते. (१६-७-१९), उमजों जाणें (१९-९-२६ ), वर्णू न शके (१६-१०-२५) भजों लागले (१७-१-८), कळों देईना (१७-१-११); इत्यादि वाक्यांतील हेत्वर्थकांचा प्रचार पूर्वींप्रमाणें च पूर्णपणें चालू आहे. तसें च केलेल्या क्रियेच्या अवस्थेची सूक्ष्म छटा दाखविणारी पुढील वाक्यरचना तितक्या च विस्तारानें रामदासांच्या कालीं चालू आहे; जसें, **विटंबून पाडिलें** (१६-६-३०), चटक **लावून सोडी** (१९-३-१३), **व्यापून ठेलें** (७-४-१५ ), **समजोन घ्यावें** (१९-३-३०), **तुटोन जाय** ( ७-५-२८ ), **मरोन जाति** ( १६-३-२९ ), इत्यादि.

( १७ ) यानंतर नाम, सर्वनाम, विशेषण, इत्यादि आठ जातींविषयीं कांहीं महत्त्वाच्या बाबींचा विचार करूं.

**केवलप्रयोगी**—पूर्वींप्रमाणें ' बापु रे, अगा कटकटा, ' असे शब्द न येतां ' धन्य धन्य, बापुडा, हरिगोविंदा ( १६-१०-१८ ) असे उद्गारवाचक शब्द येतात.

**उभयान्वयी**—फारसींतील ' व ' व ' कीं ' ही दासबोधांत नाहींत. ' पतन पाविजेल **कीं** ( ५-३-२२ ); व शाहाणे **कीं** वेडे ( १५-६-८ ), यांतील ' कीं ' चा अर्थ फारशीपेक्षां निराळा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळ प्रत ... क्र. ३३७

**शब्दयोगी**— 'केल्या वेगळें ( १२-९-६ ), वर्तल्याविण ( १२-१०-३ ), जनासहित ( ११-१०-१७ ), संसारसंगें ( ५-३-१०१ ), यापूर्वी ( १६-१-१२ ), निधानाआड ( १४-५-३२ ), कल्पनेरहित,' इत्यादिकांत आढळून येणारीं शब्दयोगी अव्ययें पूर्वी या रीतीनें आलेली क्वचित दिसतात. याशिवाय पूर्वींचीं शब्दयोगी अव्ययें येतातच; जसें, भक्तीवांचून ( १४-३-१० ), परोपकाराकारणें ( १४-३-३ ), भिक्षेसाठीं ( १४-१-५० ), आम्हांभोवतें ( १४-७-३८ ), जन्मवरी ( ८-१-४ ), यालागीं (८-३-१४), मंदबुद्धिस्तव ( ८-१०-६६ ), आपणाऐसा ( १४-७-२५ ), भिकाऱ्यासारिखा ( १५-२-२१ ), खनाळामधें (१५-२-२३), पुरुषार्थविषीं ( १६-६-२५ ), ब्रह्मादिकापासुनि ( १६-१-३० ),' इत्यादि. यांपैकीं 'करितां, साठीं व विण' यांचा उपयोग विशेष लक्षांत ठेवण्याजोगा आहे. यादवकालांत 'करितां' याचा अर्थ 'मुळें' असा होता; व 'साठीं' याचाहि अर्थ 'मुळें किंवा ऐवजी, बद्दल' अशा अर्थी होत असे. जसें, 'तिहीं चंद्रा**साठीं** जलिची। प्रतिमा धरिली ॥ ज्ञाने. ९-४९; बहामनी काळांत या उपयोगाबरोबरच वर्तमान काळीं 'साठीं व करितां' यांचे उपयोग जसें आपण करतों तसा होऊं लागला. शेवटीं शेवटीं यादवकालीन अर्थ अगदींच क्वचित आढळूं लागला. दासबोधाच्या उत्तरार्धांत यादवकालीन अर्थी यांचा उपयोग कमी दिसेल. पुढील उदाहरणांत 'करितां' याचा अर्थ 'मुळें' आहे.' चंद्रमडळ उदकाकरितां (१६-४-३८), अग्नीकरितां सृष्टि चाले (६-५-४), दोरीकरितां भुजंग (८-३-३), पापाकरितां दरिद्र प्राप्त ( १९-३-२ ); पुढील उदाहरणांत 'साठीं' याचा यादवकालीन अर्थ नाहीं; जसें, कामासाठीं ( १४-२-२२ ), द्रव्यासाठीं ( १४-१-४२ ).

**क्रियाविशेषणें**—सैरावरा (१६-३-२०), अफाट ( १६-३-२० ), धबाबां, खळाळां ( १६-४-४ ), भयंकरा ( १६-४-८ ), सरारां ( १६-६-१४ ), जयाचें चित्त **अखंड** परमेश्वरीं ( १४-७-१५ ), **उदंड** करी गुप्तरुपें ( १५-२-२१ ), **पुर्ते** ( पुरते ) पाहेना ( ११-१०-९ ), **नेमक** राहणें ( १५-२-२४ ), वायो **झडझडां** वाजे ( १३-९-३६ ), करून **बरा** विवरावा ( १३-१-१ ), विवरोन **सदृढ** धरावा ( १३-१-२ ), निरूपण **सावध** ऐका ( १३-१-२ ), **पष्ट** ( स्पष्ट ) बोलती ( १३-८-४ ), जें **स्वभावेंचि** जालें ( १३-८-११ ), **अपूर्व** मोठें (१३-४-१९), **उदंड** घनदाट ( १३-२-१४ ), नावें बोलिली **सावकास** ( १३-६-४ ), **असंभाव्य** माजला वन्ही ( १३-४-२० ), **चुकतवाक्त** आठवणें ( १३-५-१९ ), **संकळित** बोलिला प्रकार ( १३-३-२० ), तोचि बोलिला **निर्धार** ( १३-६-३ ), तेथें संकल्प उठिला **चंचळ** ( १३-३-३ ), इत्यादि क्रियाविशेषणें पूर्वीपेक्षां म्हणजे एकनाथकालीन वाङ्मयापेक्षां अधिक दिसतील. विशेषतः निर्धार (निर्धारें),

सावकास ( सावकाशपणें ), चचंळ (चंचलपणें), पष्ट (स्पष्टपणें), सावध (सावधपणें), अशा प्रकारें नामें व विशेषणें यांचा अव्ययासारखा केलेला उपयोग ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. 'सरारां, झरारां,' इत्यादि शब्दांचा साठा दासबोधांत भरपूर आहे.

**विशेषणें**—यादवकालाप्रमाणें विशेषणाला विभक्ती लागलेलीं कांहीं उदाहरणें सांपडतात; उत्तमें मध्यमें अधमें ( कर्में )–१६-२-४; लाहानथोरें अपारें विवरें–१६-२-११; उदंडें खंडें–१६-२-१६; असंख्यातें मतें–१६-९-१९; इत्यादि. उदंड, अखंड, असंभाव्य, नेमस्त, नेमक, गाढ, भारी, बाष्कळ, रोकडे, इत्यादि विशेषणें बऱ्याच वेळां येतात. कांहीं वेळेला विशेषणाचा उपयोग नामाप्रमाणें केला आहे; जसें, उत्तमासि उत्तम माने ( १३–१०–२१ ), श्रीमंत सांडून वराडी ( १३–१०–१७, ) सगुण जाळयांत सापडे ( १३–८–३० ), इत्यादि.

**विभक्ति—प्रथमा** विभक्तीच्या एकवचनांत ':संशयो, देवो,' इत्यादि रूपें जशीं येतात, तशीं बहुवचनी देखील तीं येतात; जसें, 'नाना **संशयो** छेदिले' ( १-१-१२ ). 'अग्नि व किंतु' या जागीं 'अग्न, किंत' अशीं रूपें आढळतात. **द्वितीया** व **चतुर्थी** यांच्या बाबतींत 'सि-स', 'तें' असे प्रत्यय दिसतात किंवा प्रत्ययाशिवाय केवळ सामान्यरूपानें कधीं कधीं काम भागते. 'ना' प्रत्यय कोठें च दिसत नाहीं. '**ला**' प्रत्यय लागून झालेलीं रूपें सर्व दासबोध मिळून ३०-४० देखील मिळणार नाहींत; हीं रूपें अगदीं बारकाईनें शोधून काढावीं तेव्हां सांपडतात. पहिल्या सात दशकांत असलीं रूपें नाहींत च. तेव्हां हा प्रत्यय 'लागीं' पासून झाला कीं कै. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें फारशी 'श' पासून झाला हा संशय उत्पन्न होऊन, कै. राजवाडे यांचें म्हणणें बरोबर असावें असें च वाटण्याकडे प्रवृत्ति होते. प्रत्यय नसल्याचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत; मग घ्यावें परमार्थ**विवेका** ( १२-१-१ ), **अनुमाना** येवों नेदी ( ११–१०–१० ), **देवां** सोडविता ( ६-७-२१ ), प्रतक्ष **प्रत्यया** येते ( १५-६-९ ), **भक्तां** सांभाळावया ( ८-२-२२ ); पुढील रूपांत 'सि-स' प्रत्यय दिसेल; जसें, हरिकथे**सि** सादर ( १४-५-३९ ), कोणा**स** ठाउकें होईना ( १७-१-११ ), तया**सी** माझा नमस्कार ( १७-१-११ ), जैशा**स** तैसा ( २-१०-१४ ); कांहीं रूपांत मुळीं च फरक होत नाहीं; जसें, तैसेचि दे **समाधान** (२-१०-१५), महंतं महंतें करावें ( ११-१०-२४ ), तो हा नरदेह **भेटी** । करी भगवंतीं ॥ ( ३-१०-२५ ); **तें** प्रत्ययाचीं रूपें फार थोडी येतात. 'संकल्प सिद्धी**तें** पावती ( ८-१०-३३ )

**ला** प्रत्ययांचीं उदाहरणें पुढील आहेत; पाहिजे तो **ज्याला त्याला** ( १९-४-१० ), चटक लागली **लोकाला** ( १५-२-१९ ), नाना मार्ग सांडून **त्याला** ( १५-२-१९ ), **ज्याला त्याला** । भेटी घाली ( १५-१-३४ ) मग

देहा**ला** उठवतो ( १३–९–१६ ), कर्ता म्हणती **तयाला** ( १३–८–२२ ), मग काय उणे तया**ला** ( १३-७-२७ ); 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ८ वा,' यामध्यें दिलेल्या पत्रांत, ( पान २४ ) प्रथमतः 'ला' दिसून येतो. त्यापूर्वीच्या पत्रांत तो नाहीं. 'कोण्ही तंबाकू**ला** आगी घेतील'; 'हालीं उनाळ्या**ला** आहे तइसें खलक पागेचे आहेत'; इत्यादि. तेव्हां 'ला' प्रत्ययाची चिकित्सा नीट करणें जरूर आहे, पण त्याचें हें स्थळ नसल्यानें, ही बाब सध्यां बाजूला ठेवूं. **तृतीयेच्या** दृष्टीनें पुढील बाबी ध्यानांत ठेवाव्या; 'मठाचेनि गुणें ( ७-५-९ ), मठाच्या गुणानें; सूर्याचेनि उजियेडें ( सूर्याच्या उजेडानें, ७-५-२९ ); हीं उदाहरणें यादवकालासारखीं च आहेत. यांमध्यें 'मठाचा, सूर्याचा' या षष्ठ्यन्त विशेषणाची तृतीया विशेष्याप्रमाणें केली आहे. 'मठाचेनि, सूर्याचेनि' यांतील शेवटील 'इ'चा पुढें लोप होतो. इतुकेन ( ७-५-४४ ); जयाचेन ( ६-१-१ ); इत्यादि. नंतर 'जयाचेन-जयाचे-ज्याचे-ज्याच्या' अशा पायरीनें बदल होऊन पुढीलप्रमाणें उदाहरणें दिसतात; जसें, कल्पने**च्या** नावें ( ७-७-५८ ); 'दुजया**नें** ( ७-९-४ ), दारु**नें** शोभति ( १६–५–१५ ) अशीं रूपें यादवकालांत मुळींच नाहीं. बहामनीकालांत अशीं रूपें दिसतात. रामदासकालांत तीं विस्तृत प्रमाणांत सांपडतात. **निबुधीं** वंदिजे ( १६-१-११ ), कुबु**धी**, सुबु**धी** विवरणें (१६-८-२०)' अशीं रूपेंहि ज्ञानेश्वरकालीनच आहेत. '**श्रोतां** व्हावें' ( २-३-१ ) असें 'आ' कारान्त रूप रामदासकालांतच विरळाच सांपडेल. 'स्तंभेंविण ( ८-१-२८ ), पाहिल्याविण (८-४-४३), वायोविण (८-३-५९ ) इत्यादि रूपांवरून, 'विण' याच्यापूर्वी तृतीयेचें रूप यादवकालाप्रमाणें नियमानें येतेंच असें नाहीं. **पंचमीच्या** रूपामध्यें विशेष बदल नाहीं. 'चंद्रा**पासौनि** निववितें (चंद्राहूनहि निवविणारें, ज्ञाते. ९-२४)' यांतील 'पासौनि' म्हणजे 'पेक्षां' हा यादवकालीन अर्थ, रामदासकालांत मुळींच आढळत नाहीं. भजना**परतें** (७-१०-४३), **सृष्टिहुनि**, **पासि**, **पासाव**' (८-१-३४), अशीं उदाहरणें पंचमीचीं आढळतात. **षष्ठी** विभक्तींत 'भवनदी**चा** प्रवाहीं' (७-८-१६) अशीं उदाहरणें रामदासकाळांत क्वचितच सांपडतात. 'भवनदीचा' याच्या जागीं 'भवनदीचे, भवनदीचेया, भवनदीचिया, भवनदीच्या, अशीं रूपें तेथें दिसतील. 'मायेच्या माथां' (८-२-२१); पिशाच्या हातीं (८-६-४०); देहाभिमानाचे अंतीं (८-६-४८) अज्ञानाच्या उर्मी (८-१०-४४), बहुतां जन्माचे अंतीं (८-७-१८), सृष्टींचा ठाईं (८-९-५९), पूजेचा अंगीं (८-७-२२), इत्यादि. **सप्तमीच्या** उदाहरणांत विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. समान्यरूपाच्या दृष्टीनें पुढील उदाहरणें पाहावी; '**येक्या** पंथें ( ७-९-४ ), **कितां** दिवसां ( ८-६-२ ), **पुढिलें** समासीं (८-४-५५),

बहुताचे अंतरीं ( १४-६-३२ ), ज्याला त्याला ( १९-४-१० ), लटिक्याची भीड ( १४-९-२९ ), भिकाऱ्या सारिखा ( १५-२-२१ ), इत्यादि.

**क्रियापदें:** जाणिजे, पाविजे, बोलिजे, इत्यादि रूपें रामदासकालांतहि आढळतात; पण त्याची पीठिका हळुहळु विसरल्यासारखी दिसते. 'चौदा ब्रह्में **बोलिजेति**' ( ७-२-५५), तें तें ब्रह्माचि चोखडे। **बोलिजेत** आहे ( ७-३-१३ ); **बोलिजेल** ( ७-३-१४ ); तयास अंश **बोलिजेतो** ( ७-४-१८ ); इत्यादि उदाहरणांत 'बोलिजे' या भागाला 'निर्जीवपणा' आला आहे. यादवकालाप्रमाणें त्यांत फरक होत नाहीं. दुरावलें, स्थिरावेना, नेणे, प्रबळे, घडे, पडे, मोडे, लागे, इत्यादि रूपांत नवीनपणा कांहींच नाहीं. तेव्हां कांहीं विशेष गोष्टीकडे आपण लक्ष देऊं या.

( अ ) **पाहिजे**—दासबोधांतील 'पाहिजे' शब्दाचा उपयोग ध्यानांत घेण्याजोगा आहे. 'द्वैताच्या भेणें अंतरीं। वस्तु न **पाहिजे** तरी। तेणें समाधाना उरी। असेचिना॥ ( ७-७-१४ ), या उदाहरणावरून 'पाह' धातूचें हें कर्मणि रूप आहे हें स्पष्ट आहे. 'तें आठवितां **विसरिजे**। कां तें विसरोनि **आठविजे**। जाणोनियां **नेणिजे**। परब्रह्म तें॥' ( ७-७-१९ ) या ओवींतील रूपांप्रमाणें 'पाहिजे' म्हणजे 'पाहावें' या अर्थी हें रूप आहे. अशीं रूपें यादवकालांत विपुल असून त्याचा अर्थ वर्तमानकालीन 'पाहिजे' प्रमाणें मुळींच नाहीं, एवढेंच नव्हे तर, वर्तमानकालीन अर्थाप्रमाणें 'पाहिजे' रूप दिसल्यास, तो ग्रंथ यादवकालीन असूं शकत नाहीं इतकें निश्चित विधान करण्यासारखें आहे. 'येक म्हणति आगम **पाहावा**। वेताळ प्रसन्न करून **घ्यावा**। तेणें पाविजे देवा। स्वर्गलोकीं॥' ( ८-१०-१० ), येथें 'पाहिजे' 'घेइजे' अशीं च रूपें आलीं असतीं. याकारणें सद्गुरु **पाहिजे**। तरीच सन्मार्ग **लाहिजे** ( ५-३-१७ ) यामध्यें हि 'पाह' धातूचेंच रूप दिसतें. 'पाह' धातूचीं रूपें या च अर्थानें पुढील वाक्यांत योजिलीं आहेत. शोधून **पाहा** ( १६-२-११ ), **पाहतां** उदकाचा विवेक ( १६-४-२३ ), विवरोन **पाहातां** येते ( १६-७-८ ), शोधून **पाहावी** ( ८-४-८ ), शोधून **पाहिल्याविण** (८-४-४३), याची **पाहावीं** वोळखण (८-४-४३), मोडों **पाहातो** उपाय (८-३-१५) इत्यादि उदाहरणांत 'पाहाणें' या धातूच्या मूळ अर्थानें च योजना केली आहे. आतां या पुढची पायरी म्हणजे लक्षणेनें अर्थ घेणें; उदाहरणार्थ पुढील वाक्यें पाहा; 'चातुर्य **पाहे** शाहणा। आदरेंसीं॥ ( ७-९-४७ ), भक्त **पाहे** मूर्तिध्यान ( ७-९-४८ ), नाडिज्ञानी मायाज्ञान। **पाहातुसे** ॥ ( ७-९-४९ ), या दृष्टीनें सातव्या दशकांतील नवम समासांत येणाऱ्या २७ ते ५५ ओव्या मनन करण्यासारख्या आहेत. आत्मज्ञानी येकचित्त। तेणें **पाहाणें** अद्वैत॥ ( ७-९-२७ ) 'अद्वैत **पाहावें**' असा स्पष्ट अर्थ आहे; 'बहुत प्रकारें **पाहातां** ( ७-९-२८ ), येथें धातूचा अर्थ तो च आहे.

यानंतर ही च कल्पना निरनिराळ्या शब्दानें कशी मांडली आहे तें पाहाणें मौजेचें आहे. पुढें ३९–४० ओव्या पहा. ' नाना फळें पक्षी खाती । तेणेंचि तया होये तृप्ति । परी त्या चकोराचे **चित्तीं** । **अमृत वसे** ॥ तैसे संसारी मनुष्य । **पाहे** संसाराची वास । परी ते भगवंताचे अंश । भगवंताचि **इछिती** ॥ या ठिकाणीं 'आदरानें पाहणें, मनांत इच्छा वाटणें, चित्तीं वसणें, **आवडणें** असा अर्थ हळुहळु विकसित झाला. यानंतरच्या ओव्यांत 'पाहिजे' म्हणजे 'आवडले जाते' असा अर्थ दिसतो. 'संसारी मनुष्य पाहे' याचें रूपांतर 'संसारी मनुष्यास पाहिजे' असें झालें.

ज्ञानियास **पाहिजे** ज्ञान । भजकास पाहिजे भजन ।
साधकास **पाहिजे** साधन । इछेसारिखें ॥ ७–९–४१
कवीस **पाहिजे** प्रबंद । तार्किकास तर्कवाद ।
भाविकास संवाद । **गोड वाटे** ॥ ७–९–४४.
पंडितांस पाहिजे वित्पत्ती । विद्वांसास अधेनप्रीती (अध्ययनप्रीती)।
कळावंतां **आवडती** । नाना कळा ॥ ७–९–४५.
चातुर्य **पाहे** शाहाणा । आदरेंसीं ॥ ७–९–४७;
कामिक **पाहे** कोकशास्त्र । चेटकी **पाहे** चेटकमंत्र ॥ ७–९–५०
टवाळां **आवडे** विनोद । उन्मत्तास नाना छंद ।
तामसास अप्रमाद । **गोड वाटे** ॥ ७–९–५१.
येक **पाहाती** नाना धर्म । इछेसारिखे ॥ ७–९–५४.

ज्या ठिकाणीं आपल्याला पाहिजे ती वस्तू मिळत नाहीं, तेथें बरें वाटत नाहीं, म्हणून नकारात्मक वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे, ते अर्थाच्या विकासाच्या दृष्टीनें महत्वाचें आहे.

ऐसें सांगावें ते किती । **आवडीसारिखें** ऐकती ।
नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ७–९–५६
परी परत्र साधनेंवीण । म्हणों नये तें श्रवण ।
जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नात्र कर्मणा (कालक्रमण) ॥ ७-९-५७
गोडीविण गोडपण । नाकेंविण सुलक्षण ।
ज्ञानेंविण निरूपण । बोलोंचि नये ॥ ७-९-५८

वरील ओव्यांतील विधानाच्या उलटपक्षीं असें म्हणतां येईल कीं, 'निरूपणासाठीं ज्ञान **पाहिजे**'; 'सुलक्षणास नाक **पाहिजे**'; 'परत्र साधन 'श्रवण' हा शब्द लावण्यास तें साधन मोक्ष देणारें **पाहिजे**'.

यानंतरची पुढील पायरी म्हणजे '**पाहिजे**' याचा अर्थ 'होआवा', 'असावा,' 'गरज आहे, जरूर आहे, अवश्य लागते,' अशा अर्थी होतो. उदाहरणार्थ

वेवसाई जो मळीण । त्यासि न कळे निरूपण ।
येथें **पाहिजे** सावधपण । अतिशयेंसीं ॥ ७-१-५०.
स्वानुभवाचिये खुणे । स्वानुभवी **पाहिजे** ॥ ७-१-४६
मुमुक्षु चातकीं सुस्वर । करुणा **पाहिजे** अंबर ॥ ७-१-१४

सर्वमान्य पाहिजे विचार ( १९-४-३० ), समुदाव **पाहिजे** मोठा (१९-९-२२), **पाहिजे** तो ज्याला त्याला ( १९-४-१० ), जो सकळ जनासि **व्हावा** ( १९-४-५ ), वरील ओळींत 'पाहिजे' याचा 'होआवा' असा अर्थ होतो, व त्यावरून, गरज, जरूर, आवश्यकता आहे, असा अर्थ विकसित होतो. उलटपक्षीं नकारात्मक दृष्टीनें 'नलगे' 'अवश्यक' नाहीं. असे शब्द येतील; उदाहरणार्थः—

आकाशीं आकाश मिसळलें । हें तों **न लगे** किं **बोलिलें** ॥ ८-४-२०
तेजीं तेज स्वतःसिद्ध । हें **सांगणेंचि न लगे** ॥ ८-४-२९
जो भगवंतीं रमला । आणिक कांहीं **न लगे** त्याला ॥१४-३-३१
या या या या **म्हणावें न लगे** । १४-४-१०
कांहींच **नलगे** । सुबुद्धासि ॥ १४-४-११
पापपुण्य **अवश्यक** । भोगणें **लागे** ॥ ८-७-७
प्रज्ञावंता । वेळ **नलगे** ॥ ८-६-४५
म्हणौनि **घडलें सांगणें** ॥ ८-५-१
आकाश **नलगे** सांगावें । ८-४-३३; आत्मयासी प्रगटणें घडे । १८-४-७
जें जें **जया करणें पडे** । तें तें तो हें कैसें घडे ॥ ८-१-३८
दुसऱ्यास कष्टवितां **कष्टावें** । **लागेल** स्वयें ॥ १४-६-२३
उगेंचि कल्पितां **सिणावें** । **लागेल** पुढें ॥ १४-६-२१

मृत्तिका **एकवटणें लागे** । ७-३-२; थोर लोकासि **क्षमा शांति । अगत्य करणें** ( १८-१०-३७ ) वरील ओव्यांवरून अर्थ पाहूं लागलें म्हणजे, 'करावयास पाहिजे, केलें पाहिजे, करावें लागेल, नको पाहिजे, पाहिजेच पाहिजे' या अर्थांचा विकास कसा होत गेला तें लक्षांत येईल. पुढील उदाहरणांकडे या दृष्टीनें पाहावें:—

सविस्तर । **बोलिलें पाहिजे** ॥ ८-२-२४

विवेक । **केला पाहिजे** ॥ ८-४-७

वों भवती या पक्षा । **रक्षिलें पाहिजे** ॥ १४-२-१

साक्षत्वें आत्मयास । **पाहिलें पाहिजे** तैसें ॥ १४-८-१९

जगदीश । **पाहिला** पाहिजे ॥ १९-४-२०

शेवटल्या दोन उदाहरणांवरून 'पाहिजे' याची मूळपीठिका कशी पूर्णपणें विसरली गेली हें पाहाण्याजोगें आहे.

विचक्षणे नीऊत ( न्यून ) पूर्ण । क्षमा **केलें पाहिजे** ॥ २-१०-३९ १६-५-३०. या ठिकाणीं 'क्षमा करणें' हें नपुंसकलिंगी धरून, '**केलें** पाहिजे' असें क्रियापद योजिलें आहे.

पांचा विषयाचा नैव्यद्य । **जेव्हां पाहिजे तेव्हां** सिद्ध ॥ १७-१-९

वरील ओवींतील 'पाहिजे तेव्हां' याचा अर्थ 'हवे तेव्हां, वाटेल तेव्हां' असा आहे. वरील प्रमाणें 'पाहिजे' या रूपाची पीठिका व अर्थविकास पाहातां, दास-बोधांतील एका महत्वाच्या ओवीचा अर्थ निश्चित करून हें प्रकरण आटोपतें घेऊं.

सामर्थ्य आहे चळवळेचें । जो जो करील तयाचें ।

परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ २०-४-२६

या ओवींत 'पाहिजे' याचा अर्थ कोणता ? त्या दृष्टीनें मागील व पुढील ओव्या लक्षांत घेणें जरूर आहे.

**विचार नेहटूनसा** पाहे । तरी उपासना आपणचि आहे ।

येक जाये येक राहे । देह धरुनी ॥ २०-४-२३

अखंड ऐसी घालमेली । पूर्वापार होत गेली ।

आतां हि तैसी च चालिली । उत्पत्ति स्थिती ॥ २४

बनावरीं बनचरांची सत्ता । जळावरी जळचरांची सत्ता ।
भूमंडळीं भूपाळां समस्तां । येणेंचि न्यायें ॥ २६

**कर्ता जगदीश हें खरें** । परी विभाग आला पृथकाकारें ।
तेथें अहंतेचें काविरें । बाधिजेना ॥ २७ ॥

**हरिर्दाता हरिभोक्ता** । ऐसें चालतें तत्वता ।
ये गोष्टीचा आतां । **विचार पाहावा** ॥ २८

सकळ कर्ता परमेश्वरु । आपला माइक विचारु ।
जैसें कळेल तैसें करूं । जगदांतरें ॥ २९

देवायेवढें चपळ नाहीं । ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं ।
**पाइरीनें पाइरी चढोन पाही** । मूळपरियंत ॥ ३०

वरील ओव्यांचा विचार केल्यास असें दिसतें कीं, परमेश्वराची सत्ता सर्वत्र आहे, ती फक्त नीट दिसत नाहीं, नीट विचार करावा, म्हणजे पायरीपायरीनें दिसून येईल कीं सर्वांहून व्यापकसत्ता परमेश्वराची आहे. या विचाराच्या साखळीमधील दुवा म्हणजेच 'सामर्थ्य आहे चळवळेचें' ही ओवी आहे. म्हणून 'अधिष्ठान पाहिजे' म्हणजे 'अधिष्ठान असावें' 'अधिष्ठानाची जरूरी आहे' असा अर्थ न करितां 'अधिष्ठान **पाहावें**' असाच अर्थ केला पाहिजे. याच दशकांतील नवव्या समासांतील परमेश्वरी सत्तेचें सामर्थ्य दाखविणाऱ्या ओव्या वाचल्या म्हणजे वरील अर्थाविषयीं शंका वाटत नाहीं. ( ओव्या २० ते ३० ).

येकांत स्थळीं समजोन **पाहीं** । म्हणिजे बरें ॥ २०-९-२०
देहे सामर्थ्यानुसार । सकळ करी जगदेश्वर ।
थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेति ॥ २०-९-२१

(आ) **नये**—'पाहिजे' या शब्दाप्रमाणें 'नये' या शब्दाची पूर्वपीठिका दासबोधांत हळुहळु लोपून गेली आहे. 'पैज होड **घालूं नये** । कांहीं केल्या ॥' ( २-५-१५ ) यांतील 'घालूं नये' म्हणजे **घालूं नको**' 'घालतां **कामा नये**' असा अर्थ आहे. यादवकालांत हा अर्थ नाहीं. त्याचे अवशेष दासबोधाच्या पुढील ओवींत दिसतात. उदाहरणार्थः—

नेणें आणि नायके । **न ये** ( येत नाहीं ) आणि न सीके ॥ २-३-११.

सगट भजन **करूं येतें** । तरी मूर्खपण आंगीं लागते ॥ १८-४-३७.

असो भागवत निरूपण । शुक बोलिला आपण ।

तया आंगीं बद्धपण । **लाऊं न ये** कीं ॥

(लावतां येत नाहीं, लावणें अनुचित) ७-६-४३

तथापि **कल्पूं जातां** । **न ये** कल्पनेच्या हातां । ७-७-२

श्रवणें मीपण जाये । श्रवणें धोका **न ये** ॥ ७-८-७

इतर देवांची स्तुति । **कामा न ये** सर्वथा (उपयोगी पडत नाहीं) ७-९-१३

जे ग्रंथीं बोलिलें अद्वैत । तो **म्हणों न ये** प्राकृत ॥ ७-१०-४६

तें प्राकृत **म्हणों न ये** (म्हणणें इष्ट नाहीं) ।

जेथें ज्ञानाचे उपाये ॥ ७-१०-४७

देह अंतीं नासोन जाये । त्यास आत्मा **म्हणो न ये** । ८-७-३७

तोडावया स्वप्नबंधन । नलगे आणीक साधन ।

तयास प्रेत्न जागृतीवीण । **बोलोंचि नये** ॥ (बोलतां येत नाहीं) ८-७-६३.

यादवकालीन ज्ञानेश्वरींत हा अर्थ सर्व ठिकाणीं सांपडतो ; जसें:—

केवि उराउरि मज । **पुसों येईल** ॥ अ. ११–ओ. ३६

सूडांहूनि बिं काढिलें । मग निरोलिलियें भुइं पाखिरिलें ।

तरी तें सांडीविखुरी गेलें । **म्हणों ये** काइ ॥ (म्हणतां येईल काय?) ९-३९

म्हणौनि गुज तऱ्ही तुझां ठाइं । **लपों नै ए** (लपवितां येणार नाहीं) ९-४१

पुडुतीं पुडुतीं पुटे । भांगारा देतां ऊटे ।

तरि तें ओखटें । **म्हणों नै ए** कीं (म्हणतां येत नाहीं) । १०-५९

पण हा अर्थ पुढें पुढें लुप्त होत होत, केवळ आज्ञार्थी नकारात्मक एखादें वाक्य सांगावयाचें असल्यास ' नये ' असा एक शब्द बनला व कदाचित दोन्ही अर्थ स्पष्ट होण्यासाठीं पुढील प्रकारची रचना विशेष दासबोधांत उपयोजिली असावी. जसें,

रूपलावण्य **अभ्यासितां न ये**। सहजगुणास न चले उपाये। १४-६-१

वायो सत्य **म्हणों जातां** । परी तो **न ये** दाखवितां ॥ ८-३-३२

हें उघड **बोलतां न ये** । (बोलतां येत नाहीं) ॥ ८-३-१५

(इ) **नको, नलगे** :— 'नये' च्या बाबतींत जो अनुभव आला, त्याच्या आधारें 'नलगे-नग-नगु-नकु-नको' अशा पायरीनें 'नको' शब्दाची पूर्वपीठिका संभवनीय आहे काय असा विचार येतो. निदान ही उपपत्ति चिन्तनीय आहे असें वाटतें.

(१८) रामदासकालीन व्याकरणाचा आतांपर्यंत जो स्थूलतः विचार केला, त्यांत व्याकरणाच्या ऐतिहासिक पद्धतीच्या विचारानें कांहीं बाबी महत्त्वाच्या वाटल्या त्या वाचकांना सादर केल्या आहेत. त्यामुळें दासबोधाच्या अर्थाच्या बाबतींत कांहीं अडचणी दूर होऊन, कांहीं शब्दाचें अंतरंग अधिक स्पष्ट दिसेल अशी आशा करून गंधहीन पण भावयुक्त अशीं हीं फुलें श्रीसमर्थ=चरणीं अर्पण करतों.

---

# समर्थांचें शब्दसामर्थ्य

[ लेखक — प्रो. शंकर केशव कानेटकर, एम्. ए., सांगली ]

काव्यामधें अर्थाला प्राधान्य व वाणीला गौणता देण्यांत आली असली, तरी साहित्यशास्त्राकारांनीं वाणीचें म्हणजे भाषेचें महत्व कमी वा उपेक्षणीय लेखलेलें नाहीं. वाक् व अर्थ यांची उत्कृष्ट प्रतिपत्ति झाली, तरच रसनिष्पत्ति होते, हा कविकुलगुरूप्रमाणें शास्त्रकारांचाहि सिद्धांत आहे, आणि म्हणूनच, त्यांनीं शब्द-शक्तींचें विवेचन करतांना, त्या 'अभिधा, लक्षणा, व्यंजना,' अशा तीन मानल्या; पुन्हा त्यांचे भेदोपभेद कल्पिले, त्यांच्यामुळें रसनिष्पत्तीला कसकशी मदत होते व त्याच्या अभावीं काव्य कसें हिणकस वाटतें, याचे नियम ठरविले; इतकेंच नव्हे, तर शब्दाच्या ठिकाणीं असणाऱ्या गुणांची संख्याहि दहापासून बहात्तरपर्यंत कल्पून, त्यांच्या बारीक बारीक छटांचे वैशिष्ट्य काय हें सांगितलें. कालिदासानें तर अशा वाणीचा गौरव करण्यासाठींच, तिला साक्षात् पार्वतीची उपमा देऊन, तिला अर्थ-परमेश्वराच्या निकट नेऊन का बसविलें याची यावरून कल्पना येईल. समर्थांना आपलें वाङ्मय निर्मितांना या सर्व गोष्टींची जाणीव असली पाहिजे, हें त्यांनीं कवींना 'शब्दसृष्टीचे ईश्वर', 'शब्दांचे रत्नाकर', 'बोलके चिंतामणि' अशा सुघड शब्दांनीं आळवून गौरविलें आहे, हें पाहिलें, म्हणजे दिसून येतें. कारण 'आधीं केलें मग सांगितलें' या वृत्तीनें चालणाऱ्या किंवा 'समजले आणि वर्तले' या 'भाग्यपुरुषाच्या' पदवीला पोंचलेल्या समर्थांनीं, शब्दब्रह्माचें हें स्वरूप किंवा शब्दांचीं हीं सामर्थ्यें ओळखलींच असलीं पाहिजेत. आणि म्हणूनच कवींना त्यांनीं 'सामर्थ्यवंतांची सत्ता' ही पदवी बहाल केली. दुसऱ्यांना ही पदवी बहाल करणाऱ्या समर्थांचा देखील, 'शब्दसृष्टी' निर्माण करण्याच्या बाबतींत, फार श्रेष्ठ अधिकार होता.

शब्दसृष्टि निर्माण करतांना समर्थांच्या मनाच्या पाठीशीं त्यांच्या प्रदीर्घ पर्यटनांतील अद्भुत अनुभव, पठणचिंतनांनीं कमावलेली गाढी विद्वत्ता व आपुलकींतून निर्माण झालेली उत्कट तळमळ हीं नेहमीं उभीं असत. त्यामुळें त्यांना जें जें सांगावेंसें वाटलें, तें तें सांगतांना, त्यांच्या वाणींत अनेक शक्ति गर्भित असल्याचें प्रत्ययास आलें. त्यांचें अंतःकरण, हें आदिशक्तीचें ठेवणें होतें; त्यामुळें तें अक्षय आनंदानें व तीव्र तळमळीनें वेळोवेळीं उतटलें आणि त्यांतूनच त्यांच्या शब्दशक्ति प्रकट झाल्या. अंतःकरण भावरसानें उचंबळलें, म्हणजे तेथें शब्दांचा

जन्म आपोआप होतो. कवीला शब्दासाठीं थांबावें लागत नाहीं. समर्थांचे भाव असेच वेळोवेळीं अनेक कारणांनीं उत्कटले व त्यांची अभिव्यक्ति भावपूर्ण, अन्वर्थक नि सामर्थ्यसंपन्न शब्दांनीं झाली.

या सामर्थ्यसंपन्नतेच्या बुडाशीं ओजस्विता व उत्कटता हे गुण आहेत, हा त्यांचा विशेष पाहण्यासारखा आहे. जें सांगावयाचें असेल, तें त्यांनीं अत्यंत कळकळीनें व ठसठशीतपणानें सांगितलें आहे. कवीच्या भावगर्भाचा गौरवानें उल्लेख करतांना, त्यांनीं त्याला 'कीं हा श्रुतींचा भावगर्भ' असें म्हटलें आहे; ब्रह्माचें वर्णन करतांना 'वळे विवेकाची वेंगडी। पडे शब्दाची बोबडी' अशी भाषा योजली आहे. एका ठिकाणीं दृष्टांत देतांना 'फळतीं झाडें करपतीं' असें तीव्रतेनें म्हटलें आहे, तर दुसऱ्या ठिकाणीं लोभाचें स्वरूप दाखवितांना 'जिव्हा ळळळीं वेळोवेळा' असें ध्वन्यनुकारी शब्दांनीं सांगितलें आहे. याचप्रमाणें, प्रीतीचें लक्षण सांगतांना, 'प्रीतीचें लक्षण ऐसें। अंतरीं उठे अनायासें। पाणी पाणवाटे जैसें। आपणचि धावे' असा सहज, काव्यमय नि समर्पक उल्लेख केला आहे. 'संपदेविण जो धिवंसा। तो निरर्थक' हा त्यांचा व्यवहारधर्म सांगणारा अर्थांतरन्यास हि जितका काव्यमय, तितकाच भावनोत्कट आहे. या खेरीज 'जन्म कर्माची आटणी' ही सुलभ व्याख्या, किंवा ब्रह्मलाभाचें वर्णन करतांना 'तत्वनिरसनें आपणांस। आपण लाभे' हें अत्यंत सोप्या शब्दांत केलेलें वर्णन, किंवा "हुंकार, लवथवती, जाजावला, झळंबलें, सांडी केली, गाळ्याळ, यावा होता, कुसमुस, पोटआग, कुटुंबकाबाडी, मिटकली, धादावली, शंखतीर्थ घेणें, मंत्र-कौटाळे, झिझांडिलें, झुगाडिलें, खिरडून सांडिला, सिंतरिलें, संशयें गुंडाळला, निर्बुजलेपणें, डहुळ, वळसा उठे, जळानें विरी सांडिली, तरी साहित्य न पडे, तळीं डबाबितीं, उन्मेषवृत्ति" या सारखे ओजस्वी शब्द पाहिलें म्हणजे, समर्थांच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास, 'फोडुनी शब्दाचें अंतर। वस्तु दाखवी निजसार' असें च समर्थांनीं केलें आहे, असें वाटतें. या सर्व शब्दप्रयोगांत त्यांच्या भावनेची उत्कटता व वाणीचें तेज सांठून राहिलें आहे अशी खात्री पटते.

सुंदर दृष्टांत देणें व सादर्यपूर्ण शब्द वापरणें या कामांत समथाचा हातखंडा आहे.

मानिला प्रपंचीं आनंद। केला परमार्थीं विनोद।
भ्रांत मूढ मतिमंद। लोधला कामीं॥

सूकर पूजिलें विलेपनें। म्हैसा मर्दिला चंदनें।
तैसा विषयी ब्रह्मज्ञानें। विवेकें बोधिला॥

रासभ उकिरडा लोळे। तयास परिमळ सोहळे।
उलूक अंधारीं पळे। तया केवि हंसपंगति ॥ (दशक ९, समास ३)

यांतील दृष्टांतांतील अचुकपणा, विनोदगर्भता व शब्दशक्ति हीं बघण्यासारखीं आहेत. याचप्रमाणें कोंवसा, सुघड, (नाना मतांचें) देखणें, ज्ञातेपणें, जाणपणें, (भ्रांतीचें) पडळ, घरभंग, घरवात, अमृतकळा, चंद्री लागणें, उभड आला, लोंबे मास चिरगुटासारखें, गालोरे, मंत्रचळ, पडशाळा, हुंबरे, कणव, गोंडाळ, न्याहार या शब्दांतील अर्थसौंदर्य व शब्दसौंदर्य मनाला मोहनी घालणारें आहे. विशेषतः सुघड म्हणजे चतुर (सुघड संगीत गुणग्राही), घरवात म्हणजे संसार ('पुन्हां घरवात मांडिली') अमृतकळा म्हणजे गालफडे (एकाच्या बैसल्या अमृतकळां) उभड आला म्हणजे गहिवर आला ('तेणें बहुत दुःखी झाला। देखोनिया उभड आला') किंवा §पडशाळा म्हणजे घटकाभर पडण्याची जागा ('देवद्वारीं पडशाळा) या शब्दांचे उपयोग किती समर्पकपणें व सौंदर्यदृष्टीनें केले आहेत, तें पाहिलें म्हणजे शब्द वापरणाऱ्या कुशल दृष्टीची कल्पना येते. समर्थांचे शब्द कधीं अर्थासाठीं तर कधीं अर्थांतून निर्माण झालेले असतात; त्यामुळें धरणीकंपातून बाहेर फेकल्या गेलेल्या आगदगडासारखे ते भावनेने तापलेले असतात. पण त्याबरोबर च, जे वेचून नीट घडवून योग्य ठिकाणीं बसविलेले असतात, ते ताजमहालसाठीं निवडून घडवून, बसविलेल्या शब्दाप्रमाणें सुबक असतात. समर्थांच्या भाषेंत असलेलें हें शब्दांचें जोडमिश्रण दर्शनीय आहे. त्यांचे आवडते शब्द तर आपल्यापुढें व्यक्तिमत्व च उभें करतात. त्यांचा वावर समर्थवाङ्मयांत सर्वत्र सढळपणानें झालेला आढळतो. कांहीं व्यक्तींच्या बोलण्यांत जशा लकबी असतात, तसा च समर्थांच्या वाङ्मयांत हि प्रकार आहे. हे शब्द अन्वर्थकपणें तर वापरलेले आहेत च; पण त्यांचे जागीं दुसरे शब्द घातले व ते किती हि योग्य असले तरी त्यांतील समर्थपण लगे च निघून गेल्यासारखें वाटेल, अशी त्यांत जादू आहे. निश्चयो, साक्षेप, उदंड, अनंत, सांडणे, खंडणें, नासणें, विवंचना, करंटा, अरत्रपरत्र, भूमंडळ, पवाडे, नेटका, अवचट यासारखे शब्द, समर्थांची बुद्धि कोणकोणत्या उदंड कल्पनांतून वावरली, तिनें किती साक्षेप केले, किती भूमंडळें पालथीं घातलीं, लोकांना अरत्रीं नेटका संसार करावयास कसें शिकविलें वा स्वतां परत्रीं जाण्याची विवंचना कशी केली नि चांगल्याचे पवाडे गाऊन, करंट्याचा अधिक्षेप कसा केला, याचें चित्र डोळ्यांपुढें उभें करतात. समर्थांचे हे आवडते शब्द समर्थभक्ताला गुरूची ओळख कोठें हि पटवितील.

समर्थांनीं आपल्या ज्ञानाची भूमिका संस्कृत वाङ्मयावरून तयार केली; पण ज्ञानेश्वराप्रमाणेंच, त्यांनीं आपल्या कल्पना मांडतांना किंवा आपले मनोगत सांगतांना

§ पडशाळा हा शब्द स्टेशनमधील 'वेटिंगरूम'ला वापरण्यासारखा आहे.

मराठीचा उदंड साक्षेप केला. मराठीचा केलेला हा प्रपंच एकाद्या नेटक्या संसाराप्रमाणें सर्वांगसुंदर नि वैभवशाली आहे. अशा संसारांत वावरणाऱ्या अभिजात वृत्तीच्या पृथगात्म व्यक्तीचे नवीन पिढीवर नेहमींच चांगले संस्कार होत असतात. समर्थांची शब्दसृष्टी हेंच काम करते. शब्द घडवितांना किंवा निर्माण करतांना ज्ञानेश्वराप्रमाणेंच तिनें त्यांचे शुद्ध मराठीपण किंवा मराठी वळण कायम ठेवलें आहे. या शब्दसृष्टींतून विहार करणें आनंदाचें तर वाटतेंच. पण भाग्याचें देखील वाटतें. साभिप्राय विशेषणें योजतांना, ते किती अचूक व परिणामकारी शब्दयोजना करतात हें ' अंतीं **विषम** वेळ आली', '**नाथिलीच** लागे देहअहंता ', ' **निखळ** निर्गुणी आपण ', ' **दामोदरें** ( रत्नखचित ) मंदिरें ', ' कवित्व असावें **कीर्तिवाड** ' ( थोर कीर्तीचे ), ' **मौनगर्भ** अनुमाना । आणून सोडी ' हें या उदाहरणावरून समजेल. मराठी वळणाचे शब्द वा समास योजण्यांत रामदासांचा हात धरणारा कवि ज्ञानेश्वरतुकारामाखेरीज दुसरा क्वचितच सांपडेल. " जोजार, निचाड, गुरळी ( गुळणी ), निडारलें, मोहाळें, पोटाळें, निर्बुजलें, मरतवांझ, उजवण्या, गठीसोड (भामटा), वोसणें, म्हणियारे (सेवक), वोरंगले, लाक्षाजोहर, साजणें ( मैत्री ), मार्गज (पान्थस्था), गोवा, किडखाद (किड्यांनीं खाल्लेला), अव्हाट, तपिळ, फलगट, कडसणी, अवगति ( दुर्गति ), मडघा, चोजवेना, बाकस ( चिपाड ), जापाणिला, बाजीगिरी, गर्वगाणें, 'भारदोरी ( भारलेली दोरी ), गाथागोवी, फडगरे, फडप्रसंग, वैरण ( वैरणें ). टाकतोडणी, हेमनाणीं " या शब्दांतील सौंदर्य, अर्थपूर्णता व सामासिकता हीं, मराठी वळण कसें असतें, तें दाखविण्यास पुरेशीं आहेत. विशेषतः समासांतील सोपेपणा फारच अनुकरणीय नि आकर्षक आहे.

मराठी वळणाची शब्दघडण करण्याच्या प्रवृत्तीमुळें व संवयीमुळें समर्थांच्या लेखणीला संस्कृत क्रियापदांना मराठी पेहेराव चढविण्याची इच्छा झालेली दिसते. ' बुझावणें, पेखणें, घसणी ' या सारखे शब्द याचीच साक्ष देतात, ' बुझावणें ' सारखी क्रियापदें समर्थपूर्व वाङ्मयांत हि वापरलेलीं आढळतात, पण संस्कृताचें मराठीकरण करावयाचें या दृष्टीपासून ते अलिप्त खास नाहींत. याचें यापेक्षांहि समर्पक उदाहरण त्यांनीं नामापासून वा विशेषणापासून जीं क्रियापदें बनविलीं आहेत त्यांवरून दिसून येतें. नामापासून क्रियापद बनवितांना लेखक संक्षिप्तपणाची दृष्टि ठेवीत असतो. संक्षेपानें सांगण्यांत उत्कटतेचा गुण अनायासें साधला जातो. ' मंद झाला ' म्हणण्यापेक्षां ' मंदला ' म्हणण्यांत खात्रीनें अधिक परिणामकारकता आहे. समर्थांनीं हें ओळखलें होतें. पण याशिवाय, भाषेंत भर घालण्याचें तें एक मोठें साधन आहे, हें हि त्यांनीं ओळखलें होतें. त्यामुळें

नामधातु व विशेषणधातु त्यांच्या वाङ्मयांत मोकळेपणानें वावरतांना दिसतात. दगदगला (‘ ऐसा दुःखें दगदगला ’), जाईजणें ( विनाशी, जाणारें; येथें मात्र उलट झालें आहे. ), सटवली (‘ गुरुभक्ति ते सटवली.’ सटवाईची बाधा होऊन झिजूं लागली ), पैसावला (‘ संदेह पैसावला ’ पसरला ), भावावे, डहुळेना, थिरावें, चेष्टवितो, संभ्रमलें, पेंचला, बोसवणें, खळावे ( खळ=तुरटी, तुरटीचें पाणी द्यावें ) या सारखे किती तरी शब्द समर्थांचें अंतरंग आपणांस सर्व ग्रंथांत थोडक्यांत प्रतीत करतात. भाषासंवर्धनाच्या या व्यापक दृष्टीनें मराठीवर उपकार केला आहे. या प्रवृत्तीनें ज्ञानेश्वरांच्या परंपरेचें लोण पुढें ढकललें गेलें व भाषादृष्ट्या मराठीला या स्वराज्यकाळांत संपन्नतेचें वैभव प्राप्त झालें. मात्र समर्थांनीं ही व्यापक दृष्टि शब्दापुरतीच संकुचित न ठेवतां ती अर्थासाठीं हि उपयोगिली आहे. समर्थांच्या कल्पनेला कोणतेंहि लहान पुरत नाहीं. वरचेवर त्यांना ‘ गगनाहून वाड ’ ‘ ब्रह्मांड रचनेहूनि जाड ’ ‘ उदंड ’ ‘ अनंत ’ ‘ समुद्राऐसी साठवण ’ या शब्दांचे उपयोग करावे लागतात. इतकेंच काय, पण ‘ प्राणीमात्रांचें प्रकार, रोगविशेष, जादूटोणा करणारे भोंदू, आधिभौतिक ताप, सूक्ष्म शंका ’ यांची नामावळी त्यांनीं एकदा सुरू केली, म्हणजे एकाद्या भाषाशास्त्रज्ञालाच काय, पण त्या त्या विषयाच्या तज्ञाला देखील ते आपल्या माहितीनें, शब्दयोजनेनें नि परिभाषेनें स्तिमित करतील. निरनिराळ्या धंद्यांत निरनिराळ्या शास्त्रांत त्यांची त्यांची एक परिभाषा व त्यांच्या त्यांच्या उपकरणांचीं वा हत्यारांचीं कांहीं नांवें असतात. समर्थांनीं ही परिभाषा संपूर्ण आत्मसात् केलेली आहे व ज्यावेळीं ते ती वापरावयास लागतात, त्यावेळीं त्यांच्या शब्दसृष्टींत आपण बुडून जातो. निसर्गातील बनांचीं वर्णनें, धबधब्यांची शब्दचित्रें, युद्धांची धुमश्चक्री, यांमधें हे सर्व शब्दप्रयोग आपणांस पहावयास मिळतात. रामायण, ओव्या, पंचीकरणादि प्रकरणांतून या म्हणण्याचें प्रत्यंतर येतें. एक एक विषय घेऊन, त्यांतील सर्व कल्पना शब्दांच्या सामर्थ्यानें संपवून टाकण्याचें समर्थांचें सामर्थ्य कांहीं अदभुत आहे !

आपल्या समग्र ग्रंथांतून समर्थांनीं इतके शब्द वापरले आहेत, कीं ते वाचीत असतां आजची भाषा शब्दसंपदेच्या दृष्टीनें दरिद्री झाली आहे काय, अशी शंका येते. समर्थांनीं वापरलेले किती तरी शब्द आज भाषेंतून गेले आहेत. प्रत्येक भाषेंतून कांहीं एका प्रमाणांत नवीन शब्द येणें व जुने गळणें, या क्रिया चाललेल्या असतातच. पण समर्थवाङ्मयांतील शब्दसंपत्तीचें भांडार पाहिलें, म्हणजे गळतीचें प्रमाण विलक्षण वाढलेलें दिसतें; त्यामुळें अशा सुंदर शब्दांना, त्यांच्याकडून होणाऱ्या संस्कारांना, व त्यांच्या मागच्या इतिहासांना भाषा आंचवली असें वाटल्यावांचून रहात नाहीं. समर्थवाङ्मयावरून सहज ओझरती दृष्टी फिरविली,

तरी देखील “अनरहाटी, वरवाळ, वाजट, कळभंट, आळका, विषारा, काविरें, पद्महस्ती (यशस्वी), उपंढर, कुश्चळ, डाय, खंकान, सारणी, वढाणी, मनस्वी, जनस्वी, आसुदे, संदिसे, राडी, कौटाळ, ढाळ, चेडला, दुर्भर, कुडी, चित्रलेप, तांदळे, कानडे, गडदरा, आंखिला (सेवक), असाधारण (पुष्कळ), गोंडाळ (पाण्यावरील एक वनस्पती. ‘गोंडाळ सांडून नीर घेईजे’), पारिखे, अभर, उरी (भीड), सगट (समान), जसणें, गुहिरा, किरकणें, रामविनोद (बहुरूपी), हेवाड, डुरे, पाथळ, खवाडा, ताळी, पडिपाडे, करक, सामे, तगटीं, जवार (व्यापार), सुरत (तसबीर)” यांपैकीं बहुतेक शब्द भाषेंतून लोपले आहेत व ते अनुपयोगामुळें आतां केवळ कोशगत झालेले आहेत, असें दिसून येतें. असे किती तरी शब्द समर्थवाङ्मयांत अजून आहेत. भाषेची शब्दशक्ति वाढवावयाची असल्यास यापैकीं ज्या शब्दांत अजून धुगधुगी उरली असेल, त्याला उपयोगाचें पाणी पाजून, पुन्हां जिवंत करणें हें आजच्या मराठी लेखकांचें नि कवींचें कर्तव्य आहे. समर्थांची ही शब्दसमृद्धि म्हणजे गुप्त, पुरलेला एक ठेवा च आहे. मराठीच्या पुत्रपौत्रांनीं तो राबवून, आपण भाषावैभव भोगलें पाहिजे व भाषेचें वैभव वाढविलें पाहिजे. अचाट अनुभव व अफाट शब्दसंपत्ति यांच्या जोरावर समर्थांनीं सामर्थ्यशील शब्दसृष्टि निर्माण केली आहे. त्यांचीं वर्णनें रसाळ नि वैभवशाली उतरलीं आहेत याचें कारण त्यांच्याजवळ सदासिद्ध असलेली शब्दांची सरस्वती, हेंच होय. “शारदास्तवन, सद्गुरु, कवीश्वर, संपत्तिवेध, विद्यावंत गणपति, कवित्वलक्षण, निस्पृहवर्णन, वाल्मीकिस्तवन, आपस्तवन, उत्तमपुरुष, लेखनक्रिया, रामायणांतील युद्धकांड, सीतास्वयंवराच्या मंडपाचें वर्णन, रामाचें स्वरूप वर्णन, स्फुट श्लोक, मनाचे श्लोक, धांवा, करुणाष्टकें” यांतील रसोत्कट वर्णनें करतांना समर्थांना भाषेनें हात दिला आहे. महानदीला महापूर आल्यावर जसें शेतांत पाणी शिरावें, तसें भावना उतटल्यावर समर्थांचें झालें आहे; पण त्यांच्यासारखा भाषाप्रभु होता म्हणून च इतक्या प्रचंड वेगाला ती थिटी पडली नाहीं. त्यांच्या भाषेच्या ओघाचें यांच्या च शब्दांत वर्णन करावयाचें झाल्यास—

> धबाबा लोटल्या धारा। धबाबा तोये आदळे।
> गर्जतो मेघ तो सिंधु। ध्वनि कल्लोळ ऊठिला॥

असें करतां येईल. ध्वन्यनुकारी शब्दांची रेलचेल मराठींत त्यांच्या इतकी इतरत्र नाहीं. यापैकीं कित्येक शब्द प्रसंगानें उद्भवले आहेत आणि हें च त्यांच्या भाषेच्या जिवंतपणाचें लक्षण आहे. भावनेच्या उत्कटतेबरोबर भाषेची सृजनशक्ति जागी होणें,

ही तिच्या परमोत्कर्षाची खूण आहे. हा परमोत्कर्ष समर्थांनीं आपल्या भाषासामर्थ्यानें साधला आहे आणि त्यामुळें राष्ट्रीयत्वाचे अनेक सिद्धांत समर्पक व सामर्थ्यसंपन्न भाषेनें पटवितांना, त्यांची शब्दश्री सच्छास्त्रिक झाली आहे, महाबोधांत कोवळीक दुणावली आहे, चातुर्य शहाणे झालें आहे, प्रेम रुचीस आलें आहे व सौभाग्य चोखलें आहे, असें म्हणावेसें वाटतें. भाषेच्या शब्दसामर्थ्याची यापेक्षां दुसरी कोणती साक्ष पाहिजे ?

---

श्री

# श्रीसमर्थवाङ्मयाचें नव्यानें परिशीलन करण्याची आवश्यकता

( लेखक—प्रो. **प्रभाकर वासुदेव बापट**, एम्. ए., बी. टी., **ग्वाल्हेर** )

महाराष्ट्र एक तऱ्हेनें भाग्यवान् देश खरा च. ज्ञानेश्वरापासून रामदासांपर्यंत संतपंचकानें ज्या प्रकारचें जीवनोपयोगी व महत्त्वाचें साहित्य निर्माण केलें तशा प्रकारचें ' जुनें ठेवणें ' भारतवर्षांतील दुसऱ्या कोणत्या हि प्रांताच्या वाटेला तितक्या प्रमाणांत आलेलें दिसत नाहीं. असें पैतृकधन ईश्वरी कृपेनें प्राप्त झालें असतांनाहि या जुन्या ठेवण्याची जशी निगा व जपणूक महाराष्ट्रानें करावयास पाहिजे होती तशी ती न करतां त्याविषयीं एक तऱ्हेची अनास्था च प्रकट केली. विशेषतः नव्या युगाचें स्वरूप अधिकाधिक प्रवृत्तिपर होत गेल्यानें कालात्म्याच्या प्रभावानुरूप या सामान्यतः निवृत्तिपर असलेल्या संतवाङ्मयाविषयीं अनास्थेबरोबर च अवहेलनेचीच प्रवृत्ति उत्पन्न होत गेली. समर्थांचें वाङ्मय व कार्य हें या अवहेलनेपासून कांहींसें वांचलें असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. पण खोल दृष्टीनें पाहिलें तर समर्थवाङ्मय हाहि या सामान्यप्रवृत्तीस अपवाद आहे असें म्हणतां येणार नाहीं.

**समर्थांविषयींचा आधुनिकांचा खोटा भक्तिभाव**

समर्थवाङ्मयाविषयींचा आधुनिक विद्वानांचा दृष्टिकोण हा या वर्तमान युगप्रवृत्तीचा च एक परिणाम होय. समर्थांच्या वाङ्मयांत या नव्या कालप्रवृत्तीस अनुकूल असें कांहीं असावेसें भासल्यावरून त्यांनीं समर्थांस अन्य संतांपेक्षां वेगळें काढून त्यांचा जयजयकार करण्यास सुरवात केली. या त्यांनीं केलेल्या समर्थस्तुतींत समर्थांविषयींच्या खऱ्या आदरबुद्धीचा अंश किती हें धुंडाळून काढणें सुद्धां कठीण जाईल. समर्थांविषयींचा त्यांचा तथाकथित आदरभाव हा समर्थांविषयींच्या पूज्यबुद्धीपेक्षां अन्य संतांविषयींची तिरस्कारबुद्धि व्यक्त करण्याचा च एक प्रकार होता कीं काय असा संशय येण्यास हि जागा आहे. या बुद्धिमान् लोकांस खरोखर संपूर्ण समर्थ नको होते. त्यांच्यापैकीं जेवढा भाग त्यांना स्वतःस अनुकूलसा वाटे तेवढ्याचा च ते जयजयकार करीत. एक तऱ्हेनें ही समर्थांची अवहेलना च होती. फक्त व्याजस्तुतीप्रमाणें समर्थांची ही अवहेलना स्तुत्यवगुंठित होती.

**समर्थशिकवणुकीस आलेलें विकृत स्वरूप**

समर्थांच्या या आधुनिक भक्तांस प्रिय असणारा त्यांच्या वाङ्मयांतील एकदेश म्हणजे त्यांची तथाकथित प्रवृत्तिपर शिकवण होय. या समर्थोपदेशांतील एकदेशाचा समर्थांच्या संपूर्ण उपदेशाशीं कोणता व कसा समन्वय बसतो याचा हि उत्साहाच्या भरांत विचार न करतां समर्थांचा लटका जयजयकार करून महाराष्ट्रांतील इतर संतमंडळींस 'अव्यावहारिक' 'षंढ' म्हणून आरोळ्या ठोकण्यापर्यंत या चिकित्सकांची मजल आली! प्रपंचाविषयींचा समर्थांचा दृष्टिकोण घ्या. 'प्रपंच करावा नेटका' या विधानापासून सुरवात करून 'नेटक्या प्रपंचाशिवाय परमार्थ व्यर्थ होय' हाच या समर्थोक्तीचा खरा अर्थ आहे, समर्थ हे प्रपंचाच्या नेटकेपणाचे एक मोठे द्रष्टे होते असे प्रतिपादण्यापर्यंत या चिकित्सकांनीं मजल गांठली. इतकेंच नव्हे तर व्याख्यानांतून, लेखांमधून, निवडणुकींच्या प्रचारांतून "स्वतःचा व राष्ट्राचा प्रपंच नेटका करण्यास सिद्ध व्हा" असा आदेश समर्थांच्या नांवानें मतदारांस देण्यापर्यंत समर्थांच्या आधुनिक भक्तांची तयारी झाली! जणुं समर्थ हे एखाद्या आधुनिक राजकीय पक्षाच्या एखाद्या प्रांतिक शाखेचे अध्यक्ष असावेत असा भास व्हावा!! उद्यां वयाच्या पसतीसाव्या वर्षी प्रथम पत्नी निवर्तल्यावर द्वितीय परिग्रह करूं इच्छिणारा सांसारिक समर्थांच्या या वचनाचा आधार घेऊं लागल्यास नवल नाहीं! ही परिस्थिति प्राप्त होण्याचें मुख्य कारण म्हणजे नवीन युगप्रवृत्तीस साधारणपणें अनुकूल दिसणाऱ्या कांहीं समर्थ-वचनांचा अर्थ पूर्णांशानें तसा करून व तेवढ्यावरच सर्व भर देऊन, समर्थ हे इतर संतांपेक्षां वेगळे असे आधुनिक प्रवृत्तीचे महाराष्ट्रीय संत आहेत अशा तऱ्हेचा मतलबी प्रचार करण्याचें या नवप्रवृत्तीच्या अभिमानी विद्वानांनीं पत्करिलें हेंच होय. अशा प्रकारें समर्थांच्या मूळ उपदेशगाम्भ्यापासून एकादें सालपट वेगळें फाडून घेऊन, तेंच समर्थांचा उपदेश म्हणून फडकावीत रहाण्यानें समर्थ व इतर संत यांमध्यें एक प्रकारचा कृत्रिम भेदभ्रम उत्पन्न करण्याचें कार्य साधलें खरें पण समर्थवाङ्मयाची व खुद्द समर्थांची ती एक प्रकारें अवहेलनाच नव्हे तर विटंबनाच झाली असें निःपक्षपाती अभ्यासकास वाटलें तर आश्चर्य नाहीं.

**नेटका प्रपंच म्हणजे काय**

समर्थांची प्रपंचाविषयींची विचारसरणी समजून घ्यावयाची तर वरील वचनांचा समर्थांच्या मुख्य शिकवणीशीं समन्वित असाच अर्थ करणें हेंच मीमांसाशास्त्रास धरून होईल. तसें करावयाचें म्हणजे परमार्थाच्या साधकाच्या दृष्टीनें प्रपंच नेटका करणें म्हणजे परमार्थास पोषक अशा रीतीनें करणें असाच अर्थ केला पाहिजे. हा प्रपंच नेटकेपणानें कसा करावा याचें फार मधुर विवेचन

समर्थवचनांच्याच आधारें सुप्रसिद्ध समर्थाभ्यासक गुरुवर्य शंकररावजी देव यांनीं रामदास रामदासी * वर्ष १ अंक ९ मध्यें फार उत्तम रीतीनें दाखविलें आहे. इतर संतांप्रमाणेंच प्रपंच हा परमार्थाच्या मार्गांतील एक मोठा अडथळाच आहे. याचें फार उत्तम वर्णन जुन्या दासबोधांत समास अठरा व वीसमध्यें आलें आहे. प्रपंच हा परमार्थाच्या मार्गांतला एक फार मोठा अडथळा आहे एवढेंच नव्हे तर दोहोंमध्यें एक तऱ्हेचा स्वाभाविक विरोध आहे असें समर्थांनीं स्पष्ट म्हटलें आहे. समर्थ म्हणतात :

अरे जयासी परमार्थ व्हावा । तेणें प्रपंच हा त्यजावा ।
प्रपंचीं परमार्थ करावा । तो तर्केना सर्वथा ॥

प्रपंच म्हणजे उदास नागवणा । आणि परमार्थ म्हणिजे प्रपंच बुडवणा ।
**परस्परें या दोघांजणा । सर्वथा न पडे ॥**

असल्या या अगदीं स्पष्ट उल्लेखांकडेसुद्धां रामदासांच्या या आधुनिक चिकित्सक चहात्यांनीं अगदीं सोयिस्करपणें दुर्लक्ष केलें आहे. अशीं दुसरीहि अनेक उदाहरणें देतां येतील.

**उपासनेचें समर्थांच्या उपदेशांत स्थान**

समर्थांचें मुख्य ध्येय इतर संतांप्रमाणें च परमार्थसाधनाचा सोपा व सरळ मार्ग दाखविणें हें च होतें. व हें ध्येय पुढें ठेवून तदन्वयें च समर्थांच्या वचनांचा अर्थ करणें मीमांसाशास्त्रास धरून होईल. समर्थांच्या वाङ्मयांत सर्वत्र नित्यनेम व उपासना यांवर अतिशय जोर दिलेला आढळतो. किंबहुना महाराष्ट्रास कोणता एक च संदेश समर्थांनीं दिला असेल तर तो उपासनेचा च.

अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्नमान रे ।
प्रसंग हा तुफान रे । नकोचि वेवधान रे ॥ १

अत्र हो परत्र हो । विचित्र काळसूत्र हो ।
अखंड सावधानता । सभाग्य तो नव्हे रिता ॥ २

---

* पहा रामदास आणि रामदासी शके १८३७ माघ महिन्याचा अंक – श्रीसमर्थांची शिकवण धडा ६ वा

कवी म्हणे बहु बरें । करील देव हें खरें ।
बरी धरूनि वासना । धरा मनीं उपासना ।। ३

विवेक पहाणें बरा । बरा विचार तो करा ।
उपासकासि सूचना । उपासना उपासना ।। ४

दासबोध दशक ११ समास ४ मध्यें प्रपंच नेमका कसा करावा हें सांगताना शेवटीं कर्म उपासना आणि ज्ञान यांवर च समर्थांनीं जोर दिला आहे. असें असतांना समर्थांच्या या आधुनिक चहात्यांनीं उपासनेच्या आवश्यकतेविषयीं एक शब्द हि न उच्चारतां केवळ प्रपंच नेटका करण्यावर च सर्व भर द्यावा ही एक तऱ्हेनें समर्थांची विटंबना च नव्हे काय ? म्हणून च या लोकांच्या सांगण्यावर न विसंबतां समर्थवाङ्मयाचें दृढ परिशीलन करून निराग्रहीपणें मीमांसाशास्त्राधारें अर्थशोधन करून या वाङ्मयाचें नव्यानें रसग्रहण करण्याची आज अत्यंत आवश्यकता निर्माण झाली आहे .*

**पूर्वग्रह दूर सारण्याची आवश्यकता**

असें परिशीलन करण्यास सुरवात करण्यापूर्वी आतांपर्यंतच्या चर्चेमधून जे कांहीं पूर्वग्रह निर्माण झाले आहेत ते प्रयत्नपूर्वक दूर सारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समर्थ रामदास व ज्ञानेश्वरादि जुने संत यांमध्यें कांहीं तरी मूलभूत व क्रांतिकारक भेद आहे ही भ्रांति हा एक अशाच प्रकारचा पूर्वग्रह आहे. याबाबतींत समर्थांविषयींच्या असत्य अभिनिवेशानें कै. राजवाड्यांनीं जी दुष्ट विचारप्रणाली महाराष्ट्रांत रूढ केली तिला समर्पक उत्तरें देण्याचा प्रयत्न यापूर्वी अनेक विद्वानांनीं केला असूनहि§ युगमानानुकूल्यानें महाराष्ट्रांत ती तशीच चालू राहिलेली आहे. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ही मतप्रणाली कधीं कधीं लो. टिळकांच्या नांवावरहि खपविण्यांत येते ! टिळकांसारख्या अव्वल दर्जाच्या, अत्यंत शास्त्रशुद्ध व समतोल विचारसरणीच्या संशोधक विद्वानांवर हें मत लादणें म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणेंच होय. रामदास व एकनाथ ज्ञानेश्वरादि प्राचीन संत यांमध्यें जो फरक सकृद्दर्शनीं दृष्टीस पडतो तो परिस्थितीमुळें उत्पन्न झालेला असून

* अशीं शेंकडों दुसरीं वचनें समर्थवाङ्मयांत सर्वत्र विखुरलेलीं आहेत. जुना दासबोध समास. शेतीचा दृष्टान्त देऊन उपासनेचें महत्व 'आदिमध्यावसानेषु' कसें आहे तें फार मार्मिक रीतीनें स्पष्ट केलें आहे तें जिज्ञासूंनीं अवश्य पहावें.

§ दुसरा सुमनहार–पृष्ठ १३७. 'वारकरी संप्रदाय व समर्थसंप्रदाय'–प्रो. शं. वा. दांडेकर

एकनाथास व इतर संतांस देशाभिमान नव्हता असें म्हणणें चुकीचें होईल असें स्पष्ट विधान लो. टिळकांनीं केलें आहे.[१]

**'साधकाचें वाङ्मय'**

समर्थवाङ्मयाचें परिशीलन करण्यापूर्वी एक गोष्ट आपण ध्यानांत धरणें आवश्यक आहे, ती ही कीं समर्थांचें वाङ्मय हें एक तऱ्हेनें **साधकाचें वाङ्मय** आहे, म्हणजे कोणत्या तरी विषयाचें शास्त्रीय पद्धतीनें विवरण करणाऱ्या एखाद्या आधुनिक शास्त्रीय ग्रंथाचें स्वरूप त्यास नसून मोक्षाच्या साधन-मार्गावर साधकास प्रगत करणाऱ्या ग्रंथांचें स्वरूप त्यास आहे. गीता, उपनिषदें, टामस, ए. केम्पिस्टचें 'ख्रिस्ताचा अनुकार' हे अशाच प्रकारचे दुसरे साधकग्रंथ होत. या ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय व सिद्धान्त हे एकच व निश्चित असले तरी विवेचनाच्या स्वरूपांत साधकांच्या भिन्नभिन्न भूमिकांप्रमाणें वेगवेगळेपणा आढळतो. त्यामुळें प्रसंगीं त्यांत एक तऱ्हेची विसंगतीहि भासण्याचा संभव असतो, व मूळ संदर्भाचें अनुसंधान चुकल्यास खरोखर त्या विधानाचें सापेक्ष महत्व काय यासंबंधीं चुकीचा समज होऊन केवळ बुद्धीच्या साह्यानें त्याचें अर्थग्रहण करणाऱ्याची चटकन् दिशाभूल होते. कारण हें वाङ्मय बहुधा कोणत्या तरी साधकाच्या भूमिकेला अनुलक्षून सांगितलें गेलेलें असल्यामुळें त्याची समजूत पाहून घेताना ती भूमिका समजून घेणें जरूर असते. भूमिकासापेक्षतेची ही जाणीव ही समर्थवाङ्मयाच्या प्रवेशद्वाराची गुरुकिल्लीच आहे.

**श्रीरामकृष्णांची साक्ष**

हिंदुधर्मांचे अर्वाचीन युगावतारी द्रष्टे श्रीरामकृष्ण व त्यांचे प्रथितयश शिष्य स्वामी विवेकानंद यांची साक्ष या भूमिकाभेदसापेक्षतेला अनुकूल अशीच आहे. उपनिषदांत व गीतेंत आढळून येणारीं कांहींशीं परस्परविसंगत वाक्यें व त्या शब्दांवर भर देऊन प्रवर्तिलेले द्वैत, विशिष्टाद्वैत, अंतर्यामी सिद्धान्त वगैरे निरनिराळे दार्शनिक पंथ यांमधील विरोध हा कृत्रिम व कल्पित असून हे निरनिराळे दार्शनिक सिद्धान्त आपापल्या परीनें सत्यच असून ते साधकाच्या अवस्थाभेदानें त्यास प्राप्त होणारे अनुभव आहेत, असें स्वानुभूतीच्या आधारावर भगवान् श्रीरामकृष्णांनीं प्रकट केलें होतें. परमोच्चध्येयाच्या प्राप्तीच्या मार्गावर असताना साधकाच्या भूमिकेप्रमाणें व तयारीप्रमाणें त्यास परमेश्वरी सत्तेचीं निरनिराळीं दर्शनें होतात व ही दर्शनें या वस्तुतः साधकाच्या मार्गावरील निरनिराळ्या पायऱ्या किंवा समर्थांच्या भाषेंत बोलावयाचें तर 'लक्ष्यें' होत. ही गोष्ट श्रीरामकृष्णांच्या साधकावस्थेंत प्रत्यक्ष त्यांच्या अनुभवांत आली व

[१] लो. टिळकांचे केसरींतील लेख भाग ४ पृ. ४९४

या अनुभूतीच्या जोरावरच या दार्शनिक पंथांमधील विरोधाचा परिहार त्यांनीं केला. स्वामी विवेकानंदांसहि हाच अनुभव आल्यामुळें त्यांनीं आपल्या सद्गुरूचाही सिद्धान्त आपल्या व्याख्यानांतून व संवादांतून विस्तरशः प्रतिपादला आहे. जुन्या दासबोधांत त्रिविध आत्मनिवेदनाची जी संगति समर्थांनीं लाविली आहे ती अशाच प्रकारची आहे. 'जड' चंचळ, व 'निश्चळ' या आत्मनिवेदनाच्या सायोज्यमुक्तिकडे नेणाऱ्या तीन पायऱ्या च आहेत व या वरील श्रीरामकृष्णांनीं प्रकट केलेल्या दार्शनिक सिद्धान्तरूप पायऱ्याशीं एकरूपच आहेत.

**'भूमिकाभेदा'नें होणारा विसंगतींचा परिहार**

परमार्थाच्या मार्गात भूमिकाभेदाच्या व अवस्थाभेदाच्या सिद्धान्ताचें महत्त्व विशेष प्रकारचें आहे. याच दृष्टीनें प्रख्यात युरोपीय तत्त्वज्ञानी हेगेल यानें 'सत्याची सापेक्षता' प्रतिपादून दोन सत्यांमधील सकृद्दर्शनीं भासमान होणाऱ्या विरोधाचा परिहार केला. समर्थांची विचारधारा त्याचप्रकारची आहे. वर उल्लेखिलेल्या प्रपंचाविषयींच्या समर्थांच्या प्रवचनाचेंच उदाहरण घ्या. हा भूमिकाभेद लक्षांत घेऊनच समर्थांनीं त्या दृष्टीनें च आपला उपदेश केलेला आहे. हें दर्शविणारे अनेक उल्लेख समर्थवाङ्मयांत आपणास आढळतात. कांहीं कांहीं ठिकाणीं समर्थांनीं परमार्थ व प्रपंच यांचा जोडीनें समांतर विचार केलेला आढळतो.* तर कांहीं ठिकाणीं या दोहोंमधील भूमिकाभेद गृहीत धरूनच समर्थांनीं विवेचन केलेलें आढळतें. परमार्थांत वस्तुतः अभेद आहे, अभेदाची भाषा ही सुद्धां लटकी हें अनेकवार स्पष्ट करून समर्थ म्हणतात ही परमार्थांत एकमेव सत्य असणारी गोष्ट प्रापंचिक व्यवहारांत असत्यच मानली पाहिजे. समर्थ म्हणतात :

शब्दीं सर्वआत्मा म्हणावें । आणि आचार सांडुनी भलतेंचि करावें ।
तें पाषांड मत जाणावें । विवेकी असेल तेणें ॥
भेद आणि प्रपंचीं मोडे । ऐसे हे कांहींच न घडे ।
डोळे झाकिती ते रोकडे । नागविले स्वहितासी ॥

—एकवीस समासी

समर्थांच्या विवेचनांत आधारभूत असलेला हा भूमिकाभेद लक्षांत न घेतां समर्थवचनांचा आपणांस सोयिस्कर असणारा अर्थ कांहीं आधुनिक विद्वानांनीं लावल्यामुळेंच समर्थांची प्रचारकी थाटाची विटंबना आज झालेली आढळते.

---

* दासबोधांत अनेक ठिकाणीं हें दिसून येईल. उ. पहा ११-४-३१ परमार्थी पंचीकरण—प्रपंची पाहिजे सुवर्ण.

म्हणूनच हा भूमिकाभेद निरंतर त्यांनीं वागवून समर्थवचनांपैकीं कोणतीं खरोखर विधिरूप, कोणतीं नियमरूप व कोणतीं 'परिसंख्या' स्वरूपाची आहेत याचा पक्षरहित वृत्तीनें मीमांसापद्धतीनें अभ्यास करून समर्थांचा खरा संदेश कोणता तो जाणून घेण्याची अत्यंत उत्कट आवश्यकता आज निर्माण झालेली आहे.§

**समर्थांचें वैशिष्ट्य**

प्रत्येक थोर पुरुषाच्या विचारांवर त्याच्या कालाचा जसा कांहीं तरी परिणाम घडतोच तसें त्या कालाला योग्य असा एक विशिष्ट संदेशहि त्या पुरुषाकडून मिळत असतो. या दृष्टीनें विचार केल्यास समर्थांचें वैशिष्ट्य काय व त्यांच्यांत व इतर संतांत फरक असला तर तो कोणता हें आपणांस जाणून घेतां येईल. तत्कालीन महाराष्ट्राची स्थिति पहातां परमार्थ व प्रपंच या दोहोंची गफलत करून दोहोंचीहि धाण करणारे महंत व त्यांचे 'शिष्यसमुदाव' यांनीं महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनाची नासाडी केली होती असें आपणांस आढळून येतें. परमार्थाविषयींच्या लोकांमधील भक्तीचा अयोग्य फायदा घेऊन, स्वतःची महंती पसरवून ऐश्वर्याचा व देहबुद्धीचा बडिवार माजविणारे खोटे महंत व अशा महंतांच्या नादीं लागून परमार्थाविषयींच्या असत्य व चुकीच्या कल्पनांनीं आपली प्रापंचिक कर्तव्येंहि नीट करण्यापासून पराङ्मुख झालेली हीन दीन जनता या दोहोंमध्यें महाराष्ट्राचें धार्मिक तेज नष्टप्राय झालें होतें. अंतरंगांत मानससरोवराचें ध्यान करणाऱ्या पण प्रत्यक्ष चिखलांत चोंच रुतून बसणाऱ्या राजहंसासारखी महाराष्ट्राची स्थिति झाली होती म्हणून एका बाजूनें खोट्या परमार्थाच्या नांवावर प्रपंचाचीहि नागवण करणाऱ्या विपर्यस्त महंतीविरुद्ध जसें समर्थांनीं शस्त्र उगविलें तसें 'भोळ्या भावानें' व परमार्थाच्या नांवावर खरोखर आळशी दैववादी व प्रयत्नशून्य जनतेवर 'जितुका भोळाभाव तितुका अज्ञानाचा स्वभाव' म्हणून कोरडे ओढण्याचें हि कार्य समर्थांना करावें लागलें. आपली पारमार्थिक व प्रापंचिक कर्तव्यें काय याची जाणीव त्यांनीं महाराष्ट्रास करून दिली. पण त्यांचें सापेक्ष महत्व काय यासंबंधीं त्यांचें व इतर संतांचें मत यांत फरक नव्हता. समर्थांच्या या परमार्थ व प्रपंच यासंबंधीं योग्य जाणीव उत्पन्न करण्याच्या द्विविध कामगिरीचें रहस्य 'सावधानता' व विवेक *

§ विधि व नियम म्हणजे Obligatory आज्ञापक वचनें तर परिसंख्या म्हणजे Permissive किंवा अनुज्ञापक वचनें होय.

* इहलोक परलोक। उभय लोकीं सार्थक। शुद्ध ज्ञान शुद्ध विवेक। यासी म्हणावें ॥ इहलोक म्हणजे संसार करावा । नाना यत्नें आटोपावा । लोकांमध्यें मिरवावा । पुरुषार्थ आपुला ॥ कन्यापुत्र योग्य जाले। समर्थ सोइरे पाहिले। ब्राह्मण्य विधियुक्त चाले। स्वहा स्वधा॥ लोक म्हणती भला भला । इतुकेन इहलोक साधला । आतां परलोक तोहि आणला । पाहिजे मना॥ जेणें सकळ निर्माण केलें । त्यास पाहिजे ओळखिलें । मुख्य देवास चुकले । त्या परलोक (परमार्थ) कैसा॥

या दोन शब्दांत सांठविलेलें आहे. यांच्या साह्यानें परमार्थ व प्रपंच या भूमिकाभेदानें आपलीं योग्य कर्तव्यें कोणतीं तीं ओळखून जीविताचें आपलें ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे हेंच समर्थांचें मुख्य सांगणें आहे. वरील विवेचन ध्यानांत धरलें तर समर्थांच्या प्रपंचविषयक विचारांचा समन्वय त्यांच्या मुख्य शिकवणीशीं कसा लागतो हें निराळें विवरून सांगण्याची जरूरी आहे असें नाहीं. समर्थांच्या उपदेशांत अंतर्भूत असलेला भूमिकाभेद लक्षांत न घेतल्यामुळें समर्थांच्या आधुनिक भक्तांनीं त्यांच्या शिकवणीला फार च निराळें रूप आणून त्यांच्यांत व इतर संतांत एक काल्पनिक भेद निर्माण केला आहे. पूर्वग्रहरहित दृष्टीनें पाहिलें तर श्रीसमर्थ रामदास व इतर संत यांच्या मुख्य शिकवणींत यत्किंचित् हि फरक नाहीं. विवेकदृष्टि जागृत ठेवून आपल्या रोजच्या जीवनांत परमार्थाचा मार्ग आचरतांना हि भोंवताली सावधानतेनें पाहून आपल्या पायाखालची वाट निरंतर नीट पारखून घेतली पाहिजे. यावर युगमानानुरूप समर्थांनीं अधिक कटाक्ष ठेविला व हें च समर्थांचें वैशिष्ट्य होय. ही शिकवण पूर्वींच्या संतांत हि अगदीं च नव्हती असें नाहीं. पण ती तितक्या स्पष्टपणें व प्रामुख्यानें प्रकट झाली नाहीं हें हि खरें. या वैशिष्ट्याचें बीज कांहीं अंशीं समर्थांच्या व्यक्तिमहात्म्यांत तर कांहीं अंशीं समर्थकालीन उत्तरोत्तर अधिकाधिक तीव्र होत जाणाऱ्या परिस्थितींत आहे.

**शीखधर्माशीं सादृश्य**

उत्तर हिंदुस्थानच्या धार्मिक इतिहासांत बरोबर अशी च अगदीं सदृश घटना घडून आल्याचें आढळतें. ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत झालेल्या भक्तिमार्गी संतांप्रमाणें च उत्तरभारतामध्यें हि ११ व्या शतकाच्या प्रारंभापासून सोळा शतकाच्या अंतापर्यंत सोळा भक्तिमार्गी संत होऊन गेल्याचें इतिहास सांगतो. या सोळा संतांना त्यांच्या शिकवणीच्या स्वरूपावरून 'निर्गुणभक्तिसंप्रदायी कवि' असें हिंदी वाङ्मयांत संबोधिलें जातें. यांची शिकवण व ज्ञानेश्वरादि महाराष्ट्रीय संतांची शिकवण ही एकरूप च आहेत. इतकें च नव्हे तर या कवींत नामदेव नांवाचा कवि असून तो व महाराष्ट्रीय नामदेव हे एक च होत असें आज ठरूं पाहत आहे. या सोळा संतांची संकलित शिकवण म्हणजे च नानकाचा शीखधर्म होय. ग्रंथसाहेबांत या सोळा संतांचीं वचनें एकत्रित केलीं गेलीं आहेत. तो च जगाविषयींचा निवृत्तिपर दृष्टिकोण, तीच आत्मपरीक्षापूर्वक आत्मोन्नतीची तळमळ, व तोच उपासनामार्ग या प्रारंभिक शीखधर्मांत उपदेशिलेला आहे. पण आध्यात्मिक उपासनापंथ, व प्रत्यक्ष प्रपंचाची तत्कालीन दारुण दुरवस्था यामधील विरोध प्रत्यक्ष जाणवल्यामुळें, कांहींतरी परिस्थितिप्रतियोगी धोरण अवलंबिण्याची जरूरी शीखधर्माच्या प्रारंभिक नेत्यांना भासली व त्यांनीं त्याला 'कृपाणा'ची जोड दिली. समर्थांना प्रत्यक्ष

कृपाणाची जोड आपल्या उपदेशाला देण्याची जरूरी नव्हती. कारण तें काम करणारा महाराष्ट्राचा भाग्यविधाता जन्माला आला होता. व त्याच्या कार्यास थोडीबहुत सुरवातहि झाली होती. समर्थांना पहावयाचें होतें तें एक च कीं परमार्थाच्या खोट्या कल्पनांनीं त्याच्या कार्यास विरोध होऊं नये. म्हणून अखंड सावधानता व विवेक यांवर जोर देऊन प्रपंच व परमार्थ यांतील भेद व त्यांचें स्वरूप स्पष्ट करून विवेकानें आपलें जीवित क्रमण्याचा उपदेश समर्थांनीं तत्कालीन महाराष्ट्रास केला व महाराष्ट्राचे सद्गुरु ही आपली पदवी सार्थ केली.

**नम्र प्रार्थना**

म्हणून भूमिकाभेदानें उपदेशिलेल्या व्यावहारिक शिकवणीवर अतिशयोक्त भर देऊन समर्थांच्या आधुनिक भक्तांनीं केलेल्या भुलावणीनें गांगरून जाऊन, समर्थांचा जो मुख्य सिद्धान्त त्याचा आपणांस विसर पडूं न देतां तो सिद्धान्त व त्या ध्येयसिद्ध्यर्थ समर्थांनीं उपदेशिलेले मार्ग यांची ओळख आपण स्वतःच त्यांच्या ग्रंथांतून करून घेतली पाहिजे. देहबुद्धीवर विजय मिळवून, ‘ सूर्यवंशाचें मण्डण ’ जो राम त्याचा चित्तास वेध लावून घेऊन सायोज्यमुक्तीचें वर्म ठायीं पाडून घेणें हेंच ध्येय समर्थांनीं आपल्या ग्रंथांतून महाराष्ट्रापुढें धरलें आहे. व तें साध्य करण्याकरतां उपासनेचा मार्ग उपदेशिलेला आहे. हा मार्ग आचरताना भूमिकासंकर होऊं न देण्याची सावधानता ठेवून देहबुद्धीची एक अपरिहार्य उपाधि म्हणून आपल्या प्रापंचिक कर्तव्यापासून आपण पराङ्मुख होतां कामा नये असेंहि आनुषंगिक रीतीनें सांगितलें आहे. यां आनुषंगिक कार्यांचें योग्य दुय्यम स्थान देऊन मुख्य ध्येयसाधनावरच स्थिर दृष्टि ठेवण्यानें श्रीसमर्थसद्गुरूंची कृपा महाराष्ट्रावर पुन्हां होईल.

# जेझीया कराबद्दल अवरंगजेब बादशहास लिहिलेल्या पत्राचा जनक कोण ? शिवाजी, कां अन्य कोणी ?

( लेखक—रा. **भास्कर वामन भट**, महाराष्ट्रधर्मकर्ते, धुळें )

अवरंगजेब बादशहास जेझीया कराबद्दल एक पत्र शिवाजीनें लिहिलेलें वाड आणि पारसनीस यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'सनदापत्रें' या ग्रंथांत ( १४९ ) पानावर छापण्यांत आलें आहे. पत्र विस्तृत असल्यामुळें स्थलाभावीं तें प्रस्तुत स्थळीं साग्र उधृत केलें नाहीं. या पत्रांत जेझीया कर बसविण्याच्या अवरंगजेबाच्या विचाराबद्दल शिवाजीनें तीव्र विरोध व्यक्त करून व गरीब प्रजेकडून असल्या प्रकारचा कर घेणें अवरंगजेबासारख्या बादशहास शोभत नाहीं असें निर्भीड व सडेतोड भाषेंत कळविलें आहे. या पत्रांत पत्र पाठविणारा म्हणून शिवाजी असा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु या पत्राच्या पहिल्या एक दोन ओळीशिवाय बाकीच्या सर्व मजकुराचें इंग्रजी भाषांतर फार वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें असून हें उदयपूरचा महाराजा राजसिंहानें अवरंगजेबास लिहिल्याचें Annals and antiquities of Rajsthan या ग्रंथाच्या भाग ( १ ) पान ३९१ वर नमूद केलें आहे. टॉडच्या या पत्राच्या इंग्रजी भाषांतराचे सुरुवातीस " या पत्राचें इंग्रजी भाषांतर ऑर्मनें फार वर्षांपूर्वी प्रथम करून त्याची माहिती युरोपियन इतिहास अभ्यासकास करून दिल्याचें " नमूद केलें आहे.

सनदापत्रांतील या पत्राच्या पहिल्या तीन ओळींशिवाय बाकीचें या पत्राचें सर्व भाषांतर थोडया बहुत फरकाशिवाय जसेच्या तसें च दिलें आहे. या शिवाय या पत्राचें शेवटीं " यावर हिंदू लोकास पीडा करण्यांत च धर्म आहे असें मनामध्यें आलें असल्यास आधीं राजा राजसिंग याजपासून जेझीया घ्यावा ह्मणजे इकडून कठीण नाहीं. " या वाक्यांतील राजसिंग या नांवाच्या ऐवजी रामसिंग या नांवाचा उल्लेख इंग्रजी भाषांतरांत आहे. या दोन वाक्यांशिवाय मराठी पत्र व त्याचे इंग्रजी भाषांतर यांत कांहीं फरक नाहीं.

राजपुतान्यांतील इतिहासअभ्यासकांत हें पत्र उदयपूरचा महाराजा राजसिंगाचें अगर राजा जसवंतसिंग अगर राजा रामसिंग अगर संभाजीचें असावें

असा ही समज प्रचलित आहे. मारवाडप्रांतीय प्रसिद्ध इतिहाससंशोधक व लेखक राव बहादुर गौरीशंकर ओझा यांनीं उदयपूरचा इतिहास भाग २ पान ५५२-५५३ मध्यें या पत्राचा जनक कोण याविषयीं चर्चा केली आहे. ही आमचे वाचण्यांत नसल्यामुळें आह्मी ती एका बाजूस ठेऊन या प्रश्नाची प्रस्तुत लेखांत चर्चा केली आहे. "सनदापत्रें या ग्रंथांत हें पत्र छापलें आहे, त्यांत तें अस्सल कीं नक्कल हें नमूद केलेलें नाहीं. अस्सल पत्र शिवाजीनें लिहिलेले अवरंगजेबाकडे रवाना केलें गेल्यावेळीं त्याची नक्कल शिवाजीनें करून ती आपल्या दप्तरखान्यांत ठेविली असली पाहिजे हें उघड आहे. पुण्यास पेशव्यांनीं राजधानी केल्यावर छत्रपतींच्या दप्तरखान्यांतील महत्वाचे लेख पेशव्यांनीं आपल्या दप्तरखान्यांत संग्रहीत करून ठेविले ते वेळी या पत्राची नक्कल पेशवेदप्तरांत दाखल झाली असली पाहिजे हें उघड आहे.

उदयपूरच्या दप्तरखान्यांतील पत्राचें भाषांतर आपल्या मुनशीकडून करून घेतल्याचा उल्लेख टॉडनें आपल्या ग्रंथांत केला आहे. या शिवाय हें पत्र अन्य कोठे आढळून आलें नाहीं. उदयपूरच्या दप्तरखान्यांत या पत्राची प्रत टॉडला मिळाली ती तेथें कशी गेली हें समजणें मोठें कठीण नाहीं. उदयपूरचा महाराज राजसिंग हा शिवाजीचा समकालीन असून अवरंगजेबाचा शिवाजीप्रमाणें मोठा प्रतिपक्षी होता. अशा पुरुषास जेझिया कराबाबत अवरंगजेबास स्वतःचे मत निर्भिडपणे ज्या पत्रद्वारें शिवाजीनें कळविलें व ज्या पत्रांत शिवाजीनें राजसिंगाचा उल्लेख केला, त्याची माहिती व्हावी एतदर्थ त्यानें तें राजसिंगाकडे पाठविलें असलें पाहिजे; व यामुळें तें उदयपूरच्या दप्तरखान्यांत उपलब्ध व्हावें हें युक्त च आहे. टॉडनें आपले ग्रंथांत उदेपूरच्या दप्तरखान्यांतील पत्र मराठी भाषेंत व देवनागरी लिपींत लिहिलेलें आहे कीं अन्य कोणत्या भाषेंत व लिपींत लिहिलेलें आहे याचा उल्लेख केलेला नाहीं. आजमित्तीस ही उदयपूर दप्तरखान्यांतील हें पत्र तत्प्रांतीय एखाद्या संशोधकानें पाहून त्याची हुबेहुब नक्कल करून घेऊन प्रसिद्ध केली म्हणजे या पत्राच्या सुरुवातीच्या ज्या दोन ओळींत शिवाजीच्या नांवाचा उल्लेख केला आहे त्या ओळी तेथें आहेत किंवा नाहींत याचा खुलासा होऊन या पत्राच्या जनकत्वाचा जो वाद उपस्थित झाला आहे त्याचा निवाडा करण्यास सोपें जाईल. या पत्रासंबंधीं इतकी माहिती प्रास्ताविक स्वरूपाची नमूद करून या पत्राचा जनक शिवाजी कां अन्य कोणी या प्रश्नाच्या चर्चेकडे वळतो.

पेशवेदप्तरांतील पत्रांत साक्षात शिवाजीचा उल्लेख पत्र लिहिणारा म्हणून असल्यानें हें पत्र शिवाजीचें च आहे ही गोष्ट उघड आहे. परंतु फार वर्षांपूर्वी

( इ.स. १८२९ ) टॉडनें आपल्या मुनशीकडून उदयपूर दप्तरांतील पत्राच्या इंग्रजी भाषांतरांत शिवाजीच्या नांवाचा उल्लेख नसल्यामुळें पेशवे दप्तरांतील शिवाजीचे नांवाचा असलेला उल्लेख जमेस न धरतां या पत्राचा जनक शिवाजी च आहे कां अन्य कोणी आहे हें निश्चित ठरविण्यास कांहीं साधनें उपलब्ध आहेत कीं कसे हा प्रश्न संशोधकापुढें उपस्थित होता. या प्रश्नास आमचे असें उत्तर आहे कीं अन्य कोणत्याही पुराव्याचे अभावीं या पत्रांतच असे दोन महत्वाचें उल्लेख आहेत कीं ज्याच्या योगानें या पत्राचा जनक शिवाजी च असला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद शाबीत होते.

आम्हीं या पत्रांतील जे दोन उल्लेख प्रमाणभूत मानतों ते खालीं दिले आहेत.

( १ ) "अभीष्ट चिंतन करणार प्रारब्धयोगानें हुजुरून निरोपाशिवाय आलो. परंतु यथायोग्य सेवेचे सांप्रदायांत हजर आहे."

( २ ) "सांप्रत आम्हीं इकडे आल्यावर पातशाही खजीना रिकामा जाहला व सारे द्रव्य खर्च जाले. यांजकरितां हिंदू लोकांपासून झजीया पट्टीचे द्रव्य उत्पन्न करून पादशहीचा क्रम चालविला आहे ऐसें ऐकण्यांत आले."

हे दोन्ही उल्लेख अत्यंत महत्वाचे असून यावरून शिवाजी हा च या पत्राचा जनक असला पाहिजे हें सिद्ध होत आहे.

वरील पहिल्या उल्लेखावरून हा सिद्धांत कसा शाबीत होतो याची प्रथम चर्चा करतो. या पत्राचा जनक महाराजा राजसिंग, रामसिंग, जसवंतसिंग व छत्रपती संभाजी यापैकीं कोणीतरी असल्याबद्दलची जी समजूत राजस्थानांत प्रचलित आहे ती अन्वयें उल्लेखातील आशय या व्यक्तिस लागू पडावयास पाहिजे; परंतु शिवाजीशिवाय अन्य कोणास ही लागू पडत नाहीं. "प्रारब्धयोगानें हुजुरून निरोपाशिवाय आलों" हे शब्द अत्यंत महत्वाचे असून वरील व्यक्तीपैकीं फक्त शिवाजीस च पूर्णपणें लागू पडतात. राजा जयसिंगानें केलेल्या तहान्वयें अवरंगजेबाच्या भेटीकरतां शिवाजी आग्र्यास गेला. तेथें गेल्यावर अवरंगजेबानें त्याला नजरकैदेंत ठेविले व अखेर त्याच्याकरतां तयार होत असलेल्या ज्वालाग्रही राजवाडयांत त्याला ठेवून त्यांत च त्याला भस्मसात करण्याचा त्याने केलेला निश्चय तडीस न जातां शिवाजीनें आग्र्याहून पलायन केलें. ही गोष्ट प्रारब्ध योगे करून घडली हें व्यक्त करण्याकरितां "प्रारब्धयोगें" हे शब्द शिवाजीनें वापरले आहेत; या शब्दाप्रमाणें "हुजुरून निरोपाशिवाय आलों" हे ही शब्द महत्वाचे आहेत. व ते फक्त शिवाजीस च लागू पडतात. तात्कालीन दरबारी शिष्टाचाराप्रमाणें अवरंगजेबासारख्या बादशाहाच्या भेटीस गेलेल्या स्वदेशीं शिवाजीसारख्या

राजानें परत येण्यापूर्वी त्याची भेट घेऊन निरोप घ्यावयास पाहिजे होता. परंतु ज्या परिस्थितींत शिवाजी आग्रा शहरीं सांपडला गेला होता त्या परिस्थितींत हा दरबारी शिष्टाचार शिवाजीस पाळणें अशक्य होतें; व त्यानें तो न पाळतां आग्रा शहरास रामराम ठोकला. रामसिंग, जसवंतसिंग, राजा राजसिंग, या कोणासही या वाक्यांतील आशय लागू पडत नाहीं. छत्रपती संभाजी शिवाजीबरोबर अवरंगजेबाचे भेटीस गेला होता. परंतु ते वेळीं तो प्रौढ वयाचा नव्हता. व शिवाजीनें स्वतःच्या सुटकेची क्लृप्ती व योजना स्वबुद्धीनें घडवून आणल्यामुळें संभाजीस या वाक्यांतील आशय लागू पडत नाहीं. शिवाजीची व अवरंगजेबाची भेट शिवाजीच्या निधनापावेतों एकदांच आग्रा शहरीं झाली व अन्य कोणत्याही प्रसंगीं झाली नाहीं व या भेटीचे पर्यवसान वर दर्शविल्याप्रमाणें झालें.

पहिल्या उल्लेखाविषयीं याप्रमाणें चर्चा केल्यावर दुसऱ्या उल्लेखाविषयीं चर्चा करून त्यांतून कोणता सिद्धांत निष्पन्न होतो त्याचें आम्हीं दिग्दर्शन करतों.

शिवाजीनें इ. स. १६६६ सालचे आगष्ट महिन्यांत आग्र्याहून पलायन केलें; व तो नऊ महिन्यांनीं स्वदेशीं परत आला. त्यानें अवरंगजेबाशी केलेल्या तहान्वयें जे किल्ले व मुलूख त्यानें त्यास दिला होता तो परत ताब्यांत घेण्यास त्यानें सुरुवात केली. अवरंगजेबानें जेझीया कर घेण्यास कोणत्या सालीं सुरुवात केली याबद्दल मुसलमानी रियासतींत "जेझीया कर अवरंगजेबानें इ. स. १६७९ च्या २ एप्रील रोजीं पुन्हा सुरु केला" असा उल्लेख आहे. "रिलिजियस पॉलिसी ऑफ दी मोगल एंपरर्स" या प्रोफेसर श्रीरामशर्मा यांच्या ग्रंथांत इ. स. १६७९ सालांत अवरंगजेबानें हा कर घेण्यास सुरुवात केली असें नमूद केलें आहे. याशिवाय अवरंगजेबाचा हा कर बसविण्याबद्दल शिवाजीनें तीव्र निषेध केला असें म्हटलें आहे. रियासतींत हा कर प्रथम अवरंगजेबानें कोणत्या सालापासून घेण्यास सुरुवात केली तें साल नमूद केलेलें आढळत नाहीं. परंतु दक्षिण प्रांतावर स्वाऱ्या करण्याचा कार्यक्रम त्यानें सुरु केल्यावर थोडे च दिवसानीं म्हणजे इ.स. १६७० चे सुमारास हा कर घेण्यास त्यानें सुरुवात केली असावी असें दिसतें. आतां या उल्लेखांतील महत्वाच्या वाक्यावरून कोणते अनुमान निघते तें आम्ही नमूद करतों. "सांप्रत आम्ही इकडे आल्यावर" हे शब्द शिवाजीशिवाय वर नमूद केलेल्या अन्य कोणत्या ही व्यक्तीस लागू पडत नाहींत. शिवाजीप्रमाणें राजा राजसिंह हा अवरंगजेबाचा कट्टा वैरी होता. जेझीया कराबद्दल अवरंगजेबाचा त्यानें तीव्र निषेध केला यामुळें अवरंगजेबाचा संताप होऊन त्यानें मेवाड प्रांतावर स्वारी केली. परंतु राजा राजसिंहानें अवरंगजेबाचा पराभव केला. यामुळें मेवाडांतून अवरंगजेबाने आपला पाय काढला असें रियासतींत वर्णन आहे. ही स्वारी १६८१ सालांत झाली.

यानंतर थोडे च दिवसांत राजा राजसिंह मरण पावला. या पत्रांतील दोन्हीं उल्लेख लक्ष्यांत घेतां दुसरा उल्लेख राजसिंहास अनुलक्षून करण्यांत आलेला नाहीं हें निश्चित आहे. "आम्हीं इकडे आल्यावर पातशाही खजीना रिकामा झाला व सारे द्रव्य खर्च झाले" या वाक्यांतील आशय राजसिंहांवर अवरंगजेबानें केलेल्या स्वारीस व त्यांत झालेल्या खर्चास लागू पडत नाहीं. अवरंगजेबाच्या कारकीर्दीचा विहंगम-दृष्ट्या विचार केला असतां असें दिसून येतें कीं त्यानें दक्षिणेच्या स्वाऱ्यांत अतोनात द्रव्यखर्च केले. अवरंगजेबानें महाराजा जसवंतसिंग, शाहिस्तेखान, दिलेरखान व मिर्झा राजा जयसिंग या सरदारांना शिवाजी व दक्षिणेंतील विजापूर व गोवळकोंडे हीं मुसलमानी राज्यें धुळीस मिळविण्याकरितां पाठविले. या सरदारांच्या स्वाऱ्यां-प्रीत्यर्थ शिवाजीचे निधनापावेतों म्हणजे इ. स. १६८० पावेतों अपार द्रव्य खर्च केलें. इ. स. १६८० नंतर तो स्वतः मोठ्या सैन्यासह अपार खजीना घेऊन वरील कार्यभाग सिद्ध करण्याकरितां दक्षिणेंत आला. या त्याच्या कारकीर्दीतील घटना लक्षांत घेतां इ. स. १६६६ सालांत आग्र्याहून शिवाजीनें पलायन करीपावेतों दक्षिणेच्या स्वाऱ्यांप्रीत्यर्थ त्याचा खजीना रीता होण्याइतपत त्याचा खर्च झालेला होता या विषयीं शंका नाहीं. अवरंगजेबानें राजा राजसिंगावर जी स्वारी केली ती एक वर्ष सुरू राहून समाप्त झाल्याकारणानें त्याचा खजीना या स्वारीच्या खर्चामुळें रिता होण्याचा संभव नाहीं. ही गोष्ट लक्ष्यांत घेतां पत्रांतील हें वाक्य राजा राजसिंग यांस लागू पडत नसून शिवाजीस च लागू असल्याचें दिसून येतें. येथपावेतों आम्ही केलेल्या विवेचनावरून या पत्रांतील वर नमूद केलेल्या अंतस्थ प्रमाणावरून या पत्राचा जनक शिवाजीवांचून अन्य कोणी नसला पाहिजे असा सिद्धांत निःसंदिग्धपणें निघतो. टॉडनें आपल्या मुनशीकडून उदयपूरच्या दप्तरखान्यांतील ज्या पत्राचें भाषांतर आपल्या ग्रंथांत दिलें आहे तें राजा राजसिंगाचें आहे असा जो समज राजस्थानांत प्रचलित आहे त्यांत कितपत तथ्यांश आहे याचा प्रस्तुत स्थळीं विचार करणें क्रमप्राप्त आहे. मुसलमानी रियासतींत राजसिंहानें जेझिया कर बसविल्याबद्दल त्याचा तीव्र निषेध करणारें पत्र अवरंगजेबास पाठविलें व त्यामुळें अवरंगजेबाचा संताप होऊन त्यानें मेवाडवर स्वारी केली असें मुसलमानी रियासतींत नमूद केलें आहे. रियासतकारांनीं या पत्रावर टीप देऊन त्यांत असें विधान केलें आहे कीं "हें पत्र शिवाजीनें लिहिलेले आहे" असें आतां पुढें आले आहे. हें पत्र राजा राजसिंगाचे आहे या राजस्थानांत प्रचलित असलेल्या समाजाच्या बुडाशीं सत्यांश काय असावा याचा उलगडा पुढें दर्शविल्याप्रमाणें होऊं शकतो. राजसिंहांवर स्वारी करण्यापूर्वीं एक दोन वर्षें अगोदर म्हणजे इ. स. १६७९ त जेझीया कर अवरंगजेबानें फिरून घेण्यास सुरवात केली ( Reimposed ) असें रियासतकारांनीं

विधान केलें आहे. राजसिंगासारख्या धर्माभिमानी रजपूत राजास अवरंगजेबाच्या या कृत्याबद्दल राग आला असावा व त्यानें याबद्दल अवरंगजेबाची कानउघाडणी पत्रद्वारें केली असावी. झेजीया कर प्रथम अवरंगजेबानें इ. स. १६६६ ते १६७९ चे दरम्यान जेव्हां वसूल करण्यास सुरवात केली, तेव्हां शिवाजीनें अवरंगजेबास पत्र लिहून वर दर्शविल्याप्रमाणें त्या पत्राची नक्कल राजसिंगाचे अवलोकनार्थ त्याचेकडे पाठविली. इ. स. १६७९ सालांत हा कर अवरंगजेबानें फिरून बसविला ते वेळीं या पत्रांतील विचारसरणी राजसिंगास पसंत पडून त्यानें शिवाजीच्या पत्राबरहुकूम पत्र लिहून तें अवरंगजेबाकडे पाठविलें असावें असा संभव दिसतो. हा आमचा तर्क ग्राह्य धरल्यास "सनदापत्रांत छापण्यांत पत्राचें इंग्रजी भाषांतर यांत कमालीची साम्यता दृष्टोत्पत्तीस यावी यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. या पत्राचा जनक शिवाजी व अनुवादक उदेपुरचा राजा राणासिंह असा या विवेचनाचा थोडक्यांत निष्कर्ष नमूद करून आम्ही हा लेख समाप्त करतो.

# समर्थ तुकारामबोवांचे गुरु असतील कां ?

( लेखक—प्रो. **शंकर वामन दांडेकर**, एम्. ए., मुंबई )

श्री तुकारामबोवा व श्री समर्थ या दोन थोर सत्पुरुषांविषयीं आजवर पुष्कळ लिखाण प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांतील बहुतेक लिखाण या साधूंच्या व्यक्तिशः गुणदोषांची चर्चा करणारें आहे. या दोहोंचा परस्परसंबंध कसा असावा, यांच्या तत्वज्ञानांत साम्य अथवा वैलक्षण्य कितपत आहे इत्यादि प्रश्नांचा व्हावा तसा विचार झाला नाहीं असें प्रस्तुत लेखकास फार दिवसांपासून वाटत होतें व तद्विषयक माहिती गोळा करण्याच्या तयारींत हि तो होता. अशा स्थितींत श्री रामदास आणि रामदासी मासिकाच्या २४८ व्या अंकांत समर्थ तुकारामबोवांचे तारकमंत्र देणारे गुरु होते असें सांगणारा श्री दासविश्रामधामांतील उतारा लेखकाच्या वाचण्यांत आला व त्याच्या पूर्वीच्या विचारांना चालना मिळाली. म्हणून च तुकारामबोवा व समर्थ यांच्या परस्परसंबंधांत उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांपैकीं एक प्रश्न म्हणून वरील प्रश्नाचा या लेखांत विचार करण्याचें योजिलें आहे.

तुकारामबोवा व समर्थ यांचे परस्परसंबंध सांगणारें जें थोडें लिखाण प्रसिद्ध आहे त्याचे लेखकवर्गाकडे नजर देऊन खालील सहा विभाग करतां येतील. ( १ ) समर्थसंप्रदायी, ( २ ) वारकरीसंप्रदायी, ( ३ ) ऐतिहासिक दृष्टिप्रधान, ( ४ ) राजकारणीदृष्टिप्रधान, ( ५ ) साहित्यिक, व ( ६ ) तत्वजिज्ञासु. अर्थात च हे विभाग अभेद्य नाहींत हें सुज्ञ वाचकांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. एक च लेखक दोन अथवा अधिक दृष्टीनें यांच्या वाङ्मयाकडे पाहूं शकतो. हे विभाग दाखविण्यांत हेतु येवढा च कीं, लेखकास कोणकोणत्या कसोट्या लावणें शक्य आहे हें वाचकाच्या लक्ष्यांत चटकन् यावें.

या सर्वांचा विचार करून दोहोंचा संबंध सांगणें म्हणजे एक मोठा निबंध च होईल. स्थलसंकोचास्तव तो व्याप सोडून देऊन त्यांतील प्रथम भागांतलि एक प्रश्न व जो तूर्त लोकांच्या डोळ्यासमोर आहे त्याचा च या लेखांत विचार करूं.

समर्थ व तुकारामबोवा यांचे परस्परसंबंध कसे असतील हे जरी आतां सांगतां आलें नाहीं, तरी येवढें मात्र उघड दिसतें कीं, दोहोंच्या शिष्यवर्गाचे संबंध आपुलकीचे नसावेत. तुकारामबोवांच्या शिष्यवर्गाच्यां ( उदाहरणार्थ, रामेश्वरभट, पिंपळनेरकर निळोबा ) लिखाणांत समर्थांचा उल्लेख आढळून येत नाहीं.

समर्थशिष्यांच्या लिखाणांत तो आढळून येतो. व त्यांतला च उतारा श्री. कारखानीस यांनीं श्री रामदास आणि रामदासी मासिकाच्या २४८ व्या ( पौष-जानेवारीच्या ) अंकांत दिला आहे.

समर्थभक्त श्रीयुत शंकरराव देव ज्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्या ग्रंथाला रामदासी कथांचा विश्वकोश ( Encyclopaedia Ramadasika ) म्हणतात, त्या श्री दासविश्रामधामांत आत्माराम महाराजांनीं पान ३०३, ओंव्या ८४ ते ८८ व ९६, ९७ यांत दोन गोष्टी सांगितल्या आहेत. ( १ ) समर्थांनीं तुकोबांना तारकमंत्राचा उपदेश दिला, ( २ ) 'तुका', 'तुकाप्पा' हीं पूर्वीचीं नांवें बदलून समर्थांनीं बोवांचें नांव 'तुकाराम' ठेवलें.

वरील गोष्टी कथन करणाऱ्या महत्त्वाच्या ओंव्या खालीलप्रमाणें आहेत.

पूर्ण सज्ञानी दोघे सज्जन । उभयतां श्रीहरिआज्ञा प्रमाण ।
शुद्ध येकांतीं कृपा करोन । तारक जप तुकया सांगितला ॥ ८४

आपण सांगतों हें [लोकांस] पटणार नाहीं ( कारण, तुकारामबोवांचे गुरु बाबाजी ही गोष्ट प्रसिद्ध होती ) असें वाटून, व ५७ व्या ओंवींत आपण च तिचा

बाबाजी चैतन्य गुरुकृपेबळें । धर्म हा तुकोबा विदित सकळ ।

असा उल्लेख केला आहे हें जाणून, पुढील ओंवींत महाराज पूर्वपक्ष करून समाधान करतात :

संशय कित्येका वाटेल जीवीं । उपदेश होता कीं तयास पूर्वीं ।
तरी ऐका न लाभे कैवल्य पदवी । न करितां सेवन फल तारक ॥ ८५
हरिहर महाशक्ति मंत्र सारांश । तारक मंत्र हा विशेषाविशेष ।
पूर्वात्पूर्वीचें निजगुज रहस्य । म्हणोनि हरीनें आज्ञापिलें ॥ ८६
कां गुरु नव्हे दाविता स्वहित । आणि वाणी तो धरिला स्वपंथ ।
ब्रह्मविद ब्राह्मण दास समर्थ । गुरुपणा योग्य सहजचि ॥ ८७
बाबाजी आणि महाराज सज्जन । मुळीं च असती दोघे अभीन्न ।
उपदेशकाळीं स्वरूपधारण । केलें चैतन्यासादृश्य ॥ ८८

खालील दोन ओंव्यांत 'तुकाराम' नांव ठेवल्याचें सांगतात.

तुका तुकोबा तुकपा वाणी । बाहत होते या अभिधान जनीं ।
सांगोनि विठ्ठला रामदासांनीं । तुकाराम नाम ठेविलें ॥ ९६

तुकीं कीं तुकला रामा म्हणोन । तुकाराम पडिलें नामाभिधान ।
राम चि तुका तो न दिसे भिन्न । तुकाराम नाम या हेतु ॥ ९७

आत्मारामहाराजकथित या कथा खऱ्या कां खोट्या याचा आपण थोडक्यांत विचार करूं.

(१) या विषयासंबंधानें पहिली लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, तुकारामबोवा आपल्या अभंगांत रामदासांनीं आपणाला तारकमंत्र दिला असें कोठें हि सांगत नाहींत. आपले गुरु म्हणून दोन ठिकाणीं 'बाबाजींचा' उल्लेख ते करतात.

बाबाजी सद्गुरुदास तुका । ३५५
बाबाजी आपुलें सांगितलें नाम । ३८७४
(निर्णयसागरप्रत)

(२) जवळच्या मंडळींनीं बोवांना आग्रह केल्यावरून जेव्हां तुकारामबोवांनीं आपली हकीगत सांगितली तेव्हां सुद्धां

मानियेला स्वामी गुरुचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं

असें च त्यांनीं म्हटलें आहे. त्यांत समर्थांचा अथवा तारकमंत्राचा उल्लेख हि नाहीं. येवढें च नव्हे तर गुरूंनीं दिलेल्या नामावर च दृढ विश्वास ठेवून मी बसलों असें ते स्पष्ट सांगतात.

(३) आत्मारामहाराज म्हणतात कीं, उपदेशकाळीं समर्थांनीं 'चैतन्य' साहश्य रूप धारण केलें. पण खुद्द तुकोबा आपल्या गुरूपदेशासंबंधीं तिसरें च सांगतात. ते म्हणतात —

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपण चि देव होय गुरु

आपल्या आराध्यदैवतानें च गुरुरूपानें आपल्यावर कृपा केली असा त्यांचा समज होता. येथें हि समर्थांचा उल्लेख नाहीं.

(४) वस्तुस्थिति अशी आहे कीं, तुकारामबोवा व समर्थशिष्य यांच्या परमार्थविषयक कल्पनेंत च मूळांत फरक आहे. आत्माराम महाराजांना तारकमंत्राविना कैवल्यपदवी मिळणें अशक्य वाटतें. तर तुकारामबोवांना कोणच्या हि नांवानें देवाला आळविलें तरी चालतें असें वाटतें, कारण देव हा साधकाचा आईबाप आहे. तुकारामबोवा म्हणतातः

भलतिया नामें आळविला पिता । परि तो जाणता कळवळा

तुकारामबोवा याच्यापुढें जाऊन म्हणतातः

सुलभ हें केलें सकळां जीवन । फुंकावे चि कान नलगेसे ॥

तुकारामबोवांना गुरु मान्य. पण गुरुचें बंड व मंत्राचा संकोचितपणा अमान्य.

(५) समर्थ व समर्थशिष्य यांचा आग्रह असा कीं, हा गुरु शक्य तोंवर ब्राह्मण असावा, उच्च जातीचा असावा. तुकारामबोवा अगदीं वेगळ्या मताचे, उदारमतवादी. ते म्हणतात:

उपदेश भलत्या हातीं। झाला चित्तीं धरावा॥

* * *

सोनियाचा कळस। माजि भरला सुरारस॥
काय करावें प्रमाण। तुम्ही सांगा संतजन॥
मृत्तिकेचा घट। माजि अमृताचा सांठ॥
तुका म्हणे हित। तें मज सांगावें त्वरित॥

तुकारामबोवा दुसऱ्या एका ठिकाणीं स्वच्छ म्हणतात कीं, शिक्क्याला मान आहे. कातड्याला कोण विचारतो? देवाचा शिक्का असेल तर भक्ताचा देह कोणत्या हि जातीचा असला तरी हरकत नाहीं. तो गुरु या पदवीला योग्य होऊं शकतो. खुद्द तुकारामबोवा रामेश्वरभट्ट, बहिणाबाई, निळोबा यांचे गुरु होते च कीं नाहीं? कै. राजवाडे यांनीं मात्र खुशाल लिहिलें आहे कीं, तुकारामबोवा उपदेश घेण्याकरितां आपल्याकडे आलेल्यांना दुसऱ्याकडे धाडीत असत! प्रस्तुत लेखकास वाटतें कीं, असल्या विधानांची योग्य किंमत जाणणें अवश्य आहे.

आतांपर्यंत अंतःप्रमाणांवरून समर्थांनी तुकारामबोवांना उपदेश दिला नाहीं हें सिद्ध केलें. आतां काळदृष्ट्याहि ही गोष्ट कशी असंभवनीय आहे हें आपण पाहूं. तुकारामबोवांचा जन्मशक भावे १५२९–३० देतात व प्रयाणकाल शक १५७२ असा सांगतात. समर्थांचा जन्मशक हि १५३० आहे. समर्थांचें जें चरित्र प्रसिद्ध आहे त्यांत लहानपणची हकीगत दोन प्रकारानें सांगण्यांत येतें. एक प्रसिद्ध प्रकार म्हणजे समर्थ हे विवाहसमारंभातून 'सावधान' ऐकून पळून गेले असा. भावे म्हणतात, हें खरें नसावें, समर्थ वैराग्यानें च गृहत्याग करून निघालेले असावेत. मुद्दा एवढाच कीं यावेळीं त्यांचें वय १२ धरण्यास हरकत नाहीं. नंतर १२ वर्षे तपश्चर्या व पुढें १२ वर्षे तीर्थाटन. मिळून समर्थ परत येऊन आपल्या मातोश्रींना भेटले ते सुमारें शक १५६६ च्या सुमारास व श्रीदासविश्राम-धामांत गांठ पडली म्हणून जी हकीगत आहे ती समर्थ प्रसिद्धीस आल्यावर म्हणजे शके १५६८ च्या सुमारास म्हणजे तुकारामबोवा इहलोक सोडण्याच्या पूर्वी सरासरी ४ वर्षे. आयुष्याचा इतका काळ होईपर्यंत तुकारामबोवा हे मंत्रजन्य अनुभवाविना च होते असें समजण्याचें धार्ष्टय त्यांच्या अभंगांचा कोणी हि वाचक

करणार नाहीं असें वाटतें. महिपतीबोवांनीं 'पूर्वार्ध संपलें, तळमळ लागली, गुरुकृपा प्राप्त झाली, मोठें साधन केलें' वगैरे जी हकीगत दिली आहे ती च वस्तुस्थितीस धरून असावी असें दिसतें.

तात्पर्य, वरील सर्व प्रमाणां च विचार केला असतां या लेखाच्या मथळ्यांत जो प्रश्न केला आहे त्यास एक च उत्तर देतां येईल कीं, समर्थ तुकारामबोवांचे गुरु नसले च पाहिजेत.

पण मग प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, असें जर आहे तर आत्माराम-महाराजांनीं ही मिथ्या हकीगत सांगितली कशी? त्याचें उत्तर सोपें आहे. आपण मोठ्या लोकांचे लिहिलेले इतिहास जर वाचले तर आपणांला अशा इतिहासांच्या लेखकवर्गांत एक प्रवृत्ति आढळून येते. लेखक हा आपल्या चरित्रनायकाचें महत्त्व सांगण्याकरितां तत्कालीन मोठे पुरुष त्याच्या चरित्रनायकाकडे येत असत असें सांगतो. हा एक महत्त्व वाढवण्याचा प्रकार आहे. विशेषतः धार्मिक श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांत तर हा दोष ठळकपणानें दिसतो. आपण येवढें च समजावयाचें कीं, आत्मारामममहाराज या प्रवृत्तीपासून मुक्त राहूं शकले नाहींत. आणखी हि एका दृष्टीनें याचा उलगडा होणें शक्य आहे. या विश्वकोशाकडे तो आख्यानांचा अथवा कथांचा संग्रह आहे या च दृष्टीनें बघणें अवश्य आहे. तो इतिहास नव्हे. अशा दृष्टीनें बघितलें म्हणजे मग कांहीं गोष्टी सांगणें क्षम्य ठरतें.

तात्पर्य, या लेखांत येवढें च प्रस्तुत लेखकास दाखवावयाचें आहे कीं, समर्थांनीं तुकारामबोवांना तारकमंत्राचा उपदेश केला ही सत्यकथा असणें संभवनीय नाहीं. आत्मारामममहाराजांनीं कां सांगितली हा प्रश्न गौण आहे. म्हणून त्याची विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं. आत्मारामममहाराजकथित व या च प्रकरणांत अंतर्भूत आहे म्हणून दुसऱ्या एका लहान गोष्टीचा विचार करूं व हा लेख संपवूं.

आत्मारामममहाराज म्हणतात कीं, समर्थांनीं 'तुका,' 'तुकप्पा' नांव बदलून 'तुकाराम' नांव ठेवलें., जाणत्यांना सांगावयास नको ही एक शब्दावरची कोटी आहे, या पलीकडे त्यांत सत्य नाहीं. अशा कोट्या करण्याचा प्रकार जुन्या वाङ्मयांत आढळतो. व दुर्दैवाने भावडे वाचक तें लेखकाच्या बुद्धीचें कौशल्य आहे हें न जाणून लेखक इसिहास च सांगत आहे असें समजतात. नामदेव हे शिंपी होते. शिंपी या शब्दावर कोटी करून कोणी लेखकानें 'शिंपल्यांत' जन्माला आले असें म्हटलें. झालें, तो च इतिहास होऊन बसला व प्रत्यक्ष नामदेव आपली आई आपल्याला 'मळमूत्रीं' प्रसवली असें म्हणतात हें लोक विसरून च गेले.

तसेंच येथें होण्याचा संभव असल्यानें प्रस्तुत लेखकानें आत्माराम महाराजांनीं ही कोटी केली आहे हें सांगण्याची घाई केली आहे.

ह्या कथा कशा तयार होतात हें 'तुकाराम' ह्या नांवासंबंधानें च एक कथा सांगून हें प्रकरण आटपूं. प्रस्तुत लेखक देहूस तुकारामबोवांच्या वंशजांतील एका वृद्ध गृहस्थाचें कीर्तन श्रवण करीत असतांना त्याला खालील गोष्ट ऐकावयास मिळाली. कीर्तनकारांना श्रोत्यांना 'तुकाराम' असें भजन करावयास सांगावयाचें होतें. त्याच्या पुष्ट्यर्थ ते म्हणाले, "वैकुंठांत जाण्यापूर्वी तुकोबाचें नांव 'तुका' च होतें. जेव्हां ते सदेह वैकुंठांत गेले, तेव्हां वैकुंठांतील लोकांना श्रीराम सदेह वैकुंठांत आल्याचें स्मरण झालें व त्यांनीं विचारलें 'तूं कां राम?' तेव्हांपासून 'तुकाराम' नांव प्रसिद्ध झालें. म्हणा तुकाराम तुकाराम..." कीर्तनांत सुद्धां करमणूक म्हणून च असल्या कथा योग्य. तात्पर्य, समर्थांनीं 'तुका'चें 'तुकाराम' नांव ठेवलें यालासुद्धां ऐतिहासिक सत्य म्हणणें कठीण आहे.

या लेखाच्या द्वारां येवढी च सुचना देणें अवश्य आहे कीं, श्री दासविश्रामधामांतील कथा या सत्य आहेत अथवा असत्य आहेत हें चिकित्सक दृष्टीनें परीक्षून मग च त्यांवर विश्वास ठेवावा. प्रथम साधूंच्या ग्रंथांचा अभ्यास; मग जोडीला तत्कालीन लोकांनीं इतिहास म्हणून सांगितलेल्या गोष्टी; यांतून मिळणारी माहिती एकत्र करून मग च चरित्रांतील सत्य गोष्टी ठरवाव्यात. येन्हवीं इतिहास व कथा यांत भेद रहाणार नाहीं.

# समर्थकालीन इतिहासाचें एक अलक्षित अंग

( लेखक – प्रो. **श्रीनिवास नारायण बनहट्टी**, एम्.ए., एल्एल्. बी., **नागपुर** )

" संपूर्ण राज्याचें सार तें दुर्ग "

" गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचें बल, गडकोट म्हणजे राज्य लक्ष्मी..."

– आज्ञापत्र

शिवाजी महाराजांच्या राजनीतींतलें एक प्रमुख तत्त्व 'आज्ञापत्र'कारानें वरीलप्रमाणें वर्णन केलें आहे. महाराजांनी संपादिलेलें राज्य दुर्गाश्रित होतें. केवळ राज्य च नव्हे, महाराष्ट्राची त्यावेळची संस्कृति दुर्गाश्रित व गिर्याश्रित होती. महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचें व बुद्धिमत्तेचें केंद्र सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत व कडेकपारांत त्यावेळीं येऊन स्थिर झालें होतें. पूर्वेकडून पश्चिमेकडे झालेलें हें केंद्राचें विचलन समर्थ रामदास व शककर्ते शिवराय यांच्या चरित्रांत दृष्टांतरूपानें पाहावयास मिळतें. रामदास व शिवाजी या दोघांचींही मूळ गावें महाराष्ट्राचा सपाट व सुपींक असा जो पूर्वेकडील भाग, जो आज बहुंशीं निजामच्या राज्यांत मोडतो, त्या भागांत होतीं. परंतु त्या भागांत पार्थिव संपदा खेळत असली तरी मानसिक व आध्यात्मिक संपदेच्या दृष्टीनें तो ओसाड व नापीक बनला होता, म्हणून रामदासांना काय किंवा शिवरायाला काय आपल्या कर्तृत्वाचे अंकुर सह्याद्रीच्या कडेकपारींमधून संवर्धित करावे लागले. सह्याद्रीच्या परिसरांत आणि गुहागर्भात 'म्लेंच्छाचें बहुतां दिसांचें बंड माजलेलें' नव्हतें. स्वत्वाचें, स्वधर्म - स्वभाषादिकांचें परिपालन या दुर्गम प्रदेशांत अधिक निर्वेधपणें होऊं शके. यास्तव या दोन्ही महापुरुषांनी गिरिदुर्गांचा आश्रय करून राष्ट्रीय संस्कृतीची जोपासना केली व स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. समर्थांनीं निःस्पृहाचीं लक्षणें सांगतांना

खनाळामधें जाऊन राहे । तेथें कोणी च न पाहे ।
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्व काळ ॥

अवघड स्थळीं कठीण लोक । तेथें राहाणें नेमक ।
सृष्टीमध्यें सकळ लोक । धुंडीत येती ॥

असें वेचक वर्णन केलें आहे. आणि, ' आधीं केलें मग सांगीतलें ' असा समर्थांचा बाणा होता. हें सुप्रसिद्ध च आहे! रामवरदायिनी भवानी माता गिरिकंदरांत व अरण्यांत प्रकट होऊन रामचंद्रास वर देती झाली!

राम सौमित्र हे बंधु। उदास धाकुटे वयें।
श्रीमंत लक्षणें मोठीं। दिसती मुख्य देवसे॥
फिरती थोर आरण्यें। कर्कशें गिरिकंदरें।
कपाटें विवरें झाडीं। झोतवे दर्कुटे कडे॥
अरण्या हिंडतां तेथ। कुमारी देखिली वनीं।
कुमारी बाळलीळा ते। दिसे त्रैलोक्यजननी॥

जशी रामचंद्रास तशी शिवरायासही ती गिरिकंदरांत च प्रसन्न होऊन वरदायिनी झाली. शिवाजीचा व्याप लहानपणापासून डोंगरी किल्ल्यांच्या आश्रयाने च चालू होता. सह्याद्रीचा पायथा व माथा यांत त्याची सर्व चळवळ सुरू होती, हें कोणाही मराठ्यास सांगण्याची आवश्यकता नाहीं. शिवाजीची मदतनीस सर्व लहान थोर मंडळी दऱ्याखोऱ्यांतली किंवा घाटमाथ्यावर राहणारी होती. ' डोंगरी उंदीर ' म्हणून मुसलमान सत्ताधारी त्यांच्या विरुद्ध मनगटें चावीत. परंतु डोंगरी उंदीर बनण्यांत च त्यांच्या शक्तियुक्तीचें सारसर्वस्व व साफल्य होतें.

भागवत धर्माची पताका फडकविणारे तुकोबाराय, चिंचवडचे मोरया गोसावी हेही सह्याद्रीच्या परिसरांतले च. सारांश, त्या काळच्या महाराष्ट्राची सगळी हालचाल व जागृति सह्याद्रि पर्वताच्या निकटच्या प्रदेशांत दिसून येत होती.

आणि हें साहजिक च होतें. पूर्वेकडील मैदानी मुलखावर मुसलमानी सत्तेनें वेगानें आक्रमण करून शेंकडो वर्षांपूर्वीपासून आपला अंमल बसविला होता. परकी अंमलाखाली स्वत्वाचें संरक्षण आणि विचारसंपदेचें संवर्धन करणें कठीण च पडतें. अर्थात् महाराष्ट्राचें स्वत्व व त्याची विचारसंपदा यांचें केंद्र पूर्वेकडून पश्चिमेकडे ढळूं लागलें. सबंध हिंदुस्थानांत स्वातंत्र्यरक्षणाच्या व संस्कृतिपरिपालनाच्या प्रयत्नांचा हा च प्रकार झालेला आढळेल. सबंध पंजाब व गंगानदीचें खोरें, हा सपाट व समृद्ध मुलूख मुसलमानांनी झपाट्यानें व्यापला. थेट बंगालपर्यंत त्यांच्या सत्तेच्या लोंढ्यास कोणी विशेष प्रतिबंध करूं शकला नाहीं. परंतु तेंच मुसलमानी आक्रमण राजपुतानाच्या रेताड व रुक्ष प्रदेशापाशीं अडखळलें. त्यांतही दिल्लीच्या केंद्रीय सत्तेजवळ असलेलीं अंबर (जयपूर), अजमेर वगैरे रजपूत राज्यें कांहीं काळानंतर दिल्लीच्या मुसलमान सुलतानापुढें मान वाकविती झालीं. हीं साधारणपणें सपाट व सुगम प्रदेशामध्यें

वसलीं असल्याकारणानें मुसलमानी आक्रमणाचा लोंढा जबरदस्त वेगानें त्यांवर येतां च त्यास तीं प्रतिबंध करूं शकलीं नाहींत. तें च मेवाडचें राज्य, अगोदर दिल्लीपासून दूर व त्यांतून अरवली पर्वताच्या सांनिध्यांत वसलें असल्याकारणाने मुसलमानी सत्तेशीं पिढ्यानपिढ्या झुंज खेळून आपलें स्वातंत्र्य अबाधित राखूं शकलें व आपल्या संस्कृतीचा विकास उज्वल रीतीनें करूं शकलें. त्यांतही लक्षांत घेण्याजोगी गोष्ट ही कीं, मुसलमान बादशहांच्या सैन्याचा मारा चुकविण्याकरितां मेवाडच्या राजांस आपली अत्यंत प्रिय अशी चितोड ही राजधानी सोडून उदेपूर शहर नवीन वसवावें लागलें. चितोडगड मैदानांत वसलेला आहे; दिल्लीकरांच्या सेना-समुद्रासमोर त्याचा टिकाव लागेना, तेव्हां अरवली पर्वताच्या छायेखालीं डोंगराळ मुलखांत उदेपूर हें शहर वसविण्यांत येऊन तेथें राजधानी नेण्यांत आली. डोंगराळ मुलखावर स्वारी करण्याच्या कामीं मुसलमानी फौज लटकी पडे, ही गोष्ट अनेक ठिकाणीं प्रत्ययास आलेली आहे.

जी स्थिती मेवाडची व एकंदर राजपुतान्याची तशीच मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्राची झाली. महाराष्ट्राचा पूर्व भाग हें एक विस्तीर्ण पठार असून बहुतांशीं सपाट आहे. डोंगरांच्या रांगा मधून मधून आहेत, त्या ठेंगण्या व चढण्या-उतरण्यास सुगम आहेत. अशा या सपाट व अफाट मैदानावर पसरलेले देवगिरीच्या यादवांचें साम्राज्य दिल्लीच्या सुलतानानें एकदोन धडका मारतांक्षणींच कोसळून पडलें. पुढें मुसलमानी सत्तेचे अनेक चढउतार झाले, क्रांत्या, उलथापालथी व फाटाफुटी झाल्या; परंतु महंमदीयांच्या सत्तेची या प्रदेशावरील पकड ढिली झाली नाहीं. राजकीय स्वातंत्र्याचा स्फुलिंग कायम ठेवण्याचें कार्य पश्चिमेकडील डोंगराळ व दुर्गम प्रदेशांतील काटक जनतेकडे आलें. तें कार्य त्या जनतेनें शिवरायाचा अवतार होईपर्यंत सुमारें ३०० वर्षें कसें पार पाडलें याचा इतिहास अजून नीटपणें उजेडांत यावयाचा आहे.

हा इतिहास जरी अद्याप तपशीलवार रीतीनें उजेडांत आलेला नसला तरी पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा व स्वसंस्कृतीची जोपासना करण्याची ही क्लुप्ति समर्थ व शिवराय यांना च प्रथम सुचली अगर त्यांनीं च प्रथम अमलांत आणली असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. आत्मरक्षणाची सहजवृत्ति [ instinct ] मनुष्यमात्रांत, त्याचप्रमाणें समाजांत व राष्ट्रांत सदोदित असते. त्या वृत्तीस अनुसरून धोक्याची व संकटाची जागा टाळून अधिक निरामय व सुरक्षित अशी जागा शोधण्याची खटपट मनुष्य, समाज किंवा राष्ट्र सदोदित करीत राहाणारच. मुसलमानांच्या आक्रमणापासून व दाणामारीपासून आपला बचाव करण्यासाठी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांचा व

गडकोटांचा आश्रय घ्यावा ही कल्पना सुचण्यास कांही अलौकिक प्रतिभेची जरूरी होती, असें नाहीं. आपला बचाव करण्याच्या विवंचनेने व्यग्र झालेल्या कोणत्याही राष्ट्रधुरीणास ही गोष्ट सहज सुचण्याजोगी होती. तेव्हा देवगिरीच्या यादवांचें साम्राज्य नष्ट झाल्यापासून तों शिवस्वराज्याची स्थापना होईपर्यंत जो साडेतीन शतकांचा दीर्घ काळ गेला त्यांत सह्याद्रीच्या परिसरामध्यें आपापलीं राज्यें स्थापून हिंदुसत्तेच्या स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याचा प्रयत्न अनेकांनीं केला असण्याचा संभव आहे.

अशा तऱ्हेच्या एका यशस्वी प्रयत्नाची तपशीलवार हकीकत आपणास सुसंगत रीतीनें उपलब्ध होऊं शकते, त्यावरून वरील अनुमान अधिकच बळकट होतें. हा प्रयत्न सह्याद्रींच्या उत्तर टोकाजवळील प्रदेशांत झाला. सह्याद्रीच्या रांगेची उत्तरेकडील परिसीमा ज्या प्रांतांत होते त्यास बागलाण म्हणतात. या प्रदेशांत सह्याद्रीची दोन उंच शिखरें साल्हेर व मुल्हेर नांवांचीं असून दोन्ही शिखरांवर मजबूत व दुर्भेद्य असे दुर्ग प्राचीन काळापासून बांधलेले आहेत. या दोन किल्ल्यांच्या आश्रयाने एक राठोडवंशीय 'बागुल' नांवाचें राजघराणें मुसलमानी सत्तेच्या धडकांस दाद न देतां निदान तीनशें साडेतीनशें वर्षे तरी मोठ्या ऐश्वर्यानें राज्य करीत होतें. या राज्याची माहिती मराठी वाचकांसमोर मुळीं च आलेली नाहीं असें नाहीं. कै. लक्ष्मणरावजी पांगारकरांनी आपल्या 'मराठी वाङ्मयाच्या इतिहासा'च्या तिसऱ्या खंडांत पृ. २४२ ते २५१ पर्यंत या राज्याचा गौरवयुक्त उल्लेख करून त्याचा थोडासा वृत्तांत दिला आहे. परंतु तो अगदी त्रोटक व अपुरा आहे. 'कथाकल्पतरु' नामक ओवीबद्ध मराठी ग्रंथाचा उत्तरार्ध रचणारा महादेव उर्फ मधुकर कवि हा बागुल वंशांतील बहिरामशाह नांवाच्या राजाच्या आश्रयास होता; त्याने आपल्या आश्रयदात्याचें, त्याच्या राज्याचें व राजधानीचें गौरवार्थ जें वर्णन केलें आहे त्याला गॅझेटीयर वगैरे ग्रंथांतील माहितीची जोड देऊन पांगारकरांनी वाचकांच्या नजरेसमोर एक गोड परंतु अंधुकसें चित्र निर्माण केलें आहे.

या राज्याविषयीं भरपूर, सुसंगत व विश्वसनीय माहिती देणारें एक साधन बरेच दिवसांपासून उपलब्ध असूनही त्याच्याकडे कोणाही मराठी विद्वानाचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. म्हणून पांगारकरांसारख्यास इकडून तिकडून माहितीचे कण जमवून आपली हकीकत कशी तरी साजरी करणें भाग पडलें आहे. याच बागुल-वंशावर संस्कृतांत एक स्वतंत्र महाकाव्य रुद्र नामक कवीनें रचिलेलें असून तें गायकवाड सरकारकडून प्रसिद्ध होणाऱ्या 'गायकवाड ओरिएंटल सीरीज' मध्यें १९१७ सालीं च प्रसिद्ध झालेलें आहे. संस्कृतांत 'विक्रमांकदेव चरित,' 'नव

साहसांक चरित' वगैरे जीं थोडीं ऐतिहासिक महाकाव्यें आहेत, त्यांत बरें च उच्च दर्जाचें ठरेल असें हें प्रस्तुतचें 'राष्ट्रौढवंश महाकाव्य' असून ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीनें तर तें अनुपम आहे.

या महाकाव्यामध्यें वर्णिलेल्या राजवंशाच्या वृत्तांताकडे वळण्यापूर्वी ज्या प्रदेशांत त्यानें राज्य केलें त्याचें भौगोलिक दृष्ट्या थोडें निरीक्षण करूं. सध्या इंग्रजांच्या राजवटींत जे जिल्हे पाडले आहेत, त्यांपैकीं नाशिक, पुणें व सातारा या तिन्ही जिल्ह्यांच्या पश्चिमेस पाठीच्या कण्याप्रमाणें सह्याद्रि पर्वताची मुख्य रांग लागलेली आहे, हें नकाशा पाहिल्यास कोणासही तात्काळ दिसून येणारें आहे. या तीन जिल्ह्यांपैकीं सर्वांत उत्तरेचा जो नाशिक जिल्हा तो सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर जाणाऱ्या मुख्य रांगेपासून निघून पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणाऱ्या अनेक डोंगरांच्या रांगांनीं व्यापिलेला आहे. पश्चिमेच्या बाजूस दक्षिणोत्तर पसरलेली सह्यपर्वताची मुख्य रांग, व तिजपासून फुटलेल्या अनेक शाखा पश्चिमपूर्व पसरलेल्या, अशी स्थिति असल्यामुळे या जिल्ह्यांत पश्चिमेकडे बंद व पूर्वेकडे खुले असलेले असे जणू कांहीं अनेक कप्पे च पडले आहेत. अगदी उत्तरेकडची, खानदेश व नाशिक या जिल्ह्यांच्या सीमेवरील डोंगरांची रांग सेलबारी किंवा गाळण्याचे डोंगर म्हणून प्रसिद्ध असून तिच्या उत्तरेस पांजरा नदीचें खोरें व दक्षिणेस बोरी नदीचें खोरें आहे. या रांगेंत पिशोल व गाळणा हे दोन मुख्य किल्ले आहेत. सेलबारीच्या दक्षिणेस डोलबारी नांवाची अशी च पूर्वपश्चिम जाणारी छोटीशी डोंगराची रांग असून तिच्या मधल्या पश्चिमेकडील एका उंच व दुर्गम शिखराला 'मयूराचल' असें नांव दिलेलें असून त्यावर मयूरदुर्ग अर्थात् मुल्हेरचा किल्ला वसलेला आहे. तेथून दक्षिणेकडे नजर फेकल्यास गिरणा नदीचें खोरें वसलेलें दृष्टिपथांत येतें. गिरणेच्या खोऱ्याच्या दक्षिणेस सुप्रसिद्ध सातमाळा उर्फ चांदवडच्या डोंगरांची रांग असून ही अनेक उंच शिखरांनीं व गडकोटांनी विभूषित झालेली आहे. या रांगेच्या जवळजवळ मध्यभागीं ४६०० फूट उंचीचें सप्तशृंग हें शिखर असून त्यावर सुप्रसिद्ध महिषासुरमर्दिनी देवीचें स्थान आहे. या रांगेंत, पश्चिमेकडून पूर्वेकडे, अचलगड, आहवंत, मार्किंडा, (इतिहास प्रसिद्ध मयूर खंडी), खळ्या-जवळ्या, धोडप, इंद्राई, चांदवड इत्यादि अनेक दुर्गम किल्ले आहेत. त्याच्या दक्षिणेस कडवा नदीचें व त्यानंतर गोदावरीचें खोरें असून त्याच्या दक्षिणेस गोदावरीचा उगम ज्यांतून झाला आहे ती त्र्यंबकेश्वरच्या डोंगरांची रांग लागते. या रांगेस च अंजनाद्रि असेंही नांव आहे. हिच्या दक्षिणेस दारणा नदीचें खोरें असून त्याच्या दक्षिणेस, म्हणजे नाशिक व नगर या जिल्ह्यांच्या सीमेवर कळसूबाईचे डोंगर आहेत. या सर्व डोंगराळ मुलखापैकीं उत्तरेकडील गाळण्याचे

गडकोटांचा आश्रय घ्यावा ही कल्पना सुचण्यास कांही अलौकिक प्रतिभेची जरूरी होती, असें नाहीं. आपला बचाव करण्याच्या विवंचनेने व्यग्र झालेल्या कोणत्याही राष्ट्रधुरीणास ही गोष्ट सहज सुचण्याजोगी होती. तेव्हा देवगिरीच्या यादवांचें साम्राज्य नष्ट झाल्यापासून तों शिवस्वराज्याची स्थापना होईपर्यंत जो साडेतीन शतकांचा दीर्घ काळ गेला त्यांत सह्याद्रीच्या परिसरामध्यें आपापलीं राज्यें स्थापून हिंदुसत्तेच्या स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याचा प्रयत्न अनेकांनीं केला असण्याचा संभव आहे.

अशा तऱ्हेच्या एका यशस्वी प्रयत्नाची तपशीलवार हकीकत आपणास सुसंगत रीतीनें उपलब्ध होऊं शकते, त्यावरून वरील अनुमान अधिकच बळकट होतें. हा प्रयत्न सह्याद्रीच्या उत्तर टोकाजवळील प्रदेशांत झाला. सह्याद्रीच्या रांगेची उत्तरेकडील परिसीमा ज्या प्रांतांत होते त्यास बागलाण म्हणतात. या प्रदेशांत सह्याद्रीचीं दोन उंच शिखरें सालेर व मुल्हेर नांवांचीं असून दोन्ही शिखरांवर मजबूत व दुर्भेद्य असे दुर्ग प्राचीन काळापासून बांधलेले आहेत. या दोन किल्ल्यांच्या आश्रयाने एक राठोडवंशीय 'बागुल' नांवाचें राजघराणें मुसलमानी सत्तेच्या धडकांस दाद न देतां निदान तीनशें साडेतीनशें वर्षे तरी मोठ्या ऐश्वर्यानें राज्य करीत होतें. या राज्याची माहिती मराठी वाचकांसमोर मुळीं च आलेली नाहीं असें नाहीं. कै. लक्ष्मणरावजी पांगारकरांनी आपल्या 'मराठी वाङ्मयाच्या इतिहासा'च्या तिसऱ्या खंडांत पृ. २४२ ते २५१ पर्यंत या राज्याचा गौरवयुक्त उल्लेख करून त्याचा थोडासा वृत्तांत दिला आहे. परंतु तो अगदी त्रोटक व अपुरा आहे. 'कथाकल्पतरु' नामक ओवीबद्ध मराठी ग्रंथाचा उत्तरार्ध रचणारा महादेव उर्फ मधुकर कवि हा बागुल वंशांतील बहिरामशाह नांवाच्या राजाच्या आश्रयास होता; त्याने आपल्या आश्रयदात्याचें, त्याच्या राज्याचें व राजधानीचें गौरवार्थ जें वर्णन केलें आहे त्याला गॅझेटीयर वगैरे ग्रंथांतील माहितीची जोड देऊन पांगारकरांनी वाचकांच्या नजरेसमोर एक गोड परंतु अंधुकसें चित्र निर्माण केलें आहे.

या राज्याविषयीं भरपूर, सुसंगत व विश्वसनीय माहिती देणारें एक साधन बरेच दिवसांपासून उपलब्ध असूनही त्याच्याकडे कोणाही मराठी विद्वानाचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. म्हणून पांगारकरांसारख्यास इकडून तिकडून माहितीचे कण जमवून आपली हकीकत कशी तरी साजरी करणें भाग पडलें आहे. याच बागुल-वंशावर संस्कृतांत एक स्वतंत्र महाकाव्य रुद्र नामक कवीनें रचिलेलें असून तें गायकवाड सरकारकडून प्रसिद्ध होणाऱ्या 'गायकवाड ओरिएंटल सीरीज' मध्यें १९१७ सालीं च प्रसिद्ध झालेलें आहे. संस्कृतांत 'विक्रमांकदेव चरित,' 'नव

साहसांक चरित' वगैरे जीं थोडीं ऐतिहासिक महाकाव्यें आहेत, त्यांत बरें च उच्च दर्जाचें ठरेल असें हें प्रस्तुतचें 'राष्ट्रौढवंश महाकाव्य' असून ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीनें तर तें अनुपम आहे.

या महाकाव्यामध्यें वर्णिलेल्या राजवंशाच्या वृत्तांताकडे वळण्यापूर्वी ज्या प्रदेशांत त्यानें राज्य केलें त्याचें भौगोलिक दृष्ट्या थोडें निरीक्षण करूं. सध्या इंग्रजांच्या राजवटींत जे जिल्हे पाडले आहेत, त्यांपैकीं नाशिक, पुणें व सातारा या तिन्ही जिल्ह्यांच्या पश्चिमेस पाठीच्या कण्याप्रमाणें सह्याद्रि पर्वताची मुख्य रांग लागलेली आहे, हें नकाशा पाहिल्यास कोणासही तात्काळ दिसून येणारें आहे. या तीन जिल्ह्यांपैकीं सर्वांत उत्तरेचा जो नाशिक जिल्हा तो सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर जाणाऱ्या मुख्य रांगेपासून निघून पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणाऱ्या अनेक डोंगरांच्या रांगांनीं व्यापिलेला आहे. पश्चिमेच्या बाजूस दक्षिणोत्तर पसरलेली सह्यपर्वताची मुख्य रांग, व तिजपासून फुटलेल्या अनेक शाखा पश्चिमपूर्व पसरलेल्या, अशी स्थिति असल्यामुळे या जिल्ह्यांत पश्चिमेकडे बंद व पूर्वेकडे खुले असलेले असे जणू कांहीं अनेक कप्पे च पडले आहेत. अगदी उत्तरेकडची, खानदेश व नाशिक या जिल्ह्यांच्या सीमेवरील डोंगरांची रांग सेलबारी किंवा गाळण्याचे डोंगर म्हणून प्रसिद्ध असून तिच्या उत्तरेस पांजरा नदीचें खोरें व दक्षिणेस बोरी नदीचें खोरें आहे. या रांगेंत पिशोल व गाळणा हे दोन मुख्य किल्ले आहेत. सेलबारीच्या दक्षिणेस डोलबारी नांवाची अशी च पूर्वपश्चिम जाणारी छोटीशी डोंगराची रांग असून तिच्या मधल्या पश्चिमेकडील एका उंच व दुर्गम शिखराला 'मयूराचल' असें नांव दिलेलें असून त्यावर मयूरदुर्ग अर्थात् मुल्हेरचा किल्ला वसलेला आहे. तेथून दक्षिणेकडे नजर फेकल्यास गिरणा नदीचें खोरें वसलेलें दृष्टिपथांत येतें. गिरणेच्या खोऱ्याच्या दक्षिणेस सुप्रसिद्ध सातमाळा उर्फ चांदवडच्या डोंगरांची रांग असून ही अनेक उंच शिखरांनीं व गडकोटांनी विभूषित झालेली आहे. या रांगेच्या जवळजवळ मध्यभागीं ४६०० फूट उंचीचें सप्तशृंग हें शिखर असून त्यावर सुप्रसिद्ध महिषासुरमर्दिनी देवीचें स्थान आहे. या रांगेंत, पश्चिमेकडून पूर्वेकडे, अचलगड, आहवंत, मार्किंडा, (इतिहास प्रसिद्ध मयूर खंडी), खळ्या-जवळ्या, धोडप, इंद्राई, चांदवड इत्यादि अनेक दुर्गम किल्ले आहेत. त्याच्या दक्षिणेस कडवा नदीचें व त्यानंतर गोदावरीचें खोरें असून त्याच्या दक्षिणेस गोदावरीचा उगम ज्यांतून झाला आहे ती त्र्यंबकेश्वरच्या डोंगरांची रांग लागते. या रांगेस च अंजनाद्रि असेंही नांव आहे. हिच्या दक्षिणेस दारणा नदीचें खोरें असून त्याच्या दक्षिणेस, म्हणजे नाशिक व नगर या जिल्ह्यांच्या सीमेवर कळसूबाईचे डोंगर आहेत. या सर्व डोंगराळ मुलखापैकीं उत्तरेकडील गाळण्याचे

डोंगर व सातमाळयाचे डोंगर यांमधील प्रदेशास 'बागलाण' म्हणतात. यांतून गिरणा व तिला उत्तरेकडून मिळणारी मोसम या दोन मुख्य नद्या वाहतात. हवेच्या दृष्टीनें हा प्रदेश उत्तम असून जलानें समृद्ध आहे. बागाइतीच्या पिकांबद्दल सर्व बागलाण प्रांत सुप्रसिद्ध असल्याबद्दल नाशिक जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्यें लिहिलें आहे. परंतु ही त्याची साठ वर्षांपूर्वीची कीर्ति आज कितपत कायम आहे हा प्रश्नच आहे! बागलाणांतील नापिकीबद्दल कांहीं वर्षांपूर्वी बरी च ओरड ऐकूं येत असे. असहकारितेच्या व कायदेभंगाच्या चळवळींतही बागलाणानें मोठी कीर्ति मिळविलेली होती हें पुष्कळांस स्मरत असेलच. ही ह्या प्रांताची स्वातंत्र्य-प्रियता व तेजस्विता परंपरागत आहे असें आपण आतां ऐसिहासिक माहितीच्या आधारें म्हणूं शकतों!

सध्यांच्या राजकीय व्यवस्थेंत मूळच्या बागलाणाचे बागलाण व कळवण असे दोन तालुके केले आहेत. मयूरगिरी उर्फ मुल्हेरगड (उंची समुद्रसपाटीपासून ४३२० फूट) हा बागलाण तालुक्यांत वायव्य कोपऱ्यांत असून त्याच्या पश्चिमेस सुमारें १० मैलांवर सालेरचा किल्ला सह्याद्रीच्या मुख्य रांगेंत एका उंच गिरीशिखरावर (उंची ५२९५ फूट) वसलेला आहे. सालेर नाशिक जिल्ह्याच्या हद्दीच्या बाहेर असून त्यावर व त्याच्या भोवतालच्या थोड्याशा प्रदेशावर गायकवाड सरकारचा अंमल चालतो.

शिवरायाच्या राज्यस्थापनेचें वर्णन करितांना 'आज्ञापत्र'कार म्हणतो– "शककर्ते छत्रपतीसाहेब (यांनीं)...सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादिलें." या विधानांत शिवस्वराज्याच्या दक्षिणेच्या ज्या मर्यादा उल्लेखिल्या आहेत, त्यांत ढिलेपणा बरा च आहे. जिंजीचा किल्ला कावेरी तीरापासून कितीतरी दूर उत्तरेस आहे. खेरीज शिवाजीचें राज्य कावेरी तीरापर्यंत सलगपणें मुळींच पसरलेलें नव्हतें. परंतु या विधानांत शिवस्वराज्याची उत्तरेकडील जी सीमा निर्दिष्ट केली आहे, ती लक्षांत घेण्याजोगी आहे. सालेरीच्या किल्ल्याविषयीं वर माहिती दिली च आहे. हा किल्ला मोरोपंत पिंगळे यांनीं सन १६७१ सालीं काबीज करून स्वराज्यास जोडला. 'अहिवंत' हा किल्ला सालेरीच्या दक्षिणेस सुमारें २२ मैलांवर सातमाळा रांगेंत आहे. सालेरीबरोबरच मोरोपंत पेशव्यांनीं हाही जिंकून घेतला असावा. मोरोपंतांच्या या स्वारीच्या पूर्वी फक्त ३२ वर्षे सालेर–मुल्हेर या किल्ल्यांवर औरंगजेबानें स्वारी करून तेथील बागुलांचें राज्य नष्ट केलें होतें! तत्पूर्वी कित्येक शतकें स्वराज्याचा उपभोग ज्यानें घेतला होता अशा या गगनभेदी दुर्गास शिवरायानें आपल्या स्वराज्याचा उत्तर दिक्पाल नेमिलें ही गोष्ट यथायोग्यच झाली.

शिवरायाचे जसे रायगड राजगड तसे बागुल राजांचे सालेर मुल्हेर हे होत. ज्या बागुल राजांनीं अतिशय चातुर्यानें व दूरदर्शीपणानें या किल्ल्यांना आपल्या राजधान्या बनविलें त्या राज्यांच्या कुलवृत्तांताकडे आपण आता वळूं. फिरिश्ता व इतर दख्खन देशचे मुसलमानी इतिहासकार यांच्या तवारिखांमधून त्याचप्रमाणें ऐने अकबरीमध्यें, जहांगिरच्या आत्मचरित्रामध्यें या वंशांतील राजांचे तुटक उल्लेख अगदीं क्वचित आढळतात. तेवढी च काय ती माहिती या राजघराण्याविषयीं पूर्वी उपलब्ध होती. वर सांगितल्याप्रमाणें 'मधुकर' नांवाच्या मराठी कवीने आपल्या 'कथाकल्पतरु' ग्रंथांत बागुलांच्या अगदीं अखेरच्या राजाविषयीं व त्यावेळच्या राज्यस्थितीविषयीं वर्णन केलें आहे. परंतु तेंही अगदी त्रोटक, अपुरें व क्वचित् स्थळीं चुकीचेंही आहे. या राजवंशाविषयीं विस्तृत व विश्वसनीय माहिती देणारें असें 'राष्ट्रौढवंश महाकाव्य' हें एक च साधन होय. आता बोलून चालून हें काव्य असल्यामुळे त्यांत काल्पनिक व अलंकारप्रचुर वर्णनें, वर्ण्यविषयाचा अतिशयोक्तिपूर्ण गौरव या गोष्टी असणार च. परंतु ही सर्व काव्यमय अवडंबराची प्रभावळ बाजूस सारली तर अंतर्भागीं शुद्ध ऐतिहासिक वृत्तान्ताची स्फटिकमय शाळुंका नजरेस आल्याखेरीज राहत नाहीं. या ऐतिहासिक वृत्तान्ताचें आपण आता निरीक्षण करूं.

'राष्ट्रौढवंशा' चे एकंदर २० सर्ग आहेत. प्रस्तुत लेखांत सर्गाच्या अनुक्रमानें च सर्व वृत्तान्त दिलेला आहे; तथापि या काव्यांतील मजकुराचा च केवळ अनुवाद येथें केलेला नसून इतर ठिकाणांहून मिळणाऱ्या माहितीची जोड देऊन स्वतंत्र विवरणाच्या स्वरूपांत एकंदर निष्कर्ष मांडला आहे.

पौराणिक पद्धतीस अनुसरून प्रत्येक राजवंशाची उत्पत्ति कांहींतरी उद्भूत व अपौरुषेय अशा मार्गानें झाल्याचें वर्णन करण्यांत येतें. तसें च वर्णन राष्ट्रौढ वंशाच्या उगमासंबंधींही प्रस्तुत काव्यांत केलेलें आहे. कन्यकुब्ज नगराचा सूर्यवंशी राजा नारायण पुत्रप्राप्तीकरितां शंकराचें ध्यान करीत होता. कन्यकुब्ज नगरावर राज्य करण्याकरितां एका शिशूची मागणी करण्याकरितां 'लातना' नांवाची देवी श्रीशंकरांच्याकडे गेली असतां शंकरांनीं आपल्या जवळील चंद्रकलेपासून निर्माण झालेला अकरा वर्षे वयाचा एक तेजस्वी कुमार तिला दिला. तिनें तो राजा नारायणास आणून अर्पण केला. हा सुलक्षणी कुमार पाहून नारायणास अत्यानंद झाला हें सांगणें नको च. कुमाराचें नांव देवीने च 'राष्ट्रौढ' असें ठेविलें. हा नारायणानंतर कन्यकुब्ज नगराचा राजा झाला. हा च राष्ट्रौढवंशाचा मूळ पुरुष होय. (सर्ग १)

राष्ट्रौढ हा शब्द राठोड यांचें संस्कृतीकरण होय हें स्पष्ट आहे. बागलाणावर राज्य करणारे बागुलराजे आपणास राठोड म्हणवीत असत. वर वर्णिलेली दंतकथा बागुलांनीं 'राठोड' या वंशनामावर सांगितलेला जो हक्क, त्याच्या समर्थनाकरितां निर्माण झालेली दिसते. इतिहासांत अतिप्रसिद्ध असलेलें दुसरें राठोड घराणें जोधपूर ऊर्फ मारवाडच्या राजांचें होय. जोधपूरचे राठोड हे पृथ्वीराज-संयोगितेच्या अद्भुत व रोमहर्षण कथेमध्यें खलपुरुषाची भूमिका वठविणाऱ्या कान्यकुब्जनगराधिपति जयचंद राठोडपर्यंत थेट आपली पूर्वपरंपरा नेऊन भिडवितात. त्याच्याशीं या 'राष्ट्रौढ' नांवाचा व वर सांगितलेल्या उत्पत्तिविषयक दंतकथेचा कांहीं संबंध दिसत नाहीं. तथापि सालेर मुल्हेर येथील बागुलांचा मूळ उगम कनोज येथें राज्य करणाऱ्या राठोड घराण्यांत सापडतो कीं काय, व अशा रीतीनें जोधपूरच्या राठोड राजांचा व यांचा कोठेंतरी धागा जुळतो की काय हें पाहणें हा एक संशोधनाचा विषय होऊं शकेल. ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, रायगडास राज्य करणाऱ्या भोसल्यांनीं मेवाडांतील शिसोदे घराण्यापासून आपली उत्पत्ति सांगितली, तर सालेरी येथील बागुल हे कानोजच्या व जोधपूरच्या राठोडांचें नाव हें आपलें वंशनाम म्हणून धारण करितात.

मराठे जातीमध्यें 'बागल' हें एक आडनांव आहे. तें 'बागुल' या नांवापासून निघालें आहे कीं काय हाही एक संशोधनीय विषय आहे.

राष्ट्रौढापासून वंशक्रमानें सातवा राजा 'गंगाजल' नांवाचा झाला. त्याला फार दिवस संतति नसल्यामुळे त्यानें लातना देवीला प्रसन्न करून घेण्याकरितां तप केलें, तेव्हा त्याला कालसेन व गोपचंद्र नांवाचे दोन मुलगे झाले. कालसेनाला गौतमऋषीच्या प्रसादानें उज्जयिनीचें राज्य मिळालें. परंतु कांहीं दिवसांनीं तेथून तो परत कनौजला आला. पुढें काशीच्या राजानें कनोजवर स्वारी केली; त्याच्याशीं सामना देण्याकरितां दोघे बंधु सैन्य घेऊन निघाले तों वाटेंत यमुना दुथडी भरून चालली होती. कालसेन सैन्यासह परत फिरूं लागला, तेव्हां गोपचंद्रानें 'क्षात्रधर्माला बट्टा लावतो आहेस,' अशी त्याची निर्भर्त्सना केली. नदी तरून जाण्याला आपल्याजवळ उपाय तरी कोणचा आहे? असा कालसेनानें प्रश्न करितांच गोपचंद्रानें आपलें मस्तक छाटून टाकून नदी तरून जाण्याकरितां कबन्ध बंधूला दिलें. त्या कबंधा-वरून नदीपार होऊन कालसेन राजानें काशी राजाचा पराभव केला व परत येऊन आपला भाऊ जिवंत व्हावा म्हणून चक्रेश्वरीची आराधना केली. देवीनें प्रसन्न होऊन गोपचंद्राचे कबन्ध व शिर वनदेवतांकडून आणवून तें साधलें. साधतांना तें तेढें बसल्यामुळें गोपचंद्राचें रूप लहान मुलांना भय वाटेल असें भेसूर दिसूं

लागलें, म्हणून त्यास 'बागुल' असें नांव पडलें. या गोपचंद्राचा वंश 'बागुल' या नांवानें प्रख्यातीस आला.

या ठिकाणीं 'बागुल' या शब्दाचा अर्थाच्या आधारानें काल्पनिक कारण देऊन 'बागुल' या वंशनामाची उपपत्ति देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ही कवीची च क्लृप्ति असेल असें नाहीं. ही दंतकथा परंपरेनेंच बहुधा चालत आली असेल. शब्दांच्या अर्थाच्या आधारानें दंतकथा कशा निर्माण होतात याचें हें एक उदाहरण मानिल्यास चालेल. बागुल म्हणजे 'मुलांना भय दाखविण्याकरितां कल्पिलेला भयंकर माणूस'. हा शब्द या अर्थी मराठींतच प्रचलित आहे. कनोज येथें राज्य करणाऱ्या गोपचंद्राच्या भेसूरपणामुळें 'बागुल' हा 'भयंकर मनुष्य' या अर्थाचा मराठी शब्द त्याला लावण्यांत आला अशी, या दंतकथेस अनुसरून, कल्पना करण्यापेक्षां बागुल वंशाचे लोक महाराष्ट्रांत आले, त्यांचा वेश, मुद्रा वगैरे विचित्र असल्यामुळें 'बागुल' हा शब्द मुलांना भीति दाखविण्याकरितां मराठी भाषेंत वापरण्यांत येऊं लागून त्याचा वरीलप्रमाणें अर्थ रूढ झाला असावा, ही च कल्पना अधिक सयुक्तिक दिसते. तात्पर्य, 'बागुल' वंशानें तीन चिरस्थायी गोष्टी महाराष्ट्रास प्रदान केल्या:—१ त्यांनीं ज्यांत वस्ती केली त्या प्रदेशास बागलाण नांव मिळालें; २ त्यांच्या वंशांतून 'बागल' या आडनांवाचें मराठे घराणें उद्भवलें; ३. 'बागुलबोवा' हा सामान्य अर्थाचा शब्द मराठी भाषेंत आला.

असो. कालसेन पुढें अवन्तीपुरीला राज्य करण्याकरितां निघून गेला व गोपचंद्र कनोजचा राजा झाला. गोपचंद्राच्या वंशांत बारा राजे झाल्यानंतर तेरावा राजा कान्हर नांवाचा झाला. कान्हराचा मुलगा सिंहन. हीं दोन्हीं नांवें देवगिरीच्या यादव वंशांतील राजांच्या नांवांसारखीं दिसतात, हा एक मुद्दा लक्षांत ठेवण्याजोगा आहे सिंहनाला चार मुलगे: जाखराज, हरिहर, यशस्वान आणि सोहड. यांपैकीं आपणाला फक्त तिसऱ्या यशस्वानाशीं च कर्तव्य असल्यामुळें बाकीच्या तिघांच्या हकीकती, ऐतिहासिक दृष्टीनें संशोधन करण्याजोग्या असल्या तरी, आपण सोडून देऊं. यशस्वान हा दक्षिणेंत नशीब काढण्याकरितां आला तो देवगिरीच्या रामदेवाच्या आश्रयास आला. रामदेवाच्या मुलीशीं विवाह करून त्यानें 'तलकुंकण' नांवाच्या 'पल्ली' (वाडी) चें रक्षण केलें (?) यशस्वानाचा मुलगा गजमल्लदेव यानें गुर्जर व मालव हे प्रांत जिंकले आणि यवनांचा राजा अल्लाउद्दीन याला मारून त्याचा प्रदेश हस्तगत केला. मालुगिराजा हा गजमल्लदेवाचा पुत्र होय. नऊ लक्ष धनुर्धर ज्याच्या पदरीं होते अशा रामराजाचा त्यानें युद्धांत पराभव केला. त्याचा मुख्य सचिव हेमाद्रि यानें प्रार्थना केल्यावरून मालुगीनें देवगिरीचा अधिपति रामराजा याला आपला

मांडलीक बनवून सोडून दिलें. या मालुगीनें बारा राजांच्या संघास जिंकून मोठी कीर्ति मिळविली होती. मालुगीचा मुलगा पेयिदेव यानें नवीनसाहस्र नामक देशाचा राजा लंकिवंशांतील मायिदेव याला जिंकून बारडुली (बार्डोली) नांवाची मोठी नगरी भस्मसात् करून टाकली. त्याचा मुलगा नानदेव हा पुढें राजा झाला. त्यानें जैत्रपुर नांवाचें शहर वसविलें. गोपांचा अधिपति महेश याला जिंकून त्यानें शालागिरि (सालेर) घेतला. शालागिरीवर निवास करून नंतर बऱ्याच काळानें त्यानें मयूराचल काबीज केला आणि नंतर जगच्छाय नांवाच्या राजाला जिंकून पिशोलगडही आपल्या ताब्यांत आणला. यज्ञखेट नांवाच्या गांवीं नानदेवानें यज्ञ करून तें गांव यज्ञांतील अध्वर्यु ब्राह्मणाला दक्षिणा म्हणून दिलें. आभीरांचा राजा जगरीकदेव याच्यावर स्वारी करून नानदेवानें त्याला जिंकलें. त्याची राणी जैत्रा ही मोठी धर्मपरायण व दानशूर होती. नानदेवाच्या राज्यावर अखेरीस दिल्लीश्वरानें स्वारी करून शालागिरि उर्फ सालेरास वेढा दिला. नानदेव आणि दिल्लीचा सुलतान यांचा घोरतर संग्राम होऊन सरतेशेवटीं ७०० सैनिकांनीं नानदेवावर हल्ला करून त्याला युद्धांत मारलें. त्याचा मुलगा एकदेव हा गादीवर बसला.

येथपर्यंतची हकीकत मूळ काव्यांतील वर्णनास अनुसरून हुबेहूब दिली आहे. येथें आपण इतिहासाच्या क्षेत्रांत आलों असल्यामुळें याविषयीं जरा विचार केला पाहिजे. यशस्वानानें देवगिरीच्या रामदेवरावाच्या मुलीशीं जर विवाह केला असेल तर त्याच्या नातवानें रामदेवरावालाच पराभूत केलें असणें काळाच्या दृष्टीनें शक्य नाहीं. यशस्वानानें दुसऱ्या कोणातरी यादव राजाच्या मुलीशीं विवाह केला असेल. गजमल्ल देवानें अल्लाउदिनास मारलें हें विधान उघड उघड अतिशयोक्तीचें असलें तरी त्यानें अल्लाउद्दिनाच्या सैन्याच्या एखाद्या शाखेचा पराभव केला असणें शक्य आहे. काव्यांतील हकीकतीवरून दोन तात्पर्यें ऐतिहासिक दृष्ट्या काढण्यास हरकत दिसत नाहीं. गजमल्ल व मालुगी हे दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन व देवगिरीचा रामदेव यांचे समकालीन होते, हें एक आणि हे बरेच पराक्रमी पुरुष असून त्यांनीं बागुलांच्या स्वतंत्र राज्याचा पाया घातला असावा, हें दुसरें. यानंतर नानदेव यानें शालागिरि (सालेर) व मयूराचल (मुल्हेर) हे दोन्ही गड घेऊन बागुलांच्या राज्याची दृढ संस्थापना केली. तवारिख-ई-फिरोजशाही यांत सालेर व मुल्हेर हे दोन डोंगरी किल्ले इ. स. १३४०च्या सुमारास मानदेव (नानदेव) नांवाच्या सरदाराच्या ताब्यांत होते असें म्हटलें आहे. त्यावरूनही आपण वर केलेल्या तर्कांना दुजोरा मिळतो. सारांश बागुलांचें राज्य बागलाणांत इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या अखेरीस म्हणजे देवगिरीच्या साम्राज्याच्या ऱ्हासकाळीं स्थापन झालें.

नानदेवाचा पुत्र एकदेव यानें यवनांना मारून काढून शालागिरि पुनः जिंकला व तेथें निष्कंटक राज्य केलें. त्याचा मुलगा खङ्गसेन यानें समुद्रापर्यंतच्या भूमिप्रदेशाचा उपभोग घेतला, असें काव्यांत म्हटलें आहे. या काळांत बागुलांच्या राज्याची सीमा खरोखरच पश्चिमेस समुद्राला भिडली असण्याचा संभव आहे. खङ्गसेनानें ८००० मोगल वीरांचा पराभव करून लळिंगच्या किल्ल्याचा यवन अधिपति मल्लिक याला जिंकून बंदींत ठेवलें. खङ्गसेनाचा पुत्र श्रीराम; श्रीरामाचा पुत्र वीरसेन यानें यवनांचें लोहपुर नांवाचें नगर जाळून भस्मसात केलें. वीरसेनाच्या मृत्यूसमयीं त्याचा मुलगा जोपिदेव हा अगदीं लहान होता. त्याच्या अमदानींत राज्यांत निर्नायकी होऊन गोंधळ माजला. दरबारच्या अंमलदारांनीं निरनिराळ्या वस्तु लांबवून राजवैभवाचा विध्वंस मांडला. बाह्य शत्रूंनीं आमिषावर टपलेल्या गिधाडांप्रमाणें वातावरण आक्रांत केलें. तेव्हां राज्यांतील कांहीं शहाणे मंत्री वीरसेनाचा धाकटा भाऊ नानदेव याच्याकडे गेले व त्यांनीं त्याला राज्याचा स्वीकार करण्याची विनंती केली. (सर्ग ३) नानदेवानें आपल्या सल्लागारांचा विचार घेऊन राज्य हस्तगत करून घेण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें प्रथम त्यानें सालेरीवर स्वारी करून तो किल्ला जिंकून स्वतःच्या नांवानें राज्य करावयास सुरुवात केली. बाकीचे किल्ले फारसे प्रयास न करितां त्याच्या स्वाधीन झाले. कित्येक सरदारांनीं आपल्या जवळचे खजिने त्याला नजराणा म्हणून दिले. यवनांच्या रक्ताची नदी आपल्या भुजपराक्रमरूपी नौकेनें तरून जाऊन नानदेवानें मयूरगिरि एका क्षणांत सर केला. त्यानंतर चामराचल व पिशोलपर्वत हे घेऊन स्तंभ आणि देवरमाल हे दोन गड ही त्यानें सर केले. गोदावरीच्या तीरापर्यंत त्याने आपला अंमल बसविला. मंडपाद्रि (मांडु) जिंकूं इच्छिणाऱ्या मालवदेशाधिपतीला त्यानें सहाय्य केलें. व दाक्षिण देशाच्या राजाला जिंकून वैदुरि नामक पुरी लुटली. याप्रमाणें नानदेवानें मोठा पराक्रम गाजवून राज्याचा विस्तार केला. ब्राह्मणांना आश्रय देऊन शब्दब्रह्माचा गौरव साधिला. जनकराजापेक्षाही परब्रह्मैकनिष्ठ असा झाल्यावरून जगतांत सर्वत्र त्याची 'नानब्रह्म' या नांवानें ख्याति झाली. जैत्रपुरामध्ये तो राज्य करीत असतां सर्व लोक रामराज्याचा अनुभव घेत होते. (सर्ग ४)

नानदेवाचा मुलगा भैरव, त्यानंतर डोमराज, नंतर महादेव आणि त्याच्यानंतर भैरवसेन याप्रमाणें अनुक्रमानें राजे झाले. महादेव हा शिवाचा मोठा भक्त होता. त्यानें मयूराचलावर अतिशय मनोरम असें मंदिर बांधून तेथें शिवदेवतेची विधिवत् प्रतिष्ठापना केली. त्यानें शिवाची भक्तिपूर्वक स्तुति केल्यावर श्रीशंकरानीं त्याला दर्शन दिलें व वर मागण्यास सांगितलें. शंकराच्या वरानें राजा महादेव यास मानवती नांवाच्या राणीपासून भैरवसेन नामक पुत्र झाला. (सर्ग ५) प्रस्तुत

काव्याचा नायक जो नारायणशाह त्याचा भैरवसेन पिता असल्यामुळें त्याच्या पराक्रमाचें कवीनें बऱ्या च विस्तारानें वर्णन केलें आहे. गुजरातचा सुलतान बहादुरशहा दक्षिण दिग्विजयार्थ निघाला असतां त्यानें भैरवाचें साह्य मागितलें. भैरवसेन बहादुरशहाच्या मदतीकरितां स्वतःचें सैन्य घेऊन निघाला. देवगिरीस राज्य करणाऱ्या निजामशहावर दोघांनीं मिळून स्वारी करून देवगिरीचा किल्ला घेतला. तेथून बहादुरच्या विनंतीवरून भैरवसेनानें चित्रकुटावर ( चितोड ? ) स्वारी करून तेथील राजाला शरण आणिलें. यांची जबरदस्त स्वारी आलेली पाहून दिल्लीचा बादशाहा हुमायूं हा प्रचंड सेना घेऊन यांना विरोध करावयास आला. बहादुर बाजूला राहिला, भैरवसेनाने प्रचंड पराक्रम करून हुमायूंच्या सैन्याचा पराभव केला व बहादुराकडून धन्यवाद घेतले. बहादुरानें मोठमोठे नजराणे देऊन आपल्या मित्राचा गौरव करून त्यास निरोप दिला ( सर्ग ६ ). गरुड उपनांवाच्या काशीहून आलेल्या विद्वान ब्राह्मणानें सांगितल्यावरून भैरवानें सोमयाग केला. तदनंतर गोदातीरीं स्नान करून त्र्यंबकेश्वरास जाऊन तेथील लिंगाचें दर्शन घेऊन दानधर्म केला आणि शत्रुराजाच्या ताब्यांत असलेल्या निफालखोटा ( निफाड ) वर स्वारी करून तेथील अंमलदारास पदच्युत करून त्याचा खजिना लुटला. पुढे सप्तशृंग पर्वतावर जाऊन अष्टादशभुजा असलेल्या तेथील आदिमायेचें दर्शन घेतलें. नंतर हस्तिगिरी (हातगड) गाळणा, अलाङ्गल ( आलंग ) हे किल्ले जिंकून तो राजधानीस परत आला.

भैरवास सात मुलगे. पैकी दुसरा वीरसेन उर्फ वीरमशाह गादीवर बसला. चवथा नारायणशाह हा विशेष पराक्रमी व बुद्धिमान होता. दोघां बंधूंनीं गुजरातेंतील ब्यारा नामक दुर्गावर हापसी ( हबशी ? ) पठाणांची बलिष्ठ सेना चालून आली असतां मोठ्या शर्थीनें तिचा प्रतिकार केला. गुजरातेच्या चिंगसखान नामक सुलतानवर खानदेशच्या मीर सुलतानानें स्वारी केली असतां चेंगिसखानानें बागुलांची मदत मागितली तेव्हांही या दोघां बंधूंनीं त्यास साहाय्य केलें. शत्रूच्या भीतीनें चिंगसखान च थाळनेर येथें सैन्याची छावणी घातली असतां तेथून पळाला ही गोष्ट निराळी ! ( सर्ग ७ )

वीरसेन पुढें विषयविलासामध्यें मग्न होऊन दुर्गावती नामक आपल्या राणीच्या हातांतलें केवळ बाहुलें बनला. तिनें असूयेस वश होऊन नारायणशाह यास त्याच्या बायकामुलांसह मयूरगिरीवरून घालवून देण्याची सल्ला राजास दिली. कुरकुरत कां होईना, परंतु राजास त्याप्रमाणें करणें भाग पडलें. नारायणशाह राजाज्ञेनुसार सिरवाड नांवाच्या खेड्यांत येऊन राहिला. राज्यांतल्या अनेक किल्ल्यांवरचे अधिकारी येऊन त्याला सर्व राज्य आपल्या ताब्यांत घेण्यास सांगूं लागले. पांचशें स्वारांनिशीं नारायणशाहानें सालेरवर हल्ला करून तो किल्ला ताब्यांत

घेतला. तेथील लोकांनीं त्याचें स्वागत केलें. हें ऐकतां च वीरमशाह गडबडला. त्यानें एकलासखान नांवाच्या सरदाराला बातमी आणण्याकरितां पाठविलें, तो वाटेंतून च घडलेली हकीकत ऐकून घाबरून परत आला. तेंव्हां वीरसेनाने लुमायिजी नांवाच्या आपल्या सावत्र आईला नारायणाकडे पुढील निरोप देऊन पाठविलें.—

अहं जरामृत्युचमूपराजितो
न मे सुतो राज्यमिदं तवैतत्।
इमां धुरन्न: परिवोढुमक्षमा -
न्नरेंद्र नारायण पालयाधुना ॥

'मजवर जरा व मृत्यू यांच्या सैन्याने अंमल केला आहे. मला पुत्र नाहीं. हें राज्य तुझें च आहे. तरी ही राज्यधुरा तूं स्वीकारून तिचा प्रतिपाळ कर!' निरोप पोंचतांच आपला ज्येष्ठ पुत्र प्रतापशाह याला यौवराज्यपदावर नियुक्त करून सालेरच्या संरक्षणार्थ ठेवून नारायण स्वतः लवाजम्यासह मयूरगिरीप्रत यावयास निघाला. (सर्ग ८.) हा नारायणशाह राष्ट्रौढवंश 'महाकाव्या'चा नायक होय. याच्या च आश्रयास आलेल्या रुद्र नामक पण्डितानें हें काव्य रचिलें. येथून पुढें अखेरपर्यंत नारायणशाहाच्या वर्णनानेंच काव्याचा सर्व भाग व्यापला आहे. त्यांत मृगयाविहार - ऋतुशोभा, जलक्रीडा, शृंगार, कामक्रीडा वगैरे मामुली गोष्टींचें साहित्यशास्त्रीय नियमांस अनुसरून केलेलें वर्णन चारपांच सर्गांमध्ये (१३-१७) आहे तें वगळून ऐतिहासिक कथेचा सारांश तेवढा येथे देण्याचा यत्न करूं.

नवव्या सर्गांत नारायणशाह याला मयूरगिरीवर करण्यांत आलेल्या राज्याभिषेकाचें उज्ज्वल वर्णन आहे. अभिषेकानंतरच्या अभिनंदनसमारंभांत शार्ङ्गधर पंडित व त्याचा पुत्र लक्ष्मण पंडित यांनीं नारायणाची माता यमाम्बा हिची तिच्या धार्मिकतेबद्दल, श्रेष्ठता, चारित्र्याबद्दल व दानशूरतेबद्दल स्तुति केली. नारायणानें लुमायिजि, शार्ङ्गधर पंडित व भाव पण्डित या तिघांना बालेकिल्ल्यांत दडून राहिलेल्या वीरसेनाकडे पाठविलें. दोघां भावांची प्रेमपूर्वक भेट होऊन वीरसेनाला इतमामासह एक राजवाडा राहण्याकरितां देण्यांत आला. (सर्ग ९). पुढें नारायणशाहाच्या आदर्शभूत प्रजापालन रीतीचें, त्याच्या राजलक्ष्मीचें व कीर्तीचें कवीनें अलंकारिक तऱ्हेनें फार सुंदर वर्णन केलें आहे. (सर्ग १०). अकराव्या सर्गांत दाक्षिण देशच्या राजाचें सेनापति मोठें सैन्य घेऊन मयूराचल जिंकण्याकरितां आले असतां त्यांचा नारायणशाहाच्या सैन्यानें कसा पराजय केला याचें वीररसप्रचूर वर्णन आहे. शत्रूच्या सैन्यानें प्रथम अनंतपुरास येऊन तेथें छावणी ठोकली. तेथून तें नवपुरापर्यंत चाल करून आलें. नारायणानें मयूरगिरीचा कडेकोट बंदोबस्त करून

शत्रुसैन्यावर प्रथम तोफांची मारगिरी करून त्यांस झोडपून काढलें व नंतर आपलें सैन्य त्याच्यावर लोटून त्याला पळतां पळतां भुई थोडी केली. उरलेलें शत्रुसैन्य पळून अनंतपुरास गेलें व तेथें झाडें वगैरेच्या साहाय्यानें त्यानें आपल्या छावणी-भोवतीं वलय तयार केलें. या विजयोत्सवांतच नारायणानें आपल्या हरिहर नांवाच्या मुलाचा विवाहही उरकून घेतला. पुढें शत्रुसैन्याच्या कांहीं टोळ्यांनीं अरावी-पुरीकडे व कांहीं जणांनीं देवस्थानपुर नांवाच्या गांवाकडून चाल करून येण्याचा प्रयत्न केला. परंतु हेही प्रयत्न मोडून काढण्यांत आले. शत्रु पुनः आपलें बळ सावरून मोखवट नांवाच्या गांवापर्यंत चालून आला. तेव्हां नारायण स्वतः गड उतरून जैत्रापुरापर्यंत गेला व तेथून त्यानें आपलें पायदळ सैन्य शत्रुसैन्यावर धाडलें. शत्रुसैन्याचा अखेर पूर्ण मोड होऊन तें आपल्या देशास परत गेलें. सैन्यानें जिंकलेली प्रचंड लूट नारायणानें सैन्यासच बहाल केली. (सर्ग ११)

बाराव्या सर्गांत नारायणशाहाच्या गोदावरीयात्रेचें वर्णन आहे. हस्तगिरीवर (हातगड) एक रात्र मुक्काम करून नारायण यात्रार्थी लोकांच्या मोठ्या समूहासह नाशकास पोचला. तेथें गोदावरीची स्तुति करून त्यानें विधिवत् स्नान केलें. तेथें एक चमत्कारिक प्रकार घडला. शत्रुराजाचा एक 'तुरुष्क' अंमलदार नारायण राजाकडून ज्यांना देणग्या मिळतील त्यांजकडून कर उकळावा असें मनोराज्य करीत असतां त्याला लोकांनीं खोल पाण्यांत ढकलून दिलें. तेव्हां नारायणानें स्वतः हात देऊन त्यास वर काढलें. विधिवत् जप, तर्पण, हिरण्यश्राद्ध इ. करून राजानें दानें दिलीं, सुन्दरेश्वर आणि कपालि महेश्वर या देवांची पूजा केली व पंचवटीस जाऊन श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन त्याची भक्तिपूर्वक स्तुति केली. नाशकास ब्राह्मणभोजन घालून सात दिवस राहून नारायण देवस्थानास आला, तेथून बायकामंडळींना परत पाठवून देऊन स्वतः सैन्यासह त्यानें जव्हारच्या राज्यावर स्वारी केली. तेथील राजानें शरण येऊन बरी च खंडणी व कांहीं मुलूख दिला. तेथून रामदेव नांवाच्या राजाच्या रामनगरावर स्वारी नेणार, तों रामराजाने जव्हारची झालेली स्थिति पाहून स्वतः शरण येऊन 'पेण्डवल' नामक गड नारायणास दिला. (सर्ग १२)

नारायणाचा जावई मुंगलजित् याचा पिता गांगदेव हा वासुदेवपुर नांवाच्या नगरांत राज्य करीत होता. त्याचें राज्य त्याचा थोरला मुलगा तानदास यानें हिरावून घेतल्यावरून त्यानें नारायणाची राज्य परत मिळवून तें मुंगलजित् यास देण्याबद्दल प्रार्थना केली. नारायणानें वासुदेवपुरावर स्वारी करून तें लुटलें व जाळलें आणि तानदासास पळावयास लाविलें. जळलेलें शहर पुनः वसवून तेथें मुंगलजित् याची प्रतिष्ठापना केली. त्यानंतर बुऱ्हाणशहानें दक्षिण देश जिंकण्याकरितां नारायणशाहाची मदत मागितली. त्यानें गालनपर्वताच्या शेजारीं वटग्रामावर स्वारी

करून अर्धें सैन्य तेथून बुऱ्हाणच्या मदतीकरितां पाठविलें. सैन्यानें बुऱ्हाणशहाची मदत करून त्यास दक्षिणदेशच्या राज्यावर बसविलें. बुऱ्हाणशहानें हत्ती, घोडे, रत्नें वगैरे अनेक मूल्यवान नजराणे नारायणशाहाकडे रवाना केले. ( सर्ग १३ )

नारायणशाहानें अनेक धर्मकृत्यें केलीं. चिंचली नांवाच्या गांवीं गगनचुंबी मंदिर बांधून त्यांत विश्वेश्वर आणि चतुर्भुजाविष्णु यांची एकत्र स्थापना केली. जैत्रपुरामध्यें त्यानें अग्निष्टोम आणि ज्योतिष्टोम याग केले. स्वतःची त्याचप्रमाणें पत्नी पुत्र इत्यादिकांची सुवर्णतुला करवून तें सुवर्ण ब्राह्मणांना दान केलें. मंगेश्वर नांवाच्या देवाला जाऊन तेथेंही खूप दानधर्म केला. प्रस्तुत काव्याचा कवि अर्थात् आश्रित ब्राह्मणांपैकीं च असल्यानें त्यानें राजाच्या धर्मबुद्धीचें अत्यंत गौरवयुक्त व विस्तृत असें वर्णन केलें आहे. ( सर्ग १८ )

एकोणीस व वीस हे सर्ग राजकारणाच्या दृष्टीनें महत्वाचे आहेत. दिल्लीपति सम्राट अकबराचा मुलगा मुराद हा दक्षिणदेश ( अहमदनगरची निजामशाही ) जिंकण्याच्या इच्छेनें भृगुक्षेत्र उर्फ भडोच येथें येऊन दाखल झाला. खास अकबरानें पाठविलेला नजराणा घेऊन नारायणशाहाकडे मुरादचा एक वकील आला. भेटीस बोलावल्यावरून नारयणशाहा मुरादकडे गेला. त्यानें मुरादास असा सल्ला दिला की शरद्ऋतु लागेपर्यंत आपण स्तब्ध बसावें. तोंपर्यंत हेर वगैरे पाठवून आपल्या शत्रूच्या राज्याची माहिती मिळवावी. आणि मग त्याच्यावर स्वारी करून त्याचा फडशा पाडावा. मुरादास ही सल्ला पसंत पडली. नारायणशाहानें नर्मदा तीरावर बराच मुक्काम करून शुक्लतीर्थ वगैरे धर्मक्षेत्राच्या यात्रा केल्या. व मुरादनें दिलेल्या नजराण्यांचा स्वीकार करून तो परत तापी तीरावरून 'पिप्पल वाटिका' नांवाच्या गांवीं स्नान, तीर्थविधि वगैरे करून परत मयूरगिरीला आला. ( सर्ग १९ )

शरत्काल प्राप्त होतांच मुरादानें नारायणशाहाकडे आपला दूत पाठवून त्यास साहाय्यार्थ पाचारण केलें. युवराज प्रतापशहाची स्वारीवर जाण्याची उत्सुकता पाहून नारायणशहानें त्यास सैन्यासह रवाना केलें. धायिट नांवाच्या नगरीं दोघांची भेट झाली. मुराद व प्रताप या दोघां तरुणांची मैत्री चांगली जुळली. दोघांची एकत्र झालेली सैन्यें नंदुरबार व नेरपुर येथें मुक्काम करून गालन पर्वताच्या प्रदेशांत आलीं व तो शत्रूचा प्रदेश असल्यामुळे त्यांनीं तेथें मनसोक्त लुटालूट केली. खानखानान व शहाबाजखान हे दोघे सरदार मीरासह ससैन्य खानदेशांतून येऊन मुरादास पारवत नांवाच्या गांवीं मिळाले. खानखानानें मीरला सर्व सेनेचें आधिपत्य देण्याचा मुरादास आग्रह केला, परंतु मुरादानें प्रतापशहास अगोदर च सेनापतित्व दिलें असल्याचें सांगून त्यास गप्प बसविलें. पुढें प्रताप व खानखानान यांच्यामध्यें ही हळूहळू अधिकाधिक सख्य वाढत गेलें. पारवत

गांव लुटून व जाळून हा एकत्रित झालेला प्रचंड सैन्यभार गोदातीरीं कूर्परग्राम ( कोपरगांव ) येथें आला. तेथें शुक्लेश्वराची प्रतापशाहानें पूजा केली. तेथून पुढें पुण्यस्तम्ब ( पुणतांबें ), बिल्वपुर, ( बेलापूर ), राधापुरी व नन्दिग्राम या गांवांवरून सैन्य अहमदनगरास येऊन ठेपलें. कवीच्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं, वाटेतल्या गांवीं लुटालूट करण्याविषयीं मुसलमानी सैन्य अत्यंत उत्सुक असे, परंतु प्रतापशाह स्वतः लूट करण्याविषयीं अनुत्सुक होता, इतकें च नव्हे, तर त्यानें मुसलमानांनाही लुटीपासून परावृत्त करण्याचा यत्न केला. अहमदनगर ही निजामशाहीची राजधानी. तेथील किल्ल्याला मोंगल सैन्यानें वेढा देऊन मोर्चे लावले. तोफांची मारगिरी कित्येक दिवसपर्यंत झाल्यानंतर तटाला सुरुंग लावून भगदाडें पाडण्यांत आलीं. तेव्हा अनन्यगतिक होऊन शत्रु शरण आला. त्यांनें अशी याचना केली कीं आमचें प्रारंभापासूनचें राज्य आमच्याकडे राहूं द्या. विराट ( वऱ्हाड ) देशाचें राज्य मात्र तुम्ही घ्या. ही तडजोड पतकरून प्रतापशाहाच्या सैन्यासह मोगल सैन्य वऱ्हाडकडे वळलें. लवणासुराचा जेथें वध करण्यांत आला त्या मेघंकर ( मेहकर ) नगराजवळच्या लोणार तीर्थाला ते प्रथम प्राप्त झाले. प्रतापानें तेथें स्नानदानादिक धर्मकृत्यें केलीं. तेथून बाळापूर नगरास येऊन तेथें त्यांनीं पावसाळ्याकरितां छावणी करण्याचा बेत केला. प्रतापाला घरीं परतण्याची उत्कंठा झाली असल्याकारणाने शरद् ऋतु लागतां च पुनः यदिल्लखानावर स्वारी करण्याकरितां परत येण्याबद्दल त्याला आग्रहपूर्वक सांगून मुरादनें त्यास निरोप दिला. प्रतापशाह मयूरगिरीस परत येऊन पिता नारायणशाहा यास भेटला. नारायणशाह यास चार पुत्रः प्रतापशाह, हरिहर, चतुर्भुज आणि राजसिंह. प्रतापशाहाला एक मुलगा होता, त्याचें नांव भैरवसेन. याप्रमाणें माहिती देऊन नारायणशाहाच्या व त्याच्या वंशाच्या गौरववर्णनांत कवीनें काव्याची समाप्ति केली आहे. प्रस्तुत काव्य केशवाचा नातू, अनन्ताचा पुत्र 'पंडितमंडलाम्बुजरवि' असा जो रुद्रनामा कवि त्यानें लक्ष्मणपंडितानें सांगितलेल्या हकीकतीवरून शके १५१८ सालीं लिहिलें.

प्रस्तुत काव्यांतील ऐतिहासिक कथाभागाचा सारांश वर दिला आहे, त्यावरून किती महत्त्वाची माहिती प्रस्तुत काव्याच्या योगानें आपणास उपलब्ध होत आहे, हें लक्षांत येईल. यांतील विशेषतः थोरल्या भैरवसेनापासूनच्या कवीनें कथन केलेल्या युद्धप्रसंगाचा पडताळा आपल्याला मुसलमानी इतिहासकारांच्या ग्रंथांत पाहतां येतो, त्यावरून प्रस्तुत काव्यांतील हकीकत विश्वसनीय आहे असें सिद्ध होतें. उदहरणार्थ, अगदीं अखेरीस सांगितलेली राजपुत्र मुराद याची अहमदनगरावरील स्वारी इ. स. १५९५ सालीं झाली व तिचा मुसलमानी इतिहासांत दिलेला तपशील प्रस्तुत काव्यांतील वर्णनाशीं जुळणारा असा च आहे. कित्येक ठिकाणीं हकीकतीमध्यें फरक पडतो, तो दृष्टिकोनाच्या भिन्नतेमुळें व माहितीचे उगम भिन्न असल्यामुळें

सहज पडूं शकेल असा आहे. सर्व ठिकाणांहून उपलब्ध होत असलेल्या माहितीची परस्पर तुलना करून ऐतिहासिक दृष्टीनें घटना निश्चित करण्याचें काम करतां येईल व करावयास पाहिजे. परंतु तो स्वतंत्र विषय असल्यामुळें त्याला येथें हात घालतां येत नाहीं.

प्रस्तुत काव्यांत इ. स. १५९५ पर्यंतची हकीकत आली आहे. त्यानंतर बागुल राजघराण्याचा फारच थोडा वृत्तांत सांगावयाचा उरतो. इ. स. १५९९ सालीं अकबरानें खानदेश काबीज केल्यानंतर त्यानें बागलाण घेण्याचा प्रयत्न केला. यावेळीं नारायणशाहाच्या जागीं प्रतापशाह गादीवर आला होता असें दिसतें. मुल्हेरगडास अकबरानें सात वर्षेपर्यंत वेढा घातला होता. परंतु दिल्लीपति सम्राटास अखेर या कामीं हार खावी लागली व कांहीं मुलुख प्रतापशाहास देऊन समेट करावा लागला. जहांगीर गादीवर आल्यानंतर त्याचे व प्रतापाचे संबंध दोस्तीचे होते असें जहांगीराच्या आत्मचरित्रांतील उल्लेखावरून दिसतें. मुल्हेरगडावरील गणपतीच्या देवळाचा सभामंडप इ. स. १६१२ सालीं प्रतापशाहानें बांधल्याचा तेथील मराठी शिलालेखांत उल्लेख आहे. त्यावरून या सालापर्यंत प्रतापशाह गादीवर होता हें उघड होतें. प्रतापशाहाचा मुलगा भैरवसेन उर्फ बहिरामशाह यानें १६३८ पर्यंत राज्य केलें. याच्या च दरबारांत १६२३ सालीं मधुकर कवीनें आपला 'कथाकल्पतरु' ग्रंथ पुरा केला. दक्षिणेंतील लहानमोठ्या राज्यांच्या परस्पर ओढाताणींत बागुलांनीं चातुर्यानें आपलें राज्य कायम राखलें होतें. परंतु उत्तरेकडील मोंगली साम्राज्याचा जबरदस्त रूळ दक्षिणच्या राज्यांवर फिरूं लागल्यानंतर एवढेंसें चिमुकलें संस्थान, तें दुर्गम डोंगरी मुलखांत असलें तरी, फार दिवस टिकाव धरून राहील हें शक्य नव्हतें. १६३८ सालच्या प्रारंभीं शहाजहानच्या कारकीर्दींत दक्षिणचा सुभेदार औरंगजेब यानें मालोजी व महमंद ताहिर खुरासानी या सरदारांच्या हाताखालीं ७००० सैन्य देऊन त्यांना मुल्हेरगड घेण्याकरितां पाठविलें. सुमारें २ महिन्यांच्या झगड्यांनंतर बहिरामशाह शरण आला. त्याला ३००० स्वारांची मनसबदारी देण्यांत येऊन खानदेशांत तापीच्या उत्तरेस सुलतानपूर येथें जहागिरी देण्यांत आली व बागलाणचें राज्य खालसा करून मोगलसाम्राज्यास जोडण्यांत आलें.

ही घटना अनपेक्षित अगर आश्चर्यकारक नव्हती. दक्षिणेकडे जाण्याचा मोठा रहदारीचा मार्ग बागलाणांतून होता. दक्षिणेकडे वाढूं पाहणाऱ्या मोंगल साम्राज्यास आपल्या मार्गांतला हा कांटा काढून टाकावा असें वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. बागलाणच्या भौगोलिक परिस्थितीचा हा अपरिहार्य परिणाम होता.

स्वसंकृतीचा पुनरुद्धार करण्यासाठीं व नवीन तत्त्वांवर राष्ट्राची निर्मिति करण्यासाठीं समर्थ व शिवराय यांनीं जो प्रयत्न आरंभिला त्यांत त्यांनीं भौगोलिक परिस्थितीकडे बारकाईनें लक्ष पुरविलेलें दिसतें. बागलाणच्या राज्याचा नाश त्यांच्या

नजरेदेखत झाला होता. १६३८ पर्यंत हयात असलेल्या राज्याची वार्ता अगदीं जवळ गोदातीरीं टाकळी येथें पुरश्चरण करणाऱ्या समर्थांस मुळी च नसेल अशी कल्पना करणें शक्य नाहीं. बागलाणाच्या झालेल्या दशेवरून धडा घेऊन शिवराय व समर्थ यांनीं आपल्या हालचालींचे क्षेत्र दूर दक्षिणेकडे नेलें असावें. त्यांतही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, शिवाजीनें आपल्या सत्तेचीं केंद्रस्थानें सह्याद्रीच्या मुख्य रांगेच्या पश्चिमेकडील बाजूस निर्माण केलीं व त्यायोगें मुसलमानी सत्तेचा हात तेथवर पोंचणें अधिक दुर्घट करून सोडलें. रायगड व प्रतापगड हे दोन्ही किल्ले सह्याद्रीची मुख्य घाटमाथ्याची जी रांग तिच्या पश्चिमेस आहेत. शिवाजीचा संचार कोंकणप्रांतीं फार असे व कोंकणांत च आपली सत्ता दृढमूल करण्याचे त्यानें प्रथमपासून प्रयत्न चालविले होते.

दुसरी महत्वाची गोष्ट ही कीं बागलाणच्या राज्याला कांहीं ध्येय नव्हतें. बागलाणचे राजे धर्मनिष्ठ, दानशूर, व विद्येचे पोशिंदे असतील, होतेही. परंतु त्यांची धर्मनिष्ठा व आचारशीलता वैयक्तिक स्वरूपाची होती. समाजाची काळजी त्यांना नव्हती. परसत्तेचें संकट, समाजाची संस्कृति व समृद्धि यांना ग्रासीत आहे याची त्यांना जाणीव नव्हती. त्यांच्या राज्याला घेरणारीं जीं अनेक मुसलमान राज्यें होतीं, त्यांतून आज याला मदत कर, उद्यां त्याला हात दे, परवा तिसऱ्याचें मांडलिकत्व पतकर, असें करून त्यांनीं आपली सत्ता कायम ठेविली होती एवढेंच. समर्थ व शिवराय यांचें सर्व याच्या उलट होतें. त्यांना 'निशिदिनिं जनचिंता' लागलेली होती.

सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे
भजन जन उकावे सर्व आनंद पावे।

या ध्यासासाठीं त्यांनीं आपलें आयुष्य वाहिलेलें होतें. त्यांना समाज नवा घडवावयाचा होता, आज्ञापत्रकारानें म्हटल्याप्रमाणें त्यांना ' केवळ नूतन सृष्टि निर्माण ' करावयाची होती. त्याप्रमाणें त्यांनीं केली. म्हणून च रुद्रकवीनें

यावल्लक्ष्मीकटाक्षो विलसति ललितः कैटभारेर्मुखेन्दौ
यावद्ब्रह्माण्डदीपस्तपति दिनमणिः कौमुदी यावदिन्दौ।
वीरश्रीशाहनारायणधरणिपतिश्रेणिहीरस्य ताव
द्वंशो विश्वावतंसो जगति विजयतां मेदिनीपालनाय ॥

" नारायणशाहाचा वंश यावच्चन्द्रदिवाकरौ पृथ्वीपालनाकरितां विजयी होवो " अशी आशंसा प्रकट केली असूनसुद्धा त्याचें नांवही आज कोठें उरलेलें नसून अल्पजीवी शिवशाहीचें स्मरण अखिल भारतीयांस अद्यापि स्फूर्ति देत आहे.

---

# जुना दासबोध आणि नवा दासबोध

( लेखक — रा. **जनार्दन सखाराम करंदीकर**, संपादक–केसरी, **पुणें** )

श्री समर्थांचें जे अनेक ग्रंथ आहेत त्यांत '**दासबोध**' हा ग्रंथ सर्वमान्य आणि सर्वश्रेष्ठ आहे. किंबहुना '**दासबोध**' म्हणजे च प्रत्यक्ष **रामदास** आणि '**रामदास**' म्हणजे च '**दासबोध**' असें हें भेदातीत समीकरण आहे. ही कल्पना कांहीं कोणातरी अंधभक्ताची नसून साक्षेपी समर्थप्रतापकार **गिरिधर स्वामी** हे लिहितात कीं,

समर्थ सद्गुरु निजबोध। दासबोधरूपें सर्वत्र प्रसिद्ध।

नाना साक्षात्कार होती विविध। येकनिष्ठ गुरुभक्तांसी॥ स. प्र. २०-३३

गिरिधरस्वामी हे साक्षेपी असले तरी ते समर्थांच्या शिष्यपरंपरेंतले; तेव्हां त्यांना समर्थांच्या 'दासबोध' ग्रंथाविषयीं अत्यादर वाटत असेल यांत कांहीं नवल नाहीं. यास्तव त्यांची साक्ष पुरेशी नाहीं, असें वाटत असल्यास स्वतः समर्थांची च साक्ष पहावी. समाधी घेण्यापूर्वी थोडे दिवस शिष्यांनीं विचारल्यावरून समर्थ शिष्यजनांस धीर देऊन सांगतात कीं,

माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकरणी।
परी मी आहे जगज्जीवनी। निरंतर॥ १

आत्माराम दासबोध। माझें स्वरूप स्वतःसिद्ध।
असतां न करवा हो खेद। भक्तजनीं॥ २

यांत आत्माराम **दासबोध** म्हणजे आत्मस्वरूप च असल्याने त्याचें दर्शन हें माझें च दर्शन मानावें असें समर्थ आश्वासनपूर्वक सांगत आहेत.

वरील ओवींत 'आत्माराम दासबोध' असे दोन शब्द आहेत; आणि समर्थांच्या काव्यांत हि 'आत्माराम' आणि 'दासबोध' अशी दोन पृथक् काव्यें आहेत, तेव्हां आत्माराम व दासबोध ही दोन काव्यें माझें 'स्वरूप' माना असा समर्थांनीं आदेश दिल्याचा भास होतो. परंतु आमच्या मतें 'आत्माराम' या शब्दानें 'आत्माराम' नांवाचें काव्य न घेतां 'आत्माराम' हें 'दासबोधा' चें विशेषण मानावें. '**आत्माराम**' च असा जो '**दासबोध**' ग्रंथ तो च माझें स्वतःसिद्ध स्वरूप होय, असा याचा अर्थ घेणें अधिक सयुक्तिक होय. 'माझें स्वरूप' म्हणून

सांगतांना दोन ग्रंथांचा उल्लेख केला जाणें स्वाभाविक दिसत नाहीं ; तेथें निश्चयात्मक असें एक च रूप सांगणें वाजवी ठरेल. यास्तव जणूं काय माझा च अंतरात्मा असा जो दासबोध ग्रंथ तें च माझें स्वरूप होय असा अर्थ मनाला अधिक पटतो. शिवाय 'दासबोध' ग्रंथ वगळल्यास इतर ग्रंथांत 'आत्माराम' ग्रंथास च विशेष महत्व देण्यासारखें त्यांत कांहीं वैशिष्ट्य नाहीं. त्याच्याबरोबरीचें किंबहुना त्याहून सरस असे दुसरेहि कांहीं ग्रंथ सांगतां येतील. याकरितां 'दासबोध' हा च ग्रंथ माझें आत्मस्वरूप होय असा च समर्थांचा अभिप्राय मानणें सुसंगत दिसतें. गिरिधरस्वामींनीं हि 'समर्थ सद्गुरु निजबोध। दासबोधरूपें सर्वत्र प्रसिद्ध' या ओवींत नुसत्या दासबोधाचा च उल्लेख केला आहे. आत्माराम ग्रंथाचा उल्लेख त्यांत नाहीं.

असो. समर्थांना च सर्वप्रकारें सर्वश्रेष्ठ वाटणाऱ्या '**दासबोध**' ग्रंथाच्या च नांवाचा व त्याच्या च योग्यतेचा दुसरा एक ग्रंथ आहे व तो म्हणजे '**जुना दासबोध**' हा होय. '**जुना**' आणि '**नवा**' हीं विशेषणें आतां आम्ही लेखनाच्या सोयीसाठीं वापरतों. समर्थांच्या वेळीं '**एकवीस समासी**' ऊर्फ '**जुना दासबोध**' या ग्रंथाला हि नुसतें च '**दासबोध**' असेंच नांव होतें. 'आत्माराम' हें काव्य रचतांना स्वतः समर्थ लिहितात—

दासबोधींचे समासीं। निर्मूळ केलें मीपणासी। १-२०

यांत जो दासबोधाचा उल्लेख आहे, तो सांप्रतच्या २० दशकी दासबोधाचा नसून **एकवीससमासी 'जुन्या दासबोधा'**चाच होय; कारण त्या जुन्या दासबोधांत च १३ व्या समासांत 'मीपणनिरसन' केलें आहे. त्यावरून स्वतः समर्थ च या 'एकवीससमासी' छोट्या ग्रंथाचा '**दासबोध**' असा च उल्लेख करीत हें उघड आहे.

अशा रीतीनें '**दासबोध**' या एका च नांवानें उल्लेख केल्या जाणाऱ्या दोन ग्रंथांचा घोटाळा होऊं नये म्हणून 'एकवीससमासी' ग्रंथाला '**जुना दासबोध**' आणि वीस दशकी ग्रंथाला '**नवा दासबोध**' अशीं पृथक् पृथक् नांवें कल्पून त्या भिन्न नावांनीं च त्या दोन ग्रंथांचा उल्लेख या निबंधांत करण्यांत येईल.

## जुना दासबोध केव्हां लिहिला?

जुना दासबोध हा आधीं लिहिलेला आणि नवा दासबोध हा नंतर लिहिलेला असला पाहिजे, एवढा बोध 'जुना' व 'नवा' या विशेषणांवरून च होतो. शिवाय भारत हें आधीचें आणि महाभारत हे नंतरचें हे त्या त्या ग्रंथाच्या विस्तारावरून जसें स्वतःसिद्ध आहे तसें च एकवीससमासी दासबोध हा आधींचा व दोनशें-समासी दासबोध नंतरचा हे त्यांच्या विस्तारभेदावरून च सिद्ध होतें. या शिवाय

एकवीससमासींतील चार समास दोनशेंसमासींत जशाचे तसे समाविष्ट केले आहेत, यावरून हि आधीं एकवीससमासी तयार होती आणि पुढें मोठा दासबोध लिहितांना एकवीससमासींतले जेवढे समास नव्या ग्रंथांत यथायोग्य रीतीनें समाविष्ट करतां येतील असें वाटले तेवढे समास छोट्या ग्रंथांतून मोठ्या ग्रंथांत अक्षरशः उतरून घेतले गेले. यावरून हि 'एकवीससमासी' आधींची हें निर्विवाद सिद्ध होतें. पण या शिवाय ज्या इतर अनेक अंतःपुराव्यावरून हें च अनुमान दृढतर होतें त्या पुराव्याचा हि विचार करूं.

नवा दासबोध शिवतरच्या घळींत शके १५७६ ते १५८६ च्या दरम्यान लिहिला हे समर्थ सांप्रदायांतील पत्रव्यवहारावरून सिद्ध आहे. नव्या दासबोधांतला ६ वा दशक गतकलि ४७६० म्हणजे शके १५८१ त लिहिला हें त्या ग्रंथांतील वचनावरून च सिद्ध आहे. अर्थात च समर्थांची पुष्कळशी महत्वाची ग्रंथरचना पुरश्चरण व तीर्थाटन आटोपून सातारा प्रांतीं येऊन वास्तव्य केल्यानंतर च झाली यांत शंका नाहीं. तथापि सातारा प्रांतीं येण्यापूर्वी त्यांनीं ग्रंथलेखन मुळीं च केलें नव्हतें असें नाहीं. तीर्थाटन चालू असतांहि त्यांनीं कांहीं अवांतर काव्यें आणि पदपदांतरें व आरत्या इत्यादि रचना केली असावी. पण त्या संबंधांत निश्चित पुरावा देणें कठिण आहे. परंतु तीर्थाटनाला निघण्यापूर्वी, नाशिक-पंचवटींत पुरश्चरण करीत असतांनाच त्यांनीं काव्यारंभ केला असावा असें वाटतें. आणि जुना दासबोध हा त्या काळचा व पंचवटींत अथवा टाकळीस लिहिलेला च ग्रंथ असावा याविषयीं शंका नाही.

समर्थ बारावे वर्षी गृहत्याग करून पंचवटीस येऊन रामोपासना करूं लागले आणि त्यांची ही उपासना शके १५४२ ते १५५४ पर्यंत बारा वर्षे चालली होती. यांतलीं प्रारंभींचीं पांचसात वर्षे कडक पुरश्चरण आणि अध्ययन यांत गेलीं असावीं. एवढ्या काळांत त्यांना परमार्थदृष्ट्या रामाचा साक्षात्कार झाला आणि लौकिक दृष्ट्या रामायण, भारत, भागवतादि पुराणग्रंथ आणि गीताउपनिषदादि वेदांत ग्रंथ यांचा परिचय झाला असावा. नव्या दासबोधाच्या प्रारंभीं समर्थांनीं आपल्या ग्रंथाला कोणत्या प्राचीन ग्रंथाची संमति आहे. त्याची यादीच नमूद केली आहे. त्यांतलें सर्वच ग्रंथ नव्हे तरीपण पुष्कळच ग्रंथ या पांच दहा वर्षांच्या अवधींतच त्यांनीं पाहिले असावे. कारण तीर्थाटणाच्या बारा वर्षांत अध्ययनाला वेळ थोडाच मिळाला असेल. तीर्थाटणाच्या बारा वर्षांत त्यांना मुख्यतः लोकस्थितीचें, जनस्वभावाचें आणि परप्रांतीय भाषांचें व परप्रांतीय साधुसंतांच्या ग्रंथांचें अवलोकन केलें असावें. नाशीक-पंचवटींत असतांना च समर्थांनीं स्वहस्तें '**वाल्मीकि रामायणा**'ची समग्र प्रत उतरून काढली हे 'समर्थवाग्देवतामंदिरां'तील

हस्तलिखित रामायणाच्या प्रतीवरून कळून येत आहे. त्या रामायणाच्या प्रतीच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं '**रामेण रामदासेन लिखितम्**' अशी स्वनामाची मुद्रा आहे; आणि जुन्या दासबोधाच्या प्रत्येक समासाच्या शेवटीहि '**इति श्री रामी रामदास**' '**इति श्री रामदासें**' 'इति श्री रामदास रामाचा' अशा सारखा उल्लेख आहे, यावरून वाल्मीकि रामायणाची प्रत लिहून झाल्यानंतर लवकरच समर्थांनीं 'एकवीससमासी' सारख्या स्वतंत्र ग्रंथलेखनास सुरवात केली असावी असे वाटतें. टाकळीस राहून पुरश्चरण करीत असता आठ दहा वर्षांत समर्थांचें इतकें अध्ययन होणें असंभवनीय नाहीं. कारण 'नित्यनेम सांडो नये। अभ्यास बुडों देऊ नये'; 'ग्रंथमात्र धांडोळावा, अपार पाठांतर करावें', 'पाठ उदंडची असावे, सर्वकाळ उजळीत जावे' 'एकान्ती जाऊन विवरी नाना ग्रंथ'; 'वाया जाऊं नेदी क्षण' असा समर्थांचा दंडक च होता व तो त्यांनीं स्वतः पाळला च असेल.

रामोपासना करून स्वतः सिद्धी प्राप्त करून घेतल्यानंतर स्वतःचा शिष्य संप्रदाय तयार करण्याच्या प्रारंभींच्या प्रयत्नांतच ही 'एकवीससमासी' लिहिली गेली असावी असें अनुमान अंःतपुराव्यावरून करतां येतें. जुन्या दासबोधाच्या दुसऱ्या च समासांत समर्थ लिहितात—

जे तार्किकविषयीं वरिष्ठ। जयांचे सर्वही उच्छिष्ट।
तया पुढें मी कनिष्ठ। काय बोलो॥ २–९
जें कांहीं म्या आठवावे। तें जयास पूर्वी च ठावे॥
तेथें ज्ञातेपणें बोलावें। काय हो आगळे॥ २–१०
जें बोलिले पुराणीं। तें म्या ऐकिले सांगणोवांगणी।
अहो प्राकृत बोली। परी संस्कृताची एकता आली।
जाणोनि कथा श्रवण केली। पाहिजे श्रोतीं॥ २–१७

यावरून कथा कीर्तनें पुराणें ऐकून आपली तयारी करून समर्थांनीं स्वतः प्रवचनास सुरवात केली असावी व 'जुना दासबोध' हा त्या प्रवचनांचा आधारभूत गोषवारा असावा असें वाटतें.

दुसऱ्याच समासांत रघुनाथाचें ध्यान करतांना--

ऐसा सर्वात्मा राजाधीश। सकळ पाहती सावकाश।
तेथे पिसाट रामदास। उभा असे दीन रूप॥ २–१
तुज समुदाय दासांचा। आम्हास स्वामी आणिक कैचा।
तुज कारणे जिवलगांचा। संग सोडिला॥ २–५

तुजवीण मज माया । काही नाही रे रामराया ॥
आम्हा अनाथा कासया । उपेक्षिसी ॥ २-४

यावरून रामदासांना अद्यापि पंचवटी क्षेत्रांत मानमान्यता प्राप्त झाली नव्हती, ते नुकतेच प्रसिद्धी पावूं लागले होते, पण अद्यापि त्यांची कोणावर छाप पडली नव्हती आणि जुने संत-महंत तर त्यांची हेटाळणीच करीत होते असें दिसतें.

"म्हणोनिया मी ब्रह्मपिसा । बडबड करितो भलतैसा ।
मज बरें म्हणेल तो हि पिसा । माणुसकी त्यासि नाहीं"

हें उपरोधिक वचन हेंच दर्शवितें. परंतु खोल चिकित्सक बुद्धि, आश्चर्यकारक स्मरणशक्ति, उपासनेनें प्राप्त झालेला आत्मप्रत्यय आणि कडक वैराग्य यांच्या जोरावर त्यांनीं थोड्याच काळांत आपल्या उपदेशाची छाप पाडण्यास सुरवात केली. जुन्या दासबोधाच्या नवव्या समासाच्या शेवटीं ते म्हणतात—

शंका तितुकी निःशंका जाली । सत्य चि पाहता अनुभवा आली ।
म्हणोनि इतुकी बडबड केली । वाचाळपण करूनिया ॥ ९-५७
आतां पाहे रामराणा । ना रे बा हे मज कळेना ।
मज कोणी जरी लेखीना । तरी जनाची चाड नाहीं ॥ ९-५९

इतका धीटपणा थोडक्याच अवधींत त्यांनीं संपादन केला. या धीटपणाच्या जोरावर त्यांनीं आपले सिद्धान्त प्रस्थापित करण्यास आणि इतर वावदूकांची तर्कविरुद्ध विचारसरणी खोडून काढण्यास प्रारंभ केला. विशेषतः लोभी व आचारभ्रष्ट गुरूवर त्यांचा मोठा कटाक्ष असे. जुन्या दासबोधाच्या तिसऱ्या समासांत वक्त्याचें लक्षण सांगतांना समर्थांनीं पोटभरू गुरूंवर झोड उठविली आहे.—

ऐसे क्रोधी अनावर । देहबुद्धीचे पामर ।
ऐशियाचें वक्तृत्व चतुरें । वमनप्राय त्यजावें ॥
आपण क्रियेसी अंतरले । आणि वक्तृत्वाचे भरी भरिले ॥
तया श्रवणे श्रोते जाहले । वक्त्या ऐसे ॥
आशा धरूनि वक्ता बोले । तेथे श्रोते नागवले ।
शृंगारिक श्रवणे चेवले । साधक जैसे ॥
वक्ता पाहिजे अनुभवाचा । ज्ञाता नसावा पुस्तकीचा ॥
पुस्तकज्ञानें श्रोतयांचा । भ्रम सर्वथा तुटेना ॥

वक्ता भीडसारू जोडे । तरी श्रोतयांसी अंधार पडे ।
म्हणोनी वक्त्याकडे । भीड ते ही नसावी ॥

असो वक्ता आशारहित । तयाचें चि वक्तृत्व विहित ।
दुराशा धरी जयाचें चित्त । तो वक्ता नको ॥

अशा प्रकारें लोलंगत प्रवचनकारावर तडाखे लगावून पुढें स्वतःविषयीं समर्थ म्हणतात —

श्रोते ऐकती आदरें । तरी बोलेन बोबडी उत्तरें ।
स्वामी तुमचेनि आधारें । होईन निरभिमान ॥
तुमचेनि उच्छिष्ट लेशें । आणि गुरुशिष्याचेनि मिसे ।
सांगिजेल जेणे पिसें । झडे जीवपणाचें ॥

यांतील लीनता आणि आत्मप्रत्यय हीं दोन्हीं कौतुकावह आहेत. तथापि श्रोते ऐकोत वान ऐकोत नित्य निरुपण करण्याचा हा क्रम समर्थांनीं त्यावेळीं अखंड चालू ठेवला. जुन्या दासबोधाच्या १२ व्या समासांत ते सांगतात —

देखोवेखी नित्यकर्म । करूनि निरूपण चुकसी वर्म ।
प्रतिदिनीं आमुचा नियम । जें निरूपण करावें ॥ समास १२–४५

असें निरूपण करण्याविषयीं रामाची आज्ञा च झाली आहे अशी समर्थांची श्रद्धा होती व त्या श्रद्धेनें च त्यांनीं हे 'एकवीससमासी' निरूपण प्रथम केलें.

महाराष्ट्र ग्रंथ प्रदीपावलींतील '**रामदासखंडांत**' **ह. भ. प. पांगारकर** लिहितात कीं, 'जुना दासबोध' कृष्णातीरीं आल्यावर शके १५७१–७२ च्या सुमारास समर्थांनीं लिहिला. परंतु त्यांचें हें लिहिणें निराधार आहे. नाशीक–पंचवटीपासून च समर्थांनीं आपल्या सांप्रदायाची उभारणी करण्यास सुरवात केली आणि त्या सांप्रदायांतला महत्वाचा आद्यग्रंथ म्हणजे '**जुना दासबोध**' होय. या संबंधांत इतर अनेक प्रमाणें पुढें यावयाचीं च आहेत, म्हणून त्यांचा विचार सध्या येथे करीत नाहीं. परंतु येथें एवढें च सांगून ठेवतों कीं, समर्थवाङ्मयाचे चिकित्सक अभ्यासक **श्रीयुत शंकरराव देव** हे हि '**जुना दासबोध**' हा पंचवटींत असतांना व रामदासांची विशेष प्रसिद्धी होण्यापूर्वी लिहिलेला आहे असें च मानतात.

जुना दासबोध शके १५५१ च्या आधींचा आणि 'नवा दासबोध' शके १५७६ च्या नंतरचा असल्यानें त्या दोहोंच्या रचनाकालांत कमींत कमी पंचवीस वर्षांचें अंतर पडतें. शिवाय नव्या दासबोधाची रचना मध्यंतरीं

खंड न पडतां विशिष्ट क्रमानें झाली असें नसून त्यांतील अनेक प्रकरणें प्रसंगोपात्त सांगितलेलीं आहेत. त्यामुळें नव्या दासबोधाची रचना अमक्या वर्षीं संपली असें निश्चितपणें सांगतां च येत नाहीं. समाधिकाल येण्यापूर्वीं स्वतः रामदासांनीं समास व दशक यांची कांहीं विशिष्ट व्यवस्था लावून २०० समासांचा, वीस दशकांचा, दासबोध क्रमबद्ध केला अशी आख्यायिका आहे. या दृष्टीनें पाहिल्यास नव्या दासबोधांत शके १६०१ पर्यंत नवी नवी भर पडत होती असें मानावें लागतें. एवंच जुना दासबोध शके १५५१ च्या आधींचा आणि नवा दासबोध शके १६०१ त पूर्ण झालेला असें मानल्यास दोहोंच्या रचनाकाळांत ज्यास्तींत ज्यास्त ५० वर्षांचें अंतर पडतें. कमींतकमी २५ वर्षें आणि अधिकांत अधिक ५० वर्षें इतक्या दीर्घ कालाचे दोहोंत अंतर असल्यामुळें जुना दासबोध व नवा दासबोध या दोन्हीं ग्रंथांतील विवेचनपद्धतींत पुष्कळ च अंतर पडलें असल्यास नवल नाहीं.

श्री समर्थ प्रथम पंचवटींत येऊन राहिले व पुरश्चरण करूं लागले त्यावेळच्या व शिवतर घळींत बसून ते नवा दासबोध लिहूं लागले त्या वेळच्या परिस्थितींत महदंतर पडलें होतें. मध्यंतरींच्या काळांत बारा वर्षें तीर्थाटण करून समर्थांनीं जी देशकालवर्तमान स्थिति पाहिली तिचा त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला असला पाहिजे. '**चिंता करितो विश्वाची**' ही वृत्ति समर्थांच्या अंगीं बाळपणापासून च बाणली होती. परंतु तिला विशिष्ट वळण लागलें नव्हतें. तीर्थाटनानें त्यांची दृष्टि फाकली आणि जनचिंता निश्चित स्वरूप धारण करती झाली. 'हुजूर दम निघेना अंतरीं कोंड नाना' असे उद्गार त्यांच्या तोंडून निघूं लागले. 'अंतरीची वेथा श्रीराम समर्था। जाणवल्या चिंता दूरी करी' अशी प्रार्थना त्यांच्या तोंडून बाहेर पडूं लागली. 'फिरे दास ऊदास लोकांस पाहे। मनामाजि थकीत होऊन राहे' यांत वर्णिल्याप्रमाणें समर्थांना आश्चर्य वाटून राहिलें कीं, हे लोक इतकीं दुःखें निमूटपणें सहन करतात कशीं? त्या दुःखाचा परिहार करण्याचा कांहीं च प्रयत्न कसा करीत नाहींत? स्वतः समर्थांनीं 'देवापाशीं सुखदुःख तें सांगावें। कैवारी करावें ईश्वराशीं' हा उपाय मनांत योजिला. पण हें कार्य एकट्याचें नव्हे, यास समुदाय पाहिजे हें जाणून या उपायासंबंधाची जाणत्या लोकांशीं भवति न भवति केली आणि शेवटीं अंतरीं कल्पना केली। एकांतीं बोलिलों बहु। रक्षिता देव देवांचा। त्याचा उत्साव इच्छिला॥ असा राममहोत्सवाचा उपाय सर्व अरिष्टावर तोडगा जाणून त्याचा अवलंब करण्यासाठीं चाफळला ठाणें देऊन रामप्रभूचा उत्सव सुरू केला. याकरितांच रामायणें लिहिलीं, मारुतींची ठायीं ठायीं स्थापना केली आणि मठ स्थापना करून संप्रदायाची शिकवण सर्वत्र प्रसृत केली. हा कार्याचा गाडा सुरळीत चालूं

लागल्यावर समर्थमुखांतून निघणारा बोधप्रद उपदेश आणि प्रारंभींचा नुकता च रामप्रभूचा साक्षात्कार झाल्यावेळचा, देहाचें सार्थक करण्याच्या दृष्टीनें केलेला वैराग्याचा उपदेश यांत कांहींतरी अंतर साहजिक च पडणार यामुळें च जुन्या दासबोधाची सुधारून वाढविलेली नवी आवृत्ति काढणें समर्थांस अवश्य वाटलें. अर्थात च नवा दासबोध हा जुन्या दासबोधाचा च विस्तार असून त्यांत देशकालवर्तमानानुसार जे फेरफार करावेसे वाटले ते केले गेले आणि जीं नवीं प्रकरणें त्यांत समाविष्ट करावीशीं वाटलीं ती त्यांत घालण्यांत आलीं.

जुन्या दासबोधाचे समास अवघे २१ आहेत आणि नव्या दासबोधाचे २० दशक असून २०० समास आहेत. तेव्हां जुन्या दासबोधांत जो उपदेश एकेका समासांत समाविष्ट झाला होता त्याला च नव्या दासबोधांत जवळजवळ एकेक दशकाइतकी जागा मिळूं शकली. तरी पण नव्या दासबोधांतले समास जुन्यांतल्या-पेक्षां लहान लहान असल्यानें एकंदर ग्रंथविस्तार दसपटीनें न होतां सरासरी सहापटीनें च झाला आहे. जुन्या दासबोधांत १३४० ओंव्या आहेत. परिशिष्ट त्यांत च धरल्यास ही संख्या १४५३ भरते. नव्या दासबोधांतील पहिल्या आठ दशकांत मिळून ३८६६ ओंव्या असून दशक ९ ते २० यांत ३८८५ ओंव्या आहेत. दोहोंची बेरीज ७७५१ होते. म्हणजे नव्या दासबोधाचा पहिला पारमार्थिक भाग जुन्या दासबोधाच्या सुमारे तिप्पट आहे आणि नव्या दासबोधाचा दुसरा भाग हि जुन्या दासबोधाच्या तिप्पटीइतका च आहे, मात्र त्यांतले पुष्कळसे विषय जुन्या दासबोधांत न आलेले असे आहेत. एवंच जुन्या दासबोधांतल्या विषयांचा तिप्पट विस्तार नव्या दासबोधांत झाला आणि सामान्यतः तिपटीइतका अगदीं च नव्या स्वरूपाचा भाग वाढविला गेला, अशा रीतीनें ही सुधारून वाढविलेली आवृत्ति तयार झाली.

नव्या दासबोधाचा विस्तार वाढला, नवी नवी प्रकरणें त्यांत समाविष्ट झालीं, तरी तेवढ्यानें काही समर्थांच्या मतांत, वेदान्ताच्या तत्वज्ञानांत आणि तार्किक दृष्टींत फरक पडला असें नाही. किंबहुना त्यांच्या ठासीव भाषापद्धतींत हि अंतर पडलेलें दिसत नाही. ही एकरूपता इतकी आहे कीं, चिकित्सक श्रोत्याला हि मधलें च एखादें प्रकरण काढून त्यांतल्या पांचदहा ओंव्या वाचून दाखविल्या तर त्या जुन्या दासबोधां-तल्या आहेत, का नव्या दासबोधांतल्या आहेत हें तो खात्रीपूर्वक सांगूं शकणार नाहीं. दोहोंत इतकी एकरूपता असल्यामुळें च समर्थांना जुन्या दासबोधांतले चार समास जशाचे तसे नव्या दासबोधांत समाविष्ट करतां आले. जुन्या दासबोधांतले इतर समास नव्या दासबोधांत समाविष्ट करण्याची समर्थांना जरूरी वाटली नाहीं तरी त्यांची योग्यता तेवढयानें कमी ठरत नाहीं. उदाहरणार्थ जुन्या दासबोधांतला आठवा समास '**आत्मनिवेदन**' हा आहे. नव्या दासबोधांत तो १२ व्या दशकांत ५ व्या

समासाच्या जागीं घातला आहे. परंतु जुन्या दासबोधांतल्या या ८ व्या समासाची प्रस्तावना तत्पूर्वीच्या ७ व्या समासांत आहे आणि ती अत्यंत मननीय आहे. ती प्रस्तावना जरी नव्या दासबोधांत घेतलेली नसली तरी जुन्या दासबोधांतल्या या ७ व्या समासाची सर नव्या दासबोधांतल्या फारच थोड्या समासांना येईल.

जुन्या दासबोधांतला शेवटचा २१ वा समास '**अनिर्वाच्य ब्रह्म**' हा आहे. हा समास नव्या दासबोधांत जशाचा तसा कोठें च घेतलेला नाहीं. तरी पण या समासांतली शिकवण इतकी ठासीव व महत्वाची आहे कीं, त्यांतल्या अनेक ओव्या नव्या दासबोधांतल्या ६ व्या दशकांतील शेवटच्या म्हणजे 'अनिर्वाच्य समाधान' या समासांत आणि ८ व्या दशकांतील ८ व्या म्हणजे 'आत्मदर्शन' या समासांत घेतल्या आहेत. या च पद्धतीनें जुन्या अथवा नव्या दासबोधांतल्या इतर हि कित्येक समासांची अदलाबदल केली तरी त्यांत विसंगती दिसणार नाहीं. दृष्टान्तानें हें अधिक स्पष्ट होईल म्हणून दृष्टान्तरूपानें च सांगतो कीं, समर्थांची कोणतीहि शिकवण टांकसाळींतल्या रुपयासारखी आहे. (अलीकडच्या नकली रुपयासारखी नव्हे, तर जुन्या खऱ्या रुपयासारखी आहे). त्या रुपयावर व्हिक्टोरियांचा छाप असला काय, एडवर्डचा असला काय, अगर जॉर्जचा असला काय, कोणता हि रुपाया कोठें हि चालतो; त्याप्रमाणेंच समर्थांचा जुना दासबोध घ्या, नवा दासबोध घ्या अथवा स्फुट प्रकरणें घ्या, त्यांतले सिद्धान्त इतके ठाम आहेत कीं, ते अमुक ठिकाणचे म्हणून नाकारावयाचे आणि अमुक ठिकाणचे म्हणून स्वीकारावयाचे असा भेदभाव करण्याचें कारण नाहीं.

यांत सकृद्दर्शनी एक दोन गोष्टींत अपवाद असल्यासारखा दिसतो, पण तो वास्तविक तत्वाचा भेद नसून तपशिलाचा भेद आहे. समर्थांनीं जुन्या दासबोधांत नरदेहाची निंदा केली आहे तर नव्या दासबोधांत नरदेहाची महती गायिली आहे; आणि जुन्या दासबोधांत प्रपंच हा '**परमार्थ बुडवणा**' आहे असें म्हटलें आहे, तर नव्या दासबोधांत '**आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ-विवेका**' असें म्हटलें आहे; तेव्हां या दोहोंचा मेळ कसा घालावयाचा, अशी शंका उद्भवते. तथापि हा विरोध वरवरचा, शाब्दिक, आहे, तत्वतः यांत विरोध नाहीं हें सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास दिसून येईल.

नरदेहाची कांहीं ठिकाणी स्तुति केली आहे तर कांहीं ठिकाणीं निंदा केली आहे अशी जी समजूत आहे ती बरोबर नाहीं. निंदा करण्याचें कारण वेगळें आहे आणि स्तुतीचें हि कारण वेगळें च आहे. एका च भूमिकेवरून कधीं निंदा तर कधीं स्तुति असा प्रकार झालेला नाहीं. जेथें देहाची निंदा आहे तेथें ती देहबुद्धीची

निंदा आहे. देह म्हणजे च मी असें मानणें किती बाष्कळ आहे तें पटण्याकरितां ती निंदा आहे.

'देहेबुद्धि ती आत्मबुद्धी करावी' या करितां अशी निंदा केली आहे.

देहासी थोरपण आणिता। शीणचि उरे तत्वता। जु. दा. ७४२

देह विटाळाचें मूळ। देह अशुद्धाचा गाळ।
देह नाना अनर्गळ। दुर्गंधीचा ओतिला॥ ७—४४

देहीं असे नाना विकार। देह अत्यंत असारी असार।
ऐसा तो हि क्षणभंगुर। अवचिता नासे॥

ऐशा मेघळ्याचा अभिमान। माथा वाहती मूढ जन।
वस्त्रभूषणें शृंगारून। मी थोर म्हणती॥ ७-४९

या वरून ही निंदा नरदेहाची नसून देहाभिमानाची निंदा आहे हें ४९ व्या ओवीवरून स्पष्ट आहे. आणि याविषयीं शंका राहूं नये म्हणून "जरी देह हा निंदिला। तरी काय परमार्थ बुडाला" असा रोखठोक प्रश्न विचारला आहे.

जेथें नरदेहाची स्तुति केली आहे तेथें इतर जीवजंतूंच्या देहाहून नरदेह श्रेष्ठ म्हणून ती स्तुति आहे; आणि परमार्थाचा लाभ होण्याला देह च साधन आहे, म्हणून त्या साधनाचा गौरव आहे.

धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो।
जो जो कीजे परमार्थलाहो। तो तो पावे सिद्धीते॥ १।१०।१

या नरदेहाचेनि आधारें। नाना साधनांचेनि द्वारें।
मुख्य सारासार विचारें। बहुत सुटले॥ १-१०-१८

देह परलोकीचें तारू। नाना गुणांचा गुणागरु।
नाना रत्नांचा विचारु। देहाचेनी॥ १८-४-२२

जे जे देह धरूनि आले। ते ते कांहीं करून गेले।
हरिभजनें पावन जाले। किती येके॥ १८-४-२६

आत्म्याकरितां देह जाला। देहाकरितां आत्मा तगला।
उभय योगे उदंड चालिला। कार्यभाग॥ १८-४-३२

अशा प्रकारें परलोक साधण्याचें साधन म्हणून नरदेहाची समर्थांनीं स्तुति केली आहे. हें विसरून जो देह म्हणजे च मी असें मानतो तो आत्महत्यारा होय.

देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।
देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी ॥ ९–६–५९

या करितां देहेबुद्धि टाकावी, देहाचा अभिमान टाकावा, परंतु नरदेह हा दुर्लभ आहे, तो पुनःपुनः प्राप्त होईल असें नाहीं, तेव्हां प्राप्त झालेल्या नरदेहाच्या साधनानें आत्मप्राप्ति करून घ्यावी म्हणून या दुर्लभ नरदेहाची स्तुति केली आहे व अशी स्तुति जुन्या दासबोधांत हि आहे.

बहुता जन्माच्या शेवटीं । जेणे चुके अटाटी ।
तो हा नरदेह भेटी । करी भगवंती ॥ जुना दासबोध समास ६–२६
या नरदेहाचेनि लागवेगे । सार्थक करावे संतसंगें । स. ६–२८

पण हा समास नव्या दासबोधांत समाविष्ट झाल्यानें या ओंव्या जुन्या दासबोधांतल्या आहे हे फारसें कोणाच्या लक्षांत च येत नाहीं. असो. नव्या दासबोधांत सर्व च विषय सविस्तर वर्णिल्यामुळें त्यांत नरदेहाची जशी निंदा आहे तशी च स्तुति हि आहे. पण ती स्तुति व निंदा वेगवेगळया अर्थी व वेगवेगळया प्रसंगानें आलेली आहे. उदाहरणार्थ नव्या दासबोधात चतुर्दशब्रह्माची प्रस्तावना करतांना दशक ७ समास २ यांत देहाची निंदा आहे.

देहाचें जें थोरपण । तेंचि देहबुद्धीचें लक्षण ।
मिथ्या जाणोनि विचक्षण । निंदिति देहो ॥ ७–२–३४

जुन्या दासबोधांतला ७ वा समास ४२ वी ओवी आणि नव्या दासबोधांतली वर उद्धृत केलेली ओवी या दोन्ही सारख्याच असल्यानें समर्थांच्या विचारसरणींत तत्वतः दोन्हीं ग्रंथांत साम्य किती आहे तें दिसून येतें.

'प्रपंच आणि परमार्थ' या संबंधांत जुना दासबोध आणि नवा दासबोध यांतील मतांत अंतर पडलें आहे पण तें हि विसंगत नाहीं. जुन्या दासबोधांत केवळ परमार्थप्राप्तीच्या मार्गाचा च उपदेश करावयाचा होता; त्यांत इतर व्यावहारिक विषयांचा समावेश मुळीं च झालेला नाहीं. नवा दासबोध हा केवळ मुमुक्षूंना च उद्देशून लिहिला नसून अखिल समाजास उद्देशून लिहिलेला आहे. पंचवटींतला जुन्या दासबोधांतला उपदेश सांप्रदायिक शिष्यापुरता च होता. नवा दासबोध हा चारी आश्रमांतील अखिल जनतेकारितां आहे. विशेषतः श्रीशिवाजी महाराज, निळो सोनदेव, बाळाजी आवजी चिटणीस यासारखे प्रत्यक्ष राजे व राजकार्यधुरंधर गृहस्थ

प्रत्यक्ष शिष्य म्हणून होते. अर्थात च त्यांना स्वधर्माचा म्हणजे क्षात्रधर्माचा व सेवकधर्माचा उपदेश समर्थांनीं केला. अशा रीतीनें प्रत्येक वर्णाला त्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें जो जो उपदेश केला त्या त्या उपदेशाचा संग्रह नव्या दासबोधांत एकत्र असल्यानें त्यांतील विवेचन एकांगी नसून तें व्यवहाराला धरून आहे. म्हणून च जुन्या दासबोधांतली प्रपंचाकडे पाहण्याची दृष्टि आणि नव्या दासबोधांतली प्रपंचाकडे पहाण्याची दृष्टि वेगवेगळी दिसते. ह. भ. प. पांगारकर हे आपल्या रामदासखंडात लिहितात कीं, 'दासबोध हा जसा अध्यात्मशास्त्राचा **तसा च हिंदु समाजशास्त्राचा एक महनीय ग्रंथ आहे. असा दुसरा ग्रंथ मराठी भाषेंतच काय, पण दुसऱ्या कोणत्या हि भाषेंत सांपडणें कठिण आहे.**' (रामदासखंड पृ. २६८). अर्थात च अध्यात्मशास्त्र व समाजशास्त्र या दोहोंचा मेळ घालतांना केवळ अध्यात्मग्रंथांतली एकांगी मतें उपयोगी पडत नाहींत हे अनुभवसिद्ध आहे. जुना दासबोध हा ग्रंथ केवळ अध्यात्मग्रंथ आहे. त्यांत 'पहिलें हरिकथानिरूपण' एवढें च आहे, 'दुसरें तें राजकारण, तिसरें तें सावधपण सर्व विषयीं' हें नाहीं. आणि 'चौथा अत्यंत साक्षेप' हा हि नाहीं. यामुळें देशकालवर्तमानाप्रमाणें दोहोंत थोडासा फरक हा पडणार च. तथापि हा फरक तत्वज्ञानांत नाहीं; उपदेश घेणाऱ्याच्या भूमिकेनुसार हा भेद आहे, एवढें लक्षांत ठेवणें जरूर आहे. जुन्या दासबोधांतल्या तत्वज्ञानापुरतीच तुलना करावयाची झाल्यास नव्या दासबोधांतल्या पहिल्या आठ दशकांतील विवेचनाशीं च ती करावी, म्हणजे त्या दोहोंत पूर्ण साम्य दिसून येईल. नव्या दासबोधाचा दशक ९ ते २० हा भाग उत्तरार्ध मानला गेला आहे व त्याची रचना हि पुष्कळच मागाहून झाली आहे. यामुळें नव्या दासबोधांतले पहिले आठ दशक व पुढचे बारा दशक यांत हि कांहीं अंतर दिसून येतें, मग जुना दासबोध आणि नव्या दासबोधांतला उत्तरार्ध यांत अंतर दिसून आल्यास नवल काय? असो. आतां जुना दासबोध व नवादासबोध यांत प्रपंच व परमार्थ याविषयीं काय म्हटलें आहे तें आधीं पाहू आणि नंतर त्याची चिकित्सा करूं.

**जुना दासबोध—**

अरे जयासी परमार्थ व्हावा। तेणे प्रपंच त्यजावा।
प्रपंचीं परमार्थ करावा। तो ठाकेना सर्वथा॥ १८–१८

जयास वाटे वैराग्य करावें। तेणें कांहीं च न विचारावें।
उठोनि वाटेसि लागावे। दिगंताप्रती॥ १८–२४

जरी हा प्रपंच शाश्वत जाणतो । तरी आम्ही यासी च धरितो ।
हा अशाश्वत म्हणोनि रडतो । तुम्हा भोवतीं ॥ ११-५९

प्रपंच म्हणिजे उदास नागवणा । आणि परमार्थ म्हणिजे प्रपंचबुडवणा ।
परस्परें या दोघाजणा । सर्वथा न पडे ॥ १८-२१

यांत प्रपंच आणि परमार्थ यांचा उभा दावा असल्यासारखें वर्णन आहे! आतां नवा दासबोध काय सांगतो पाहा—

**नवा दासबोध—**

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थविवेका ।
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणे तुम्हीं कष्टी व्हाल ।
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैचा ॥
परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी ।
संसारीं असता च मुक्त । तो चि जाणावा संयुक्त ।
अखंड करी युक्तायुक्त । विचारणा हे ॥

प्रपंचीं जो सावधान । तो चि परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥
म्हणोनि सावधपणें । प्रपंच परमार्थ साधणें ।
सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर ।
ऐसा हा लौकिक विचार । दिसत चि आहे ॥ द. १२ स. १
प्रपंच करावा नेमक । पहावा परमार्थविवेक ।
जेणेकरितां उभयलोक । संतुष्ट होती ॥ ११-३-२
तरी आतां ऐसे न करावें । बहुत विवेकें वर्तावें ।
इहलोक परत्र साधावे । दोहीकडे ॥ ११-३-९
प्रपंची असोन परमार्थ पाहे । तो चि ये स्थितीते लाहे ।
प्रारब्धयोगेंकरूनि राहे । लोकामध्ये ॥ १२-८-२१
जगदीशा परता लाभ नाहीं । कार्याकारण सर्व कांहीं ।
संसार करीत असतां हि । समाधान ॥ १२-८-३०

मागा होते जनकादिक । राज्यकरिताहि अनेक ।
तैसे चि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ॥ १२-८-३१

परमार्थी आणि विवेकी । त्याचे करणे माने लोकीं ।
कां जे विवरविवरो चुकी । पडोचि नेदी ॥ १९-६-१

किती प्रपंची जन । अखंड वृत्ती उदासीन ।
सुखदुःखें समाधान । दंडळेना ॥ १९-८-२

उपाधी कांहीं राहात नाहीं । समाधाना एवढें थोर नाहीं ।
नरदेह प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा ॥ १९-८-३०

या आणखी अशा च अर्थाच्या दुसऱ्या अनेक ओव्यांतून प्रपंच आणि परमार्थ यांचा मेळ घालून दाखविला आहे आणि दोन्ही सांभाळण्याविषयीं उपदेश केला आहे. यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, नव्या दासबोधांतले जे अनेक उतारे दिले आहेत त्यांतला एक हि उतारा दासबोधाच्या पूर्वार्धांतला नाहीं. सगळे उतारे उत्तरार्धांतले आहेत. यावरून पूर्वी एकदां केलेल्या विधानाला च पुष्टि मिळते, ती अशी कीं, जुना दासबोध आणि नव्या दासबोधाचा पूर्वार्ध यांत जितकें विचारसाम्य आहे तितकें जुना दासबोध आणि नव्या दासबोधाचा उत्तरार्ध यांत साम्य नाहीं.

असा फरक पडण्याचें कारण हें च कीं, प्रारंभींचा कडक वैराग्याचा उमाळा शांत झाल्यावर, जगाचा व लोकस्थितीचा भलाबुरा अनुभव आल्यावर आणि संकुचित सांप्रदायिक दृष्टि जाऊन सर्व व्यापक लोकसंग्रहाची दृष्टी आल्यावर प्रपंच व परमार्थ, भोग व त्याग, समाजधर्म व व्यक्तिधर्म यांच्या मर्यादा लक्षांत येऊं लागल्या आणि शक्याशक्यतेच्या दृष्टीनें व्यवहार पारखला जाऊं लागला.

बहुत चि सुकुमारा स्वस्थ नाहीं शरीरा ।
निशिदिनि जनचिंता लागलीसे उदारा ।
सकळजन सुखावे तो कसा काळ फावे ।
भजन जन उकावे सर्व आनंद पावे ॥

अशा प्रकारच्या जनचिंतेंत च समाजधर्माचें बीज सांठवलें आहे. समर्थांना लोकोद्धार करावयाचा होता व त्यासाठीं कार्यकर्ते तयार करावयाचे होते. जुन्या दासबोधांत कार्यकर्त्यांचा विचार केलेला नाहीं. नव्या दासबोधांत 'महंते महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे । जाणते करून विखरावे । नाना देशीं ' असा कार्यक्रम

असल्यामुळें उपदेशाचा ओघ 'दृढनिश्चयो धरावा। संसार सुखाचा करावा। विश्वजन उद्धरावा। संसर्गमात्रें' या दिशेला वळला. आणि भक्ति, वैराग्य, विषयत्याग इत्यादि शब्दांच्या व्याख्या हि बदलूं लागल्या. 'सकळा राखणे राजी। हे मुख्य भक्ति जाणिजे' ही भक्तीची व्याख्या झाली. नुसता संसारत्याग हें 'हेकाडपिसें' ठरून वैराग्याच्या मागें 'विवेक' शब्दाची उपाधी लागली. 'शबल विषय त्यागणें। शुद्ध कार्याकारण घेणें' अशी मर्यादा घालून विषयभोगाला परवानगी मिळाली. 'सत्याचा जो साभिमान। तो जाणावा निरभिमान' असें म्हणून देशाभिमान, धर्माभिमान हे प्रशस्य ठरले.

मतांतराचे असे अनेक कप्पे दाखवितां आले तरी हे सर्व कप्पे उघडण्यास उपयोगी पडणारी किल्ली कोणती हें कळणें अगत्याचें आहे. याकरितां या सर्व तत्वज्ञानाच्या बुडाशीं जाऊन शोध करतां करतां ही किल्ली हातीं येते. ती कोणती तर 'उपाधींत वावरून हि अलिप्त राहतां येते याची जाणीव' ही च ती किल्ली होय. गीतेंतील कर्मयोगाची हि ही च किल्ली आहे. कर्म म्हटलें कीं, तें कसें हि केलें तरी बंधनकारक होणारच, ही कल्पना उराशीं बाळगली कीं, समूळ कर्मत्यागाशिवाय, गत्यंतर नाहीं. उलटपक्षीं 'कर्म करूनहि पाण्यांतील कमल पत्राप्रमाणें अलिप्त राहतां येते' हें तत्व मनाला पटलें कीं, कर्मयोगाचा मार्ग मोकळा झाला. पूर्व वयांत जुना वेदांत वाचून वाचून समर्थ रामदासस्वामींचा हि असाच ग्रह झाला होता कीं, प्रपंचाच्या उपाधींत सांपडल्यावर त्या उपाधीचा उपसर्ग न लागणें संभवनीय नाहीं. याकरितां ज्याला परमार्थ जोडावयाचा असेल त्यानें प्रपंचाची शृंखला तोडली च पाहिजे. हें तत्व त्यांनीं जुन्या दासबोधांत मांडलें. या मताची सूचक अशी एक च ओवी येथें दाखल करतों. ती अशी—

संसारीं असोनि अलिप्त म्हणे। त्याचें फटकाळ बोलणे।
आधार धरी, टाकावा कोणे। प्रपंच म्हणोनी॥ १८-२०

यांत संसारांत राहून अलिप्त राहतो असें म्हणणें फटकळ ठरविलें असून जनकादिकांचा दाखला दिला जातो त्याची हि थट्टाच केली आहे. परंतु पुढें जेव्हां स्वतः समर्थ च स्वतः अलिप्त राहून महाराष्ट्राचा प्रपंच करूं लागले, तेव्हां त्यांना गीतेंतला 'कर्मण्यकर्म यः पश्येत्' हा कर्मयोगाचा सिद्धांत पटूं लागला आणि मग ते महंतांना हि तसा च कर्मयोगाचा उपदेश करूं लागले. त्या उपदेशांतील पुढील निवडक वचनें पाहा—

उपाधीसी विस्तारावें। उपाधींत न सापडावें।
नीचत्व पहिले च घ्यावे। आणि मूर्खपण॥ ११-९

साकडी मध्ये वर्तो जाणे । उपाधीमध्ये मिळो जाणे ॥
अलिप्तपणे राखो जाणे । आपणासी ॥ ११-६-१३

आपणास उपाधी मुळीं च नाहीं । ऋणानुबंधे मिळाले सर्व हि ।
आल्या गेल्याची क्षिती नाहीं । ऐसें जालें पाहिजे ॥ १९-८-२७

प्रकृती सारिखे चालावे । परी अंतरीं शाश्वत वोळखावें ।
सत्य होऊन वर्तावे । लोकां ऐसे ॥

लोकांमध्ये तरे । आणि जना तारी ।
धन्य तो संसारी । दास म्हणे ॥

उपाधीमध्ये असावे । परी विवेकें निघोनि जावे ।
मनःपासूनि नसावें । उपाधीमध्यें ॥

मनोगत अवघे परब्रह्मीं । शरीर वर्ते मायाभ्रमीं ।
तयास संसार ऊर्मी । बाधूं न शकती ॥

असो. असे उतारे अनेक देतां येतील. पण त्या सर्वांचें तात्पर्य हें च कीं, प्रपंच आणि परमार्थ यांचें कांहीं अहिनकुलवत् वैर नाहीं. कार्य आणि ज्ञान यांचा विरोध तमःप्रकाशवत् आहे असें श्रीशंकराचार्यांनीं प्रतिपादिलें व कर्मयोगाला विरोध केला. ती च विचारसरणी समर्थांच्या मनावर हि प्रथमारंभीं ठसली होती. परंतु मागाहून आत्मप्रचीति आणि भगवद्गीतादि ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास यांच्या योगानें रामदासांच्या मनाला गीतेंतला कर्मयोग पटला आणि त्यांनीं कर्मयोगपर उपदेश सुरू केला आणि लोकोद्धार प्रत्यक्ष साधला. जुना दासबोध हा प्राथमिक ग्रंथ असल्यानें त्यावेळीं समर्थांचें ध्येय अद्यापि ठरावयाचें होतें. तें ध्येय ठरून प्रत्यक्ष कार्याला प्रारंभ केल्यानंतरच्या अनुभवाचें सार नव्या दासबोधांत आहे. तरी पण प्रपंच व परमार्थ यांच्यांतील संबंध व विरोध वगळल्यास इतर बाबतींत समर्थांचा जुना दासबोध हि नव्या दासबोधाचें धाकटें भावंड शोभण्यासारखा च आहे. विशेषतः जुन्या दासबोधांतली पुढील प्रकरणें वाचकांनीं अगत्यपूर्वक वाचावी.

जुन्या दासबोधांतल्या पहिल्या समासाला मंगलाचरण म्हटलें आहे, पण त्यांत रूढ अर्थानें मंगलाचरण नाहीं. त्यांतील विवेचनावरून देखील तो समास आरंभीं च सांगितला कां मागाहून जोडला याची शंका च येते. त्यापेक्षां नववा समास हा

आरंभींचा समास मानल्यास तें अधिक सयुक्तिक दिसेल. सद्गुरुलक्षण, सच्छिष्य-लक्षण, वैराग्यनिरूपण व आत्मनिवेदन हे चार समास अमोलिक असून ते नव्या दासबोधांत सुप्रतिष्ठा पावले आहेत. निरभिमान शांति, विविध शिकवण, प्रारब्ध प्रयत्न या तीन समासांचा विस्तार नव्या दासबोधांत विशेषत्वानें केला आहे, यावरून त्यांचें महत्व लक्षांत येईल. मराठी भाषेचा अभिमान दोन ठिकाणीं आला आहे तो मननीय आहे. पंधराव्या समासांत रामभक्तीचा व राममंत्राचा उपदेश आहे. १८, १९, २० व २१ हे चार समास विशेष महत्वाचे असून त्यांतलि विवेचन वारंवार वाचून पारायण करण्यासारखें आहे. यांतील विषयांचा विस्तार नव्या दासबोधांत अनेक समासांतून केला आहे. शेवटच्या समासांतील 'अनिर्वाच्य ब्रह्म' या विषयाचा ऊहापोह नव्या दासबोधांतल्या हि शेवटच्या दशकांतच 'विमलब्रह्म' या समासाच्या द्वारा केला आहे. एवंच समर्थांचा नवा दासबोध समजण्याला या जुन्या दासबोधाचें साहाय्य बरें च होतें. यास्तव समर्थांच्या ग्रंथांचा अभ्यास व पारायण करणाऱ्यांनीं समर्थांच्या या प्रारंभीच्या ग्रंथाकडे हल्लींहून अधिक लक्ष द्यावें अशी त्यास प्रार्थना आहे.

( ४० )

# श्रीसमर्थांचा संप्रदाय

( लेखक — रा. यशवंत सूर्यराव सरदेसाई, मुंबई )

तुझेनि सर्व बोलणें । तुझेनि सर्व चालणें ॥
तुझेनि योगधारणें । तुझेनि राजकारणें ॥

श्रीसमर्थांचा संप्रदाय हा एक राष्ट्रीय पंथ आहे. एका विशिष्ट विचारसरणीनें भारलेली ती एक सामाजिक संस्था आहे. समर्थांचे मठ म्हणजे एक School of National Thoughts म्हणतां येईल. त्यांचे महंत महाराष्ट्रधर्माचे मतप्रचारक होत. आणि त्यांचा भगवा झेंडा हें त्यागचिन्हांकित राष्ट्रीय निशाणाप्रमाणें पवित्र, आदरणीय व पूज्य आहे. समर्थांचा संप्रदाय देशांतील माजलेलें रान झाडून काढणारा, समाजांतील आळसाचें शेवाळ धवळून टाकणारा, व प्रत्येक व्यक्तीला कार्यप्रवण करून राष्ट्राच्या आघाडीवर उत्साहानें तयार ठेवणारा धर्म होय ! पंजाबांतील नानकगुरुंचें कार्य, बंगाल्यांतील रामकृष्णविवेकानंदांचें कार्य, युरोपांतील फ्रान्सिस्कन मिशनचें कार्य, तें च समर्थांच्या महाराष्ट्रधर्माचें कार्य होय ! देशांत प्रबळ शक्ति निर्माण व्हावी व त्यायोगें 'हिंदुस्थान बळावलें' असा थाट दिसावा अशी समर्थांची इच्छा होती. 'पुण्यमार्ग प्रतिष्ठावा, लावावी धर्मवासना' हें समर्थांचें ब्रीद असलें, तथापि हा पुण्यमार्ग स्वर्गारोहणाचा नसून सत्तारोहणाचा होता, आणि ही धर्मवासना Religion या शब्दापुरती च मर्यादित नसून Duty या अर्थापर्यंत तिची व्याप्ति होती. 'उपासना उपासना' म्हणून समर्थ जयघोष करतात, ती उपासना 'यत्न तो देव जाणावा' या देवाची ! समर्थांचें चरित्र, त्यांच्या कोदंडधारी रामाचें वर्णन, त्यांच्या वीर हनुमंताचीं स्तोत्रें, त्यांच्या मठस्थापनेचे उद्योग, त्यांच्या महंताबद्दलचा दंडक, या सगळ्या गोष्टी लक्षांत घेतल्या, त्यांचें जोरदार वाङ्मय, जळजळीत उपदेश, काळीज पिळवटून निघालेले कडक उद्गार आणि त्यांनीं केलेली तपश्चर्या पाहिली, म्हणजे हा महंत व्यक्तीपुरता च समर्थ नसून देशाला प्रबळ, सामर्थ्यवान, संघटित, स्वतंत्र करणारा युगप्रवर्तक होता, असें म्हणण्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं.

देशांत ज्यावेळीं स्वराज्य स्वातंत्र्य न्यायनीति असते, सुबत्ता सुखसमाधान शांति नांदते, त्यावेळीं निर्माण होणारें तत्त्वज्ञान अध्यात्मनिष्ठ असतें. जीवनाला अधिक सुंदर, अधिक प्रसन्न, अधिक आदर्शमान करण्याविषयीं देशांतील महात्म्याची बुद्धि खर्च होते. पण ज्या वेळीं देश विपन्नावस्थेंत असतो, ज्या वेळीं समाजांत

अधर्म माजतो, ज्यावेळीं बुद्धिस्थानें भ्रष्ट होतात, ज्यावेळीं 'मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला' अशी स्थिति होते, ज्यावेळीं ब्राह्मण गुरुत्वापासून च्युत होतात, क्षत्रियांचे बाहु परकीयांची सेवा बजावतात, आपल्या 'धनी' पणाची शंका स्वतःला च वाटूं लागते, सगळीकडे दारिद्र्य, औदासिन्य, निष्क्रियता, द्वेष, कलह, ग्रामण्यें, चोऱ्या चहाड्या यांना ऊत येतो, त्या वेळीं देशाला

धीर्धरा धीर्धरा तकवा। हडबडूं गडबडूं नका॥

म्हणून अधिकारवाणीनें सांगणारा महात्मा पुढें येतो! योग्य प्रसंगीं समर्थांचा अवतार झाला. देशाला तयार करण्याच्या बाबतींत, देशासमोर उत्साहजनक कार्यक्रम ठेवण्याच्या बाबतींत व सर्वत्र अखंड सावधानतेची विद्या पेरण्याच्या बाबतींत समर्थांची आवाडी मार्गदर्शक, अनुकरणीय, व चिरंजीव ठरली आहे, यांत मुळींच शंका नाहीं. समर्थांनीं नेणत्यांना जाणते केले, तकवा सुटलेल्यांना मर्द बनविलें, निश्चय मनावर बिंबविले, प्रत्यय पटवून दिले, शक्तीनें राज्यें मिळतात हें दाखवून दिलें आणि दंडकारण्याचें आनंदवन करून सोडलें. थोर विभूतिमत्व, जोरदार तत्त्वज्ञान, प्रचंड कार्याची उभारणी, संघटित सामर्थ्याचा आटोप आणि प्रत्यक्ष पदरांत फळ पडणारा व्यावहारिक सिद्धांत, यांमुळें समर्थांचें धुरीणत्व सर्वमान्य झालें. समर्थांच्या वाङ्मयांतून त्यांची विचारसरणी स्पष्ट दिसते. स्वतःच्या प्रपंचापेक्षां राष्ट्राच्या प्रपंचाचा घोर त्यांना अधिक लागला होता; मोक्षपदापेक्षां राज्यपदाचें महत्त्व त्यांना अधिक वाटत होतें; नंदनवनापेक्षां आनंदवनभुवनाचीं स्वप्नें त्यांना अधिक पडत होतीं; यक्षकिन्नरांच्या संगीतापेक्षां महाराष्ट्रांतील दऱ्याखोऱ्यांतून निनादणारीं रणवाद्यें ऐकून त्यांना अधिक आनंद वाटत होता; स्वर्गींच्या अमृत नदीपेक्षां सह्याद्रीमधील स्नानसंध्येच्या पाण्याला उदंड भरती आलेली पाहून ते बेभान झाले होते, व 'लिहिला प्रत्ययो आला, मोठा आनंद वाटला' म्हणून ते बेहोष झाले होते! समर्थांचें थोर भाग्य कीं, त्यांना 'चढता वाढता प्रेमा आनंदवनभुवनीं' निर्माण झालेला पहावयास मिळाला. आम्हांला हें भाग्य लाभेल काय?

( ४१ )

# श्रीसमर्थांचा " उत्तम पुरुष "

( लेखक — प्रो. **नरहर रघुनाथ फाटक**, बी. ए., मुंबई )

जगांतील नामांकित तत्त्वज्ञानामध्यें आदर्श व्यक्तित्व निर्माण करण्याविषयींचा त्या त्या तत्त्वोपदेशकाचा रोख दिसून येतो. जगांतल्या मानवी व्यवहारांतील दुःखाचा उगम मनुष्यस्वभावांतील दोषांत असून ह्या दोषांचा परिहार करण्याचे उपाय सांगून त्यांची जागा गुणांनीं भरून काढली कीं, मानवी व्यवहार सुखाचा होईल, अशी कल्पना सर्व तत्त्वज्ञानपद्धतींच्या मागें असल्याचें आढळून आल्याशिवाय रहात नाहीं. प्लेटो, अरिस्टाटलपासून कालपरवांच्या नीत्शेपर्यंत बहुतेक सर्व युरोपियन तत्वोपदेशकांच्या विचारसरणींत आदर्श व्यक्तित्वाचें चित्र रेखाटल्याचें आपण पाहूं शकतो. प्लेटोनें तत्वज्ञ राजा ( philosopher king ) या शब्दांनीं आपली समजूत विशद केली आहे. समाजाचा अग्रणी नियंता तत्वज्ञ असला तर च तो जगाला सुखाचा योग्य मार्ग दाखवील, असा प्लेटोचा निष्कर्ष आहे. अरिस्टाटलनें good man ( सज्जन ) या शब्दांनीं आपल्याला इष्ट वाटणारें आदर्श चारित्र्य विशद केलें आहे. अगदीं अलीकडचा नित्शे घेतल्यास तो super man म्हणजे एकप्रकारें त्रिगुणातीत पुरुषाच्या कल्पनेनें आपलें तत्त्वज्ञान लोकांना सांगतांना दिसतो. कर्तव्यासाठीं कर्तव्य (duty for duty's sake ) किंवा कांहीं अंशीं निष्काम कर्मयोग, असा सिद्धान्त नित्शेच्या आधीं कँटनें स्वीकारला आहे. कार्लाइल आपल्या प्रतिपादनांत Hero या शब्दानें वरच्यांच्या प्रमाणें आदर्श चारित्र्याचा पुरस्कार करतो.

आपल्याकडील सर्वमान्य व लोकप्रिय भगवद्गीतेंत हि ही च तऱ्हा दृष्टीस पडते. या ग्रंथांत एकच स्वरूपाच्या चारित्र्याचीं वर्णनें पांच सहा ठिकाणीं आलेलीं आहेत. दुसऱ्या अध्यायाच्या शेवटचा स्थितप्रज्ञ १२ व्या अध्यायाच्या अखेरीस निराळ्या संज्ञेनें निराळ्या शब्दांच्या पोषाखांत दिसतो. १३ व्या अध्यायांतील ज्ञानी दुसरा कोणी नसून दुसऱ्यांतील स्थितप्रज्ञ व बाराव्यांतील भक्त च होय, असें ध्यानांत येण्याला उशीर लागत नाहीं. हें च चारित्र्य पुनश्च चौदाव्याच्या शेवटीं 'त्रिगुणातीत' या नांवानें आपल्यापुढें येतें. १६ व्या अध्यायांत दैवी संपत्ति आणि आसुरी संपत्ति या विषयाचा विस्तार आहे. दैवी संपत्तीचा पुरुष न्याहाळल्यास तो स्थितप्रज्ञ, भक्त, ज्ञानी, व त्रिगुणातीत यांच्या च तोंडावळ्याचा असल्याबद्दल खात्री पटते. प्रत्येक स्थळीं ती च लक्षणें – फार तर एखाद्या लक्षणाची

भर पडून – दिसतात. येथें जीं पांच स्थळें निर्देशिलीं तेवढ्यावरून गीतेमध्यें आदर्श चारित्र्याची मीमांसा अन्यत्र आलेली नाहीं असें मात्र समजूं नये. इतर अध्यायांतून त्याची मीमांसा केलेली सांपडते. यावरून गीताकारासमोर विशिष्ट लक्षणाचें चारित्र्य लोकांनीं अंगीकारल्यास मानव जातीचा उद्धार होईल, हा उद्देश असल्याचें गळीं उतरते. गीतेमधील आदर्श चारित्र्याच्या खुणा महाभारतांत किती तरी ठिकाणीं विखुरलेल्या आहेत. पूर्वी युरोपियन तत्त्वोपदेशकांची जी दृष्टि सांगितली ती च गीताकाराची होती, याबद्दल येथें जास्त विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं.

श्री समर्थांनीं दासबोधांत अशीच दृष्टि ठेवलेली आहे. लोकस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावर त्यांना जिकडेतिकडे गोंधळाशिवाय दुसरें कांहीं च दिसेना. देवाची भक्ति वाढवावयाची हें त्यांचें ध्येय, परंतु देवांबद्दल लोकांना स्पष्ट कल्पना नाहीं, सर्वत्र नाना मतें व नाना पंथ यांचें प्राबल्य माजलेलें आहे; यांतून लोकांना मार्ग दाखवावयाचा तर मनुष्याचें जीवन आणि ईश्वराचें शुद्ध स्वरूप यांची परीक्षा करण्याशिवाय समर्थांना गत्यंतर नव्हतें. त्यांनीं मनुष्याच्या जीवनक्रमाचें एका ठिकाणीं अतिशय मार्मिक चित्र रेखाटलें आहे. त्या चित्रांतल्या माणसाचीं त्यांनीं तीन लग्नें लावलीं हें कोणाला अत्युक्तीचें वाटेल, पण तेवढा भाग सोडून त्या चित्राशीं आजच्या मानवी जीवनाची तुलना केल्यास फारसा फरक आढळणार नाहीं. तसा फरक आढळण्याचें कारण हि नाहीं. मनुष्याच्या बाल्य, तारुण्य, आणि वार्धक्य या तीन अवस्था कायमच्या आहेत. बाल्यावस्थेंत विद्यार्जन, तारुण्यांत व पुढें गृहस्थाश्रमाचा कारभार ही आयुष्यांतल्या कामाची वाटणी आजसुद्धां बदललेली नाहीं. दुराचाराकडे झुकण्याची प्रवृत्ति आजदेखील मनुष्यामध्यें त्यांच्या काळाइतकीच तीव्र आहे. आत्मस्तुति, परनिंदा, परस्वापहार, परस्त्रियांविषयीं आवड, अहंकार, बलात्कार, दंभ, मानाचा लोभ, इत्यादि आत्मघातकी दोष जसे उपनिषदांतील ऋषींनीं मनुष्याच्या स्वभावांत पाहिले, तसे च गीताकारानें हि पाहिले; त्याच दोषांनीं माणसाचा स्वभाव व्यापलेला आहे, असा लोकस्थितीकडे नजर टाकली तेव्हां समर्थांनाही अनुभव आला; मानवी व्यवहारांतील दुःखाचें मूळ म्हणजे असल्या दोषांनीं भरलेल्या स्वभावाशिवाय दुसरें कोणतें च नाहीं, याबद्दल समर्थांना कसला च संदेह उरला नाहीं. म्हणून असल्या दोषांचें निराकरण हें च त्यांच्या शिकवणीचें तात्पर्य निघते.

दासबोधामध्यें गीतेंतल्याप्रमाणें च मानवी जीवनाच्या दोन दिशा अगदीं स्पष्टपणें दाखविलेल्या आहेत. मूर्ख, पढतमूर्ख, कुविद्य, तमोगुणी, रजोगुणी, बद्ध, टोणपा, करंटा, आळशी, झोपाळू, दुश्चित, भ्रान्त किंवा भ्रमिष्ट या

नांवांनीं दासबोधांत लोकांचा एक प्रचंड वर्ग मानलेला असून सद्विद्य, सत्वगुणी, यत्नशील, सदेव, निस्पृह, विरक्त, महंत, जाणता, विमल, सच्छिष्य, सिद्ध, या नांवांनीं दुसरा वर्ग सुचविलेला आहे. सामान्यत: समाजामध्यें पहिला वर्ग बहुसंख्य असतो. लहानपणापासून ज्या चाकोरींत मनुष्य सांपडेल त्या चाकोरींतून इकडे तिकडे न पहातां किंवा न सरकतां त्यानें मरेपर्यंत जावें, असा नियमच झालेला आहे. जनावराप्रमाणें मनुष्य मर्यादित आणि विकासशून्य बुद्धीचा असता तर त्याच्या जीवनाचा विचार करण्याचा प्रकारच उद्भवला नसता. पण त्याला बुद्धि असून तिच्या साह्यानें आपलीं दुःखें कमी करणें व सुखें वाढविणें शक्य असतां हि तो त्या बुद्धीचा उपयोग करीत नाहीं. सुखदुःखाबद्दल मनांत विचित्र कल्पना बाळगून व पोसून तो आपलें खरें कल्याण कधीं च साधीत नाहीं. अहिताला स्वहित ठरविणारी बुद्धीची विकृति समर्थांनीं जागोजाग मांडली आहे. पहिल्या वर्गाचीं वर्णनें वाचलीं असतां याबद्दल शंका उरणार नाहीं.

माणसाची बुद्धि सुधारल्याशिवाय त्याचा उद्धार व्हावयाचा नाहीं. बुद्धि सुधारावयाची तर तिला नश्वर अशा प्रापंचिक वा व्यावहारिक सुखाऐवजीं श्रेष्ठ शाश्वत सुखाची गोडी लावणें अवश्य ठरतें. तसें श्रेष्ठ व शाश्वत सुख ईश्वराच्या भक्तीनें प्राप्त होते, असा निश्चय झाला तरी ईश्वर कोणाला समजावयाचें हा प्रश्न उत्पन्न होतो. देवाच्या कल्पनांचा बाजार समर्थांनीं उत्तम प्रकारें विचारांत घेऊन देवाची खरी शुद्ध कल्पना विशद केली आहे. यासंबंधांतील समर्थांचें विवेचन हल्लींच्या बुद्धिप्रामाण्यवाद्याला हि आश्चर्यानें क्षणभर थक्क करून सोडण्याइतकें तीक्ष्ण पद्धतीचें आहे. देवासंबंधीं नानाविध कल्पना, देवाला खूष करून ऐहिक स्वार्थ साधण्यासाठीं योजले जाणारे नवसासारखे उपाय, पुढल्या जन्माची आस्था, या कल्पनांचे त्यांनीं धिंडवडे काढले असून प्रयत्नानें मनुष्याला या जन्मांत च सिद्धावस्था प्राप्त करून घेतां येईल, असा समर्थांचा दृढ विश्वास होता. परंतु सगळा समाज एकदम सिद्धावस्थेला पोंचणार नाहीं, हें लक्ष्यांत घेऊन त्यांनीं आपल्या शिकवणीची उभारणी केली आहे. इतर कोणत्या हि संतापेक्षां त्यांना समुदाय करण्याचा व समुदायाला शहाणे करून सोडण्याचा हव्यास जास्त होता. लोकांना सोडून सिद्धाचें चालणार नाहीं किंबहुना लोकांच्या अज्ञानाची जो उपेक्षा करील त्याची सिद्धावस्था असून नसून सारखी च असा कटाक्ष त्यांच्या शिकवणींत ओतप्रोत भरलेला आहे. समुदाय म्हणजे लोकांचें एकीकरण किंवा संघटना. समुदाय करणें, त्याला ज्ञानामृत पाजणें, या गोष्टीबरोबर च समर्थांच्या शिकवणीमध्यें झटकन् डोळ्यांत भरण्याजोगी आणखी एक गोष्ट आहे. ती म्हणजे ग्रंथावलोकनाची. प्रत्येकानें कांहींतरी ग्रंथावलोकन करावें, नुसते च ग्रंथावलोकन करूं

नये तर त्यांतील वचनांचें अर्थान्तर शोधावें, कोणी शंकित भेटल्यास त्याचें सयुक्तिक रीतीनें समाधान करण्याइतका ग्रंथांतील अभिप्रायाचा खोल अभ्यास करावा, असें निरुपण त्यांनीं वारंवार मोठ्या कळवळ्यानें केलेलें आहे. समर्थांच्या ग्रंथावलोकनपर अभिरुचीचा एक परिणाम त्यांच्या मठांतून झालेला ग्रंथसंग्रह हा होय.

त्यांच्या शिकवणींत सांपडणाऱ्या अशा विशेष गोष्टींचा अधिक ऊहापोह न करतां देशांतील माणसें कशीं असावीत याबद्दल त्यांनीं व्यक्त केलेल्या विचारसरणीकडे वळणें योग्य आहे. मथळयांत 'उत्तम पुरुष' हे शब्द त्यांनीं वर्णिलेल्या आदर्शचारित्र्याच्या पुरुषाला अनुलक्षून घातले आहेत व ते त्यांच्या च शिकवणींतून उचललेले आहेत. ज्या दोषांचा त्यांनीं निषेध केला आहे ते दोष नसलेला – उलट अनेक प्रकारचे गुण असलेला–जो पुरुष तो 'उत्तम पुरुष' अशी समर्थांची या बाबतींतील व्याख्या उमगण्याला कठिण नाहीं. त्यांच्या व्याख्येची कल्पना येण्यासाठीं पुढील उतारे उपयोगी पडतील अशी उमेद आहे.

> विद्याहीन वैभवहीन। कुळहीन लक्ष्मीहीन।
> शक्तिहीन सामर्थ्यहीन। अदृष्टहीन भिकारी ॥ ३४
>
> बळहीन कळाहीन। मुद्राहीन दीक्षाहीन।
> लक्षणहीन लावण्यहीन। आंगहीन विपारा ॥ ३५
>
> युक्तिहीन बुद्धिहीन। आचारहीन विचारहीन।
> क्रियाहीन सत्त्वहीन। विवेकहीन संशयी ॥ ३६
>
> भक्तिहीन भावहीन। ज्ञानहीन वैराग्यहीन
> शांतिहीन क्षमाहीन। सर्वहीन क्षुल्लकु ॥ ३७

दासबोध दशक २ समास ३ मधील या ओव्यांच्या उलट त्या च दशकांतील ८ व्या समासांत पुढील ओव्या आहेत.

> भाग्यवंत जयवंत। रूपवंत गुणवंत।
> आचारवंत क्रियावंत। विचारवंत स्थिती ॥ २६
>
> येशवंत कीर्तिवंत। शक्तिवंत सामर्थ्यवंत।
> वीर्यवंत वरदवंत। सत्यवंत सुकृती ॥ २७
>
> विद्यावंत कळावंत। लक्ष्मीवंत लक्षणवंत।
> कुळवंत सुचिष्मंत। बळवंत दयाळु ॥ २८

युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ट ।
दीक्षावंत सदासंतुष्ट । निस्पृह वीतरागी ॥ २९

या दशकांतील व अनुक्रमें पूर्वोक्त समासांतील आणखी एक उतारा असा च वाचनीय आहे.

काठिण्यवचनी कर्कशवचनी । कापट्यवचनी संदेहवचनी ।
दुःखवचनी तीव्रवचनी । शूर निष्ठुर दुरात्मा ॥ २१

न्यूनवचनी पैशुन्यवचनी । अशुभवचनी अनित्यवचनी ।
द्वेषवचनी अनृत्यवचनी । बाष्कळवचनी धिःकारु ॥ २२

सत्यवचनी शुभवचनी । कोमळवचनी येकवचनी ।
निश्चयवचनी सौख्यवचनी । सर्वकाळ ॥

प्रस्तुत उताऱ्यांच्या साह्यानें समर्थांना कोणत्या गुणाचीं माणसें समाजांत वाढावीं असें वाटत होतें याचा किंचित् बोध होण्याला हरकत नाहीं.

जितुके कांहीं उत्तम गुण । तें समर्थाचें लक्षण ।
अवगुण ते करंटलक्षण । सहजचि जाले (१९-४-३१)॥

ही ओवी सदेवलक्षणांतील आहे. दुसऱ्या ठिकाणीं

ऐक सदेवपणाचें लक्षण। रिकामा जाऊं नेदी क्षण । (११।३।२४)

जेथें उदंड जाणीव । तेचि तितुके सदेव ।
थोडे जाणिवेनें निर्देव । होती लोक ॥ ६

व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती ।
तेणें प्राणी सदेव होती । देखत देखतां ॥ ७ (१९-३)

सदैव म्हणजे दैवी संपत्तीचे पुरुष. समर्थांनीं एका ठिकाणीं सद्गुणाला च 'देव' ठरविलें आहे.

यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरे ॥
सावधु देव जाणावा । उन्मत्तु दैत्य बोलिजे ॥
होरट्या दैत्य जाणावा । देव तो सौख्यदायकु ॥
साक्षपी वंश देवाचे । आळशी वंश दानवी ॥

(रामदासकृत स्फुट प्रकरणें पान ३८९.)

दासबोधांत दैवी – आसुरी प्रकृतीचा असा च विवेक आहे.

जाणता देवाचा अंश। नेणता म्हणजे तो राक्षस। (१७–७–१४)
तुंड हेकाड कठोरवचनी। अखंड तोले साभिमानी।
न्याय नीति अंतःकरणी। घेणार नाहीं ॥ ३ ॥
तऱ्हे सीघ्रकोपी सदा। कदापि न धरी मर्यादा।
राजकारण संवादा। मिळोचि नेणे ॥ ४ ॥
ऐसे लौंद बेइमानी। कदापि सत्य नाहीं वचनीं।
पापी अपस्मार जनीं। राक्षेस जाणावे॥ ९ ॥

उत्तम पुरुष समासांची ( १८–६ ) ही प्रस्तावना आहे.
करंटे व भाग्याचे पुरुष यांचा समर्थांनीं एका ठिकाणीं उलगडा केला आहे:—

जेहीं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून ठेले।
येर ते बोलत चि राहिले। करंटे जन ॥ (१८–७–१६)
समजले आणि वर्तले। ते चि भाग्यपुरुष जाले।
या वेगळे उरले। ते करंटे पुरुष ॥ (१४–६–२५ )
विद्या नाहीं बुद्धि नाहीं। विवेक नाहीं साक्षेप नाहीं
कुशळता नाहीं व्याप नाहीं। म्हणौन प्राणी करंटा ॥(९–४–१०)
विद्येवीण करंटा वसे। विद्या तो भाग्यवंत (९–४–७)

श्री समर्थांना मनुष्याच्या ठिकाणीं कोणत्या प्रकारचें चारित्र्य नसावें असें वाटत होतें, याची थोडीशी अटकळ वरील अवतरणावरून येईल. कोणत्या प्रकारच्या चारित्र्यानें मनुष्य स्वतःला आणि इतरांना सुखी करील, याविषयींची समर्थांची कल्पना या च अवतरणांचा आधार घेतल्यास शक्य होईल. मनुष्य आळशी नसावा असें म्हटल्यानें तो उद्योगी असावा, याचा बोध सहजं च होतो. तो गाफील नसावा असें म्हटल्यानंतर तो निरंतर, सावध व खबरदार असावा हें निराळें सांगण्याची गरज रहात नाहीं. परंतु समर्थांनीं लोकांच्या तर्काकडे ही बाजू सोपविलेली नाहीं. त्यांनीं उत्तम गुण घ्यावें असा उपदेश करतांना उत्तम गुण कोणते याची पुनः पुनः यथेच्छ सविस्तर वाच्यता केलेली आहे. दशक २ समास ८ मध्यें सद्विद्येच्या पुरुषाचें वर्णन आहे. तें मुळांतून पाहिल्यास समर्थांपुढें उत्तम पुरुषाची केवढी भव्य मूर्ति होती याचें ज्ञान होईल. त्या समासांतील कांहीं

वचनांचा विचार केल्यास अस्थानीं होणार नाहीं. या वचनांवरून त्या समासांतील सगळ्या विवेचनाचा अंदाज होणार नाहीं. त्यांत पुष्कळ खुब्या आहेत. एकत्र न नांदणारे गुण एकमेकांस जोडून समर्थांनीं उत्तम पुरुषाची मूर्ति निर्मिली आहे. सौंदर्य आणि चातुर्य, बलाढ्यता व धीर, ज्ञान व भक्ति, तप आणि शांति, पांडित्य आणि विरक्ति, संपन्नता आणि औदार्य, श्रेष्ठत्व आणि नम्रता, राजत्व आणि धार्मिकत्व, तारुण्य आणि मर्यादाशीलता अशा गुणांच्या जोड्या बहुधा एका ठिकाणीं नांदत नाहींत. सद्विद्येच्या पुरुषामध्यें ही असामान्यता आढळतें, असें समर्थांचें सांगणें आहे. प्रथम विरोधी गुणांच्या जोड्या मांडल्यावर पुढें कार्यकर्ता, निरभिमानी, परोपकारी, दक्ष, धूर्त, योग्य, तार्किक, कुशल, चपळ, चमत्कारिक, सावध, साक्षेपी, साधक, दृढव्रती, कायाक्लेसी (शी), वासनातृप्त, सखोल, योगी, भव्य, सुप्रसन्न, अशा उत्तम पुरुषांच्या ओळखीच्या खुणा सांगून झाल्यावर "द्रव्यसुची दारासुची। न्यायसुची अंतरसुची। प्रवृत्तिसुची निवृत्तिसुची। सर्वसुची निःसंगपणें ॥२०॥" (२-८) असा आणखी मजकूर आलेला आहे.

येथवर केलेल्या विवेचनाचें थोडक्यांत आणखी स्पष्टीकरण झाल्याशिवाय हा विषय तितकासा ध्यानीं उतरणार नाहीं. श्री समर्थांना आपल्या देशाची हलाखी पाहून समाजाचा प्रत्येक घटक 'उत्तम' व्हावा, अशी चिंता लागली होती. यासाठीं उत्तम पुरुषाचीं लक्षणें त्यांनीं आपल्या उपदेशांत पुनः पुनः आणलीं आहेत. समाजांत महंत, विरक्त, निःस्पृह, सद्विद्येचे, सत्त्वगुणी पुरुष निपजावे व त्यांनीं आपल्या वर्तनाचा कित्ता समाजास घालून द्यावा, तो समाजाकडून स्वयंप्रेरणेनें गिरविला जाईल, अशी भावना न ठेवतां महंतानें समाजाला संघटित करून तो कित्ता गिरवावयास लावावें; असें श्री समर्थांच्या उपदेशाचें निस्संदिग्ध धोरण आहे. लोक अज्ञानी आहेत, त्यांना शहाणे करून सोडावे, ही समर्थांची तळमळ त्यांच्या शिकवणींत अत्यंत उत्कटत्वानें अनुभवास येते. देह हा च आत्मा अशा समजुतीनें व्यवहार करीत रहाणें, अशी लोकांच्या अज्ञानाची व्याख्या दासबोधांतील वचनावरून निघते. देहात्मबुद्धीनें मनुष्य 'मी आणि माझें' या दोन शब्दांच्या व्यापाचा पाश आपल्यासभोंवती गुंडाळून घेतो. माझा देह म्हणजे मी व या देहाच्या अनुषंगानें जें जें कांहीं सुखावह या नात्यानें जवळ येईल तें माझें. या ग्रहाच्या फेऱ्यांत एकदां मनुष्य सांपडला कीं तो कोठवर वहात जाईल याचा भरंवसा रहात नाहीं. बद्ध, करंटा, टोणपा, मूर्ख, पढतमूर्ख, दुश्चित, आळशी, कुविद्येचा, तमोगुणी, रजोगुणी, अशा विशेषणांनीं दर्शविलेलीं माणसें 'मी व माझें' या स्वार्थामुळें अधोगतीस जातात. प्रत्येकानें आपला स्वार्थ थोडा फार आवरल्याशिवाय समाजाची संघटना सबळ व्हावयाची नाहीं. माणसाच्या

स्वार्थाला समाजव्यवस्थेचें कुंपण असलें तरी त्या कुंपणांतील आवारांत एखाद्यानें धुडगूस घालण्याचें मनांत आणल्यास तसा धुडगूस त्याला घालता येतो व असा धुडगूस घालण्याच्या प्रवृत्तीनें च, आळस, दुश्चितपणा, तोंडाळपणा, मत्सर, दुसऱ्याच्या घाताची इच्छा, विद्या, रूप, तारुण्य, कुळ, द्रव्य इत्यादिकांच्या जोरावर दुसऱ्याची हेटाळणी करण्याची हौस, अशा प्रकारचे दोष मनुष्यांत शिरून त्याला समाजाचा शत्रु बनवून सोडतात. स्वार्थ सोडावयाचा म्हणजे प्रपंच सोडावयाचा असा समर्थांनीं स्वार्थत्यागाचा अर्थ केलेला नाहीं. ज्याला प्रपंच नीट करतां येत नाहीं तो परमार्थाला हि नालायक असें समर्थांनीं च म्हटलें आहे. प्रपंच हा च परमार्थाचा अभ्यास करण्याचा आखाडा, अशी समर्थांची भावना दृष्टीस पडते. प्रपंच नीट करावा, आपला प्रपंच परावलंबी नसावा, असें समर्थांचें मत असलें तरी त्यांत च प्रत्येकानें गुरफटून रहावें, आणि परमार्थाकडे साफ दुर्लक्ष करावें, असें त्यांना वाटत नव्हतें.

प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।
परमार्थ अवघा चि बुडवावा । हें विहित नव्हे ॥ दासबोध ९-३-१०३

परमार्थांत ज्याचें त्यानें मग्न व्हावें, हें सुद्धां समर्थांना संमत नव्हतें. समुदायानें परमार्थ साधावयाचा तर स्वार्थत्यागाशिवाय गत्यंतर नाहीं. यासाठीं च त्यांनीं उत्तम गुण अंगीं लावून घेण्याविषयीं आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें आहे. द्रव्यशुचित्व, दाराशुचित्व या गुणांची तपासणी केल्यास समुदायाच्या बळकटीला त्याचा कसा उपयोग होतो तें समजणें अवघड नाहीं. समर्थांचा 'मंडळ्या' हा शब्द संस्था या अर्थानें आपणास आज परिचित आहे. समुदाय हा शब्द देखील त्यांनीं अशा च अर्थानें वापरला आहे. समुदायांतील निरनिराळे कार्यकर्ते हे लहान मोठे पुढारी असल्यामुळें द्रव्यदारा किंवा कनककान्ता या दोन जबरदस्त मोहांचा पगडा त्यावर केव्हां हि न बसणें किती आवश्यक आहे, याची निराळी फोड नको. समुदायाच्या उभारणीला जो आरंभ करील तो आपलें काम वेळच्या वेळीं, कसलें हि न्यून न राहूं देतां अत्यंत आस्थेनें करणारा असला पाहिजे. तो धूर्त अर्थात् दुसऱ्याचे डावपेंच ओळखणारा व त्यावर तोड काढणारा पाहिजे. त्याला माणसें जोडून तीं आपल्या शिस्तींत कायम राखावयाचीं असल्यानें तो 'अमृतवचनी' आणि कमालीचा सोशीक असावा हें उघड आहे. समुदायांतील घटकांत शंकाकुशंका निघणें स्वाभाविक आहे; कित्येकदां बाहेरून इतरांच्या मत्सराचे त्यावर आघात व्हावे हें क्रमप्राप्त च आहे. अशा अंतर्बाह्य संकटांशीं विजयी रीतीनें तो टक्कर देणारा हवा, असें उत्तम पुरुषाचें एक लक्षण समर्थांच्या उपदेशांत अनेक स्थळीं आलेलें आहे. समुदाय उभारला कीं, त्याला रिकामा राहूं

देणें धोक्याचें असतें. तो सतत कांहीं ना कांहीं कार्यामध्यें अखंड गुंतविलेला पाहिजे; याला च समर्थांनीं अखंड ‘ चालना ’ असें म्हटलें आहे. एक काम उरकतां च दुसरें तत्काळ उभें करतां येण्यासाठींच त्यांनीं उत्तम पुरुषाच्या लक्षणांत ‘ दीर्घसूचना ’ या गुणाचा समावेश केला आहे. नवीं नवीं कामें उपस्थित करतांना त्याचें औचित्य–अनौचित्य आधीं कसून पाहणें अवश्य असतें. आपल्याला जें उचित वाटलें तें इतरांस तसें वाटेल च याबद्दल खात्री बाळगणें शक्य नाहीं म्हणून इतरांच्या परीक्षेंत तें उतरेल अशी खबरदारी घेण्याविषयीं समर्थांचीं वचनें आहेत. पुष्कळांनीं तपासलें व पुष्कळांच्या पसंतीस उतरलें तर च तें काम सफळ झालें, असें मानावें; आपण च काय तें शहाणे व इतर सगळे अडाणी अशा कल्पनेनें सगळ्या जगाशीं वैर मांडणारा शेवटीं नादान ठरतो, असें समर्थांनीं दासबोधांत जागजागीं बजावलें आहे. विचार सर्वमान्य असावा. एखादा विचार सर्वमान्य झाला म्हणजे संपूर्ण जनता त्या विचारानें भारली जाते व त्या विचाराच्या दिशेनें लोकांचा उत्कर्ष साधतो. हा विचार संदिग्ध नसावा. तर्कशुद्ध आणि अनुभवसिद्ध असावा. परमार्थसाधनांत भोळेपणाला समर्थांनीं थारा दिलेला नाहीं. सामान्यतः परमार्थविचारांत श्रद्धा, भाविकपणा असल्या मनोविकारांची महती आढळते. समर्थ हे पराकाष्ठेच्या तर्काचे भोक्ते व अनुभवाचे तर अनन्य भक्त होते. अनुभव काय तो खरा, अनुमानावर मुळीं च विसंबतां कामा नये; विस्तव थंड असें कोणी शेंकडों तर्कांनीं किंवा शास्त्रवचनांनीं सिद्ध करूं लागला तरी त्यावर विश्वास न ठेवतां अग्नि उष्ण व दाहक हा अनुभव च खरा मानून त्याप्रमाणें वर्तन करणें श्रेयस्कर ठरतें. समर्थांनीं म्हणून च अनुमानधपक्यानें चालण्यावर कोरडे ओढले आहेत आणि अनुभवाचे म्हणजे प्रचीतीचे पोवाडे गाइले आहेत. अनुमानासारखी च फसगत करणारी दुसरी एक धोक्याची वाट आहे. लोकांच्या नादीं लागणें ही च ती धोक्याची वाट होय. यानें सांगितलें, त्यानें सुचविलें, अमका असें म्हणतो, तमक्याचें मत तसें आहे; अशा रीतीनें स्वतःच्या बुद्धि दुसऱ्याच्या सल्लामसलतीला गहाण लावून दिल्यानें कधीं हि कोणाचें कल्याण व्हावयाचें नाहीं, असें समर्थांचें निश्चित मत होतें. लोकांच्या उद्धाराची निश्चित व अनुभवानें खरी ठरणारी योजना लोकांना पटवून तिची अंमलबजावणी लोकामार्फत होऊं लागली कीं, त्या योजनेच्या जनकत्वाबद्दल आपली कीर्ति व्हावी, लोकांनीं आपले देव्हारे माजवावे, असें माणसाला वाटूं लागतें. कीर्ति संपादावी हें समर्थांना मान्य होतें. परंतु तिच्या अपेक्षेनें मनुष्यानें काम करूं नये, असेंही त्यांनीं सुचविलें आहे. कार्य उभें रहावें, त्याची चटक लागून त्यावर लोकांच्या उड्या पडाव्या, त्याची अभिवृद्धि व्हावी,

परंतु त्याचा मूळ उत्पादक कोण याचा पत्ता लागूं देऊं नये, अशी समर्थांची शिकवण आहे. यासाठीं कार्योत्पादकानें आपल्या कार्याचें ठिकाण सोडून दुसऱ्या स्थळीं निघून जाण्याचा समर्थांनीं उपदेश केला आहे. निरंतर गर्दीत राहिल्यानें मनुष्याच्या बुद्धीची कार्यक्षमता मंदावण्याचा संभव असतो. याकरितां कांहीं काळ एकान्त सेवावा. नेहेमीं गलबल्यांत राहूं नये. कांहीं काळ समाजांत व कांहीं काळ एकान्तांत घालवावा. एकान्ताशिवाय झाल्या कामाचा आढावा घेणें व नव्या कामाची विवंचना करणें कर्त्या पुरुषाला शक्य होत नाहीं.

श्रीसमर्थांनीं दासबोधांत वर्णिलेल्या उत्तम पुरुषांचीं सगळीं लक्षणें घेऊन त्याचें विवरण केल्यास विस्तार होईल. हीं लक्षणें नाहींत असे दासबोधांत फार च थोडे समास सांपडतील. समर्थांना आपल्या देशांत कर्ते, सात्त्विक, परोपकारी, निःस्पृह, विरक्त, नेमस्त ( कडक शिस्तीचे, बाष्कळ किंवा उच्छृंखल नसलेले ), समुदाय उभारणारे, निश्चित विचाराचे, धैर्यवान्, प्रतापी, संकटांत न डगमगणारे, स्वकार्यांत चुकारपणा न करणारे, दक्ष, धूर्त, तार्किक, सावध, दीर्घ सूचनेचे, अखंड चालनाशील, निरलस, कष्टाळू, सोशिक, प्रसिद्धीची लालसा न बाळगणारे, असे पुरुष देशांत जिकडे तिकडे उदयास यावे, त्यांनीं आपल्या उद्योगानें व शिकवणीनें लोकांतील दुर्गुण झाडून सर्वांना आपल्या योग्यतेस आणून सोडावे असें वाटत होतें. समाजाच्या अधोगतीचें बीज समाजघटकांच्या स्वभावदोषांत असते, ही जाणीव समर्थांनीं आपल्या वाङ्मयांत सर्वत्र मोठ्या कटाक्षानें व्यक्त केली आहे. दासबोधांत जसें एका इसमाच्या प्रपंचाचें चित्र सविस्तर रेखाटलेलें आहे, तसें च क्वचित लोकांच्या व्यवसायाचें चित्र काढलेलें असून त्यांच्या सर्वसामान्य बेशिस्तपणाचें हि चित्र दाखविलें आहे. समर्थकालीन लोकस्थितीचा पडताळा आज देखील घेता येतो. यामुळें च दासबोधांतील उपदेशाचा ताजेपणा अजून देखील प्रत्ययाला येतो. माणुसकीची साफसुफी व उन्नति हें समर्थांचें कार्य होतें. जोंवर माणुसकींत मळ शिरण्याचा व माजण्याचा संभव आहे, तोंपर्यंत समर्थांच्या शिकवणीची परिणामकारकता लोपण्याचें भय नाहीं. समर्थांच्या काळीं महाराष्ट्रांतील समाजाचा देव आणि धर्म संकटांत अडकला होता. म्हणून त्यांनीं देवाधर्माच्या भाषेनें उपदेश केला आहे. आज लोकांनीं देवाधर्माची जागा देशाच्या राजकीय उद्धाराला दिली आहे; तथापि समर्थांनीं वर्णिलेल्या उत्तम पुरुषाच्या योग्यतेला धक्का लागत नाहीं. त्यांची आवश्यकता आज हि असून समर्थोक्त गुणांचे उत्तम पुरुष देशांत निपजावे या धोरणाचे प्रयत्न सध्यां आपण पहात च आहोंत.

## सत्कार्योत्तेजक सभेचें
## स्थापनाकालीन ग्रहदृष्ट्या निरीक्षण
### ( लेखक—होराभूषण दीक्षित, पुणें )

सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेची सभा शक १८१५ ज्येष्ठ शुद्ध ४ शुक्रवारीं सायंकाळीं चार वाजण्याच्या सुमारास धुळें मुकामीं झाली. त्या दिवसाची सभेच्या सुरुवातीची ग्रहस्थिति अशी:

**दिनांक १९ मे १८९३ इसवी**



† शनि लग्न तूला १६ अं.

ग्रहांचे सायन स्पष्ट राश्यंश असे–रविवृषभ २८; चंद्रकर्क १८; मंगळकर्क ४; बुधवृषभ ११; गुरुवृषभ १३; शुक्रमिथुन ३; शनितूला ६; राहुमेष २७; हर्शलवृश्चिक ७; नेपच्यून मिथुन १०

लग्नभावारंभ तूला १६ दशमारंभ कर्क १६

सत्कार्योत्तेजक सभा, श्रीसमर्थसंघ, इत्यादि कार्यांचे प्राण समर्थभक्त श्री. शंकरराव देव ह्यांच्या जन्मकालीन ग्रहस्थितीचें वर्णन आमच्या "कुंडलीवर्णन" मासिकाच्या दि. १५ ऑगस्ट १९३९ च्या, पांचव्या वर्षाच्या चौथ्या अंकांत केलेलें आहे. त्यांत लिहिल्याप्रमाणें ह्याही सभेच्या व चालकांच्या ग्रहांत जन्यजनक संबंध स्पष्ट दिसतो, तो असा: संस्थेचें जन्मलग्न तूला; ह्या च तूला राशींत श्री. देवांचा रवि आहे. रवि पितृत्व दर्शवितो. श्री. देवांच्या अष्टम स्थानीं गुरु आहे. सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनाकालीं गुरु अष्टमांत च आहे. सत्कार्योत्तेजक सभेचे लग्न तूला; श्री. देवांचें लग्न धनु. त्रिरेकादश योग परस्परोपकारक झालेला आहे. सभेच्या लाभांत सिंह राशी आहे. ह्या च सिंह राशींत श्री. देवांचा चंद्र आहे.

हा अन्योन्य संबंध मुद्दाम दाखविण्याचा हेतु-कर्ता व त्याचें अपत्य ह्यांत कसें सहजासहजीं जन्यजनकसंबंधसादृश्य असतें, व त्यावरून शास्त्राचें सत्यत्व व ईश्वरी संकेताचें गहनत्व पटून आनंद होणें. कारण आपलें ग्रहमान पाहून तदनुरोधानें सभास्थापनेचा दिवस व वेळ निश्चित करण्याच्या दैववादी तत्वाचे समर्थभक्त शंकरराव देव नाहींत; परंतु ते तसे नसले तरी सहजस्फूर्तीची क्रियाही कालपुरुषाच्या साम्राज्यांत कशी सुसंगत असते हें ह्यावरून कळेल.

संस्थेच्या स्थापनाकालीन कुंडलीकडे दृष्टि टाकली तर सहज दिसून येईल कीं, सत्कार्य आणि त्याला उत्तेजन, हे दोन प्रधान हेतु कुंडलींतही सहज प्रतिबिंबित झाले आहेत. कार्य म्हटलें कीं, कुंडलींतल्या दशमस्थानाकडे नजर जाते. तेथें चंद्र हा लोकपक्षीय ग्रहाची कर्क राशी तींत प्रतिष्ठित असून कर्कराशीचा स्वामी चंद्र-शुद्ध पक्षांतला-वाढत्या कलेचा विराजमान आहे. एकटा च नाहीं, तर धडाडीनें कार्यास प्रेरणा देणाऱ्या अशा मंगळासह आहे. चंद्रमंगळसान्निध्य लक्ष्मी, यश, तेजस्विता, निरलसता देते. आज संस्था ५० वर्षें सुप्रतिष्ठित झाली आहे. हें श्रेय बहुंशीं स्वस्वस्तिकीं असणाऱ्या चंद्रमंगळाकडे च आहे. सेवा करणारा ग्रह शनि हा सभास्थापनकालीं ह्या च सारासार विचार करणाऱ्या तूळ राशींत आपल्या उच्चींत विराजमान होता, उगवत होता. "ग्रहेषु मंदो वृधोस्ति आयुर्वृद्धिप्रदायकः" ह्या सूत्राप्रमाणें संस्थेचें दीर्घायुष्य हा पंचमेश शनि तूळेंत आपल्या उच्चीत उगवत होता ह्याचें दर्शक आहे.

चतुर्थ स्थान स्थावर मिळकत दर्शवितें. व्यक्तीला किंवा संस्थेला अधिष्ठान लाभेल किंवा नाहीं हें चतुर्थ स्थानावरून कळतें. सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनकालीं मकर राशी ह्या स्थानीं असून तिचा स्वामी शनि हा उच्च स्थितींत लग्नीं उगवता आहे. व हा शनि दशमस्थ चंद्र मंगळाच्याही चतुर्थांत आहे. चंद्र स्वगृहींचा आहे, ही कार्यकारणपरंपरा सभेस अधिष्ठान, स्थावरलाभ, दर्शवितें. व इ. स. १९५२-५३ सालीं षष्ठ्यब्दपूर्तिसमारंभकालीं शनीच्या उच्च स्थितीच्या पुनरावृत्तीस सुंदर, दर्शनीय, सत्कार्यास प्रेरणा देणारी, अनेक अंगोपांगांनीं मंडित अशी डौलदार इमारत किंवा प्रासाद दृष्टीस पडेल. असलेल्या अधिष्ठानास वाढतें व रम्य स्वरूप आणखी दहा वर्षांनीं दिसेल.

"कीर्तिरूपें उरावें" हें दशमस्थान-नवमस्थान दर्शवितें. ह्या दृष्टीनें दशमस्थानेश चंद्र दशमस्थानीं च आहे व लग्नेश शुक्र भाग्यस्थानीं, धर्मस्थानीं आहे; व शनिशुक्र परस्पर त्रिकोणांत आहेत. अष्टमेश भाग्यांत, भाग्येश अष्टमांत, हा परस्परराशीस्थानयोग, धर्म व त्यापासून सद्गति, लौकिक दर्शक आहे. ह्यामुळें संस्था, तिचे सदस्य, चालक ह्यांच्याहातून वाङ्मय, धर्म, लोकसेवा इत्यादि

सत्कार्योत्तेजक कार्ये झालीं आहेत व होतील; व शुक्रेंदुवत् जास्तींत जास्त उन्नति इ. स. १९५२-५३ कडे होईल. परमार्थ, निवृत्ति, निष्काम कार्य, दर्शक स्थानें ४, ८, १२. ह्या ठिकाणीं गुरु=ज्ञान, रवि=आत्मा, बुध=वाङ्मय, अशा तीन तत्वांचे तीन ग्रह पडल्यानें संस्थेच्या हातून वाङ्मय, संशोधन व जीवितसाफल्य अशा तीन तऱ्हेचीं कार्यें होतील असें स्पष्ट दिसतें.

बारा स्थानांत तिसरें स्थान वृत्तपत्रें, कादंबऱ्या, कथानकें असें कनिष्ठ वाङ्मय दर्शवितें. नववें स्थान उच्च वाङ्मय दर्शवितें. सभेच्या जन्मकाळीं ह्या उच्च वाङ्मयदर्शक स्थानीं शुक्रनेपच्यून आहेत, ह्यामुळें संस्थेच्या हातून शुक्राप्रमाणें सुंदर, सुबोध, परंतु उच्च वाङ्मयाचा प्रसार होईल. हें च नववें स्थान संस्थेच्या शाखा उपशाखांचें दर्शक असतें. नवव्या स्थानीं असलेला लग्नेश शुक्र, संस्थेच्या कमींत कमी तीन व जास्तींत जास्त सात तरी शाखा महाराष्ट्रभर निघतील, असें दर्शवितो. इ. स. १९४४, १९४६, १९५१-५२ ह्या वर्षी एकेक शाखा संस्थेच्या अभिवृद्धीस कारण होईल. मुंबईस अशी शाखा १९४५ किंवा १९४६ मध्यें निघेल.

सारांश, संस्थास्थापनकालीं, ज्योतिषप्रचीति, शास्त्रावरील विश्वास, व ईश्वरी संकेताचें सामर्थ्य प्रतीत होईल अशी ग्रहस्थिति प्रारंभींच्या कुंडलींत किंवा आकाशस्थ ग्रहस्थितीच्या नकाशांत दृग्गोचर होते. कारण, सभा स्थापून आज ५० वर्षें झालीं. संस्थेचा ५० वर्षांचा इतिहास व कर्तृत्व जनतेपुढें आहेत. व प्रारंभींच्या दिवसाची ग्रहस्थिति तर स्पष्ट च आहे. तेव्हां संस्थेचे प्रारंभकालीन ग्रह व त्यांचा परिणाम ह्या दोहोंचा मेळ सत्य, स्पष्ट दिसतो; व तसा तो श्रद्धाळु परंतु चिकित्सक वाचकांच्या ध्यानीं आला तरी लेखाचें सार्थक होईल. (१) दशमस्थ चंद्रमंगळ, (२) लग्नीं उच्च शनि, व (३) भाग्यांत शुक्रनेपच्यून, ही त्रयी संस्थेस पन्नास वर्षांचा कार्यक्रम करूं देऊं शकली व शतसांवत्सरिक उत्सवाची सुवर्णसंधि देईल अशी खात्री आहे.

---



श्रीसद्गुरुसमर्थ

श्रीरामसमर्थ

## श्रीसमर्थसंप्रदाय आणि त्याचें भवितव्य

( लेखक — शंकर श्रीकृष्ण देव, धुळें )

वक्तेपणासी आणूनि मज । तूं चि बोलवितोसी सहज ।
तरी मी देवा बोलेन आज । मन मानेल तैसें चि ॥

समर्था ! मला बोलावयास लावता आणि मी कांहीं हट्ट धरला तर अजून वेळ आली नाहीं म्हणता, हें काय बरें ! कोठवर वाट पहावी ! बरें आहे ! मर्जी आपली ! जें म्हणाल तें ऐकलें पाहिजे व बोलवाल तें बोललें पाहिजे. तेव्हां आपल्या संप्रदायाचें भवितव्य काय आहे, काय व्हावें, याविषयीं जे अनेक विचार मनांत सारखे घोळत असतात, ते आज बोलून दाखविण्याचे योजिलें आहे. हे जे विचार माझ्या मनांत येत असतात, त्यांना मी आकाशांतील ग्रहांचा आधार घेतलेला नसतो, तर संप्रदायाचें मूळ स्वरूप काय होतें, तें आधीं पाहून, स्थापनेपासून आजपर्यंत त्याची स्थितिगति कशी होत गेली ती विचारांत घेऊन, आवतीभोंवतीं दृष्टिक्षेप करून, पुढें काय होणार याचें अनुमान करीत असतो. त्या अनुमानांत केव्हां केव्हां वास्तवतेपेक्षां इच्छेचा च भाग जास्त असतो. म्हणजे प्रत्यक्ष परिस्थिति पाहून प्रतिकूल अनुमान काढणें अपरिहार्य असलें तरी मनाला विषाद वाटून सदिच्छा मध्यें च पुढें सरसावते, विषादावर आपला पगडा बसविते व संतोषदायक अनुकूल अनुमानें काढावयास लावते. पण, या क्षणीं ती सदिच्छा बाजूस सारून, कठोर वृत्ति धारण करून, जें सत्य असेल, मग तें किती हि अप्रिय असो, तें च बोलावयाचें, असें मी ठरविलें आहे.

क्रमाक्रमानें आपण पुढें जाऊं. आपण आधीं ( १ ) संप्रदायाचें मूळ स्वरूप पाहूं, ( २ ) श्रीसमर्थांच्या काळीं त्याचा कसा उत्कर्ष होत गेला, त्याचा विचार करूं आणि ( ३ ) नंतरच्या काळांत त्याची अवस्था काय झाली व ( ४ ) आज कशी आहे, ती अवलोकन करून ( ५ ) त्याच्या भवितव्याचें अनुमान करूं. तें विपरीत निघत असेल, तर तें बदलण्यास ( ६ ) आपण सर्वांनीं काय केलें पाहिजे, याचा हि विचार शेवटीं सादर करूं. यांतून जें साधेल तें खरें. सविस्तर लिहूं म्हटल्यास हे पांच सहा मुद्दे एकाद्या ग्रन्थाचे विषय होऊं शकतील. तसा ग्रन्थ आपण योजिला हि आहे. आज मात्र आपणांस ग्रन्थ लिहावयाचा नसून

लहानसा निबंध लिहावयाचा आहे. तेव्हां या सर्व मुद्यांचें विवेचन येथें सूत्ररूपानें च केलें पाहिजे, आधार आणि प्रमाणें, शक्य तों मनांत ठेवून अनुमानें तेवढीं च सादर केलीं पाहिजेत. स्मृतिग्रन्थाच्या संपादकानें निबंधांना पृष्ठांची जी मर्यादा घातलेली आहे, ती मला तरी निदान पाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ग्रन्थराजाच्या ११ व्या दशकाचा ५ वा समास म्हणजे संप्रदायाच्या लक्षणांचा समास होय, असें मी परवापरवापर्यंत मानीत, बोलत आणि लिहित आलों आहे. त्या समासांतील

अनन्य राहे समुदाव। इतर जनास उपजे भाव।
ऐसा आहे अभिप्राव। उपायांचा॥

या तिसऱ्या ओंवीनें माझा तसा ग्रह केला. या ओंवींत श्री समर्थ म्हणतात, आपण आतां पुढें जे अनेक उपाय सांगण्यास प्रवृत्त होत आहोंत, ते सांगण्यांत आपला मतलब असा आहे कीं, जे आधीं च माझे आहेत त्यांची निष्ठा या संप्रदायाविषयीं दृढ व्हावी व जे अजून परके आहेत, जे दूर राहिले आहेत, त्यांना आमच्यांत येऊन मिळण्याची बुद्धि व्हावी. असा दुहेरी हेतु मनांत धरून जे उपाय श्रीसमर्थांनीं पुढें सांगितले आहेत, तीं च संप्रदायाचीं लक्षणें होत, असें माझ्या मनानें घेतलें. नंतर मग पुढें

मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण।

या सर्वतोमुखीं झालेल्या ओवीनें उपाय सांगण्यास सुरुवात झाली आहे. हीं सारीं मी संप्रदायाचीं लक्षणें मानूं लागलों. पण आज माझें मत बदललें आहे. मला निराळें वाटूं लागलें आहे. वाचकांनीं मजवर एकदम विश्वास टाकूं नये, स्वतंत्रपणें विचार करावा. मी आज लक्षणें आणि साधनें यांत फरक करतो. ११×५ त संप्रदायाचीं लक्षणें सांगितलीं नसून साधनें सांगितलीं आहेत, असें मी आज म्हणतों. तिसऱ्या ओंवींतील उपाय शब्द हि मला आज तसें च सुचवीत आहे. उपाय म्हणजे साधनें. तेव्हां ११×५ त सांगितलेलीं जर साधनें, तर लक्षणें कोणतीं, असा प्रश्न आहे.

तीं त्या अप्रतिम पत्रांत आलीं आहेत. तीर्थाटणाच्या निमित्तानें देशाची भयंकर स्थिति अवलोकन करून व त्या स्थितीचा शेवट झाला पाहिजे, असा मनोमनीं संकल्प करून श्रीसमर्थ दक्षिणेंत उतरले असतां, आपल्या कार्याला आरंभ करण्यापूर्वी कृष्णातटाकाहून पंचवटीच्या रामोपासकांना त्यांनीं जें अत्यंत कळवळ्याचें पत्र पाठविलें आहे, त्या पत्रांत तीं लक्षणें आलीं आहेत, असें मी आज

आग्रहपूर्वक प्रतिपादन करूं इच्छितों. अगदीं आरंभींच्या काळांतील तें पत्र आहे. अजून चाफळास श्रीरामाची स्थापना हि झाली नव्हती. सांप्रदायिक विविध विषयांच्या पहिल्या खंडांत तें पत्र आलें आहे. त्यांतील अकरावी ओवी

शुद्ध उपासना विमळ ज्ञान। वीतराग आणि ब्राह्मण्यरक्षण।
गुरुपरंपरेचें लक्षण। शुद्ध मार्ग॥

अशी आहे. असा हा श्रीसमर्थांचा पंचविध शुद्ध मार्ग होय. तीं च त्यांच्या संप्रदायाचीं लक्षणें होत. या ओवींतील प्रत्येक शब्द विचारांत घेतला पाहिजे.

(१) नुसती उपासना नव्हे, शुद्ध उपासना पाहिजे. शुद्ध उपासना कोणती? श्रीसमर्थांनीं चत्वार देव सांगितले आहेत, पैकीं पहिल्या तिन्ही देवांची त्यांनीं पूजा केली आहे व आतां आपण स्वतः चवथा देव होऊन बसले आहेत.

(१) मृत्तिका धातु पाषाणादिक। ऐसिया प्रतिमा अनेक।
बहुतेक लोकांचा दंडक। प्रतिमादेवीं॥ ११-२-२९

(२) नाना देवांचे अवतार। चरित्रें ऐकती येक नर।
जप ध्यान निरंतर। करिती पूजा॥ ३०

(३) येक सकळांचा अंतरात्मा। विश्वीं वर्ते जो विश्वात्मा।
द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा। मानिती येक॥ ३१

(४) येक ते निर्मळ निश्चळ। कदापी न्हेती चंचल।
अनन्यभावें केवळ। वस्तु च ते॥ ३२

म्हणजे प्रतिमा, अवतार, अंतरात्मा, परब्रह्म असे हे चार देव होत. त्यांतील कोणत्या देवाच्या उपासनेला शुद्ध उपासना म्हणावयाचें? समर्थांनीं पहिले तिन्ही देव पूजिले होते. चाफळास स्थापिलेल्या श्रीरामाची ते स्वतः पूजा करीत, श्रीरामाचा त्यांना प्रत्यक्ष अनुग्रह होता, सर्वत्र भरलेला अंतरात्मा त्यांनीं ओळखिला होता. त्याच्या पुढच्या पायरीवर तद्रूपता प्राप्त होत असल्यामुळें उपासना संभवत नाहीं, कारण उपासनेंत देव आणि भक्त असें द्वैत असावें लागतें. तेव्हां पहिल्या तिहींतील शुद्ध उपासना कोणती? अंतरात्म्याची उपासना ती शुद्ध उपासना होय. ती च श्रीसमर्थांनीं केलेली उपासना होय. पंधराव्याच्या नवव्या समासांत ती सांगितली आहे.

नारायण असे विश्वीं। त्याची पूजा करीत जावी।

साऱ्या विश्वांत नारायण भरलेला आहे, त्याची पूजा करावयास श्रीसमर्थ सांगत आहेत. साऱ्या विश्वाचें पालन करणें हें त्यांच्या उपासनेचें स्वरूप होतें. आपल्या बोलण्याचालण्यानें कोणत्या हि जीवाचा संतोष झाला म्हणजे ती ईश्वराची पूजा झाली, असें समजावें.

नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।
याकारणें तोषवावी । कोणी तरी काया ॥ १९–९–२५
उपासना शोधून पाहिली । तो ते विश्वपाळिती जाली ।
न कळे लीला परीक्षिली । न वचे कोणा ॥ २६

या उपासनेंत कोठें भेदाभेद आहे काय? या उपासनेला सारें जग लागलें, तर राष्ट्राराष्ट्रांत युद्धें माजण्याला कांहीं कारण राहील काय? जागतिक सुस्थितीचा राष्ट्रांनीं विचार चालविला आहे. तो प्रामाणिकपणाचा असेल तर त्यांनीं श्रीसमर्थांनीं दाखविलेल्या या शुद्ध उपासनेचा विचार करावा. श्रीसमर्थहृदय ग्रन्थांत या उपासनेचें विस्तृत विवेचन आलें आहे, म्हणून येथें आटोपतें घेतों.

(२) श्रीसमर्थसंप्रदायाचें दुसरें लक्षण विमल ज्ञान. विमल म्हणजे शुद्ध च. नुसतें ज्ञान नव्हे, तर तें शुद्ध पाहिजे. पांचव्याच्या सहाव्यांत तें शुद्ध ज्ञान सांगितलें आहे. बाकीचें सारें अशुद्ध ज्ञान होय. दुसऱ्याच्या मनांतलें ओळखतां आलें तर आपणांस मोठा आचंबा वाटतो, पण तें कांहीं खरें ज्ञान नव्हे, शुद्ध ज्ञान तें अनारिसें.

ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणासी आपण । या नांव ज्ञान ॥
जेथें नाहीं दृश्य भान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुद्ध स्वरूप ज्ञान । यासी बोलिजे ॥ ५–६–५

श्रीसमर्थसंप्रदायांत भोळेपणा, बावळटपणा, भावडेपणा, आंधळेपणा याला मुळीं च वाव नाहीं. तो आंधळेपणा, त्यांचें म्हणविणारे आम्ही, आमच्या स्वार्थासाठीं, आमच्या अनुयायी मंडळींत माजवीत असतो; मोठें पाप करीत असतो. शुद्ध ज्ञान म्हणजे प्रत्ययाचें ज्ञान, अनुमानाचें नव्हे. प्रत्यय हें परमार्थाचें मोठें वर्म होय, आणि आम्ही तर प्रत्ययावांचून लोकांस नादीं लावीत असतो. दहाव्याचा आठवा समास अगत्य वाचा. श्रीसमर्थ निक्षून सांगतात:

माझे उपासनेचा बडिवार । ज्ञान सांगावें साचार ।
मिथ्या बोलतां उत्तर । प्रभूस लागे ॥ १०-८-२७

साचार म्हणजे सत्य, शुद्ध, निर्मल. साचार म्हणजे प्रत्ययाचें, अनुमानाचें नव्हे. साचार म्हणजे ढोंग नव्हे, अवडंबर नव्हे. शुद्ध उपासनेचें पर्यवसान शुद्ध ज्ञानांत च झालें पाहिजे.

(३) संप्रदायाचें तिसरें लक्षण वीतराग. वीतराग म्हणजे वैराग्य. शुद्ध उपासना घडण्याला आणि विमल ज्ञान होण्याला वैराग्याची फार आवश्यकता असते.

वैराग्य हें भाग्य आमुच्या समर्थस्वामीचें।
तेणें करितां पोषण जालें भक्तिज्ञानाचें॥

वैराग्यावांचून भक्ति नाहीं आणि भक्तीवांचून ज्ञान नाहीं. वैराग्याचा प्रश्न निघाला म्हणजे तीर्थाटण करीत असतां श्रीसमर्थांनीं जे अत्यंत कष्ट सहन केले ते मला दिसूं लागतात. त्यांचें च पद आहे:

कोण कैचा हा भिकारी। भीक मागे दारोदारीं॥ १
ऐसें म्हणती तेथें जावें। सुखें वैराग्य करावें॥ २
लोक पुसती कोण काये। पुसों जातां सांगों नये॥ ३

आणि लोकांनीं आपसांत म्हणावें

आहे ब्राह्मण विदेशी। नाहीं ठाउक आम्हांसी॥ ४

परंतु आम्ही तर लौकिकासाठीं किती हापापलेले असतो.

वैराग्य आणि ज्ञान हीं परस्परावलंबी असतात. वैराग्यावांचून ज्ञान होणें नाहीं आणि ज्ञानावांचून वैराग्य हि अंगीं बाणत नाहीं.

विषयीं वैराग्य उपजलें। तयासी च पूर्ण ज्ञान जालें।

आणि

पूर्ण जालियां ब्रह्मज्ञान। वैराग्य भरे आंगीं॥ ५ – ६

वैराग्य म्हणजे मात्र घरदार सोडून आईबापांना आणि बायकापोरांना रडत ठेवणें नव्हे. विरक्ति म्हणजे संसारीं आसक्ति नसणें, इतकें च.

(४) चवथें लक्षण ब्राह्मण्यरक्षण. ब्राह्मण्यरक्षण म्हटलें आहे, ब्राह्मण-रक्षण नव्हे, इकडे सर्वांचें लक्ष असावें, म्हणजे कोणास विषाद वाटणार नाहीं; कारण मला पुढें स्पष्ट सुचवावयाचें आहे कीं, जगांत सर्वत्र सर्वकाल शांति नांदावी अशी खरोखर जगाची इच्छा असेल तर जगानें श्रीसमर्थांनीं दाखविलेल्या या शुद्ध मार्गानें चालूं लागावें. शम, दम, तप, शुचिर्भूतपणा, शांति, सरळपणा, अध्यात्मज्ञान, विविधज्ञान, आस्तिक्यबुद्धि इत्यादि गुणसमुच्चय म्हणजे च जर

ब्राह्मण्य असेल, तर यांतला कोणता गुण जगाला नकोसा वाटणार आहे? या गुणांचें संवर्धन म्हणजे च जगाची सुस्थिति होय. श्रीमत् शंकराचार्यांपासून श्रीमत् रामदासांपर्यंत सर्वांनीं म्हटलें आहे कीं, एका ब्राह्मण्याच्या संगोपनांत साऱ्या जगाचें कल्याण आहे. जग बाजूस राहो, आपण सध्यां आपल्या देशाकडे पाहूं. आपला सबंध देश हि वाटल्यास विचारांत घेऊं नका, फक्त आपल्या महाराष्ट्रापुरती च आपण चिंता करूं या. संप्रदायाचें हें चवथें लक्षण आपण मानूं तर च महाराष्ट्राला सुख लागणार आहे. याचा विचार सर्वांनीं आणि सर्वांच्या आधीं ब्राह्मणांनीं च केला पाहिजे. ब्राह्मणांच्या ठिकाणीं ब्राह्मण्य प्रथम अवतरलं पाहिजे. झालें गेलें विसरून

आतां तरी ब्राह्मणीं आपणाला। शाहाणे करावें ॥

म्हणजे काय करावें? तर

देव पुजावा विमळ हस्तीं। तेणें भाग्य पाविजे समस्तीं ॥ १४६

विमल हस्तीं देव पुजावयाचा म्हणजे श्रीसमर्थांनीं वर सांगितलेली शुद्ध उपासना चालवावयाची. त्या उपासनेला ब्राह्मण लागले म्हणजे समस्तांचें च भाग्य उदयास येणार आहे.

(५) आणि संप्रदायाचें पांचवें आणि शेवटचें लक्षण म्हणजे गुरुपरंपरा अखंड चालविणें. यांत गुरूची आवश्यकता आली, गुरुवचनीं पूर्ण विश्वास आला, गुरुभक्ति आणि गुरुपूजा हीं हि आलीं. या विषयाची महती श्रीसमर्थग्रन्थांत सर्वत्र सामान्यपणें आलेली आहे, परंतु या बाबतींत मला स्वानुभवदिनकरांतील अकरा ओव्यांत गुरुपरंपरेचें सारसर्वस्व आलें आहे, असें वाटतें. त्या ओव्यांकडे सर्वांचें लक्ष असावें.

रामदासीं श्रीराम आराधिला। आराधुनी गुरुत्वें वरिला।
स्वरूपसाक्षात्कार करूनि साधिला। प्रपंचपरमार्थ ॥ १

श्रीरामचंद्रें रामदासांसी। जेव्हां केलें निजअनुग्रहासी।
तेव्हां निरविलें श्रीहनुमंतजीसी। रामदासपरंपरा ॥ २

जितुके रामदासांचे शरणागत। जाले आणि होणार परंपरागत।
तितुक्यांचा साहाकारी श्रीहनुमंत। सुखदुःखीं तो स्मरावा ॥ ३

केलिया मारुतीचें निजस्मरण। तत्काळ होईजे सुखसंपन्न।
दुःख संकट महा विघ्न। स्मरणमात्रें नाश पावे। ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ प्रत. सं. ४३१ ता.

त्यानंतर रामदासांची वर्तणुक । निस्पृहता आणि प्रपंचिक ।
त्यांत प्राक्तनयोगें ज्यासी जे योजेल सम्यक । तेणें तें चि साधावें ॥ ५

परंतु हो प्रपंची अथवा निस्पृह । तेणें वैराग्ययुक्त असावें निसंदेह ।
वर्णाश्रमधर्मकर्मसमूह । प्राणांतीं हि न सोडिजे ॥ ६

अहर्निश करावी श्रीरामभक्ति । वर्णाश्रमधर्मांचिया युक्ति ।
श्रीरामउपासनेची अभिव्यक्ति । केली च करावी निशंक ॥ ७

वैराग्य करावें विवेकयुक्त । प्रतिज्ञा म्हणवावें श्रीरामभक्त ।
पदार्थमात्रीं कदापि आसक्त । प्राणांतीं हि न व्हावें ॥ ८

जितुकी गोष्टी मुखें बोलावी । तितुकी क्रिया करूनि दाखवावी ।
सत्क्रिया उत्तरोत्तर चालवावी । धर्मशास्त्रविचारेंसीं ॥ ९

करावें वेदपारायण । शास्त्रचर्चा अध्यात्मनिरूपण ।
कां ते श्रीरामगुणानुवादकीर्तन । यथासांग करावें ॥ १०

श्री राम जय राम जय जय राम । नित्यस्मरणाचा हा चि असावा नेम ।
यावांचुनि सकळ मिथ्या श्रम । वायांविण करूं नये ॥ ११

श्रीसमर्थसंप्रदायाचीं अशीं हीं एकंदर पंचविध लक्षणें होत. तीं सांगून श्रीसमर्थ त्या पत्राचा शेवट करतात—

ऐसें हें पंचधा बोलिलें । इतुकें पाहिजे यत्नें केलें ।
म्हणिजे सकळ हि पावलें । म्हणे दासानुदास ॥

या पांच गोष्टी करा म्हणजे मला सर्व कांहीं पावलें, असें श्रीसमर्थ म्हणत आहेत. आम्हां सांप्रदायिकांच्या दृष्टीनें किती आनंदाची ही गोष्ट आहे. काय केलें असतां श्रीसमर्थांची आपणांवर कृपा होईल, तें येथें श्रीसमर्थांनीं निस्संदिग्धपणें सांगितलें आहे. सर्वांच्या आधीं सांप्रदायिकांनीं या गोष्टीचा विचार करावा आणि मनोभावानें शुद्ध मार्गाला लागावें.

या पांच गोष्टी श्रीसमर्थांच्या अति जिव्हाळ्याच्या होत्या, असें वाटतें. नेमक्या त्या च पांच गोष्टी सांभाळण्याविषयीं कीर्तनभक्तींत त्यांनीं आज्ञा केली आहे.

ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।
गुरुपरंपरा निर्धारें । चळों च नेदावी ॥ ४-२-२०

करावें वैराग्यरक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण ।
परम दक्ष विचक्षण । सर्व हि सांभाळी ॥ २१

शंका उरत नाहीं कीं, या पंचविध लक्षणांनीं युक्त श्रीसमर्थसंप्रदाय होता व असावा. याची साक्ष श्रीसमर्थांचें चरित्र च देत आहे. हीं पांच लक्षणें मनांत आणून, आतां श्रीसमर्थांकडे पहा. तीं लक्षणें श्रीसमर्थांच्या ठायीं मूर्तिमंत अवतरलेलीं तुम्हांस दिसतील. हीं लक्षणें म्हणजे च श्रीसमर्थावतार आणि तो च त्यांचा संप्रदाय. मी कशास आतां श्रीसमर्थावतार व श्रीसमर्थसंप्रदाय हे दोन ग्रन्थ निराळे लिहावयास पाहिजेत? लिहिणार आहे, लिहित आहे, लिहिले आहेत, पण न प्रकाशित करतां हि गेलों तरी हरकत नाहीं.

त्या काळीं या पंचविध लक्षणांनीं युक्त असा महापुरुष महाराष्ट्रापुढें साक्षात् उभा होता, म्हणून या संप्रदायाचा सारखा उत्कर्ष होत जाऊन रामराज्याची स्थापना होण्यापर्यंत त्याची मजल पोंचली. त्यांच्या पश्चात् एक दोन पिढ्यांना त्याचें आणि त्यांच्या शिकवणीचें स्मरण होतें आणि या पांच गुणांत मागें न पडणारीं अशीं अनेक माणसें त्या पिढ्यांत होऊन गेलीं. कल्याण, उद्धव, दिवाकर, दिनकर, वासुदेव, बालकराम, मुसळराम, अनंत मौनी, भीम, त्रिंबक, देवदास, रामचंद्र निळकंठ इत्यादि प्रत्यक्ष त्यांचे शिष्य आणि मेरु, गिरिधर, रोकडाराम, हरिहर, यासारखे प्रशिष्य यांनीं श्रीसमर्थांच्या पश्चात् सुमारें पाऊणशें शंभर वर्षें संप्रदायाचा बोज राखला. कित्येकांस माझें हें विधान एकदम पटणार नाहीं, कारण या पुरुषांचीं साद्यंत चरित्रें महाराष्ट्रास अजून कळावयाचीं आहेत. समर्थसंप्रदायांत हीं फार मोठीं माणसें होऊन गेलीं. त्यांचें नुसतें स्मरण हि मला नेहमीं पुण्यप्रद वाटत असतें.

कित्येकांकडून नेहमीं असा एक प्रश्न उपस्थित केला जातो कीं, श्रीसमर्थांच्या पश्चात् त्यांच्या संप्रदायांत त्यांच्या तोलाचीं माणसें कां आढळत नाहींत. हा प्रश्न दिशाभूल करणारा आहे. तो विचारणारांची दृष्टि श्रीसमर्थांच्या केवळ राजकारणावर खिळलेली असते. या प्रश्नाला माझें उत्तर असें आहे कीं, श्रीसमर्थांच्या नंतर त्यांच्या शिष्यांना राजकारण करण्याचें कारण च उरलें नव्हतें. श्रीसमर्थ आणि श्रीशिवराय या गुरुशिष्यांच्या प्रयत्नानें आणि पुण्याईनें स्नानसंध्या आणि जप, तप, अनुष्ठानें करण्याला उदंड पाणी झाल्यावर, म्हणजे स्वराज्याची स्थापना होऊन देव, धर्म, गो, ब्राह्मण यांच्यावर आलेलीं संकटें दूर झाल्यावर श्रीसमर्थशिष्य निश्चिंत झाले होते. राजकारण करणें हें संप्रदायाचें नित्य कर्म नव्हे, तर नैमित्तिक होय. राजकारण करण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग उद्भवेल तेव्हां

तेव्हां सांप्रदायिकांनीं तें अवश्य करावें, एरव्हीं तें ज्यांचें त्यांना च करूं द्यावें. याप्रमाणें श्रीसमर्थांच्या शिष्यांना त्यांच्या पाठीमागें राजकारणांत पडण्याचें प्रयोजन च उरलें नसल्यामुळें केवळ राजकारणाच्या दृष्टीनें हा जो प्रश्न उपस्थित केला जातो, तो मला भ्रामक वाटतो.

साधनें प्रसंगानुसार योजावयाचीं असतात. लक्षणें मात्र नित्य, निरपवाद, आवश्यक असतात. ११×५ त व इतरत्र साधनें सांगितलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं कांहीं केव्हां केव्हां भिन्न भिन्न परिस्थितीमुळें कालबाह्य होऊन अनवश्यक होतील हि. तशी तीं अनवश्यक झाल्यावर उपयोगांत न आणणें दूषणावह होणार नाहीं. नित्य लक्षणांचें मात्र तसें नसतें. शुद्ध उपासना, विमल ज्ञान, वीतराग, ब्राह्मण्यरक्षण आणि गुरुपरंपरा हे जे संप्रदायाचे पंच प्राण त्यांत श्रीसमर्थांच्या नंतर शंभर पाऊणशें वर्षांत त्यांचा कोणता हि शिष्य किंवा प्रशिष्य मागें पडल्याचें उदाहरण नाहीं. हें विधान प्रमाणें देऊन मला सिद्ध करतां येईल.

नंतर मात्र मूळ स्वरूपावरून दृष्टि ढळून हळुहळु अवनतीचा काळ सुरू झाला. सुदैवानें स्वरूपाची ओळख अजीबात बुजली नव्हती. पुन्हां अलिकडे पाऊणशें ऐशीं वर्षांपासून जागृतीचीं थोडथोडीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पूर्ण जागृति झाली आहे, असें नव्हे. पूर्ण जागृतीच्या आड अनेक विघ्नें आहेत. स्वार्थपरायणता हें कायमचें च विघ्न असून त्याच्या जोडीला, अलिकडच्या काळांत विशेष, दोन अनुल्लंघनीय विघ्नें येऊन बसलीं आहेत. एक लोकेषणा आणि दुसरें ढोंग. आपणांस कोणी समर्थभक्त म्हटलें आणि तें हि चारचौघांत म्हटलें म्हणजे आपले घोडे गंगेंत न्हायल्याची आपणांस धन्यता वाटते! समर्थभक्ति इतकी सवंग असती, तर भोळारामभीमकल्याणादि शिष्यांना प्राणाची पर्वा न करतां श्रीसमर्थसेवा करावी लागली नसती! श्रीसमर्थभक्त कोणत्या गुणांनीं युक्त असावा, याचा एक उतारा, किंचित् फरक करून, मेरुस्वामींच्या भीमोपदेशांतून चिंतनासाठीं वाचकांस सादर करतों. मी बोलून चालून स्वभावतः प्रचारक आहे. प्रचारक नसेन, तर मी कोणी च नाहीं. ऐका गुरुभक्ताचीं लक्षणें:

गुरुकृपा सत्संगती। नित्यात्मचर्चा प्रचीति।
त्याच्या भाग्यासी नाहीं मिती। विचारें पाहतां॥ १

सर्वकाळ विरक्तमानसें। अनुष्ठानपर अभ्यासें।
सद्गुरुवचनें विश्वासें। राहिला सुनिश्चळ॥ २

सर्वकाळ गुरुभजनीं। ध्यानपर अनुसंधानीं।
सर्वदा मानसपूजनीं। गुरुदेव भजे॥ ३

भक्तीचें अंतर निरंतर । स्वरूपीं अनुसंधान अगोचर ।
केवळ विश्रांतीचे निर्धार । जागवी जीवीं ॥ ४

करुणाकीर्तनजिव्हाळा । नामस्मरणाचा अखंड चाळा ।
अमृताहून मधुर सरळा । गिरा आलाप करी ॥ ५

केवळ अंतरस्थितीची चाळणा । परात्परविवंचना ।
साधकाची निजधारणा । सिद्धदशे माझारी ॥ ६

आंगीं सिद्ध स्वभावता । अभ्यासें कठीण साधकता ।
नाना साधनें परमार्था । साधी जीवापासूनि ॥ ७

विषमता न देखे भूतीं । स्वभाविक समता चित्तीं ।
अक्षोभ शांतीनें स्वस्थिती । राखों जाणे चतुर ॥ ८

वर्तती चर्या निरुपद्रव । सन्मानीं न धरी गर्व ।
असन्मानें क्षोभेना जीव । यथार्थ शांती ते ॥ ९

ऐसिया लक्षणयुक्त । अंतरापासूनि विरक्त ।
तो चि जाणिजे समर्थभक्त । मुक्त चूडामणी ॥ १०

हीं सारीं लक्षणें आपल्या अंगीं बाणावीं, याची चिंता आपणांस लागावी, कां वर्तमानपत्रांत पोकळ प्रतिष्ठा येण्याची वाट पहात आपण बसावें? या लोकेषणेनें खऱ्या कार्याचा फार घात केला आहे आणि वर्तमानपत्रांनीं खतपाणी घालून तिला फार फोपावून सोडलें आहे.

तशी च ढोंग करण्याची प्रवृत्ति फार माजलेली दिसते. देशभक्तीचें, धर्मभक्तीचें, साधुत्वाचें, महाराजपणाचें ढोंग करण्यानें भोळ्याबाबड्यांना आपण फसवीत असूं च, पण आपण आपला स्वतःचा च अधःपात करून घेत असतो, हें आपल्या लक्षांत हि येत नाहीं. स्वतःचें पोट भरण्यासाठीं, बायकापोरांचा प्रपंच चालविण्यासाठीं, घरदार करण्यासाठीं रामदासी म्हणवून घेऊन साधुत्वाचा आव आणणें यासारखें दुसरें पातक नाहीं! तें करून येथें खालती कदाचित् चैनींत राहतां येत असेल, पण तेथें वरती काय होणार, याची वाट काय?

रामदासी घेउनि नाम करिशी भगलउपाय ।
कवणाचें काय जाय, भगल तुझें तुज खाय ॥

भोगूं आपल्या कर्माचीं फळें! भगल म्हणजे ढोंग.

आपण सर्वांनीं अखंड सावध असावें, असा इषारा मला स्वतःला आणि ज्यांना मी आपले समजतो व जे मला आपला मानतात, त्यांना देण्यापलिकडे यांत माझा दुसरा हेतु नाहीं. जे अखंड सुचित्त असतात, केव्हां हि दुश्चित्त नसतात, त्यांना इषारा देण्याचें कारण च नाहीं.

अशा या श्रीसमर्थसंप्रदायाचें भवितव्य काय? तें तुमच्या आमच्या हातीं आहे. लोकेषणेला पायाखालीं तुडवून, स्वार्थावर तिलांजलि देऊन, ढोंग माजविण्याचें सोडून देऊन, नम्रपणें, प्रामाणिकपणें, निष्काम बुद्धीनें श्रीसंप्रदायाच्या सेवेला आपण लागूं तर सारा देश श्रीसमर्थांच्या कक्षेखालीं आपण सहज आणूं शकूं. चालू विसाव्या शतकांतील तरुणांची जी महत्त्वाकांक्षा आहे, ती तृप्त करण्याचें सामर्थ्य श्रीसमर्थांनीं दाखविलेल्या मार्गांत च आहे. राष्ट्रांतील तरुणांनीं पश्चिमेकडे आणि पूर्वेकडे पाहण्याचा नाद सोडून देऊन स्वतःच्या पूर्वजांकडे दृष्टि वळविल्यास, घरचें टाकून आपण बाहेरच्यांच्या तोंडाकडे आशाळभूतपणानें कां पहात राहिलों, याचें त्यांचें त्यांना च आश्चर्य वाटेल. श्रीसमर्थांच्या विश्वव्यापक स्वरूपाच्या उपासनेनें हजारों तरुणांचीं मनें त्यांनीं आपणांकडे वेधून घेतल्यामुळें लोकदृष्टीनें त्यांचा एक संप्रदाय बनला खरा, पण संप्रदाय शब्दाच्या अर्थांत जो संकुचितपणा ध्वनित होतो, तो त्यांच्या उपासनेंत नव्हता. ते आपल्या पंचविध तत्त्वज्ञानाला संप्रदाय न म्हणतां शुद्ध मार्ग म्हणून संबोधीत आहेत. शुद्ध उपासना, विमल ज्ञान, वीतराग, ब्राह्मण्यरक्षण आणि गुरुपरंपरा या पंचविध शुद्ध मार्गानें जाण्यांत च, केवळ आपल्या देशाचें च नव्हे, तर जगाचें कल्याण आहे, असें ते मानीत. अलिकडच्या भाषेंत बोलावयाचें तर, अशी श्रीसमर्थांची जागतिक कल्याणाची योजना ( world order ) होती. तीहून सरस योजना कोणी सुचवूं शकेल काय? हा च श्रीसमर्थांचा महाराष्ट्रधर्म होय व त्याचा प्रसार जगभर करावा, अशी त्यांनीं आपल्या शिष्यांना आज्ञा देऊन ठेविली आहे.

- ती त्यांची आज्ञा आपण कितीशी पाळीत आहोंत, याचा विचार करावा. अजून हि उमगून आपण त्यांची आज्ञा पाळूं तर आपणांस निश्चयानें म्हणतां येईल कीं, श्रीसमर्थसंप्रदायाचें, म्हणजे च श्रीसमर्थांच्या तत्त्वज्ञानाचें, त्यांच्या जागतिक सुस्थितीच्या योजनेचें भवितव्य उज्ज्वल आहे. विद्यमान परिस्थिति समाधानकारक आहे, असें मी म्हणत नाहीं. सोंग, ढोंग, स्वार्थ पुष्कळ आहे, पण हे सर्व दुर्गुण झडून पडतील आणि पुनरपि एकवार हा संप्रदाय आपल्या शुद्ध, दिव्य स्वरूपांत प्रकाशमान होईल, असा मला दृढ विश्वास आहे. तो तसा व्हावा, ही च आपणा सर्वांची इच्छा असणार. तें कसें व्हावें, याचा आपण थोडा वेळ विचार करूं.

सांप्रदायिकाची माझी व्याख्या अशी आहे: जो श्रीसमर्थांना राष्ट्रगुरु मानतो व ज्याच्या ठिकाणीं श्रीसमर्थांविषयीं निस्सीम भक्तिप्रेम असतें, जो त्यांचें वाङ्मय सतत अवलोकन करतो, ज्याला त्यांच्या चरित्राचा अखंड निदिध्यास लागतो, जो सदाचारसंपन्न असून स्वधर्माप्रमाणें वागतो, जो क्षणभर हि दुश्चित्त नसतो, जो विचारूनि बोलतो आणि विवंचूनि चालतो, जो प्रयत्नशील असतो आणि जो त्यांच्या आज्ञांचें यथाशक्ति पालन करतो, तो रामदासी होय. स्वतः चें आणि राष्ट्राचें ऐहिक आणि पारलौकिक ध्येय ज्याच्या दृष्टीपुढून केव्हां च ढळत नाहीं, त्याला मी श्रीसांप्रदायिक समजतो. श्रीसमर्थसंघाच्या नियमांत या सर्व गोष्टी येतात, तरी देखील संघाचा प्रत्यक्ष कार्यक्रम काय, म्हणून कांहीं जण विचारीत च असतात. मी त्यांना सांगत असतो, इहपर लोकीं उच्च स्थान गांठणें हें संघाचें ध्येय होय; रामराज्यांत ऐहिक वैभवाची सीमा होते आणि 'अहं ब्रह्मास्मि' या साक्षात्कारापलिकडे पारलौकिक कर्तव्य उरत नाहीं, तेव्हां आपल्या देशांत रामराज्याची स्थापना व्हावी म्हणून जे जे उपाय योजावे लागतील, ते सारे उपाय आणि प्रकार, ऐहिक दृष्टीनें संघाच्या कार्यक्रमांत येतात आणि पारमार्थिक दृष्टीनें 'अहं ब्रह्मास्मि' या सद्गुरुवचनाचा अनुभव यावा आणि साक्षात्कार व्हावा म्हणून जीं जीं साधनें करावीं लागतील, त्या सर्व साधनांचा समावेश संघाच्या कार्यक्रमांत होतो. याहून व्यापक कार्यक्रम कोणता असूं शकेल? या कार्यक्रमांत काय येत नाहीं, येणार नाहीं? वास्तविक हा ऐहिक आणि पारलौकिक संपूर्ण कार्यक्रम इतका विश्वव्यापक असून सुद्धां कित्येक प्रश्न करतात च, आपण प्रत्यक्ष म्हणजे दृश्य असें सतत काय करीत जावें! काय उत्तर द्यावें! तुम्हांला सुचतील त्या हजार गोष्टी करा, पण ध्येयाची विस्मृति क्षणभर हि होऊं देऊं नका. ही सोपी गोष्ट नव्हे. मला तिचें स्वरूप नीट समजावून देतां आलें नाहीं, म्हणून ती सोपी मानूं नका. जो अखंड सावध राहून श्रीसमर्थोपदिष्ट साधनें करीत राहील, त्यांनीं सांगितलेल्या मार्गाचा अवलंब करील, तो च खरा रामदासी, तो च श्रीसमर्थभक्त या पदवीला योग्य आणि श्रीसमर्थसंघाचा सभासद होण्याला पात्र.

कठीण गोष्ट आहे, पण सुसाध्य आहे, अभ्यासानें प्राप्त होणारी आहे. अभ्यास कोणता करावा?

माझ्या गुरूनें जो मला सांगितला, तो च मी तुम्हांस सांगतो. तो तपशिलवार नाहीं. आत्मकल्याणाची ती नुसती गुरुकिल्ली आहे. 'मी समर्थांचा आहे' एवढें सतत अनुसंधान राहूं द्या, म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें. सतत म्हणजे सतत, चोवीस तास. 'मी समर्थांचा आहे' या जाणिवेच्या पोटीं किती तरी अर्थ भरला आहे. आपण समर्थांचे आहोंत, ते नेहमीं आपल्या पाठीशीं आहेत,

ते आपल्यापासून केव्हां च दूर होत नाहींत, ते आपणाकडे सारखे पहात आहेत, आपण त्यांच्या दृष्टिआड क्षणभर हि होऊं शकत नाहीं, अशी ज्याची भावना होईल, तो भाग्यवान् होय! त्याला कशाची पर्वा वाटणार, तो सुखदुःखाला कां जुमानील, तो कोणाला आणि कां भीईल, दुसऱ्या कशाची गोष्ट च नको पण मृत्यूची तरी त्याला भीति कोठून उरणार? मी समर्थांचा झालों, त्यांच्या आज्ञेवांचून आतां एक हि पाऊल टाकणार नाहीं, त्यांना अखंड हृदयाशीं धरीन – नव्हे – हृदयांत सांठवीन, असा निश्चय झाला म्हणजे कार्यक्रमाला काय तोटा असणार!

पण, 'मी समर्थांचा आहे' असें अखंड स्मरण राहणें सोपें नव्हे. मी समर्थांचा आहे, असें नुसते शब्द उच्चारणें सोपें आहे, तसें होणें कठीण आहे. आपण त्यांचे आहोंत, याचा संपूर्ण अर्थ, क्षणभर स्तब्ध राहून, मनांत आणा, म्हणजे आपण त्यांचें होणें किती कठीण आहे, तें ध्यानीं येईल. आपण त्यांचें झाल्यावर आपलें निराळें असें काय उरणार आहे? आपण त्यांच्या पासून विभक्त होऊं च शकणार नाहीं आणि ते हि आपणास सोडून कोठें क्षणभर हि जाणार नाहींत! आपण त्यांचें झाल्यावर सारें ब्रह्मांड आपल्या मुठींत आल्यासारखें होणार नाहीं काय? मी त्यांचा, तसे ते माझे. ते माझे म्हणजे त्यांचें सारें सामर्थ्य माझें, त्यांचें सारें सामर्थ्य मजमध्यें उतरलें पाहिजे. असें झालें च पाहिजे. असें होईल तर च मी खरा त्यांचा झालों! 'मी समर्थांचा आहे' हे नुसते फोल शब्द आहेत, कां यथार्थ आहेत, याची ही च कसोटी होय. ती आपली आपल्याला लावून आपली आपल्याला सतत परीक्षा होत जाईल.

संपलें माझें बोलणें. असा हा शुद्ध, उज्ज्वल संप्रदाय आहे. विश्वव्यापक भगवंताचें त्याला अधिष्ठान आहे. तो अमर आहे, कारण तो ज्ञानप्रधान आहे आणि 'सत्यं ज्ञानं अनंतं ब्रह्म' असें वचन आहे. महाराष्ट्रीयांनीं मनांवर घेतलें पाहिजे. बृहन्महाराष्ट्रांत श्रीसमर्थसंघाच्या शाखा सर्वत्र निघाल्या पाहिजेत. त्या कार्यक्षम झाल्या पाहिजेत. श्रीसमर्थांचे म्हणविणारांनीं स्वतःस जाळून घेऊन म्हणजे मीपणा सोडून, स्वार्थाला झिडकारून, क्षुद्र मनोविकारांना बाजूस सारून, श्रीसमर्थांना शरण जाऊन, ध्येयावर अचल दृष्टि ठेवून, सालोसाल एकत्र जमून विचार केला पाहिजे. आणखी कांहीं सूचना कराव्याशा वाटतात; पण आधीं स्वतःस जाळून घ्यावें आणि मग श्रीसमर्थांच्या अनेक कार्यांचा जेथें विचार चालला असेल त्या सभेला जावें, याहून निराळ्या सूचना इतक्यांत च कोणत्या कराव्या? संप्रदायाचें गोमटें व्हावें म्हणून प्रथम अहंपणाची पूर्ण आहुति देऊन महाराष्ट्रांतील शंभर माणसें कार्यास लागतील, तर तें नुसत्या संप्रदायाचें च काय, जगाचें

कल्याण करतील! असा हा श्रीसमर्थांनीं उपदेशिलेला आणि यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारा सामर्थ्यवान् स्वयंभु शुद्ध मार्ग होय.

शेवटीं श्रीतुकाराममहाराजांच्या शब्दांत श्रीसमर्थांची प्रार्थना करीत करीत स्तब्ध होऊन बसतों.

बोलवीशी तैसें आणी अनुभवा।
नाहीं तरी देवा विटंबना॥

ती होऊं देऊं नका, कृपा करा!

१८६५ चैत्र शुद्ध ९

॥ श्रीरामसमर्थ ॥

# सत्कार्योत्तेजक सभा चिरायु होवो

( गणेश शंकर देव, धुळें )

"चारचौघांनीं एकत्र जमून आपल्या पूर्वपरंपरेला अनुसरून स्वहिताचा विचार करावा व तसें करीत असतां घडेल ती आत्मसेवा व लोकसेवा करावी अशा उद्देशानें शक १८१५ ज्येष्ठ शुद्ध ४ ( दि. १९ मे १८९३ ) या दिवशीं धुळें येथें **सत्कार्योत्तेजक सभा** स्थापन करण्यांत आली." व्याख्यानें देणें, राष्ट्रपुरुषांचे उत्सव करणें, मराठीच्या परीक्षा घेऊन उत्तेजनार्थ बक्षिसें देणें वगैरे मार्गांनीं होणारें अल्पसें कार्य करण्यापलिकडे "आरंभीं आरंभीं सभेच्या हातून जास्त कांहीं काम होऊं शकलें नाहीं. पुढें शक १८२५ पासून श्रीरामदासी वाङ्मयाकडे तिचें लक्ष विशेष वेधून तिनें श्री **रामदास** आणि **रामदासी ग्रंथमाला** सुरू केली. मालेंतील दहा बारा भाग प्रसिद्ध झाल्यावर १८३७ च्या ज्येष्ठ शुद्ध १३ पासून मालेला श्री **रामदास** आणि **रामदासी मासिक पुस्तका**ची तिनें जोड करून दिली व १८३८ च्या मार्गशीर्ष शुद्ध १ पासून **इतिहास** आणि **ऐतिहासिक मासिक पुस्तक** सुरू करून आपला व्याप वाढविला." 'रामदास आणि रामदासी' मासिकाचें एकविसावें वर्ष नुकतें च संपलें. 'इतिहास आणि ऐतिहासिक' मासिकाचे ३७ अंक निघून तें बंद पडलें. आतांपर्यंत स्वतंत्रपणें आणि रामदासी मासिकांतून 'रामदास आणि रामदासी' ग्रंथमालेचे १ ते ४४, ५० व १२१ असे एकूण ४६ भाग निघाले. 'इतिहास आणि ऐतिहासिक' मासिकांतून 'इतिहास आणि ऐतिहासिक' ग्रंथमालेचे १, २, ३, ४ व ८ हे भाग बाहेर पडले आणि ५ व ६ हे अपूर्ण राहिले आहेत. मध्यंतरीं **महाराष्ट्रधर्म** ग्रंथमाला म्हणून एक स्वतंत्र ग्रंथमाला काढून तिच्यांतील ४ भाग आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. शिवाय या तीन मालांपैकीं कोणत्या च मालेंत न आलेले, स्वतंत्र किंवा निरनिराळ्या लेखांचे असे, १३ ग्रंथ सभेनें प्रकाशित केले. सत्कार्योत्तेजक सभेच्या या सर्व प्रकाशनाची यादी दुसऱ्या परिशिष्टांत दिली च आहे, तिच्यावरून "प्राकृत भाषा उन्नतीस चढविण्यासाठीं", श्री सांप्रदायिक वाङ्मयाचा प्रसार व्हावा म्हणून, आणि आपल्या उज्ज्वल इतिहासाचें सम्यक् ज्ञान व्हावें म्हणून सत्कार्योत्तेजक सभेनें कोणता व्याप केला हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

(२) सत्कार्योत्तेजक सभेच्या या व्यापामुळें च "श्रीसमर्थमंदिर - जांब" बांधलें गेलें, "श्रीसमर्थवाग्देवता - मंदिर - धुळें" ही संस्था निर्माण झाली, आणि अखिल भारतीय स्वरूपाचा "श्रीसमर्थसंघ" जन्मास आला. अशीं हीं सभेनें आरंभिलेलीं चार कार्यें होत. सभा स्थापन झाल्याला ५० वर्षें होत आलीं, शक १८६५ ज्येष्ठ शुद्ध ४ दि. ७ जून १९४३ या दिवशीं ५१ वें वर्षें सुरु होईल. इतकीं वर्षें हें काम केवळ एकतंत्रीपणानें चाललें आणि खरें बोलावयाचें तर, हें सारें काम एकतंत्रीपणानें चाललें म्हणून च तें इतकें होऊं शकलें तरी. पण व्यक्ति कांहीं अमर नसतात, संस्था मात्र चिरायु झाल्या पाहिजेत, केल्या पाहिजेत. म्हणून या एकतंत्री कारभाराला नियमबद्ध स्वरूप देऊन कांहीं संघटणा करावी यासाठीं पूर्वीं दोन चार वेळां प्रयत्न करण्यांत आले, पण ते यशस्वी होऊं शकले नाहींत. आम्ही हा शेवटचा प्रयत्न करून पहात आहों; तो यशस्वी होईल असा विश्वास वाटतो. सत्कार्योत्तेजक सभेकडे पहाण्याची आमची दृष्टि वैयक्तिक आणि खाजगी स्वरूपाची असणें सहाजिक च असल्यामुळें आम्ही हा घरगुती प्रयत्न करीत आहोंत, आणि यांतून च सत्कार्योत्तेजक सभेचें सार्वजनिक स्वरूप प्रकट व्हावयाचें आहे," ही निश्चिती आहे.

(३) सत्कार्योत्तेजक सभेच्या वर उल्लेखिलेल्या चार कार्यांबद्दल "चौथा सुमनहार" या ग्रंथांतील "सत्कार्योत्तेजक सभा - धुळें" या आपल्या लेखांत ती. शंकर श्रीकृष्ण देव म्हणतात: "अशीं हीं सभेनें आरंभिलेलीं चार कार्यें आहेत. तीं चार हि स्वतंत्र आहेत. प्रत्येक कार्याचे चालक वेगळे, जमाखर्च वेगळे, घटना वेगळ्या. त्या चारीं कार्यांचा मी च एक चिटणीस असल्यामुळें मला तीं चारीं कार्यें सारखीं च प्रिय आणि अगत्याचीं वाटतात. चालकांनीं मनांत आणल्यास उद्यां हीं चारीं कार्यें अलग अलग होऊं शकतील. तशीं तीं एकवार व्हावीं हि, एरव्हीं तीं बळावणार नाहींत, अशी मला भीति वाटते. सर्वांनीं च या चारीं कार्यांचा सारखा च अभिमान वा भार वाहिला पाहिजे, असें नाहीं. चारी कार्यांचें **श्रीसमर्थभक्तिप्रेम** हें एक मूळ सूत्र कायम असलें म्हणजे झालें."

(४) आपल्या या लेखाचा शेवट ती. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं असा केला आहे: "चाळीस वर्षें झालीं म्हणावयाचीं, आम्हीं या कार्यांचा भार वाहिला. फल-प्राप्ति फार थोडी झाली, याची जाणीव आम्हांस आहे. प्रयत्नाची आमच्याकडून कसूर झाली नाहीं, पण आम्ही अल्पमति असल्यामुळें आमच्या हातून जास्त कार्य होऊं शकलें नाहीं. या पुढें आतां या कार्यांचा भार वाहण्यास आम्ही असमर्थ आहोंत. आम्हीं थकलों आहोंत. जी थोडी शक्ति उरली आहे ती आतां जीवाच्या उरलेल्या एका च कार्याकडे खर्च झाली पाहिजे. बाकीचीं कार्यें पुढिलांनीं पुढें चालविलीं पाहिजेत. तेव्हां आतां शेवटीं माझ्या स्वतःच्या, माझ्या मित्रांच्या, माझ्या

सुहृदांच्या, माझ्या उपकारकर्त्यांच्या, श्रीसमर्थकार्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य अपरिचितांच्या, सर्वांच्या पुत्रपौत्रादिकांना माझी विनंति इतकी च कीं, श्रीसमर्थांच्या चरणीं लक्ष लावा, चतुर्विध च काय पण सहस्रविध दिशांनीं त्यांची सेवा करा, त्यांच्या आज्ञा पाळा, आचारविचारांचे त्यांनीं घालून दिलेले धडे गिरवा, त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें जाण्याच्या तयारीला लागा, नव्हे, जाऊं लागा, त्यांच्या वाङ्मयांत त्यांना पहा, त्यांची अहर्निशीं करुणा भाका, ते कृपा करतील, हा विश्वास बाळगा. त्यांत च आपलें, आपल्या धर्माचें, आपल्या राष्ट्राचें कल्याण आहे, हें निश्चित समजा."

(५) सर्वांच्या पुत्रपौत्रादिकांना ती. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं विनंति करावी हें ठीक, पण त्यांच्या स्वतःच्या पुत्रपौत्रादिकांनीं आणि जवळच्या नातलगांनीं, इतरांसमवेत आपल्याला त्यांनीं जाहीर रीतीनें केलेली ही विनंति त्यांची आज्ञा म्हणून समजली पाहिजे आणि तशी ती पाळली पाहिजे. सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेच्या सभेंत संस्थेच्या नांवाचा प्रश्न निघाला असतां, इतकें मोठें नांव कशाला, आज मोठें नांव घ्यावें, आणि उद्यां ते बुडवावें, हें बरें नाहीं, असा आक्षेप घेण्यांत आला असतां, आपण जिवंत आहों तोंपर्यंत तरी सभेचें नांव बुडूं देणार नाहीं, असें आपण कसें बोलून गेलों, ही हकिकत त्या लेखांत त्यांनीं दिलेली आहे. आणि त्याप्रमाणें तें नांव त्यांनीं टिकविलें, आणि ती संस्था आजपर्यंत चालविली. तें नांव यापुढें हि चालावें, ती संस्था नंतर हि कार्य करीत रहावी, असें च कोणाला हि वाटेल! मग आम्हांला वाटल्यास त्यांत नवल नाहीं. सत्कार्योत्तेजक सभेकडे पहाण्याची आमची ही अशी दृष्टि आहे. या भावनेनें आम्ही या कार्याकडे पहातों. त्या दृष्टीनें आम्ही आमचें म्हणणें ती. शंकर श्रीकृष्ण देव यांच्यापुढें मांडलें, आणि त्यांना तें मान्य होऊन त्यांनीं आशीर्वाद दिला. म्हणून आम्ही (१) दत्तात्रय त्रिंबक देव, प्रवरासंगम, (२) नरहर त्रिंबक देव, अंमळनेर, (३) रामचंद्र त्रिंबक देव, अंमळनेर, (४) गणेश शंकर देव, धुळें, (५) काशीताई जोशी, अकोला, (६) मोरेश्वर शंकर देव, अकोला, (७) सौ. येसुताई चापेकर, ठाणें, (८) विनायक शंकर देव, धुळें, (९) सौ. कमलाताई काळे, नाशिक, (१०) सौ. अनसूयाबाई जोशी, बिलासपूर, (११) गणेश गोविंद टकले, चांदा, (१२) दत्तात्रय वासुदेव शिदोरे, उमरावती, (१३) नरहर वासुदेव शिदोरे, धुळें, आणि (१४) महादेव वासुदेव शिदोरे, उमरावती, असे देवांचे पुतणे, सुलगे, मुली आणि भाचे या चौदा जणांनीं सत्कार्योत्तेजक सभेचे सभासद होऊन ही सभा संस्थानोंदणीच्या कायद्याप्रमाणें नोंदून घेतली आहे.

(६) सत्कार्योत्तेजक सभेचें प्रकाशनकार्य तर चालू राहील च. त्यासाठीं आणि सभेच्या कार्याचा व्याप वाढवा म्हणून सभेचें एक सभागृह असणें

आवश्यक आहे, असें वाटतें. त्याविषयींची माझी कल्पना अशी आहे. श्रीसमर्थवाग्देवतामंदिराला ग्रंथालयाची जरूर आहे. वाग्देवतामंदिराच्या मालकीची अभ्यागताश्रमाच्या आवारांत वरी च मोकळी जागा आहे. किंबहुना ग्रंथालयासाठीं म्हणून च ती जागा मोकळी ठेवण्यांत आली आहे. मंदिरानें आणि सभेनें मिळून १०००० रुपये जमवावे, त्यांतून वरील जागेंत टुमदार दुमजली इमारत बांधावी, एका मजल्यावर सत्कार्योत्तेजक सभेचा व्याप चालावा आणि एका मजल्यावर वाग्देवतामंदिराचें ग्रंथालय व्हावें. ही दुमजली इमारत आणि ग्रंथालयांतील ग्रंथ वगैरे यावर **मंदिराची मालकी** राहील, सभेच्या सामानावर **सभेची मालकी** राहील, मात्र सभेचें कार्य चालू आहे तोपर्यंत ती इमारत आणि तें ग्रंथालय सभेच्या ताब्यांत रहातील. या ग्रंथालयाला ती. शंकर श्रीकृष्ण देव यांचा खाजगी ग्रंथसंग्रह नजर मिळणार च, हें न सांगतां हि समजण्यासारखें आहे. अर्थात च सत्कार्योत्तेजक सभा आणि श्रीसमर्थवाग्देवतामंदिर या दोन्हीं संस्थांच्या सभासदांना त्या ग्रंथालयाचा उपयोग करितां येईल. सध्यांची स्थिति निवळतां च हें कार्य हातीं घ्यावें, दरम्यान त्यासाठीं लागणारा द्रव्यनिधी जमवावा, असें ठरलें आहे. शक १८६५ ज्येष्ठ शु. १३ ला व्हावयाच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिराच्या विश्वस्तांच्या सभेंत या योजनेचा विचार होईल आणि तिला त्यांची संमति मिळेल असा विश्वास वाटतो.

(७) सभेचा १०००० चा कायमनिधी हि असावा, आणि त्याच्या व्याजाचा विनियोग सभेच्या खर्चाकडे करण्यांत यावा, अशी हि एक कल्पना आहे. सभागृहाचे १०००० व कायमनिधीचे १००००, निःसंशय रकमा मोठ्या आहेत. पण समर्थाभिमानी महाराष्ट्राला अशक्य असें कांहीं च नाहीं.

(८) नोंदलेल्या सत्कार्योत्तेजक सभेची घटना पहिल्या परिशिष्टांत दिली आहे. प्रत्येक समर्थाभिमानी व्यक्तीनें सत्कार्योत्तेजक सभेचे सभासद व्हावें, अशी विनंति येथें च करून ठेवली तर चालेल ना? सभेचे हेतु मुद्दाम च फार व्यापक ठेवले आहेत. अशासाठीं कीं, कोणतें हि कार्य करण्यास अडचण पडूं नये. कोणतें कार्य आणि कसें व्हावयाचें हें अर्थात च सभेला मिळणाऱ्या मनुष्यबळावर आणि द्रव्यबळावर अवलंबून आहे.

(९) विश्वास वाटतो कीं, आमचा हा प्रयत्न यशस्वी होईल आणि सभा व्यापक होऊन तिचा व्याप सारखा वाढत जाईल. श्रीसमर्थांची कृपा, श्रेष्ठांचा आशीर्वाद आणि महाराष्ट्राची सहानुभूति काय करूं शकणार नाहींत? आम्ही इतकें च जाणतों कीं, त्यांच्यावर सर्वस्वीं भार टाकावा आणि निर्धास्त पुढें चालावें.

(१०) शेवटीं सर्वांना प्रार्थना इतकी च कीं, **सत्कार्योत्तेजक सभा चिरायु होवो** असा आपणा सर्वांचा आशीर्वाद असावा.

(४५)

॥ श्रीरामसमर्थ ॥

## प्रार्थना

नानादेवसमारंभा राष्ट्रधर्मप्रकाशिका ।
सदाप्पारणदीपाढ्या सत्कार्योत्तेजिका सभा ॥ १

यस्याः प्रयत्नकृतनिश्चयिभिस्सुसभ्यै —।
र्निद्राक्षुधादितनुपोषणमप्युपेक्ष्य ।
ग्रंथास्समर्थपथगादिमठेषु गुप्ताः ।
संगृह्य लोककुशलाय सुमुद्रिताश्च ॥ २

जीर्णोद्धारनिधिं विधाय कतिचित् स्थानानि संस्कृत्य स-
ज्जम्बुक्षेत्रगते समर्थजननस्थाने बृहन्मंदिरम् ।
कृत्वा सुप्रतिमां निधाय च ततः स्कन्धाख्यदेशे महद् ।
ग्रंथानां निचयाय सुष्ठु रचितं वाग्देवतामंदिरम् ॥ ३

समर्थग्रंथगर्भस्य सम्यगभ्याससिद्धये ।
कृतः समर्थसङ्घोऽथ हृदयं च प्रकाशितम् ॥ ४

तस्याः समर्थभक्तानां हृदयानंदवर्धनः ।
पञ्चाशदब्दभूतोऽयं भूयात् स्वर्णमहोत्सवः ॥ ५

श्रीसमर्थभवनम्, मंगळूर
फाल्गुन शुद्ध ४ शके १८६४

दुर्गाराम बाल हरिदास

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

# परिशिष्टें

# परिशिष्ट पहिलें

संस्थानोंदणीच्या १८६० च्या २१ व्या कायद्यान्वयें नोंदलेली

## सत्कार्योत्तेजक सभा–धुळें

ता. १४-४-१९४३ ( १८६५ श्रीरामसमर्थनवमी ) च्या सभेंत मंजूर झालेली

## संस्थेची घटना

[ सत्कार्योत्तेजक सभेची स्थापना शके १८१५ ज्येष्ठ शुद्ध ४ या दिवशीं झाली, म्हणजे १८६५ च्या ज्येष्ठ शुद्ध ४ ला सभेची स्थापना होऊन बरोबर पन्नास वर्षे होतात. या पन्नास वर्षांच्या अवधींत सभेचा सर्व कारभार एकतंत्री चालला, परंतु यापुढें तसा च तो चालणें शक्य नव्हे आणि एका दृष्टीनें इष्ट हि नव्हे. म्हणून ज्यांनीं सभेचा भार आतांपर्यंत पन्नास वर्षे सारखा वाहिला त्यांच्यावरील तो भार कृतज्ञतापूर्वक उतरून यापुढें संघटित रीतीनें अनेकांनीं स्वीकरावा, असें ठरवून संस्थानोंदणीच्या कायद्याप्रमाणें सत्कार्योत्तेजक सभा नोंदविण्यांत आली आहे. ]

### ( १ ) संस्थेचें नांव

( १ ) या संस्थेचें नांव "सत्कार्योत्तेजक सभा–धुळें" असें आहे.

### ( २ ) हेतु

( १ ) श्री रामदासी वाङ्मयाचें संशोधन व प्रकाशन करणें,

( २ ) इतर वाङ्मयाचें संशोधन व प्रकाशन करणें,

( ३ ) सदरहु वाङ्मयाच्या अभ्यासाला प्रोत्साहन देणें,

( ४ ) भारतवर्षाच्या, विशेषतः मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचें संशोधन व प्रकाशन करणें,

( ५ ) इतिहास व इतिहासशास्त्र यांचा अभ्यास करणें,

( ६ ) महाराष्ट्रधर्माचा विचार आणि प्रसार करणें,

( ७ ) ऐतिहासिक स्थलांचा जीर्णोद्धार करणें,

( ८ ) साधनसामुग्री सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करणें;

( ९ ) अनेकविध मार्गांनीं सत्पुरुषांची, विशेषत: श्रीसमर्थांची सेवा करणें, व

(१०) या हेतूंना धरून जरूर ती योजना वेळोवेळीं करणें.

## (३) उद्देश तडीस नेण्याचीं कांहीं साधनें

(१) श्री रामदास आणि रामदासी, इतिहास आणि ऐतिहासिक, कवि आणि काव्य, महाराष्ट्रधर्म इत्यादि ग्रंथमाला व मासिकें चालविणें,

(२) इतर स्वतंत्र ग्रंथ लिहिणें, प्रकाशित करणें,

(३) काव्येतिहास संग्रहालयें, वाचनालयें, आणि संशोधनमंडळें स्थापणें,

(४) इत्यादि

## (४) सभासद

(१) १००० किंवा जास्त रुपये एकदम किंवा दरसाल रु. १०० देणारे संस्थेचे **आधारस्तंभ सभासद** होत.

(२) ५०० किंवा जास्त रुपये एकदम किंवा दरसाल रु. ५० देणारे संस्थेचे **आश्रयदाते सभासद** होत.

(३) १०० किंवा जास्त रुपये देणारे संस्थेचे **सन्मान्य सभासद** होत.

(४) ५० किंवा जास्त रुपये एकदम देणारे संस्थेचे **सामान्य सभासद** होत.

**टीप** — पहिल्या दोन वर्गांच्या सभासदांना सभेचीं सर्व प्रकाशनें व पुढच्या दोन वर्गांतील सभासदांना श्री रामदासी मासिक हीं नजर करण्यांत येतील.

## (५) व्यवस्था

(१) संस्थेस एक अध्यक्ष, जरूर तर एक उपाध्यक्ष, जरूर तर एक कार्याध्यक्ष आणि एक चिटणीस असावा. या चौघांपैकीं एक खजिनदार असावा. या चौघांपैकीं कोणी वा अन्य सभासद यांस रामदासी मासिकाचे संपादक नेमण्यांत यावें. यांपैकीं कोणती हि जागा कोणत्या हि कारणावरून दरम्यान रिकामी झाल्यास नवीन निवडणूक साधारण सभेनें करावी.

(२) अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, चिटणीस, खजिनदार आणि संपादक हे धरून कार्यकारी मंडळ ७ पेक्षां कमी अगर ११ पेक्षां जास्त नसावें.

(३) कार्यकारी मंडळाची निवडणूक दरसाल वार्षिक सभेंत व्हावी.

(४) अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, चिटणीस, खजिनदार आणि संपादक याशिवाय कार्यकारी मंडळांतील दुसऱ्या एकाद्या सभासदाची जागा कांहीं कारणानें रिकामी झाल्यास ती जागा तात्पुरती भरून काढण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास आहे.

(५) कार्यकारी मंडळाच्या बाहेरचा एक हिशोबतपासनीस असावा, व त्याची निवडणूक वार्षिक सभेंत व्हावी.

## (६) वर्ष

(१) संस्थेचें वर्ष ज्येष्ठ शुद्ध ४ पासून ज्येष्ठ शुद्ध ३ अखेर असावें.

## (७) वार्षिक आणि विशेष साधारण सभा

(१) वार्षिक सभा दरसाल वर्ष संपल्यापासून दोन महिन्यांत भरवावी. अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष यांचा विचार घेऊन चिटणीसांनीं ती सभा बोलवावी.

(२) विशेष साधारण सभा वाटेल तेव्हां बोलाविण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे.

(३) वार्षिक अहवाल मंजूर करणें; अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, चिटणीस, खजिनदार व संपादक, कार्यकारी मंडळाचे इतर सभासद, हिशोब-तपासनीस यांची निवडणूक करणें; मागील सालचा जमाखर्च व पुढील सालच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक मंजूर करणें; वगैरे कामें वार्षिक सभेंत होतील.

## (८) कार्यकारी मंडळाच्या सभा

(१) कार्यकारी मंडळाच्या सभा वर्षांतून निदान चार व्हाव्या. कार्याध्यक्ष आणि अध्यक्ष यांचा विचार घेऊन चिटणीसांनीं त्या सभा बोलवाव्या.

(२) कार्यकारी मंडळानें संस्थेच्या कारभारावर देखरेख ठेवावी.

(३) संस्थेच्या उद्देशांना धरून जरूर तीं कामें करण्याची तजवीज कार्यकारी मंडळानें करावी.

## (९) गणसंख्या

(१) वार्षिक सभा आणि विशेष साधारण सभा यांच्या कामास १५ सभासदांची गणसंख्या असावी.

(२) कार्यकारी मंडळाच्या सभेच्या कामास ४ सभासदांची गणसंख्या असावी.

(३) कोणत्या हि सभेला गणसंख्येकरितां १५ मिनिटें वाट पहावी.

(४) गणसंख्या भरून सभा सुरू झाल्यावर उपस्थित सभासदांची संख्या कमी झाली तरी सभेचें काम चालू राहील.

(५) गणसंख्येच्या अभावीं अगर इतर कारणानें सभा तहकूब झाल्यास, तहकूब ठेवलेल्या सभेची तारीख व वेळ सभा तहकूब करतांना च ठरविण्यांत यावी.

(६) तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता नाहीं.

## ( १० ) सभेची सूचना

( १ ) कोणत्या हि सभेची सूचना निमंत्रणपत्रिकेच्या द्वारा, अगर फिरत्या पत्रकानें, अगर वर्तमानपत्रद्वारा, अगर मासिकद्वारा, सभासदांना देण्यांत यावी.

( २ ) वार्षिक सभेची सूचना ८ दिवस अगोदर आणि विशेष साधारण सभेची सूचना ३ दिवस अगोदर देण्यांत यावी.

( ३ ) अत्यंत जरूरीच्या कामाखेरीज कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना २ दिवस अगोदर देण्यांत यावी.

## ( ११ ) द्रव्यनिधि, मिळकत व दप्तर

( १ ) संस्थेची सर्व स्थावर जंगम मिळकत कार्यकारी मंडळाच्या ताब्यांत राहील. संस्थेनें आपलें **सभागृह** श्रीसमर्थवाग्देवतामंदिराच्या जागेंत बांधल्यास त्या इमारतीवर श्रीसमर्थवाग्देवतामंदिराची मालकी राहील. मात्र कोणत्या हि कारणावरून सभा बंद पडल्यास सदरहु इमारतीचा ताबा हि श्रीसमर्थवाग्देवता-मंदिराकडे जाईल.

( २ ) संस्थेचे दप्तर चिटणीसाजवळ राहील.

( ३ ) संस्थेचे पैसे कार्यकारी मंडळ ठरवील त्या ठिकाणीं ठेवावे.

## ( १२ ) किरकोळ

( १ ) संस्थेच्या कोणत्या हि सभेपुढें येणाऱ्या प्रश्नांचा निकाल मताधिक्यानें होईल. मतें सारखी पडल्यास सभेच्या अध्यक्षांना आपल्या मताशिवाय आणखी एक निर्णायक मत देतां येईल.

( २ ) सभेंत अध्यक्ष नसतील तर उपाध्यक्ष, आणि दोघे हि नसतील तर कार्याध्यक्ष सभेच्या अध्यक्षाचें काम करतील. या तिघांच्या अभावीं सभासदांनीं आपणांपैकीं एकास सभेचे अध्यक्ष निवडावें.

( ३ ) सभेच्या अध्यक्षांना कोणतें हि काम ऐन वेळीं सभेपुढें मांडतां येईल, अगर मांडण्यास परवानगी देतां येईल.

( ४ ) एकाद्या अत्यंत जरूरीच्या प्रश्नावर सभासदांचें मत फिरत्या पत्रकाच्या द्वारा घेतां येईल.

( २ )

# परिशिष्ट दुसरें

## सत्कार्योत्तेजक सभेचें ५० वर्षांचें प्रकाशन

( शक १८१५ ज्येष्ठ शुद्ध ४ ते १८६५ ज्येष्ठ शुद्ध ४ )

श्री रामदास आणि रामदासी ग्रंथमाला, श्री रामदास आणि रामदासी मासिक पुस्तक, श्री इतिहास आणि ऐतिहासिक मासिक पुस्तक, आणि स्वतंत्र पुस्तकें यांच्या द्वारा सत्कार्योत्तेजक सभेचें आजपर्यंतचें प्रकाशन झालें. सत्कार्योत्तेजक सभेच्या या ५० वर्षांच्या अवधींतील प्रकाशनाची नोंद एके ठिकाणीं कोठेंतरी केलेली असावी, म्हणून ती तपशीलवार येथें दिली आहे.

( १ )

### श्री रामदास आणि रामदासी ग्रंथमाला

| ग्रंथाचें नांव | पृष्ठें |
|---|---|
| ( १ ) श्रीमत् दासबोध ( आवृत्ति सहावी ) ... | ८०० |
| ( २ ) श्री समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें ... ... | २५२ |
| ( ३ ) श्री रामदासांची कविता, प्रथम खंड ... | ५७२ |
| ( ४ ) श्री रामीरामदासांची कविता ... ... | ५५२ |
| ( ५ ) श्री श्लोक मनाचे ( आवृत्ति सहावी ) ... ... | २७१ |
| ( ६ ) श्री स्वानुभवदिनकर ... ... ... | ५४२ |
| ( ७ ) श्री दासविश्रामधाम ... ... ... | ९९८ |
| ( ८ ) श्री समर्थप्रताप ... ... ... | २३६ |
| ( ९ ) श्री संप्रदायाचीं कागदपत्रें, खंड पहिला ... | ५३५ |
| ( १० ) श्री करुणाष्टकें ( आवृत्ति पहिली ) ... ... | २३४ |
| ( ११ ) श्री समर्थांचीं लघुकाव्यें ... ... | ३०७ |
| ( १२ ) श्री सीतास्वयंवर ... ... ... | १६२ |
| ( १३ ) श्री रामदासपंथक्रमसार ... ... ... | ७२ |
| ( १४ ) श्री निवृत्तिराम ... ... ... | १९० |
| ( १५ ) श्री सांप्रदायिक विविध विषय, प्रथम खंड ... | ३८८ |
| ( १६ ) श्री दिनकरांची स्फुट कविता ... ... | ३७० |
| ( १७ ) श्री सांप्रदायिक विविध विषय, द्वितीय खंड ... | २२१ |

| | | |
|---|---|---|
| ( १८ ) | श्री रामसोहळा ... ... ... | ६४१ |
| ( १९ ) | श्री संप्रदायाचीं कागदपत्रें, द्वितीय खंड ... | २३० |
| ( २० ) | श्रीमत् दासबोधाची किल्ली ... ... | ९२ |
| ( २१ ) | श्री सांप्रदायिक विविध विषय, तृतीय खंड ... | १९४ |
| ( २२ ) | श्री संप्रदायाचीं कागदपत्रें, तृतीय खंड ... | १२६ |
| ( २३ ) | श्री संकेतरामायण ... ... ... | ४८७ |
| ( २४ ) | श्री हकिकतवाके ... ... ... | ८० |
| ( २५ ) | श्री समर्थकृत पदपदांतरें ... | ३११ |
| ( २६ ) | श्री सांप्रदायिक विविध विषय, चतुर्थ खंड | ६० |
| ( २७ ) | श्री भक्तमंजरी माला | |
| | खंड पहिला ... ... | २७२ |
| | खंड दुसरा ... ... | २४४ |
| | खंड तिसरा ... ... | ३७५ |
| ( २८ ) | श्री रामदासी संशोधन-देवांनीं केलेलें | |
| | खंड पहिला ... ... | ४८८ |
| | खंड दुसरा ... ... | ६२६ |
| ( २९ ) | श्री रामदासीचीं ऐतिहासिक टिपणें-देवकृत ... ... | ८४ |
| ( ३० ) | श्री रामदासीचीं ऐतिहासिक कागदपत्रें ... ... | १०६ |
| | ( १ ) कारी व आंबवडे-जेधे देशमुख | |
| ( ३१ ) | पहिला सुमनहार ( अनेकांच्या सुमनांचा ) ... | ४०० |
| ( ३२ ) | श्री भीमोपदेश ... ... ... | ४२० |
| ( ३३ ) | दुसरा सुमनहार ( अनेकांच्या सुमनांचा ) ... | १८३ |
| ( ३४ ) | तिसरा सुमनहार ( अनेकांच्या सुमनांचा ) ... | २२७ |
| ( ३५ ) | श्री मंगलरामायण ... ... ... | २१८ |
| ( ३६ ) | श्री रामदासीचीं ऐतिहासिक कागदपत्रें ... | ८३ |
| | ( २ ) नरसीपुर-सावंत | |
| ( ३७ ) | श्री गिरिधरांचीं रामायणें ... ... | २८४ |
| ( ३८ ) | श्री श्लोक मनाचे, भाष्य, संगति आणि सार - भावेकृत | १५४ |
| ( ३९ ) | चौथा सुमनहार ( अनेकांच्या सुमनांचा ) .... | १२९ |
| ( ४० ) | पांचवा सुमनहार ( अनेकांच्या सुमनांचा ) ... | १८४ |
| ( ४१ ) | श्री समर्थांचें पंचविध दर्शन - बालस्वामीकृत .... | १०४ |
| ( ४२ ) | श्री रामदासीचीं ऐतिहासिक कागदपत्रें ... | १२८ |

(३) चौल – अधिकारी
(४) इंगळी – देशपांडे

| | | | |
|---|---|---|---|
| (४३) | श्री वेणाबाईकृत रामायण | ... ... | १५४ |
| (४४) | सहावा सुमनहार (अनेकांच्या सुमनांचा) | ... | १४४ |
| (५०) | सत्कार्योत्तेजक सभा – सुवर्ण महोत्सव ग्रंथ | ... | ५०० |
| (१२१) | श्रीसमर्थ चरित्र – देवांनीं लिहिलेलें द्वितीय खंड – श्रीसमर्थहृदय | ... | ६०८ |
| ४६ | | | १५०३८ |

याप्रमाणें श्री रामदास आणि रामदासी ग्रंथमालेचे ४६ भाग आतांपर्यंत प्रकाशित झाले आहेत. या ४६ भागांपैकीं १ ते १०, १२, ३१, ५० आणि १२१ हे १४ भाग स्वतंत्र ग्रंथरुपानें प्रसिद्ध झाले. बाकीचे भाग श्री रामदास आणि रामदासी मासिकांतून दरमहा खंडशः प्रसिद्ध होत गेले.

" श्रीमत् दासबोध " व " श्री मनाचे श्लोक – सटीक " यांच्या सहा सहा आवृत्त्या निघाल्या. सर्व आवृत्त्या मिळून दासबोधाच्या १९००० प्रती व सटीक मनाच्या श्लोकांच्या २५००० प्रती होतात. श्री समर्थांच्या करुणाष्टकांची २००० ची दुसरी आवृत्ति आणि श्रीसमर्थहृदय हे दोन ग्रंथ रा. ढवळे यांनीं प्रकाशित केले आहेत. याशिवाय " श्रीमत् दासबोधाची प्रस्तावना " आणि " मनाचे श्लोक – मूळ " यांच्या पांच पांच आवृत्त्या निघाल्या.

## (२)

## श्री इतिहास आणि ऐतिहासिक ग्रंथमाला

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | ऐतिहासिक विविध विषय, खंड पहिला | ... | ३७९ |
| (२) | शिवकालीन घराणीं | ... ... ... | ३६० |
| (३) | पेशवाईची अखेर | ... .... ... | २१६ |
| (४) | ऐतिहासिक विविध विषय, द्वितीय खंड | ... | १९२ |
| (५) | शिवकालीन घराणीं (अपूर्ण) | ... ... | १३६ |
| (६) | ऐतिहासिक विविध विषय, तृतीय खंड (अपूर्ण) | ... | ३२ |
| (८) | संस्कृत भाषेचा उलगडा-राजवाडेकृत | ... | १३३ |
| ७ | | | १४४८ |

हे सर्व ग्रंथ " श्री इतिहास आणि ऐतिहासिक " मासिकांतून खंडशः प्रसिद्ध झाले.

## (३)

### श्री महाराष्ट्रधर्म ग्रंथमाला

| | | |
|---|---|---|
| (१) | ज्ञानेश्वरी ... ... ... | १२४ |
| (श्री) | श्री ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण—राजवाडेकृत | १५८ |
| (२) | बालबोध ... ... ... | ३५६ |
| (३) | योगवासिष्ठ ... ... ... | ११५ |
| (४) | महाराष्ट्रधर्म-भटकृत ... ... | ५२२ |
| ५ | | २०७५ |

यांपैकीं फक्त चौथा भाग "महाराष्ट्रधर्म" हा "श्री रामदास आणि रामदासी" मासिकांतून खंडशः प्रसिद्ध झाला. बाकीचे चार हि ग्रंथ स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले.

## (४)

### सभेचीं इतर पुस्तकें

#### (अ) रामदासी मासिकांतून प्रसिद्ध झालेलीं

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड पहिला ... | ३७६ |
| (२) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड दुसरा ... | १४४ |
| (३) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड तिसरा ... | १५६ |
| (४) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड चवथा ... | १४८ |
| (५) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड पांचवा ... | ८८ |
| (६) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड सहावा ... | ३३२ |
| (७) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड सातवा ... | १८६ |
| (८) | श्री सांप्रदायिक वृत्त, चर्चा वगैरे, खंड आठवा ... | ९६ |
| ८ | | १५२६ |

#### (आ) मासिक वा ग्रंथमाला यांतून प्रसिद्ध न झालेलीं स्वतंत्र पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| (१) | छत्रपति श्री शिवाजी महाराज व शिवजन्मोत्सव — पिंपळखरेकृत | ८३ |
| (२) | जपानची मर्दुमकी – देववर्णित – दुसरी आवृत्ति | १५८ |
| (३) | कैलासमानससरोवरदर्शन — नाटेकरकृत .... | १९० |
| (४) | आपण कोण — देवांचें व्याख्यान .... | २८ |
| (५) | आर्यलिपी — चांदोरकरांचा निबंध ... | ४७ |
| ५ | | ५३३ |

(५)

याशिवाय श्री रामदास आणि रामदासी या ग्रंथमालेच्या "सांप्रदायिक विविध विषय" या भागांत प्रसिद्ध झालेले देवांनीं लिहिलेले श्रीसमर्थांच्या शिकवणीचे सोळा धडे, "श्रीसमर्थांची शिकवण" (पृष्ठसंख्या ११७), व "श्रीमत् दासबोधाचे कर्ते दुसरे कोण असणार?" (पृष्ठसंख्या ७२), आणि स्वतंत्र पुस्तकरुपानें प्रसिद्ध झालेली देवांची "श्रीमत् दासबोधाची प्रस्तावना" (पृष्ठसंख्या १४६), याप्रमाणें तीन पुस्तकें सभेनें प्रकाशित केलीं आहेत. दासबोधाच्या प्रस्तावनेच्या तर सभेनें पांच आवृत्त्या काढल्या.

सारांश, या पन्नास वर्षांत सत्कार्योत्तेजक सभेनें **२०९५५ पृष्ठांचे लहान मोठे ७४ ग्रंथ** प्रकाशित केले.

# परिशिष्ट तिसरें

## सत्कार्योत्तेजक सभेचे ५० वर्षांतील लेखक

( शक १८१५ ते १८६५=सन १८९३ ते १९४३ )

### सूची

#### संक्षिप्तांचा खुलासा

रा. भा. –रामदास आणि रामदासी ग्रंथमाला भाग
रं. रा. मा. अं. –रंगीत पृष्ठें, रामदासी मासिक अंक
रं. अभि. रा. मा. अं. –रंगीत पृष्ठें, अभिप्राय, रामदासी मासिक अंक
वृ. च. खं. –वृत्त, चर्चा, खंड
ऐ. भा. –इतिहास आणि ऐतिहासिक ग्रंथमाला भाग
रं. ऐ. मा. अं. –रंगीत पृष्ठें, ऐतिहासिक मासिक अंक
म. भा. –महाराष्ट्रधर्मग्रंथमाला भाग
ले. –लेखांक
इ. –इतर पुस्तकें

॥ श्रीरामसमर्थ ॥

### लेखकांची सूचि

**अनंतदास रामदासी**, गिरड
रा. भा. ३१ ले, १४; ३४–१९; ३९–१४; ४०–४, १३; ५०–१०
वृ. च. खं. ४ ले. १६०; ६–१६८; ८–२७८

**अनुवाद**
रा. भा. १७ ले ८६

**अळतेकर, गणेश सदाशिव**, कऱ्हाड
रा. भा. ३९ ले. ९

**अळतेकर, (प्रो.) माधव दामोदर**, मुंबई
रा. भा. ३१ ले. ८

**अळतेकर, सदाशिव खंडो**, कऱ्हाड
रा. भा. ३१ ले. १५; ३३–४

**आठवले, रामचंद्र महादेव,** ठाणें

रा. भा. ३१ ले. २८

**आ. प.** धुळें

रं. अभि. रा. मा. अं. २११, २१२

**आपटे, मोरेश्वर हरि,** धुळें

रा. भा. ३१ ले. २७

**ओक,** प्रिन्सिपॉल **दामोदर केशव,** नागपूर

रा. भा. ४० ले. १०, ११; ४४-४, १२; ५०-२६

**ओगले, केशव लक्ष्मण,**

रा. भा. १४-प्रस्तावना; १८-प्रस्तावना

**ओतुरकर,** प्रो. **रा. वि.,** पुणें

रा. भा. ५० ले. ३१

**इंदुमती,** धुळें

रं. अभि. रा. मा. अं. -२४८

**करंदीकर, जनार्दन सखाराम,** पुणें

रा. भा. ३१ ले. ३; ३३-१; ३४-४, १५; ३९-१०; ५०-३९

**करंदीकर, सदाशिव नारायण,** चाळीसगांव

रा. भा. ३१ ले. १९

**कवीश्वर, गजानन वासुदेव,** इंदूर

रा. भा. ५० ले. १६

**कानेटकर,** (प्रो.) **शंकर केशव,** सांगली

रा. भा. ३१ ले. ५; ५०-३४

**कारखानीस, गणेश गोविंद,** विजापूर

रा. भा. ४० ले. १४, १५, १७; ४४-८, ११, १३, १५, १६, २०, २१; ५०-८

वृ. च. खं. ८ ले. २९०, २९१

**काळे, द. गो.,** पुणें

रा. भा. ३१ ले. ६

वृ. च. खं. ६ ले. १९१

**काळे, दिनकर विनायक,** पुणें

वृ. च. खं. १ ले. ९२

**कुवलयानंद,** लोणावळें

रं. रा. मा. अं. ३९

**कुळकर्णी, गोपाळ लक्ष्मण,** खांडवा
रा. भा. ३१ ले. २३

**कुळकर्णी, स. बा.,** भुसावळ
रा. भा. ४४ ले ५

**केदार, तुकाराम जयराम,** नागपूर
रा. भा. ४४ ले. ३

**केळकर, (सौ.) गिरिजाबाई,** जळगांव
रा. भा. ३३ ले. ७

**केळकर, नरसिंह चिंतामण,** पुणें
रा. भा. ३१ ले. ७

**कोटणीस, रघुनाथ हणमंत,** सांगली
बृ. च. खं. १ ले. ८६

**खरे, त्र्यंबक भास्कर शास्त्री,** मुंबई व नागपूर
रा. भा. ३१ ले. ३४

**खुपेरकर, बाळाचार्य,** कोल्हापूर
रा. भा. ५० ले. १८

**खेर, महादेव काशीनाथ,** इंदूर
रा. भा. ३४ ले २०; ३९-१२; ४०-३

**गद्रे, त्रिंबक रामकृष्ण,** अकोला
रा. भा. ३१ ले. २६; ३३-२; ३४-१, ११; ३९-३; ४०-२; ४४-६; ५०-११

**गोखले, चिं. ह.,** मनमाड
रा. भा. ३१ ले. २९

**गोगटे, गोपाळ रावजी,** भुसावळ
रा. भा. ३१ ले. १७; ३३-१०; ३४-८, १८; ४४-१९; ५०-५
रं. रा. मा. अं. २३१
रं. अभि. रा. मा. अं. २११, २२०, २३४
बृ. च. खं. ७ ले. २३४; ८-२९२

**गोडबोले, के. वि.,** फलटण
रा. मा. अंक १०५

**गोविंदबुवा रामदासी,** पावनगड
रं. रा. मा. अं. २३१

**गोसावी**, आचार्य **श्रीराम**, नाशीक
रा. भा. ५० ले. ३०
**घरत, रा. ल.**, सासवनें
रं. रा. मा. अं. २३१
**घारपुरे**, प्रिन्सिपॉल **जगन्नाथ रघुनाथ**, मुंबई
रा. भा. ५० ले. २९
**चरणकिंकर**
वृ. च. खं १ ले. ८१
**चांदोरकर, गोविंद काशिनाथ**, धुळें
ऐ. भा. १ ले. १६, १७; ३–उपोद्घात; ४–२८, ३५; ६-३९
रं. ऐ. मा. अं. ७, २६, २७
म. भा. २–प्रस्तावना; ३–प्रस्तावना
इ–आर्यलिपी, प्रभात मासिक
**चापेकर, नारायण गोविंद**, बदलापुर
रा. भा. ३१ ले. ४
**चिपळूणकर, वासुदेव लक्ष्मण**, अकोला
रा. भा. ५० ले. १३
**चौंडे**, (महाराज) **बाळकृष्ण मार्तंड**, वांई
रा. भा. ३१ ले. २
रं. रा. मा. अं. ४५
**जनस्थानवासी**
रं. रा. मा. अं. २७
**जोग, त्रिंबक बाळकृष्ण**, वर्धा
रं. रा. मा. अं. ४८
**जोग, बबन**, धुळें
रा. भा. ३९ ले. ७
रं. रा. मा. अं. २३०
**जोग**, प्रो. **रामचंद्र श्रीपाद**, पुणें
रा. भा. ५० ले. ३२
**जोगळेकर, धोंडो केशव**, चाळीसगांव
रा. भा. ४० ले. १, १२
**जोशी, नारायण गजानन**, अहमदाबाद
रा. भा. ४४ ले. ९

जोशी, बाळकृष्ण भाऊ, पुणें
वृ. च. खं १ ले. ३८, ३९, ४१
जोशी, सर मोरोपंत, उमरावती
रा. भा. ५० ले. २५
जोशी, रा दा., सोलापुर
रं. रा. मा. अं. २२५
जोशी, विष्णु बाळकृष्ण, कन्नड
रा. भा. ४४ ले. १०
टिळक, अनंत विश्वनाथ, धुळें
रा. भा. ३३ ले. ८; ३४-१४; ३९-८
ठाकूर, वासुदेव वामन, इंदूर
रा. भा. ३४ ले. १६
ठोंबरे, अमृतराव, जांब
रा. भा. ३१ ले. १८
डांगे, के. ना., मंदसोर
रा. भा. ५०-७
डोळे, (वेनुदास) शंकर सखाराम, पुणें
रा. भा, ३१ ले १६; ४०-६
तगारे, गणेश वासुदेव, शिराळें
वृ. च. खं. ६ ले. १७७
तटस्थ, धुळें
रं. रा. मा. अं. २११
रं. अभि. रा. मा. अं. २११
तरटे, मार्तंड बळवंत, धुळें
रा. भा. ३९ ले. २
तळवलकर, वामन दामोदर, पुणें
वृ. च. खं. ३ ले. १२८, १३१; १३४, १३५
दाणी, वा. कृ., दारव्हा
रा. भा. ५० ले. २३
दांडेकर, (प्रो.) शंकर वामन, मुंबई
रा. भा. ३३ ले. १२; ५० - ३७
दीक्षित, होराभूषण, पुणें
रा. भा. ५० ले. ४२

**दीक्षित, कृष्णाजी शंकर,** पुणें

**रा. भा.** ५० ले. २

**दुर्गाराम बालहरिदास रामदासी,** मंगलूर

**रा. भा.** ३१ ले. ३३; ३९–५; ४०–१६; ५०–४५

**देव, गणेश शंकर,** धुळें

**रा. भा.** ३१ ले. १; ३४–१२; ३५–प्रस्तावना; ३७–प्रस्तावना; ३९–प्रस्तावना; ४०–८, प्रस्तावना; ४१–प्रस्तावना; ४३–प्रस्तावना; ४४–७, प्रस्तावना; ५०–प्रस्तावना, १, ३, १७, ४४

**रं. रा. मा. अं.** १९३ ते १९५, १९८, २०३ ते २०७, २१३ ते २१६, २१८, २२१, २२३, २२४, २२७ ते २३०, २३३, २३४, २३६, २४०, २४२, २४३, २४८

**रं. अभि. रा. मा. अं.** १९५, १९९, २०१ ते २०३, २११, २१२, २१८, २१९, २२१, २२७, २३२

**वृ. च. खं.** ७ ले. २३७, २६२, प्रस्तावना; ८–२८४ टीप २८६ (१०)

**देव, शंकर श्रीकृष्ण,** धुळें

**रा. भा. १ ते १४**–प्रस्तावना; १५ ले. १ ते २०, २२ ते २५, २७, २८, ३० ते ३३, ३५, ३६, ३८ ते ४१, ४३, ४५ ते ५७, प्रस्तावना; १६–प्रस्तावना; १७–५८ ते ६४, ६८ ते ७१, ७३ ते ७९, ८१ ते ८४, ८७, ८८, ९० ते ९३, दोन शब्द; १९–दोन च शब्द; २०–प्रस्तावना; २१–९४, ९५, ९७ ते १०३, १०६, १०८ ते ११०, दोन शब्द; २२–सूचना; २३–दोन शब्द; २४–प्रस्तावना; २५–प्रस्तावना; २६–१११; २७–खं. १–प्रस्तावना; २८–श्री रामदासी संशोधन, खंड १ व २; २९–टिपणें १ ते १२, दोन शब्द; ३०–प्रस्तावना; ३१–३५, प्रस्तावना; ३२–प्रस्तावना; ३३–१३, प्रस्तावना; ३४–६, ७, १०, प्रस्तावना; ३६–प्रस्तावना; ३८–प्रस्तावना; ३९–१५; ४०–५, ९; ४२–प्रास्ताविक टिपण; ५०–४३; १२१–श्रीसमर्थचरित्र, द्वितीय खंड, श्रीसमर्थहृदय

**रं. रा. मा. अं.** १ ते १४२, १४५ ते १९२, १९६ ते २००, २०२, २०८ ते २१०, २१२ ते २१६, २१८ ते २२०,

२२२, २२३, २२५, २२६, २२८, २३२, २३४, २३६ ते २३९, २४१ ते २४७, २४९ ते २५२

**रं. अभि. रा. मा. अं.** १९४, २०२, २०७, २१९, २२०, २२३, २२६, २२७, २२९, २३३

**वृ. च. खं.** १ ले. १ ते १२, १४ ते २८, ३० ते ३७, ४०, ४२ ते ४६, ४८ ते ५१, ५३ ते ६२, ६४ ते ७९, ८२ ते ८५, ८७ ते ९१, ९३ ते १०४; २-१०५ ते १०७, १०९, १११, ११२, ११५ ते १२५, ३-१२७, १२९, १३२ ते १३४, १३६ ते १४२; ४-१४३ ते १५९; ५-१६१, १६२; ६-१६३ ते १६७, १६९ ते १७६, १७८ ते १९०, १९२ ते २२१; ७-२२३ ते २२५, २२७, २२८, २३० ते २३३, २३५ २३६, २३८, २३९, २४२ ते २५९, २६१, २६३ ते २६६; ८-२६७ ते २६९, २७२, २७३, २७५ ते २७७, २८० ते २८३, २८७ ते २८९, २९३

**ऐ. भा.** १ ले. १, ३, ६, ९; ६-४३, ४४; ८-चिटणीसाचा खुलासा

**रं. ऐ. मा. अं.** १, ३, ८, १८, २२ ते २४

**इ**-जपानची मर्दुमकी; कैलासमानससरोवरदर्शनाची प्रस्तावना; छत्रपती श्री शिवाजी महाराज व शिवजन्मोत्सव-पहिलीं १५ पृष्ठें आपण कोण ?

**देवधर रामचंद्र हरि,** खामगांव

**रा. भा.** ३१-१३

**देशपांडे, बाबासाहेब,** पुणें

**रा. भा.** ५० ले. २८

**देशपांडे, यादव खुशाल,** यवतमाळ

**रा. भा.** ५० ले. १९

**नाईक, वामनराव,** हैद्राबाद

**रा. भा.** ३१-२२

**नाटेकर, गजानन पांडुरंग,** धुळें

**इ**-कैलासमानससरोवरदर्शन

**नांदेडकर, ए. रा.,** धुळें

**वृ. च. खं.** ७ ले. २२९

**नारायण रामदासी**, मसूर
रा. भा. १७ ले. ८९
**निरंजन**, धुळें
वृ. च. खं. ८ ले. २७१, २७४
**नेने, हरि नारायण**, नागपुर
रा. भा. ५० ले. ३३
**पंडित, राजाराम गणेश**, माहुली
रा. भा. ५० ले. २४
**पंडित, श्रीधर सखाराम**, पुणें
रा. भा. ५० ले. २०
**पागे, विठ्ठल सखाराम**, कऱ्हाड
रा. भा. ३१ ले. ३२
**पांगारकर, लक्ष्मण रामचंद्र**, नाशिक
रं. रा. मा. अं. २३
**पाठक**, ( महामहोपाध्याय ) **श्रीधरशास्त्री** ( शंकरानंद भारती ), धुळें
रा. भा. ३४ ले. ९; ४४-१
**पिंपळखरे, काशीनाथ पांडुरंग**, धुळें
इ-छत्रपती श्री शिवाजी महाराज व शिवजन्मोत्सव
( चैत्र शुद्ध १ शके १८२१ )
**पुणतांबेकर**, प्रो. **श्रीकृष्ण व्यंकटेश**, काशी
रा. भा. ५० ले. १४
**पेंडसे**, ( डॉ. ) **शंकर दामोदर**, नागपूर
रा. भा. ३१ ले. ११, ३९-१; ४०-१८
**पोतदार**, ( प्रो. ) **दत्तो वामन**, पुणें
रा. भा. ३१ ले. २०; वृ. च. खं. ७-२६०
**प्रेषित**
रं. रा. मा. अं. २५
**प्रेष्य**, जांब
रा. भा. ३३ ले. ११
**फाटक**, (प्रो.) **नरहर रघुनाथ**, मुंबई.
रा. भा. ५० ले. ४१
**बनहट्टी**, (प्रो.) **श्रीनिवास नारायण**, नागपुर
रा. भा. ५० ले. ३८

**बापट, ( प्रो. ) प्रभाकर वासुदेव,** ग्वाल्हेर
रा भा ५० ले. ३५
**बालस्वामी,** डोंबिवली
रा. भा. ३३ ले. ५, ९; ४१–श्रीसमर्थांचें पंचविध दर्शन
**बाळ गणू**
रं. रा. भा. अं. ३५
**बेहेरे, प्रो. नारायण केशव,** नागपुर
रा. भा. ५० ले. ६
**भट, भास्कर वामन,** धुळें
रा. भा. ३१ ले. २१; ३४–२; ३९–११; ५०–३६
रं. अभि. रा. भा. अं १०
वृ. च. खं. २–ले. १०८, ११०, ११४, १२६
ऐ. भा. ४ ले. ३४
म. भा. ४– महाराष्ट्रधर्म
**भागवत, ( प्रो. ) राजाराम सखाराम,** ठाणें
रा. भा. ५० ले. १२
**भागवत, विनायक परशुराम,** चाळीसगांव
रा. भा. ३१ ले. ३१
**भागवत, शांताराम शास्त्री,** चांफळकर, राजापुर
रा. भा. ४४ ले. १४
**भाटवडेकर,** कु. **गार्गी,** पी. ए., **मुंबई**
रा. भा. ५० ले. २२
**भावे, शिवाजी न.,** वर्धा
रा. भा.३३ ले. ३; ३८–श्री श्लोक मनाचे, भाष्य, संगति आणि सार
वृ. च. खं. ८ ले. २७०
**भोपटकर, लक्ष्मण बळवंत,** पुणें
रा. भा. ३१ ले. १०
**मराठा**
रं. रा. भा. अं. २२५
**महाजन, भगवंत विनायक,** सोलापूर
रा. भा. ३१ ले. ३०
**महाबळ, कृष्णाजी बळवंत,** नाशिक
रा. भा. ५० ले. ४

**मावळंकर, दादासाहेब**, अहमदाबाद
रा. भा. ३४ ले. १३
**मुंडले, वा. दा.**, इस्लामपुर
वृ. च. खं. १ ले. २९
**मोडक, गो. कृ.**, पुणें
रा. भा. ३१ ले. २५
**M. G.** धुळें
रं. रा. मा. अं. २२४
**यशवंत**, चाफळ
रं. रा. मा. अं. ८२
**रणदिवे, विष्णु सीताराम**, धुळें
रा. भा. ३९ ले. ६
**रसाळ, अमृत बापुजी**, शेवगांव
रा. भा. २१ ले. ९६
**राजवाडे**, ( इतिहासाचार्य ) **विश्वनाथ काशीनाथ**, धुळें
रा. भा. १५ ले. २१, २६, २९, ३४, ३७, ४२, ४४; १७-६५ ते ६७, ७२
वृ. च. खं. १ ले. ५२
ऐ. भा. १ ले. २, ४, ५, ७, ८, १० ते १५, १८ ते २४; ४-२५ ते २७, २९ ते ३३, ३६ ते ३८; ६-४० ते ४२; ८-संस्कृत भाषेचा उलगडा
रं. ऐ. मा. अं. ६, ८ ते १७, १९ ते २१, २३ ते २५, २८ ते ३२
म. भा. १ - प्रस्तावना
इ - ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण
**राजारामबुवा**, पिंपळनेर
रा. भा. ३१ ले. १२
**वणीकर, अनंत सखाराम**, अहमदाबाद
रा. भा. ३९ ले. १३; ४०-७; ५०-२१
**वर्गणीदार**, मासिकाचा एक
रा. भा. २१ ले. १०४
**वाचक, एक**, कोरेगांव
वृ. च. खं. १ ले. ८०

**वाचक, श्रीमत् दासबोधाचा एक**
वृ. च. खं. १ ले. १३
**वाचक, श्री रामदासीचा एक कर्नाटकी**
वृ. च. खं. ६ ले. २२२
**वाटवे,** डॉ. के. ना., पुणें
रा. भा. ५० ले. १५
**विद्यार्थी, बी. ए. चा,** अमरावती
रं. रा. मा. अं. २२६
**विनायक,** धुळें
रं. अभि. रा. मा. अं. २३१, २३९, २४६
**शास्त्री, नरहर दामोदर,** धुळें
रा. भा. ५० ले. २७
रं. अभि. रा. मा. अं. २४३
**शाहीर**
रं. रा. मा. अं. ३९
**शिदोरे, दत्तात्रय वासुदेव,** उमरावती
रा. भा. ३१ ले. २४
**शिदोरे, नरहर वासुदेव,** धुळें
रा. भा. ३४ ले.१७
रं. अभि. रा. मा. अं. २००
वृ. च. खं. ८ ले. २७९
**शेजवलकर, ( प्रो. ) त्र्यंबक शंकर,** पुणें
रा. भा. ३९ ले. ४; ५०-९
**श्रीचरणकिंकर**
रा. भा. २१ ले. १०५
वृ. च. खं. १ ले. ४७
**श्रीचरणाचा किंकर**
रा. भा. २१ ले. १०७
**श्रीधर**
रं. अभि. रा. मा. अं २२२
**श्रीधर स्वामी महाराज,** शिगेहळ्ळी
रा. भा. ४४ ले. १७, १८

**सदाशिव**, वांई
　　रं. रा. मा. अं. २७
**सनईकर, गणपतराव पिराजी**, बडोदे
　　रा. भा. ३३ ले. ६
**सन्मित्र**, एक
　　रं. रा. मा. अं. ३०
**समर्थदास**, इंदुरबोधन
　　रा. भा. १७ ले. ८०, ८५
　　रं. रा. मा. अं. २४४
**सरदेसाई**, (रियासतकार) **गोविंद सखाराम**, कामशेत
　　रा. भा. ३१ ले. ९
**सरदेसाई, यशवंत सूर्यराव**, मुंबई
　　रा. भा. ५० ले. ४०
**साठये, शारदाबाई**, हिंगणें
　　रा. भा. ३४ ले. ३; ३५—प्रस्तावना
　　रं. अभि. रा. मा. अं. १९३, २००, २०१, २०३, २०४, २१८
　　वृ. च. खं. ७ ले. २४०
**साधुदास**, सांगली
　　रं. रा. मा. अं. १०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
सं.
ता.
ठाणें.
REFBK-0006384
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे